# उल्हासनगरमहानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:- ०३/१२/२०२१

दिनांक:- ०३/१२/२०२१ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

१०

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा 'शुक्रवार, दिनांक ०३/१२/२०२१, रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील महापालिका सभागृह येथे मा. अवर सचिव, क्रमांक कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४, दिनांक २२ ऑक्टोंबर, २०२१ च्या पत्रान्वये विहीत कार्यपध्दती पालन करुन प्रत्यक्ष सहभागाने/उपस्थितीने सभा घेण्यात आली, सदर सभेत खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | **सभापती** |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश वदारीया | सदस्य |
| ४ | श्री. भगवान भालेराव | सदस्य |
| ५ | श्री. राजकुमार किशनचंद जग्यासी | सदस्य |
| ६ | श्रीम. जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ७ | श्री. कलवंतसिंह सोहता | सदस्य |
| ८ | श्री. चंद्रशेखर यादव | सदस्य |
| ९ | श्रीम. अर्चना करणकाळे | सदस्या |
| १० | श्रीम. कविता लाल पंजाबी | सदस्या |
| ११ | श्रीम. कंचन अमर लुंड | सदस्या |
| १२ | श्री. रमेश महादेव चव्हाण | सदस्य |
| १३ | श्री. अकाश पाटील | सदस्य |
| १४ | श्री. स्वप्नील बागुल | सदस्य |
| १५ | श्रीम. सुनिता बगाडे | सदस्या |
| १६ | श्री. गजानन शेळके | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य सभेस अनुपस्थित होते/होत्या.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्रीमती करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त, आयुक्ताच्या स्थानी आसनस्थ
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव
३. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त, (मुख्यालय)
४. डॉ. शुभाष जाधव , उप आयुक्त (आरोग्य)

५. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी
६. श्री. विजय खेडकर, प्र. मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. महेश सितलानी, शहर अभियंता
८. श्री. के.जे. रहेजा, कार्यकारी अभियंता
९. श्री. संदिप जाधव, उप अभियंता
१०. श्री. बाळू नेटके, मुख्य अग्निशमन अधिकारी
११. श्री. मनिष हिवरे, सहाय्यक आरोग्य अधिकारी
१२. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
१३. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख

खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती नर्गिस खान
२. श्री. बाळू भांगरे
३. श्रीमती विदया आढळ

सायंकाळी ४.१४ वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त, श्रीम. करुणा जुईकर, या आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ होत्या.

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.१:—** उल्हासनगर-**२** प्रभाग क्र.**६** मधील खेमाणी चौक ते आंबेडकर चौक पेव्हमेंट रोड व नाली बनविणे या कामाचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे.

---

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** कोण सांगणार हे सगळ. रस्ता आला ठिक आहे. खाली रस्त्याचे नाव वाचा. इकडे या.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** मा. सभापती आणि मा. सदस्य हा जो रोड आहे तो खेमानी चौक पासून आंबेडकर रोड पर्यंत जाईल. बजेटमध्ये त्याची नोंद नाही आहे. नाही त्यांचा तर बजेटमध्ये...

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** तुमचे उप अभियंता आहेत ना इथे त्यांना पण बोलवा. आपण मला सांगा. हा रोड किती फुटाचा आहे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी,:-** ६० फुटाचा आहे सर.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** बोलतो मी, हा माझा इश्यु आहे ना. मला आपण दोघे येथे बसले आहेत. आपण किती वर्षापासून महानगरपालिकेत काम करत आहेत.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** ३० वर्ष झाले.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** आणि संदिपला किती वर्ष झाले. सभापती येथे बसले आहेत, आम्ही सदस्य येथे बसलो आहोत. आता सांगा हा रस्ता प्रभाग क्र. ७ मध्ये येतो का ते मला सांगा.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** ६ मध्ये येतो.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** मग ७ चा कसे आम्हांला पाठवले आहे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** टायपिंग चुक आहे सर.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** दुरुस्त करुन आपण परत घेवून या बरोबर आहे ना. जमनुजी आपण समजून नाही घेत हा रस्ता ६ मध्ये आहे. आणि ६ नगरसेवक येथे स्थायी समितीमध्ये बसल्या आहेत. माखिजा मॅडम. हा रस्ता ७ मध्ये आहेच नाही. १ स्क्वेअर फुट पण ७ मध्ये नाही.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** टायपिंग चुक आहे. सर ६ मध्ये येतो आम्ही मान्य करतो.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव :-** मग आम्ही ७ ला कसे परवानगी देणार.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** ६ समजा ना सर. टायपिंग चुक आहे.

**सदस्य, श्री. कुलवंतसिंग सोहता:-** जर बदल करुन आणले तर करु दया.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** मग ठिक करुन दया नंतरच्या वेळेस आता करु शकता का.

**सदस्य, श्री. कुलवंतसिंग सोहता:-** ते मान्य करतात ना.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** आता ठिक करुन आणतात का.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** वार्डची चुक फक्त आहे. टायपिंगमध्ये लवकर लवकर केल्यामुळे झाले आहे.

**सदस्या, श्रीमती कंचन लुंड:-** साहेब पास करा ना.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** अरे तुमचे पत्र, एस्टिमेंट सर्व ७ मध्ये आहेत ना. वार्ड

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** आमची आपल्याला विनंती आहे की,

**सदस्य, श्री. कुलवंतसिंग सोहता:-** ६ करुन घेणार.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** त्याला ६ करुन घेणार.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** बघा तुम्ही आयुक्त म्हणून आहेत. मी सांगतो ७ मधून ६ करा तर आम्ही दुरुस्ती करतो तुम्ही करत नाही.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** नाही, नाही, ६ मी करतो सर.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** आपण करत आहात ठिक आहे परंतु आम्ही पण ठराव करतो थोडी दुरुस्ती होते. ३ वर्षाचे ५ वर्ष करतो तुम्ही लोक करुन देत नाहीत. आता आज आम्हांला बोला की, ही दुरुस्ती आम्ही आताच करतो. नाही तर प्रस्ताव नंतर घेवून या. पुढच्या सभेत घेवू या.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** नाही सर, आता मी करुन देतो.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** दुरुस्ती करणार ना की, आम्हांला नंतरच्या वेळी स्थायी समितीचे ऐकावे लागेल.

**उप अभियंता, श्री. संदिप जाधव:-** सर असे पण निविदेचा निविदा कॉल करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद करण्यासाठी....

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** हो ते ठिक आहे. मी ६ च्या ऐवजी तुम्ही ७ घेतले आहे म्हणून मी तुम्हांला सांगत आहे.

**कनिष्ठ अभियंता, श्री. संदिप जाधव:-** सर, आम्ही करुन घेवू ना.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** आमच्या ठरावामध्ये पण तुम्हांला दुरुस्ती करता आली पाहिजे.

**सदस्य, श्री. राजेश वधारिया:-** नाही आम्ही ठरावात पण करणार ना.

**महापालिका सचिव**:- मी बोलते सॉरी, यात त्यांनी लिहिले आहे की, मा. आयुक्तांनी सदर कामाचा प्रस्ताव वर्ष २०२१-२०२२ मध्ये अर्थसंकल्पीय तरतुद करण्याकरीता स्थायी समिती व त्यानंतर मा. महासभेच्या मान्य करणेबाबत शेरा लिहिला आहे. वरती लिहितात प्रशासकीय वित्तिय मान्यता पाहिजे आहे. खाली लिहितात अर्थसंकल्पात तरतुद करण्याकरीता, नक्की काय करायचे आहे हे ठराव स्पष्ट दया.

**उप अभियंता, श्री. संदिप जाधव**:- अर्थसंकल्पात तरतुद करण्या करीता.

**महापालिका सचिव**:- मग तुम्हांला हे महासभेत सादर करावे लागेल. तुम्ही ठराव व्यवस्थित दया. कारण साहेबांचे शेरे आहेत, की मा. महासभेच्या मान्यतेकरीता. हे मी सदस्यांच्या निदर्शनास आणून देते. बाकी तुम्हांला जो ठराव करायचा आहे तुम्ही करु शकता.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** मॅडम हा पास होईल तर महासभेत पण जाईल.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** महासभेत जाईल ना. मग ६ करुन आणा. ७ नाही.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** हो सर ६ करणार.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** आता पास करायचे का नाही करायचा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** आता काय पास करायचे ते दुरुस्ती करुन आणतात. तर आणु दया.

**महापालिका सचिव**:- मग असा ठराव होईल ना. महासभेच्या मंजूरीच्या अधीन राहून मान्यता देत आहे. असा ठराव करते दुरुस्ती करत आहोत प्रभाग क्र.६ संबंधीत विभागाने तशी दुरुस्त करावी. आणि महासभेच्या मंजुरीच्या अधीन राहून मान्यता देत आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** होय.

**महापालिका सचिव**:- ठिक आहे कारण मा. आयुक्तांचे शेरा आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** मान्य आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** हो चालेल ना. दुरुस्ती करुन आणतात. आपल्याला पण नंतर पर्याय असेल ना.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** ६ मध्ये करायची आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** याची रुंदी किती आहे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** ६० फुटाच्या हिशोबाने बनले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** सर, दोन मिनिट कृपया, ६० फुट आहे. आपण ६० फुट बोलले. ठिक आहे आणि लांबी किती आहे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** साडे ३५० मीटर.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** खेमानी चौक पासून बाबासाहेब आंबेडकर चौक पर्यंत सोडले आहे ना. परंतु बाबासाहेब आंबेडकर चौक पर्यंत आहे ना. त्याची अडचण नाही. परंतु काही जागांवर ६० फुट नाही आहे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी,:-** साहेब ते डिपीच्या हिशोबाने बनवणार ना.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** ते आले पाहिजे. कालच चिल्लमचाली झाली आहे आणि परत असे नाही झाले पाहिजे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** दुसरी गोष्ट अशी आहे की, आपण इथे लिहीले आहे की, झुलेलाल स्कुल, बालकन्जी बारी...

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** सर तो कनेक्शन लिहिले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** यात आपण लिहिले आहे नाली आणि रस्ता, मोठा रस्ता पण जातो, खेमानी स्कुलच्या उजव्या बाजूने जातो.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** तो नाही घेतला आम्ही. कलवर्ट घेतला आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** नाही. तो नाही घेतला आहे. ठिक आहे. आता हे सांगा हा नाला खेमानी स्कूलच्या गेटच्या पहिले. उजव्या बाजूला वळून तो नाल्यामध्ये जातो आणि पुढे तो वळून सीमा अपार्टमेंटकडून पुढे जातो. तर या नाल्यामुळे आणि पावसामुळे ते पाणी पुर्ण खेमानी पर्यंत वाहून येते. जर यामध्ये तुम्ही नाला नाही घेत तर रोड बनवून काय फायदा.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** सर त्यात कलवर्ट घेतले आहे. डॉ.राजा म्हणून तिथे आहेत तिथे कलवर्ट घेतले आहे आम्ही.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** डॉ.राजा यांचे क्लिनिक जवळ आपण कलवर्ट घेतले आहे. परंतु त्यानंतर

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** त्याचे नवीन प्रस्ताव बनवू आम्ही पाठवू.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** माझे ऐका आधी आरामात खेमाणी स्कूलला लागून भगवान भालेराव यांच्या ऑफिसच्या मागून जो नाला येतो. लासी बिल्डींगपासून खेमाणी स्कूल भिंती लागून उजव्या बाजूस बाहेर जात आहे. जर यामध्ये तुम्ही नाला नाही बनवत तर रोड बनवून काय अर्थ नाही.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** त्याचा त्यामध्ये समावेश नाही. आम्ही त्याचे वेगळा प्रस्ताव बनवून देतो.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** अच्छा निधी कोणता वापरत आहात आपण.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** जनरल निधी आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** त्यात तो नाला पण टाका ना काय आहे. आता आपण २.८० चे एस्टिमेट बनवले आहे. त्याचे ३ होईल, सव्वा तीन होतील आणखी काय होईल.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** नाही. तो नाला खुप मोठा आहे. कमीत कमी ५० लाखापर्यंत जाईल. मी दुसरा एस्टिमेट आहे ते घेवून येईन.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** ठिक आहे. आम्ही आपल्याला असे निर्देश देतो की, या रोडच्या सोबत जो नाला आहे. तो पुर्ण नाला वर पासून खालपर्यंत त्याचा पण एस्टिमेट बनवून आमच्यासमोर आणा.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** धन्यवाद सर.

**महापालिका सचिव:-** हे म्हणजे महासभेच्या मंजूरीच्या अधिन राहून मान्यता देत आहे. विषय क्र. पास हा बदल प्रभाग क्र. ६

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** ठराव काय असेल आमचा.

**सदस्, श्री. भगवान भालेराव:-** प्रभाग क्र. ७ च्या बदल करुन प्रभाग क्र. ६.

**महापालिका सचिव:** ६ ना.

**सदस्, श्री. भगवान भालेराव:-** ७ आले आहे ते ६ झाले पाहिजे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** गोषवारा दुरुस्त करुन वाचले जाईल.

**सदस्, श्री. भगवान भालेराव:-** इतिवृत्ताची वाट न पाहता कशासाठी एवढे काय महत्वाचे आहे. महासभे पुढे जाईल ना मग.

**काही सदस्य:-** पास, पास….

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:- सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑ **विषय क्र. १** :— उल्हासनगर-**२** प्रभाग क्र.**६** मधील खेमाणी चौक ते आंबेडकर चौक पेव्हमेंट रोड व नाली बनविणे या कामाचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर-२ प्रभाग क्र.६ मधील खेमाणी चौक पेव्हमेंट रोड व नाली खराब झाल्याने सदर ठिकाणचा रस्ता व नाली बनविणे अत्यंत आवश्यक आहे.

सदर रस्ता हा मुख्य रस्ता आहे. उक्त रस्त्यावर एस.ई.एस.शाळा,उमपा शाळा क्र.१८ व २४, झुलेलाल शाळा, बाल्कनजीबारी शाळा परिसरात असल्याने शाळेला जाण्याकरिता या परिसरातील मुख्य रस्ता आहे. तसेच सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूस मे. कोणार्क कंपनीच्या पाण्याच्या पाईप लाईन गेल्याने रस्ता कमकुवत झालेला आहे. सदर ठिकाणी मोठया प्रमाणावर लोकवस्ती वसलेली असून या रस्त्यावर वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात सुरु असते. परंतू सदर रस्ता खराब झाल्यामुळे दरवर्षी महापालिकेचा खड्डे भरणेकरीता डांबरीकरणावर करावा लागणारा खर्च वाचेल. त्यामुळे उक्त ठिकाणचा रस्ता बनविणे आवश्यक आहे.

उल्हासनगर-२ प्रभाग क्र.६ मधील खेमाणी चौक पेव्हमेंट रोड व नाली बनविणे या कामाचे रुपये २,८०,५४,६००/- एवढ्या खर्चाचे प्राकलन तयार करण्यात आले आहे. सदर प्राकलन प्रशासकीय व वित्तीय मान्यतेकरीता सादर केले असता मा.आयुक्त यांनी सदर कामाचा प्रस्ताव वर्ष २०२१-२२ मध्ये अर्थसंकल्पीय तरतूदीकरीता स्थायी समिती व त्यानंतर मा.महासभेच्या मान्यतेकरीता सादर करणेबाबत शेरा लिहिला आहे.

तरी उल्हासनगर-२ प्रभाग क्र.७ मधील खेमाणी चौक पेव्हमेंट रोड व नाली बनविणे प्राकलनिय खर्च रुपये २,८०,५४,६००/- (अक्षरी रु.दोन कोटी ऐंशी लाख चौप्पन हजार सहाशे) या कामाकरीता अर्थसंकल्पात तरतूद करणेकरीता मा.स्थायी समितीच्या मान्यतेकरीता प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.९१** **दिनांक :०३/१२/२०२१**

सूचकाचे नांव:— श्री. स्वप्नील बागुल

अनुमोदकाचे नांव:— श्री. चंद्रशेखर यादव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार **उल्हासनगर-२ प्रभाग क्र.६ मधील खेमाणी चौक ते आंबेडकर चौक पेव्हमेंट रोड व नाली बनविणे या कामाचे प्राकलनास महासभेच्या मंजूरीच्या अधीन राहून मान्यता देत आहे.**

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-** विषय क्रमांक २ वाचून दाखवितात.

———————————————————————————————————————

**⇨विषय क्र.२:— उल्हासनगर-१ उल्हासनगर महापालिका इस्पितळ, रीजन्सी ॲन्टीलीया कॉम्प्लेक्स, शहाड येथील ऑक्सीजन टाकीच्या परिसरासाठी प्रवेशद्वार तयार करणेकरीता मान्यता देणेबाबतची माहिती मा. स्थायी समितीचे पटलावर सादर करणेबाबत.**

———————————————————————————————————————

**महापालिका सचिव:-** हा विषय माहीतीसाठी आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** नाही, नाही, मला हे सांगा. यात आपण लिहिले आहे की, शेवटच्या परिच्छेदाची तिसरी ओळ तरी कलम ५ (२) (२) नमुद प्रमाणे रु.८,८०,३५५/- चे प्रस्तावित कामे हे मे. कमलेश कुमार किशिनचंद यांचेकडून करुन घेण्यात आले आहे. ५ (२) (२) मध्ये आयुक्तांना अधिकार आहेत का?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** मा. सदस्य जी, हे जे काम आहे ते ॲन्टीलीया हॉस्पिटलचे आहे. येथे रोड बनवला आहे कोविडमुळे आम्हांला तिथे ऑक्सिजन टँकर जाण्यासाठी गरजेचे होते तर सरांनी हे ५ (२) (२) मध्ये पास करुन स्थायी समितीकडे मंजूरीसाठी पाठवले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** ५ (२) (२) मध्ये नियम आहे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** मा. आयुक्तांनी पास केले आहे. कोविडमध्ये आहे ना.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** Emergency मध्ये आहे ना.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** मिस्टर शितलानी एक गोष्ट ऐका.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** हा सर.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** आपण शहर अभियंता आहात. ५ (२) (२) चे काम सामान्यत: जास्तीत जास्त काम आपल्या विभागाकडून होत असतात. तर सेक्शन जो नियम आहे ५ (२) (२) चा ठेकेदाराचा असतो, तो...

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** सेक्टर ५ मध्ये आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** मी आपल्यासाठी प्रकरण ५ संविदा एकमध्ये संविदा करण्याची पध्दत नाईकवाडे साहेब जरा ऐका. थोडे ज्ञान मिळेल. फुकट वाटत आहेत. ५ (२) (२) मला मराठी कमी येते यासाठी मी महापालिका सचिव यांना विनंती करतो की, हे ५ (२) (२) त्यांनी वाचावे.

**महापालिका सचिव:-** प्रकरण २ मध्ये लिहिले आहे. विवक्षित संविदेसाठी निविदा मागविणे यात यापुढे अन्यथा तरतुद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त आयुक्त किंवा याबाबत त्यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याने जे कोणतेही काम करण्यासाठी किंवा कोणतेही सामुग्री किंवा माल पुरविण्यासाठी २

लाख रुपये पेक्षा अधिक किंवा महापालिका, राज्य शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी विहित करेल अशा त्याहून अधिक रकमेपेक्षा अधिक खर्च होणार असेल, असे कोणतेही काम करण्याबाबत किंवा कोणतीही सामुग्री किंवा माल पुरविण्याबाबत कोणतीही संविदा करण्यापुर्वी निदान ७ दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात जाहिरातीद्वारे नोटीस देवून अशा संविदेसाठी निविदा मागविल्या पाहिजेत. परंतु २ लाखापेक्षा कमी रकमेवर कोणत्याही संविदेची निविदेची सुचना महापालिकेच्या अधिकृत संकेत स्थळावर दर्शविण्यात येईल. यात २ नंबर असा आहे, अशा नोटीसीस अनुसरुन जी कोणतीही निविदा देण्यात येईल, ती स्विकारणे आयुक्तांवर बंधनकारक असणार नाही. परंतु कलम ७३ खंड (क) च्या तरतुदीच्या अधीन राहून, अशारितीने देण्यात आलेल्या निविदापैकी जी कोणतीही निविदा सर्व परिस्थिती विचारात घेता, सर्वात फायदेशीर आहे असे त्यास वाटेल ती निविदा स्विकारता येईल. परंतु स्थायी समितीला तिच्या कारणे नमुद करुन आयुक्तांस यात तरतुदप्रमाणे निविदा न मागविता किंवा मागविल्यानंतर त्यांच्याकडे ज्या कोणत्याही निविदा येतील त्या न स्विकारता संविदा करण्यास प्राधिकृत करता येईल.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** याचा अर्थ असा आहे की, आयुक्त परवानगी शिवाय स्थायी समिती मंजूरी विना निविदा काढून अर्जंटमध्ये संविदा काढून करु शकतो. परंतु जर त्यांना स्थायी समिती याप्रकारचा अधिकार देते तर. नाही तर नाही. तर महानगरपालिकेचे लेखा अधिकारी फाईल मंजूर झाली होती का.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** होय.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** काय महानगरपालिका लेखा परिक्षक येथे उपस्थित आहेत. आमच्या जवळ जे महापालिका मुख्य लेखा परिक्षक असतात त्यांची ही जबाबदारी असते की, कोणती फाईल आयुक्तांकडे जाण्या अगोदर आपण ऑडिट करा लिगली फायनान्सशली आणि सर्वपरिने बरोबर आहे बघणे हे आपले कर्तव्य आहे. मी आपल्यासाठी इंग्रजी वर्जन वाचतो. ५ (२) (२) मध्ये provided by Standigcommiti authorised the commissinor for the reason we shall recorded in its prossiding to the intire the contract without inviting tender ad provided or without any tender which he may receive after having invited them. जर आपण निविदा मागविला परंतु जर आपण एखादया recommended करतात त्याला सोडून आणि स्थायी समितीला हवे असेल तर ती दुस-याला काम देवू शकते. या आयुक्त आम्हांला recommend करतील तर आम्ही त्यांना कारणासहीत मान्यता देवू. तेव्हा आयुक्त ५ (२) (२) मध्ये विना निविदा मागवून काम करुन घेवू शकतात. अजून पण वेगळे नियम आहेत, आता आपण सांगा.

**उप आयुक्त, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-** सर याच्यात सादरकर्ता विभागाने कोविडची दुसरी लाट आणि प्रादुर्भाव या सर्व emergency प्रस्तावित केलेल्या असल्यामुळे ही फाईल पुढे पाठविली होती. या प्रस्तावातच लिहिले होते की, दुसरी लाट सुरु असून प्रादुर्भाव आणि प्रसार टाळण्यासाठी कोविडच्या बेसेसवरती ही फाईल पुढे पाठविण्यात आली होती. आणि प्रस्ताव असा केला होता की,

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** साहेब रोड बनविण्यासाठी कोविडचे काय काम आहे?

**उप आयुक्त, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-** सर यामध्ये ऑक्सिजन पुरवठा दाखविला आहे.

**उप आयुक्त, (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** सर आपल्या माहितीसाठी बोलू का. मा. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य गण आपल्याला...

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** यात जो विषय लिहिला आहे, तो विषयच चुकीचा आहे. विषयात काय लिहिले आहे की, उल्हासनगर-१ उल्हासनगर महानगरपालिका इस्पितळ, रीजन्सी ॲन्टीलीया कॉम्प्लेक्स, शहाड येथील ऑक्सीजन टाकीच्या परिसरासाठी प्रवेशद्वार तयार करणेकरीता मान्यता मिळणे. प्रवेशद्वार आहे की रोड आहे की काय आहे? तर हे परत दुरुस्त करा. आता दुसरी बात कमलेशकुमार किशनचंद ही काय आहे कोणती कंपनी, कोणती संस्था आहे, कोणती पार्टनरशिप फर्म आहे काय आहे काय? कोणती कंपनी आहे? हे काय कमलेशकुमार किशनचंद एन्टरप्रायजेस काय आहे? असच फक्त कमलेशकुमार किशनचंद, हे

तर काही समजत नाही. फाईलमध्ये काय नाव आहे कमलेश कुमार किशनचंद याचा टर्न ओव्हर काय आहे. कोणते काम केले आहे. पहिले उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये किती रोडचे काम केले आहे?

या वेळी सदस्य, श्री.स्वप्नील बागुल हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**उप आयुक्त्ा, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-** ओके सर.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** नाही नाही काय आहे प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आहे, लिमिटेड कंपनी आहे, एंटरप्रायझेज आहे, या पार्टनरशिप फर्म आहे काय आहे काय हे? पहिले पी. डब्ल्यु.डी. मध्ये यांनी काम केले आहे. पी. डब्ल्यु.डी.ची नोंदणी आहे.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** आहे. आपल्याकडे नियमित प्रकारे काम करणारीच मंडळी आहेत. आणि या कामामध्ये आपल्याला एम. एम. आर. डी. कडून निधी मिळणार आहे आणि त्यासाठी तातडीने ऑक्सिजन...

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** ठिक आहे आयुक्त् महोदयांचे आहे आम्ही मान्यता देत आहोत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** जमनादास पुरस्वानी बोलतात म्हणून पास.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** चला पास पुढचा विषय घ्या, मॅडम.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** शितलानीजी एक आणखी सेक्शन आहे, ६७ (३) (क) हे काम आपण तुम्ही त्यात घेतले पाहिजे होते. सल्ला देत आहे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** हो सर पुढच्या वेळी.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** ६७ (३) (क) मध्ये आपण आले असते तर आमच्याकडे पण आपल्याला यायची गरज नसती पडली. माहितीसाठी सादर करत असते तर चालले असते. तर मेहरबानी करुन ५ (२) (२) हा शब्द जर लिहितात तर लक्षात ठेवा, आयुक्तांना एक रुपायाचा पण अधिकार ५ (२) (२) मध्ये नाही आहे.

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:- सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑ **विषय क्र.२ :— उल्हासनगर-१ उल्हासनगर महापालिका इस्पितळ, रीजन्सी ॲन्टीलीया कॉम्प्लेक्स, शहाड येथील ऑक्सीजन टाकीच्या परिसरासाठी प्रवेशद्वार तयार करणेकरीत मान्यता देणेबाबतची माहिती मा. स्थायी समितीचे पटलावर सादर करणेबाबत....**

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये (COVID -19) कोरोना विषाणूच्या साथीच्या आजाराची दुसरी लाट सुरु असुन सदर आजाराचा प्रादुर्भाव व प्रसार टाळण्यासाठी अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरु आहे. सद्यास्थितीतही कोरोना बाधीत रुग्ण काही प्रमाणात आढळून येत आहेत. या अनुषंगाने उल्हासनगर-१ येथील रिजन्सी ॲन्टीलिया कॉम्प्लेक्स , शहाड येथे उल्हासनगर महापालिकेचे इस्पितळ बनविण्यात आले आहे. सदर इस्पितळास ऑक्सीजन पुरवठा अखंड रहावा म्हणुन मोठी ऑक्सीजनची टाकी उभारण्यात आली आहे. सदर टाकीमध्ये ऑक्सीजन सुरक्षित व नियमितपणे भरता येण्यासाठी वाहनाचा थेट प्रवेश टाकीजवळ होणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी प्रवेशद्वार नसल्याने टाकीमध्ये ऑक्सीजन भरणा करणे अडचणीचे ठरत आहे. त्याकरीत स्वतंत्र प्रवेशद्वार बनविणे आवश्यक आहे.

सदर इस्पितळ तयार झाले असून तातडीने ऑक्सीजन व्यवस्था सुरळीत करणे आवश्यक आहे. तरी सदर कामाकरीता रु. ८,८०,३५५/- रुपयाचे प्राकलन सा.बां. विभागाकडून तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च

सन २०२१-२२ रोजीच्या महापालिका अर्थसंकल्पामधी पुर किंवा अन्य आपत्ती खर्च (Exp. During Calamities)/ शासनाचा कोव्हिड-१९ निधी या या लेखा शिर्षामधून प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम कलम ५(२) (२) मध्ये नमुद केलेप्रमाणे कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठीर किंवा महानगरपालिकेच्या मालमत्ता संरक्षणासाठी त्यांना समर्थनिय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुसऱ्या एखादया नगरपालिका प्राधिकाऱ्याच्या किंवा राज्य शासनाच्या मंजुरी, मान्यता, किंवा प्राधिकरणाशिवाय करता येत नव्हती, तरीही अशी कार्यवाही केली पाहीजे असे नमुद आहे. तथापि सदर कामास मान्यता मिळाल्यास महानगरपालिकेचे इस्पीतळामधील ऑक्सीजन व्यवस्था सुरळीतपणे सुरु करुन त्याचा फायदा शहरामधील रुग्णांना होणार आहे. तरी कलम ५(२) (२) नमुद प्रमाणे रु. ८,८०,३५५/- चे प्रस्तावित काम हे मे. कमलेश कुमार किशीनचंद यांचेकडून करुन घेणेत आले आहे. तरी सदर माहिती मा. स्थायी समितीचे पटलावर माहितीकरीता सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.९२** **दिनांक : ०३/१२/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. चंद्रशेखर यादव

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-१ उल्हासनगर महापालिका इस्पितळ, रीजन्सी ॲन्टीलीया कॉम्प्लेक्स, शहाड येथील ऑक्सीजन टाकीच्या परिसरासाठी प्रवेशद्वार तयार करणेबाबतची माहिती नोंद करत आहे.**

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ३ वाचून दाखवितात.

---

**⇨ विषय क्र.३ :— मेसर्स कोणार्क इ.प्रो.प्रा. लिमिटेड, उल्हासनगर, घनकचरा वाहतुक ठेकेदार यांच्या खाजगी ठेक्याची मुदत दिनांक ५ डिसेंबर, २०२१ रोजी संपुष्टात येत आहे, तरी ३१ मार्च, २०२२ पर्यंत अथवा नविन अभिकर्त्यांची नेमणुक होउन नविन परिपुर्ण व्यवस्था कार्यन्वित होईपर्यंत त्यांना मुदतवाढीस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.**

---

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** कोण बोलणार याच्यावर.

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-** मा. सभापती, मा. आयुक्त्, मा. सदस्य सदयस्थितीत आपल्याकडे शहरातील घनकचरा वाहतुकीसाठी मे. कोणार्क इ.प्रो.प्रा. लिमिटेड, उल्हासनगर यांना ८ वर्षाच्या कालावधीसाठी आपण यापुर्वी दिलेले आहे.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** हे माहिती आहे सगळयांना. उशीर का झाला टेंडर काढायला त्याचे उत्तर दया.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>** ८ वर्षापासुन उशीर का झाला आहे? ही तारीख माहीत होती ना, टेंडर संपणार आहे. जेव्हा टेंडर निघाला होता, तेव्हा माहीती असेल ८ वर्षे पहीले ही गोष्ट आपल्याला महीती होती.

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** आपण हा प्रस्ताव म्हणजे टेंडरचा प्रस्ताव गेल्या वर्षी तत्कालीन आयुक्त असताना २०१९ मध्ये हा प्रस्ताव आपण सादर केलेला होता. सादर केल्यानंतर त्यावर तत्कालीन आयुक्तांनी असे लिहिले होते की, या गाडया खरेदीच्या प्रस्तावाला डिपीआर प्रमाणे तुम्ही ६ महिने आधी तयारी करा. त्याच्यानुसार हा करार संपायच्या ६ महिने आधीपासून आपण तयारी सुरु केली परंतु तयारी करताना गाडया कोणत्या घ्यायच्या, कशा घ्यायच्या यावर विचार विनिमय करण्यासाठी वेळ गेलेला आहे. आणि या प्रस्तावाला थोडासा विलंब झालेला आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** ठिक आहे. आता आमचे असे म्हणणे आहे की, तुम्ही कालच महासभेमध्ये तुमचा एक प्रस्ताव आम्ही ८ वर्षासाठी मंजूर केला. आता तुम्ही किती महिन्यासाठी मुदतवाढ मागत आहेत.

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** सर ही जी मुदतवाढ आपण मागत आहोत ती ३१ मार्च २०२२ पर्यंत हे काम पुर्ण होईल अशी आम्हांला खात्री आहे. ३१ मार्च २०२२ पर्यंत किंवा आता नवीन परिपुर्ण व्यवस्था कार्यान्वित होईपर्यंत. असे आम्ही दोन दिलेले आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- असे आम्हांला मंजूर नाही. ३१ मार्च २०२२ टेंडर पुर्ण होईपर्यंत. ३१ मार्च नंतर एप्रिल, मे, जून दुसरा ३१ मार्च येईल. आपण आता मला सांगा, आम्ही काल जो प्रस्ताव महासभेत पारीत केलेला आहे. त्याचा टेंडर कधी होईल. कधी लोड होईल?

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** सर, याच महिन्यात लोड करायचा आपला पुर्ण प्रयत्न असणार आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- ठिक आहे. समजा आपण १५ डिसेंबर ला लोड करणार.

**<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण:-</u>** उशीर का झाला?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** उशीर का झाला तुम्हांला काल आम्ही इतिवृत्ताची वाट न पाहता असे म्हटले आहे. ठराव आज मिळाला पण असेल.-

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** नाही सर अजून ठराव मिळाला नाही.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव</u>**:- काय ठराव झाले नाही का. सोमवारी तुम्हांला ठराव मिळेल. टेंडर तुमच्याकडे तयार आहे.

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** हो, हो तयार आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** टेंडर तुमच्याकडे तयार आहे. मग तो दोन दिवसात अपलोड करायला काय हरकत आहे?

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** सर, करु शकतो.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी</u>**:- आपण असे काय बोलता

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** या अगोदरच आम्ही प्रस्तावाची कार्यवाही सुरु केलेली आहे.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी</u>**:- आपण स्थायी समितीला तारीख सांगा.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- मला वाटत मुदतवाढ नाही दिली पाहिजे. काल महानगरपालिकेत कचरा उचलला पाहिजे. स्वत: उचलला पाहिजे. काय चाललय हे. टेंडर काढा. टेंडर काढा. का आणले.

उदयापासुन हा कचरा भरून आम्ही महानगरपालिकेवर फेकणार. आम्ही उचलणार कचरा. का दयायची मुदतवाढ. मग म्हणता एक महिन्यानंतर दोन महिन्यानंतर.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** काय झाले माहित आहे का मॅडम, प्रत्येक गोष्टीला मुदतवाढ आहे. एक ही गोष्ट अशी नाही की तिला मुदतवाढ नाही.

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-** सर मी याच्यावर सांगू इच्छितो की, आपण अगोदरच एक टेंडर अपलोड केलेला आहे. डी.पी.आर. नुसार गाडया खरेदीचा आपल्याकडे शासनाकडून जो निधी आलेला होता. त्या शासनाकडून आलेल्या निधीनुसार आपल्याकडे अगोदरच एक टेंडर लोड केलेला आहे. कार्यवाही चालू आहे.

या वेळी सदस्य, श्री. स्वप्नील बागुल यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** आम्हांला एवढा स्थायी समितीला..

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** भगवानराव साहेब, उप आयुक्त उत्तर देतील तर चांगले होईल.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** उप आयुक्त साहेब माइक घ्या. आम्हांला एक मिनिट. ओके. ठिक आहे. अरे बोलू तर दया ना मला. आम्ही काल तुम्हांला ठराव पारीत केला आहे. सोमवारी तुम्हांला ठरावाची कॉपी मिळेल. इथेच चालले आहे सगळ. बरोबर ठराव पण तुम्हांला सोमवारी मिळेल. तुम्ही आता या स्थायी समितीला सांगा. कि तुम्ही कोणत्या दिवशी टेंडर अपलोड करणार.

**उप आयुक्त, वैदयकिय आरोग्य,डॉ. सुभाष जाधव,:-** सोमवारी होउ शकते. आमचे सर्व तयार आहे.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** ऐका जाधव साहेब आपण जे पण उत्तर देत आहात ते स्थायी समितीमध्ये देत आहात

**महापालिका सचिव :-** तातडीचे असेल तर मी ठराव नंबर देते.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** तातडीचे असेल तर ते बघा ठराव पण देतात.

**महापालिका सचिव:-** तातडीचे असेल तर मी फक्त ठराव क्रमांक सांगेन, नंतर सोमवारी ठराव पाठवून देते. ठराव क्रमांक देवू शकते मी.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** ठराव क्रमांक देवू शकतात, तुम्हांला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** उप आयुक्त महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर दया. समजा की आम्ही आज मुदतवाढ नाही दिली. तर उदया आपण काय करणा?. याचा पण खुलासा करा.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** ते समजतात म्हणून तर आणली आहे मुदतवाढ. त्यासाठी तर आणले आहेत.

**सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-** नाही नाही, पालिकेला स्वत: उचलू दया ना कचरा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** मी काय बोलतो आपण मुददयावर येवू. तुम्ही एक गोष्ट सांगा. तुम्हांला तुमचा ठराव क्रमांक आज तुम्हांला मिळणार आहे. तुम्हांला फक्त सादर फिरवायचा आहे, तुम्हांला सादर फिरवण्यासाठी किती वेळ लागतो. इथे तुम्ही आहेत, लेखा विभागाचे अधिकारी आहेत, उप आयुक्त आहेत, अतिरिक्त आयुक्त आहेत, आयुक्त नाही आहेत. एकतर तुम्ही हातोहात जावून सही घेवू शकता. काही विषय नाही. मग आम्ही तुम्हांला आता मुदतवाढ देणार आहे. आल लक्षात, मुदतवाढ देण्याच्या अगोदर जर आता आम्ही तुम्हांला मुदतवाढ देवू. पण मुदतवाढ दिल्यानंतर तुम्ही किती दिवसात हि यंत्रणा कार्यान्वित करणार. टेंडर कधी करणार?

**उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य, डॉ. सुभाष जाधव**:- नाही सन्माननीय सदस्य, सांगतो मी, तयारी आमची चालू आहे. आणि पेपर डॉक्युमेंट झाले तर जास्तीत जास्त १५ डिसेंबर पर्यंत अपलोड करण्याची तयार होईल.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** १५ डिसेंबर आजची तारीख ४ आहे अजून १२ दिवस कशासाठी

**उपआयुक्त्, वैदयकिय आरोग्य, डॉ. सुभाष जाधव**:- प्रशासकीय कार्यप्रणाली थोडासा वेळ जातो.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव :-** काय प्रशासकीय कार्यप्रणाली

**उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य, डॉ. सुभाष जाधव**:-सरांकडे जाईल.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** आज आम्ही नाही देत आहोत. आम्ही तुम्हांला १५ दिवस किंवा २० दिवस देवू. मग कसे होणार. ३१ मार्च आपण कसे लिहिले?

**उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य, डॉ. सुभाष जाधव**:- तोपर्यंत आपली कारवाई पुर्ण होईल अशी शक्यता आहे. आर्थिक वर्षामध्ये....

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** आपण होमवर्क करुन या.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** आपण जे ३१ मार्च लिहिले आहे ना. आपली मनस्थिती नाही. आपण मनात ठरवून ठेवले आहे. ३१ मार्च पर्यंत आम्हांला टेंडर काढायचाच नाही. ॲक्शन घेतलीच नाही.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** तारीख सांगा आपण.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी :-** जबाबदारी आहे सर्व अधिका-यांची...

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** २० तारीख आम्ही तुम्हांला देवू शकणार नाही, १० तारखेपर्यंत आम्ही तुम्हांला मुदतवाढ देवू. नंतर तुमचा टेंडर आला पाहिजे. मंगळवार पर्यंत तुमचा टेंडर आला पाहिजे. तुम्हांला ठराव मिळतो आहे, सगळया गोष्टी मिळतात, मग तुम्हांला अडचण काय आहे?

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** नंतर आमचे मनिषजी विचार करतील गाडया कोणत्या घ्यायच्या. काय करायचे वेळ तर जाणार.

**उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य, डॉ. सुभाष जाधव**:- सर ८ दिवसांत करतो सर.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** तारीख सांगा. तारीख

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** माझी विनंती आहे की, जे पण उत्तर देत आहेत त्यांनी विचार करुन उत्तर दया.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** मनिषजी तारीख का देत नाहीत.काही मुहुर्त काढला आहे का?

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-** १० ते ११ तारखेपर्यंत आम्ही अपलोड करून देतो.

**सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-** १० की ११ तारीख.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** आज ठराव देतो आम्ही. तुम्ही आयुक्त साहेब एवढे कार्यक्षम आहेत की, तुम्ही कार्यक्षम मंडळी दिसता आम्हांला.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण:-** मनिषजी तुम्ही एवढे इझी का घेत आहेत?

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-** काही सांगू इच्छितो सर, टेंडर कागदपत्र आम्ही बनविलेले आहेत. अजून तपासणी व्हायची आहे. टेंडर कागदपत्र तपासणी होणार, तपासणी झाल्यानंतर त्यातील अटी व शर्ती कमी-जास्त करणे या कार्यवाहीला थोडा वेळ लागणार. आणि टेंडर कागदपत्रे तपासणी झाल्यानंतर अपलोड करणार आहेत.

**<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण:-</u>** हे तुम्ही अगोदर करायला पाहीजे होते.अगोदर केले असते तर आता पर्यंत झाले असते.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** टेंडर कमिटीचे अध्यक्ष तुम्ही आहात.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- मा. सभापती, मा. आयुक्त मॅडम याचा अर्थ काल महासभेत जो आला की आपण त्या टेंडरला मान्यता दया. तो बोगस आणला, का बोगस आणला, आणि यांचे म्हणणे आहे की, अजून टेंडर बनले नाही, जर टेंडर बनला नाही तर महासभेत का आणला. काल का आणला महासभा मंजूरीसाठी. आम्ही दुसरे पण एक महापौरांना प्रस्ताव देत आहेत. आणि काल आम्ही जो पास केला त्याला परत आज रदद करा. कारण आपण स्वत: बोलत आहात स्थायी समितीमध्ये की आम्हांला १० दिवस अजून लागतील. मग तुम्ही आमची मंजूरी कशी घेतली. महासभेला चुकीची माहिती दिली का. जर तुमचा टेंडर तयार आहे. तर सोमवारी लोड झाले पाहिजे. जर टेंडर तयार नाही तर याचा अर्थ आपण महासभेला चुकीची माहिती दिली. आता आपण उत्तर दया आपण काय केले आहे.

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** टेंडर डॉक्युमेंट आम्ही बनविलेले आहेत. तयार आहे फक्त टेंडर डॉक्युमेंट अप्रुल होणे बाकी आहे.

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** सर टेंडर डॉक्युमेंट अप्रुल झाल्या नंतर

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>** टेंडर डॉक्युमेंट अप्रुल करण्यासाठी किती वेळ लागतो?

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** आमची फाईल पुटअप होईल, टेंडर डॉक्युमेंट जाईल. ते छाननी समितीसमोर जाईल, छाननी समिती त्याला अंतिम मान्यता देईल. अंतिम मान्यता दिल्यानंतर ते प्रसिध्द होईल.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- ठिक आहे, आता समजून घ्या, ऐका १० तारखेला अपलोड होईल का. १० डिसेंबरला.

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** १० डिसेंबर किंवा ११ डिसेंबर पर्यंत आम्ही पुर्ण प्रयत्न करु.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- १५ डिसेंबर पर्यंत होईल का.

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** सर १५ डिसेंबर मी आधीच बोललो होतो.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- ठिक आहे १५ डिसेंबर किती दिवसाचा टेंडर असेल.

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** २१ दिवस

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- ७ जानेवारीला टेंडर खोलणार. वर्क ऑर्डर दयायला किती दिवस लागतील.

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** १ आठवडा जास्तीत जास्त.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- १५ दिवस, २२ जानेवारीपर्यंत वर्क ऑर्डर होईल. तर आम्ही २२, २६ जानेवारी पर्यंत मुदत वाढ करु शकतो.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** नाही. २५ जाणेवारी पर्यंत नंतर कचरा इथे टाकणार.

**<u>सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-</u>** बरोबर, बरोबर.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- २५ जानेवारी पर्यंत आपला विश्वास आहे का.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** जमनुजी मी एक विनंती करतो की, हा सिरीयस विषय आहे.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-** यांना माहीती असते तर पहीलेच झाले असते.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** हा सिरीयस विषय आहे. हे दोघे काय उत्तर देणार नाहीत. तुम्ही जरा उत्तर दया.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** जे आपण उत्तर देणार ते आयुक्त साहेबांचे शब्द असतील.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** होय तुम्ही त्या खुर्चीवर असला आहात.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** पाच मिनीट वेट करणार, पहीले आपण आयुक्तांशी बोलून घ्या.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** आपण आयुक्तांशी बोलून घ्या.

**अतिरिक्त आयुक्त, श्रीमती करुणा जुईकर:-** मा. अध्यक्ष महोदय, सर्व सन्माननिय सदस्य, संबंधीत उप आयुक्त आणि सार्वजनिक आरोग्य अधिकारी माझ्या माहितीप्रमाणे या फाईलवर पुर्ण चर्चा झालेली आहे अटी व शर्ती सुध्दा झालेल्या होत्या. विभागाला आयुक्तांची सक्त ताकिद आहे की, २ दिवसांत अटी व शर्ती अंतिम कराव्यात. सोमवारी सरांची मान्यता घ्यावी. आपला टेंडरचा जो विहित कालावधी आहे. सन्माननीय सदस्य म्हणत होते की, टेंडर अपलोड झाले की, लगेच ७ दिवसांत वर्क ऑर्डर. सर भविष्यातले आपल्याला सांगता येणार नाही. जेव्हा टेंडर अपलोड होईल पात्र निविदाधारक आले तर नियमाप्रमाणे काम्रवाही होवून नियमाप्रमाणे देता येईल. आपल्याला नाहीतर अटी व शर्ती अंतिम करताना १५ दिवस घ्यायची आवश्यकता नाही. आणि पुन्हा सांगते आयुक्तांच्या अधिकाराने उप आयुक्त आणि सार्वजनिक आरोग्य अधिकारी यांनी अटी व शर्ती २ दिवसांत अंतिम कराव्यात. सोमवारी सरांशी चर्चा करुन लेखा विभाग आणि लेखा परिक्षण विभाग यांच्याशी चर्चा करुन टेंडरच्या अटी व शर्ती अंतिम करुन अपलोड ८ दिवसांच्या आत करण्याचे मी त्यांना आदेश देते. सदर सुचना मी आयुक्त यांच्या अधिकराने सुध्दा ही बाब मी निदर्शनास आणून देते. आणि संबंधीत विभागाने तातडीने कार्यवाही करावी असे मी आदेश देत आहे, मा. अध्यक्षांच्या मान्यतेने.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** ३-३ महिने आज ३ मार्च पर्यंत मुदतवाढ देत आहे. ३ मार्च नंतर त्यांना कोणत्याही परिस्थितीत देता येणार नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव :-** दुसरी तुम्हांला काही अडचण असेल, तुमच्या सहया झाल्या तुम्हांला काही अडचण असेल तर फाईल माझ्या दालनात घेवून या. मी सगळया अधिका-यांना बोलवतो आणि एकाच दिवशी फाईलवर सहया करून घेवू. विषय संपेल.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** साहेब ४ महिने मुदतवाढ झाली ना आता डिसेंबर चालू आहे.

**महापालिका सचिव:-** एक मिनिट यात असे लिहिले आहे की, निविदेतील करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार दैनंदिन प्रति दिन रुपये ४ लाख ४६ हजार ४०० रुपये दरवाढीसह दरवाढ रक्कम मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सादर. मग हे पण आपल्याला नमुद करावे लागेल दरवाढीसह यांनी यात लिहिले आहे की, शहरातील दैनंदिन घनकचरा वाहतुकीसाठी मा.स्थायी समिती ठराव क्र.६२, दिनांक २८/०३/२०१७ अन्वये प्रती दिन ४ लाख ४७ हजार ४०० रुपये ३ महीन्याने एक्सेलेशन दरवाढ रक्कम देण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार निविदेतील व करारनामातील अटी व शर्तीनुसार दैनंदिन प्रतिदिन रुपये ४ लाख ४७ हजार ४००/- दरवाढीसह दरवाढ रककम मान्यतेसाठी सादर.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** आता आपण किती देतोय?

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-** सर माझी स्थायी समितीला विनंती राहील की, ३ मार्च पर्यंत हे शक्य नाही आहे. कारण ३ मार्च नंतर टेंडर अपलोड केल्यानंतर त्याला आल्यानंतर.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** आम्ही मुदतवाढ जास्त देणार नाही. कारण तुमच्या आयुक्तांनी मागेच सांगितले आहे की, जास्तीत जास्त ६ महिने. मुदतवाढ देणार नाही.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** ३ मार्च पर्यंत देणार नाही.

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे :-</u>** सर, त्याच्यानंतर गाडया खरेदी झाल्यानंतर गाडया असेंबल करणे याला थोडासा वेळ लागेल.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- ३ मार्च नंतर परत घेऊन या, ३ मार्च पर्यंत ही स्थायी समिती मुदतवाढ देत आहे. ३ मार्च पर्यंत नाही झाले तर त्याच्या आधी परत घेवून या.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** दरवाढी सह इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>महापालिका सचिव:-</u>** ३ मार्च २०२२ पर्यंत दरवाढीसह मुदतवाढ देण्यास मान्यता देत आहे. सर्व संमतीने पास इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** आपण ३ बोलत आहेत की ३०

**<u>महापालिका सचिव:-</u>** ३ मार्च २०२२ पर्यंत

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** तर माझा एक प्रश्न आहे, उदया ३ मार्च पर्यंत किंवा त्याच्या काही दिवस पहीले आचारसंहिता लागली तर काय करणार?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव</u>**:- विभाग बघेल ना. आपला रोल आहे का? आचारसंहिते नंतर आपला रोल संपून जातो.

**<u>महापालिका सचिव:-</u>** आयुक्त साहेब, जिल्हाधिकारी साहेबांकडे पाठवतील.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** आपण किती वेळ वाट बघणार आहेत?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव</u>**:- आपल्याला काय करायचे आहे, आपला इश्यु संपला आहे.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** प्रशासन चालवेल.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** आचार संहितेमध्ये सर्व अधिकार प्रशासनाला येतील.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u> **सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑ **विषय क्र. ३:— मेसर्स कोणार्क इ.प्रो.प्रा. लिमिटेड, उल्हासनगर, घनकचरा वाहतुक ठेकेदार यांच्या खाजगी ठेक्याची मुदत दिनांक ५ डिसेंबर, २०२१ रोजी संपुष्टात येत आहे, तरी ३१ मार्च, २०२२ पर्यंत अथवा नविन अभिकर्त्यांची नेमणुक होउन नविन परिपुर्ण व्यवस्था कार्यन्वित होईपर्यंत त्यांना मुदत वाढीस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.**

<u>प्रस्तावना</u>

**उल्हासनगर शहरात सद्यास्थित मे. कोणार्क इ. प्रो. प्रा. लिमिटेड, उल्हासनगर घनकचरा वाहतुक ठेकेदार यांच्या मार्फत दैनंदिन घनकचरा वाहतुकीचे काम सुरु आहे. सदर ठेक्याचा कालावधी आठ वर्षाचा असून सदर खाजगी ठेक्याची मुदत दिनांक ५ डिसेंबर २०२१ रोजी संपुष्टात येत आहे. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवालानुसार (DPR) नुसार वाहने व इतर साधन सामुग्री ई-निविदा प्रसिध्द करुन खरेदी करण्यासाठी व आजची परीस्थितीनुसार आवश्यक अतिरीक्त वाहनांची पुर्तता करुन त्यांची बांधणी**

करण्यासाठी व कचरा वाहतुकीसाठी अभिकर्त्याची नेमणुक करण्यासाठी किमान ४ ते ५ महिन्यांचा कालावधी अपेक्षीत आहे. उल्हासनगर महानगरपालिकेकडे घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार घनकचरा वाहतुकीसाठी बंदिस्त वाहने व साधन सामुग्री उपलब्ध नाही. त्यामुळे खालिल बाबींची पुर्तता करणे शक्य होणार नाही.

अ) घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ व स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नमुद मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी करणे.

आ) घरोघरी जावुन कचरा गोळा करणे.

इ) संपुर्ण शहरात डस्टबिन पुरविणे.

ई) शास्त्रोक्त पध्दतीने घनकचरा वाहतुक करणे.

उ)घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचना नुसार घनकच-याची बंदिस्त वाहनातुन वाहतुक करणे.

करीता मेसर्स कोणार्क इ.प्रो.प्रा. लिमिटेड, उल्हासनगर घनकचरा वाहतुक ठेकेदार यांची ठेक्याची मुदत ०५/१२/२०२१ रोजी संपुष्टात येत आहे. त्यामुळे मे. कोणार्क इ. प्रो. प्रा. लिमिटेड, यांना मुदत वाढ देणेबाबत मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. प्रशासनाने यापुर्वीच मे. कोणार्क इ. प्रो. प्रा. लिमिटेड, यांना ३१ मार्च २०२२ पर्यंत अथवा नविन अभिकर्त्याची नेमणुक होऊन नविन परिपुर्ण व्यवस्था कार्यन्वित होईपर्यंत मुदत वाढ देण्यास मान्यतेसाठी मा. महासभेसमोर सदरचा प्रस्ताव दिनांक १०/११/२०२१ रोजी सादर केलेला आहे.

दिनांक ०१/१२/२०२१ रोजी सांयकाळी ०४:१५ वाजता मे. कोणार्क, इन्व्हायरो प्रोजेक्ट प्रा. लि., घनकचरा वाहतुक ठेकेदार यांनी लेखी पत्र दिले असून सदर पत्रान्वये **As per your letter dated 02/11/2021 we would wish to continue the contract/Extension of contract beginning on 5th December, 2021. We would want to raise the bills including the escalation for the running bill monthly, so that the payments are done on monthly basis including escalation (i.e. Regular Bill + Escalation Bill)** नुसार मुदतवाढ स्विकारली आहे.

शहरातील दैनंदिन घनकचरा वाहतूकीसाठी मा. स्थायी समिती ठराव क्र. ६२, दिनांक २८/०३/२०१३ अन्वये प्रति दिन ४,४६,४००/- व प्रत्येक तिन महिन्यांनी (Escalation) दरवाढ रक्कम देण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार निविदेतील व करारनाम्यातील अटी व शर्ती नूसार दैनंदिन प्रति दिन रुपये ४,४६,४००/- दर वाढी सह (Escalation) दरवाढ रक्कम मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सविनय सादर.

मेसर्स कोणार्क इ.प्रो.प्रा. लिमिटेड, उल्हासनगर घनकचरा वाहतुक ठेकेदार यांच्या सदर खाजगी ठेक्याची मुदत दिनांक ५ डिसेंबर, २०२१ रोजी संपुष्टात येत आहे. तरी ३१ मार्च, २०२२ पर्यंत अथवा नविन अभिकर्त्यांची नेमणुक होउन, नविन परिपुर्ण व्यवस्था कार्यन्वित होईपर्यंत मेसर्स कोणार्क इ.प्रो.प्रा. लिमिटेड, उल्हासनगर घनकचरा वाहतुक ठेकेदार यांना मुदत वाढ देणेसाठी त्याकरीता येणा-या खर्चास मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सविनय सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.९३</u> <u>दिनांक : ०३/१२/२०२१</u>

सुचकाचे नाव :— श्री. चेद्रशेखर यादव

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

**ही स्थायी समिती वरील वरील प्रस्तावनेनुसार व सभेत झालेल्या चर्चेअंती, मेसर्स कोणार्क इ.प्रो.प्रा. लिमिटेड, उल्हासनगर घनकचरा वाहतुक ठेकेदार यांच्या सदर खाजगी ठेक्यास दरवाढीसह ३ मार्च, २०२२ पर्यंत मुदतवाढीस मान्यता देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-** विषय क्रमांक ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.४ :—** संभाव्य कोवीड-१९ तिस-या लाटेचा धोका लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाय योजन पुर्वतयारी करण्यासाठी उमपाचे नव्याने सुरु करण्यात येणा-या DCHC/DCH/CCC रुग्णालयात भरती होणा-या सौम्य व मध्यम सौम्य ऑक्सिजन कमतरता असणा-या रुग्णांस आरोग्य सेवा पुरविण्यासाठी शंभर (१००) Oxygen Concentrator Machine १० Liter Capacity खरेदी करण्यारिता मा. स्थायी समिती समोर मान्यतासाठी सादर.

---

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** कोण आहे आम्हांला मार्गदर्शन करेल.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** कोण आहे हॉस्पिटलचे बघणारे. तुम्हीच आहेत का? या बोला. किती बेडचे हॉस्पिटल आहे. त्याच्या मध्ये १०० ऑक्सिजन. हिदुंजाला पण तेवढे नसतील.

**उप आयुक्त, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-** सन्माननीय सदस्य, सन्माननीय सभापती आपल्याला अँटालियाला २०० बेडचे हॉस्पिटल होत आहे आणि आपल्या शांतीनगरला ही २०० बेडचे हॉस्पिटल होत आहे. तर आपल्याला तिस-या लाटेची शक्यता पाहता दुस-या लाटेमध्ये ऑक्सिजनची कमतरता पाहता ब-याच ठिकाणी काही अपघात झालेले आहेत. तर ती अत्यावश्यक बाब आहे म्हणून ती उपलब्धत व्हावी. यासाठी आम्ही तयारी केलेली आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** बघा यात पान नंबर २ मध्ये आपण लिहिले आहे कोरोना विषाणू वरुन दुसरी ओळ कोरोनाची विषाणूची दुसरी लाट आलेली असून कोरोना बाधीत रुग्णाच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. ही बाब खरी आहे का.

**उपआयुक्त, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-** आता हे तिस-या लाटेच्या संभाव्य शक्यता आपण केलेली आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया :-** साहेब तुम्ही २ री लाट तुम्ही काय लिहिले आहे ते वाचा. दुसरी लाट आलेली असून

**उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य, डॉ. सुभाष जाधव विभाग:-** त्या त्या वेळेला केले आहे. ज्यावेळेस प्रशासकीय तयारी करतो त्यावेळेची परिस्थिती लिहिलेली आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** या आधीच्या बॉटम ओळीवर जा. सोबत टेक्नीकल स्पेसिफिकेशन जोडून देण्यात आलेली आहे. आम्हांला तर मिळाली नाही. गोषवा-यात लिहिले आहे टेक्नीकल टेक्नीकल स्पेसिफिकेशन जोडण्यात आले आहे आपण कुठे लिहिले आहे तर मला दाखवा.

**उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-** टेक्नीकल स्पेसिफिकेशन आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया :-** दाखवा, दाखवा.

**उपआयुक्त्, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-** संचिकेमध्ये जोडलेले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** ती संचिकाची झेरॉक्स काढा, सोडा आणि एकएकाला दया. आपण आमच्या गोषवा-यात लिहिले आहे की, सोबत टेक्नीकल स्पेसिफिकेशन जोडण्यात आले आहे तर येथे जोडले पाहिजे. चला आपण वाचा. सर आपण वाचून दाखवा.

**उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-** ठिक आहे.

**उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-** बरोबर आहे सर टेक्नीकल जोडण्यात आलेले आहे असे लिहिलेले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** याचा बिलो दर काय आहे? व्हाट इज दि बिलो रेट

**उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-** टेक्नीकल पेसिफिकेशन मध्ये आहे सर.

ची टक्केवारी काय आहे. ९३ अधिक वर आहे. त्याचा साउंड लेवल काय आहे? आउट लेटचे प्रेशर काय आहे? ऑपरेटिंग प्रेशर काय आहे, ऑक्सिजन आउटपुट प्रेशर काय आहे? पावर फेलियर अलार्म आहे का?, ओव्हर हिट अलार्म आहे का? , लो प्युरिटी अलार्म आहे का?, व्होलटेज अलार्म आहे का?, ऑक्सिजन प्युरिटी परसेंटेज डिसप्ले आहे का?, डिझार्जन....

**उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-** बरोबर आहे. टेक्नीकल स्पेशिफिकेशनमध्ये आहे संचिकेमध्ये. टेंडरमध्ये केले आहे, आपण तुम्हांला सगळे सादर करु सर. आपण मागणी केल्याप्रमाणे तुम्हांला सगळ देवू सर. ते आहे आमच्याकडे. आपल्याला सादर करु सर.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** सांगा तुम्ही सांगा. मिनिटसमध्ये आले पाहिजे. मला नका दाखवू. तुम्ही वाचा.

**उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-** मेडिकल ऑफिसर आपले पुण्याला मिटिंगला गेले आहेत. तर मी त्यांच्यावतीने सांगतो Specification of oxygen concerten of १० ltr. Capacity, oxygen to provide from oxygen concertation of the follow mit. By oxygen sensence behide sounde leval below ५० desible Wich Should be of p.s.a Tecnology mentenes Free wall Oxgen of consotion of ९० Present oxygen out Put ०२१० L.p.m. Preser Atomatic p.s.I......

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** याला पास करा.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** गॅरंटी आणि वॉरंटी

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-</u>** राजेशजी विषय पास करा.

**<u>उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-</u>** याबाबत आम्ही त्यांना मेल केलेला आहे. तीन मेल केले आहे हे समजण्यासाठी संबंधीत जो पुरवठादार आहे तो तीन महीन्या पासून आले नाही. गॅरंटी आणि वॉरंटी १०० ची मागणी केली आहे. पण समजा २-३ ऑउट ऑफ ऑर्डर होवू शकतात टेक्नीकलमुळे. स्टॅण्ड बाय घेण्यासाठी पण आम्ही त्यांना सांगितले होते. मेल प्रसिाद करत नाही. जेव्हा आम्ही वर्क ऑर्डर देवू तेव्हा त्यांच्याकडून लिहून घेवू. नंतर आम्ही ती कार्यवाही करु शकतो.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:-</u>** हे बघा, आपण ज्यावेळेस टेंडर काढतात. या चार लोकांकडून आपण दर मागितले आहेत. तर त्यात आपल्या काही अटी असतात. यामध्ये ही मशिन पाहिजे, त्यासाठी एवढी कपॅसिटी पाहिजे, एवढी वॉरंटी, एवढी गॅरंटी असली पाहिजे. नाहीतर ऑपरेशन व मेन्टंन्स त्याला मोफत करुन दयायचा आहे. ३ वर्ष २ वर्ष ५ वर्ष.

**<u>उपआयुक्त्, वैदयकिय आरोग्य, डॉ. सुभाष जाधव:-</u>** वॉरंटी, गॅरंटी असेल ना सर.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:-</u>** मी तेच विचारतो आहे.

**<u>उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-</u>** गोषवा-यात ते नाही होत वेगळे आम्ही देवू शकतो.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:-</u>** साहेब टेक्नीकल स्पेशिफिकेशन नाही आहे.

**<u>उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य, डॉ. सुभाष जाधव:-</u>** आहे ना सर.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:-</u>** वॉरंटी, गॅरंटी नाही आहे.

**<u>उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-</u>** त्यांना कंडीशन दयायलाच लागते तर टाकतो ना. त्या अटीमध्ये ते टाकावेच लागते सर कोणी पण घेतो तेव्हा वॉरंटी, गॅरंटी सोबत

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:-</u>** आपण सांगा की आहे कारण हे मिनिट रेकॉर्ड होत आहे.

**<u>उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-</u>** एम. ओ.एच असते तर त्यांनी सांगितले असते.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:-</u>** एम. ओ.एच. नाही आहेत म्हणुन तर मी एमओएच चे प्रश्न आपल्याला विचारत नाही. प्रशासनाल प्रशन विचारत आहे. टेक्नीकल के प्रश्न विचारतो. नाहीतर मी विचारले असते टेक्नीकल...

**<u>उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-</u>** सर मी समाधानी आहे आपल्या कृपया मान्यता मिळावी, हि विनंती. गॅरेंटी ऑफ इको मेन सप्लाय दि गॅरेटी इन्कुलूड लास्ट टू ऐअर वॉरंटी ऑफ सप्लाय ॲन्उड स्पेअर पार्ट इट इज स्टॅडर्ड पॉलिसी ऑफ गिव्ह टू कंपनी फॉर मोर दि टू ऐअर विल बी ॲक्सेप्टेड यु.एम.सी...

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:-</u>** मान्यता मिळेल. प्रश्न विचारण्याचा अर्थ असा नाही की, मी याला विरोध करत आहे. प्रश्न विचारण्याचा अर्थ असा आहे की, मी आपल्याकडून माहिती घेत आहे. जी माहिती यात स्पष्ट नाही आहे ती आपल्याला विचारत आहे.

**<u>उप आयुक्त्, वैदयकिय आरोग्य विभाग, डॉ. सुभाष जाधव:-</u>** सर त्याच्यासाठी सुध्दा आम्ही इ मेलद्वारे माहिती मागिवली आहे. ते घेवून पुढील वर्क ऑर्डरची कार्यवाही करू. धन्यवाद सर.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:-</u>** पास इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** पास इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>महापालिका सचिव:-</u>** पास इतिवृत्ताची वाट न पाहता, खरेदी करण्यास मान्यता देते आहे.

---

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑ **विषय क्र.** ४ :— संभाव्य कोवीड-**१९** तिस-या लाटेचा धोका लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजना पुर्व तयारी करण्यासाठी उमपाचे नव्याने सुरु करण्यात येणा-या **DCHC/DCH/CCC** रुग्णालयात भरती होणा-या सौम्य व मध्यम सौम्य ऑक्सिजन कमतरता असणा-या रुग्णांस आरोग्य सेवा पुरविण्यासाठी **शंभर** (१००) **Oxygen Concentrator Machine १० Liter Capacity** खरेदी **करण्यारिता** मा. स्थायी समिती समोर मान्यतासाठी सादर**.**

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आदेशित करण्यात येते की, ज्याआर्थी सध्या जगभरात पसरलेल्या करोना विषाणूची लागण झाली आहे. सदर रोगाच्या प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने करोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधनात्मक कायदा, १८९७ संदर्भ क्र. ०१ अन्वये दिनांक १४ मार्च २०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनूसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महापालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम आहेत असे घोषित करण्यात आले आहे.

त्याअर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिनूचनेव्दारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने तसेच महानगरपालिका क्षेत्रात कोरोना संबंधि विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) "क" मध्ये नमूद केलेप्रमाणे कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अ शा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुसऱ्या एखादया नगरपालिका प्रधिकाऱ्याच्या किंवा १ (राज्य) शासनाच्या मंजूरी, मान्यता किंवा प्रधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहीजे असे नमूद आहे.

आपत्ती व्यवस्थापण कायदा २००५ मधील कलम ५० (अ) अन्वये आपत्कालीन खरेदी व आपत्तीजन्य परीस्थिती किंवा धोक्याच्या कारणांमुळे राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राणिकरण बचाव करण्यासाठी तात्काळ तरतुद किंवा साहीत्य खरेदी करणे किंवा संसाधनांचा त्वारीत उपयोग करणे आवश्यक आहे असे नमूद आहे. तसेच आपत्कालीन खरेदी करणेसाठी संबंधित विभाग किंवा प्राधिकरणाला ते अधिकृत करुशकतात आणि आपत्कालीन परीस्थितीत निविदा मागविण्याची आवश्यक असलेली मानक प्रक्रिया माफ केलेली मानली जाईल असे नमूद आहे.

महानगरपालिका अधिनियम १९४१ कलम ३१९ नुसार शहरात कोणत्याही वेळी कोणत्याही दुधंर रोगांचा प्रार्दुभाव झाला असेल किंवा प्रार्दुभाव होण्याची भिती निर्माण झाली असेल अशा प्रसंगी किंवा कोणत्याही सांसर्गीक रोग उद्भवला असेल किंवा शहरातील गुराढोरांमध्ये त्याचा प्रार्दुभाव होण्याचा संभव असेल अशा प्रसंगी अधिनियमाच्या आणि नियमाच्या किंवा त्या वेळा अंमलात असलेल्या अन्य कोण्त्याही कायद्याच्या सामान्य तरतुदी त्या प्रयोजनासाठी

अपुऱ्या आहेत असे आयुक्तांना वाटेल तर त्यास शासनाच्या मंजूरीने नियमांत विनिर्दिष्ट करण्यात आले असतील असे आणि अशा रोगाच्या प्रार्दुभाव किंवा प्रसारात प्रतिबंध करणेसाठी त्यास आवश्यक वाटतील त्या उपाययोजना करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान केले आहेत.

त्याअर्थी उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सदर अधिसुचनेव्दारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने तात्काळ आरोग्य सेवा पुरविणे आवश्यक आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचे स्वत:चे रुग्णालय नाही व वैद्यकीय यंत्रणा उपलब्ध नाही. या करिता सदर आजारवर मात करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात उमपाचे स्वता:चे नव्याने दोन रुग्णालय सुरु करणे प्रस्तावित असून सदर कोवीड कालावधीत त्याचा वापर DCHC/DCH रुग्णालय म्हणुन करण्यात येणार आहे. सदर रुग्णालयातील खाटांची मर्यादा प्रति २०० खाटा (एकुण ४०० खाटा) असून यामध्ये प्रति ३० आय.सी.यु. खाटा (एकुण ६० खाटा) आहेत.

सदर नव्याने सुरु करण्यात येणा-या कोवीड रुग्णालया अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जनतेस आरोग्य सेवा पुरविण्यात येणार आहे. कोरोना विषाणू आजाराची दुसरी लाट आलेली असून सद्यस्थितीत **कोरोना बाधित रुग्णांच्या संख्येत मोठया प्रमाणावर वाढ झालेली आहे तसेच** संभाव्य कोवीड-१९ तिस-या लाटेचा धोका लक्षात घेता कोवीड रुग्णांची संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरिता सदर DCH/DCHC/CCC या कोवीड-१९ रुग्णालयात भरती होणा-या सौम्य व मध्यम सौम्य ऑक्सिजन कमतरता असणा-या रुग्णांस तात्काळ प्राधान्याने ऑक्सिजन पुरवठा व आरोग्य सेवा पुरविणे आवश्यक आहे. याकरिता सदर कोवीड रुग्णालयात Oxygen Concentrator Machine १० Liter Capacity उपलब्ध असणे आवश्यक आहे. याकरिता याकरिता सदर DCH/DCHC/CCC या कोवीड-१९ रुग्णालयाकरिता खालील प्रमाणे १०० Oxygen Concentrator Machine १० Liter Capacity खरेदी करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच संदर्भिय पत्र क्रमांक-४ व ५ अन्वये आयोजित करण्यात आलेल्या व्हिडीओ कॉन्फरेन्समध्ये संभाव्य तिस-या लाटेची पुर्व तयारी व Medical Oxygen Storage व PSA Plants याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्यान्वये सदर Oxygen Concentrator Machine १० Liter Capacity तपशील खालील प्रमाणे आहे. (सोबत TECHNICAL SPECIFICATION जोडण्यात आलेले आहे.)

| अ.क्र. | Item Description | Qty | Units | Basic Rates / each in fig Rs. | Total Cost in fig Rs. |
|---|---|---|---|---|---|
| १ | Oxygen Concentrator Machine of १० liters capacity<br><br>(As per specification) | 100 | Per units | 80,000/- | 80,00,000/- |
| **Total** | | | | | **80,00,000/-** |

सदरबाब ही कोव्हिड-१९ शी संबंधीत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) "क" मध्ये नमुद केलेप्रमाणे व संदर्भिय परिपत्रक क्रमांक-३ अन्वये प्रकरण क्रमांक ३ (विशेष परिस्थितीतील खरेदी) मधील अनुक्रमांक ३.३.१ (तातडीचा खरेदी आदेश) नुसार विशेष परिस्थितीतीमध्ये तातडीच्या परिस्थितीत प्रशासकीय विभाग प्रमुख यांना रु. १ कोटी पर्यतची तातडीची खरेदी त्यांचे स्तरावरुन करता यईल.

तरी वरील प्रमाणे Oxygen Concentrator Machine १० Liter Capacity खरेदी करिता रु.८०,००,०००/- (अक्षरी रुपये ऐंशी लक्ष मात्र) ऐवढा खर्च सादर करण्यात आले होते. सदर **१०० Oxygen Concentrator Machine १० liter capacity (DCHC / DCH/ CCC )** खरेदी करण्याकरिता ई-निविदा दि. **१९/०७/२०२१** रोजी **online** प्रसिध्द करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| **१** | प्राकलनीय खर्च | रुपये ८०,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| २ | ई. निविदा **Maharashtra Tenders website** वर प्रसिध्द करण्याची दिनांक | दि. १९/०७/**२०२१** |
| **३** | ई. निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्र | दै. वृत्तमानस, दै. नगर न्युज |
| **४** | ई. निविदापुर्व बैठक दिनांक | दि. २२/०७/**२०२१** |
| **५** | ई. निविदा विक्री कालावधी | १९/०७/**२०२१** ते २७/०७/**२०२१** |
| ६ | ई. निविदेचा तांत्रिक भाग उघडण्याची दिनांक | २८/**०७/२०२१** |
| ७ | ई. निविदेस भाग घेतलेल्या निविदाकारांची संख्या | चार |

सदर निविदेचा तांत्रिक लिफाफा दि. **२८/०७/२०२१** रोजी उघडण्यात आला. ई. निविदेस चार निविदेकारांनी भाग घेतले **१.** मोदीदटेक ईंटरनेशनल **२.** बोस्टोनिवी **३.** युनिवरसल इलेकट्रोकल आँड इलेकट्रोनिकल कंपनी **४.** मन इलेक्ट्रोनिक. सदर ई. निविदेची अटी व शर्तीची पुर्तता केल्याने चारही निविदेकार पात्र ठरविण्यात आले.

| Check List | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Particular | Company Name | | | |
| | | Moditech International | Bostonivy | Universal Electrical and Electronical company | Mann Electronic |
| 1 | Forwarding letter in prescribed format per Annexure no. I | पात्र | पात्र | पात्र | पात्र |
| 2 | Statement of particulars of manufacturer/distributor/agent etc. in prescribed format as per Annexure II. | पात्र | पात्र | पात्र | पात्र |
| 3 | Scope of mandatory supply with standard accessories as per tender specification in Annexure IV. | पात्र | पात्र | पात्र | पात्र |
| 4 | E.M.D (Earnest Money Deposits) and document fees: should be paid online | पात्र | पात्र | पात्र | पात्र |
| 5 | Valid copy of shop and Establishment certificate | पात्र | पात्र | पात्र | पात्र |
| 6 | GST Registration Certificate | पात्र | पात्र | पात्र | पात्र |
| 7 | Details of specification of the equipment quoted | पात्र | पात्र | पात्र | पात्र |
| 8 | Details of past two years' experience : a certificate about the supply of past 2 years of medical equipment and details of spare parts, after sales service and repairs of the equipment should be submitted. Attested copies of certificate issued by hospital /institution that have used/ are using the equipment should be submitted. (Preferable Govt. / semi Govt. / Reputed Pvt. Hospital with more then 50 beds); | पात्र | पात्र | पात्र | पात्र |
| 9 | Catalogues of the equipment quoted should be submitted in technical envelope | पात्र | पात्र | पात्र | पात्र |
| 10 | Bonafide distributor's certificate:- Annexure No. III | पात्र | पात्र | पात्र | पात्र |
| 11 | Bidder must submit last three financial years CA certified documents | पात्र | पात्र | पात्र | पात्र |

सदर ई. निवीदेच्या आर्थिक लिफाफा दि. **०३/०९/२०२१** रोजी दुपारी **३.००** वा. उघडण्यात आला. चारही निविदेकारांनी ऑनलाईन वर सादर केलेले **BOQ** ची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. ऑनलाईन वरुन प्राप्त **BOQ** मध्ये मन इलेक्ट्रोनिक निविदेकारची दर कमी दर्शवली आहे. चारही निविदेकारांनी सादर केलेले दर खालील प्रमाणे आहे.

तक्ता — अ---- तुलनातमक तक्ता

| **Company Name** | **Boston Ivy Healthcare Solution Pvt. Ltd** | **Universal Electrical And Electronics Co.** | **Moditech International** | **Mann Electronics** |
|---|---|---|---|---|
| **Rate per Quantity (including Gst)** | **७३,३३३/-** | **६३,३१५/-** | **६७,९००/-** | **६०,९००/-** |
| **Total Amount for १०० Quantity (including Gst)** | **७३,३३,३००/-** | **६३३,१,५००/-** | **६७,९०,०००/-** | **६०,९०,०००/-** |

वरील तक्तानुसार मन इलेक्ट्रोनिक निविदाकाराचे दर चारही निविदाकारपेक्षा कमी आहे. तरी सदर निविदाकाराला दि. २०/०९/२०२१ रोजी दराची वाटाघाटी करण्याकरिता बोलविण्यात आला होता. मा. उप-आयुक्त (वै.आ.वि.) यांच्या दालनात मा. ई. निविदा समिती सदस्य समोर वाटाघाटीची बैठक घेण्यात आली व मन इलेक्ट्रोनिक यांचे ऑथोराईस्ड व्यक्तीने **email** द्वारे अंतिम दरची सुचना देण्यात येईल असे सांगीतले. मन इलेक्ट्रोनिक निविदाकारांने दि. २३/०९/२०२१ रोजी **email** द्वारे रु **. २००** प्रती नग (Rate per Quantity) कमी केले व तसेच अंमित दर **६०७००/-** प्रती नग ठरविण्यात आलेले आहे. त्यान्वये **Oxygen Concentrator Machine १० liter capacity** ची नवीन दरनूसार तपशिल खालीलि प्रमाणे आहे

तक्ता - ब

| **Company Name** | **Mann Electronic** |
|---|---|
| **Rate per Quantity (including Gst)** | **Rs. ६०,७००/-** |
| **Total Amount for १०० Quantity** | **Rs. ६०,७०,००० /-** |

वरील तक्तान्वये १०० Oxygen Concentrator Machine १० liter capacity खरेदी करण्याकरिता रु. ६०,७०,०००/- (साठ लाख सत्तर हजार मात्र) खर्च येतील.

सदर ई. निविदा अंदाजीत रक्कम रु ८०,००,०००/- अपेक्षिलेली आहे. निविदाकार यांनी दिलेले दराची वाटाघाटी केल्यानंतर रु. ६०,७०,०००/- (साठ लाख सत्तर हजार मात्र) एवढी रक्कम आहे. निविदाकारने सादर केलेली रक्कम अंदाजीत रक्कमेशी कमी आहे. तसेच सदरचा खर्च B-२ (३) या लेखाशिर्षातुन किंवा कोवीड - १ ९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधातून करण्यात येतील. सदरबाब मा. स्थायी समिती समोर मान्यतासाठी सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.९४** **दिनांक: ०३/१२/२०२१**

**सुचकाचे नाव :— श्री. चंद्रशेखर यादव**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव**

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार संभाव्य कोवीड-१९ तिस-या लाटेचा धोका लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजना पुर्व तयारी करण्यासाठी उमपाचे नव्याने सुरु करण्यात येणा-या DCHC/DCH/CCC रुग्णालयात भरती होणा-या सौम्य व मध्यम सौम्य ऑक्सिजन कमतरता असणा-या**

**रुग्णांस आरोग्य सेवा पुरविण्यासाठी** शंभर (१००) **Oxygen Concentrator Machine १० Liter Capacity करीता रु.**६०,७०,०००/- (साठ लाख सत्तर हजार मात्र) **खरेदी करणेस मान्यता देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची** सही/—

**अनुमोदकाची** सही/—

**सर्वानुमते**
**सभापती/पीठासीन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**महापालिका सचिव:- विषय क्र.५ वाचून दाखवतात.**

---

**विषय क्र.५ प्रस्तावाची सुचना**

**उल्हासनगर -५ प्रभाग क्र.१६ मधील हील व्हीव्यु व बाबाधाम येथे नाल्याची भिंत व साकव बांधणेच्या कामास महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ (२)अन्वये देण्यात आलेला कामामध्ये ठेकेदारास बदल होणेसबाबत. पालिका सदस्य सुचक म्हणून श्रीम कांचन लुंड व अनुमोदक श्री. राजेश वदारिया यांचा प्रस्ताव विचारात घेणे.**

---

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** मा. सभापतीजी, मे. कृष्णा कन्स्ट्रक्शन, ४०२, साई सदन, झुलेलाल स्कुल, उल्हासनगर-२ लेटर हेडवर आम्हांला पत्र मिळाले आहे. सचिव मॅडम, मा. आयुक्त्, मा. सभापती, महापालिका सचिव त्यांना पण दिले आहे त्यांनी मला वाचण्यासाठी दिले आहे. त्यांनी म्हटले आहे की, माझ्या संमतीने पास झालेला आहे. माझे लाखो रुपयाचे बिल महानगरपालिकेमध्ये थकीत आहे यामुळे माझ्याकडे हे काम करण्यासाठी पैसे नाहीत. त्यामुळे मी हे काम करु शकत नाही. तरी माझी आपणांस विनंती आहे की, वरील कामे दुस-या ठेकेदारास देण्यात यावे. तर ५ (२) (२) मध्ये हे काम दुस-या एजन्सीला दया.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** का करीत नाही.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** झा.पी. कंपनीला दया.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** ही जी प्रस्तावाची सुचना आहे. हे लेटर नंतर जर प्रस्तावाची सुचनेला वाचणार तर प्रस्ताव सुचनेमध्ये अगोदरच एक नाव लिहून पाठविले आहे. ज्यांनी ही प्रस्तावाची सुचना दिली आहे. मी त्यांना निवेदन करतो की, त्यांनी कोणाचे नाव टाकण्याची मागणी केली आहे, सांगा जरा.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** मा. सभापतीजी ही जी सुचना आहे प्रस्तावाची हे लेटर पॅड स्थायी समिती सभापती मला वाटते राजेशजी पण होते. हे नाव का लिहिले आहे असे. खाली आले आहे एक्स स्थायी समिती सभापती लेटर नाव हरवले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** तर ते सचिव विभागाने स्थायी समिती सभा विषय क्र. ५ चे दिनांक ३/१२/२०२१ ची पटटी लावली आहे तर नावाच्या वरती पटटी लावली आहे त्यात आमची काय चुक आहे. मॅडमने तर आपल्यावर लेटरहेड वर

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** सर आपल्याला नाही विचारत ना. सभापतींना विचारले मॅडम एक्स स्थायी समिती सभापती राजेशजी पण होते कांचन बहन पण होती. तेच विचारत होतो अजून काही नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** वरती नाव लिहिले आहे. लेटर हेडवर जो पत्ता आहे. त्यावर पटटी चिकटवली आहे. त्यात स्पष्ट लिहिले आहे साई वसंतशहा दुरुस्त केले जावे

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** साहेब आता बरोबर आहे इतके सविस्तर तर आपण उत्तर त्यांना का देवू देत नाही. सर मी काय बोललो राजेश पण माजी स्थायी समिती सभापती राहीले आहेत. आणि मॅडम पण सभापती राहील्या आहेत. आणि ही सभापती सुचना जी आली आहे. ठेकदाराचे पत्र नंतर आले आहे. मी करणार. याच्या आधी सुचना आली. बरोबर. राजेशजी ते पत्र दया ना. सभापती साहेबांकडे आले आहे.

**सदस्या, श्रीमती कांचन लुंड:-** सभापती सर माझा प्रस्ताव आहे की ए. एम. रामचंदानी यांना दिले जावे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** त्याचे पण पुर्ण झाले.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** आपल्या सहीचे एक लेटर आहे.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** भालेरावजी काम कोणाला दयायचा आहे, तोच ठराव करा.

**सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-** अधिकारी सांगतील ना.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** सुचने बरोबर एक पत्र पण लावले आहे.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** कुलवंतजी आता विषयच समाप्त होणार आहे.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** हा विषय आहे, पण पत्र काय आले आहे?

**सदस्य, श्री. चंद्रशेखर यादव:-** दुस-याला नाही तर तिस-याला दया.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** आमची सदस्या कांचन लुंडजी यांनी प्रस्ताव दिला आहे की, हे काम एम. रामचंदानी यांना दिला पाहिजे.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** जमनुजी प्रस्ताव दिला आहे तर काय झाले बोलून पण नाही देत. प्रस्ताव दिला चांगली गोष्ट आहे. दिले जावे त्यामध्ये आम्हांला काहीच हरकत नाही. ज्या विषयास हरकत आहे ते विचारु देणार नाही का? तर मी काय विचारतो की, शितलानी यांनी जे पत्र दिले आहे. यात आपण काय दिले आहे. ठेकेदाराने पत्र नंतर दिले आहे ना. मी आपण जे पाठविले आहे, ते विचारतो आहे.

**शहर अभियंता, श्री. महेश शितलानी:-** मा. सभापती, मा. अतिरिक्त आयुक्त मॅडम, मा. सदस्यजी मी जे पत्र दिले आहे त्यात हे लिहिले आहे की, मे. कृष्णा कन्सक्ट्रशन ची कपॅसिटी संपली आहे. म्हणून आम्ही त्यांना काम देवू शकत नाही.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** तर ही जी आम्ही मागणी करत आहोत रामचंदानी जी यांची. तर यांची कपॅसिटी आहे का.

**शहर अभियंता, श्री. महेश शितलानी:-** त्यांच्या कपॅसिटीचे पण आम्हांला पडताळणी करावी लागेल.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** वेरीफाय करुन परत आणा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मी सांगू इच्छितो की, ए.एम. रामचंदानीची बिड कॅपेसिटी संपली नाही.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** जमनुजी प्रशासन सांगेल ना. प्रशासनाला उत्तर देवू दया.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** पहीले मला बोलू दया, त्याच्या नंतर प्रशासन बोलेल, जर मी चुकीचा असेल तर प्रशासन उत्तर दयावे. ए.एम. रामचंदानीला हे सी.ए. चे प्रमाणपत्र आहे ज्यामध्ये त्यांनी लिहिले आहे की, त्यांची बिड कॅपेसिटी ६ करोड १७ लाख अजून बाकी आहे.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-</u>** साहेब हे पत्र आमच्याजवळ पण आहे. आम्ही पण वाचले आहे. प्रशासन सांगेल.

**<u>सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-</u>** प्रशासन सांगेल.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- माझा विषय पुर्ण होवू दया. त्यानंतर शितलानीजी बोलतील. आपण पण बोला माझे पुर्ण झाल्यावर शितलानीजी बोलतील. आपण पण बोला. परंतु माझे पुर्ण झाल्यावर. हे सी.ए. चे प्रमाणपत्र आहे ६ करोड १७ लाखाचे त्यानंतर ए.एम. रामचंदानी ला एक काम दिले आहे ३१.०३.२०२१ ला कन्सट्रक्शन ऑफ कंपाउंड वॉल एम.एस.डब्ल्यु, फॉर यु.एम.सी.उसाटणे ५ करोड ११ लाख ८५ हजार एक काम दिले आहे. ते ५ करोड माझे पुर्ण होउ दया ना. आपण लोक जेव्हा बोलतात आम्ही मध्येच नाही येत. जर आपल्याला समजायचे असेल तर पुर्ण ऐका. ५ करोड ११ लाख ८५ हजार चे वर्क ऑर्डर आपण दिले आहे. ज्याची मुदत ३१ ऑक्टोबरला संपली आहे. ६ महिन्याचे आत जर काम चालू नाही केले, त्यांना लाईन लेवलदिली नाही तर त्याची मुदत संपली आहे. म्हणजे ५ करोडचा बिड कॅपेसिटी वाढला आहे. म्हणजे ६ आणि ५ ११ झाले कारण की, ६ महिने समाप्त झाले. टेंडरमध्ये कंडीशन आहे. वर्क ऑर्डर नंतर पण काम सुरु नाही केले. तर ते काम समाप्त होते. त्यामुळे त्याचा हा ५ करोडचा टेंडर रदद झाला.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-</u>** शितलानीजी आपण उत्तर दया. आम्ही कथा ऐकायला आलो नाहीत. आम्ही पण वाचले आहे. आमच्याजवळ पण आहे. आपण उत्तर दया.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- ए.एम. रामचंदानी आयुक्तांना पण एक पत्र दिले आहे. की,

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-</u>** चांगली गोष्ट आहे ना त्यांचे आहेत तर प्रमाणित कोण करेल. जमनुजींच्या बोलण्याने प्रमाणित होईल का. त्यांना उत्तर का देवू देत नाही तुम्ही.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- माझे ऐकुन तर घ्या.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-</u>** आपली कथा आम्ही ऐकली. सगळे समजले.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- मी सभागृहाला सांगू इच्छितो की…

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-</u>** फक्त त्यांना उत्तर देवू दया, विषय संपला.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:-ऐका, माझे बोलण पुर्ण संपलेले नाही. तोपर्यंत शितलानीजी नाही बोलणार. माझे बोलणे संपल्यावर मी आरामात बसेल. तेव्हा बोला आपण पण बोला.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-</u>** शितलानी जी उत्तर हो किंवा नाही.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- २७.०९. ला ए.एम.रामचंदानी ला एक पत्र दिले आहे. ज्या पत्रानुसार त्यांनी आपल्याला मागणी केली आहे ६ महिन्याने काम करण्यास दिले तर टेंडर समाप्त होईल. ते कागदपत्र आपल्याला देत आहे. त्यानंतर आपण सांगा कारण की, बीट कपॅसिटी आहे कि नाही. जर बीट कपॅसिटी नाही आहे. तर ५ करोडची वर्क ऑर्डर त्यांना का दिली?

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-</u>** अरे चांगली गोष्ट आहे ना आपण त्या विषयात हा विषयच नाही आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- एक वेळा नाही दहा वेळा बोललो माझे झाल्यावर बोला. हे सर्व कागदपत्रे घ्या.

**<u>शहर अभियंता, श्री. महेश शितलानी</u>**:- मा. सदस्यजी, प्रदिप रामचंदानी जींला आम्ही ५ कोटीचे काम दिले आहे. ते रदद नाही केले. त्यात लिगल डिस्प्युट आहे, साईट डिस्प्युट आहे ते हाय कमांडच्या वर चालू आहे. तर त्याची बीट कपॅसिटी जी ५ कोटीची होती त्यात आम्ही समावेश केला आहे. त्याची बीट कपॅसिटी आम्ही

कमी नाही करु शकत. त्यामुळे टेंडर बीट कपॅसिटी बघीतल्यानंतर आम्ही आपल्याला सांगू शकतो. टेंडर देवू शकतो की नाही.

या वेळी सदस्य, श्री. भगवान भालेराव हे सभगृहाच्या बाहेर गेले.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** साहेब झा. कंपनीला दया.

**शहर अभियंता, श्री. महेश शितलानी:-** आम्ही बीट कपॅसिटीला ५ कोटीमधून काढू शकत नाही. त्यामुळे त्याचा टेंडर रदद नाही होउ शकत. त्याला वर्क ऑर्डर आम्ही टेंडर रददचा दिलेला नाही आहे. ते साईट डिस्प्टयु चालू आहे. साईट डिस्प्टयुचे सर्व काम पुढे करणार आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** तर माझे हि विनंती आहे की, जय भारत किंवा नव निर्माण कंन्सट्रक्शन दोघांपैकी कोणालाही दया.

**शहर अभियंता, श्री. महेश शितलानी:-** सर आपण ज्यांना पण बोलाल त्यांना देण्यासत तयार आहे.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** ठिक आहे ना. दया ना ज्यांना दयायचे आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** जय भारत किंवा नव निर्माण कंन्सट्रक्शन कोणालाही दया.

**शहर अभियंता, श्री. महेश शितलानी:-** धन्यवाद सर.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** जय हिंद आम्ही नेहमीच बोलतो जय हिंद या जय भारत. इतिवृत्ताची वाट न पाहता. आणि जेव्हा पण आपण कोणतेही काम ५ (२)(२) मध्ये देतात एकदा आम्ही ५ (२)(२) ची बात करतो आणि दुसरीकडे वर्क ऑर्डर देताना १५-१५ दिवस लावतो तर टेंडर का होत नाही. तरी लवकर आजच्या आज सोमवारी जय भारत यांना वर्क ऑर्डर देवून काम सुरु करा.

**सदस्या, श्रीमती. कांचन लुंड:-** सर. जय भारत किंवा नव निर्माण कंन्सट्रक्शन यांना दया.

**महापालिका सचिव:-** ठिक आहे. जय भारत कंन्सट्रक्शन यांना देण्यात यावे. इतिवृत्ताची वाट न पाहता सदर काम त्यांना देण्यात येत आहे. मिटिंग संपली आहे.

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:- सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑ **विषय क्र. ५ :— उल्हासनगर-५ प्रभाग क्र. १६ मधील हिल व्हीव्यू व बाबाधाम येथे**
नाल्याची भिंत व साकव बांधणेच्या कामास महाराष्ट्र महापालिका
अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ (२) अन्वये देण्यात आलेल्या
कामामध्ये ठेकेदारास बदल होणेबाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त प्रस्तावाच्या सुचनेनुसार मेसर्स कृष्णा कंपनी एजन्सी यांची बीड कपॅसिटी संपुष्टात आली आहे. दि.३०/११/२०२१ संदर्भ- उमपा/साबांवि/शअ/२४२/२०२१, शहर अभियंता यांनी मला पत्र दिलेले आहे. त्या अनुषंगाने स्थायी समितीने कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ (२) मध्ये प्रभाग क्र.१६ मधील हिल व्हीव्यू व बाबाधाम येथे नाल्याची भिंत व साकव बांधणेचे काम स्थायी समिती सभा दि.१/११/२०२१ रोजी कृष्णा कन्स्ट्रक्शन एजन्सी यांना देण्यात आला होता. सदर एजन्सी ची बीड कपॅसिटी नसल्यामुळे आणि सदर प्रकरणी कामाची तातडी असल्यामुळे हे काम

कृष्णा कंपनी यांना न देवून उल्हासनगर महानगरपालिकामध्ये कार्यरत असणारे मेसर्स अे.एम. रामचंदानी यांना देण्यात यावे. यांना काम दिल्यास विहित मुदतीत काम पुर्ण करतील अशी अपेक्षा आहे.

तरी सदर प्रस्तावावर येत्या स्थायी समिती सभेमध्ये योग्य ती चर्चा विचारविनिमय होवून प्रभाग क्र. १६ मध्ये हिल व्हीव्यू व बाबाधाम येथे नाल्याची भिंत व साकव बांधणेचे कंत्राट मेसर्स अे.एम. रामचंदानी यांना देण्यात यावे.

दिनांक : ०३/१२/२०२१

स्थायी समिती ठराव क्र.९५

सुचकाचे नाव :— श्री. चंद्रशेखर यादव

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-५ प्रभाग क्र. १६ मधील हिल व्हीव्यू व बाबाधाम येथे नाल्याची भिंत व साकव बांधणेच्या कामास महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ (२) अन्वये देण्यात आलेल्या कामामध्ये मे. कृष्णा कंपनी यांनी सदर काम करण्यास असहमती दर्शविलेली असून सदरचे काम जय भारत कन्स्ट्रक्शन यांना देणेस मान्यता देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ६.०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती, श्री. दिपक सिरवानी यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगरमहानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:-

०५/०१/२०२२

दिनांक:- ०५/०१/२०२२ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

**१२**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा 'बुधवार, दिनांक ०५/०१/२०२२, रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात येथे मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि. ०३ जानेवारी, २०२२ रोजीचे पत्रान्वये विहीत कार्यपध्दती पालन करुन सभेस ऑनलाईन ॲपद्वारे सभा घेण्यात आली, सदर सभेत खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | **सभापती** |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश वदारीया | सदस्य |
| ४ | श्री. भगवान भालेराव | सदस्य |
| ५ | श्रीम. जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ६ | श्री. कलवंतसिंह सोहता | सदस्य |
| ७ | श्री. चंद्रशेखर यादव | सदस्य |
| ८ | श्रीम. अर्चना करणकाळे | सदस्या |
| ९ | श्रीम. कविता लाल पंजाबी | सदस्या |
| १० | श्रीम. कंचन अमर लुंड | सदस्या |
| ११ | श्री. रमेश महादेव चव्हाण | सदस्य |
| १२ | श्री. अकाश पाटील | सदस्य |
| १३ | श्री. स्वप्नील बागुल | सदस्य |
| १४ | श्रीम. सुनिता बगाडे | सदस्या |
| १५ | श्री. गजानन शेळके | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य सभेस अनुपस्थित होते/होत्या.

१) श्री. राजकुमार किशनचंद जग्यासी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. डॉ. राजा दयानिधी, आयुक्त
२. श्रीमती करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त, आयुक्ताच्या स्थानी आसनस्थ
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव
४. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त, (मुख्यालय)
५. डॉ. शुभाष जाधव , उप आयुक्त (आरोग्य)
६. श्रीम. प्रियंका राजपूत, उप आयुक्त (कर विभाग)
७. डॉ. दिपक पगारे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
८. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी

९. श्री. विजय खेडकर, प्र. मुख्य लेखा परिक्षक
१०. श्री. अशोक मोरे, सहा. लेखा परिक्षक
११. श्री. महेश सितलानी, शहर अभियंता
१२. श्री. के.जे. रहेजा, कार्यकारी अभियंता (पा.पु.वि. )
१३. श्री. अजय एडके, सहाय्यक आयुक्त
१४. श्री. गणेश शिंपी, सहाय्यक आयुक्त
१५. श्री. महेंद्र पंजाबी, सहाय्यक आयुक्त
१६. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता
१७. श्री. बाळू नेटके, मुख्य अग्निशमन अधिकारी
१८. श्री. मनिष हिवरे, सहाय्यक आरोग्य अधिकारी
१९. श्री. अच्युत सासे, प्र. सहाय्यक आयुक्त

खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती नर्गिस खान
२. श्री. बाळू भांगरे
३. श्रीमती विदया आढळ

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** सचिव मॅडम मिटींग चालू करा.

सायंकाळी ४.१५ वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** सचिव मॅडम मिटींग चालू करा.

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १ वाचून दाखवितात.

---

**⇨ विषय क्र १ :— मागील स्थायी समिती सभेचे दिनांक २७/०९/२०२१, २८/१०/२०२१, ०१/११/२०२१, १२/११/२०२१, व २२/११/२०२१, रोजीचे इतिवृत्त कायम करणे.**

---

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** **सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑ **विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक २७/०९/२०२१, २८/१०/२०२१, ०१/११/२०२१, १२/११/२०२१ व दिनांक २२/११/२०२१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव :— श्री. कलवंतसिंह सोहता

**स्थायी समिती ठराव क्र.:— १००अ** दिनांक :

**०५/०१/२०२१**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक २७/०९/२०२१, रोजीचे पृष्ठ क्र. ०१ ते ५९, दिनांक २८/१०/२०२१, रोजीचे पृष्ठ क्र. ०१ ते ९४, दिनांक ०१/११/२०२१ रोजीचे पृष्ठ क्र. ०१ ते २४, दिनांक १२/११/२०२१ रोजीचे पृष्ठ क्र. ०१ ते ३७ व दिनांक २२/११/२०२१ रोजीचे पृष्ठ क्र. ०१ ते ११ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे. सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** माझा १२/११/२०२१, व २२/११/२०२१ रोजीच्या इतिवृत्तावर ऑब्जेक्शन आहे.

**महापालिका सचिव:-** बोला सर.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** आयुक्त् साहेब, याच्यामध्ये आम्ही स्पष्ट सांगितले होते की, तुम्ही रजेवर जाण्याच्या पहीले मिटींग झाली होती. स्पष्टपणे सांगतो की, कच-याच्या संदर्भामध्ये जो विषय होता. आठ दिवसाच्या आतमध्ये टेंडर अपलोड करायला पाहीजे होता. आज पर्यंत २० ते १५ दिवसाच्या वरती झाले आहेत, अजून पर्यंत त्या संदर्भामध्ये काही झाले नाही. मिटींगमध्ये त्यांना स्पष्ट आदेश दिले होते की हे ताबोडतोब झाले पाहीजे. अदयाप पर्यंत का झाले नाही?

**आयुक्त्, डॉ. राजा दयानिधी:-** मनिष हिवरे,प्लीज उत्तर दया. सन्माननिय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दया.

**सहाय्यक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-** होय सर,..

**महापालिका सचिव:-** मनिष तुमचा आवाज येत आहे.

**सहाय्यक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-** मॅडम मला विषय कळला नाही.
**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-** कच-याचा जो विषय आहे, सन्माननिय सदस्यानी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दया.

**सहाय्यक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-** सर विषय निट ऐकू आला नाही.

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-** कच-याच्या बाबतीमध्ये त्यांनी तुम्हांला टेंडर अपलोड करायला सांगितले होते, त्या बाबतीत तुम्ही काय केले? त्यांना माहीती अवगत करा.

**सहाय्यक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-** मिटींगमध्ये ठराव झाला होता, पण ठरावाची प्रत उशिराने मिळाल्याने आणि ठरावामध्ये ज्या अटी शर्ती केल्या आहेत, त्या त्याच्यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक असल्याने त्यास विलंब झालेला आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** तुम्हांला ठरावाची प्रत देवून आठ दिवस झालेले आहेत, मी स्वत: मा. महापौरांची सही घेऊन दिलेली आहे.

**सहाय्यक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-** सर आपला आवाज ऐकू येत नाही.

**सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-** आवाज येत नाही.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** तुम्हांला ठरावाची प्रत आठ दिवस झाले आहे, महापौरांची सही घेऊन आठ दिवसामध्ये आयुक्त साहेबांची सही का नाही झाली? आता दिड महीना राहीला आहे. दिड महीन्यामध्ये आपण काय करणार आहेत? २१ दिवस टेंडरला जातील, त्याच्या नंतर टेंडर उघडायला १५ दिवस जातील, आपल्या महानगरपालिकेचा कचरा कोण कोण उचलणार? म्हणजे त्याच्यामध्ये कुठल्या कंपनीला काम दिले आहे. उदया जी एजेंन्सी करते, तिला आपण सांगू शकतो. परंतु जी बाहेरची एजेंन्सी कोणी आली, तिला काम मिळाला तर प्रत कधी बनवणार, तो कारवाई कधी करणार हा सदरचा माणसास मुदतवाढ आपण देणार आहे, तो घेणार का नाही घेणार? त्या दिवशीच सांगितले होते ना. मग आपली परिस्थिती काय आहे? आपल्या महानगरपालिकेचा कचरा कोण उचलणार?

**<u>सहाय्यक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** सर सध्या प्रस्ताव आपल्या विभागाने सादर केला आहे. तो प्रोसेसमध्ये आहे, प्रोसेस असल्यामुळे...

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** प्रोसेस म्हणजे काय? त्या दिवशीच प्रोसेस तुम्ही आम्हांला सांगीतली. आता किती दिवसात टेंडर अपलोड होईल? एवढे मला सांगा.

**<u>सहाय्यक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** सर शुक्रवार पर्यंत माझे टेंडर डॉक्युमेट फायनल होईल. शनिवारी किंवा मंगळवारी अपलोड करु शकतो.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** शनिवार व मंगळवार असे का, कुठल्या तारखा आहेत, हया?

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-</u>** शनिवारी सुटटी असणार.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** उदया शुक्रवार आहे.

**<u>सहाय्यक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** सोमवार किंवा मंगळवार.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** आता आयुक्त साहेब आहेत, आयुक्त साहेबांनीच आदेश दिलेले आहेत. अडचण पण नाही. तुम्ही शुक्रवारी अपलोड कराल का टेंडर?

**<u>सहाय्यक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** सर शुक्रवारी मला अंतिम टेंडर डॉक्युमेंट सादर करायचे आहेत सर. आयुक्त साहेबांना ते झाल्यावर फायनल होईल आणि मग सोमवारी किंवा मंगळवारी अपलोड होईल.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** एकच दिवस सांगा, कुठल्या दिवशी करणार आहेत ते. म्हणजे विषय संपेल. मागे पण तुम्ही असेच सांगितले होते, एक आठवडयात होईल. सोमवारी का मंगळवारी.

**<u>सहाय्यक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** सर मंगळवारी

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** दुसरा विषय माझा एक होता, आपण टॅक्सच्या संदर्भामध्ये एक बैठक आपण आयोजित करायला पाहीजे. तुम्ही आता १५ दिवस, १२, १३ दिवस नव्हते. मला वाटते आता परत स्थायी समिती सभापती व सदस्य, आता परत या कोरोनामुळे अडचणी यायला लागल्या. मला वाटते आपण एक बैठक परत टॅक्सच्या संदर्भामध्ये, परिस्थिती अशी आहे, साहेब आता टॅक्समध्ये आपल्याकडे डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल या चारच महीन्यामध्ये आपल्याकडे ३०,४० कोटी रुपयाची, नेहमीच १० कोटी प्रत्येक महीन्याला असे ३०, ४० कोटी रुपये आपल्याकडे येतात. परंतु आताची जर परिस्थिती बघितली तर मला वाटते आपल्याकडे टॅक्स ५ लाख पण दिवसाला येत नाही. १० लाखाच्या आसपासच साहेब येतात. जर असे राहीले तर आपल्याला कुठे १० कोटी येणार आहेत.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** माझी विनंती आहे की, हे

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** मंगळवारी त्याची वेळ तुम्हांला पण सांगितली आहे. मी तुम्हांला पत्र देत आहे.

**महापालिका सचिव:-** तीन दिवस पहीले सुचना दयायला पाहीजे, हा विषय पास..पास..

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** पेजचे सेटींग बरोबर नाही.

**महापालिका सचिव:-** आपली मशिन खराब असल्यामुळे झेरॉक्स बाहेरुन काढले जाते.

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक २ वाचून दाखवितात.

---

**⇨ विषय क्र २ :— कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना संदर्भात कंत्राटी पध्दतीने कार्यरत स्टाफ नर्स (GNM) (ANM), औषध निर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ ,वॉर्ड बॉय पदावर कार्यरत कर्मचारी यांना २ महिने किंवा पुढील ई निविदा भरती प्रक्रिया होईपर्यंत मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजूरीसाठी सविनय सादर.**

---

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** निविदा प्रक्रिया झाली का?

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** झाली आहे, पण त्याच्यात थोडीशी मिस्टेक आहे, कंडीशन ज्या असतात ना एक ठिकाणी वेगळी पध्दत, दुस-या ठिकाणी वेगळी पध्दत ई-निविदा प्रक्रिया बरोबर होत नाही, त्यात सुधारणा कराव्या लागतील. निविदा प्रक्रिया सुधारणा करावच्या असतील तर परत करावे लागेल.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. सभापतीजी, हा इंजिनियरचा टेंडर मला वाटते ६ महीन्या नंतर मुदतवाढ दिली जाते.

**महापालिका सचिव:-** इंजिनियरचा टेंडर नाही सर. स्टाफ नर्सचा आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** इंजिनियरची कमी आहे, पाणी पुरवठा विभागाचे काम व्यवस्थित होत नाही, आता विषय क्र. २ वर बोलत आहे. यांना आपण ६ महीन्यासाठी ठेवले आहे. याच्या नंतर तुम्हांला माहीती होते की, १२/१०/२०२१ ला जीपण तारीख आहे, ती वेळ संपणार आहे. आपल्याला माहीतीच आहे की, २८० दिवस जो कर्मचारी काम करती असेल तर आपल्याकडे परमानंट अधिकार मागण्याचा हक्कदार असतो. ही गोष्ट मी इंजिनियरच्या वेळी बोललो होतो आणि तेच झाले एक इंजिनियर हायकोर्टामध्ये गेला आणि मला परमानंट नोकरी पाहीजे. आज प्रायव्हेट सेक्टरमध्ये पगार चांगले आहे, परंतु नोकरी परमानंट नाही. ते कधी पण काढून टाकतात. गव्हर्नमेंट आणि सेमी गव्हर्नमेंटची नोकरीची जी मागणी आहे, ती यामुळे आहे की, नोकरी परमानंट आहे आणि आपण हीच चुक परत परत करीत आहेत. जेव्हा पासून याला मुदतवाढ देणार आहेत, जर यामधून कोणी तरी उल्हासनगर महानगरपालिकेकडे नोकरी मांगितली व त्यांना दयायला लागली त्याला जबाबदार कोण राहणार? दुसरी गोष्ट जे आपण सांगितले आहे की, एक दिवसाचा खंड हा दिल्लीमध्ये झाला आह,सुप्रिम कोर्टाची पहीली जेजमेंट आहे. लॉ डिपार्टमेंटकडून आले आहे....

**वैदयकीय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-** ही जी मुदतवाढ मागितली आहे, तेव्हा आपल्याला वॅक्सीवेशन करायचे होते, कोरोना टेस्टींग कराची होती, त्यासाठी आपल्याला स्टाफ हवा होता. आता पण कामे चालूच आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** सुप्रिम कोर्टाच्या ऑर्डर नंतर गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्राने ऑर्डीनस काढले आणि ऑर्डीनसला सुप्रिम कोर्टने रदद केले आहे. अजून तुम्हांला किती नियम सांगू नियम रदद केले आहेत, जी.आर. रदद केले आहेत. सुप्रिम कोर्टाकडून जी.आर. निघत असतो, कायदयानुसार जर एखादा जी.आर. निघत असतो तर साहेब हे बघा तो व्यक्ती कोर्टामध्ये जावून काय बोलणार आहे, मला नोककरीची गरज होती, यांनी जबरदस्ती अंडर टेकिंग केले मला दिले गेले. तर आपण त्याला काय करु शकतात. यांनी चुकी केली आहे, रस्ता ते सांगतील ना आपण का सांगायचा? तुम्हांला पहीले पण माहीती होते की, १० व्या महीन्यामध्ये टर्म संपत आहे, आपल्याकडे ६ महीन्याचे अधिकार आहेत. ६ महीन्यामध्ये २८० दिवस होत नाही तर तुम्हांला याच्या पहीले टेंडर काढायला पाहीजे होते. काय आहे, आपण यांना जी वर्क ऑर्डर देणार आहेत, त्यांना सांगणार की, १० लोक पाठवा, ते १० लोक पाठवणार? १०० पाठवा, १०० पाठवणार,

९० पाठवा, ९० पाठवणार. टेंडरमध्ये आपण बोलू शकतात की, १०० पर्यंत आपण लोक मागवू शकतात. तुम्हांला जेवढे लोक पाहीजेत तेवढे लोक तुम्हांला मिळणार आहेत. टेंडर प्रोसेसर आपण क्लीयर असली पाहीजे.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** यामध्ये सर आपण २३/११/२१ ला ठेकेदाराचे टेंडर क्लोज केले, त्या नंतर त्यांचे १५ दिवसाची वेळ होती आणि सोमवारी ओपन केले. त्याच्या नंतर सेंकन्ड...
**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** नाही, सॉरी स्पष्ट सांगा, आपण टेंडर कॉल कधी केले?
**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** २३/११/२०२१ ला.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** १५ दिवस कधी संपतात?

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** ३१/१२/२०२१ ला.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ३१/१२/२०२१ तर सव्वा महीना झाला आहे.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** १५ दिवस झाले.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** १५ दिवसाचा टेंडर करतात आणि उघडण्यासाठी सव्वा महीना लावतात. आयुक्त टेंडर उघडतात का? पहीले टेंडर उघडला जातो,

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** सर ०३/१२/२०२१ टेंडर करण्यात आला.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** तर १५ दिवस होतच नाहीत.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** दिनांक २१/१२/२०२१ ला ओपन केले, मान्यता घेतली ०३/१ ला आणि ४ तारखेला दुसरा लिफाफा उघडला, ४ तारखेला लिफाफा उघडल्या नंतर त्याच्यामध्ये एक अशी आडचण आलेली होती, दोन एजेंन्सी आपल्या वेगवगळया टेंडरमध्ये होत्या आणि ठेकेदाराने चार्जेस होते ते देण्यात येऊ नये आणि त्यामुळे अपात्र ठरविण्यात येईल अशी एक ठिकाणी अट होती.तर ती अट वगळून तिथे बिलो, अबाऊ अशी अट पाहीजे. ठेकेदाराने पहीला पान होते आणि शेवटचे पान आहे तिथे कंडीशननुसार बिलो, अबाऊ असे आपल्याला करता येत नाही. ती अट सुधारणा करुन ७ दिवसाचे सॉर्ट टेंडर करीत आहेत,

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. सभापतीजी, हे काय पहील्या टेंडरमध्ये हीच परिस्थिती आहे. परंतु टेंडर कमिटी तर होती, वेरीफाय करण्यासाठी आणि दुस-या गोष्टी करण्यासाठी आयुक्तांची गरज पडत नाही आणि त्यामध्ये गरज पडत असेल आणि आपल्याच टेंडरमध्ये चुका आहेत. एका पानावर एक कंडीशन लिहीतात आणि दुस-या पानावर दुसरी कंडीशन लिहीतात. तर ही बनवणारे यांची चुक आहे. आता आपण परत २३/११/२०२१ ला जाऊ जी दिनांक आपण लिहीली आहे, लगबग दिनांक ११/१०/२०२१, ६/१०/२०२१, ९/१०/२०२१, ९/११/२०२१ आणि मला वाटते की हे लोक अजून कामावर असतील किंवा त्यांना आपण काढून टाकले आहे.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** नाही, नाही. काम चालू आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** काम चालू आहे, त्यामुळे काढून टाकले नाही.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** आपण व्यवस्थित करा, नंतर आम्ही राहणार नाहीत, नविन आयुक्त येती, सभपती नविन येती....

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** आता ३४० लोकांचे ते खाडा बदलीचे लोक आहेत, आज माझ्याकडे ४ लोक आले आहेत, चला ४ लोक काम करा. पंधरा दिवसाची मला गरज पडली नाही, पंधरा दिवसांनी मला परत गरज पडली १० लोकांची ते मी घेतले त्यांनी दिले ना आणि आपल्या भारताचा पण कायदा आहे, हे कोण लेबर आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** हे तर डायरेक्ट आले आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** नाईकवाडे असे होते की, आपण ऐन मोमेंटवर विषय घेऊन येतात. आता आम्ही नाही पण बोलू शकत नाहीत.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** हा आता आम्ही....

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** काही अडचण आली तर ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** जबाबदारी यांचीच राहील.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** याला कुठ पर्यंत मुदतवाढ दयायची.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** ३१ जानेवारी पर्यंत.

**महापालिका सचिव:-** यामध्ये असे लिहीते, ३१ जानेवारी पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. एवढेच लिहायचे आहे ना. बाकी इतर काही लिहायचे नाही ना.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** लवकरात लवकर निविदा प्रक्रिया करुन लवकरात लवकर ऑर्डर देण्याची कारवाईकरावी अन्यथा प्रशासन जबाबदार राहील.

**महापालिका सचिव:-** लवकरात लवकर निविदा मागविण्याची कारवाई करावी. सदर बाबतीत जबाबदारी प्रशासनाची राहील.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..पास..

या वेळी आयुक्त सभागृहाच्या बाहेर गेले त्यांच्या जागी अतिरिक्त आयुक्त श्रीम. करुणा जुईकर हया आसनस्थ झाल्या.

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री. दिपक सिरवानी सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑ **विषय क्र. २** :- कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना संदर्भात कंत्राटी पध्दतीने कार्यरत स्टाफ नर्स (GNM) (ANM), औषध निर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ ,वॉर्ड बॉय पदावर कार्यरत कर्मचारी यांना २ महिने किंवा पुढील ई निविदा भरती प्रक्रिया होईपर्यंत मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजूरीसाठी सविनय सादर.

**प्रस्तावना**

कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिका सामान्य प्रशासन विभाग अंतर्गत औषध निर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, स्टाफ नर्स (GNM व ANM), व वॉर्ड बॉय या पदांची कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात ठोक वेतनावर ६ महिने कालावधीकरिता नियुक्ती करण्यात आलेली होती, सदर वरील प्रमाणे कार्यरत कर्मचारी यांची कार्यकाळ वॉर्ड बॉय (१४/१०/२०२१ व ३१/१०/२०२१ ), प्रयोगशाळा तंत्रज्ञ (०३/११/२०२१ ), औषध निर्माता (१४/१०/२०२१), स्टाफ नर्स GNM (०५/१०/२०२१, ११/१०/२०२१ व ३१/१०/२०२१) व ANM (११/१०/२०२१, ३१/१०/२०२१ व ०९/११/२०२१) संपुष्ठात येत आहे. या बाबतचा सविस्तर अहवाल खालील प्रमाणे आहे. तरी वरील प्रमाणे कर्मचारी यांचा कार्यकाळ संपुष्ठात येत आहे. संभाव्य कोव्हिड-१९ तिस-या लाटेचा धोका लक्षात घेता कोव्हिड-१९ आजाराचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी सदर खालील प्रमाणे अनुभवी कंत्रटी कर्मचारी यांची आवश्यकता आहे.

**स्टाफ नर्स (GNM व ANM)**

| अ.क्र. | नांव | पदनाम | अंतिम दिनांक | एक दिवसाचा खंड | पुढील २ महिन्यासाठीचा नियुक्ती दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. साहिबा खान | जी.एन.एम | ११/१०/२०२१ | १२/१०/२०२१ | १३/१०/२०२१ ते १२/१२/२०२१ |
| २ | श्रीम. अकिंता गोडके (कांबळे) | जी.एन.एम | ०५/१०/२०२१ | ०६/१०/२०२१ | ०७/१०/२०२१ ते ०८/१२/२०२१ |
| ३ | श्रीम.निता गडरी | जी.एन.एम | ११/१०/२०२१ | १२/१०/२०२१ | १३/१०/२०२१ ते १२/१२/२०२१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | श्रीम. अकिंता जाधव | जी.एन.एम | ११/१०/२०२१ | १२/१०/२०२१ | १३/१०/२०२१ ते १२/१२/२०२१ |
| ५ | श्रीम. कल्पणा मोरटाटे | जी.एन.एम | ११/१०/२०२१ | १२/१०/२०२१ | १३/१०/२०२१ ते १२/१२/२०२१ |
| ६ | श्रीम. भाग्यश्री वानखेडे | जी.एन.एम | ११/१०/२०२१ | १२/१०/२०२१ | १३/१०/२०२१ ते १२/१२/२०२१ |
| ७ | श्रीम.मिली डोंगरे | जी.एन.एम | ११/१०/२०२१ | १२/१०/२०२१ | १३/१०/२०२१ ते १२/१२/२०२१ |
| ८ | श्री.संतोष बोर्डे | जी.एन.एम | ११/१०/२०२१ | १२/१०/२०२१ | १३/१०/२०२१ ते १२/१२/२०२१ |
| ९ | श्रीम .कल्याणी अहिरे | जी.एन.एम | ११/१०/२०२१ | १२/१०/२०२१ | १३/१०/२०२१ ते १२/१२/२०२१ |
| १० | श्रीम. प्रज्ञा तडके | जी.एन.एम | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| ११ | श्रीम. नम्रता खंडागळे | जी.एन.एम | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| १२ | श्रीम. ज्योतस्ना क्षेत्रे | जी.एन.एम | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| १३ | श्रीम. सोनाली आहिरे | ए.एन.एम | ११/१०/२०२१ | १२/१०/२०२१ | १३/१०/२०२१ ते १२/१२/२०२१ |
| १४ | श्रीम. पुजा अंबोरे | ए.एन.एम | ११/१०/२०२१ | १२/१०/२०२१ | १३/१०/२०२१ते १२/१२/२०२१ |
| १५ | श्रीम. मनिषा सखरे | ए.एन.एम | ०९/११/२०२१ | १०/११/२०२१ | ११/११/२०२१ ते १०/०१/२०२२ |
| १६ | श्रीम. शितल गायकवाड | ए.एन.एम | ०९/११/२०२१ | १०/१०/२०२१ | ११/११/२०२१ ते १०/०१/२०२२ |
| १७ | श्रीम. शुभांगी पाटील | ए.एन.एम | ०९/११/२०२१ | १०/१०/२०२१ | ११/११/२०२१ ते १०/०१/२०२२ |
| १८ | श्रीम. अश्विनी मालवी | ए.एन.एम | ०९/११/२०२१ | १०/१०/२०२१ | ११/११/२०२१ ते १०/०१/२०२२ |
| १९ | श्रीम. रोशनी कांबळे | ए.एन.एम | ११/१०/२०२१ | १२/१०/२०२१ | १३/१०/२०२१ ते १२/१२/२०२१ |
| २० | श्रीम. ललीता सावंत (बेबी मलोडे) | ए.एन.एम | ११/१०/२०२१ | १२/१०/२०२१ | १३/१०/२०२१ ते १२/१२/२०२१ |
| २१ | श्रीम. छाया खुराडे | ए.एन.एम | ११/१०/२०२१ | १२/१०/२०२१ | १३/१०/२०२१ ते १२/१२/२०२१ |
| २२ | श्रीम. कविता मुठे | ए.एन.एम | ११/१०/२०२१ | १२/१०/२०२१ | १३/१०/२०२१ ते १२/१२/२०२१ |
| २३ | श्रीम. हेमलता लंगी | ए.एन.एम | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| २४ | श्रीम. राजश्री सोनावणे (खरे) | ए.एन.एम | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| २५ | श्रीम. मनिषा रेंगडे | ए.एन.एम | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| २६ | श्रीम. पुष्पा वानखेडे | ए.एन.एम | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| २७ | श्रीम. रागीनी सुधीर धोंगाडे | ए.एन.एम | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| २८ | श्रीम. सुष्मिता खंडागळे | ए.एन.एम | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| २९ | श्रीम. प्रियंका मोरे | ए.एन.एम | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| ३० | श्रीम. शीतल गोसावी | ए.एन.एम | ०९/११/२०२१ | १०/११/२०२१ | ११/११/२०२१ ते १०/०१/२०२२ |
| ३१ | श्रीम. सारिका गावळे | ए.एन.एम | ०९/११/२०२१ | १०/११/२०२१ | ११/११/२०२१ ते १०/०१/२०२२ |

**वार्ड बॉय**

| अ.क्र. | नांव | पदनाम | अंतिम दिनांक | एक दिवसाचा खंड | पुढील २ महिन्यासाठीचा नियुक्ती दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. शैलेंद्र रुपेकर | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| २ | श्री. कमलेश राठोड | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| ३ | श्री. धीरज यादव | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| ४ | श्री. प्रशांत पवार | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| ५ | श्री. कल्पेश सुरोशी | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| ६ | श्री. राहुल परब | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| ७ | श्री. प्रकाश वनवे | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| ८ | श्री. राजेश खैरे | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| ९ | श्री. विनोद चव्हाण | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ते १५/१२/२०२१ |
| १० | श्री. विजय सोनावणे | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| ११ | श्री. हरीओम लोंडे | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| १२ | श्री. प्रशांत राजगुरु | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| १३ | श्री. अश्विन डोळस | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| १४ | श्री. सुशील घारगे | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| १५ | श्री. विश्वास इंगळे | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| १६ | श्री. प्रदिप शेलार | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| १७ | श्री. अशीष भगत | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| १८ | श्री. कुष्णा भालेराव | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| १९ | श्री. ईश्वर पाटील | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| २० | श्री. ओमकार सासे | वार्ड बॉय | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| २१ | श्री. गोपाल किशन दिघे | वार्ड बॉय | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| २२ | श्रीम. मनिषा लोखंडे | वार्ड बॉय | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| २३ | श्री. जीवन दशरथ मांडवे | वार्ड बॉय | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| २४ | श्री. शंतानु पठे | वार्ड बॉय | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| २५ | श्री. अविनाश सोनावणे | वार्ड बॉय | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| २६ | श्री. सागर येडगे | वार्ड बॉय | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| २७ | श्री. प्रफुल पारधे | वार्ड बॉय | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| २८ | श्री. प्रदीप चव्हाण | वार्ड बॉय | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २९ | श्री. गणेश परदशी | वार्ड बॉय | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| ३० | श्री. गणेश चौधरी | वार्ड बॉय | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| ३१ | श्री. नितीन साळवे | वार्ड बॉय | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| ३२ | श्री. अजय अहिर | वार्ड बॉय | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ ते ०१/०१/२०२२ |
| ३३ | श्री. हेमंत सिंग | वार्ड बॉय | ३१/१०/२०२१ | ०१/११/२०२१ | ०२/११/२०२१ते ०१/०१/२०२२ |

**औषधनिर्माता**

| **अ.क्र.** | **नांव** | **पदनाम** | **अंतिम दिनांक** | **एक दिवसाचा खंड** | **पुढील २ महिन्यासाठीचा नियुक्ती दिनांक** |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रविण पाखरे | फार्मासिस्ट | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| २ | श्रीम. दीक्षा रामटेके | फार्मासिस्ट | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| ३ | श्रीम. तेजश्री परदेशी | फार्मासिस्ट | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |
| ४ | श्री. सोमनाथ लथुर | फार्मासिस्ट | १४/१०/२०२१ | १५/१०/२०२१ | १६/१०/२०२१ ते १५/१२/२०२१ |

**प्रयोगशाळा तंत्रज्ञ**

| **अ.क्र.** | **नांव** | **पदनाम** | **अंतिम दिनांक** | **एक दिवसाचा खंड** | **पुढील २ महिन्यासाठीचा नियुक्ती दिनांक** |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. सुवर्ण ढकणे | लॅब तंत्रज्ञ | ०३/११/२०२१ | ०४/११/२०२१ | ०५/११/२०२१ ते ०४/०१/२०२२ |
| २ | श्रीम. नेहा हरड | लॅब तंत्रज्ञ | ०३/११/२०२१ | ०४/११/२०२१ | ०५/११/२०२१ ते ०४/०१/२०२२ |
| ३ | श्रीम. अक्षदा सरनोबत | लॅब तंत्रज्ञ | ०३/११/२०२१ | ०४/११/२०२१ | ०५/११/२०२१ ते ०४/०१/२०२२ |
| ४ | श्रीम. मयूरी पाटकर | लॅब तंत्रज्ञ | ०३/११/२०२१ | ०४/११/२०२१ | ०५/११/२०२१ ते ०४/०१/२०२२ |

कोव्हिड-१९ तिस-या लाटेचा धोका लक्षात घेता काव्हिड-१९ आजाराचा प्रादुभार्व कमी करण्यासाठी वरील प्रमाणे अनुभवी कंत्राटी कर्मचारी यांची आवश्यकता लक्षात घेता त्यांना २ महिने किंवा पुढील ई निविदा भरती प्रक्रिया होईपर्यंत मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजूरीसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. १०१** **दिनांक :- ५/०१/२०२२**

**सुचकाचे नाव:- श्री. भगवान भालेराव**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. कलवंतसिंग सोहता**

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार व झालेल्या चर्चे अंती कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना संदर्भात कंत्राटी पध्दतीने कार्यरत स्टाफ नर्स (GNM) (ANM), औषध निर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, वॉर्ड बॉय पदावर कार्यरत कर्मचारी यांना दिनांक ३१ जानेवारी २०२२ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देत आहे.**

**तसेच,**

**लवकरात लवकर ई निविदा कार्यवाही पुर्ण करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.**

**या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही /-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**सभापती/पीठासीन अधिकारी**

**स्थायी समिती सभा**

**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ३ वाचून दाखवितात.

———————————————————————————————————————

**⇨ विषय क्र ३ :— उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरु करण्यात आलेल्या RTPCR प्रयोगशाळेकरिता आवश्यक असलेले मागणीनुसार प्रयोगशाळा साहित्य (Consumable Item) खरेदी करणेबाबत चा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या माहिती साठी सविनय सादर.**

———————————————————————————————————————

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** आपण माहीतीसाठी देत आहेत, परंतु पहील्या पॅराध्ये शेवटी लिहीले आहे की, सदर प्रयोगशाळा सुरु करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेकडे मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने Lab Care Plus Diagnostic Consultancy यांना मनुष्यबळ नेमणूक करणेबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे. आपण यांना पहीले लॅबच्या सामानासाठी Consultancy नियुक्ती केली आहे आणि सामान पण त्यांच्याकडूनच मागवले आहे.

**वैदयकीय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-** हे जे आहे, ते मोठमोठया कंपनीचे आहेत. ॲथोराईज केले आहे, त्यांच्या हिशोबाने केले जाईल.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** पहीली गोष्ट म्हणजे आपण कोटेशनमध्ये तीन नसून २ दरपत्रकधारक (१) M/s LabcarePlus Diagnostics Cousultancy (२) M/s Genaxy Scientific Pvt. Ltd यां

**महापालिका सविचव:-** एक मिनीट सर यामध्ये तुम्ही लिहीले आहे की, खरेदी करण्यासाठी खर्च हे माहीतीसाठी किंवा मान्यतेसाठी आहे.शेवटच्या पॅरामध्ये लिहीले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मॅडम माहीतीसाठी असला तरी आम्हांला माहीती असायला पाहीजे की, नाही.

**महापालिका सविचव:-** सर मी तुम्हांला बोलत नाही, मला ठराव बनवायचा आहे ना, म्हणून म्हणून मी विचारत आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** आपण दर पत्रकामध्ये तीन सांगिले आहे, इथे दोन मागविले आहेत.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** यामध्ये तीन लोकांनी ॲपलाय केले होते, तिस-याने एक्सटेंशन मागितले होते.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** यामध्ये खुप तफावत आहे, आपण किती वेळा रीकॉल केला आहे, दोनच कोटेशन आले आहेत. यामध्ये दोन आहेत तर दोनमध्ये आपण टेंडर रिकॉल केला आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** काय करायचे ते सांगा?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** काय मालाची सप्लायर पण तेच करणार आहेत. ते कोण बघणार आहेत? बिल कोण बघणार आहेत.

**वैदकीय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-** सर्व मटेरियल आपल्याकडे येणार आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** आपण त्यांना देणार आहेत.

महापालिका सचिव:- माहीतीची नोंद करीत आहेत.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑ **विषय क्र.३:- उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरु करण्यात आलेल्या RTPCR प्रयोगशाळेकरिता आवश्यक असलेले मागणीनुसार प्रयोगशाळा साहित्य (Consumable Item) खरेदी करणेबाबत चा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या माहिती साठी सविनय सादर.**

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आदेशित करण्यात येते की, ज्याआर्थी सध्या जगभरात पसरलेल्या करोना विषाणूची लागण झाली आहे. सदर रोगाच्या प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने करोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधनात्मक कायदा, १८९७ दिनांक १४ मार्च २०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनूसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महापालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम आहेत असे घोषित करण्यात आले आहे.

त्याअर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिसुचनेव्दारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने तसेच महानगरपालिका क्षेत्रात कोरोना संबंधि विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) "क" मध्ये नमूद केलेप्रमाणे कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुसऱ्या दखादया नगरपालिका प्रधिकाऱ्याच्या किंवा १ (राज्य) शासनाच्या मंजूरी, मान्यता किंवा प्रधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहीजे असे नमूद आहे.

आपत्ती व्यवस्थापण कायदा २००५ मधील कलम ५० (अ) अन्वये आपत्कालीन खरेदी व आपत्तीजन्य परीस्थिती किंवा धोक्याच्या कारणांमुळे राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राणिकरण बचाव करण्यासाठी तात्काळ तरतुद किंवा साहीत्य खरेदी करणे किंवा संसाधनांचा त्वारीत उपयोग करणे आवश्यक आहे असे नमूद आहे. तसेच आपत्कालीन खरेदी करणेसाठी संबंधित विभाग किंवा प्राधिकरणाला ते अधिकृत करुशकतात आणि आपत्कालीन परीस्थितीत निविदा मागविण्याची आवश्यक असलेली मानक प्रक्रिया माफ केलेली मानली जाईल असे नमूद आहे.

महानगरपालिका अधिनियम १९४१ कलम ३१९ नुसार शहरात कोणत्याही वेळी कोणत्याही दुधंर रोगांचा प्रार्दुभाव झाला असेल किंवा प्रार्दुभाव होण्याची भिती निर्माण झाली असेल अशा प्रसंगी किंवा कोणत्याही सांसर्गीक रोग उद्भवला असेल किंवा शहरातील गुराढोरांमध्ये त्याचा प्रार्दुभाव होण्याचा संभव असेल अशा प्रसंगी अधिनियमाच्या आणि नियमाच्या किंवा त्या वेळा अंमलात असलेल्या अन्य कोण्त्याही कायद्याच्या सामान्य तरतुदी त्या प्रयोजनासाठी अपुऱ्या आहेत असे आयुक्तांना वाटेल तर त्यास शासनाच्या मंजूरीने नियमांत विनिर्दिष्ट करण्यात आले असतील असे आणि अशा रोगाच्या प्रार्दुभाव किंवा प्रसारात प्रतिबंध करणेसाठी त्यास आवश्यक वाटतील त्या उपाययोजना करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान केले आहेत.

त्याअर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिसुचनेव्दारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाकडील आदेशान्वये ज्या

शहरात २०० पेक्षा जास्त कोवीड सदुश्य रुग्ण आढळले आहे. त्या शहरात नवीन RTPCR प्रयोगशाळा स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यान्वये उल्हासनगर महानगरपालिकेसाठी नवीन RTPCR प्रयोगशाळा स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आलेली होती. त्यानुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेने कोणार्क रेसिडेंसी जवळ, शहाड स्टेशन रोड, उल्हासनगर-१ येथे उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेतील जनतेस २४ x ७ तास आरोग्य सेवा पुरविण्यासाठी RTPCR प्रयोगशाळा सुरु करण्यात आलेली आहे. सदर RTPCR प्रयोगशाळेसाठी लागणारी यंत्र सामग्री शासनाकडून पुरविण्यात आलेली आहे. सदर प्रयोगशाळा सुरु करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकाकडे प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने Lab Care Plus Diagnostic Consultancy यांना मनुष्यबळ नेमणूक करणेबाबत आदेशित करण्यात आलेले आहे. यापुर्वी उल्हासनगर शहरातील कोवीड संशयित रुग्णांचे स्वॅब नमुने तपासणीसाठी NIV व Haffkine मुंबई येथे पाठविण्यात येत होते, सदर तपासणी अहवाल दोन ते तीन दिवसांनी उपलब्ध होत असे, त्यामुळे रुग्णांवर विहित कालावधीत करता येत नव्हते व रुग्ण वाढण्याचा संभाव्य धोका अधिक होता.

सदर कोवीड -१९ ची माहामारीची परिस्थिती पाहता उल्हासनगर शहरातील कोवीड संशयित रुग्णांची स्वॅब तपासणी तात्काळ होऊन तात्काळ अहवाल प्राप्त होण्यासाठी सदर RTPCR प्रयोगशाळा सुरु करुन त्यांला ICMR ची मान्यता

घेण्यात आलेली आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी, ठाणे, मा. उपसंचालक, मुंबई मंडळ, ठाणे व मा. जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, ठाणे यांनी सदर ठिकाणी प्रत्यक्षदर्शनी भेट देवुन तेथिल कामाची पाहणी केलेली आहे. उल्हासनगर शहरातील जनतेस आरोग्य सेवा पुरविण्यासाठी सदर Lab Care Plus Diagnostic Consultancy लॅब यांनी सदर लॅब सुरु राहण्यासाठी खालील प्रमाणे आवश्यक असलेल्या प्रयोगशाळा साहित्यांची (Consumable Item) मागणी केली आहे.

सदर RTPCR प्रयोगशाळा नियमितपणे सुरु ठेवुन कोवीड संशयित रुग्णांची स्वॅब तपासणी करणेकरिता सदर लॅब साठी प्रयोगशाळा साहित्य पुरवठा करणे आवश्यक आहे. तरी सदर प्रयोगशाळा साहित्य (Consumable Item) खरेदी स्थानिक स्तरावरुन दरपत्रके मागवुन खरेदी करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

सदरबाब ही कोव्हिड-१९ शी संबंधीत असल्याने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) “क” मध्ये नमुद केलेप्रमाणे व संदर्भिय परिपत्रक क्रमांक-३ अन्वये प्रकरण क्रमांक ३ (विशेष परिस्थितीतील खरेदी) मधील अनुक्रमांक ३.३.१ (तातडीचा खरेदी आदेश) नुसार विशेष परिस्थितीतीमध्ये तातडीच्या परिस्थितीत प्रशासकीय विभाग प्रमुख यांना रु. १ कोटी पर्यंतची तातडीची खरेदी त्यांचे स्तरावरुन करता यईल.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने संभाव्य कोवीड-१९ तिस-या लाटेचा धोका लक्षात घेता पुर्व तयारी व प्रतिबंधात्मक उपयायोजना करण्यासाठी उमपाच्या नव्याने सुरु करण्यात येणा-या RTPCR प्रयोगशाळा करिता लागणारे खालील प्रमाणे प्रयोगशाळा साहित्य (Consumable Item) खरेदी संदर्भात दिनांक ११/१०/२०२१ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर व सुरक्षा रक्षक यांचेकडील सुचना फलकावर जाहीरात प्रसिध्द करुन स्थानिक स्तरावरुन दरपत्रके मागविण्यात आले होते. त्यानुषंगाने विहित कालावधीत एकही दरपत्रके प्राप्त झालेले नाही. त्याअन्वये दिनांक २३/११/२०२१ रोजी मनपा संकेत स्थळावर व सुरक्षा रक्षक यांचेकडील सुचना फलकावर प्रथम मुदतवाढ जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती त्यानुषंगाने विहित कालावधीत ४ दरपत्रके प्राप्त झाले. त्यापैकी २ दरपत्रकधारक (१) M/S ३६५ Medical (२) M/S Educational & Research Aids Company यांनी अटी शर्तीची पुर्तता न केल्यामुळे अपात्र ठरले आले आहे. तसेच २ दरपत्रकधारक (१) M/s LabcarePlus Diagnostics Cousultancy (२) M/s Genaxy Scientific Pvt. Ltd यांनी अटी शर्तीची पुर्तता केल्यामुळे पात्र ठरले आले आहे. सद्यस्थितीची परिस्थिती पाहता उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात नव्याने RTPCR प्रयोगशाळा सुरु करुन तात्काळ २४ तास उल्हासनगर महानगरपालिकाची जनतेस आरोग्य सेवा देणे अनिवार्य असल्याने सदर पात्र २ दरपत्रकधारक यांचे आर्थिक लिफाफे उघडण्यात आलेले आहे.

उक्त २ पात्र दरपत्रकधारकांचे आर्थिकदेकार रक्कमेचे लिफाफे उघडण्यात आले असता दरपत्रधारक यांनी दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या दरांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**तुलनात्मक तक्ता “अ”**

| अ.क्र | प्रयोगशाळा साहित्य नाव | साहित्य तपशील | मागणी | बाजार भाव | M/s Labcareplus Diagnostics Consultancy (सर्व करांसहित) | M/s Genaxy Scientific Pvt. Ltd. (सर्व करांसहित) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Autoclave INDICATOR STRIPS | 1 X 55 METER tape | १० | 1000 | **रु ९९५/- प्रति नग** | रु ३०६८/- प्रति नग | ९९५०/- |
| २ | HI-MEDIA DISPOSABLE BAGS | 1 unit (200 Piece) | ५ | 1500 | **रु १४९३/- प्रति नग** | रु २३०१०/- प्रति नग | ७४६५/- |
| ३ | ACURO Liquid iso propyl alcohol | 1 bottle (10 Ltr) | ५ | 2000 | **रु १९९२/- प्रति नग** | रु १९९४२/- प्रति नग | ९९६०/- |
| ४ | 15 ml falcon tube Rack Stand (50 position) | 1 unit (1 Piece) | ५ | 3000 | **रु २९९८/- प्रति नग** | रु ७२४०/- प्रति नग | १४९९०/- |
| ५ | Micro centrifuge tube racks (60 position) | 1 unit (1 Piece) | ५ | 3000 | **रु २९९६/- प्रति नग** | रु १०७३८/- प्रति नग | १४९८०/- |
| ६ | PCR plate Racks | 1 unit (1 Piece) | ५ | 3000 | **रु २९९६/- प्रति नग** | रु १०३४०/- प्रति नग | १४९८०/- |
| ७ | RESERVOIR LARGE SIZE Plastic | 1 unit (100 Piece) | १ | 12000 | **रु ११९९१/- प्रति नग** | रु १७८०५/- प्रति नग | ११९९१/- |
| ८ | RESERVOIRS SMALL SIZE | 1 unit (100 Piece) | १ | 10000 | **रु ९९९९/- प्रति नग** | रु ३७२७६/- प्रति नग | ९९९९/- |
| ९ | BARRIER TIPS BOX (200 UL) | 1 Box (10 Piece) | ५ | 7000 | **रु ७०००/- प्रति नग** | रु ९२६५/- प्रति नग | ३५०००/- |
| १० | BARRIER TIPS BOX (20 UL) | 1 Box (10 Piece) | ५ | 7000 | **रु ७०००/- प्रति नग** | रु ९२६५/- प्रति नग | ३५०००/- |
| ११ | Elution plate | 1 unit (1 Piece) | ३०० | 300 | **रु २९९/- प्रति नग** | रु ४१९१५/- प्रति नग | ८९७००/- |
| १२ | Tip comb plate | 1 unit (1 Piece) | ३०० | 300 | **रु २९९/- प्रति नग** | रु ८३८३०/- प्रति नग | ८९७००/- |
| १३ | Himedia plate sealer SEALING FILM | 1unit (200 Piece) | ५ | 6000 | **रु ५९९७/- प्रति नग** | रु ११७३५/- प्रति नग | २९९८५/- |
| १४ | Himedia plate sealer-Optical SEALING FILM (Adhesive Sealer) | 1unit (200 Piece) | ५ | 6000 | **रु ५९९८/- प्रति नग** | रु ४६०२०/- प्रति नग | २९९९०/- |
| १५ | ETHANOL MB DILUENT | 1 bottle (500ml) | ६० | 3000 | **रु २९९१/- प्रति नग** | रु ८४५०/- प्रति नग | १७९४६०/- |
| १६ | semi skirt 96 WELL Q PCR PLATES, 200ul ABI,A12 CUT CLEAR FROSTED NON PYROGENIC RNASE FREE RTPCR PLATES | 1 unit (1piece) | ५०० | 500 | **रु ४९९/- प्रति नग** | रु ३८३५०/- प्रति नग | २४९५००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | 15ml microcentrifuge tube rack | 1 unit (1piece) | ५ | 2000 | **रु १९९७/- प्रति नग** | रु ४६०२०/- प्रति नग | ९९८५/- |
| १८ | SEALER APPLICATOR | 1 unit (1piece) | ५ | 500 | **रु ४९८/- प्रति नग** | रु ३८३५/- प्रति नग | २४९०/- |
| १९ | Cryovials box | 1 unit (1piece) | २५ | 2000 | **रु १९९५/- प्रति नग** | रु १३३३८/- प्रति नग | ४९८७५/- |
| २० | Eppendroff tube (1 ml) | 1 unit (1piece) | २००० | 10 | **रु ९/- प्रति नग** | रु १३८०/- प्रति नग | १८०००/- |
| २१ | peroxide silver (Himedia ) Product code CO166 | 5 lit | ३ | 5000 | **रु ४९९८/- प्रति नग** | रु ९२४०/- प्रति नग | १४९९४/- |
| **Total** | | | | | | | ९,२७,९९४/- |

वरील प्रमाणे दरपत्रक तुलनात्मक तक्ता —अ मध्ये १. M/S Labcareplus Diagnostics Consultancy यांचे दर कमी असून ते बाजार भावापेक्षा वाजवी आहेत. सदर RTPCR प्रयोगशाळा करिता लागणारे प्रयोगशाळा साहित्य (Consumable Item) खरेदी करिता रु ९,२७,९९४/- (अक्षरी रुपये नऊ लाख सत्तावीस हजार नऊशे चौ-यान्न्व मात्र) एवढा खर्च अपेक्षीत आहे. सदर वैद्यकीय साहित्य (Consumable Item) चे खरेदी करिता येणारा खर्च हा सन २०२१-२०२२ मधील विपरीत परिस्थिती व्यवस्थापन B-२(३) या लेखाशिर्षातून किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधितून करण्यासाठी चा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या माहितीसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. १०२** **दिनांक :- ५/०१/२०२२**

**सुचकाचे नाव:- श्री. राजेश वदारिया**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. कलवंतसिंह सोहता**

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार व झालेल्या चर्चे अंती,** M/S Labcareplus Diagnostics Consultancy **यांना उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरु करण्यात आलेल्या RTPCR प्रयोगशाळेकरिता आवश्यक असलेले मागणीनुसार प्रयोगशाळा साहित्य (Consumable Item) खरेदी करणेबाबत माहितीची नोंद घेत आहे.**

**सुचकाची सही/-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**सभापती/पीठासीन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ४ वाचून दाखवितात.

———————————————————————————————————

⇨ **विषय क्र ४** :— दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत शहरी बेघरांना निवारा या घटकांतर्गत बेघर निवारा व्यवस्थापन व देखभाल करणा-या संस्थाना ३ महिने मुदत वाढ देणेकरीता प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

---

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** या संस्था कोणाच्या आहेत, कोण उत्तर देणार? त्या संस्थांची नावे काय आहेत? त्यांना मुदतवाढ का दयायची आहे?

**उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-** चार नंबरचा संस्थाचा विषय आहे का? इकडे ऐकायला येत नाही. काय प्रश्न आहे, तरा परत विचाराल का?

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** संस्था कोणाच्या आहेत?

**उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-** बर पहीला प्रश्न मला कळला की, संस्था कोणाच्या आहेत,

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** संस्थेची नावे सांगा आणि गोषवा-यामध्ये तुम्ही नावे लिहीली नाही.

**उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-** पहील्या प्रश्नाचे उत्तर देवू का मी? पहीला प्रश्न आहे की, संस्था कोणाच्या आहेत? आपण जो गोषवारा दिलेला आहे, त्यामध्ये पहील्या पॅरामध्ये नावे दिलेली आहेत की या ज्या संस्था आहेत, उल्हास बेघर निवारा आदर्श आदिवासी विकास व शैक्षक संस्था ही एक संस्था आहे.आणि दुस-या संस्थेचे नाव आहे, मानव विकास सामाजिक संस्था या दोन संस्था आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** याच्यामध्ये उल्लेख नाही.

**उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-** यात उल्लेख आहे ना सर. गोषवा-यामध्ये तुम्ही पहा, पॅरा नंबर एक

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** किती वर्षापासून या संस्था काम करतात?

**उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-** त्यांना तीन वर्षे झाली आहेत, त्याच्या नंतर त्यांना सहा महीन्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आता विषय ठेवला आहे, तीन महीने किंवा त्यांचे टेंडर होईपर्यंत मुदतवाढ देणे असे आहे.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** शेवटची मुदतवाढ देवू.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** नाही, नाही विषय मॅडम असा आहे की, या संस्थेचे तुम्ही स्वत: जाऊन पाहणी केली आहे का?

**उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-** होय कलेले आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** कुठल्या संस्था चालू आहेत, त्या दाखवा मला, निवारा शेड कुठले चालू आहेत, ते दाखवा.

**उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-** काय दाखवा?

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** निवारा शेड कुठला चालू आहे, आता. हे निवारा शेड तुम्ही नावे दिली आहेत, त्यातले कुठे चालू आहेत.

**उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-** दोन आहेत सर.

**उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-** आपले दोन्ही निवारा शेड चालू आहेत, एक उल्हास निवारा केंद शाळा क्रमांक १, भोलनाथ टॉवर जवळ पुर्णकुटी निवारा आहे, दुसरा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** आता सध्या किती लोक आहेत?

**उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-** सर उल्हास डे आहे ना तिथे ४० लोकांची कॅपेसिटी आणि ३५ लोक आहेत आणि दुसरे जे पुर्णकुटी तिथे २० लोकांची कॅपेसिटी आणि हाऊस फुल २० लोक आहेत.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** मॅडम मी स्थायी मितील सदस्य पण आहे आणि उप महापौर पणआहे, आपण उद्या संयुक्तीक व्हीजीट करु या. दोन्ही निवारा शेडला.

**<u>उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-</u>** सर उद्या काय आता पण तुम्ही करु शकतात, जसे तुम्ही म्हणाल तसे

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** चालेल, आज नको, उद्याच करु.

**<u>उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-</u>** बर ठिक आहे, तुम्हांला जेव्हा वेळ मिळेल तेव्हा.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** काय आहे, निवारा शेडची परिस्थिती अशी आहे की, त्याला कुठलाही ऑडीट रिपोर्ट नाही

**<u>उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-</u>** सर आपल्याकडे ऑडीट रिपोर्ट सर्व आहे. ते पण दाखवू शकतो तुम्हांला.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>**संसथेचे.

**<u>उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-</u>** होय सोशन ऑडीट रिपोर्ट म्हणतात त्याला सर सोशन ऑडीट रिपोर्ट आहेत आपल्याकडे सर.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** ठिक आहे, उद्या ते घ्या बरोबर आपण जाऊ तिथे स्वत: पहा, तिथे काय परिस्थिती आहे, मी जवळून बघितली आहे, सुरुवातीला मी पद्य पण दिलेले आहे आणि त्या पत्रावर कुठलीही कारवाई झालेली नाही. तेव्हा हे आयुक्त नव्हते, त्याच्या पहीले दुसरे आयुक्त होते. तेव्हा तुम्ही पण नव्हत्या ते पत्र आज पर्यंत कुठलीही कारवाई झाली नाही तिथे निवारा केंद्र वैगेरे आता मी स्थायी समितीचा सदस्य आहे. त्या शेडमध्ये तिथे कोणीच माणसे राहत नाहीत.

**<u>उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-</u>** सर, उप महापौर साहेब, निवारा शेडमध्ये लोक आहेत, उद्या कशाला आता पण जाऊन पाहू या. आता लगेच जाऊ शकतो, आणि दुसरी गोष्ट म्हणजे तुम्ही म्हणतात पत्र आमच्या जे.एन.एम.यु.एलच्या पण कार्यालयात काही सापडले नाही. कृपया त्याची कॉपी दयाल तर आपण त्याच्यावर लगेच कारवाई करु.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** मॅडम आपण एवढे बोलत आहात तर सहा महीन्याची मुदतवाढ, मग तीन महीन्याची का वाढवतात?

**<u>उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-</u>** मा. महापौरजी,

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** ऐकून घ्या, सहा महीन्याची मुदतवाढ देण्यापेक्षा भांडार विभागाकडून साहीत्य पुरवठा करा.

**<u>उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-</u>** उप महापौरजी ही केंद्र शासनाची स्किम आहे, त्याच्या बददल पण माहीती मी देईल, त्यानुसार हे जे फंड आहेत, हे केंद्र शासनाकडून येतात आणि आपल्याकडे राज्य शासनाकडून ही राबवली जाते. याच्यावर महापालिकेकडून खचर् होत नाही आणि त्यांनी दिलेल्या प्रोसेसनुसारच काम करावे लागते. त्यांनी दिलेल्या प्रासेसनुसारच टेंडर काढला जातो आणि भांडार विभागामार्फत सर सर्व विभागांची कामे होत नाहीत. याचे नियम...

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** मॅडम तुम्ही उप आयुक्त म्हणून येऊन एक वर्षे झाला आहे, ही संस्था गेली सात वर्षापासून या दोन संस्था आहेत,

**<u>उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-</u>** तीनच वर्षे झाली आहेत या संस्थेला आणि तीन वर्षात पहीलाच ठेका त्यांना आपण दिलेला आहे. सर मला कळल नाही, तुम्हांला काय म्हणयचे आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:- तुम्ही टेंडर प्रासिजर लवकरात लवकर करा.</u>**

**<u>उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-</u>** टेंडर प्रोसिजर मी उदयाच टेंडर प्रक्रियेसाठी सुरु करीत आहे, आज फक्त् क्लॉज नविन टाकायचा होता, तो राहीला होता. माझी फाईल संध्याकाळ पर्यंत तयार होत आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** तीन महीन्याची मुदतवाढ नाही, एक महीन्याची मुदतवाढ देतो विषय संपवून टाका. ओके.

**<u>उप आयुक्त (कर) श्रीम. प्रियंका राजपूत:-</u>** हरकत नाही, धन्यवाद सर.

**<u>सभपती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** कधी पर्यंत मुदतवाढ दयायची आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** एक महीना, एक महीन्याची मुदतवाढ देवू. इतिवृत्ताची वाट न पहाता. एक महीन्यासाठी.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..पास..

**<u>महापालिा सचिव:-</u>** हा विषय पास झाला आहे, इतिवृत्ताची वाट न पहाता, एक महीन्याची मुदतवाढ आणि निविदा प्रक्रिया करण्यासाठी लवकरात लवकर कारवाई करणे.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑ विषय क्र.४:- **दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत शहरी बेघरांना निवारा या घटकांतर्गत बेघर निवारा व्यवस्थापन व देखभाल करणा-या संस्थाना ३ महिने मुदत वाढ देणेकरीता प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**<u>प्रस्तावना</u>**

मा. आयुक्त सो यांच्या निर्देशानुसार सादर करण्यात येते कि दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत शहरी बेघरांना निवारा या घटकांतर्गत २ बेघर निवारे सुरु आहेत १) उल्हास बेघर निवारा, शाळा क्र. १, भोलेनाथ टावर जवळ , उल्हासनगर १ आणि २) पर्णकुटी बेघर निवारा, समाज मंदिर, ताडी मादी केंद्रा जवळ, फारवर लाईन, उल्हासनगर ३ , सदर निवारा केंद्र हे अनुक्रमे आदर्श आदिवासी विकास व शैक्षणिक संस्था आणि मानव विकास सामाजिक सेवा संस्था यांना बेघर निवारा व्यवस्थापन व देखभाल साठी २६ जून २०१८ ते २५ जून २०२१ पर्यंत चालविणेसाठी देण्यात आलेले होते.सदर संस्थाना मुदत वाढ देणे बाबत प्रस्तावित केले असता मा. आयुक्त सो यांनी ६ महिनेची मुदत वाढ देऊन दरम्यानच्या कालावधी मध्ये अजून तीन निवारे सुरु करून एकूण पाच निवारे सुरु करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करावी असे सूचित केलेले होते तथापि सदर मुदत कालावधी मध्ये अजून ३ निवारे सुरु करण्यासाठी जागा उपलब्ध झाल्या नाहीत त्यामुळे निविदा प्रक्रिया सुरु केलेली नाही. सदर संस्थांची मुदत २५ डिसेंबर २०२१ रोजी संपुष्टात येत आहे.

शहरी बेघर निवारे हे अत्यंत आवश्यक असून सुप्रीम कोर्टाच्या बेघर निवारा समितीच्या मार्गदर्शना खाली सुरु आहेत.तसेच शहरी बेघर निवारा व्यवस्थापन व देखभाल संस्थासोबत केलेल्या करारातील अट क्रमांक १६ नुसार दिनांक २६/०६/२०२१ पासून पुढील सहा महिनेपर्यंत अथवा पुढील निविदा होऊन कार्यान्वित होईपर्यंत दिलेल्या कामाच्या आदेशानुसार सदर व्यवस्थापन व देखभाल करणे बंधनकारक राहील असे नमूद केलेले आहे.

सदर संस्थाना शहरी बेघर निवारा देखभाल व व्यवस्थापन करणेसाठी निविदा प्रक्रिया कार्यान्वयित होऊन अंतिम होईपर्यंत अथवा पुढील तीन (३)महिने ( २६ डिसेंबर ते ३१ मार्च २०२२ पर्यंत ) मुदतवाढ देणेबाबत च्या टिपणीवर मा. आयुक्त सो यांनी सूचित केले आहे कि, सदरची मुदत वाढ हि दुस-यांदा द्यावयाची असल्यामुळे मा. स्थायी समितीची मान्यता घ्यावी.

तरी बेघर निवारा देखभाल व व्यवस्थापनाचा खर्च हा अभियानांतर्गत केला जातो. सदर संस्थाना शहरी बेघर निवारा देखभाल व व्यवस्थापन करणेसाठी निविदा प्रक्रिया कार्यान्वयित होऊन अंतिम होईपर्यंत अथवा पुढील तीन महिने ( २६ डिसेंबर ते ३१ मार्च २०२२ पर्यंत ) मुदतवाढ देणेकामी मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रस्तावित.

**<u>स्थायी समिती ठराव क्र. १०३</u>** **दिनांक :- ५/०१/२०२२**

**सुचकाचे नाव:- श्री. राजेश वदारिया**
**अनुमोदकाचे नाव :- श्री. कलवंतसिंह सोहता**

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार व झालेल्या चर्चे अंती दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत शहरी बेघरांना निवारा या घटकांतर्गत बेघर निवारा व्यवस्थापन व देखभाल करणा-या संस्थाना १ महिन्याच्या मुदत वाढीस मान्यता देत आहे.

तसेच,

लवकरात लवकर निविदा प्रक्रिया करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही /-
अनुमोदकाची सही /-

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव-</u>** विषय क्रमांक ५ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र ५ :— उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये सध्या कर्मचारी यांची कमतरता लक्षात घेता बाहयस्त्रोताद्वारे ठोकेदारामार्फत लिपीक/मजूरन/माळी/विद्युत मदतनीस पुरवठा करणे बाबत.**

---

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** निविदा प्रक्रिया करायची आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मंजुर पदे कनिष्ठ अभियंता रिक्त पदे भरलेली नाही, पहीली गोष्ट म्हणजे जेव्हा कनिष्ठ अभियंत्याची नियुक्ती झाली होती, आपल्याला एवढया लोकांची गरज आहे का?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** विषय दुसरा आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** कनिष्ठ लिपीक, मंजुर पदे २८७ भरलेली रिक्त १६९, रिक्त पदे ११८ आणि आपले १० ते १२ लोक काही वर्षापासून तहसिलदार येथे बसले आहेत,...

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** १२ लोक आपले तहसिल ऑफिसला तीन ठिकाणी होती, कल्याण तहसिलला, उल्हासनगर, प्रांत ऑफिस या ठिकाणी मी आल्या नंतर माझ्या लक्षात आले स्थायी समितीचा व महासभेचा जो ठराव आहे, इतर लोकांना परत बोलवण्यात यावे. यांना सर्वांना परत बोलवण्यासाठी सुचना दिल्या होत्या, त्या पैकी आता निवडणूक कार्यक्रम जो सुरु झाला तेव्हा आपली फक्त तीन लोक राहीलेली आहेत.ते तीन लोक जिल्हाधिकारी यांच्या अंडरमध्ये असल्याने आणि आयुक्त साहेबांना सांगितल्यामुळे ते तीन लोक आपण घेऊ शकलो नाही. बाकीचे सर्व लोक परत आले आहेत.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मंजुरांची आपल्याला कुठे आवश्यकता आहे?

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** बांधकाम विभागात कार्यरत असतात, ब-याच ठिकाणी गार्डन आहेत अशा ठिकाणी आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** काय झाले आहे, मी तुम्हांला सांगतो, पहीले उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये ८ जुनला एक माळी, एक मिस्त्री, एक मुकादम असत, मजुर लोक तर सेवा निवृत्त् झाले आहेत, आता यांनी काय केले आहे, जेव्हा अनाधिकृत बांधकामे पाडायची होती, ८५५ बिल्डींगी त्या वेळी सर्व मजुरांना वर्ग केले गेले वार्ड ऑफिसमध्ये आता वार्ड ऑफिसमध्ये जास्त काही काम आहेच नाही. रोज डिमॉलेशन होत नाही, डिमॉलेश्न कधी कधी होते. तर त्या मजुरांना परत सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये आणायला पाहीजे. बाकी आपण ज्या पंधरा लोकांची गरज सांगितली आता आपल्याकडे १४ माळी, १३१ मजुर आहेत.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** मी आल्या पासून गार्डन विभागामध्ये कार्यरत असावे असे माझे मत आहे. मी आता जॉईंड झालो आहे, मी फक्त् प्रयत्न करीत आहे. आज पर्यंत मला ते करता आले नाही. कारण आपल्याकडे मला प्रोत्सान मिळाले नाही. आपल्याकडे १४ माळी आहेत आणि आपण जर हे १५ घेतले आपल्याकडे रस्त्यांचे सुशोभीकरण आहे,गार्डन आहेत हे आळीपाळीने आपल्याला वापरता येतील आणि आताची जी परिस्थिती आहे, गार्डनची, रस्त्यांच्या कामांची ही पुर्वीपेक्षा आपण सुधारु शकतो. नविन आपण हा प्रयत्न करीत आहोत, आपली मान्यता असेल तर आम्ही जी परिस्थिती आहे, तसे चालवू.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मला माहीती पाहीजे, आपण जे मजुर घेत आहेत, १५ माळी आहेत आपल्याकडे १३१ मजुर आहेत, ते कुठे कुठे काम करीत आहेत?

**प्र. सहाय्यक आयुक्त् (साप्रवि), श्री. अशोक सासे:-** हे सर्व मजुर प्रभाग समिती १,२, ३, व ४ मध्ये, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग आणि महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये शिपाई म्हणून कार्यरत आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** हा विषय आम्ही पहीले पण घेतला आहे, जे शिपाई आहेत, ते कोणाचे ना कोणाचे पॉलिटीकल प्रेशनर घेऊन आपल्याकडे शिपाई म्हणून ठेवून घेतात. तर जेवढे पण मजूर इथे आहेत, त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये पाठवा.दुसरे जेवढे पण आपले मजुर वार्ड ऑफिसमध्ये बसले आहेत, त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये पाठवा किंवा जिथे त्यांची गरज आहे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून आपण गार्डन डिपार्टमेंट चालवा. आज गोल मैदान येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे पण ऑफिस आहे. पप्पू गार्डनमध्ये सार्वजनिक सार्वजनिक बांधकाम विभागाचे ऑफिस आहे. नेजाजी गार्डन येथे पब्लिक हेल्थचा ऑफिस आहे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे पणऑफिस आहे. जर आपण एक संघटना म्हणून काम करु सार्वजनिक बांधकाम विभाग गार्डन विकसित करण्याचे काम बघतात. तर जे वार्ड ऑफिस येथे मुजुर असेच बसले आहेत, काहीच काम करीत नाही. हे बघा त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये वर्ग करा आणि जे मजूर इथे शिपाई बनून बसले आहेत, त्यांना आपण परत वर्ग करा आणि माळी कमी आहेत, १५ आणि १४ हे भरपूर माळी होतील तर एक गार्डनमध्ये एक माळी ठेवा. ६४ गार्डन आहेत आपल्याकडे १०, १५ मोठे गार्डन असतील, बाकीचे छोटे गार्डन असतील. माळी वाढवून घ्या, मजूर पण वाढवून घ्या पण मजुरांची आपल्याला गरज पडणार नाही.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये देण्यासाठी कोणी आहेच नाही, हे आम्ही नविन केले आहे की, आपल्या विभागाचे आपल्याकडे राहतील आणि हे बाहेर काम करतील.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** आपणअसे करा मजूर आणि माळी अनाधिकृत बांधकामाचे काम करु शकतात का?

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** होय प्रयत्न करु ना असे की आम्ही बोलत आहेत आम्ही रिल्युव्ह देणार त्याच्या नंतर जिथे त्यांना दिले आहे, तिथले तिथले लोक काढले जातील आणि तिथे आवश्यकता आहे तिथे आम्ही यांना शिप्ट करु आणि जो काम आम्हांला करायचे आहे, चांगले काम करण्याचा प्रयत्न करणार. अजून पण एक आहे, शिपाई जे लोक आहेत १४४, ६७ ॲक्टीवेशन मध्ये आले आहेत. ६७ फक्त् आता काम करीत आहेत आणि ८७ पोस्ट रिकाम्या आहेत. तर शिपाई लोक आम्ही कसे पुरवणार समजा महापौर कार्यालय, उप महापौर कार्यालय, आपल्या इथे सर्वच ठिकाणी दयायला लागतात. शिपाई लोक नाहीत, म्हणून आम्ही मजुर लोकांना घेतले आहे, काम चालवण्यासाठी त्यामुळे आम्ही शिपाई लोक घेत नाहीत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** नाईकवाडे साहेब, आपण लिपीक घेतात, माळी घेतात, मजूर घेतात, आपल्याकडे पोस्टींग डेप्युटी इंजिनियरच्या दोन घेत आहेत, त्या पण भरत नाही.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** त्या प्रोसेसमध्ये आहेत ना.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** आहो डेप्युटी इंजिनियरच्या पोस्टींग भरत नाही, तुम्ही इंजिनियर भरतात पण डेप्युटी इंजिनियरला प्रमोशन् दयाल तर तेव्हा ते इंजिनियर भरले जातील.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** एक गोष्ट आहे, सरळ सेवा भर्ती प्रक्रिया ज्या पोस्ट आहेत, आपण महानगरपालिकेच्या आस्थापना खर्च ४२ टक्के आहे आणि शासनाची अट आहे, ३५ टक्के असायला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** डेप्युटी इंजिनियरला कुठली अट आहे, महापालिकेची त्यांना प्रमोशन दयायचे असते.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>**सर प्रमोशन देण्यासाठी शासनाकडे आपली पदोन्नती कमिटीची बैठक झाली, त्या बैठकीमध्ये दोन तीन मुददे उपस्थित झालेले आहेत, त्या मुददयाचे शासनाकडून आपण अभिप्राय मागितले आहेत, मी दोन वेळा स्वत: मंत्रालयामध्ये पण जाऊन आलो आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** आहो किती दिवस झालेत या गोष्टीला मी फलोअप घेऊन वर्षे झाला आहे.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** होय मी पण प्रयत्न केले आहेत, शासन आपल्याला देईना.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** आपले अधिकार नाहीत का? महासभेकडे पाठवा, महासभा देवून टाकेल.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** महासभेला देवून चालणार नाही, शासनाचे धोरण आहे ना,

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** आपण का थांबवले आहे? पाठपुरावा करायला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मा. सभापतीजी, मी तुम्हांला सांगू इच्छितो की, मी प्रस्ताव आणला होता, महासभेमध्ये त्यामध्ये फायरबिग्रेटचे लोक आणि इंजिनियरच्या भरतीला आम्ही विरोध केला होता. आम्ही ठराव केला त्यांनी गव्हर्नमेंटकडे पाठवले तर त्यांनी सांगितले की आपला जो खर्च आहे तो ३५ टक्केपेक्षा जास्त आहे. तर सांगितले त्यांनी मंजुरीला नकार दिला आणि मंजुरीला नकार दिला तर आपण काय करु शकतो? आणि ते क्वालीफाईड आहेत तर जे चालले आहे प्रभारी २ टक्के भारी हे चालले आहे.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** सर पदोन्नती देण्यासाठी पण मी इथे आल्या नंतर सन २०१६ पर्यंत सिनियर लिस्ट त्या थोडया अपडेट केल्या आणि पदोन्नतीसाठीची सर्व प्रक्रिया पुर्ण केली. पदोन्नती समितीच्या बैठका दोन वेळा झाल्या आहेत सर. पदोन्नती समितीचे अध्यक्ष त्यांच्या शंका आहेत. त्या शासनाच्या धोरणाच्या अनुषंगाने आणि त्या धोरणाच्या अनुषंगाने शासनाकडून उत्तर लागणार आहे. आपण नाही करु शकत, म्हणून अडचण झाली आहे. समितीची जेव्हा बैठक झाली त्यांनी दोन तीन मुददे उपस्थित कलेले आहेत. ते रोस्टरप्रमाणे बनवायचे आहे. अपंगाचे रिझंवेशन आहे, सर्व रिझंवेशन आहे, पदाला लावून भरावयाचे आहे आणि ते किती टक्के आहे आणि तो किती लावायचे आहे, आपल्याला तसे काही दिले नाही, आपण ही तोंडी माहीती घेतलेली आहे. अपंगाचे रिझंवेशन आहे, रिक्त पदांना लावून भरायचे आहे, लमसम लावायचे नाही. परंतु कागदावर आल्याशिवाय आपल्याला काम करता येणार नाही. म्हणून राहीले आहे. त्यासाठी माझे प्रयत्न चालू आहेत. आयुक्त साहेबांनी स्वत: बघून चौकशी दोन तीन वेळा केलेली आहे, सासे यांना सांगितलेले आहे मंत्रालयात जाऊन परत पाहून या आणि नंतर नगरविकास विभागातील सचिव, उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी यांना ते सुध्दा तिथे फे-या मारत आहेत. ते स्वत: वेरीफिकेशन करणार आहेत, माझ्या लेवलवर प्रयत्न करुन मी रोष्टर आणण्याचे प्रयत्न करेल.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** किती कॉल केले आहेत?

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** सर एक वर्षासाठी कॉल करु.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** नाईकवाडे साहेब, तुम्ही एक वर्षासाठी कॉल करणार त्या लिपीकांना ट्रेन करणार, आणि परत तुम्ही, टेंडर आणतानी तीन वर्षाचा आणा.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** सर आपण मंजुरी दयाल त्यानुसार करु.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** तीन वर्षाचा दया ना त्याला.

**सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-** सर ७५ लोकांना ठेकेदारामार्फत घेण्यापेक्षा ठोक वेतनावर घेतले तर काय हरकत आहे का?

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** नाही ठोकवेतनावर आपण घेऊ शकत नाही, कारण ते उदया कोर्टात गेले तर आपल्याला नियमित करावे लागेल. आपण ठेकेदारा मार्फत् घेत आहेत तर ते ठिक आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** तीन वर्षासाठी ठेकेदाराकडून घ्या.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** होय आपल्याला ठकेदारामार्फत करता येईल, एक एक वर्षासाठी मुदतवाढ देण्यात येईल. शासन निर्णयाच्या धोरणानुसार करता येईल. शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** लवकरात लवकर ...

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ठिक आहे, एक वर्षासाठी मुदत देत आहेत, एक वर्षाची भरती करती आहेत, माळी, मजूर घेत आहेत.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** आपल्या सर्वांना माहीती आहे, आपल्यामुळे आज पर्यंत ४० ते ५० कोटीचे वाढीव प्रस्ताव आणले आहेत. तुम्ही सर्वांनी मंजूर केले आहेत, त्या आधारावर मी मंत्रालयात जाऊन आलो त्या आधारावर आपल्याला काही प्रमीशन मिळतील आणि एक गोष्ट आहे, रिक्त पदाबाबत आपल्याला ४ टक्के भरणे अधिकार आहेत. या आधीचे पण प्रस्ताव आपण पास केलेले आहेत. प्रशासनाचा खर्च आपला कमी होईल. भरती क्रिया राबवण्यासाठी आता फार त्रासदायक झालेले आहे. तर हे सर्व विचार करुन भरती प्रक्रिया राबविण्यात येतील, शासनाकडे कमिटया आहेत, समितीपुढे नगरविकास विभागाला सादर करावे लागते. आपल्याला तिकडून मान्यता मिळेल आणि आपला प्रशासकीय खर्च कमी होईल...

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** ठिक आहे, नाईकवाडे साहेब, ताबोडतोब टेंडर करा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** तुम्हांला सांगिले होते की, कोणता कोणता खर्च कमी करायचा आहे, मी त्या दिवशी पण आपल्याला माहीती दिली होती आपल्या ऑफिसमध्ये येऊन, आता हे होत आहे की, जो नॉन हॉकिंग झोन आहे, जपानी बाजार, जपानी बाजारामध्ये ४० रुपयाची पावती बनवत आहेत, महासभेच्या ठरावानुसार २००० ची पावती बनली पाहीजे. ६०० रुपये ते घेतात आणि बाकीची पावती हे काम चालू आहे. नाही तर ठराव रदद करायला लागेल. इनकम मिळाले पाहीजे. आज नेहरु चौक ते गोल मैदान, नेहरु चौक ते जपानी बाजार, उल्हासनगर-१ पोलिस स्टेशन पर्यंत आपले नॉन हॉकिंग झोन आहे, मी दाखवून देतो की, नेहरु चौकामध्ये किती हॉकर्स बसले आहेत आणि सगळयांच्या हातामध्ये पावती असेल.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** सर आपण ज्यां मंजुरी दिलेल्या आहेत, नविन आपण धोरण आणलेले आहे. प्रायोगीक तत्वावर आपल्या मार्फत सुरु करीत आहोत, आता आपण त्याची टेंडर प्रक्रियासाठी मसुदा तयार केलेला आहे. त्याचे मार्गदर्शन सुध्दा आम्ही घेत आहोत....

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मार्गदर्शन ठिक आहे साहेब, पहीले ही सिस्टम ठिक करा. नॉन हॉकिंग झोनमधून आपण पेनाल्टी घेत आहेत, याचे कारण महासभेच्या ठरावाला महत्व नाही.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** त्याच्यासाठीच आपण टेंडर प्रक्रियामध्ये जे हॉकिंग झोन आहेत, त्यांची नावे आपण निविदेमध्ये नमुद केलेले आहेत. त्या शिवाय महासभेच्या ठरावामध्ये ज्या पण कंडीशन आहेत, तीन अटी आहेत, काही तरी.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** प्रभाग अधिकारी आहेत का इथे? प्रभाग अधिकारी ऑन लाईनवर कोण कोण आहेत? एक पण नाहीत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** विषया बाहेर जावू नका, लवकर संपवून टाका.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** आपण पुर्ण निविदा केलेल्या आहेत, निविदा मागविलेल्या आहेत.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** आज स्वत: महानगरपालिकेचे कर्मचारी वसुली करीत आहेत, मी त्यांच्या बददल बोलत आहे.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** तशा मी त्यांना सुचना देतो, तसे करणार नाहीत. मॅडमकडे बैठक घेतो.

**<u>महापालिका सचिव:-</u>** पास..

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** पास..पास... लवकरात लवकर टेंडर आणावा, इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>महापालिका सचिव:-</u>** एक वर्षाकरिता इतिृत्ताची वाट न पहाता सदरचा ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** धन्यवाद.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

**☑ विषय क्र.५:- उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये सध्या कर्मचारी यांची कमतरता लक्षात घेता बाहयस्त्रोताद्वारे ठोकेदारामार्फत लिपीक/मजूरन /माळी/विद्युत मदतनीस पुरवठा करणे बाबत.**

**<u>प्रस्तावना</u>**

**उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर वरील संवर्गातील मंजुर पदे, भरलेली पदे व रिक्त पदांबाबत माहिती खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपीक | २८७ | १६९ | ११८ |
| २ | मजूर | ४१८ | २३१ | १८६ |
| ३ | माळी | ५२ | १४ | ३८ |
| ४ | विद्युत मदतनीस | ५६ | ४१ | १५ |
| एकूण | | ८१३ | ४५५ | ३५७ |

**सध्या महापालिकेच्या विविध विभागामध्ये कर्मचारी कमी असल्यामुळे महापालिका सदस्य व विभाग प्रमुख यांची कर्मचारी उपलब्ध करून देण्याबाबत वारंवार मागणी होत आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग/नगररचना विभाग/पाणी पुरवठा विभाग/प्रभाग समिती कार्यालय येथे कर्मचारी नसल्यामुळे विकास कामे व शहरातील नैसर्गिक आपत्ती विषयक कामे व अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यासाठी कर्मचारी कमी असल्यामुळे व इतर कामे होत नाही. तसेच सार्वत्रिक निवडणूक २०२२ असल्यामुळे कर्मचारी यांची आवशयकता आहे. त्यामुळे महापालिकेमध्ये कर्मचारी यांची कमतरता लक्षात घेत खालील संवर्गातील पदांवर ठेकेदारार्मात नियुक्ती करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.**

**उल्हासनगर महानगरपालिका सन २०२१-२०२२ या आर्थसंकल्पामध्ये आस्थापना खर्चाची रू. १२६.५ कोटी इतकी तरतूद आहे.**

**वरील संवर्गासाठी अटी व शर्ती तयार करण्यात आल्या आहेत. तसेच उल्हासनगर महानगरपालिकेतील विविध विभगामध्ये नियुक्ती केलयास एकावर्षासाठी खालीप्रमाणे नमुद खर्च अपेक्षीत आहे.**

**अनुसुचीत रोजगाराचे किमान वेतन दर २४ फेब्रुवारी २०१५ नुसार मुळ वेतन मंजुर करण्यात आलेले आहे. तसेच किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत विशेष नुसार जाहिर केले आहेत.**

**परिमंडळ -१ मध्ये कुशल कामगार म्हणून येत असुन सदर लिपीकास प्रति माहे करीता येणार अंदाजीत खर्च खालील प्रमाणेआहे.**

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | दर (किमान वेतन कायदयानुसार ) |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपीक | अ) कोणत्याही शाखेची पदवी<br>ब) राज्य शासनाची मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. (जीसीसी)/ इंग्रजी टंकलेखन ४० श. प्र.मि परिक्षा उत्तीर्ण<br>किंवा<br>क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उर्त्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C . सोसायटीच्या अधिकृत C.C.C किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उर्त्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>ड) मराठी लिहीता, बोलता व वाचता येणे आवश्यक. | किमान १८ वर्षे ते ३३ वर्षे | a) प्रती ठेका कर्मचारी दरमहा<br>(see table below) |
| २ | मजूर | अ) इयत्ता ७ वी उर्त्तीर्ण<br>ब) मजबूत शरीरयष्टी. | किमान १८ वर्षे ते ३३ वर्षे | (see table below) |
| ३ | माळी | अ) इयत्ता ७ वी उर्त्तीर्ण<br>ब) बागकामाचा अनुभव | किमान १८ वर्षे ते ३३ वर्षे | |

कुशल कर्मचाऱ्यास देय होणाऱ्या खर्चाच तपशिल (परिमंडळ १ करीता) खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | प्रति कर्मचारी देय रक्कम रुपये |
|---|---|---|
| अ) | **स्थूल वेतन** | |
| १ | मुळ वेतन | १४००० |
| २ | विशेष भत्ता **(राहणीमान भत्ता)** | ६१६० |
| ३ | EPF १३% | २६२१ |
| ४ | ESIC ४.७५% | ९५८ |
| ५ | Paid Leave१.२८% | २५८ |
| ६ | Bonus ८.३३% | १६७९ |
| ७ | एमएलडब्लूएफ as per Maharashtra walfare Board | १२ |
| ८ | व्यवसाय कर | २०० |
| ९ | घरभाडे भत्ता ५% | १००८ |
| | एकूण मासिक वेतन | २६५९३ |

अकुशल कर्मचाऱ्यास देय होणाऱ्या खर्चाचा तपशिल (परिमंडळ १ करीता) खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | प्रति कर्मचारी देय रक्कम रुपये |
|---|---|---|
| अ) | **स्थूल वेतन** | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | असल्यास प्राधान्य. | | १ | मुळ वेतन | ११५०० |
| | | | | २ | विशेष भत्ता (**राहणीमान भत्ता**) | १०९२ |
| ४ | विदयुत मदतनीस | अ) इयत्ता ७ वी उत्तीर्ण<br>ब) मजबूत शरीरयष्टी. | किमान १८ वर्षे ते ३३ वर्षे | ३ | EPF १३% | १६३७ |
| | | | | ४ | ESIC ४.७५% | ४०९ |
| | | | | ५ | Paid Leave१.२८% | १६१ |
| | | | | ६ | Bonus ८.३३% | १०४९ |
| | | | | ७ | एमएलडब्लूएफ as per Maharashtra walfare Board | १२ |
| | | | | ८ | व्यवसाय कर | २०० |
| | | | | ९ | घरभाडे भत्ता | ६३० |
| | | | | | एकूण मासिक वेतन | १६६९० |

**सध्या खालीलप्रमाणे बाहयस्त्रोताद्वारे अभिकर्ता यांच्याकडून कंत्राटी कामगार म्हणून नियुक्ती करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.**

| **अ.क्र.** | **पदनाम** | **आवश्यक संख्या** | **मासिक वेतन** | |
|---|---|---|---|---|
| **१** | **कनिष्ठ लिपीक** | **२५** | रु. २६६८४/- | रु.२६५९३ X२५= ६६४८२५/- |
| **२** | **मजूर** | **२०** | रु.१६४७८/- | रु.१६६९० X २०=३३३८००/- |
| **३** | **माळी** | **१५** | रु.१६४७८/- | रु. १६६९० X १५=२५०३५०/- |
| **४** | **विद्युत मदतनीस** | **१५** | रु.१६४७८/- | रु. १६६९० X १५=२५०३५०/- |
| **एकूण** | | **७५** | | रु.**१४९९३२५** X १२ = १७९९१९००/- |

वार्षीक रु. १,७९,९१,९००. कोटी खर्चाचा प्रस्तावास वित्तीय व प्रशासकीय मान्यतेसाठी मा. स्थायी समितीसमोर सादर करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १०४** **दिनांक :- ५/०१/२०२२**

**सुचकाचे नाव:- श्री. राजेश वदारिया**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. कलवंतसिंह सोहता**

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार व झालेल्या चर्चे अंती उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये सध्या कर्मचारी यांची कमतरता लक्षात घेता बाहयस्त्रोताद्वारे ठोकेदारामार्फत लिपीक /मजूर / माळी / विद्युत मदतनीस पुरवठा करणेबाबत वार्षीक रु. १,७९,९१,९००/- कोटी खर्चाचा प्रस्तावास १ वर्षाची मुदतवाढ देण्यास मान्यता देत आहे.**

**तसेच,**

**भविष्यात काही वादा-वादी निर्माण झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील.**

**या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

सुचकाची सही /-
अनुमोदकाची सही /-

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ६ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र ६ :— उल्हासनगर-१ प्रभाग क्र.४ मधील गौतमनगर येथे जुने समाजमंदिर निष्कांसित करुन नविन समाजमंदिर बांधणे.**

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** विषय असा दिला आहे की, नवीन समाज मंदिर बनवण्यासाठी परवानगी घेत आहेत. किती वेळा टेंडर कॉल केला होता? सितलानीजी, सितलानीजी, आपण दिसत आहेत, तुमचा हात दिसत आहे, पण तुमचा आवाज ऐकु नाही. आपण म्युट आहेत.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** पहीला कॉल आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** इथे दोन दिसत आहेत.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** चार आले आहेत, पण टेंडर कॉल पहीलाच आहे.

**महापालिका सचिव:-** सितलानी सर आपण स्टॅन्डींगमध्ये या. आवाज येत आहे, बोला सितलानीजी.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी :-** मा.सभापती महोदय, आयुक्त साहेब, टेंडर तर एकदाच कॉल केले आहे, पहीलाच टेंडर आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया: -** तर पहीले दोन क्वॉलीफाईड झाले आहेत, जी.आर. आहे,

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** होय सर चालेल जी.आर. मध्ये आहे, टेंडर उघडू शकतो .

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ठिक आहे, सितलानी म्हणत आहेत की, जी.आर. आहे, पास.. इतिवृत्ताची वाट न पहाता.

**महापालिका सचिव:-** पास..सदर ठराव पास झाला आहे.झा ॲन्ड पी कंपनी सोबत संविदा करण्यात येत आहे इतिवृत्ताची वाट न पाहता.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ओके.

**काही सदस्य:-** पास, पास....

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

☑ विषय क्र. ६ :- उल्हासनगर-१ प्रभाग क्र.४ मधील गौतमनगर येथे जुने समाजमंदिर निष्कांसित करुन नविन समाजमंदिर बांधणे.

प्रस्तावना

उल्हासनगर-१ प्रभाग क्र.४ मधील गौतमनगर येथे जुने समाजमंदिर निष्कांसित करुन नविन समाजमंदिर बांधणे आवश्यक असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सदर कामाचे रुपये ३६,६१,९२०/-एवढया खर्चाचे प्राकलन तयार करुन सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्यात आली व नियमाप्रमाणे सदर कामाची निविदा प्रक्रिया करण्यात आली त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.१**

| | | |
|---|---|---|
| १. | प्राकलनीय खर्च | रु.३६,६१,९२०/- |
| २. | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १०/०८/२०२१ |
| ३. | निविदा विक्री कालावधी | दिनांक १०/०८/२०२१ ते ३१/०८/२०२१ |
| ४. | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ३१/०८/२०२१ |
| ५. | प्रथम मुदतवाढ | - |
| ६. | द्वितीय मुदतवाढ | - |
| ७. | तृतीय मुदतवाढ | - |
| ८. | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १५/०९/२०२१ |
| ९. | आर्थिक भाग उघडल्याचा दिनांक्र | दिनांक १७/११/२०२१ |
| १०. | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ४ |
| ११. | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ४ |

सदर निविदेचा तांत्रिक भाग दिनांक १५/०९/२०२१ रोजी निविदा समिती समोर उघडण्यात आला. त्यामध्ये **१) मे. गोल्डन कन्स्ट्रक्शन २) मे. झा. पी. ॲण्ड कंपनी ३) मे. रवि एंटरप्रायजेस ४) मे. शुभम कन्स्ट्रक्शन** यांनी निविदा सादर केल्या आहेत. त्याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे :

**तक्ता क्र.२**

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. गोल्डन कन्स्ट्रक्शन | मे. झा. पी. ॲण्ड कंपनी | मे. रवि एंटरप्रायजेस | मे. शुभम कन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|---|---|
| १. | अद्यावत आयकर रिर्टन भरल्याची पावती मागील ३ वर्ष | होय | होय | होय | होय |
| २. | कामाचा अनुभव व मागील ३ वर्षाचे वार्षिक उत्पन्न | होय | होय | होय | होय |
| ३. | पॅन कार्डाची प्रत | होय | होय | होय | होय |
| ४. | संस्था /कंपनी नोंदणी ( भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे दस्ताऐवज | होय | होय | होय | होय |
| ५. | ई.पी.एफ. व जी.एस.टी. प्रमाणपत्र प्रत | होय | होय | होय | होय |
| ६ | कंत्राटदाराची निविदा भरण्याच्या सक्षमता | होय | होय | होय | होय |
| ७ | निविदेमध्ये दिलेल्या नमुन्यात रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे. | होय | होय | **नाही** | **नाही** |
| ८ | कंत्राटदाराची घोषणा | होय | होय | होय | होय |
| ९. | पात्र/अपात्र | **पात्र** | **पात्र** | **अपात्र** | **अपात्र** |

उक्त तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार निविदाकारांच्या कागदपत्रांची छाननी केली. त्यामध्ये **१) मे. रवि एंटरप्रायजेस २) मे. शुभम कन्स्ट्रक्शन** या दोन निविदाकारांनी निविदा अटी शर्तीप्रमाणो विहीत मुदतीत रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्राची मूळ प्रत जोडलेली नसल्याने सदर निविदाकारास अपात्र ठरविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने **१) मे. गोल्डन कन्स्ट्रक्शन २) मे. झा. पी. ॲण्ड कंपनी** हे दोन निविदाकार पात्र ठरत असल्याने त्यांचे निविदेचा आर्थिक भाग (Financial Bid) उघडण्यात आला त्याची माहिती खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र.३ :-**

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | दिलेले दर (टक्के प्रमाणे) |
|---|---|---|
| १. | **मे. झा. पी. ॲण्ड कंपनी** | **दिलेले दर ०.९९०% टक्के कमी** |
| २. | **मे. गोल्डन कन्स्ट्रक्शन** | दिलेले दर १.२००% टक्के जास्त |

उक्त तक्त्यात नमुद **उल्हासनगर-१ प्रभाग क्र.४ मधील गौतमनगर येथे जुने समाजमंदिर निष्कांसित करुन नविन समाजमंदिर बांधणे** या कामाकरीता **मे. झा. पी. ॲण्ड कंपनी** या निविदाकाराने **०.९९०% टक्के कमी** दर सादर केले आहेत. सदर दर निम्न आहेत.

तरी **मे. झा. पी. ॲण्ड कंपनी** यांची निम्न दराची निविदा मान्य करण्यास व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अंतर्गत मा.आयुक्त यांचे **मे. झा. पी. ॲण्ड कंपनी** यांचेशी संविदा करणेस मा. स्थायी समितीचे मान्यतेस्तव प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १०५ दिनांक :- ५/०१/२०२२

सुचकाचे नाव:- श्री. राजेश वदारिया
अनुमोदकाचे नाव :- श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार व झालेल्या चर्चे अंती उल्हासनगर-१ प्रभाग क्र.४ मधील गौतमनगर येथे जुने समाजमंदिर निष्कांसित करुन नविन समाजमंदिर बांधणे या कामाकरीता मे. झा. पी. ॲण्ड कंपनी यांची निम्न दराची निविदा मान्य करण्यास व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अंतर्गत मे. झा. पी. ॲण्ड कंपनी यांचेशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही /-

सर्वानुमते
सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ७ वाचून दाखवितात.

---

**➡ विषय क्र ७ :— उल्हासनगर -२ प्रभाग क्र.७ मधील रुहानी सत्संग हॉल ते खेमाणी चौक पर्यंत सी.सी पेव्हमेंट रोड व नाली**

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिय :-** आताच नुकताच सदर ठिकाणी डांबरचा रस्ता बनवला आहे. सरजी आताच सदर ठिकाणी डांबरचा रस्ता बनवला आहे.आयुक्त साहेबांना सुद्धा फोटो पाठवले होते की आधी येथे सिमेंटचा रस्ता होता, त्यावर डांबरीकरण केले, आता पुन्हा डांबरावर सिमेंटचा रस्ता का बनवायचा?

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** राजेश भाई बरोबर बोलत आहे. सितलानीजी, पहीले डांबर काढले पाहीजे की काय केले पाहीजे?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** सदर रस्त्याची अवस्था इतकी वाईट होती की रोज तिकडे अपघात होत होते, टेंडर फायनल न झाल्यामुळे आम्ही तिथे बी.ए.एम.सी. करण्यात आले होते.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** किती दिवस झाले आहेत? पंधरा दिवस पण झाले नाहीत.

**शहर अभियता, श्री. महेश सितलानी:-** आता आपण फक्त 80 मिटरचा रस्ता घेतला आहे, खेमानी पासून...

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** परंतू 15 दिवस पण नाही झाले अजून डांबरचे काम करून.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-** अहो भालेरावजी 3 महीने झाले आहेत, तीन महीने.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** गॅरंटी पीरेड त्याचा सहा महीने आहे,

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** सहा महीने आहे तर आता काय करायचे आहे?

**सदस्य, श्री. गजानन शेळके:-** रोड बनवणे खुप आवश्यक आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मी कधी म्हणालो की नाही बनवायचा आहे?

**सदस्य, श्री. गजानन शेळके:-** तो पूर्ण नाही बनवला आहे, फक्त खड्डे भरले आहे त्यामुळे तो बनवणे गरजेचे आहे. चला तुमहाला तो रस्ता दाखवतो

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** सदरचा रस्ता प्रभाग 7 मध्ये नाही आहे प्रभाग 6 मध्ये आहे तर तुम्ही गोषवाऱ्या मध्ये प्रभाग 7 कसे लिहीले आहे?

**सदस्य, श्री. गजानन शेळके:-**तो पास करणे आवश्यक आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ऑडीट ऑर्डर येईल, यामध्ये मतदान घ्या माझा विरोध आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** 7 मध्ये कसा लिहीला आहे, नाही पास नाही, डांबर काधायची जबाबदारी कोण घेणार? शेळके घेणार का?

**महापालिका ससचिव:-** तो मागच्या मिटींगमध्ये 7 करायला करायला सांगितले होते.

**सदस्य, श्री. चंद्रशेखर यादव:-** पास.. पास..

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** फेल, फेल.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** पहीले सितलानी यांना बोलू द्या. मी आयुक्त साहेबांना दिनांक 2 नोव्हेंबर 2021 ला फोटो पाठवला आहे, आयुक्त साहेब वॉट्सअॅप चेक करा.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** सरजी त्या रस्त्याची अवस्था खूप वाईट होती म्हणून तो पास करणे आवश्यक आहे.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:-**कोणत्या कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की तुम्ही सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यावर डांबर चढवू शकतात?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** सरजी रस्त्याची अवस्था खूप वाईट आहे, म्हणून नागरीकांच्या सोईसाठी केले आहे.

**सदस्य, श्री. चंद्रशेखर यादव:-** पास..पास..

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** सर तो तीस वर्षे जुना रोड आहे, त्याची आवस्था खुप वाईट आहे, म्हणून बनविणे खूप आवश्यक होते. वॉटर सप्लायच्या कामामुळे पूर्ण रोड खोदून खराब झाला होता रोज अपघाट होत होते.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया :-** वॉटर सप्लाय वाल्यांना सांगाना ते त्यांच्यामार्फत भरतील ना, तिसरी गोष्ट सांगतो हे माजी महापौर यांच्या काळापासून हे नेहरू चौक ते उल्हासनगर पोलीस स्टेशन पर्यंतचे खड्डे भरण्यात आले होते आणि फुक्टचे बिल घेऊन गेला ठेकेदार एक पण खड्डा त्यानी नाही भरला, किती पैसे एका रस्त्या साठी खर्च करणार? किती वेळा करणार.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** सरजी अजून याचे बील नाही बनवले.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-** राजेशजी का या रस्त्यासाठी एवढा विरोध करीत आहेत बाकी रस्ते बनत आहेत, मग यासाठी कशाला एवढी चर्चा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** आमचा रोडला विरोध नाही. बिटूभाई या रोडचा 6 महीने मुदत आहे, तर त्याच्या पहीले का होत आहे? त्याच्या नंतर करा.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-** भगवानजी तूम्हाला माहिती आहे की, डांबरचे केलेले किती दिवस, तूम्ही रस्ताचे एवढे मोठे कॉन्ट्रॅक्टर आहात तुम्हांला सर्वात जास्त माहीती आहे. जाणूनबुजून टाईमपास करीत आहेत का?

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** हा रोड फेल झाला पाहीजे, सहा महीन्या नंतर झाला पाहीजे.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-** व्यक्तीगत कारण आहे, म्हणून करायचे नाही असे बोलायला पाहीजे होते.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** हा डांबरचा रस्ता चांगला आहे, तो खराब झाल्यावर बनवा.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-** अरे भगवानजी, गोष्टी फिरवू  नका सरळ सांगा ना व्यक्तीगत कारणामूळे नाही बनवायचा आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ठिक आहे, आपण यावर काही मार्ग काढू, पहीले तर याचे सहा महीन्याचा कालावधी पूर्ण होऊ द्या नंतर याचे वर्क ऑर्डर द्या. नंतर ऑर्डर देण्यात यावी.

**सदस्य, श्री. भगवान भालरेराव:-**ओके धन्यवाद.

**सदस्य, श्री. गजानन शेळके:-** ना ही नाही असे नाही होत, डांबरचा रस्ता उल्हासनगरमध्ये किती दिवस चालतो.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** नाहीतर त्या डांबरच्या रस्ताचे बिल....

**<u>सदस्य, श्री. गजानन शेळके:-</u>** उप महापौर साहेब, सर्व शहराचे रस्ते चांगले बनले पाहीजेत. भालेराव आपली हीच अपेक्षा आहे की नाही

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** ठिक आहे आता शेळके साहेब एवढे बोलतायेत म्हणून पास करूया

**<u>सदस्य, श्री. गजानन शेळके:-</u>** उल्हासनगर शहरात जे जे रस्ते चांगले होतील त्याने तूमचेच नाव होणार आहे, तूमच्या कालावधीमध्ये होतील ते.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** तुम्ही का ठेकेदाराची एवढी बाजू घेता आहेत?

**<u>सदस्य, श्री. चंद्रशेखर शेळके:-</u>** तुम्हाला खूष व्हायला पाहीजे तूमच्या कार्यकाळात एवढे चांगले रस्ते बनत आहेत.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** डबल डबल बनत आहेत.

**<u>सदस्य, श्री.राजेश वदारिया:-</u>** माझ्या कार्यकाळात 16 रस्ते बनले आहेत. त्यांची गॅरंटी होती तर आम्ही परत बनवून घेतले आहेत.

**<u>सदस्य, श्री. चंद्रशेखर शेळके:-</u>** हा विषय पास करा, इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>सदस्य, श्री.राजेश वदारिया:-</u>** आमचा विरोध आहे, तो राहणार आहे.

**<u>सदस्य, श्री. गजानन शेळके:-</u>** पास..पास..

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** मतदान घ्या मतदान.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-</u>** तूम्ही मतदान घ्या तरी आम्ही पासच बोलू.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** आमचा विरोध राहील.

**<u>सदस्य, श्री. चंद्रशेखर यादव:-</u>** असे सर्व खराब रस्ते शहरातले बनलेच पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-</u>** जेव्हा पण बघा विरोधच करतात. अटी व शर्ती गॅरेंटी वैगेरे सर्व निघून जातात.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** अरे मतदान घ्या मतदान.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-</u>** अहो भालेराव साहेब तिथे एवढ्या अडचणी आहेत.

**<u>सदस्य, श्री. चंद्रशेखर यादव:-</u>** लोकांना, कुठलाही कोणताही वार्ड असू दे शहरात रस्ते चांगले झालेच पाहिजेत.पास..पास..

**<u>सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-</u>** पास..पास..इतिवृत्ताची  वाट न पाहता.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** नापास.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** आके पुढचा विषय घ्या.

**<u>सदस्य, श्री. चंद्रशेखर यादव:-</u>** इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>महापालिका सचिव:-</u>** हा विषय पास..या मध्ये फक्त असे असेल की उल्हासनगर 2 प्रभाग 7 मधील रूहानी सत्संग हॉल ते खेमानी चौक पर्यंत सी.सी. पेव्हमेंट रोड व नाली बनविण्याच्या  कामास मान्यता देते आहे.ठराव असाच होईल, नंतर ठरावामध्ये कोणताही बददल होणार नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** सदरचा रस्ता मुदत संपल्या नंतर करण्यात यावा.

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:- सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑ विषय क्र.७ :- उल्हासनगर -२ प्रभाग क्र.७ मधील रुहानी सत्संग हॉल ते खेमाणी चौक पर्यंत सी.सी पेव्हमेंट रोड व नाली बनविणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर -२ प्रभाग क्र.७ मधील रुहानी सत्संग हॉल ते खेमाणी चौक पर्यंत सी.सी पेव्हमेंट रोड व नाली बनविणे आवश्यक असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सदर कामाचे रुपये ४०,००,०००/- एवढया खर्चाचे प्राकलन तयार करुन सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्यात आली व नियमाप्रमाणे सदर कामाची निविदा प्रक्रिया करण्यात आली त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.१**

| | | |
|---|---|---|
| १. | प्राकलनीय खर्च | रु.४०,००,०००/- |
| २. | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०१/०९/२०२१ |
| ३. | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०१/०९/२०२१ ते २१/०९/२०२१ |
| ४. | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक २१/०९/२०२१ |
| ५. | प्रथम मुदतवाढ | - |
| ६. | द्वितीय मुदतवाढ | - |
| ७. | तृतीय मुदतवाढ | - |
| ८. | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १५/११/२०२१ |
| ९. | आर्थिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक ०२/१२/२०२१ |
| १०. | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ५ |
| ११. | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ५ |

सदर निविदेचा तांत्रिक भाग दिनांक १५/११/२०२१ रोजी निविदा समिती समोर उघडण्यात आला. त्यामध्ये **१) मे. गोल्डन कन्स्ट्रक्शन २) मे. झा. पी. ॲ ण्ड कंपनी ३) मे. लाईप स्पार्क कन्स्ट्रक्शन ४) मे.ए.एम.रामचंदानी ५) मे. रवि एंटरप्रायजेस** यांनी निविदा सादर केल्या आहेत. त्याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे :

**तक्ता क्र.२**

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. गोल्डन कन्स्ट्रक्शन | मे. झा. पी. ॲण्ड कंपनी | मे. लाईप स्पार्क कन्स्ट्रक्शन | मे.ए.एम. रामचंदानी | मे. रवि एंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती मागील ३ वर्ष | होय | होय | होय | होय | होय |
| २. | कामाचा अनुभव मागील ३ वर्षाचे वार्षिक उत्पन्न | होय | होय | होय | होय | होय |
| ३. | पॅन कार्डाची प्रत | होय | होय | होय | होय | होय |
| ४. | संस्था /कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे दस्त‍ऐवज | होय | होय | होय | होय | होय |
| ५. | ई.पी.एफ. व जी.एस.टी. प्रमाणपत्र प्रत | होय | होय | होय | होय | होय |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६. | कंत्राटदाराची निविदा भरण्याच्या सक्षमता | होय | होय | **नाही** | होय | होय |
| ७. | निविदेमध्ये दिलेल्या नमुन्यात रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे. | होय | होय | **नाही** | होय | होय |
| ८. | कंत्राटदाराची घोषणा | होय | होय | होय | होय | होय |
| ९. | पात्र/अपात्र | **पात्र** | **पात्र** | **अपात्र** | **पात्र** | **पात्र** |

उक्त तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार निविदाकांराच्या कागदपत्रांची छाननी केली. त्यामध्ये **१) मे. लाईप स्पार्क कन्स्ट्रक्शन** या निविदाकाराने बीड कपॅसिटी दिलेली नाही तसेच सदर निविदाकारास रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्राची मूळ प्रत देण्याकरिता दिनांक २२/११/२०२१ रोजी कळविले होते. परंतु सदर निविदाकारानी प्रतिज्ञापत्राची मूळ प्रत जोडलेली नसल्याने सदर निविदाकारास अपात्र ठरविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने **१) मे. गोल्डन कन्स्ट्रक्शन २) मे. झा. पी. ॲण्ड कंपनी ३) मे.ए.एम.रामचंदानी ४) मे. रवि एंटरप्रायजेस** हे चार निविदाकार पात्र ठरत असल्याने त्यांचे निविदेचा आर्थिक भाग (Financial Bid) उघडण्यात आला त्याची माहिती खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र.३ :-**

| **अ.क्र.** | **निविदाकारांचे नाव** | **दिलेले दर (टक्के प्रमाणे)** |
|---|---|---|
| १. | **मे. गोल्डन कन्स्ट्रक्शन** | दिलेले दर १.२००% टक्के जास्त |
| २. | **मे. झा. पी. ॲण्ड कंपनी** | दिलेले दर ०.९९०% टक्के कमी |
| ३. | **मे. ए.एम.रामचंदानी** | दिलेले दर २.०४०% टक्के कमी |
| ४. | **मे. रवि एंटरप्रायजेस** | **दिलेले दर १०.९९०% टक्के कमी** |

वरील तक्त्यात नमुद उल्हासनगर महानगरपालिका **उल्हासनगर -२ प्रभाग क्र.७ मधील रुहानी सत्संग हॉल ते खेमाणी चौक पर्यंत सी. सी पेव्हमेंट रोड व नाली बनविणे** या कामाकरीता **मे. रवि एंटरप्रायजेस** यांनी **१०.९९०% टक्के कमी** दर सादर केले आहे. सदर दर निम्न आहेत. शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि.२६ नोव्हेंबर,२०१८ अन्वये लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर निम्न दराच्या निविदाकाराने Performance Security Deposit आठ दिवसाच्या आत जमा करणे आहे. **मे. रवि एंटरप्रायजेस** यांनी रु.८०,०००/- एवढया रक्कमेचे परफॉमन्स सिक्युरीटी आठ दिवसात भरणे आवश्यक आहे

तरी **मे. रवि एंटरप्रायजेस** यांची निम्न दराची निविदा मान्य करण्यास व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अंतर्गत मा.आयुक्त यांचे स्तरावर **मे. रवि एंटरप्रायजेस** यांचेशी संविदा करणेस मा. स्थायी समितीचे मान्यतेस्तव प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १०६ दिनांक :- ५/०१/२०२२

सुचकाचे नाव:- श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेश वदारिया

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार व झालेल्या चर्चे अंती उल्हासनगर -२ प्रभाग क्र.७ मधील रुहानी सत्संग हॉल ते खेमाणी चौक पर्यंत सी.सी पेव्हमेंट रोड व नाली बनविणेस मे. रवि एंटरप्रायजेस यांची निम्न दराची निविदा मान्य करण्यास व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (३) (क) अंतर्गत मे. रवि एंटरप्रायजेस यांचेशी यापुर्वीच्या निविदेचे ६ महिने पुर्ण झाल्यानंतर वर्क ऑर्डर देणेस मान्यता देत आहे.**

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

सर्वानुमते
सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ८ वाचून दाखवितात.

---

—

⇨ **विषय क्र ८ :— उल्हासनगर-१ प्रभाग क्र.१ येथील कमला नेहरुनगर येथील संरक्षण भिंत बनविणेच्या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२)अं तर्गत मा. स्थायी समितीचे पटलावर माहिती सादर करणेबाबत.**

---

—

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा.सभापतीजी मी तूमच्या माध्यमातून प्रशासनास विचारु इच्छितो की 5 (2) (2) मध्ये वर्क ऑर्डर देऊन माहीतीची समितीचे पटलावर कोणती तरतूद आहे? कृपया वाचून सांगा असा कोणता नियम आहे.श्री.सितलानीजी कृपया माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या. महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5 (2) (2) ला आपण स्थायी समिती सभेमध्ये माहीतीस्तव प्रस्तावीत, आपण नियम वाचून दाखवा. सितलानी सर.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** याची पार्श्वभूमी सांगीतली होती,ही जी भिंत पडली आहे, पावसाळ्यात पडली होती आणि हे डोंगर पूर्ण खाली येण्याचे चान्सेस होते. त्यामुळे याची पुर्ण मिडीयामध्ये याबद्दल चर्चा झाली होती म्हणून इमरजेन्सीमध्ये आपण ही भिंत 5 (2) (2) मध्ये दिली होती, ही घरे दरड कोसळून पडू नये याच उद्देशाने....

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** नाईकवाडे साहेब मी सांगतो पहील्या पहील्या ओळी मध्ये लिहीले आहे, उल्हासनगर -1, प्रभाग क्र.1 येथील कमला नेहरू नगर येथील संरक्षण भिंत दिनांक 29/09/2021 रोजी सकाळी 8-10 च्या दरम्यान अचानक कोसळली आहे ठिक आहे, आणि वरती वरती सार्वजनिक बांधकाम विभाग दिनांक 28 डिसेंबर, 2021 रोजी आमच्याकडे गोषवारा पाठवला आहे. जर तुम्हाला कामाची गरज होती तर एका दिवसात एस्टीमेट बनते आणि आयुक्त साहेब आम्हाला पत्र देतात तर एका दिवसात इमरजेंन्सी स्टँडींग कमीटीची सभा लागू शकते. कोणी थांबवले होते तुम्हाला, दिनांक 29/09 पासून, 29/10, 29/11/, 29/12, तीन महीने पेक्षा जास्त झाले आहे, आम्ही तर नव्हते थांबवले तुम्हाला, एस्टीमेट बनवायचे काम तर एका दिवसाचे आहे, जर तुम्ही एका दिवसात इमरजेंन्सी आहे तर एस्टीमेट बनवून सांगितले असते की, सभापतीजी अर्जेंट आहे, आम्ही त्वरीत मिटींग लावली असती. कायदा तर आहे ना, त्याचा उपयोग करायचा आहे. हे संपुर्ण मिसयुज आहे 5 (2) (2) चे. सितलानीजी आम्हांला तुमचे ऐकाचे आहे.

**महापालिका सचिव:-** सितलानी साहेब ते उत्तर मांगतायेत ते आपण द्या म्हणजे पुढचा विषय वाचता येईल.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** मॅडम तिकडे शिवाजी बालउद्यान येथे संरक्षण भिंत पावसामुळे पडली होती, जीवित्त व वित्तहानी होत होती ते काम खूप तातडीचे होते, तिथे अपघात झाला असता तर खूप मोठी समस्या निर्माण झाली असती सर.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** आपण समजून घ्या माझा मुद्दा जर तुमाला हवे होते तर तुम्ही 63 सी मध्ये घेऊ शकले असते. आपण त्यामध्ये का दाखवले नाही?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** तुमचा मुद्दा बरोबर आहे सर पण आमचा विचार होता की स्थायी समितीमध्ये चर्चा होऊन पास होणे गरजेचे आहे.

**सदस्य, श्री भगवान भालेराव:-** पास..पास..

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** तुम्ही 63 सी मध्ये पण आम्हाला कळवू शकले असते की 5 (2) (2) मध्ये नाही बसत आहे आम्ही इमरजंसी काम सूरू केले आहे. बघायला गेले तर 63 सी पण असे नाही की प्रत्येक काम आपण 63 डी सी मध्ये करायला सुरू करणार जरी तुम्हाला गरज वाटत होती तर तुम्ही आम्हाला कळवले असते तर आम्ही इमरजेंन्सी सभा लावून करून दिले असते ना, 5 (2) (2) मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मध्ये आणखी दुसरा कोणता सेक्शनच नाही आहे. त्यामध्ये बसत नाही.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** मी विनंती करतो की यात करेक्शन करा 63 डी. सी.सी. करा 5 (2) (2) च्या जागी...

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**आपण गोषवारा मध्ये बदल करा, 63 डी. सी. करून आणा, गोषवाऱ्यामध्ये बदली करा ना.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** या गोषवारा मध्ये 5 (2) (2) च्या जागी 63 डी. सी. असे वाचन्यात येऊन या ठरावाला मान्यता देण्याची विनंती मी करतो.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ठिक आहे पास.

**महापालिका सचिव:-** या गोषवाऱ्यात पण बदल करण्यात येईल आणि त्यानुसार ठरावात पण बदल करण्यात येईल. पास..

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** धन्यवाद सर, धन्यवाद.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** धन्यवाद सर पास..

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:- सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑ विषय क्र.८:- उल्हासनगर-१ प्रभाग क्र.१ येथील कमला नेहरुनगर येथील संरक्षण भिंत बनविणेच्या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (३) (क)अंतर्गत मा. स्थायी समितीचे पटलावर माहिती सादर करणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर-१ प्रभाग क्र.१ येथील कमला नेहरुनगर येथील संरक्षण भिंत दि.२९/०९/२०२१ रोजी सकाळी ८.०० वाजे दरम्यान अचानक कोसळली आहे. सदर भिंत कोसळल्यामुळे त्याचे वरील एकुण २० ते २५ घरे कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. प्रभाग अधिकारी, समिती कार्यालय १ यांनी सदर धोकादायक ठरलेल्या घरांना रिकामी करण्याचे काम सुरु केले आहे. त्यामुळे सदर संरक्षण भिंतीचे बांधकाम तात्काळ करणे बाबत स्थानिक नगरसेविका सौ.ज्योती दि. गायकवाड व सौ.जयश्री पाटील यांनी संर्भाकित पत्राद्वारे कळविले आहे.

उल्हासनगर-१ येथील कमलानेहरु नगर येथील सदर संरक्षण भिंत ही अतिवृष्टी मुळे कोसळल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे. तरी सदर ठिकाणावरी लोकांची जिवतहानी व मालमत्तेचे नुकसान टाळण्याकारीता तातडीने कामास सुरुवात करणे आवश्यक आहे.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता उल्हासनगर-१ येथील कमलानेहरु नगर येथील सदर संरक्षण भिंत बांधणे तातडीचे आहे. तसेच सदर कामाचे बांधकामाकरीता सा.बां. विभागामार्फत रु. २४,१०,९२५/- एवढया खर्चाचे प्राकलन तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च वर्ष २०२१-२२ च्या महापालिका अर्थसंकल्पामधील Const. of Storm Water Drain, Nallas and Culverts (WS) या लेखामधून प्रस्तावित करण्यात आला आहे.

सदर काम अत्यंत तातडीचे असून निविदा प्रक्रिया केल्यास दोन ते तीन महिन्याचा कालावधी लागू शकतो. तोपर्यंत वरील घटनेची पुनरावृत्ती होऊन जिवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी या कामची तातडी पाहता सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (३) (क) अंतर्गत मे. नवनिर्माण कंन्स्ट्रक्शन यांचे कडून करुन घेणेस मा.स्थायी समितीच्या माहितीस्तव प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १०७ दिनांक :- ५/०१/२०२२

सुचकाचे नाव:- श्री. राजेश वदारिया
अनुमोदकाचे नाव :- श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-१ प्रभाग क्र.१ येथील कमला नेहरुनगर येथील संरक्षण भिंत बनविणेच्या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (३) (क) अंतर्गत मे. नवनिर्माण कंन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेणेच्या प्रस्तावाची माहितीची नोंद घेण्यात येत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही /-

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ९ वाचून दाखवितात.

---

—⇨ **विषय क्र ९ :— उल्हासनगर-१ येथील डी.टी. कलानी कॉलेज ते महात्मा फुले चौकापर्यंत रस्ता रुंदीकरण करणे या कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस स्थायी समितीची मान्यता मिळणे.**

---

**—सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** पास करा इतिवृत्ताची वाट न पाहता, संपवून टाका.

**महापालिका सचिव:-** पास.. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** धन्यवद सर, धन्यवाद.
**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:- सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑ विषय **क्र.९ :-** उल्हासनगर-**१** येथील डी.टी. कलानी कॉलेज ते महात्मा फुले चौकापर्यंत रस्ता रुंदीकरण करणे या कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस स्थायी समितीची मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

सादर करण्यात येते की, डी.टी. कलानी कॉलेज ते महात्मा फुले चौकापर्यंत रस्ता रुंदीकरण करणे या कामाची दिनांक १३/०१/२०२१ ते ०४/०२/२०२१ या कालावधीत ई निविदा मागविण्यात आली होती. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ५,१३,२९,१३८/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १३/०१/२०२१ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १३/०१/२०२१ ते ०४/०२/२०२१ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०४/०२/२०२१ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |

| | | |
|---|---|---|
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०५/०२/२०२१ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | -- |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०६ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०६ |

दिनांक ०५/०२/२०२१ रोजी उल्हासनगर ४ येथील डी .टी. कलानी कॉलेज ते महात्मा फुले चौकापर्यंत रस्ता रुंदीकरण करणे या कामाचा तांत्रिक भाग उघडण्यात आला. सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तांत्रिक भाग (Technical Bid)**

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | झा.पी. ॲण्ड कंपनी | जयहिंद रोड बिल्डर्स | शंकर ट्रेडर्स | साई सिध्दनाथ कंन्स्टक्शन | दत्त दिगंबर कंन्स्ट्रक्शन | जय भारत कंन्स्ट्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Certificate of Registration in appropriate Class from Certificate of Registration in appropriate Class from CPWD/State PWD/CIDCO/MCGM./MJP etc. | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| २ | Attested Copy of Pan Card | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ३ | Goods &Service Tax Registration / Undertaking for Goods &Service Tax Exemption | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ४ | Income Tax Statement Return Statement and Turnover statement duly signed by the CA of Last Three years. | आहे | आहे | आहे | आहे | **अन्य कंपनीच्या नावे** | आहे |
| ५ | EPF Registration Certificate Number | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ६ | Tenderer should have successfully completed with Government / Semi Government / Public Sector at least one similar type of work in last ५ years (Five years) | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ७ | Annual Turnover of Last five years | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ८ | The tenderer will be qualified only if their available bid capacity is more than the total estimated value of works for which he has offered his bid. (A*N*१.५) - B | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ९ | The tenderer should possess his owned Ready Mix Concrete Plant v | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| १० | Static Roller ८ to १० tonne, Smooth Wheeled power roller | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ११ | Truck / Tipper/ Tractor | आहे | आहे | मालकी नाही | आहे | आहे | आहे |
| १२ | Ready Mix Concrete Plant | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| १३ | Transit Mixture ५ to ६ cum capacity | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| १४ | ५००/- Stamp Paper | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| १५ | Work in hand | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| १६ | Eligible / Not Eligible | पात्र | पात्र | अपात्र | पात्र | अपात्र | पात्र |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार निविदाकारांच्या कागदपत्रांची छाननी केली असता १) शंकर ट्रेडर्स मालकीचे वाहन नसल्याने २) मे. दत्त दिगंबर कंन्स्ट्रक्शन यांचे आय.टी.आर. अन्य कंपनीचे नावे असल्याने हे दोनही निविदाकार अपात्र ठरत आहेत. तसेच १) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी २) मे.जयहिंद रोड बिल्डर्स व ३) **जय भारत** कंन्स्ट्रक्शन ४)मे. साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन हे चारही निविदाकार पात्र ठरत आहेत.

तरी वरीलप्रमाणे पात्र/ अपात्र निविदाकारांची माहिती दिनांक १३/०७/२०२१ रोजी सायं.४.०० वाजेपासून ते २०/०७/२०२१ सायं ४.०० वाजेपर्यंत या कालावधीकरीता उल्हासनगर महानगरपालिकेच्या www.umc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे Ulhasnagar.pwd@gmail.com या मेलवर व शहर अभियंता यांचे कार्यालयात लेखी स्वरुपात हरकती व सुचना मागविण्यात आल्या होत्या. परंतू दिनांक २०/०७/२०२१ रोजी सायं.४.०० वाजेपर्यंत कोणत्याही हरकती / सुचना प्राप्त झालेल्या नसल्याने दिनांक २२/११/२०२१ रोजी सदर निविदेचा दुसरा लिफाफा (आर्थिक भाग) उघडणेत आला. निविदाकारांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहे.

38

| अक्र | निविदाकारांचीनावे | दिलेलेदर |
|---|---|---|
| | मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन | ११.१७०टक्के कमी |
| २ | मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन | ०.९९० टक्के कमी |
| ३ | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी | ७.२१० टक्के जास्त |
| ४ | मे.जयहिंद रोड बिल्डर्स | ७.००० टक्के जास्त |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांचे दर निम्न आहेत. त्यांनी ११.१७०% कमी दर सादर केले आहेत. प्रस्तावित कामाची प्राकलनिय किंमत रुपये ५,१३,२९,१३८/- एवढी आहे. निविदाकार यांनी सादर केलेले ११.१७०% कमी दराप्रमाणे रु.१५,४०,०००/- एवढी रक्कम शासन परिपत्रक क्रमांक : सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दिनांक २६ नोव्हेंबर,२०१८ अन्वये परफॉमस सेक्युरीटी म्हणून भरणा संबंधित एजन्सीकडून भरणा करुन घेण्यात येत आहे.

तरी उल्हासनगर ४ येथील डी .टी. कलानी कॉलेज ते महात्मा फुले चौकापर्यंत रस्ता रुंदीकरण करणे या कामाची ११.१७०% कमी दराप्रमाणे रु.४,५५,९५,६७३/- एवढ्या रक्कमेच्या कामाकरीता निम्न दराचे निविदाकार मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांचेशी संविदा करणेस स्थायी समितीच्या मान्यतेकरीता प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. १०८** **दिनांक :- ५/०१/२०२२**

**सुचकाचे नाव:- श्री. कलवंतसिंह सोहता**
**अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेश वदारिया**

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार व झालेल्या चर्चे अंती उल्हासनगर-१ येथील डी. टी. कलानी कॉलेज ते महात्मा फुले चौकापर्यंत रस्ता रुंदीकरण करणे या कामाच्या रु.४,५५,९५,६७३/- एवढ्या रक्कमेच्या कामाकरीता निम्न दराचे निविदाकार मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांचेशी संविदा करणेस मान्यता देत आहे.**

**या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही/-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**
**सभापती/पीठासीन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

महापालिका सचिव:- विषय संपले आहेत.

सायंकाळी ५.३५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती, श्री. दिपक सिरवानी यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:- ०७ /०७/२०२१

दिनांक:- ०७/०७/२०२१ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

०२

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक ०७/०७/२०२१, रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृह येथे मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील शासनाचे क्रमांक कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४, दिनांक २८ जुन, २०२१ च्या पत्रान्वये विहित कार्यपध्दती पालन करुन सभेस ऑनलाईन ॲपद्वारे घेण्यांत आली, सदर सभेत खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश वदारीया | सदस्य |
| ४ | श्री. भगवान भालेराव | सदस्य |
| ५ | श्री. राजकुमार किशनचंद जग्याशी | सदस्य |
| ६ | श्रीम. जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ७ | श्री. चंद्रशेखर यादव | सदस्य |
| ८ | श्रीमती अर्चना करणकाळे | सदस्या |
| ९ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| १० | श्रीमती कंचन अमर लुंड | सदस्या |
| ११ | श्री. रमेश चव्हाण | सदस्य |
| १२ | श्री .आकाश पाटील | सदस्य |
| १३ | श्री. स्वप्नील बागुल | सदस्य |
| १४ | श्रीमती सुनिता बगाडे | सदस्या |
| १५ | श्री. गजाजन शेळके | सदस्य |

तर,
खालील दर्शविलेले सदस्य सभेस अनुपस्थित होते.

१. सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्रीमती करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव
३. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय)
४. श्री. मदन सोंडे, उप-आयुक्त
५. श्रीमती प्रियांका राजपुत, उप आयुक्त (कर विभाग)
६. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक
८. डॉ. दिपक पगारे, वैद्यकिय अधिकारी
९. श्री. महेश सितलानी, शहर अभियंता

१०. श्री. अश्विनी आहुजा, उप अभियंता (सा.बा.वि.)
११. श्री. तरुण सेवकांनी, उप अभियंता (सा.बा.वि.)
१२. श्री. अजय एडके, सहा. आयुक्त
१३. श्री. मनिष हिवरे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी
१४. श्रीमती श्रध्दा सपकाळे, सिस्टीम ॲनालिस्ट, मा.त.विभाग
१५. श्री. रहेजा, शाखा अभियंता (पा.पु.वि.)
१६. श्री. अच्युत सासे, सहा. आयुक्त (सा.प्र.वि.)
१७. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी
१८. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१९. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती नर्गिस खान
२. श्री. बाळू भांगरे
३. श्रीमती विद्या आढळ, लिपीक

सायंकाळी ४.१५ वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

या वेळी आयुक्तांच्या स्थानी अतिरिक्त आयुक्त, श्रीम. करुणा जुईकर या आसनस्थ होत्या.

**महापालिका सचिव:-** मिटींग सुरु होत आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:- माझी सगळयांना विनंती आहे, की दिपक सिरवानी सभापती झाल्यापासून सगळयांना सहकार्य करावे सर्व सदस्यांनाही त्या संदर्भात सदस्यांनीही आपले नियमांप्रमाणे आपली जी मागणी असेल किंवा चर्चा असेल ती नियमाप्रमाणे करावी तसेच अधिका-यांनीही मला वाटते सभापतीच्या कार्यकाळामध्ये कुठेलेही अधिकारी गैरहजर न राहता चांगल्या पध्दतीने आम्हाला सहकार्य करावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि सभापतीनी मिटींग सुरु करावी अशी मी त्यांना विनंती करतो.

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** मी, सभेस आलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत करत आहे. सर्वांसाठी माझी एक विनंती आहे की, प्रत्येक विषयावरती एका एका ने बोलावे जेणेकरुन त्या विषयावरती चर्चा विचारविनिमय होवून मार्ग काढता येवू शकेल, धन्यवाद.

**सदस्य, श्री. राजू जग्याशी**:- मा. सभापती जी मला अनुमती पाहिजे श्रध्दांजली देण्यासाठी...

**सदस्य, श्री. राजेश वधरीया-** स्थायी समिती सभेमध्ये श्रध्दांजली देत नाहीत.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** ओके ठिक आहे.

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १ वाचून दाखवितात.

---

**⇨विषय क्र १ :– मागील स्थायी समिती सभेचे दिनांक १२/०२/२०२१ (त्यात १९/०३/२०२१ त्यात २६/०३/२०२१) आणि दिनांक १९/०३/२०२१ (त्यात २२/०३/२०१) आणि दिनांक १९/०३/२०२१ (त्यात २६/०३/२०२१) आणि दिनांक २६/०३/२०२१ आणि दिनांक ३०/०३/२०२१ व दिनांक १६/०६/२०२१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.**

---

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी-** याच्यामध्ये कोणाला काही संशय आहे का ते बोला. ही माझी पहिली मिटींग आहे या पूर्वीचे जे सदस्य आहेत त्यांना या विषयी काही बोलायचे असेल तर बोलू शकता.

**महापालिका सचिव:-** साहेब बोला.

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** पास...पास.. इतिवृत्ताची वाट न पहाता.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे . 👍

---

☑

**विषय क्र.१ :—** मागील सभेचे दिनांक १२/०२/२०२१ (त्यात दि.१९/०३/२०२१ त्यात दिनांक २६/०३/२०२१) आणि दिनांक १९/०३/२०२१ (त्यात दिनांक २२/०३/२०२१) आणि दिनांक १९/०३/२०२१ (त्यात दिनांक २६/०३/२०२१ आणि दिनांक २६/०३/२०२१ आणि दिनांक ३०/०३/२०२१ व दिनांक १६/०६/२०२१रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. गजानन शेळके

**स्थायी समिती ठराव क्र.०१ :—** **दिनांक : ०७/०७/२०२१**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक १२/०२/२०२१ (त्यात दि.१९/०३/२०२१ त्यात दिनांक २६/०३/२०२१) पृष्ठ क्र. १ ते ४६ पर्यंतचे आणि दिनांक १९/०३/२०२१ (त्यात दिनांक २२/०३/२०२१) पृष्ठ क्र. १ ते ४२ पर्यंतचे आणि दिनांक १९/०३/२०२१ (त्यात दिनांक २६/०३/२०२१ पृष्ठ क्र. १ ते ४१ पर्यंतचे आणि दिनांक २६/०३/२०२१ पृष्ठ क्र. १ ते १३ पर्यंतचे आणि दिनांक ३०/०३/२०२१ पृष्ठ क्र. १ ते पर्यंतचे व दिनांक १६/०६/२०२१ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ४ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक २ वाचून दाखवितात.

---

➪**विषय क्र २:— माहे एप्रिल २०१९ ते मार्च २०२० अखेरचा जमा खर्चाचा वार्षिक अहवाल**

---

**<u>सदस्य, श्री. राजेश वधरीया-</u>** जो दोन नंबरचा विषय आहे आहे, माहे ऐप्रील २०१९ ते मार्च २०२० अखेरच्या जमा खर्चाचा वार्षिक अहवाल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५ नुसार माहे एप्रील २०१९ मार्च २०२० अखेरच्या जमा खर्चाचा एकत्रीत अहवाल हा जो सादर केला आहे. हा खूप वेळाने सादर केलेला आहे.रिवाईज बजेट आम्ही पास करुन देवू. तर या बजेटचा अर्थ काय आहे? इथे आणण्याचा अर्थच काय आहे? यामध्ये आयुक्तांनी सही केलेली आहे व आयुक्त उपलब्ध नाही आहेत. तरी हा विषय डिफर करण्यात यावा. मा. आयुक्त समोर या विषयी चर्चा केली जाईल. क्लीअरफिकेशन आम्ही आयुक्ताकडू मागणार कारण की,आयुक्त साहेबांची स्वाक्षरी आहे. डॉ. राजा दयानिधी म्हणून, या विषयी आम्ही आयुक्त साहेबाना प्रश्न विचारणार आहेत. प्रत्येक वेळी स्थायी समिती मध्ये अशा प्रकारच्या घटना होत आहेत. म्युनसिपल चिप ऑडीटर प्रत्येक वेळी स्थायी समितीचे ठराव होत असून, कायदा असून, तरतूद असून जाणूनबजून माहिती लपविण्यासाठी एक वर्षाची एकत्र माहिती दखविली जाते जसे की कोणाला समजू नये. यासाठी आम्ही आयुक्त साहेबासमोर चर्चा करणार. त्यामुळे हा विषय डिफर करण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. सभापती महोदय, राजेश वधरीयाजी यानी जो विषय उपस्थित केला आहे, आपल्याला निवेदन करतों की, एक अशी बैठक लावण्यात यावी ज्यामध्ये फक्त २०१९, २०२० चे वार्षीक अहवालावरती चर्चा करण्यात यावी. बाकी जे प्रत्येक महिन्याला दयायला पाहिजे ते एक वर्षाचे आले आहे. ज्या वेळेस आयुक्त साहेब उपस्थितीत राहतील त्या वेळेस यानंतर एक अशी बैठक लावा की, ज्यामध्ध्ये फक्त ऐप्रील २०१९ पासून मार्च २०२० पर्यंतचा अहवाल या वरती चर्चा करावी. आणि तसेच मार्च २०२० नंतर सन २०२१ हे वर्ष सुध्दा संपले आहे याचा अहवाल सुध्दा आणावा. जेणेकरुन आम्हांला समजणे सोपे हाईल. हा अहवाल पास करणे माझ्या माहीतीनुसार उचित राहणार नाही.

**<u>स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** हा विषय डिफर करणेत येत आहे आणि पुढच्या मिटींग मध्ये घेण्यात येईल. ज्यावेळेस आयुक्त साहेब उपस्थित असतील किंवा यासाठी विषेश मिटींग घेणेत येईल, आभारी आहे.

**<u>महापालिका सचिव-</u>** विषय वगळण्यात येत आहे, असा ठराव करणेत येईल फक्त

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे आणि विषय कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे .

---

☑

**विषय क्र. २ :— माहे एप्रिल २०१९ ते मार्च २०२० अखेरचा जमा खर्चाचा वार्षिक अहवाल**

<u>प्रस्तावना</u>

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ नुसार माहे एप्रिल २०१९ ते डिसें २०१९अखेर पर्यंतची जमा खर्चाचा एकत्रित अहवाल खालील प्रमाणे सादर करित आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा. ही विनंती**

**वित्तीय वर्ष २०१९—२०२० च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खालीलप्रमाणे आहे.**

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| मागील शिल्लक | **7717000** |
| “अ” | **9163650000** |

| | |
|---|---|
| "ब" | 21000000 |
| "क" | 1435300000 |
| एकूण | 10627667000 |

सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | 7486550000 |
| ३ | शासकीय अनुदान | 2699500000 |
| ४ | अनामत रकमा/<br>दायित्वे इ. | 433900000 |
| ५ | एकुण | 10619950000 |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | 7717000 |
| ७ | एकुण :— | 10627667000 |

माहे , डिसें, २०१९ अखेर मूळ व सुधारित अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

वित्तीय वर्ष २०१९—२०२० च्या मुळ अर्थसंकल्पात एकुण जमा रक्कम रुपये १०६२७६६७०००/— अपेक्षित धरलेली आहे. त्यामुळे माहे डिसे,२०१९ अखेर सुधारित अंदाजपत्रकाप्रमकाणे समप्रमाणात रुपये ७९७०७५०२५०/— एकुण उत्पन्न जमा होणे अपेक्षित होते. परंतू प्रत्यक्षात रुपये ३४५८५७३७२२/— (एकूण अपेक्षित जमेच्या ४३.३९टक्के) एकुण उत्पन्न प्राप्त झाले आहे.

| Sr.No. | PARTICULARS | ESTIMATES FOR THE YEAR | Expected Revenue income Up To Dec 2019 | PROGRESSIVE TOTAL FROM APRIL 2019 TO Dec 2018 | Percentage as per original estimates | Percentage as per revised estimates |
|---|---|---|---|---|---|---|
| | OP. BALANCE | 7717000 | 5144666.667 | 692226438 | 8970.15 | 0.00 |
| A - BUDGET | | | | | | |
| P-I | REVENUE INCOME | | | | | |
| A1 | OCTROI | 250000000 | 187500000 | 13500000 | 5.40 | 0.00 |
| A2 | PROPERTY TAX | 2152000000 | 1614000000 | 214804219 | 9.98 | 0.00 |
| B 1 | RECOVERY UNDER MRTP | 3230800000 | 2423100000 | 86145212 | 2.67 | 0.00 |
| B 2 | Rec Un Un-Authorised Const | 0 | 0 | 0 | 0.00 | 0.00 |
| C-1 | MARKETS | 10000000 | 7500000 | 0 | 0.00 | 0.00 |
| C2 | HOSPITAL & DISP. | 600000 | 450000 | 374050 | 62.34 | 0.00 |
| C3 | LICENCE FEES | 171700000 | 128775000 | 29549567 | 17.21 | 0.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| D | GRANTS | 1928500000 | 1446375000 | 1364896820 | 70.78 | 0.00 |
| E | MISCELLANEOUS | 23150000 | 17362500 | 34467656 | 148.89 | 0.00 |
| P-II | CAPITAL RECEIPTS (LOANS) | | | | | |
| A | REVENUE FROM MPL. PROP | 464800000 | 348600000 | 7371328 | 1.59 | 0.00 |
| B | GRANTS | 500000000 | 375000000 | 752439469 | 150.49 | 0.00 |
| C | LOANS | 0 | 0 | 0 | | 0.00 |
| P-III | EXTRA ORD. HEADS | 432100000 | 324075000 | 48859807 | 11.31 | 0.00 |
| Total - A-Budget-Income | 9163650000 | 6872737500 | 2552408128 | 480.64 | 0.00 | |
| B - BUDGET | | | | | | |
| PART 1 | REVENUE RECEIPTS | 1000000 | 750000 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| PART 2 | CAPITAL RECEIPTS | 20000000 | 15000000 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| C - BUDGET | | | | | | |
| P-I | REVENUE INCOME | | | | | |
| A | WATER BILL COLLECTION (TAX) | 500000000 | 375000000 | 112204005 | 22.44 | 0.00 |
| A | WATER BILL COLLECTION (W.S) | 40000000 | 30000000 | 28786214 | 71.97 | 0.00 |
| A | CORP. RATES & TAXES | 631500000 | 473625000 | 60621843 | 9.60 | 0.00 |
| B | LICENCE & FEES | 11700000 | 8775000 | 12225169 | 104.49 | 0.00 |
| C | MISCELLANEOUS | 300000 | 225000 | 6300 | 2.10 | 0.00 |
| P-II | CAPITAL RECEIPTS (LOANS) | 0 | 0 | 0 | | 0.00 |
| P-II | CAPITAL RECEIPTS (GRANTS) | 250000000 | 187500000 | 0 | 0.00 | 0.00 |
| P-III | EXTRA ORD. HEADS | 1800000 | 1350000 | 95625 | 5.31 | 0.00 |
| Total - C-Budget-Income | 1435300000 | 1076475000 | 213939156 | 14.91 | 0.00 | |
| A, B & C TOTAL INCOME (Without Opening Bal.) | 10619950000 | 7964962500 | 2766347284 | 26.05 | 0.00 | |
| A, B & C TOTAL INCOME (With | 10627667000 | 7970750250 | 3458573722 | 32.54 | 0.00 | |

| Opening Bal.) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|

| Sr. No. | PARTICULARS | ESTIMATES 2018/19 | Expected Revenue Expenditure Up To March2019 | PROGRESSIVE TOTAL FROM APRIL 2018 To March 2019 | Percentage as per original estimates | Percentage as per revised estimates |
|---|---|---|---|---|---|---|

सन २०१९—२० च्या 'अ''ब'व'क' मूळ अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. १०६२७६६७०००/— (प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित धरलेले होते . मात्र प्रत्यक्षात माहे , एप्रिल २०१८ ते डिसे २०१९ अखेरपर्यंत मुळ अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने रू. ३४५८५७३७२२/— (प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे. सदर उत्पन्न हे मुळ अंदाजपत्रकाच्या .३२.५४ टक्के इतके आहे.

अर्थसंकल्पात नमूद केलेल्या बाबी मध्ये खालील विभागांनी उत्पन्न वाढविण्यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.

१) मालमत्ता कर विभाग:— सुधारीत अर्थसंकल्पात मालमत्ता कर विभागाकडून सन २०१९—२० मध्ये एकूण रक्कम रू ३२८३५०००००/—स्वरूपात जमा होणे आवश्यक होते. मात्र प्रत्यक्षात डिसें,२०१९ अखेर रक्कम रू. ३८७६३००६७/— एवढी जमा झाली आहे. ती वरील अर्थसंकल्पिय तरतूदीच्या ११.८० टक्के एवढी अल्प प्रमाणात जमा झाली आहे. त्यामुळे मालमत्ता कर विभागाने प्रलंबीत मालमत्ता कर वसुली बाबत ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच ज्या इमारतींची कर निर्धारणा **(Assessment )** केल्या नाहीत त्या त्वरीत कर निर्धारणा करून कर लावल्यास महापालिकेस उत्पन्न प्राप्त होईल.

२) मालमत्ता विभाग :—१) मालमत्ता विभागाकडून शहरातील पार्किंग स्थळाचे सर्वेक्षण करून पार्किंग स्थळे निर्माण करावी, ज्यामुळे महापालिकेस उत्पन्न प्राप्त होईल. २) रिकाम्या मालमत्ता भाडे तत्वावर वापरात आणून उत्पन्न वाढविणे. ३) व्यवसाय परवाना धोरण अवलंबून उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे. ४) फेरिवाला धोरण लवकरात लवकर निश्चित करून उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे. ५) महापालिकेच्या मालमत्तेचे सुधारित दर निश्चित करून उत्पन्न वाढविण्या साठी उपाययोजना करणे.

३) पाणी पुरवठा विभाग:— १) सुधारीत अर्थसंकल्पात पाणी पट्टीसाठी सन २०१९—२० मध्ये एकुण रूक्कम रू.४००००००० /—एवढी पाणी पट्टी जमा होणे आवश्यक होते. मात्र प्रत्यक्षात रू.२८७८६२१४/— एवढी रक्कम पाणी पट्टी जमा झाली आहे. ती मुळ अर्थसंकल्पाच्या ७१.९७ टक्के एवढीच अल्प प्रमाणात जमा झाली आहे. त्यामुळे प्रलंबीत पाणी पट्टी वसुलीबाबत ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. अनधिकृत नळ जोडणी नियमाप्रमाणे दंड आकारून नियमित करून नळ कनेक्शनला मिटर लावून पाणी चोरीला आळा घालणे आवश्यक वाटते.

४)स्थानिक संस्था कर विभाग:— स्थानिक संस्था कर विभागाचे बजेट सन २०१९—२०२० रू. २५०००००००० एवढे दर्शविण्यात आलेले आहे. परंतू प्रत्याक्षात मात्र रू.१३५०००००/— इतके जमा झालेली आहे. ती अंदाजपत्रकाच्य ५.४० टक्के अल्प प्रमाणात प्राप्त झाली आहे. तरी स्थानिक संस्था कर विभागातून प्रलंबित निर्धारणेचे कार्य मार्चे, २०२० अखेर पर्यंत पूर्ण करून जास्तीत जास्त उत्पन्न प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. प्रलंबित निर्धारणा मार्च २०२० अखेर पूर्ण न झाल्यास महसूल बुडण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे लेखा परिक्षण **Loss of Revenu** म्हणून शक्यता ही नाकारता येत नाही याबाबत संबंधितांना सुचना देण्यात याव्यात.

खर्च—

लेखा परिक्षण विभागास पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पन्नाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवणे शक्य होत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील जमेचे लेखा परिक्षण करण्यात येत असून. अनियमितता आढळल्यास सदर बाब संबंधित विभागाच्या निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात येतात.

माहे ,डिसे., २०१९ अखेर मूळ अंदाजानुसार व सुधारित अंदाजपत्रकानुसार अपेक्षित असलेले खर्च व प्रत्यक्ष खर्च लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| PART I | **A BUDGET -Rev.Exp.** | | | | | |
| A1 | **SALARY** | **1088632000** | **816474000** | **742194641** | **68.18** | 0.00 |
| A2 | **ALLOWANCE** | **48100000** | **36075000** | **33867447** | **70.41** | 0.00 |
| A3 | **ADM. EXP.** | **169100000** | **126825000** | **72757036** | **43.03** | 0.00 |
| P | **STREET LIGHT** | **86300000** | **64725000** | **59079873** | **68.46** | 0.00 |
| B2 | **FIRE FIGHT** | **10100000** | **7575000** | **1504089** | **14.89** | 0.00 |
| C1 | **PUBLIC HEALTH** | **409650000** | **307237500** | **229153329** | **55.94** | 0.00 |
| C2 | **HOSP. & DISP.** | **44600000** | **33450000** | **20222111** | **45.34** | 0.00 |
| C3 | **GARDEN IMPROVEMENT** | **111700000** | **83775000** | **4292519** | **3.84** | 0.00 |
| C4 | **EDUCATION** | **730623000** | **547967250** | **300173980** | **41.08** | 0.00 |
| C5 | **P.W.D** | **283200000** | **212400000** | **91266077** | **32.23** | 0.00 |
| D | **WARD COMMITTEES** | **374400000** | **280800000** | **15270420** | **4.08** | 0.00 |
| E | **MISCELLANEOUS** | **106975000** | **80231250** | **46799423** | **43.75** | 0.00 |
| | | **3463380000** | **2597535000** | **1616580945** | | |
| PART II | **CAPITAL EXPENDITURE** | | | | | |
| A1 | **GEN. ADM** | **32200000** | **24150000** | **9717018** | **30.18** | 0.00 |
| B1 | **STREET LIGHT** | **53800000** | **40350000** | **7500848** | **13.94** | 0.00 |
| B2 | **FIRE FIGHT** | **32000000** | **24000000** | **0** | **0.00** | 0.00 |
| C1 | **PUBLIC HEALTH** | **245000000** | **183750000** | **2787686** | **1.14** | 0.00 |
| C2 | **HOSP. & DISP.** | **6000000** | **4500000** | **0** | **0.00** | 0.00 |
| C3 | **GARDEN IMPROVEMENT** | **102119000** | **76589250** | **2864615** | **2.81** | 0.00 |
| C4 | **P.W.D** | **3696200000** | **2772150000** | **157639036** | **4.26** | 0.00 |
| C5 | **SECURITY DEPARTMENT** | **2000000** | **1500000** | **0** | **0.00** | 0.00 |
| C6 | **LOAN EXP.** | **0** | **0** | **0** | **0.00** | 0.00 |
| C7 | **LOAN REPAY (ESCROW)** | **0** | **0** | **0** | **0.00** | 0.00 |
| D | **MISCELLANEOUS** | **500000** | **375000** | **316132** | **63.23** | 0.00 |
| PT. III-A | **EXTRA ORD. HEADS** | **443600000** | **332700000** | **1695585** | **0.38** | 0.00 |
| | | **4613419000** | **0** | **182520920** | | 0.00 |
| Total A-Budget Exp. | | **8076799000** | **6057599250** | **1799101865** | **22.27** | 0.00 |
| | | | **1350000** | | | 0.00 |
| A | **B REVENUE EXP** | **5500000** | **4125000** | **333258** | **6.06** | 0.00 |
| | **CAPITAL EXPENDITURE** | **30000000** | **22500000** | **0** | **0.00** | 0.00 |
| PART I | **C BUDGET -Revenue** | | | | | |
| **A1** | **SALARY** | **79481000** | **59610750** | **46150508** | **58.06** | 0.00 |
| **A2** | **ALLOWANCES** | **13100000** | **9825000** | **3843151** | **0.00** | 0.00 |
| **A3** | **ADM. EXP.** | **2000000** | **1500000** | **869331** | **43.47** | 0.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| B1 | MIDC WATER BILLS | 300000000 | 225000000 | 225000000 | 0.00 | 0.00 |
| B2 | MWSSB WATER ARREARS | 34000000 | 25500000 | 0 | 0.00 | 0.00 |
| B3 | WATER SUPPLY MAINT. | 153000000 | 114750000 | 89590342 | 58.56 | 0.00 |
| C | UNDERGROUND DRAINAGE | 21800000 | 16350000 | 14516859 | 66.59 | 0.00 |
| D | DRAINAGE | 170000000 | 127500000 | 30136430 | 0.00 | |
| E | WARD COMMITTEES | 15600000 | 11700000 | 5908261 | 0.00 | |
| F | MISCELLANEOUS | 3400000 | 2550000 | 2709106 | 79.68 | |
| | | 792381000 | 594285750 | 418723988 | | |
| PART II | CAPITAL EXPENDITURE | | | | | |
| A | GENERAL ADMINISTRATION | 1000000 | 750000 | 0 | 0 | 0.00 |
| B | WATER SUPPLY | 262500000 | 196875000 | 25874034 | 9.86 | 0.00 |
| C | UNDER GOUND DRAINAGE | 583000000 | 437250000 | 218540883 | 37.49 | 0.00 |
| D | DRAINAGE | 478000000 | 358500000 | 94254158 | 19.72 | 0.00 |
| E | LOAN REPAY | 393212000 | 294909000 | 83765576 | 21.30 | 0.00 |
| F | MISCELLANEOUS | 550000 | 412500 | 0 | 0.00 | 0.00 |
| PT. III-A | EXTRA ORD. HEADS | 1300000 | 975000 | 0 | 0.00 | 0.00 |
| | | 1719562000 | 1289671500 | 422434651 | 24.57 | 0.00 |
| Total C-Budget Exp. | | 2511943000 | 1883957250 | 841158639 | 33.49 | 0.00 |
| A B C EXP. TOTAL | | 10624242000 | 7968181500 | 2640593762 | 24.85 | 0.00 |
| CLOSING BALANCE | | 3425000 | 2568750 | 817979960 | 0.00 | 0.00 |

माहे एप्रिल २०१८ ते डिसे,२०१९ अखेर पर्यंत मुळ अंदाज पत्रकाच्या अनुषंगाने २६४०५९३७६२/— खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसूलाच्या ७६.३५ टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखा परिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येते. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

निवृत्ती वेतन प्रकरणे—माहे एप्रिल २०१८ ते डिसे २०१९ अखेर महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या/ निधन पावलेल्या कर्मचा—यांची …… निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ०६ (१) अ च्या तरतुदीप्रमाणे):— अर्थसंकल्पिय अंदाजाप्रमाणे महानगरपालिकेस फारच कमी उत्पन्न मिळाले आहे. त्यामुळे १) स्थानिक संस्था कर २) मालमत्ता कर ३) महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न ४)पाणी बिल वसूली (कर) ५) पाणी बिल वसुली(पाणीपट्टी) या महसूली उत्पन्नात वाढ होणेच्या दृष्टीने विभागांनी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

सूचकाचे नांव : श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नांव : श्री. गजानन शेळके

**स्थायी समिती ठराव क्र. १अ:—** **दिनांक : ०७/०७/२०२१**

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे एप्रिल २०१९ ते मार्च २०२० अखेरचा जमा खर्चाच्या वार्षिक अहवालाचा प्रस्ताव कार्यसुचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

**<u>सर्वानुमते</u>**

सभापती / पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव-</u>** विषय क्रमांक ३ वाचून दाखवितात.

---

**⇨विषय क्र ३ :— उल्हासनगर शहरात निश्चित केलेले कोविड रुग्णालयत २४ तास साफसफाई/स्वच्छता निर्जंतूकीकरण (हाऊस किपींग साठी) तीन पाळी मध्ये कुशल/सुपरवाझर असे किमान ५४ कुशल कर्मचारी (कर्मचा-यांची संख्या आवश्यकतेनूसार कमी/जास्त होवु शकते) पुरवठा करण्याकरीता (सन २०२०-२१ निविदेतील) प्राप्त मंजुर दराने दिनांक ३० जुन, २०२१ पर्यंत मे. शार्प सर्व्हिसेस, मुंबई यांच्या कामास मुदत वाढ देण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.**

---

**<u>स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी-</u>** या विषयावरती कोणाला बोलायचे आहे. हा विषय डिफर.

**<u>महापालिका सचिव-</u>** हा विषय कार्य सुचिवरुन वगळण्यात येत आहे.

**<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:-</u>** मा. सभापतीजी ...

**<u>महापालिका सचिव-</u>** विषय क्रमांक ४ वाचून दाखवितात.

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनीष हिवरे:-</u>** हॅलो, हॅलो...

**<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:-</u>** मा. सभापतीजी..

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव</u>**- हा विषय संपला.

प्र **<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:-</u>** साहेब सदर विषया संदर्भामध्ये थोडेसे बोलायचे होते.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव</u>**- नंतर बोलू आता, सभापतींना येऊन भेटा. पहीली चर्चा करा नंतर मग विषय.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .

☑ **विषय क्र. ३ :— उल्हासनगर शहरात निश्चित केलेले कोविड रुग्णालयत २४ तास साफसफाई/ स्वच्छता निर्जंतूकीकरण (हाऊस किपींग साठी) तीन पाळी मध्ये कुशल/सुपरवाझर असे किमान ५४ कुशल कर्मचारी (कर्मचा-यांची संख्या आवश्यकतेनूसार कमी/जास्त होवु शकते) पुरवठा करण्याकरीता (सन २०२०-२१ निविदेतील) प्राप्त मंजुर दराने दिनांक ३० जुन, २०२१ पर्यंत मे. शार्प सर्व्हिसेस, मुंबई यांच्या कामास मुदत वाढ देण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावना**

सन २०२०-२१ साठी निश्चित केलेले कोविड रुग्णालयात २४ तास साफसफाई/स्वच्छता निर्जंतूकीकरण ठेवणेकामी अनुभवी अभिकर्ता यांचेकडून ई-टेंडर पध्दतीने निविदा मागविण्यात आली होती. त्याअनुषंगाने उल्हासनगर शहरात निश्चित केलेले कोविड रुग्णालयत २४ तास साफसफाई/स्वच्छता निर्जंतूकीकरण (हाऊस किपींग साठी) तीन पाळी मध्ये कुशल कर्मचारी पुरविणेकामी मे. शार्प सर्व्हिसेस, मुंबई यांनी न्युनतम दर सादर केले होते.

मा. स्थायी समिती ठराव क्र. ३८, दिनांक २१/१२/२०२० अन्वये उल्हासनगर शहरात निश्चित केलेले कोरोना (कोव्हिड १९) विषाणूंचा संशयित बाधीत रुग्णांसाठी २४ तास साफसफाई/स्वच्छता निर्जंतूकीकरण (हाऊस किपींग साठी) करणे व इतर संबंधीत कामांसाठी प्रति दिन ८८ कर्मचारी तीन पाळीत पुरवठा करुन घेण्यासाठी येणारा खर्च रुपये ७७,५९,१३६/- (अक्षरी सत्यातर लाख ऐक्योणसाठी हजार एकशे छत्तीस मात्र.) मे. शार्प सर्व्हिसेस, मुंबई यांच्याशी संविदा करण्यास खालील अटी प्रमाणे मान्यता दिली होती.

१) सदर कामाचा कालावधी ३१ मार्च, २०२१ पर्यंत आहे. सदरचे काम अत्यंत तातडीचे असल्याने काम सुरु आहे.
२) सदर कामाचा कालावधी कमी अथवा जास्त करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना असतील.
३) उल्हासनगर शहरात निश्चित केलेले कोव्हिड रुग्णालयात पुरवठा करण्यात येणा-या कर्मचा-यांना संरक्षणार्थ साधने हॅडग्लोज, मास्क, पी पी किट) व निर्जंतूकीकरण द्रव्य इत्यादी महापालिकेकडून पुरवठा करण्यात येतील.

त्यानुसार मे. शार्प सर्व्हिसेस, मुंबई यांच्या कामाचा कार्यादेशाची मुदत दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी संपत असल्याने व सद्या कोरोना विषाणूचा वाढता प्रार्दुभाव पाहता मे. शार्प सर्व्हिसेस, मुंबई यांना मंजुर दराने स्थापन करण्यात आलेल्या कोव्हिड रुग्णालय कक्षात तीन पाळी मध्ये कुशल/सुपरवायझर कर्मचारी (कर्मचा-यांची संख्या आवश्यकतेनूसार कमी/जास्त होवु शकते) पुरविण्याकामी किमान ३ महिने दिनांक ३० जुन, २०२१ (९१ दिवस) पर्यंत कामास मुदत वाढ देण्याचे प्रस्तावित करण्यात येते.

त्याअन्वये किमान ३ महिने दिनांक ३० जुन, २०२१ पर्यंत खालील प्रमाणे तीन पाळीत मागील मंजुर दराने मे. शार्प सर्व्हिसेस, मुंबई यांच्या मार्फत कुशल कर्मचारी पुरवविण्याकमी मुदत वाढ देण्यास मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र. | अलगीकरण कक्ष व कोव्हिड रुग्णालय कक्षाचा तपशील | पाळी मधिल कुशल सफाई कर्मचारी | | | सुपरवायझर | एकूण कुशल कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अ पाळी | ब पाळी | क पाळी | सामान्य पाळी | |
| | | सकाळी ७.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत | दुपारी ०३.०० ते रात्री ११.०० वाजेपर्यंत | रात्री ११.०० ते सकाळी ७.०० वाजेपर्यंत | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत | |
| १ | शासकीय औदयोगिक प्रशिक्षण केंद्र इमारत, (ITI), उल्हासनगर -३ | ३ | ३ | ३ | १ | १० |
| २ | नविन इमारत तहसील कार्यालय जवळ, उल्हासनगर - ५ | ६ | ६ | ६ | १ | १९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | साई प्लेटिनम रुग्णालय, उल्हासनगर - ३ | ८ | ८ | ८ | १ | २५ |
| **एकूण** | | **१७** | **१७** | **१७** | **०३** | **५४** |

उक्त तपशीलानुसार उल्हासनगर शहरात निश्चित केलेले कोव्हिड रुग्णालयात २४ तास साफसफाई/स्वच्छता निर्जतूकीकरण (हाऊस किपींग साठी) तीन पाळी मध्ये मे. शार्प सर्व्हिसेस, मुंबई यांच्या मार्फत कुशल/सुपरवायझर असे प्रति दिन ५४ कर्मचारी पुरवठा करुन घेण्यास (सन २०२०-२०२१ निविदेतील) प्राप्त मंजुर दर रुपये ६५८/- प्रति कर्मचारी या प्रमाणे प्रति दिन रुपये (६५८ X ५४ = ३५,५३२/-) यानुसार किमान ३ महिने दिनांक ३० जुन, २०२१ पर्यंत (९१ दिवस X प्रति दिन रुपये ३५,५३२ = रुपये ३२,३३,४१२/- (बत्तीस लाख तेहत्तीस हजार चारशे बारा मात्र.) इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर बाबत होणारा खर्च हा विपरीत परिस्थिती व्यवस्थापन B-२(३) या लेखाशिर्षातून किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधितून करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

तरी सदरच्या खर्चास तसेच उल्हासनगर शहरात निश्चित केलेले कोविड रुग्णालयत २४ तास साफसफाई/स्वच्छता निर्जंतूकीकरण (हाऊस किपींग साठी) तीन पाळी मध्ये कुशल/सुपरवाझर असे किमान ५४ कुशल कर्मचारी (कर्मचा-यांची संख्या आवश्यकतेनूसार कमी/जास्त होवु शकते) पुरवठा करण्याकरीता (सन २०२०-२१ निविदेतील) प्राप्त मंजुर दराने दिनांक ३० जुन, २०२१ पर्यंत मे. शार्प सर्व्हिसेस, मुंबई यांच्या कामास मुदत वाढ देण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.१ब** **दिनांक : ०७/०७/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात निश्चित केलेले कोविड रुग्णालयत २४ तास साफसफाई/ स्वच्छता निर्जंतूकीकरण (हाऊस किपींग साठी) तीन पाळी मध्ये कुशल/सुपरवाझर असे किमान ५४ कुशल कर्मचारी (कर्मचा-यांची संख्या आवश्यकतेनूसार कमी/जास्त होवु शकते) पुरवठा करण्याकरीता (सन २०२०-२१ निविदेतील) प्राप्त मंजुर दराने दिनांक ३० जुन, २०२१ पर्यंत मे. शार्प सर्व्हिसेस, मुंबई यांच्या कामाचा मुदत वाढ देण्याचा प्रस्ताव कार्यसुचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

**सर्वानुमते**

सभापती / पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**⇨विषय क्र ४:— उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत कॅम्प नं. १ ते ३ मध्ये असलेले विविध बुस्टर पंपिग मशिनरी चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे कामाच्या निविदे बाबत.**

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी-** या ४ नंबरच्या विषयावर पाणी पुरवठा विभागाचे श्री. रहेजा जी, माईक नाही आहे का.

**शाखा अभियंता, श्री. रहेजा:-** कॅम्प नं. १,२,३ मध्ये छोटे छोटे बुस्टर आहेत. त्यांचे एका वर्षाचे मेनटेंनन्सचा खर्च आहे ८७.२९ लाख, १.१ टक्के **बीलो** आहे. एकूण ३६ बुस्टरचा एक वर्षाचा खर्च आहे, पंपचा काही मेटैनन्स खर्च आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधरीया:-** किती बुस्टर बंद आहेत?

**शाखा अभियंता, श्री. रहेजा:-** एकूण ३६ बुस्टर बंद आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** माझ्या प्रभागामध्ये किती बंद आहेत?

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी-** प्रभाग वाईज लीस्ट दया.

**शाखा अभियंता, श्री. रहेजा:-** शिवनेरी नगर, बेला गार्डन, शिरु चौक, भय्यासाहेब नगर, आझादनगर,

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** मी तुम्हाला दोन वर्षापासून सांगत आहे मी नऊ वर्षापासून नगरसेवक आहे..

**शाखा अभियंता, श्री. रहेजा:-** साहेब, यामध्ये नाही आहे. आझाद नगर आहे, रुहानी सत्संग आहे गांधी नगर आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** हनुमान नगर आहे.

**शाखा अभियंता, श्री. रहेजा:-** हनुमान नगर नाही आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** मी पर्सनली बोललो आहे, ते करा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** टेंडर कधी झालेले आहे.

**शाखा अभियंता, श्री. रहेजा:-** हे टेंडर पहिलेच झालेले आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** नाही करायचा पास.

**सदस्य,श्री. स्वप्नील बागुल:-** मा. सभापती महोदय,

**शाखा अभियंता, श्री. रहेजा:-** साहेब, या बददल मी आपल्याशी बोललो होतो.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते समजून आले नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** माझे किती आहेत?

**शाखा अभियंता, श्री. रहेजा:-** तुमचे आता दोन आहेत. नंतरच्या टेंडरमध्ये घेण्यात येतील.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** माझे याच्यामध्ये का घेतले नाही?

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:-** मा. सभापती महोदय, मा. उप महापौरजी यांचे काम होत नाही तर आपण विचार करा शहरातील बाकीच्या नगरसेकांचे परिस्थिती काय असेल? याचा आपण जरा विचार करा. त्यामुळे

या विषयाला पास करण्यात यावे आणि आपल्या उप महापौरांच्या विषयाला प्राधान्यता देवून लवकरात लवकर टेंडर काढण्यात यावा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** कधी टेंडर काढणार?

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:-** उदया टेंडर अपलोड करा आणि आठ दिवसात सात दिवसाची नोटीस काढा, विषय पास इतिवृत्ताची वाट न पाहता.

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** पास...पास..

**महापालिका सचिव:-** उरलेली कामे सात दिवसाची नोटीस देवून करण्यात यावी, पास..

**सदस्य,श्री. स्वप्नील बागुल:-** मा. सभापती महोदय, आपल्या दालनात तूम्ही सदस्यांना बसवून मिटींग घेतात. आम्हाला इथे काहीच कळत नाही रहेजा साहेब काय बोलताहेत काय चर्चा होत आहे, ठराविक सदस्यांना फक्त तुमच्या दालनामध्ये प्रवेश आहे का? असे काही आहे का ॲप व्दारे मिटींग चालू आहे.

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** स्वप्नीलजी, आज सर्व सदस्याचे ज्या ऐरियामध्ये वायफाय चालत आहे त्या ऐरियामध्ये मी फक्त त्यांना परवानगी दिली आहे. आपण येवू शकता. त्यांचा नेटवर्क च्या अडचणीमुळे वायफाय नसल्यामुळे अडचण आहे, त्यामुळे इथे बसले आहेत.

**सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-** रहेजा साहेबांची आणि कोणाची चर्चा चालू होती आम्हाला त्या चर्चेतून काहीच कळालेले नाही.

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** रहेजाजी स्वप्नीलजी आपल्या बरोबर बोलू इच्छित आहेत.

**शाखा अभियंता, श्री. रहेजा:-** आपले बुस्टरचे टेंडर आहे, उल्हासनगर १,२,३ मध्ये एकूण ३६ बुस्टर आहेत. टेंडर८७.२९ लाख, १.१ टक्के बीलो आहे. छोटे छोटे बुस्टर आहेत त्यांचे मेंन्टेनन्स वैगेरे रिपेरचे काम केले जाणार आहे.

**सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-** रहेजाजी ठिक आहे, ठिक आहे.

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** पास..पास..

**महापालिका सचिव:-** या ठरावात इतिवृत्ताची वाट न पाहता आणि उरलेल्या कामासाठी टेंडर मागविण्यास सात दिवसाची नोटीस देवून काम पुर्ण करणेस प्रशासनास असे लिहीत आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** काय आहे विषय?

**सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-** पास..पास..

**शाखा अभियंता, श्री. रहेजा:-** बुस्टरचाच आहे.

**महापालिका सचिव:-** तो पास झाला आहे.

**काही सदस्य:-** पास.. पास....

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .

☑ **विषय क्र. ४ :— उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत कॅम्प नं. १ ते ३ मध्ये असलेले विविध बुस्टर पंपिग मशिनरी चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे कामाच्या निविदे बाबत.**

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर शहरासाठी महानगरपालिकेच्या अंतर्गत कॅम्प नं. १ ते ३ मध्ये असलेले विविध बुस्टर पंपिग मशिनरी चालविणे व देखभाल दुरुस्ती करणेच्या कामासाठी पाणी पुरवठा विभागातर्फे सदर कामाचे रु.८७,२९,१२१/- एवढ्या खर्चाचे प्राकलण तयार करुन सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्यात आली आहे. मा. आयुक्त सो., यांचे मान्यतेने जनसंपर्क अधिकारी यांना दिनांक २४/११/२०२० रोजीच्या सकाळ, मिड-डे, व धनुषधारी या वृत्तपत्रामध्ये जाहिरात देवून ई निविदा मागविण्यात आली होती. सदर ई निविदेच्या तांत्रिक बाबींचा लिफाफा दिनांक ०४/१२/२०२० रोजी उघडण्यात आला. कागदपत्रांची छाननी केली असता तीनही निविदाकार तांत्रिकदृष्टया पात्र आहेत. त्यामुळे लिफाफा क्र.०२ (आर्थिक भाग दर) उघडण्यासाठी निविदा समिती सदस्यांची मान्यता घेणेसाठी सादर करणेत आले होते. या समितीची मान्यता घेतल्यानंतर दिनांक २३/१२/२०२० रोजी ठेकेदार / प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत लिफाफा क्र.०२ (आर्थिक भाग दर) उघडण्यात आला. त्याप्रमाणे तीन पात्र निविदा धारकांनी भरलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | प्राकलनीय किंमत | सादर केलेला दर | एकुण रक्क्म | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. हर्षल टेकनिक्स, नाशिक | | १५.००० टक्के जादा दराने | रु.१००३८४८९.१५० | III |
| २ | मे. कल्पतरु इंजिनियर्स अॅन्ड कॉन्ट्रक्टर प्रा.ली., उल्हासनगर | | १.१०० टक्के कमी दराने | रु. ८६३३१००.६६९ | I |
| ३ | मे.कामधेनु इंटरप्रायझेस, बदलापुर | | १४.००० टक्के जादा दराने | रु.९९५११९७.९४० | II |

वरील ०३ निविदाधारकापैकी मे. कल्पतरु इंजिनियर्स अॅन्ड कॉन्ट्रक्टर प्रा.ली., उल्हासनगर यांचे निविदेचे दर अंदाजित किंमतीच्या दरापेक्षा १.१०० टक्के कमी दराने आहेत. त्यानुसार या कामाची एकुण किंमत रु.८६३३१००.६६९ एवढी येते, सदर दर इतर एजन्सीपेक्षा तुलनात्मकरित्या न्युनतम व कमी असल्याने, वाजवी वाटतात. मे. कल्पतरु इंजिनियर्स अॅन्ड कॉन्ट्रक्टर प्रा.ली., उल्हासनगर यांनी सादर केलेल्या न्युनतम निविदेची किंमत रु.२५.०० लाखापेक्षा जास्त असल्याने आर्थिक मंजुरीसह त्यांच्याशी करारनामा करुन कार्यादेश देण्यासाठी वित्तीय मान्यता घेणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने गोषवारा तयार करण्यात आला असुन, मान्यतेसाठी शिफारस करण्यात येत आहे. सदर प्रस्तावास मा. स्थायी समितीची आर्थिक मंजुरी मिळणेसाठी मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करणेत येत आहे.

**<u>स्थायी समिती ठराव क्र.०२</u>** **<u>दिनांक : ७/०७/२०२१</u>**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत कॅम्प नं. १ ते ३ मध्ये असलेले विविध बुस्टर पंपिग मशिनरी चालविणे व देखभाल दुरुस्ती करण्याच्या कामास मे. कल्पतरु इंजिनियर्स अॅन्ड कॉन्ट्रक्टर प्रा.ली., उल्हासनगर यांच्याशी प्राप्त न्युनतम दर निविदेची कामाची एकुण किंमत रु.८६३३१००.६६९ या दरास मान्यता देत आहे. तसेच उर्वरीत कामांसाठी ७ दिवसांची अल्प कालावधीची नोटीस देवून निविदा मागविण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

**<u>सर्वानुमते</u>**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव:-</u>** विषय क्रमांक ५ वाचून दाखवितात.

---

**⇨विषय क्र ५:– ट्राफिक वार्डन यांना मुदतवाढ व अर्थसहाय्य् निधीस मंजुरी मिळणेबाबत.**

---

**<u>सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:-</u>** या विषयाची माहिती देणारे अधिकरी कोण आहेत, त्यांना बोलवा जरा.

**<u>स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** ट्राफिक वार्डन च्या विषयामध्ये जर सन्मानीय सदस्य कोणाला बोलायचे आहे जर त्यांच्या ऐरियामध्ये आपल्या महानगरपालिकेच्या मार्फत ट्राफिकची समस्या असेल तर सन्मानीय सदस्य श्री. धरणे जी ट्राफिक विभागातून आले आहेत.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. सभापती महोदय, हे जे ४१ ट्राफिक वार्डन ठेवले होते ज्याची मुदत दि. ०६/०२/२०२१ रोजी पूर्ण झालेली आहे आणि आज तारीख आहे दिनांक ७/७/२०२१ हा विषय लवकर यायला पाहीजे होता. परंतु हे ५ ते ६ महीने उशिरा आला आहे. म्हणजे दिनांक ६/२/२०२१ पासून वार्डन नव्हते. असे समजण्यात येईल, माझी अशा सुचना आहेत की जर मुदत वाढ दयायची असेल तर आज दि. ७/७/२०२१ पासून दि. ७/७/२०२२ पर्यंत देण्यात यावे. कारण की, दिनांक ६/२/२०२१ ला मुदत संपत आहे त्या आगोदर मुदत वाढीसाठी आणायला पाहिजे होते. याबाबत ब-याच वेळा आपणांस वांरवार सांगण्यात आले आहे आणि जर ६/२ ला आणले आहे तर कधी पर्यंत चे आहे याबाबत काही चर्चा नाही आहे, गोष्टीची दि. ०६/०२/२०२१ मुदत संपलेली आहे.

**<u>प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत संगळे:-</u>** यामध्ये आपल्याला ट्राफिक वार्डन संदर्भात प्रस्तावित केले होते, मा. महापौरांनी, मा. उप महापौरांनी पत्र दिले होते. या लोकांना तिथून कमी केले होते....

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** असे कोण बोलले होते, मला माहीत नाही.

या वेळी काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते समजून आले नाही.

**<u>सदस्या, श्रीम. कंचन अमर लुंड:-</u>** मा. सभापतीजी,..

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. सभापतीजी, जो टेंडर संपणार आहे, तो पहीलेच का आला नाही. याला मुदतवाढ दयायची होती तर मुदतवाढीच्या पहीलेच पंधरा दिवस आणायला पाहीजे होता. असा करा हा विषय डिफर करा आणि एक वर्षे तुमच्या मनाने करा.

**<u>प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत संगळे:-</u>** दिनांक २३ जानेवारीला फाईल पुटअप करण्यात आली होती, मा. आयुक्त साहेबांनी त्या वेळी आदेश दिले होते की, सदरचा जो चेंबू आहे, त्या चेंबुचा मासिक अहवाल पोलिस खात्यातून मागविण्यात यावा आणि त्या नंतर डी.सी.पी. ची मिटींग मला लावण्यासाठी सांगितले होते आणि त्या ४ माचर्ला सरानी आदेश दिल्यानुसार प्रभाग समिती सहा. आयुक्त, पोलिस निरीक्षक, डि.सी.ी यांची मिटींग लावण्यात आली. त्या वेळी सांगण्यात आले की ठिक आहे मुदत मागवून घ्या.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** तुम्हांला जर सांगायचे असेल तर आयुक्तांकडून मुदतवाढ घ्या. स्थायी समिती त्याला जबाबदार नाही. आयुक्तांनी असे बोलले, महापौरांनी असे सांगितले, उप महापोरांनी असेल

सांगिले आणि दिनांक ०६/०२/२०२१ रोजी मुदत वाढ दयायला पाहीजे. आम्ही प्रत्येक वेळीअधिका-यांना सांगितल्या नंतरही मुदत संपल्या नंतरही वाढीसाठी विषय घेऊन येतात. आता उशिर झाला आहे तर त्यांना पगार दिला आहे का?

**प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत संगळे:-** नाही सर.

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** एप्रिल, मे मध्ये यायला पाहीजे होता.

**प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत संगळे:-** एप्रिलमध्ये प्रपोजल सादर केला होता.

**सदस्या, श्रीम. कंचन लुंड:-** सभापतीजी मला दोन मिनीटे बोलण्यासाठी देण्यात यावे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** ३१ मार्चला स्थायी समिती सभापतींनी मिटींग घेतली होती, शेवटची सभा होती, ३१ मार्चला, हा विषय कधीच दिनांक ०६/०२/२०२१ संपुष्टांत आला आहे आणि आपण आणायला पाहीजे होता जानेवारीमध्ये आणि आपण आता आणत आहेत जुलै महीन्यामध्ये जर आम्ही करणारच नाही तर काय करणार? तुम्हांला माहीती आहे की, आम्ही मुदतवाढ देवू शकतो, त्यामुळे तुम्ही उशिर करीत आहेत. आज तीन महीने झाले आहेत, त्यांना पगार कोण देणार?

**प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत संगळे:-** सर मी मुदतीतच सादर केला होता.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** ठिक आहे, आमचा विरोध आहे.

**वरिष्ठ पोलिस निरीक्षक, श्री. श्रीकांत धरणे:-** माझे असे निवेदन आहे की, आम्ही याच्या पहील्या मिटींगमध्ये घेण्यासाठी बोललो पण होता, परंतु टेक्नीकल प्रॉब्लेम कोईड-१९ च्या मुळे थोडी अडचण आली, त्यामुळे....

**सदस्या, श्री. कंचन लुंड:-** सभापतीजी मला बोलून दिले जाणार आहे की नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** १५ मार्च पासून संपुर्ण बाजार बंद होते, प्रत्येक मार्केट बंद होते, त्या वेळी रोड ओस पडले होते, तेव्हा ट्राफिक वार्डनची काय गरज आहे? तुम्ही फेब्रुवारी नंतर ट्राफिक वार्डन काढून टाकयला पाहीजे होते. एक वर्षासाठी ट्राफिक वार्डनची काय गरज होती, रोड बंद आहेत, बाजार बंद आहे. जर तुम्हांला मुदतवाढ मिळाली नाही तर ४ महीने काढून टाकायला पाहीजे होते. मी राटींगमध्ये आयुक्तांना पत्र लिहीले होते, ट्राफिक बंद आहे, संपुर्ण शहर लॉकडाऊन आहे, ट्राफिक वार्डनचीआवश्यकता नाही, त्यांना कोईड सेंटरमध्ये पाठविण्यात यावे. हे ६ फेब्रुवारी पहीलेच झाले आहे. परंतु असे काहीच झाले नाही, परंतु आज ५ महीन्या नंतर हा विषय आला आहे. ३१ मार्च पर्यंत स्थायी समितीचे सभापती होते, तो पर्यंत आला नाही. माझ्या म्हणण्यानुसार फेब्रुवारीच्या पहीलेच झाले पाहीजे. ठिक आहे ६ मार्च, त्यां नंतर ३१ मार्च पर्यंत आला नाही. तर आज ५ महीन्या नंतर विषय आला आहे, मला वाटते की, आपण तीन वर्षासाठी घेऊन या, परत परत आणण्यासाठी उशिर होत आहे, पाच पाच महीने, पहीले तीन हजार केले होते, आता ६ हजार केले आहे. आता लक्ष दया, काय होत आहे आणि काय नाही, सर्व लक्षात घ्या.

**सदस्या, श्रीम. कंचन लुंड:-** हे जे वार्डन आहेत हे फक्त लोकांना त्रास देण्याचे काम करतात आणि वसुली करतात त्यामुळे यांना का घेण्यात यावे, यांची मुदतवाढ देण्यात येवू नये व  हे रदद करण्यात यावे. ड्रायव्हिंग लायसन्स तपासणे, पेपर्स मागतात(तपासतात) हयांचे काम काय हे जरा सांगण्यात यावे ट्राफिक नियंत्रित करणे हे काम आहे की, कागपत्रे तपासणे हे आहे, याची माहिती देण्यात यावी.

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी**- श्री.धरणेजी, आपले नेमून दिलेले काम न करता ड्रायव्हिंग लायसन्स तपासणे, पेपर्स मागणे तपासणे त्यामुळे शहरातील लोकांना जाणूनबूजून त्रास देत आहेत.

**वरिष्ठ पोलिस निरीक्षक, श्री. श्रीकांत धरणे:-** वार्डन लोकांना आम्ही यांबाबात वांवार समज देण्यात आलेली आहे. ज्यांनी तक्रार आलेली आहे त्यांना आम्ही काढून टाकण्यात आले आहे. सगळेच जण असे काही करत नाही. परंतु एखादा दुसरा जो असतो त्यांना आम्ही काढून टाकतो. आणि काढलेले आहेत. आपल्याला जर काही यांबाबतीत अडचण आली तर संपर्क करु शकता. तसेच जो कोणी असे कृत्य करेल त्याला काढून टाकण्यात येईल.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** मा. सभपती महोदय, उपस्थित सर्व सन्मानीय सदस्य, हा विषय आम्ही पहिल्यांदा सादर केला आहे तो १३ डिसेंबरला मान्यतेूसाठी गोषवारा सादर करणेसाठी ची प्रक्रिया सुरु झाली. त्यानंतर पुढे विषय असा आले की, टेंडर करावे, आपणच टेंडरींग करुन हे वार्डनचे पेमेंट करावे. असे प्रपोजल चर्चेसाठी आले त्यानुसार पुढे चर्चा सुरु झाली. यांनंतर टेंडर जर केले तर आपल्याला किमान वेतन कायदा , त्यांना आपल्याला वेतन देणे भाग पडेल असते आणि त्यानुसार आपल्यावर आर्थिक भार खुप मोठया प्रमाणावर येत होता. आता जे आपण ६ हजार रुपये देत आहे, ठोक वेतनावर. ते जर निदा काढली असती तर किमान वेतन नुसार त्यांना पैसे दयावे लागले असते. किमान वेतन नुसार कमीत कमी १५ ते २० हजार रुपये प्रत्येकास देणे इतका भार आपलयावर येत होता आणि तो भार आपल्याला उचलणे, आपली जी आर्थिक सोर्सजेस जो आहे त्यानुसार शक्य होत नाही. असे आयुक्त साहेबांच्या ठरावात वेगवेगळया वेळी चर्चा करुन बैठका होवून अंतिमत: याच्यावर निर्णय झाला तो १३ मार्च २०२१ रोजी असे ठरले की याचा आर्थिक भार आपल्यावर खुप येणार आहे आणि आपल्याला आर्थिक भार उचलणे शक्य होणार नाही. त्यामुळे जी प्रक्रिया आहेत त्याच प्रक्रियेने आपण हे परत कार्यरत ठेवावे आणि त्यानंतर मग आम्ही हया बाबातचा साहेबांनी गोषवारा तयार करुन स्थायी समिती सादर करण्याचे निर्देश दिले त्यानंतर आपल्याला माहित होत की, ३१ मार्च पर्यंत स्टँडीग होते. त्यानंतर आपले स्टँडीग नव्हेते त्यांनंतर आम्ही गोषवारा तातडीने स्थायी समितीला मान्यतेसाठी सादर केला आणि आज आपली पहिलीच मिटींग होत आहे आपण अध्यक्ष होता. असे काही आमचे जाणीवपूर्वक केलेले नाही आहे. आपला काही अवमान करणे स्थायी समितीचा आमचा काही उददेश नव्हता. आमची स्पष्ट भूमिका होती त्यानुसार आम्ही जेवढे जलद करता येईल तेवढे करुन आपल्या समोर हा विषय आणलेला आहे आपण या बाबत आम्ही खुलासा सादर केला त्याबाबत सहानुभुतीपूर्वक विचार करुन मान्यता दयावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

**सदस्य, श्री. राजेश वधरीया:-** मा. सभापती महोदय, आम्ही जे ट्रॅफीक वार्डन ट्रॅफीक पोलिसांसोबत काम करण्यासाठी दिले आहेत, ते शहरातील ट्रॅफीक समस्याना जाणून घेवून त्या ट्रॅफीक समस्यांना सुव्यावस्थित पध्दतीने ट्रॅफीक चालविण्यासाठी दिलेले आहेत. काही ठिकाणी पाहता असे निर्दशनात आले आहे की, त्यांचे लक्ष हे ट्रॅफीक नियंत्रित करण्यात राहत नाही. जसे की सदस्या श्रीम. कंचन लुंड जी यानी समस्या सांगितली आहे. हा मुददा बरोबर आहे. हे जे वार्डन आहेत ते अनियंत्रित पध्दतीने वसुलीमध्ये लागत असतात. ट्रॅफीक विभागाकडून आम्ही अशी आशा करतो की, आपल्या असे काही प्रकार लक्षात आल्यास अशा वार्डनला त्वरीत काढून टाकण्यात यावे. दुसरी गोष्ट अडचणी वाढत जात आहेत. जसे की फर्निचर बाजारामध्ये एक कलवर्ट चे काम चालू आहे. ज्यामुळे इगल हॉटेल बाहेरील चौक प्रत्येक वेळी जॅम राहत आहे. आज आपल्याकडे ४५ वार्डन असून त्या ठिकाणी एक किंवा दोन वार्डन असतात. हया चौकाला सुव्यवस्थीत करण्यासाठी त्याठिकाणी कमीत कमी ४ ट्रॅफीक वार्डन आणि दोन ट्रॅफीक कॉस्टेबल असणे अतिआवश्यक आहे. त्याच्यामुळे शिवाजी चौक, सेंट्रल हॉस्पीटल, फर्निचर बाझार, आणि या ठिकाणी सपना गार्डन या संपूर्ण परिसरावरती फरक पडत आहे. वाहतूक विभागाने मोबाईल बाजारामध्ये जे डिव्हायडर लावलेले आहेत.ते खुप प्रसंशनीय आहेत. ही एक चांगली संकल्पना त्यांनी घेतली आणि डिव्हाडर लावले. ज्याठिकाणी पहिले भरपूर ट्रॅफीक होत होती. परंतु डिव्हाडर लावल्यानंतर आता तिथे जास्त वाहतुक कोंडी होत नाही. तर आम्ही वाहतुक विभागाकडून अशी अशा करतो की, अशा ज्या ज्या जागा आहे आहेत तिथे ट्रॅफीक जाम होत असते, त्या

ठिकाणी अशाच प्रकारे नियोजन करण्यात यावे. जसे आपण त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात डिव्हाडर लावलेले आहेत. जे तिथे कायम स्वरुपी त्या ठिकाणी लावायला पाहिजेत. जसे नेहरु चौकापासून गोल मदान येथे डिव्हायडर लावल्यामुळे वाहतुक कोंडीची समस्या कमी झाली आहे. दुस-या काही अशा जागा आहेत ज्या ठिकणी लक्ष देणे खुप गरजेचे आहे. यासाठी आपणांस विनंती आहे की, अनाधिकृत पार्किंग आणि नो एन्ट्री आणि खास करुन डिव्हाडर लावल्यानंतर जे चुकीच्या बाजूने ट्रॅफीक येत असते त्याच्यांवरती सुध्दा कडक कारवाई करण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>** मा. सभापती जी,

**<u>सदस्या, श्रीम. कंचन लुंड:-</u>** मा. सभापती जी, ट्रॅफीक वार्डन वाले २५ सेक्शन येथे आणि नेताजी चौक येथे कधीही राहत नसून ते मागच्या बाजुच्या रोडवरती उभे राहत असतात आणि हे आटीओवाल्यांबरोबर मिळून लोकांकडून पेसे घेत असतात. यांच्यावरती सुध्दा नियंत्रण ठेवण्यात यावे.

**<u>सदस्या, श्रीम. कंचन लुंड:-</u>** पेट्रोल पंपाच्या मागे पण उभे असतात.

**<u>सदस्य, श्री.राजू जग्यासी:-</u>** मा. सभापती जी, आपली अनुमती ने तर मला काही बोलायचे आहे.

**<u>स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** बोला,

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>** मा. सभापती जी, जसे की श्री. धरणे साहेब सुध्दा या ठिकाणी उपस्थित आहेत. पहिले तर मी धरणे साहेबांचे अभिंनंदन करतो की ज्या ज्या वेळेस आम्ही त्यांना कॉल केलाआहे आणि सहयोग मागिला आहे त्यावेळेस त्यांनी सहयोग दिला आहे. असे काही दोन ठिकाणे आहे तिथे त्यांचे मी विशेष लक्षात आणून देऊ इच्छितो , सगळयात पहिला पॉईट आहे भगत कंवाराम चौक, या ठिकाणी श्री. घरणे साहेबांनी स्व्त: भेट देऊन त्या ठिकाणी जी पार्किंग होत होती ती हटविण्यात आली होती. परंतु कोरोना काळा मध्ये परत त्या ठिकणी चौकाच्या सभोवताली गाडया उभ्या करणे चालू झालेले आहे. त्यामुळे श्री. धरणे साहेबाकडे माझी विनंती आहे की , एका वार्डन ने कमीत कमी दिवसातून एक किंवा दोन वेळा त्या ठिकाणी जावून त्या ठिकाणी अनधिकृत गाडया उभ्या असतात त्या हटविण्यात याव्यात या गोष्टीची नोंद करण्यात यावी. दुसरी प्रमुख पॉईट शिवाजी चौक पासून स्टेशन पर्यंत तिथे टु व्हिलरच्याच इन्द्रीसाठी बोर्ड लावला आहे. आपण शिवाजी चौक ते स्टेशनच्या दिशेने जाणार तर टू व्हिलरच्या सोबत तीन चाकी पण तेथून जाणे—येणे चालू करतात. तर कारण काय होतो की, दोन्ही बाजूने ऑटो स्टॅन्ड आहे. जर एक रिक्षा तेथून जाणार असेल आणि समोरून जर एक कार आली तर तेथे एक जाळे तयार होते खुप मोठी समस्या बनत आहे. तिथे गीता हॉटेल आहे. तर त्या जागेवर कसे पण करुन फक्त टु व्हिलरलाच एन्ट्री राहीली पाहीजे. तेथे असे आदेश दिले जावे, ऑटो ला महाराजा हॉलच्या बाजूने जाईल. तर तो रोड मोकळा होईल. तर माझी धरणे साहेबांना विनंती आहे त्यांनी लक्ष ठेवावे व पुढे याचे समाधान होईल असे करावे, धन्यवाद.

**<u>स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:—</u>** १७ सेक्शनचा मोबाईल बाजाराचा वन वे जो आमचा प्रस्ताव आहे. सन्माननिय सदस्यांचे ऑब्जेक्शन आहे की, कवाराम पुतळयापासुन ते १७ सेक्शन पर्यंत गाडया आहेत. पेट्रोल पंप पासून गाडी येत असतात.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव :—</u>** वॉर्डनच्या बददल आमच्या सर्व सदस्यांचे अनुभव जो तुमच्या पुढे सांगितले. खरोखर उल्हासनगर शहरातील वाहतुक समस्यांबाबत आपले वॉर्डन काहीच काम करत नाही. ट्रॅफिक पोलीस प्रत्येक हवालदार बॉडीगार म्हणून तुमचे

वापरतात, ते बंद करा आणि जिथे आवश्यक आहे तिथे तुमचे वॉर्डन वापरा जिथे आवश्यकता नाही दुसरीकडे तुम्ही समस्यांसाठी पाठवा. त्यांना काय वाटते माहित आहे का. आम्ही बाकीचे सोडून दया. आमचे अधिकारी येत असतील आमच्या अधिका—यांनाही अनुभव येत असतील आमचा पण अनुभव आहे. तुमचे वॉर्डन आमच्या जरी गाडया आल्या तरी खुर्चीवरुन उठत नाहीत. कुठल्याही प्रकारचे त्यांना हे माहित नाही की पगार महानगरपालिका देते. ते वॉर्डन त्यांच्याच मस्तीत असतात आणि असा अनुभव येतो की, कुठे त्यांना समजत नाही आता ठिक आहे. कल्याणच्या येथून येणा:या मला वाटते अतिरिक्त आयुक्त पण तिथून येत असतील त्यांना पण त्यांचा अनुभव येत असतील. तुम्ही पण येत असतील तुम्हांला अनुभव येत असतील. त्यांना हे माहित नाही महानगरपालिकेचे आयुक्त कोण उपआयुक्त कोण आहेत त्यांना त्याची जाणीव करुन दया. काय झाले आहे माहित आहे का परिस्थिती? फक्त त्यांना एकच गोष्ट कळते की ट्रॅफिक चे हवालदार असतील महानगरपालिकेचे पदाधिकारी असतील जे आमचे अधिकारी असतील त्या लोकांशी कमीत कमी जास्त काही नाही आम्ही त्यांना मानधन देतो. आमची अपेक्षा आहे कमीत कमी त्यांनी तुम्ही उभे राहिले पाहिजे तेव्हाच आम्हांला इज्जत मिळेल असा त्याचा अर्थ नाही. पण कमीत कमी त्या वेळेत काही ज्या वाईट गोष्टी आहेत त्या थांबविल्या पाहिजेत. याची त्यांना समज दया. दुसरी गोष्ट अशी आम्हांला कोणाचे हे थांबविण्यासाठी जरी आमचे जमनु पुरस्वानी असतील त्यांच्या मनातील राग अगदी जनतेतला आहे. स्थायी समितीत बरेच वेळा सांगितले आहे महानगरपालिकेच्या समोर मोटार सायकल लावतात. तुम्ही आता जा तुम्ही अधिकारी आहेत म्हणून तुम्हांला सांगतो तुम्ही जावून दाखवा मला गाडी घेवून मोटार सायकली रस्त्यावर येतात. जायला रस्ता नसतो. अमन टॉकीजला काय परिस्थिती आहे. तिथे तुम्ही ॲक्शन घेत नाही. कशासाठी ॲक्शन आहे हे सगळे थांबले पाहिजे. त्यासाठी आमचे नगरसेवक आहेत स्थायी समितीचे त्यांच्या भावना तुमच्यापर्यंत पोहचवणे यात जर बदल नाही झाले तर पुढे तुम्ही अपेक्षा करु नका. आमच्याकडून वाढीव तुम्हांला मिळतील. त्यामुळे हा मुदतवाढ तुम्हांला दयायला तयार आहोत. याच्यापुढे याच्यात बदल झाला नाही तर होणार नाही.

**उप आयुक्त, श्री. अशोक नाईकवाडे :—** सन्माननिय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्याबददल प्रशासनाच्या वतीने वाहतुक विभागाला सक्त सुचना देवू आणि मला वाटते मी पण त्या डोंबिवली वरून येताना दोन वेळा दोन वेळा या आपल्या वाहतुक विभागाने माझी गाडी अडवून मला जवळपास ५ ते १० मिनिट थांबवून तुमच्या गाडीवर फाईन चेक करणार. माझे गाडीवर उप आयुक्त, मुख्यालय बोर्ड आहे. महाराष्ट्र शासनाचा बोर्ड आहे. तरी दोन वेळा गाडी अडवली गेली आहे. माझी सुध्दा भावना आपल्यावतीने कळवतो. आणि आमच्या अधिका—यांच्या गाडया अडवल्या जाणार नाहीत. आमच्या कुठल्याही सन्माननीय सदस्यांच्या गाडया अडवल्या जाणार नाहीत याची सक्त दखल त्यांनी घ्यावी. अशी मी आपल्या महापालिकेच्यावतीने त्यांना विनंती करतो आणि यापुढे दर तीन महिन्यांनी मी स्वत: या वाहतूक विभाग माझयाकडेच आहे दर तीन महिन्यांनी याबाबतचा आढावा घेईन. आपल्या सदस्यांनी जर कोणाच्या सुचना असतील तर वाहन विभागाला देण्यात याव्या. त्या सुचना त्यांच्या निदर्शनास आणून यापुढे जास्तीत जास्त कसे सुधारणा आणता येतील याबददल आपण कार्य करु या आणि या ठरावाला मान्यता दयावी अशी मी विनंती करतो.

**सदस्य, श्री.जमनुदास पुरस्वानी:—** मा. अध्यक्ष महोदय, आमचा कोणत्या विषयाला विरोध नसतो. विरोध आहे विषय वेळेत न आणण्याला. जर हा विषय पास नाही झाला. तर ते

५ महिने आमचे कथित वॉर्डन विना पगार काम करणार. हे त्यांच्यासाठी पण त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था कशी होणार. एका अधिका—याच्या चुकीमुळे असे नाही झाले पाहिजे. फक्त हाच विषय नाही, दुसरे पण जे टेंडर आहे. दुसरे पण जे मुदतवाढ आहेत. त्यांना पण वेळेत आणले पाहिजे. माझा विरोध वेळेत न आणण्यावर आहे. त्यांना न ठेवण्यावर नाही. यासाठी सर्व संमतीने पास करु या. परंतु याच्यापुढे ही सर्व विभाग प्रमुख उपस्थित आहेत याच्या नंतर कधी पण कोणता पण विषय असो, कोणत्याही विभागाचा असो तो वेळेवर यायला पाहीजे.

**उप आयुक्त, श्री. अशोक नाईकवाडे:—**याची दक्षता घेतली जाईल.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** मा. सभापती जी, यात आधीच आमचा ग्रुप बनला आहे. तर त्या ग्रुपमध्ये पहिले जे पण ट्रॅफीक वॉर्डन जसे त्यांचे चार्ट बनतात तो चार्ट पहिले ग्रुपवर येत होता की उदया कोणत्या वॉर्डनची डयुटी कुठे आहे. दर दिवसाचे पण होत होते आणि आठवडयाचे पण होत होते. कधी कधी आठवडयाचे पण येतात. सर्वाना माहित होते की कोणते वार्डन उद्या कुठे आहेत याने काय होईल. ग्रुप तर बनलेलाच आहे पण आमचे दुसरे जे स्थायी समितीचे नविन सदस्य आहेत त्यांचा त्या ग्रुपमध्ये समावेश करून आणि धरणेजी आपण कोणत्या ट्रॅफीक वॉर्डन ची डयुटी कोठे आहे तो चार्ट बनवून ग्रुपच्या माध्यमातून पाठवा.

**वरिष्ठ पोलिस निरीक्षक, श्री. श्रीकांत धरणे:—** मा. सभापतीजी, आणि मा. सदस्य आपण ज्या सुचना केलेल्या आहेत. निश्चितच त्यात काही वॉर्डन करुन काही चुका झालेल्या असतील. त्यात वेळोवेळी आम्ही त्यांच्यावर कारवाई करत होतो. परंतु आपण ज्या सुचना केलेल्या आहेत त्याचा परंतु जास्तीत जास्त चांगल्या पध्दतीने बददल ट्रॅफिक विभागाकडून केले जातील, आपल्या सर्वांचे आभार आणि धन्यवाद.

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:—** मी इथे बोलू इच्छितो की, ट्रॅफिक वॉर्डन आम्ही ३—४ वर्षापासुन जे दिले आहेत. ते आम्ही आमच्या जनतेसाठी दिले आहे. केवळ आपल्या अधिका—यांच्या सुविधेसाठी. जा`पण आपण डिक्लीयर करणार त्या स्पॉट वर येथे आम्ही १६ सदस्य आहोत. आम्हांलाच माहित नसते माझे एरियामध्ये कोण आहे जसे महाराजा हॉल आहे, शिवाजी चौक, साईबाबा चौकात काय गरज आहे वॉर्डनची. अंबरनाथमध्ये राधास्वामी हॉल पण गरज आहे आपले मी पहीले बघतिले आहे ट्रॅफिक विभागामध्ये सी. एच. एम. कॉलेज आपण विसरले. ४ नंबरच्या बाजूला रेल्वे स्टेशन विसरले तेथे ट्रॅफिक असते. आपण मायक्रो प्लॅनिंग करा. सर्वाना घेवून चला सोबत. जिथे तुम्ही चुकत आहात तेथे आम्ही सांगू. आपण आम्हांला कन्व्हेंस करुन आपले काम करा. हे आम्ही पास करत आहोत. परंतु नंतरच्या वेळेस जे राहिल एक वर्षासाठी कोणताही विभाग असो ७ दिवस पहिले त्याचा प्रस्ताव आमच्याजवळ आला पाहिजे. ७ दिवस आधी किंवा ६ महिन्यासाठी आहे तर एक महिने पहिले. जसे प्रत्येक सन्माननीय सदस्य जमनुजी आम्ही पास करत आहोत. पण प्रत्येक सदस्यांचे जे जे पॉईट आहेत ते आपण बघा.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:—** इतिवृत्ताची वाट न पाहता.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** इतिवृत्ताची वाट न पहाता, यांना पगार मिळाला नाही, त्यांना लवकरात लवकर पगार मिळायला पाहीजे.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:—** धन्यवाद.

**<u>महापालिका सचिवः—</u>** एक मिनिट यामध्ये मुदत अशी दिली आहे की, दिनांक ६/०२/२०२१ ते ५/०२/२०२२ पर्यंत एक वर्षासाठी.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारियाः—</u>** बरोबर आहे.

**<u>सदस्य, श्री.जमनुदास पुरस्वानीः—</u>** प्रस्ताव वेळेवर आणण्यात यावा आणि लेखा विभागाने पण त्यांना लवकरात लवकर पगार देण्यात यावा, ५ महिन्याचा पगार दिला नाही.

**<u>महापालिका सचिवः—</u>** ठिक आहे, पास...

**<u>सदस्य, श्री.जमनुदास पुरस्वानीः—</u>** तो पर्यंत यांना ॲडव्हान्स रक्कम दया. यांना पहील्या महीन्याचा पगार वेळेवर देण्यात यावा, पास..

**<u>महापालिका सचिवः—</u>** पास..पास.

**<u>काही सदस्यः-</u>** पास.. पास....

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानीः-</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .

---

☑ **विषय क्र. ५ :— ट्राफिक वार्डन यांना मुदतवाढ व अर्थसहाय्य् निधीस मंजुरी मिळणेबाबत.**

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त् संदर्भिय विषयान्वये उल्हासनगर शहरातील वाहतुक कोंडीच्या समस्या दुर करणेकामी वाहतुक पोलीस यांचे मदतीकरीता नियुक्त् करण्यात आलेले एकुण ४५ ट्राफिक वार्डन यांची मुदत संपुष्ठात येत असल्यामुळे त्यांना मुदतवाढ व किमान वेतनानुसार रु.६०००/- मानधनावर नियुक्त करणेबाबत सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुर करणेत आलेला आहे.

सध्या उल्हासनगर शहरातील कल्याण अंबरनाथ् रोड रुदीकरण तसेच महत्वाच्या चौकात, सण उत्सवामध्ये वाहतुक पोलीस अंमलदारासोबत वाहतुक नियमाना करीता ट्राफिक वॉर्डन यांची मोठया प्रमाणात मदत होत असुन उल्हासनगर शहरात या पुर्वी होणाया वाहतुक कोंडीच्या तुलनेने सध्याची वाहतुक कोंडी ही ट्राफिक वार्डन यांचे मदतीने सुरळीत करण्यात येते.

तसेच शहर वाहतुक उपविभाग उल्हासनगर येथे उपलब्ध् असलेले मनुष्यबळ हे आपुरे असल्याने ट्राफिक वॉर्डन याची मोठया प्रमाणात वाहतुक नियमनाकरीता मदत होत आहे. ज्या प्रमाणात सामान्या नागरीकांना वाहतुक कोंडीचा सामना हा अंरुद रस्ते,रस्त्यावरील बस्तांना मांडुन बसलेले फेरीवाले, हातगाडीवाले, कटलरी सामाना विक्रेते, दुकानदार यांनी फुटपाथ काबीज केल्याने वाहतुकीकरीता प्रत्याक्षात रस्ता अंरुद होतो अशावेळी ट्राफिक वार्डन यांचे मदतीने वाहतुक कोंडी सोडवुन वाहतुक नियमन करण्यात येते

तरी उल्हासनगर शहरातील उल्हासनगर व विठठलवाडी वाहतुक पोलीस अंमलदार यांना मदतीस असलेले ४५ ट्राफिक वॉर्डन यांना नियुक्ती ठिकाणी मुदतवाढ करुन मिळणेस विनंती आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत उल्हासनगर शहरातील वाहतुक कोंडीच्या समस्या दुर होणेसाठी शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर व विठठलवाडी यांना शहरातील वाहतुक समस्यांचे निराकरण करणेसाठी आत्तापर्यत खालीलप्रमाणे मंजुरी प्राप्त होवुन अर्थसहाय्यास मंजुरी दिली आहे.

१) मा. स्थायी समिती ठराव क्र ०१ दिनांक १३/०९/२०१२ अन्वये २० ट्राफिक वार्डन यांना अटी शतीच्या आधारे मानधन तत्वावर अर्थसहाय्यास मंजुरी दिलेली होती.

२) सदर वार्डन यांचा एक वर्षाचा कालावधी संपुष्ठात आला असता मा. स्थायी समिती ठराव क्र. ५६ दिनांक १७/१२/२०१३ अन्वये वार्डन यांची सेवा सन २०१३-१४ साठी चालू ठेवुन आणखी ५ ट्राफिक वार्डन म्हणजे एकुण

२५ वार्डन नेमणेस व त्यांचे मानधन रु.२००० च्या ऐवजी रु. ४००० अशी वाढ करण्यास मान्यता दिलेली होती.

३) सन २०१४- १५ मध्ये मा. स्थायी समिती ठराव क्र. ७१, दिनांक ०२/०१/२०१५ अन्वये २५ ट्राफिक वार्डन यांना मुदतवाढ दिली.

४) सन २०१५- १६ मध्ये मा. स्थायी समिती ठराव क्र. १०० दिनांक १४/०३/२०१६ अन्वये २५ ट्राफिक वार्डन यांना मुदतवाढ दिली.

५) सन २०१६- १७ मध्ये मा. स्थायी समिती ठराव क्र. ८१, दिनांक ०७/१०/२०१६ अन्वये २५ ट्राफिक वार्डन यांना अर्थसहाय्य मंजुरी दिलेली आहे.

६) मा. स्थायी समिती ठराव क्र. २४ दिनांक ८/०९/२०१७ अन्वये २५ ट्राफिक वार्डन याच्या अर्थसहाय्यास मंजुरी देण्यात आली आहे.

७) मा. स्थायी समिती ठराव क्र. ५७ दिनांक १६/११/२०१७ अन्वये २० ट्राफिक वॉर्डन यांच्या अर्थसहाय्यास मंजुरी देण्यात आली आहे.

८) मा. स्थायी समिती ठराव क्र. ३२ दिनांक ०४/०९/२०१८ अन्वये ४५ ट्राफिक वार्डन याच्या अर्थसहाय्यास मंजुरी मिळणेबाबत.

९) मा. स्थायी समिती ठराव क्र. ५१ दिनांक ०२/११/२०१८ अन्वये ट्राफिक वॉर्डन यांच्या मानधनात वाढीस मंजुरी मिळण्याबाबत.

१०) मा. स्थायी समिती ठराव क्र. ५९ दिनांक ०७/२/२०२० अन्वये ४५ ट्राफिक वॉर्डन यांच्या अर्थसहाय्यास मंजुरी मिळणेबाबत.

वाहतुक शाखेस टाफिक वार्डन २५ अधिक अतिरिक्त् २० ट्राफिक वार्डन असे एकुण ४५वार्डन यांना मानधन मिळणेबात विनंती केल्यानुसार मा. स्थायी समिती ठराव क्र. ५१ दिनांक ०२/११/२०१८ अन्वये ट्राफिक वार्डन यांना उदरानिर्वाहसाठी प्रति वार्डन रु.६०००/- एवढे मानधन देण्यास मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त् नमुद मुदा क्र. १० प्रमाणे एकुण ४५ ट्राफिक वार्डन यांचा कालावधी दि ०६/२/२०२१ रोजी संपेल आहे. पुढील एक वर्षाकरीता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन त्यांचया अर्थसहाय्यास मंजुरी देण्याचे प्रस्तावित आहे.

१) संबंधीत अतिरिक्त् ४५ ट्राफिक वॉर्डन यांची नियुक्ती करण्याची जबाबदारी पोलीस विभागाची राहील.

२) संबंधीत अतिरिक्त् ४५ ट्राफिक वॉर्डन यांना प्रतिमाह रु. ६०००/- एवढे मानधन महानगरपालिकेतर्फे सहाय्यक पोलिस आयुक्त्, शहर वाहतुक उपशाखा, उल्हासनगर विभाग यांचेकडून देयक प्राप्त झालयावर अर्थसहाय्य स्वरुपात देण्यात येईल.

३) ट्राफिक वार्डन यांच्या सेवेचा महानगरपालिकेशी कोणताही संबंध राहणार नाही.

४) ट्राफिक वॉर्डन यांना सेवेत असताना काही अपघात झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी ट्राफिक पोलीस विभागाची राहील.संबंधीत सर्व ट्राफिक वार्डन यांच्या उपस्थितीबाबत व कर्तव्याबाबत पोलिस विभागाचे नियंत्रण राहील.

५) वाहतुक व्यवस्था ही शहरातील मुख्य् समस्या आहे.या व्यवस्थेला सुधारणे गरजेचे असल्याने सदरचे कार्य महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३) (अ) अन्वये पार पाडणे आवश्यक् आहे.

सदर वार्डन यांना रु.६०००/-(मासिक मानधन) X ४५(ट्रॅाफिक वार्डन) X १२(महिने) = ३२,४०,०००/- रुपये मानधापोटी वार्षिक एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च वर्ष २०२०-२१ चे अंदाजपत्रकात A-१ (२४) Part १ ( Traffic Sing) या लेखार्शिषात रु ४ कोटी एवढी तरतुद उपलब्ध् आहे.

यास्तव मा.स्थायी समिती ठराव क्र. ५९ दिनांक ०७/२/२०२० अन्वये नियुक्तीचा एक वर्षाचा कार्यकाळ दि ६/२/२०२१ रोजी संपुष्टात येणार आहे. वाहतुक नियमनासाठी एकुण ४५ ट्राफिक वार्डन यांना पुढील एक वर्षाकरीता अर्थसहाय्य् मंजुरी मिळण्याबाबत सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी पटलावर सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.०३** **दिनांक : ७/०७/२०२१**

सुचकाचे नाव :—श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार ट्राफिक वार्डन यांना दिनांक ०६/०२/२०२१ ते दिनाक ०५/०२/२०२२ पर्यंत एक वर्षासाठी मुदतवाढ व अर्थसहाय्य देणेस मान्यता देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

**सर्वानुमते**

सभापती / पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**हापालिका सचिव:-** विषय क्रमांक ६ वाचून दाखवितात.

---

⇨**विषय क्र ६:— उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोरोना सेटंरवर सुरक्षेच्या दृष्टीने मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ,(सानपाडा) नवी मुंबई यांचेद्वारे कार्यरत ५० सुरक्षा रक्षक यांना ६ महिने मुदतवाढ देणेकरीता प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

---

**सदस्य, श्री. चंद्रशेखर यादव:—**पास.. पास. पास..

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** कोण बोलले पास.. पास?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मुदतवाढ कधी संपणार आहे?

**महापालिका सचिव:—** मुदतवाढ २१ एप्रिलला संपणार आहे, ना बरोबर आहे ना.

**मुख्य सुरक्षा अधिकारी, श्री. बाळू नेटके:—** मा. अध्यक्ष महोदय, मा. आयुक्त, मा. सदस्य, उल्हासनगर महापालिका कार्यक्षेत्रातील कोरोना सेंटरवर सुरक्षेच्या दृष्टीने मा. शासनाने स्थापन केलेल्या मा. सचिव, सुरक्षारक्षक मंडळ, नवि मुंबई सानपाडा मुंबई मंडळ यांचेकडून ५० सुरक्षारक्षक घेणेसाठी प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे सादर केलेला आहे. आपण सध्या कोरोना काळ लक्षात घेता, आपल्याकडे ५० सुरक्षा रक्षक कोरोन्टाईन सेंटरकरीता मा. आयुक्तांची मान्यता घेवून स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर केला होता. त्याची मुदत १६/०४/२०२१ रोजी संपुष्टात आलेली आहे आणि कोरोनाची तिसरी लाट लक्षात घेता, सदरचा प्रस्ताव मान्य व्हावा हि विनंती.

**सदस्य, श्री. चंद्रशेखर यादव:—** आवश्यकता का आहे.

**मुख्य सुरक्षा अधिकारी, श्री. बाळू नेटके:—** तिसरी लाट

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** काही आवश्यकता नाही. पुढची लाट येईल तेव्हा बघू. तिसरी लाट संख्या वाढत चालली तर आपण Emergency मिटिंग लावू आणि करून घेऊ. आता काय आवश्यकता नाही.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया :—** हे जे सुरक्षा रक्षक आहेत, हे सुरक्षा रक्षक असताना सुध्दा त्यावेळेस सेलवन एक्झुक्टीव्ह इंजिनियर होते. आयुक्तांच्या दालनात त्यांना मारले होते. देहेरकर साहेब उपायुक्त होते. त्यांच्या दालनात त्यांच्यावर कोणते तरी केमिकल पिवून आत्महत्या करायचा प्रयत्न एका कर्मचा—याने केला होता. गणेश शिंपी, प्रभाग अधिकारी होते. त्यांना पण आयुक्तांच्या दालनात मारले होते. तर हे जे सुरक्षा रक्षक आहेत ते कोणत्याही कामाचे नाहीत. आपण भिवंडीमध्ये चला, भाईंदरमध्ये चला तेथे जास्त अफेकटेड आहे, जास्त फिट आहेत, ट्रेंड आहेत आणि यांना येथे ठेवून काही फायदा पण दिसत नाही. कधी कोणी असे काही काम केले आहे. कोणत्या अधिका—याला किंवा कर्मचा—याला सुरक्षा दिली आहे. केव्हा पण ५० लोक आयुक्तांच्या दालना बाहेर येतात आणि धरणा आंदोलन करतात.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** फक्त ७—८ लोक येतात, जास्त नाही. इथे राडा करतात.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** हे फ्रि ऑफ ऑल असे महानगरपालिकेचे वातावरण झाले आहे सुरक्षा रक्षक असतानाही. तर आम्ही यांना मुदतवाढ देण्याच्या विरोधात आहोत. त्यांना मुदतवाढ नाही दिली पाहिजे. आम्ही ठराव पास केले आहे की, जे निवृत्त सेनादलातील सैनिक आहेत त्यांचा एक बोर्ड आहे. त्यांच्याकडून आपण सुरक्षा घ्या. त्यांचे काय चार्जेस आहेत? बाकी जागांवर ते आहेत. जर स्थायी समितीच्या ठरावाची प्रशासनाला गंभीरता नाही आहे. तर आम्हांला पण त्यांना सहकार्य नाही करायचे. आम्ही पण हे नामंजुर करतो. ठराव केल्यानंतरही आमच्याकडे प्रस्ताव आणला जात आहे. जर याप्रकारेच आपल्याला प्रशासन चालवायचे आहे तर आपण चालवा. आपल्याला स्थायी समिती व महासभेची आवश्यकता काय आहे? महाराष्ट्र शासनाकडे जावून आपण प्रशासकीय पॉवर आणा. नविन निवडून आलेल्या स्थायी समितीच्या सदस्यांची गरज आपल्याला नाही आहे. ठराव आपण मानन्यास तयार नाहीत. हा सभापतीचा नाही पुर्ण स्थायी समितीचा अपमान आहे. यासाठी मला वाटते की हा ठराव आम्ही नामंजूर करावे.

**मुख्य सुरक्षा अधिकारी, श्री. बाळू नेटके:—** मा. सभापती महोदयांनी आता सांगितले की, ठरावाची अवहेलना झालेली आहे. आदरणीय महोदय मी आपणांस विनंती करु इच्छितो की आणि सभागृहाच्या निर्देशनास आणू दच्छितो की, आपण तीन महीन्याचा ठराव पास करणेसाठी आदेशित केले होते. दरम्यानच्या काळात आपण माजी सैनिक सुरक्षा रक्षक मंडळाचे जवान घेण्यासाठी आपण प्राधिकृत केले होते. तो काळ वास्तविक पाहता कोरोना काळ असल्यामुळे आपण तत्कालीन माजी सैनिक बोर्डाचे प्रमुख यांचेशी संपर्क साधला आपल्या सुचनेनुसार आणि त्यावेळेस त्यांनी सांगितले कोरोना काळात आम्ही सुरक्षा देवू शकत नाही. आम्ही मुंबईला जास्तीत जास्त कर्मचारी पुरविले आहेत. आमच्याकडे आता नाहीत. असे त्यांनी सांगितले त्यावेळेस मी त्याच वेळेस मा. आयुक्तांचे निदर्शनास आणले आयुक्त साहेबांनी पण सांगितले की, ठेवता येणार नाही कोरोना काळात आपल्याला कर्मचारी सुरक्षा रक्षक लागतील. तर त्याच्या अनुषंगान....

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** तुम्ही आता इतिवृत्तामध्ये बोलत आहेत, तुमच्याकडे लेखी आहे काही? तुम्ही त्यांच्याशी लेखी व्यवहार केला आहे का?

<u>मुख्य **सुरक्षा अधिकारी, श्री. बाळू नेटके:—**</u> त्यांनी तुमच्या निदर्शनास आणून दिले.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** तुम्ही कोणाच्या निदर्शनास आणून दिले आहे? तुम्ही त्या निवृत्त माजी सैनिकांशी पत्रव्यवहार केला आहे का?

**<u>मुख्य सुरक्षा अधिकारी, श्री. बाळू नेटके:—</u>** होय केला आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** मग दाखवा आम्हांला त्यांचे पत्र कुठे आहे?

**<u>सदस्य, श्री. स्वप्नील बागुल :—</u>** मा. सभापती महोदय,

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** स्वप्नील बागुल थोडं थांबा. त्यांनी पत्र दिलेले दाखवा, त्यांचे पत्र कुठे आहे? त्यांनी दिलेले पत्र दाखवा. त्यांचे पत्र कुठे आहे?

**<u>सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:—</u>** मा. सभापती महोदय, येणा—या काळामध्ये जर तिसरी लाट आली तर त्या लाटेसाठी सुरक्षा रक्षक असणे गरजेचे आहे आणि येणा—या काळात लसीकरणाच्या वेळेस गोंधळ उडतो. त्यासाठी सुध्दा सुरक्षा रक्षकांची गरज पडते. माजी सैनिकांचे वय सुध्दा...

**<u>स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:—</u>** स्वप्नीलजी, एक मिनिट नेटकेजींचे पुर्ण होऊ दया, मग तुम्ही बोला.

**<u>मुख्य सुरक्षा अधिकारी, श्री. बाळु नेटके:—</u>** शासननिर्णय असा आहे महामंडळे, सरकारी, निमसरकारी, महापालिका इत्यादींना ज्या ज्या वेळी सुरक्षा अधिकारी यांची आवश्यकता असेल त्या त्या वेळी सुरक्षा मंडळाकडूनच सुरक्षारक्षक यांची मागणी करावी. व त्यातुनच आपल्या आस्थापनेमध्ये सुरक्षा रक्षकाची नेमणूक करावी वर नमुद ज्या संस्था, कार्यालये यापुढे शासनाच्या सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षक घेणार नाहीत. त्या जबाबदार अधिकारी हा दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील. या सर्व बाबींचा विचार करता सुरक्षा रक्षक मंडळाचा प्रस्ताव खारीज केला जाईल.

**<u>स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:—</u>** नेटकेजी आपण स्वत:ला वाचवण्यासाठी करीत आहेत का आमची जी मागणी आहे, आमच्या अधिका—या बरोबर आमची पण सुरक्षा झाली पाहिजे, हा एक विषय आहे. जे आमचे सन्माननीय सदस्य आपल्या विचारत आहेत. आपण आम्हांला सांगत आहेत की, आमच्यावरती कारवाई होईल. आम्ही मनाई नाही केली सुरक्षा रक्षक ठेवण्यासाठी, आम्ही बोललो की पेसीफिक बोर्डाकडून तुम्हाला सेवा निवृत्त मिलेटरीवाले मिळू शकतात. असे पण नाही की, पेमेंट जास्त देवू शकतो. आम्ही असे बोललो की बोर्डाकडून सुरक्षा रक्षक ठरावामध्ये असे पण होत का त्यांचे पगार वाढणार. माजी सैनिक

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u>** त्यांचे चार्जेस काय आहेत? हया संवादातील त्रुटी आहेत. भिवंडी, नवी मुंबई व मिरा भाईंदर येथे जास्त आहे. जास्त फिट आहेत. मी आपल्याला तीन घटना सांगितल्या व त्या अधिका—यांच्या बाबतीतच घडल्या आहेत. कोणत्याही नगरसेवकाच्या बाबतीत नाही घडल्या. आपली सुरक्षा मागत आहोत. अधिका—यांवर हल्ला झालेला आहे. आयुक्तांच्या समोर आयुक्तांच्या दालनात. तर बाकी कुठे अधिकारी सुरक्षित आहेत.

**उप आयुक्त (मु.), श्री. अशोक नाईकवाडे:—** आदरणीय सभापती महोदय आणि सर्व सदस्य, आपल्याकडे एकूण ९६ पदांची मंजूर संख्या आहे. त्यातून आपण भरलेले ४२ आहेत, त्यातील ५४ सध्या रिक्त आहेत. आपल्याकडे ज्या ठिकाणी वॅक्सीन सेंटर आणि कोरोना रुग्णांसाठी जे रुग्णालये आहेत त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर लोकांचे आवक—जावक होते आणि तिथे गोंधळ बरेच होत होते. त्यामुळे सर्व ठिकाणी या सुरक्षा रक्षकाचे मागणी मोठया प्रमाणावर आपले नगरसेवक वगैरे यांचेकडून येत होती आणि त्या मागण्या विचारात घेता आपण तातडीने उपलब्ध करुन तिथे तातडीने व्यवस्था केलेली आहे तिथले कामकाज आपण जर पाहिले असेल सुरक्षारक्षक तिथे तर आणि लोकांना २४X७ कंटोल करण्यामध्ये ते मदत करतात. वदारिया साहेबांनी जी आपल्याला सुचना दिलेल्या आहेत. त्या सुचना शासनाचा जो जी. आर. आहे तो जी. आर. तपासून त्यातुन जर आपल्याला अशा पध्दतीने जर मंडळाकडून उपलब्ध झाले सेवानिवृत्त तर आमच्या प्रती आपण चांगल्या भावना व्यक्त करुन आमच्यासाठीच आपण सुचना केल्या त्याबददल आपले धन्यवाद. त्याबददल माझा विरोध नाही. आम्हांला सुरक्षा चांगली मिळावी आमच्या ही जीव धोक्यात आहे. आम्हांला संरक्षण मिळावे. ही आपली जी भावना आहे त्या भावना व्यक्त केल्याबददल मी सर्वांच्या वतीने धन्यवाद देतो आभार मानतो. चांगले सुरक्षा रक्षक असावे अशी माझी ही भावना आहे. त्याबददल दुमत नाही. मंडळाकडून जर आपण बोलतात सेवानिवृत्त मिलिटरी लोक मिळाले सगळे बघून कॉल करु इंटरव्हयू घेवू. ते मिळाले तर प्रयत्न करु. आपल्याला या दराने मिळतील. २५,००० हजार रुपये त्यांचा दर आहे. वेतन आहे सर्वांचे जर आपल्याला शासन निर्णयाच्या विरुध्द तपासून आपण सुचवता की मिलिटरी लोकांचे जे काही मंडळ आहे तेथून जर घेता येत असेल तर तिथून घेवू आपण मान्यता दयावी. हे वाढीव त्यांचे मानधन असेल ते ही आपण तुम्ही मान्यता दिली तर तेही देवू. आमचा त्याला काही विरोध नाही. कामकाज चालू आहे. त्यानंतर आपण विचार करु, अशी माझी विनंती आहे.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—** त्यांची चुकी आहे. आमची चुकी नाही.

**उप आयुक्त (मु.), श्री. अशोक नाईकवाडे:—** त्याच्याच खाली आहे मुदत आपल्याला मिळालेली आहे. कोरोना काळात संपुष्टात आलेली आहे. त्यापुढे आपल्याला मुदतवाढ हवी आहे. त्यांना वेळ आहे, त्या दरम्यान आपण करू. जसा तुमचा सुझाव आहे, त्या हिशोबाने सादर करू.

**सदस्या, श्रीम. सुनिता बगाडे:—** मा. सभापतीजी, तुम्हांला माजी सैनिकच पाहीजे का?

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी :—** बगाडे मॅडम बोला.

**सदस्या, श्री. सुनिता बगाडे:—** मा. सभापती जी, सुरक्षा रक्षकासाठी माजी सैनिकच पाहिजे का. नविन भरती नाही आपण करु शकत. आवाज येतोय माझा.

**उप आयुक्त (मु.), श्री. अशोक नाईकवाडे:—**होय येत आहे बोला.

**सदस्या, श्री. सुनिता बगाडे :—** सुरक्षा रक्षकासाठी माजी सैनिकच पाहिजे का? नविन मुलांची भरती नाही आपण करु शकत.

**उप आयुक्त (मु.), श्री. अशोक नाईकवाडे:—** पदे मंजुर आहेत, भरती करता येते. आपला भरतीची प्रक्रिया करण्याचा प्रस्ताव चालू आहे. त्याला शासनाची मान्यता वगैरे घेण्याची आवश्यकता आहे तसेच आपला खर्च किती आहे? ती मर्यादा ओलांडली तर

आपल्याला भरती करायला मान्यता मिळू शकत नाही. त्या सर्व बाबी आम्ही तपासत आहोत आणि नियमित भरती करण्याचा प्रपोजल आमच्या विचाराधीन आहे.

**<u>सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:—</u>** यांना मुदतवाढ दयावी साहेब.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** सहा महीन्यासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

**<u>उप आयुक्त (मु.), श्री. अशोक नाईकवाडे :—</u>** धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u>** मिलेटरीचा जो बोर्ड आहे. नाईकवाडे साहेब स्वत: त्यांच्याशी विचार विनिमय करुन दुसरी महानगरपालिका कशाप्रकारे सुरक्षा रक्षक घेत आहेत, कामकाज करीत आहेत, कुठून घेत आहेत? दुसरे असे मंडळ आहे का? असा प्रस्ताव स्थायी समितीच्या समोर आणण्यात यावा.

**<u>उप आयुक्त (मु.), श्री. अशोक नाईकवाड:—</u>** दिलेल्या सुचनेनुसार आम्ही कार्यवाई करू सर.

**<u>महापालिका सचिव:—</u>** मुदत दिनांक ०६/०२/२०२१ ते दिनांक ०५/०२/२०२२ पर्यंत. एक वर्षासाठी.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

☑ **विषय क्र. ६:—** उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोरोना सेटंरवर सुरक्षेच्या दृष्टीने मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ,(सानपाडा) नवी मुंबई यांचेद्वारे कार्यरत ५० सुरक्षा रक्षक यांना ६ महिने मुदतवाढ देणेकरीता प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**<u>प्रस्तावना</u>**

सध्या जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणूची लागण राज्यातील काही भागात झाली आहे- सदर रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत- त्या दृष्टीने राज्य शासनाने कोरोना विषाणूचा ( covid-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ दिनांक २३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २ , ३ व ४ मधील तरतुदीनुसार आधिसूचना निर्गमित केलेली आहे.

आणि ज्याअर्थी वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २ (१) नुसार महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात covid-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या कारणासाठी ते सक्षम असतील असे घोषित करण्यात आलेले आहे.

उल्हासनगर महानगरपालिका सुरक्षा विभागाच्या आस्थापनेवर एकुण ९६ सुरक्षा रक्षकांची पदे शासन स्त्रावर मंजुर असुन आज रोजी ४२ पदे भरलेली आहे व ५४ पदे रिक्त् आहेत. उक्त् पदापैकी २६ सुरक्षा रक्षक महानगरपालिकेच्या विविध विभागात वॅालमन , शिपाई, लिपीक म्हणुन कार्यरत अहेत व महापालिका आस्थापनेवर सुरक्षा रक्षकाचे ५४ पदे रिक्त् आहेत.

सरकारी निमसरकारी क्षेत्रे / उपक्रम/ शासकिय मंडळे, महामंडळे / महानगरपालिका/ स्थानिक स्वराज्य संस्था/ सहकारी संस्था/ शासकीय कार्यालये इत्यादींना ज्या-ज्या वेळी सुरक्षा अधिकारी/ सुरक्षा रक्षक यांची अवश्यकता असेल त्या-त्या वेळी संबंधितांनी यापुढे खाजगी अभिकरणामधून सुरक्षा अधिकारी / सुरक्षा रक्षक यांची मागणी न करता शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडूनच सुरक्षा अधिकारी किंवा सुरक्षा रक्षक यांची मागणी करावी. व त्यातुनच आप-आपल्या अस्थापनेमध्ये सुरक्षा रक्षकांची नेमणूक करावी. वर नमुद ज्या संस्था यापुढे शासनाच्या सुरक्षा

रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षक घेणार नाहीत त्या संस्थामधील संबंधीत जबाबदार अधिकरी हे दंडात्मक कारवाईस पात्र राहील, असे निर्देश आहेत.

महापालिका वैद्यकीय आरोग्य विभागाकडून कोरोना सेंटरसाठी आणि कोरोना covid-१९ हॉस्पिटलसाठी महापालिका **सुरक्षा विभागाद्वारे सुरक्षा रक्षक मिळणे कामी सतत मागणी होत आहे.**परंतु सुरक्षा विभागाकडे सुरक्षा रक्षक मागणीपेक्षा कमी असल्याने पूर्तता करणे शक्य होत नाही. कोरोना सेंटरसाठी आणि कोरोना covid-१९ हॉस्पिटलसाठी सुरक्षेच्या दृष्टीने मा. स्थायी समिती ठराव क्रमांक २१ दिनांक १२/११/२०२० अन्वये दिनांक १७/१०/२०२० पासुन ६ महिन्याकरीता शासनाने स्थापन केलेल्या मा. सचिव, सुरक्षा रक्षक मंडळ, सानपाडा नवी मुंबई, यांचे व्दरा ५० सुरक्षा रक्षक एकूण ०९ कोरोना सेंटर/ हॉस्पिटल/ तपासणी सेंटर/ व नव्याने सुरू करण्यात आलेल्या लसीकरण केंद्र येथे कार्यरत आहेत. त्यांची मुदत दिनांक १६/०४/२०२१ रोजी संपुष्टात येत आहे.

**मा. महोदय, सध्या महाराष्ट्रभर कोरोनाच्या दूस-या लाटेचा प्रादुर्भाव लक्षात घेता** महापालिका कार्यक्षेत्रात वरीलप्रमाणे आवश्यकते नुसार कार्यरत असलेल्या एकूण ०९ कोरोना सेंटर/ हॉस्पिटल/ तपासणी सेंटर/नव्याने सुरू करण्यात आलेल्या लसीकरण केंद्र येथे सुरक्षेच्या दृष्टीने सन २०२०-२०२१ या वर्षासाठी दिनांक १७/१०/२०२० पासुन सध्या कार्यरत ५० सुरक्षा रक्षक यांना ०६ महिन्याकरीता मुदतवाढ देणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच अधीक आवश्यकता भासल्यास तसे वेळोवेळी पूरवठा करण्याकरीता आदेश व्हावेत.

मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्या करिता) यांचे कडून घेण्यात येणाऱ्या सुरक्षा रक्षकाच्या पगारात दर दोन वर्षांनी व इतर भत्यात दर सहा महिन्यांनी वाढ होत असते. त्याप्रमाणे मूळ वेतन + विशेष भत्ता /महागाई भत्ता = किमान वेतन, नोंदीत सुरक्षा रक्षकांचा किमान वेतनावर मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन मुख्य मालकाने ४५.२५ % दराने लेव्ही देणे मुख्य मालकाला बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता व अतिकालिक भत्ता यावर ३.२५ % दराने लेव्ही देणे मुख्य मालकाला बंधनकारक राहील. **प्रति सुरक्षा रक्षकास** १ महिन्याकरिता **२५,४५०** तर **५० सुरक्षा रक्षकांना एका महिन्याकारीता १२,७२,५००/- तर ५० सुरक्षा रक्षकांना ०६ महिन्याकरिता ७६,३५०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.**

शहरातील अलगीकरण कक्षाकरीता सुरक्षा रक्षक घेण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५० व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (३) अन्वये मान्यता देण्यास हरकत नाही .

सबब शासनाने स्थापन केलेल्या मा. सचिव, सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्हा करिता) यांचेकडून तात्काळ ५० सुरक्षा रक्षक हे ०६ महिन्यांकरिता घेणे अपेक्षित आहे. यावर येणारा खर्च महापालिका अंदाज पत्रकातील अ. १ (२४) आस्थापना खर्च रोजंदारी / मानधन इत्यादी किंवा कोव्हिड १९ या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास सदर विशेष निधीतून खर्च करण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे कामी मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रस्तावित .

**स्थायी समिती ठराव क्र. ०४** **दिनांक : ७/०७/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोरोना सेंटरवर सुरक्षेच्या दृष्टीने मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ, (सानपाडा) नवी मुंबई यांचेद्वारे कार्यरत ५० सुरक्षा रक्षक यांना ६ महिने मुदतवाढ देणेकरीता प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**तसेच**,

मिलिटरी बोर्डाशी संपर्क साधुन सदस्यांनी दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

**<u>सर्वानुमते</u>**

सभापती / पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव:-</u>** विषय क्रमांक ७ वाचून दाखवितात.

---

**⇨विषय क्र ७:— खाजगी कंपनीकडून प्रशिक्षित ५८ फायरमन कंत्राटी पध्दतीने पुरवठा करणेकरीता न्युनतम निविदा धारकाशी करार करणेस व लागणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत**

---

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u>** यात आम्हांला माहिती कोण देणार?

**<u>उप आयुक्त (मु.), श्री. अशोक नाईकवाडे:—</u>** सर यामध्ये आपल्याकडे अग्निशमन विभाग आहे. सतत आपल्या शहराच्या सेवेसाठी कार्यरत असतो. याठिकाणी आपल्याकडे ६० पदे मंजूर आहेत त्यापैकी ७ भरलेली आहेत, ५ लोकांना पदोन्नती दिलेली आहते आणि ५८ पदे आपल्याकडे रिक्त आहेत. सध्याला आपल्याकडे ही ५८ पदे ठेकेदार म्हणजे कॉट्रॅक पध्दतीने नियुक्त केलेली आहेत. ठेकेदार त्यांच्यामार्फत आपण अग्निशमन विभागाचे कामकाज चालवत आहोत. आपल्याला अनुभव आलेलाच आहे आगीची दुर्घटना असो, इमारत पडलेली असो झाड पडलेली दुर्घटना असो त्याठिकाणी आमचा अग्निशमन विभाग ज्यावेळेस कॉल मिळतो त्यावेळेस तातडीने पोहचून लोकांची सेवेत कार्यरत असून एक आता मला अभिमान वाटतो माझयाकडेच हा विभाग आहे. एक आपल्या डी.सी.पी. साहेबांनी मध्यंतरी मॉक ड्रिल घेतले होते आणि त्या मॉक ड्रिलच्या वेळी ज्यावेळेस कॉल आला त्या वेळेस within 5 minits आपला अग्निशमन विभाग तेथे सर्व जेवढया यंत्रणा कार्यरत आहेत त्या यंत्रणेच्या आधी पोहचला होता. डी.सी.पी. साहेबांनी त्यावेळेस आपल्याला शाबासकी सुध्दा दिली होती. अशीच अशाच पध्दतीने आपल्या इमारतीच्या दुर्घटना घडल्या त्यावेळेस सुध्दा आपला अग्निशमन विभाग तातडीने पोहचून आपण ज्या दुर्घटनाग्रस्त इमारतीमधले बचाव कार्य अशा पध्दतीने केले होते. अशा प्रकारे अग्निशमन विभाग सतत कार्यरत आहे. आपल्या शहरांच्या नागरीकांसाठी हे कार्य करत असताना मनुष्यबळ आपल्याला कमी पडतो. त्यामध्ये किमान वेतन कायदा वगैरे याच्या ब—याच अडचणी निर्माण होत आहेत आणि या अडचणींवर मात करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत होतो आणि इतर विभागात आपल्या महापालिकेत रुजू झाल्यापासुन आम्ही विचार केल्यानंतर आपल्याला थोडक्यात माहिती सांगतो की, ठेकेदारांनी जर आपल्याला नियुक्त केलेले आहे. त्याला आपण तर २८,९९०/— रुपये प्रती व्यक्ती दर महिना आपण देत आहोत आणि ते मात्र आपल्या सुरक्षा रक्षकाला आपल्या अग्निशमनच्या कार्यरत आहेत त्यांना १८,०००/—रुपये दर महिना देत आहेत. त्यामुळे त्यामध्ये किमान वेतनचे उल्लंघन होत असल्याने उल्हासनगर आपल्याकडे कामगार आयुक्त यांचेकडे पत्र व्यवहार चालू आहेत, लोकांच्या तक्रारी खुप आहेत. आजच कल्याण कामगार आयुक्तांकडे सुनावणी होती. आपल्या महापालिकेत अंमलबजावणी लवकर होत नाही म्हणून. हा जो सर्व प्रकार आहे त्यामुळे आपण सुरक्षा मंडळ आहे उपक्रम आहेत त्यांच्याशी आम्ही संपर्क साधला. त्यांनी आपल्याकडे येवून तपासणी केली आणि जी अग्निशमनची आपली मागणी आहे ती ते लेखी दिलेली आहे. त्या लेखीनुसार त्यांनी

आपल्याला सांगितले की, २५,४५०/—रुपये प्रती व्यक्ती त्यांना दयावे लागेल आणि ते आपल्या सुरक्षा रक्षकाला १९,७००/— रुपये ते आपल्या सुरक्षा रक्षकाला पे करणार आहेत. त्यामुळे इथे विनिमय वेजेस ॲक्टचा सुध्दा उल्लंघन होत नाही आणि आपले दर महा एका सुरक्षा रक्षकाला ३,५४०/— रुपये बचत होते. त्यानुसार दर महा २,००,५२०,/— रुपये बचत होवून वार्षिक बचत आपली २४,६३,०००/— रुपये इतकी होणार आहे. आणि आपल्याला जे आवश्यक मनुष्यबळ आहे ते मनुष्यबळ हया सुरक्षा मंडळामार्फत प्राप्त होणार आहे. यामुळे हा प्रस्तावास आपल्याकडून मान्यता मिळाली तर महापालिकेची बचतही होईल. आपल्याला सुरक्षा रक्षक जे अग्निशमन कडून मिळणार आहेत शासन अंगिकृत उपक्रमाकडून मिळणार असल्यामुळे त्यामध्ये जर अनियमितता झााली, गडबड झाली तर त्याच्यावर आपली जबाबदारी निश्चित करणे सुध्दा सोपे होते कारण सुरक्षा मंडळाकडे रजिस्टर असून त्यांच्याकडे डाटा असतो त्यांची जबाबदारी निश्चित करता येते. आवश्यकता असेल तर त्यांना बदलता येते आणि तात्काळ दुसरे जे आवश्यक मनुष्यबळ आहे हे ही आपल्याला उपलब्ध होते. त्यामुळे हे जरा सोयीस्कर आहे निधीची बचत होते विनिमय ॲक्टची ही पुर्तता होत आहे. आणि सुरक्षा मंडळ शासन अंगिकृत असल्यामुळे आपल्याला जबाबदारी निश्च्ति करता येतात. यादृष्टी कोनातून आम्ही हा प्रस्ताव आपल्या पुढे मांडलेला आहे. तरी या प्रस्तावाला आपण मान्यता दयावी, अशी प्रशासनाची विनंती आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** एपीएफचा समावेश आहे का?

**उप आयुक्त (मु.), श्री. अशोक नाईकवाडे:—** त्याच्यात सर्व समावेश आहे. सुरक्षा मंडळाला इपीएफची शासनाला माफी आहे. सुरक्षा मंडळाला माफी आहे. त्यांनी लेखी दिलेले आहे. आपण लेखा विभागाला ही दिलेले आहे. त्यांना इपीएफ लागू नाही त्यामुळे इपीएफ घेतला जात नाही. स्वतंत्र आहेत आवश्यकता नाही. त्यामुळे लागू नाही. आपल्याकडे लेखी दिले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया :—** चव्हाण साहेब आहेत इथे.पहीले इपीएफमध्ये किती पैसे फसलेले आहेत?

**मुख्य लेखाधिकारी, श्री. विकास चव्हाण:—** ६३ करोड रूपये इपीएफने अडकवले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** इपीएफ चे पगार ठेकेदाराने केले नाही. मुददल खूप जास्त आहे. कुणाला तरी ती जबाबदारी घेतली पाहिजे.

**उप आयुक्त (मु.), श्री. अशोक नाईकवाडे:—** त्यांच्याकडे इपीएफचा प्रश्नच येत नाही. मंडळाला कपात करण्याची आवश्यकता नाही असे लेखी आपल्याकडे आलेले आहे, तसे मंडळाचे प्रोव्हिजन पण आलेले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—**एक घटना अशी आहे, एका व्यक्तीला ४० टक्के भाजले होते. तर ठेकेदार बोलला तुमच्यावर उपचार करण्याची माझी जबाबदारी नाही. कुणाला अपंगत्व आले. कुणाला कायमस्वरुपी अपंगत्व आले तर त्यात काय तरतुद आहे आपल्याकडे.

**उप आयुक्त (मु.), श्री. अशोक नाईकवाडे :—** त्या सुरक्षा मंडळाकडून इएसआय म्हणून जे रुग्णालय आहे. त्यामधुन त्यांना उपचार केले जातील.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** ते त्यांच्यावर उपचार झाले, कोणाला परमानंट डिसीबिलीटी आले, आग विझवण्याच्या वेळी आंधळा झाला, जळल्यामुळे तो पुढे कामच करू शकत नाही, त्याला आपण काय करणार?

**<u>उप आयुक्त (मु.), श्री. अशोक नाईकवाडे:—</u>** ती सर्व जबाबदारी बोर्डाची आहे, आपल्या महापालिकेची काहीच जबाबदारी नाही. महापालिकेंची कुठलीही जबाबदारी नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u>**मी हे सांगत नाही की, महानगरपालिकेची जबाबदारी नाही, मला हे सांगा की, त्यांची जबाबदारी काय आहे?

**<u>उप आयुक्त (मु.), श्री. अशोक नाईकवाडे:—</u>** आपल्याकडे माहीती उपलब्ध नाही, आम्ही माहीती घेऊ.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u>** तो पर्यंत तयारी करून या, आपल्याकडे माहीती कमी आहे. आपल्याकडे पेंडींग ठेवू.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u>**मी आपल्याला सांगत आहे की, हा खुप महत्वाचा मुदा आहे, आम्ही याला डिफर करीत आहे. महासभेसाठी पेडींग ठेवू महासभेमध्ये वेगळा निर्णय होईल.

**<u>उप आयुक्त (मु.), श्री. अशोक नाईकवाडे:—</u>**पहीले महासभेमध्ये विषय आला होता, तेव्हा आपण याला मान्यता मिळावी, तेव्हा आम्ही विषय मागे घेतला आहे. मी तसे पत्र पण दिलेले आहे, काही अडचण नाही, पण सर, सुरक्षा मंडळाकडून घेतल्यामुळे आपला निधी पण वाचत आहे.

**<u>उप आयुक्त (मु.), श्री. अशोक नाईकवाडे :—</u>** आपला निधी पण वाचेल.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u>** आम्ही अशी मुले बघितली आहेत. अपंगत्व आले. त्याला तुम्ही काढून टाकणार.

**<u>उप आयुक्त (मु.), श्री. अशोक नाईकवाडे:—</u>** त्यांना काहीच तरतुद नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u>** आपण ज्याप्रकारे हा प्रस्ताव बनवला आहे. आम्ही आपली प्रशंसा करतो की, आपण महानगरपालिकेचे २५ लाख रुपये वाचवले. चांगल्या अटी आपण देत आहात. आम्ही त्याबददल तुमची प्रशंसा करतो. परंतु कायमस्वरुपी अपंगत्व आले तर त्यांचे काय होणार याबाबत जरा सांगा.

**<u>स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:—</u>** मॅडम हा विषय डिफर करण्यात यावा, चला पुढचा विषय घ्या.

**<u>महापालिका सचिव:—</u>** विषय वगळण्यात आला आहे.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .

---

☑ **विषय क्र. ७ :—** खाजगी कंपनीकडून प्रशिक्षित ५८ फायरमन कंत्राटी पध्दतीने पुरवठा करणेकरीता न्युनतम निविदा धारकाशी करार करणेस व लागणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त विषयानुरूप सादर करण्यात येते की, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सरंक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील प्रकरण ६ कलम ५ अन्वये तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६३(५) आग विझविणेसाठी व आगीपासून जीवीत आणि मालमत्ता यांचे नुकसानीची तीव्रता कमी करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करणे आणि त्याकरीता सुसज्ज् असे अग्निशामक पथक तयार करणे महापालिकेची जबाबादारी आहे. उल्हासनगर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागातील ०२ अग्निशमन केंद्राकरीता एकूण ०६ अग्निशमन वाहनावर कार्य

करण्यासाठी शासनाने एकूण ६० अग्निशमन विमोचक (फायरमन) या संवर्गाची पदे मंजुर केलेली आहेत. त्यापैकी केवळ ०७ अग्निशमन विमोचक (फायरमन) ची पदे भरलेली आहेत. पैकी ०५ अग्निशमन विमोचक (फायरमन) यांची पदोन्नतीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याने एकूण ६० अग्निशमन विमोचक (फायरमन) पदापैकी मात्र ०२ पदे भरलेली राहतील व ५८ पदे रिक्त् असणार आहेत. उर्वरीत मंजुर पदावर अग्निशमन विमोचक (फायरमन) पदाची नेमणूक सरळसेवेने व्हावी या करीता मा. संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा महाराष्ट्र शासन दिनांक १५/६/२०१९ व २३/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये मंजुरी दिलेली आहे. त्याअनुषंगाने मा. आयुक्त् यांनी भरती प्रक्रिया राबविणेकरीता निर्देश दिलेले आहेत. मात्र कोरोना कोविड-१९ महामारी तसेच मराठा आरक्षण या बाबीचा विचार करता भरती प्रक्रिया राबविणेस विलंब होत आहे.

वरील सर्व बाबीचा विचार करता उल्हासनगर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील अग्निशमन विमोचक (फायरमन) पदांची सरळसेवा भरती / सध्या स्थितीत त्वरीत करणे शक्य् होत नाही. पर्यायी व्यवस्था म्हणून ५८ प्रशिक्षित अग्निशमन विमोचक (फायरमन)ची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करून अग्निशमन विभागाचे कार्य प्रभावीपणे सुरू ठेवणे आवश्यक आहे.

आज रोजी ०७ फायरमन/अग्निशामक विमोचक या संवर्गामध्ये कर्मचारी कार्यरत असून त्यापैकी ०३ सहा. अग्निशमन केंद्र अधिकारी ०२ प्रमुख अग्निशमन विमोचक (लिडिंग फायरमन) सवंर्गात अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. तसेच सध्या सफाई कामगार सवंर्गातील ०३ कर्मचारी यांना प्र. अग्निशमन विमोचक/फायरमन या सवंर्गामध्ये कार्यभार सोपविण्या आलेला आहे. अपु-या मनुष्यबळामुळे त्यांना नेहमी जादा तास काम करावे लागत असुन त्यांना साप्ताहिक सुट्टीदेखील देता येत नाही त्यामुळे वारंवार पुरेशे अग्निशमन विमोचक (फायरमन) पदाची भरती करणेसाठी मागणी करण्यात येत आहे..

अग्निशमन विभागातील कर्मचां-याना आगीसारख्या मानवनिर्मित व नैसर्गिक आपत्तीनां सामोरे जावे लागते तसेच अग्निशमन विभाग हा २४ तास कार्यरत व तत्पर असतो. सध्याचे कर्मचारी वर्ग अल्प् असून फायरकॉल,स्पेशल कॉल हाताळताना फारच गैरसोईचे आणि जिकरीचे होत आहे.

शासन निर्णय क्रं अशस/१४०७/३६०/प्र.क्र २११/नवि-२० दिनांक ३१/८/२००९ च्या महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानमधील परिशिष्ट ड (भाग २) अन्वये एक अग्निशमन वाहनासाठी खालीलप्रमाणे एकूण ३२ अधिकारी/कर्मचारी असणे आवश्यक आहे.

| अ.क्रं | पदाचे नाव | आवश्यक मनुष्यबळ | |
|---|---|---|---|
| | | एका पाळीसाठी | तीन पाळीसाठी |
| १ | केंद्र अधिकारी | ०१ | ०१ |
| २ | सहा. अग्निशमन केंद्र अधिकारी | ०१ | ०१ |
| ३ | प्रमुख अग्निशमन विमोचक | ०१ | ०३ |
| ४ | चालक यंत्रचालक | ०२ | ०६ |
| ५ | अग्निशमन विमोचक | ०७ | २१ |
| | एकूण आठ तास कर्तव्यकाळ | १२ | |
| | एकूण आठ तास ३ पाळीत कर्तव्यकाळ | ...... | ३२ |

सबब ई निविदा प्रक्रियाद्वारे मे. सेफ टेकर सिक्युरीटी फोर्स ठाणे या खाजगी कंपनीची नियुक्ती करण्यात येऊन, त्यांच्याकडून किमान वेतन कायदयाच्या न्यूनतम दरानुसार ३० प्रशिक्षित फायरमन यांच्या सेवा निव्वळ करार पध्दतीने दिनांक ८/३/१९ पासुन घेण्यात येत असून, दिनांक ७/३/२०२१ रोजी निविदा ठेका संपुष्टात येत आहे. कार्यालयीन आदेश क्रं जा क्र उमपा/अग्नि/१८४/१९ दिनांक ८/३/२०१९ अन्वये घेणेत आलेले एकूण ३० अग्निशामक विमोचक (फायरमन) हे राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांचेमार्फत प्रशिक्षण पूर्ण केलेले आहेत. सदर निविदेमधील अटी व शर्तीच्या अधिन राहून ५८ अग्निशमन विमोचक (फायरमन) यांचर पुरवठा होणे बंधनकारक आहे.

अग्निशमन विभागाने खाजगी कंपनीकडून प्रशिक्षित ५८ फायरमन कंत्राटी पध्दतीने पुरवठा करणेकरीता ई-निविदा प्रक्रिया अवंलबिली होती. सदर फायरमन हे राज्य् अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांचेमार्फत प्रशिक्षण पुर्ण केलेले असल्यामुळे असे प्रशिक्षित फायरमन हे Minimum Wages Act च्या नोटीफिकेशन नुसार Skilled या दर्जामध्ये येतात. अति. आयुक्त् यांच्या दिनांक २५/२/२०२१ रोजीच्या आदेशान्वये ई निविदा कक्षामध्ये निविदेचा आर्थिक भाग उघडण्यात आला. त्यांच्या प्रतिसादात निविदाधारकांनी भरणा केलेला तक्ता पुढीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रू २,१२,३८,७४२/- |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्र | १) दै फ्रि प्रेस जनरल<br>२) दै आपला महानगर<br>३) दै हिंदमाता मिरर |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिंनांक ४/२/२०२१ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ४/२/२०२१ ते १७/२/२०२१ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ४/२/२०२१ ते १७/२/२०२१ |
| ६ | निविदेचा तांत्रिकी/आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक १८/२/२०२१ |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०४ |
| ८ | प्राप्त् झालेल्या निविदांची संख्या | ०४ |

दि २५/२/२०२१ रोजी निवड समितीच्या समक्ष यांच्या उपस्थितीत अग्निशमन विभागाकरीता खाजगी कंपनीकडून ५८ प्रिशिक्षित फायरमन कंत्राटी पध्दतीने पुरवठा करण्याच्या निविदेचा भाग-२ (आर्थिक) लिफाफा उघडण्यात आला व वरील निविदा समितीने त्याची तपासणी करून खालीलप्रमाणे तपशील सादर करण्यात आला आहे.

| | विषय | अदांजपत्रकीय रक्कम | निविदाधारकाचे नाव | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागास ठेका पध्दतीने प्रशिक्षित अग्निशामक विमोचक (फायरमन) पुरवठा करणे (राज्य् अग्निशमन प्रशिक्षण येथुन फायरमन प्रशिक्षण घेतलेले) | २,१२,३८,७४२ | शेतमजुर सहकारी संघ लि. | युनाईट सेक्युर फॅसिलिटी | कलावती इंटरप्रायझोस | सेफ टेकर सिक्युरीटी फोर्स लि. |
| | | | रू ११५०/- प्रति दिन प्रति फायरमन<br>एक फायरमनास एक वर्षाकरीता<br>रू.११५० x ३६५ दिवस = रू ४,१९,७५०/-<br>५८ अग्निशामक विमोचक (फायरमन)<br>**१ वर्षा करीता**<br>२,४३,४५,५०० | रू १०००/- प्रति दिन प्रति फायरमन<br>एक फायरमनास एक वर्षाकरीता<br>रू .१००० x ३६५ दिवस = रू.३,६५,०००/-<br>५८ अग्निशामक विमोचक (फायरमन) | रू ९६६.६७/- प्रति दिन प्रति फायरमन<br>एक फायरमनास एक वर्षाकरीता रू .९६६.६७ x ३६५ दिवस = ३,५२,८३४.५५<br>५८ अग्निशामक विमोचक (फायरमन)<br>**१ वर्षा करीता**<br>[illegible] | रू ९६६.३३/- प्रति दिन प्रति फायरमन<br>एक फायरमनास एक वर्षाकरीता रू ९६६.३३ x ३६५ दिवस = रू ३,५२,७१०.४५/<br>५८ अग्निशामक विमोचक (फायरमन)<br>**१ वर्षा करीता**<br>[illegible] |

तुलनात्मक तक्त्यानुसार मे. सेफ टेकर सिक्युरीटी फोर्स यांचे दर सर्वात कमी व अंदाजपत्रकीय रक्कम रू.२,१२,२८,७४२/- पेक्षा रू ७,८१,५३५.९/- एवढे कमी म्हणजेच रूपये २,०४,५७,२०६.१०/-इतके प्राप्त झाले आहेत. हा दर अंदाजकीय रक्कमेपेक्षा ३.६७% इतका कमी आहे. मे. सेफटेकर सिक्युरीटी फोर्स यांचेकडून ५% सुरक्षा अनामत रक्कम रू. १०,६१,९३७.१० /- घेण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

आयुक्त यांच्या दिनांक १२/३/२०२१ रोजीच्या टिपणी अन्वये शाखा प्रबंधक, सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे यांचेशी संपर्क साधला असता दिनांक १६/३/२०२१ रोजी त्यांचे समवेत उप-आयुक्त (मुख्यालय) यांच्या दालनात उक्त विषयाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली. महापालिकेतील अग्निशमन विभागाकरीता अग्निशमन विमोचक या पदास आवश्यक असलेली शैक्षणिक व तांत्रिक पात्रता, लागणारे मनुष्यबळ इत्यादी माहिती देण्यात आली. सुरक्षा मंडळाचे अधिकारी यांनी महापालिकेने पुरविलेल्या माहितीच्या आधारे निरीक्षण अहवाल दि. १६/०३/२०२१ रोजी सादर केलेला आहे.

अग्निशमन विभागाकडे यापूर्वी कंत्राटी तत्वावर अनुभवी व सर्व निकष पूर्ण करणारे ३० कंत्राटी फायरमन (अग्निशामक विमोचक) कार्यरत असून हे अनुभवी मनुष्यबळ सुरक्षा रक्षक महामंडळाकडून उपलब्ध झाल्यास महापालिका कामकाजात गैरसोय निर्माण होणार नाही असे शाखा प्रबंधक यांचे निदर्शनास आणले असता त्यांचा सेवा अभिलेख त्यांना उपलब्ध करून दिल्यास (हजेरी पत्रक, ओळखपत्र, ईएसआयसी क्रंमाक) हे मनुष्यबळ सुरक्षा रक्षक महामंडळाकडून पुरविण्यात येईल असे त्यांनी दिनांक २४/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. सुरक्षा मंडळामार्फत पुरविण्यात येणा-या सुरक्षा रक्षकाला त्यांचे दरपत्रकानुसार प्रत्येकी वेतन व सर्व भत्यासह दरमहा रूपये २५,४५०/- (आठ तासाकरीता) अनुज्ञेय राहणार आहे. धारीकेमध्ये प्रस्तावित केलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील पात्र निविदा धारकाचा दर विचारात घेता प्रतिमाह रू २८,९९०/- प्रत्येकी अनुज्ञेय ठरतात. यानुसार सुरक्षा रक्षक मंडळाचे दर व पात्र निविदा धारकाचे दर विचारात घेता एका सुरक्षा रक्षकामागे रक्कम रूपये ३,५४०/- इतका फरक येत असून ५८ सुरक्षा रक्षकासाठी दरमाह रू २,०५,३२०/- व वार्षिक रू २४,६३,८४०/- इतकी खर्चाची बचत होणार आहे. सबब सुरक्षा मंडळाकडून सुरक्षा रक्षक घेतल्यास महापालिकेच्या रुपये २४,६३,८४०/- इतक्या निधीची बचत होवून महापालिकेच्या हिताचे ठरणार आहे. तसेच सुरक्षा रक्षक मंडळ शासन अंगिकृत उपक्रम असल्यामुळे त्यांचेकडून प्राप्त होणा-या मनुष्यबळामार्फत काही अनियमितता झाल्याचे निदर्शनास आल्यास त्यास सुरक्षा रक्षक मंडळ जबाबदार राहणार आहे.

त्यास अनुसरून आयुक्त यांनी दिनांक ७/४/२०२१ रोजी दिलेल्या निर्देशानुसार खालीलप्रमाणे फेरसादर करण्यात येत आहे.

| **अ.क्रं** | **मुद्दे** | **स्पष्टीकरण** |
|---|---|---|
| १ | टि. १ प्रमाणे सुरक्षा मंडळ कडून घेतले तर बचत (saving) किती होण्याची शक्यता आहे. | महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडून ५८ अग्निशामक विमोचक/सुरक्षा रक्षक घेतल्यास महापालिकेच्या रू २४,६३,८४०/- एवढया वार्षिक खर्चाची बचत होणार आहे. |
| २ | परंतु सुरक्षा मंडळ कडून मनुष्यबळ पुरवठा होण्यास विलंब होऊ शकते ,तोपर्यंत Fire Dept. Services (Emergency) असुन थांबू शकत नाही. | सुरक्षा रक्षक मंडळाकडून अग्निशामक विमोचक मिळेपर्यंत/उपलब्ध् होईपर्यंत मेसर्स सेफ टेकर सिक्युरीटी फोर्स यांनी सादर केलेले दर कमी व न्युनतम असल्याने सदर निविदेप्रमाणे अग्निशामक विमोचक घेणेची कार्यवा ही करणेत येईल. |
| ३ | सध्या Covid २nd Wave सुरू असल्यामुळे मंडळाकडून वेळ लागत असल्याची शक्यता असल्यामुळे ०६ महिने पर्यंत किंवा सुरक्षा मंडळाकडून येईपर्यंत जे अगोदर घडेल ते मान्य् | मा. आयुक्त् यांनी दिलेल्या निर्देशानुसार मेसर्स सेफ टेकर सिक्युरीटी फोर्स यांचे कडून अग्निशामक विमोचक घेण्यासाठी करारनामा करण्यात येईल. |
| ४ | दरम्यानचा कालावधीमध्ये सुरक्षा मंडळाकडून घ्यावा. | सदरची कार्यवाही सत्वर करण्यात येईल. |

सबब, उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता ई निविदाप्रमाणे ०६ महिन्याकरीता पात्र निविदाधारक मे. सेफ टेकर सिक्युरीटी फोर्स यांना अथवा सुरक्षा मंडळाकडून मनुष्यबळ पूरवठा करण्याच्या निविदेस मान्यता असावी. सुरक्षा मंडळाकडून मनुष्यबळ उपलब्ध होण्यास सुरूवात झाल्यानंतर उक्त निविदा संपुष्टात येईल. याकरीता गोषवारा मा. स्थायी समितीच्या प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. ४अ** **दिनांक : ३०/०३/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार खाजगी कंपनीकडून प्रशिक्षित ५८ फायरमन कंत्राटी पध्दतीने पुरवठा करणेकरीता न्युनतम निविदा धारकाशी करार करणेस व लागणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्याचा प्रस्ताव कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

**सर्वानुमते**

सभापती / पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-** विषय क्रमांक ८ वाचून दाखवितात.

---

**⇨विषय क्र. ८:— उल्हासनगर -३ येथील सातारा कॉलनी मधील शाम शिंदे हाऊस ते साळवी हाऊस पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणे**

---

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** या विषयामध्ये मी तुम्हांला सांगू इच्छितो की, सातारा कॉलनीमध्ये सिमेंट कॉक्रीटकरण रस्ता २५ फुट रोड आहे, दोन बाजू स्लम आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** हा डी.पी. रोड आहे का नॉन डी.पी. आहे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** नॉन डी.पी. आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** हा विषय कोणत्या बजेटमधून करायचा आहे, हे काही लिहीले नाही. रवि इंटरप्राईजेस कारवाई करा. इथे किती पात्र केल्या आहेत.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** दोन पात्र आहेत.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** हा पहीला कॉल आहे का? तुम्ही किती कॉल केले.

**<u>शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—</u>** असा जी.आर. आहे की, ५०० रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर दयायचा आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u>** कोणता जी.आर. आहे, मी आपल्याला तो जी आर दाखवू शकतो. २०१४ मध्ये मोदी सरकारच्या कार्यकाळामध्ये...

**<u>सदस्य, श्री. चंद्रशेखर यादव:—</u>** ठिक आहे, राजेशजी हा विषय वेगळा आहे.

या वेळी काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते समजून आले नाही.

**<u>शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—</u>** सर आपला प्रस्ताव बरोबर आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** माझे काय म्हणणे आहे की, हे तीन्ही ठेकेदार एकत्र बसून झा.पी. ने बोला की, माझा एक टक्का कमी दराने कमी आहे, रवी वाल्याने बोला का माझा १५ टक्याने कमी आहे, तर यांनी लिफापा उघडून बघितले पाहिजे किती टक्के फॉर्म भरला आहे. जरी त्याला दयायचे नसेल तरी. १०—१५ टक्के भरले असेल एक वेळा उघडून बघितले असते का किती टक्के भरला आहे, १०, १५ टक्के भरला आहे तर महापालिकेला १० टक्के, १५ टक्के फायदा झाला असता  तर ज्यानी भरला आहे, त्यांना अपात्र करा किंवा दंडात्मक कारवाई करा, रवि इंटप्राजेस यांना एक लाखाचा दंड लावा किंवा ब्लॅक लिस्ट करा म्हणजे एक वर्षासाठी निविदा भरु शकणार नाहीत असे कळवा. कोणते ना कोणते काम करायला पाहीजे ना. मनमानी करीत आहे, रवि इंटरप्राजेसवाला निविदा भरत आहे आणि ५००रूपयाचे स्टॅम्प देत नाही. दंडात्मक कारवाई करा. आजच्या नंतर ६ महीने टेंडर भरू शकत नाही किंवा त्यांना अपात्र करा. असा काही प्लॅन बनला पाहीजे. असे जे फालतू काम करीत आहेत. याच्यावर मॅडम येथे बसल्या आहेत. त्यांनी चांगले काम केले आहे, हे मी बघितले आहे. हे जे महापालिकेसोबत छेडछाड करत आहेत भरणा आणि देत नाहीत. हा विषय महासभेमध्ये घेउन या. जो ५०० रूपयाचे टॅम्प भरून देत नाहीत, त्यांना एक वर्षासाठी टेंडर भरणे मनाई करा. ५० हजाराचे दंड लावा किंवा ५ महिन्यासाठी मनाई करा. नाही तर जेवढया किंमतीची निविदा केल्या आहेत त्याच्या एक टक्के दंड लावा. त्यांना असे केले तर ते परत हिम्मत करणारच नाहीत. ५ टक्के दंड लावा तर जेवढया वेळा चुकी करतील त्यावेळी ५ टक्के दंड भरत जातील ५ लाख रूपयें महापालिकेचा फायदा होईल. नाहीतर एक वर्ष तो महापालिकेत येणार नाही. कमी दर दाखवला आता काम होईल नाही होणार कमी तर दाखवला आहे. आपल्या अतिरिक्त आयुक्त मॅडमने जे सुरु केले आहे ते शहराच्या फायदयासाठी आहे. नुकसानासाठी नाही. त्यांनी जी लगाम लावली आहे त्याचा पण एक फायदा आहे.त्या प्रमाणे लगाम लावा. याला पास करा. आम्ही याचा विरोध नाही करु शकत.

**<u>आयुक्तांच्या स्थानी, अतिरिक्त आयुक्त, श्रीम. करूणा जुईकर:—</u>**त्यांना नोटीस इश्यु करा.

**<u>शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—</u>** सर लवकरात लवकर काम करायचे आहे, जसे की, सी.सी. रोड असतात, तसेच नाली आणि इतर...

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** १०००/— रूपये, ५००/— रूपये स्टॅम्प पेपरची आवश्यकताच नाही. आपण कंडीशन..

**स्थायी समिती सभपती, श्री. दिपक सिरवानी:—** असे दुस—या कामामध्ये नाही झाले पाहीजे. जसे हे मिसगाईड करीत आहेत. आपल्या विभागाला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** यांना दंडात्मक करण्याची कारवाई सुरू करा.

**आयुक्तांच्या स्थानी, अतिरिक्त आयुक्त, श्रीम. करूणा जुईकर:—** सन्मान्य सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**महापालिका सचिव:—** ठराव असा होईल ही स्थायी समिती उल्हासनगर—३ येथील सातारा कॉलनीमधील शाम शिंदे हाऊस ते साळवी हाऊस पर्यंतचे रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करण्यास मान्यता देत आहे. आणखी काही ठरावात टाकायचे असेल तर सांगा.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** सर आमच्याकडून ॲक्शन घेण्यात येईल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** इतिवृत्ताची वाट न पहाता, हे काम त्वरीत सुरू करा.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** आता येथून पुढे आम्ही लक्ष देवू.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .

---

☑ **विषय क्र. ८ :—** उल्हासनगर -३ येथील सातारा कॉलनी मधील शाम शिंदे हाऊस ते साळवी हाऊस पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणे

**प्रस्तावना**

**उल्हासनगर -३ येथील सातारा कॉलनी मधील शाम शिंदे हाऊस ते साळवी हाऊस पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणे** आवश्यक असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सदर कामाचे रुपये ४९,८५,९००/- एवढया खर्चाचे प्राकलन तयार करुन सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्यात आली व नियमाप्रमाणे सदर कामाची निविदा प्रक्रिया करण्यात आली त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.१**

| | | |
|---|---|---|
| १. | प्राकलनीय खर्च | रु.४९,८५,९००/- |
| २. | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २३/०३/२०२१ |
| ३. | निविदा विक्री कालावधी | दिनांक २३/०३/२०२१ ते ०५/०४/२०२१ |
| ४. | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०५/०४/२०२१ |
| ५. | प्रथम मुदतवाढ | - |
| ६. | द्वितीय मुदतवाढ | - |
| ७. | तृतीय मुदतवाढ | - |
| ८. | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १२/०४/२०२१ |
| ९. | आर्थिक भाग उघडल्याचा दिनांक्र | दिनांक ०५/०५/२०२१ |
| १०. | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |
| ११. | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

सदर निविदेचा तांत्रिक भाग दिनांक १२/०४/२०२१ रोजी निविदा समिती समोर उघडण्यात आला. त्यामध्ये **१) मे. झा. पी. ॲण्ड कंपनी २) मे. रवि एंटरप्रायजेस ३) मे. ऋषी कन्स्ट्रक्शन** यांनी निविदा सादर केल्या आहेत. त्याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे

**तक्ता क्र.२**

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. झा. पी. ॲण्ड कंपनी | मे. ऋषी कन्स्ट्रक्शन | मे. रवि एंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|
| १. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती मागील ३ वर्ष | होय | होय | होय |
| २. | कामाचा अनुभव मागील ३ वर्षाचे वार्षिक उत्पन्न | होय | होय | होय |
| ३. | पॅन कार्डाची प्रत | होय | होय | होय |
| ४. | संस्था /कंपनी नोंदणी ( भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे दस्ताऐवज | होय | होय | होय |
| ५. | ई.पी.एफ. व जी.एस.टी. प्रमाणपत्र प्रत | होय | होय | होय |
| ६. | कंत्राटदाराची निविदा भरण्याच्या सक्षमता | होय | होय | होय |
| ७. | निविदेमध्ये दिलेल्या नमुन्यात रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे. | होय | होय | **नाही** |
| ८ | कंत्राटदाराची घोषणा | होय | होय | होय |
| ९ | पात्र/अपात्र | पात्र | पात्र | **अपात्र** |

उक्त तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार निविदाकांराच्या कागदपत्रांची छाननी केली. त्यामध्ये **मे. रवि एंटरप्रायजेस** या निविदाकारानी रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्राची मूळ प्रत देण्याकरिता कळविले होते. परंतु सदर निविदाकाराने प्रतिज्ञापत्राची मूळ प्रत जोडलेली नसल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात येत असून **१) मे. झा. पी. ॲण्ड कंपनी २) मे. ऋषी कन्स्ट्रक्शन** हे दोन निविदाकार पात्र ठरत असल्याने त्यांचे निविदेचा आर्थिक भाग (Financial Bid) उघडणेत आला.

उक्त तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार **उल्हासनगर -३ येथील सातारा कॉलनी मधील शाम शिंदे हाउस ते साळवी हाऊस पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणे** या कामाकरीता **मे. झा. पी. ॲण्ड कंपनी** यांनी प्राकलनीय दराप्रमाणे **०.९९०% टक्के कमी** दर सादर केले आहेत. सदर दर निम्न आहेत.

| अ.क्र. | .निविदाकारांचे नाव | दिलेले दर (टक्के प्रमाणे) |
|---|---|---|
| १. | मे. झा. पी. ॲण्ड कंपनी | दिलेले दर ०.९९०% टक्के कमी |
| २. | मे. ऋषी कन्स्ट्रक्शन | दिलेले दर १.२००% टक्के जास्त |

उक्त तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार **उल्हासनगर -३ येथील सातारा कॉलनी मधील शाम शिंदे हाउस ते साळवी हाऊस पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणे** या कामाकरीता **मे. झा. पी. ॲण्ड कंपनी** यांनी प्राकलनीय दराप्रमाणे **०.९९०% टक्के कमी** दर सादर केले आहेत. सदर दर निम्न आहेत.

तरी **मे. झा. पी. ॲण्ड कंपनी** यांची निम्न दराची निविदा मान्य करण्यास व निविदाकाराशी संविदा करणेस मा. स्थायी समितीचे मान्यतेस्तव प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.०५** **दिनांक : ७/०७/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर -३ येथील सातारा कॉलनी मधील शाम शिंदे हाऊस ते साळवी हाऊस पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणेकामी निम्म् दराचे निविदाकार **मे. झा. पी. ॲण्ड कंपनी** यांची निम्न दराची निविदा मान्य व निविदाकाराशी संविदा करणेस व येणारा खर्च रुपये ४९,८५,९००/ यास मान्यता देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

**सर्वानुमते**

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-** विषय क्रमांक ९ वाचून दाखवितात.

---

⇨**विषय क्र. ९:– उल्हासनगर-२ प्रभाग क्र. ७ मधील संत ज्ञानेश्वर नगर गेट ते जगु चहावाला पर्यंत पेव्हमेंट रोड व नाली बनविणे**या कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकाराशी संविदा करणे.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–** यामध्ये ५००/– रूपयाच्या टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र यामध्ये रविराज इंटरप्रायजेस आणि मे.रिशी कन्स्ट्रक्शन यांनी सादर केलेले नाही व मे.झा. पी.ॲन्ड कंपनी व एम. रामचंदानी यांनी सादर केलेले आहे. तर रविराज इंटरप्रायजेस आणि मे.रिशी कन्स्ट्रक्शन ब्लॅकलिस्ट करून टाका. परत परत असेच करणे, बंद होईल.

**आयुक्तांच्या स्थानी, अतिरिक्त आयुक्त, श्रीमती करुणा जुईकर:–** सन्माननीय सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्य, आता पुरस्वानी सरांनी सांगितल्या प्रमाणे ठरवून काही ठेकेदार जाणून बुजून जर प्रकियेला विलंब करत असतील तर त्यांना एकदा फक्त सुचना देवून नंतर त्यांच्यावर आपण ॲक्शन घेउ शकतो. अशा केसेसमध्ये आणि त्याप्रमाणे आम्ही विभाग प्रमुखांना निर्देश दिलेले आहेत.

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:–** पास..पास...

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी:–** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..पास...

**महापालिका सचिव :–** पास हा ठराव इतिवृत्ताची वाट न पाहता पास झाला आहे.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे. 👍

---

☑ **विषय क्र. ९ :–** उल्हासनगर-२ प्रभाग क्र. ७ मधील संत ज्ञानेश्वर नगर गेट ते जगु चहावाला पर्यंत पेव्हमेंट रोड व नाली बनविणे **या कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकाराशी संविदा करणे.**

**प्रस्तावना**

उल्हासनगर-२ प्रभाग क्र. ७ मधील संत ज्ञानेश्वर नगर गेट ते जगु चहावाला पर्यंत पेव्हमेंट रोड व नाली बनविणे आवश्यक असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सदर कामाचे रुपये ८६,५०,०००/- एवढया खर्चाचे

प्राकलन तयार करुन सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्यात आली व नियमाप्रमाणे सदर कामाची निविदा प्रक्रिया करण्यात आली त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.१**

| | | |
|---|---|---|
| १. | प्राकलनीय खर्च | **रु.८६,५०,०००/-** |
| २. | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १७/०३/२०२१ |
| ३. | निविदा विक्री कालावधी | दिनांक १७/०३/२०२१ ते ०८/०४/२०२१ |
| ४. | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०८/०४/२०२१ |
| ५. | प्रथम मुदतवाढ | - |
| ६. | द्वितीय मुदतवाढ | - |
| ७. | तृतीय मुदतवाढ | - |
| ८. | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक ०९/०४/२०२१ |
| ९. | आर्थिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १७/०५/२०२१ |
| १०. | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ५ |
| ११. | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ५ |

सदर निविदेचा तांत्रिक भाग दिनांक **०९/०४/२०२१** रोजी निविदा समिती समोर उघडण्यात आला. त्यामध्ये **१) मे.झा.पी. अ‍ॅन्ड कं. २) मे.ए.एम. रामचंदानी ३) मे. रवी एंटरप्रायझेस ४) मे. रिशी कंस्ट्रक्शन ५) मे. एम. डेक. इंजिनियर्स** यांनी निविदा सादर केल्या आहेत. त्याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे :-

**तक्ता क्र.२**

| **अ. क्र.** | **निविदाकाराच्या निविदेमधील बाबी** | **मे.झा.पी. अ‍ॅन्ड कं.** | **मे.ए.एम. रामचंदानी** | **मे. रवी एंटरप्रायझेस** | **मे. रिशी कंस्ट्रक्शन** | **मे. एम.डेक. इंजिनियर्स** |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती मागील ३ वर्ष | होय | होय | होय | होय | होय |
| २. | कामाचा अनुभव मागील ३ वर्षाचे वार्षिक उत्पन्न | होय | होय | होय | होय | होय |
| ३. | पॅन कार्डाची प्रत | होय | होय | होय | होय | होय |
| ४. | संस्था /कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे दस्ताऐवज | होय | होय | होय | होय | होय |
| ५. | ई.पी.एफ. व जी.एस.टी. प्रमाणपत्र प्रत | होय | होय | होय | होय | होय |
| ६. | कंत्राटदाराची निविदा भरण्याच्या सक्षमता | होय | **नाही** | होय | **नाही** | **नाही** |
| ७. | निविदेमध्ये दिलेल्या नमुन्यात रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे. | होय | होय | होय | **नाही** | **नाही** |
| ८. | कंत्राटदाराची घोषणा | होय | होय | होय | होय | होय |
| ९. | पात्र/अपात्र | **पात्र** | **अपात्र** | **पात्र** | **अपात्र** | **अपात्र** |

उक्त तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार निविदाकांराच्या कागदपत्रांची छाननी पुर्ण करण्यात आली. **१) मे.ए.एम. रामचंदानी २) मे. एम. डेक. इंजिनियर्स व ३)मे. रिशी कंस्ट्रक्शन** यांनी कंत्राटदाराची निविदा भरण्याच्या सक्षमता दर्शविणारी कागदपत्र जोडलेली नसल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. तसेच १) **मे. एम. डेक. इंजिनियर्स व २) मे. रिशी कंस्ट्रक्शन** यांनी रु.५०० च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर केले नाही, याबाबत त्यांना दि. १६/०४/२०२१ रोजी च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते परंतु त्यांनी प्रतिज्ञापत्र सादर केले नसल्याने अपात्र ठरले आहेत. त्यामुळे उर्वरित **१) मे.झा.पी. अ‍ॅन्ड कं. व २) मे. रवी एंटरप्रायझेस** हे दोन निविदाकार पात्र ठरले आहेत.

तरी वरीलप्रमाणे पात्र/अपात्र निविदाकारांची माहिती दि. १४/०५/२०२१ रोजी सायं. ४.०० वाजेपासून ते दि. १७/०५/२०२१ सायं. ४.०० वाजेपर्यंत या कालावधीकरीता उल्हासनगर महानगरपालिकेच्या www.umc.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे ulhasnagar.pwd@gmail.com या मेलवर व शहर अभियंता यांचे कार्यालयात लेखी स्वरुपात हरकती सूचना मागविणेस मान्यता घेऊन प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु सदर कालावधीमध्ये कोणत्याही सूचना/हरकती प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे निविदेची पुढील कार्यवाही पुढीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.३**

| अ.क्र. | .निविदाकारांचे नाव | दिलेले दर (टक्के प्रमाणे) |
|---|---|---|
| १. | मे. झा. पी. ॲण्ड कंपनी | दिलेले दर ३.३३० % टक्के कमी |
| २. | मे. रवि एंटरप्रायजेस | दिलेले दर ०.९९० % टक्के कमी |

वरील तक्त्यात नमुद उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर-२ प्रभाग क्र. ७ मधील संत ज्ञानेश्वर नगर गेट ते जगु चहावाला पर्यंत पेव्हमेंट रोड व नाली बनविणे या कामाकरीता **मे. झा. पी. ॲण्ड कंपनी** यांनी ११.५१० % टक्के कमी दर सादर केले आहे. सदर दर निम्न आहेत. शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि.२६ नोव्हेंबर,२०१८अन्वये लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर निम्न दराच्या निविदाकाराने Performance Security Deposit आठ दिवसाच्या आत जमा करणे बंधनकारक आहे. **मे. झा. पी. ॲण्ड कंपनी** यांनी रु.८७,०००/- एवढया रक्कमेचे परफॉमन्स सिक्युरीटी आठ दिवसात भरणे आवश्यक आहे.

तरी निम्न दराचे निविदाकार **मे. झा.पी. ॲण्ड कंपनी** यांचेशी संविदा करणेकामी स्थायी समितीच्या मान्यतेकरीता प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.०६** **दिनांक : ७/०७/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-२ प्रभाग क्र. ७ मधील संत ज्ञानेश्वर नगर गेट ते जगु चहावाला पर्यंत पेव्हमेंट रोड व नाली बनविणे या कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार **मे. झा.पी. ॲण्ड कंपनी** यांचेशी संविदा करणेस व येणारा अंतर्भूत खर्च रककम रुपये ८६,५०,०००/ यास मान्यता देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

**सर्वानुमते**

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-** विषय क्रमांक १० वाचून दाखवितात.

**⇨विषय क्र. १०:— श्री.बी. एस.पाटील, सेवानिवृत्त शाखा अभियंता, उल्हासनगर महानगरपालिका यांना पुढील ०६ महिन्याच्या कालावधीकरीता नियुक्ती करणेबाबत.**

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:—** पास..पास...

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी:—** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..पास...

**महापालिका सचिव :—** हा ठराव इतिवृत्ताची वाट न पाहता पास झाला.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

☑ **विषय क्र. १० :—** श्री.बी. एस.पाटील, सेवानिवृत्त शाखा अभियंता, उल्हासनगर महानगरपालिका यांना पुढील ०६ महिन्याच्या कालावधीकरीता नियुक्ती करणेबाबत.

**प्रस्तावना**

पाणी पुरवठा विभागाकडुन महाराष्ट्र जीवन प्राधीकरण येथे प्रतिनियुक्तीवर शाखा अभियंता/अभियंता यांची मागणी केलेली आहे. श्री. बी.एस.पाटील, सेवानिवृत्त शाखा अभियंता, यांनी उल्हासनगर महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर काम केलेले आहे. त्यामुळे त्यांना पाणी पुरवठा विभागाचा कामाचा अनुभव आहे. तसेच महापालिका आस्थापेवरील कर्मचारी/अधिकारी यांची कमतरता लक्षात घेता शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-/२७१९/प्र.क्र.१०००/१३,दिनांक १७ डिसेंबर २०१६ या निर्णयातील तरतुदीनुसार ०६ महिन्यासाठी अटी व शर्तीच्या अधिन राहून श्री. बी.एस.पाटील, सेवानिवृत्त शाखा अभियंता यांना कार्यालयीन आदेश क्र. जा.क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१४४/२०२१ दिनांक १५/०२/२०२१ रोजीच्या आदेशान्वये ०६ महिन्यासाठी मानधन तत्वावर अटी व शर्तीच्या अधिन राहुन नियुक्त करण्यात आले होते. त्यांचा ०६ महिन्याच्या कालावधी दिनांक ०५/०४/२०२१ रोजी संपुष्टात आलेला आहे.

श्री. बी.एस.पाटील, सेवानिवृत्त शाखा अभियंता, उल्हासनगर महानगरपालिका यांना उपरोक्त शासन निर्णयानुसार ०६ महिन्याच्या कालावाधी करिता पुन्हा नियुक्ती करणेसाठी मा. स्थायी समिती पटलावर मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.०७** **दिनांक : ७/०७/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री.बी. एस.पाटील, सेवानिवृत्त शाखा अभियंता, उल्हासनगर महानगरपालिका यांना शासन निर्णयानुसार ०६ महिन्याच्या कालावाधी करीता नियुक्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-** विषय क्रमांक ११ वाचून दाखवितात.

---

⇨**विषय क्र. ११:– उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कोवीड-१९ अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या RTPCR Lab करिता तात्पुरत्या स्वरुपात (कंत्राटी पध्दतीने) मनुष्य बळाची पुर्तता वाढवुन २४ x ७ या पुर्ण वेळ प्रयोगशाळा सुरु ठेवणे याबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती यांचे माहितीस्तव सविनय सादर.**

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–** पास.. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**महापालिका सचिव:–** माहितीस्तव आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:–** कशाबाबत माहिती.

**महापालिका सचिव:–** संबंधीत विभाग सांगेल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–** आर.टी.पिसी.आर. टेस्टचा आहे, कोणती मोठी गोष्ट नाही. काम होत आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:–** जरा समजू तर दया साहेब.

**मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:–** सन्माननीय सभापती, सन्माननीय सदस्य मी आपल्या असे निदर्शनास आणू इच्छितो की, आर.टी.पिसी.आर. लॅब आपल्याकडे फक्त एकाच सेंटरमध्ये सुरू होते सध्या ती आता आपण २४ x ७ म्हणजे तीन्ही वेळेस सुरळीत चालू केली आहे. तिन्ही शिफ्टमध्ये त्याठिकाणी आपल्या टेस्ट करतात.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:–** कुठे चालू केली आहे सर.

**मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी, श्री.दिपक पगारे:–** शहाड येथे कोणार्क रेसिंडन्सी महानगरपालिकेन...

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:–** यामध्ये महापलिकेन घ्यायला पाहीजे होता, ते घेतले आहे. मी सांगतो आपल्याला आर.टी.पिसी.आर. लॅबचे २४ x ७ चालू आहे जनतेला कसे माहित होणार चालू आहे ते.

**मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी, श्री.दिपक पगारे:–** जे स्मॅपल असतात ते कंडक्ट करतात. जेथे कॅम्प असातात तेथून आपण स्मॅपल येथे घेवून येतो. मग टेस्ट होते.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:–** हि फक्त लॅब आहे, सॅम्पल गोळा करीत नाहीत.

**मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी, श्री.दिपक पगारे:–** होय सॅम्पल आम्ही तिथून कट करतो.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u>** कॅम्प मधून गोळा करुन येथे टेस्ट केली जाते. २४ X ७ तास येथे काम केले जाते. किती तासात रिपोर्ट देते ही आर. टी. पीसी. आरचे?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** इतिवृत्ताची वाट न पहाता पास..

**<u>महापालिका सचिव:—</u>** माहीतीसाठी आहे, माहितीची नोंद करण्यात येत आहे.हा ठराव इतिवृत्ताची वाट न पाहता पास झाला आहे.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .

---

☑ **विषय क्र. ११ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कोवीड-१९ अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या RTPCR Lab करिता तात्पुरत्या स्वरुपात (कंत्राटी पध्दतीने) मनुष्य बळाची पुर्तता वाढवुन २४ x ७ या पुर्ण वेळ प्रयोगशाळा सुरु ठेवणे याबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती यांचे माहितीस्तव सविनय सादर .

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, टिप्पणी पृष्ठ क्रमांक १ ते २३ वर प्रस्तावित केल्यानुसार मा. आयुक्त् यांचेकडील मान्यतेनुसार Lab Care Plus Diagnostic Consultancy यांना दिनांक २१/०३/२०२१ ते ३०/०४/२०२१ या कालावधीत पुढील मुदतवाढ देण्यात आलेली आहे. कोरोना विषाणू आजाराची दुसरी लाट आलेली असून सद्यस्थितीत कोरोना बाधित रुग्णांच्या संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ होत आहे. सदर आजाराचा प्रादुर्भाव वेळीच रोखण्यासाठी कोरोना संशयित रुग्णांचे स्वॅब नमुन RTPCR प्रयोगशाळेत तपासुन प्राप्त् अहवालाच्या अनुषंगाने सदर रुग्णांस वेळीच तात्काळ औषधोपचार करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत मा. आयुक्त यांचेकडील मान्यतेनुसार मंजुर दरपत्रकानुसार खालील प्रमाणे मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

**तक्ता - अ**

| अ.क्र | पदनाम | शैक्षणिक अहर्ता | संख्या | प्रति मानधन | अंदाजे मासिक वेतन |
|---|---|---|---|---|---|
| १ | MD MICRO/MD PATH | MBBS M.D | ०१ | रु. १००,०००/- | रु. १,००,०००/- |
| २ | CENTRE HEAD | B.Sc | ०१ | रु. ७५,०००/- | रु. ७५,०००/- |
| ३ | SR TECHNICIAN | B.Sc DMLT | ०४ | रु.३७,५००/- | रु.१,५०,०००/- |
| ४ | JR TECHNICIAN | B.sc DMLT | ०३ | रु.२५,०००/- | रु.७५,०००/- |
| ५ | SAMPLE ACCESSOR | B.Sc | ०३ | रु. १०,०००/- | रु.३०,०००/- |
| ६ | DATA ENTRY OPERATORS | १२th English & Marathi Typing | ०२ | रु.१५,०००/- | रु.३०,०००/- |
| एकुण | | | १४ | - | रु.४,६०,०००/- |

कोरोना विषाणू आजाराची दुसरी लाट आल्याने सदर रुग्णांची होणारी वाढ लक्षात घेता सदर RTPCR प्रयोगशाळा २४ x ७ तास नियमितपणे सुरु करणे आवश्यक असल्याने मनुष्यबळ वाढ करणेबाबत मा. आयुक्त सो., यांचेकडील आदेशान्वये संदर्भियपत्र क्रमांक-३ अन्वये मे. Lab Care Plus Diagnostic Consultancy यांना या कार्यालयामार्फत तसे कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने संदर्भिय पत्र क्रमांक-४ अन्वये मे. Lab Care Plus Diagnostic Consultancy यांनी सदर RTPCR प्रयोगशाळा २४ x ७ तास नियमितपणे सुरु ठेवण्यासाठी खालील प्रमाणे मनुष्यबळ वाढीचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**तक्ता - ब**

| अ.क्र | पदनाम | शैक्षणिक अहर्ता | संख्या | प्रति मानधन | अंदाजे मासिक वेतन |
|---|---|---|---|---|---|
| १ | MD MICRO/MD PATH | MBBS M.D | ०२ | रु. १००,०००/- | रु. २,००,०००/- |
| २ | CENTRE HEAD | B.Sc | ०२ | रु. ७५,०००/- | रु.१,५०,०००/- |
| ३ | SR TECHNICIAN | B.Sc DMLT | ०८ | रु.३७,५००/- | रु.३,००,०००/- |
| ४ | JR TECHNICIAN | B.sc DMLT | ०६ | रु.२५,०००/- | रु.१,५०,०००/- |
| ५ | SAMPLE ACCESSOR | B.Sc | ०६ | रु. १०,०००/- | रु.६०,०००/- |
| ६ | DATA ENTRY OPERATORS | १२th English & Marathi Typing | ०४ | रु.१५,०००/- | रु.६०,०००/- |
| एकुण | | | २८ | - | रु.९,२०,०००/- |

तरी सदर कोवीड रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता उल्हासनगर शहरातील कोवीड रुग्णांच्या व जनतेच्या हितासाठी तातडीच्या प्रसंगी आरोग्य सेवा पुरविणे आवश्यक आहे. याकरिता RTPCR प्रयोगशाळेत तातडीने मनुष्यबळ वाढ करणे आवश्यक आहे. तरी तक्ता क्रमांक- ब नुसार व मंजुर दरपत्रकानुसार कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात मनुष्यबळ वाढ करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात मनुष्यबळ वाढीनुसार २४ x ७ तास RTPCR प्रयोगशाळा सुरु ठेवण्याकरिता दर माहे रु. ९,२०,०००/- ऐवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा सन २०२१-२०२२ मधील विपरीत परिस्थिती व्यस्थापन B-२(३) या लेखाशिर्षातुन किंवा Covide-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधातून करण्यासाठी व कोवीड-१९ चा वाढता प्रादुर्भाव पाहता Lab Care Plus Diagnostic Consultancy यांना RTPCR प्रयोगशाळा २४ x ७ तास नियमितपणे पुर्ण वेळ सुरु ठेवण्याकरिता वाढीव मनुष्यबळ पुरवठा करणेबाबत कोवीड संपेपर्यत कार्यादेश देण्यात आलेला आहे व सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती यांचे माहितीस्तव सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.०८** **दिनांक : ७/०७/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कोवीड-१९ अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या RTPCR Lab करिता तात्पुरत्या स्वरुपात (कंत्राटी पध्दतीने) मनुष्य बळाची पुर्तता वाढवुन २४ x ७ या पुर्ण वेळ प्रयोगशाळा सुरु ठेवण्याच्या माहितीची नोंद करण्यात येत आहे.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

**सर्वानुमते**

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव:-** विषय क्रमांक १२ वाचून दाखवितात.

---

**➩विषय क्र. १२:—** कोरोना (COVID-१९) विषाणूच्या तपासणी करीता आधुनिक व सुसज्ज प्रयोगशाळेची उभारणी करणेच्या कामास कार्योत्तर मान्यता मिळणे.

---

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** कार्योत्तर मान्यता. नाही, मी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम असा शब्द वाचला नाही. कोणत्या सेक्शनमध्ये असतो ते सांगा. कार्योत्तर मंजूरी या कार्योत्तर मान्यता. यामध्ये कोणताही फरक नाही. कोणत्या सेक्शनमध्ये आहे, कोणत्या अधिकारमध्ये आहे. कुणाला अधिकार आहे जरा सांगा.

**उप अभियंता, श्री. तरुण सेवकानी:—** मा. सभापतीजी, आणि सन्माननीय सदस्य एक तर ही महामारी आल्यामुळे खुप सा—या केसेस या शहरात आरटीपीसीआर च्या केसेस वाढत होत्या. तर आम्हांला त्यासाठी एक लॅब पाहिजे होती. आरटीपीसीआर ची व त्यांची मान्यता मा. मुख्यमंत्री आणि जिल्हाधिकाच्या मान्यतेने म्हणजे स्वतंत्र लॅब उल्हासनगर शहरासाठी पाहिजे होती. तेव्हा आपण आरटीपीसीआर टेस्टींगसाठी शहराच्या बाहेर पाठवत होतो. ते आता आपण आपल्याच शहरात टेस्ट करुन जसे लवकरात लवकर रिझल्ट येतो. म्हणून ते आम्हांला लवकर करणे भाग होते म्हणुन त्याचे काम केल्यानंतर आम्ही मान्यता घेत आहोत.

**महापालिका सचिव:—** आयुक्त साहेबांना अधिकार आहेत Emergency हा निर्णय घेण्याचा. मी वाचू का?

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** ६७ (३) आपणच वाचू शकता हे दुसरे कोणी नाही.

**महापालिका सचिव:—** असे लिहिले आहे कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुस—या एखादया नगरपालिका प्राधिका—याच्या किंवा राज्य शासनाच्या मंजूरी, मान्यता किंवा प्राधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली जाईल. परंतु आयुक्ताने त्याने केलेली कार्यवाही, त्याबाबतची कारणे आणि या अधिनियमाच्या तरतुदींन्वये चालू अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ट नसलेला जो कोणताही खर्च अशा कार्यवाहीमुळे झाला असेल किंवा होण्याचा संभव असेल तो खर्च या विषयीचे प्रतिवृत्त स्थायी समिती व महापालिका यांचेकडे ताबडतोब पाठविले पाहिजे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** कधी बनवले आहे?

**उप अभियंता, श्री. तरुण सेवकानी:—** हे मागच्या वर्षी ऑक्टोबर मध्ये आम्ही बनविले.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** आपण एक वर्ष खर्च केला आहे आणि आता एक वर्षानंतर आणले आहे. आपण निर्णय कधी घेतला आपली फाईल दाखवा.

**उप अभियंता, श्री. तरुण सेवकानी:—** मार्च २०२१ मध्ये.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** आपण आता काय बोलले ३१ मार्च २०२१ पर्यंत स्थायी समिती होती.

**उप अभियंता, श्री. तरुण सेवकानी:—** २ जून २०२१ ला मंजूर झाले आहे. त्यामुळे आम्ही मार्च....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** आम्ही याला पास करीत आहेत.

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:—** शिकण्यास मिळाले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** आशा आहे.

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:—** पास..पास..

**महापालिका सचिव:—** पास...

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

☑ **विषय क्र. १२:— कोरोना** (COVID-१९) **विषाणूच्या तपासणीकरीता आधुनिक व सुसज्ज प्रयोगशाळेची उभारणी करणेच्या कामास कार्योत्तर मान्यता मिळणे.**

**प्रस्तावना**

राज्यात दिवसेंदिवस कोरोना (Corona) रुग्णांची संख्या वाढत चालली असून ही बाब निश्चितच चिंतेची आहे. आगामी काळात कोरोनाचे आव्हान यशस्वीपणे पेलण्यासाठी हा लढा सकारात्मकरित्या लढावा लागेल. मार्च महिन्यात कोरोनाची चाचणी करणाऱ्या राज्यात केवळ दोनच लॅब होत्या. आज त्यांची संख्या 110 वर पोहोचली आहे. येत्या काळात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी कोरोनाची चाचणी करणाऱ्या प्रयोगशाळा (Covid १९ Testing Lab) उभारल्या जाणार असल्याचे प्रतिपादन मा.मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले.

उल्हासनगर शहरातील कोरोना रुग्णांची संख्या वाढत चालली असल्याने येथील रुग्णांच्या सोयीकरीता थर्मोफिशयर या अमेरीकन कंपनीचे चाचणी साहित्य (Testing Material) शासनातर्फे आले आहे. त्यामुळे उल्हासनगर-१ येथील कोनार्क रेसीडेंसी येथे प्रयोगशाळा (Covid १९ Testing Lab) उभारणीकरीता काम सुरु करण्यात आले आहे. काम सुरु असताना मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनीही सदर कामाची पाहणी केली आहे.

सध्या कोरोना रुग्णांची वाढती संख्या पाहता तसेच येणाऱ्या काळात आरोग्य यंत्रणेसह आपणा सर्वांसमोर कोरोनामुळे होणारा मृत्युदर कमी ठेवण्यासाठी सर्वंकष व सामुहिक प्रयत्नांची गरज असल्याचे निकष समोर ठेऊन आयुक्त, वैद्यकीय आरोग्य अधिकारी व संपूर्ण आरोग्य यंत्रणेचा असा निर्णय झाला की, शहरात कायमस्वरुपी आधुनिक व सुसज्ज प्रयोगशाळेची उभारणी करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याअनुषंगाने उल्हासनगर-१ येथील कोनार्क रेसीडेंसी येथील प्रयोगशाळेच्या उभारणीच्या कामात वाढ करुन सुसज्ज प्रयोगशाळा उभारणीचे आदेश मा.जिल्हाधिकारी, ठाणे, आयुक्त व वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी दिल्या. त्यानुसार या प्रयोगशाळेच्या उभारणीच्या कामात वाढ करण्यात आली.

या प्रयोगशाळेच्या माध्यमातून नागरिकांना कोरोना विषाणूची तपासणी करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. आरोग्याच्या सुविधांमध्ये वाढ होणार आहे तसेच येणाऱ्या काळात या सुविधा कायम स्वरूपी उपलब्ध होणार आहेत. कोव्हिड बरोबरच या प्रयोगशाळेत एचआयव्ही, क्षयरोग, साथीचे आजार, एमआरआय यासह अन्य तपासण्या केल्या जातील. या प्रयोगशाळेच्या माध्यमातून आपणांस दररोज लवकरात लवकर कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांचे अहवाल प्राप्त होणार असल्यामुळे त्यांच्या निकट सहवासितांची ओळख होईल व त्यांच्या देखील तपासण्या करुन कोरोनाची साखळी तोडण्याबरोबरच कोव्हिड बाधितांवर तातडीने उपचार करणे सोयीचे होणार आहे तसेच प्लाझ्मा थेरपी व ॲन्टीबॉडी टेस्टिंग मशिन शासनाकडून उपलब्ध झाल्यास त्याही सुविधा उपलब्ध होतील. उल्हासनगर शहरात कोरोनाची रुग्णसंख्या जरी वाढत असली तरी कोरोनामुक्त होणाऱ्या रुग्णांची संख्या देखील अधिक आहे. या अत्याधुनिक प्रयोगशाळेच्या माध्यमातून दैनंदीन चाचण्यांमध्ये वाढ होणार आहे.

अशाप्रकारे वरील वस्तुस्थिती लक्षात घेता उल्हासनगर-१ येथील कोनार्क रेसीडेंसी येथे आरोग्य यंत्रणेच्या मार्गदर्शनानुसार सुसज्ज व अत्याधुनिक प्रयोगशाळा तयार करण्याची स्थापत्य स्वरुपाची कामे मे.झा.पी.ॲण्ड कंपनी या संस्थेतर्फे पूर्ण करण्यात आली आहेत. या कामांवर रुपये ६५,४०,७००/- एवढा खर्च करण्यात आला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) ‘क’ मध्ये नमूद केलेप्रमाणे कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुस-या एखादया नगरपालिका प्राधिका-याच्या किंवा १ (राज्य) शासनाच्या मंजूरी, मान्यता किंवा प्राधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहीजे असे नमूद आहे.

वरील बाबी विचारात घेता उल्हासनगर १-येथील कोनार्क रेसीडेंसी येथे सुसज्य प्रयोगशाळा )Covid १९ Testing Lab) उभारणीकरीता रुपये -/६५,४०,७००एवढया रक्कमेच्या कामाकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) ‘क’ अंतर्गत मा.स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.०९** **दिनांक : ७/०७/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कोरोना (COVID-१९) विषाणूच्यातपासणीकरीताआधुनिक व सुसज्ज प्रयोगशाळेची उभारणी करणेच्या कामास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

**सर्वानुमते**

सभापती / पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-** विषय क्रमांक १३ वाचून दाखवितात.

---

⇨**विषय क्र. १३**:— उल्हासनगर-४ येथील छत्रपती शिवाजी महाराज नगर रहिवासी संघ चौक ते गजानन नगर प्रवेशद्वार ते एकविरा माता मंदीर पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे या कामाकरीता निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणे.

---

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** एक पॅनल नं. १४ मध्ये आहेत. उल्हासनगर कॅम्प नंबर २ मध्ये येते. चार नगरसेवक आहेत. श्री. सुरेश जाधव, अरुण आशान सर. सर आपण ज्या सुचना दिल्या आहेत त्यानुसार कार्यवाही करणार. आणि नंतरच्या

मिटिंगमध्ये आपल्याला त्याचा रिझल्ट पण मिळेल. आम्हांला आपला पाठिंबा मिळाला १०० टक्के काम होईल.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** पहीले केले नाही का?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** सर आता आम्हांला तुमचा पाठिंबा मिळाला आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** काय झाले आहे?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** टेंडर कॉल केले आहे सर, ६ लोक आले होते. तीन लोक अपात्र ठरले.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** काय अटी, शर्ती होत्या. आपण आता बोलले ना अपात्र केले आहे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** साहेब त्यांच्याकडे मशीन नव्हत्या,

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** तर पात्र होण्यास काय काय कंडीशन आहेत?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** पात्र होण्यास त्यांना एक तर ओनर शिप मशीनस पाहिजे, प्लन पाहिजे, डंपर पाहिजे. त्यांच्या स्वत:च्या मशीनस पाहीजेत, १६ पॉईट पाहिजेत.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** हया ज्या पात्रतेच्या अटी बनविल्या आहेत त्या कोणत्या जी.आर. च्या आधारे बनवल्या आहेत.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** बाकी तर कॉमन आहेत. आणि ज्या ज्या महत्वाच्या आहेत. पॅन कार्ड, लायसन्सस त्या कधी पण लागतात सर.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** तुम्ही मला सांगा, प्लीज सर्टीफिकेट ऑफ रजिस्ट्रेशन आपण इथे लिहिले अॅस्टेडेट कॉपी आहे, जी.एस.टी., आय.टी. रिटर्न इन्स्ट्रुमेंट, सी.ए., पी.एफ., सेमी गव्हर्नमेंट, गव्हर्नमेंट पाच पाच वर्षामध्ये

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** इथे लिहीले नाही, पण कंडीशन आहेत ना. टेंडर कन्डीशन आहेत सर.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** आता तुम्ही मला सांगा की, ११ नंबर कंडीशन आपण टाकली आहे, टॅक्टर, डंपर पाहीजेत निविदा कमिटीचे लोक येथे बसलेले आहेत, कमिटीही टेंडर बनवतात, अशा कन्डीशनची गरज काय आहे?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** त्यांच्याकडे मशीनस असणे गरजेचे आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया :—** किती करोडचे काम आहे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी :—** १कोटी ८५ लाख चे काम आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया :—** आपण म्हणता या १ कोटी कामासाठी, २ कोटीच्या कामासाठी रेडी मिक्स प्लन्ट पण पाहिजे रोलर पण पाहीजे, ट्रक पण पाहीजेत, फिरणारा मिक्सर पण पाहीजे, मशिनरी किතीची आहे?

**<u>शहर अभियंता, श्री. महेश सितलानी :—</u>** मशिनरी कितीची ही असु दया. आपली एक अट आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :—</u>** आज मला सांगा. दिड करोडचे आपण काम काढतात. आणि त्यांना बोलतात की, आपल्याजवळ १० करोडची मशिन ठेवा

**<u>शहर अभियंता, श्री. महेश सितलानी :—</u>** जी. आर. मध्ये अट आहे. तर आजुबाजूच्या महानगरपालिकेत पण असे चालते, जी. आर. मध्ये लिहीले आहे. जी.आर. मधून इथे टाकले आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** बरोबर आहे, चला.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>** पास.... पास..इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>महापालिका सचिव :—</u>** पास. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .

---

☑ **विषय क्र.१३ :— उल्हासनगर-४ येथील छत्रपती शिवाजी महाराज नगर रहिवासी संघ चौक ते गजानननगर प्रवेशद्वार ते एकविरा माता मंदीर पर्यंतचा रस्ता सिमेंट काँक्रीट करणे या कामाकरीता निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणे.**

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर-४ येथील छत्रपती शिवाजी महाराज नगर रहिवासी संघ चौक ते गजानन नगर प्रवेशद्वार ते एकविरा माता मंदीर पर्यंतचा रस्ता सिमेंट काँक्रीट करणे या कामाची दिनांक १३/०१/२०२१ ते ०४/०२/२०२१ या कालावधीत ई निविदा मागविण्यात आली होती. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये १८५१८५१८/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १३/०१/२०२१ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १३/०१/२०२१ ते ०४/०२/२०२१ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०४/०२/२०२१ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/०३/२०२१ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | -- |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०६ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०६ |

दिनांक ०८/०३/२०२१ रोजी उल्हासनगर-४ येथील छत्रपती शिवाजी महाराज नगर रहिवासी संघ चौक ते गजानन नगर प्रवेशद्वार ते एकविरा माता मंदीर पर्यंतचा रस्ता सिमेंट काँक्रीट करणे या कामाचा तांत्रिक भाग उघडण्यात आला. सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तांत्रिक भाग (Technical Bid)**

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | झा.पी.ॲण्ड कंपनी | जयहिंद रोड बिल्डर्स | शंकर ट्रेडर्स | व्ही.के. कंन्स्टक्शन | जयभारत कंन्स्ट्रक्शन | दत्त दिगंबर कंन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Certificate of Registration in appropriate Class from Certificate of Registration in appropriate Class from CPWD/State PWD/CIDCO/MCGM./MJP etc. | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| २ | Attested Copy of Pan Card | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ३ | Goods &Service Tax Registration / Undertaking for Goods &Service Tax Exemption | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ४ | Income Tax Statement Return Statement and Turnover statement duly signed by the CA of Last Three years. | आहे | आहे | आहे | आहे | आहे | **अन्य कंपनीच्या नाव** |
| ५ | EPF Registration Certificate Number | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ६ | Tenderer should have successfully completed with Government / Semi Government / Public Sector at least one similar type of work in last ५ years (Five years) | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ७ | Annual Turnover of Last five years | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ८ | The tenderer will be qualified only if their available bid capacity is more than the total estimated value of works for which he has offered his bid. (A*N*१.५) - B | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ९ | The tenderer should possess his owned Ready Mix Concrete Plant | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| १० | Static Roller ८ to १० tonne, Smooth Wheeled power roller | आहे | आहे | आहे | **कागदपत्र नाही** | आहे | आहे |
| ११ | Truck / Tipper/ Tractor | आहे | आहे | **मालकी नाही** | आहे | आहे | आहे |
| १२ | Ready Mix Concrete Plant | आहे | आहे | आहे | आहे | आहे | **कागदपत्र नाही** |
| १३ | Transit Mixture ५ to ६ cum capacity | आहे | आहे | आहे | **नाही** | आहे | आहे |
| १४ | ५००/- Stamp Paper | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| १५ | Work in hand | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| १६ | Eligible / Not Eligible | पात्र | पात्र | अपात्र | अपात्र | पात्र | अपात्र |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार निविदाकारांच्या कागदपत्रांची छाननी केली असता १) शंकर ट्रेडर्स २) व्ही.के.कंन्स्ट्रक्शन व ३) दत्त दिगंबर कंन्स्ट्रक्शन हे तीन निविदाकार अपात्र ठरत आहेत व १) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी २) मे.जयहिंद रोड बिल्डर्स व ३) मे.जय भारत कंन्स्ट्रक्शन हे तीन निविदाकार पात्र ठरत आहेत.

सदर पात्र/ अपात्र निविदाकारांची माहिती दिनांक ०५/०५/२०२१ रोजी सायं.४.०० वाजेपासून ते ०७/०५/२०२१ सायं ४.०० वाजेपर्यंत या कालावधीकरीता उल्हासनगर महानगरपालिकेच्या www.umc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे Ulhasnagar.pwd@gmail.com या मेलवर व शहर अभियंता यांचे कार्यालयात लेखी स्वरुपात हरकती व सुचना मागविण्यात आल्या होत्या.

परंतू दिनांक ०७/०५/२०२१ रोजी सायं.४.०० वाजेपर्यंत कोणत्याही हरकती / सुचना प्राप्त झालेल्या नाही. तद्नंतर सदर निविदा प्रक्रियेचा दुसरा लिफाफा दिनांक १८/०५/२०२१ रोजी उघडण्यात आला. निविदाकारांनी सादर केलेल्या दरांची माहिती खालीलप्रमाणे.

**आर्थिक भाग (Financial Bid)**

| अ.क्र. | निविदाकार | सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | मे. जयहिंद रोड बिल्डर्स | ०.९९०% कमी |
| २ | मे. झा.पी.ॲण्ड कंपनी | ९.०००% जास्त |
| ३ | मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन | ९.९९०% जास्त |

वरील तक्त्यातील माहितीनुसार मे.जयहिंद रोड बिल्डर्स यांनी ०.९९०% कमी दर सादर केले आहेत. सदर दर निम्न आहेत. निविदाकाराने आणखी दर कमी करणेकरीता मे. जयहिंद रोड बिल्डर्स यांना वाटाघाटीकरीता बोलविण्यात आले. मे.जयहिंद रोड बिल्डर्स यांनी त्यांचे दिनांक २०/०५/२०२१ चे पत्रान्वये त्यांनी सादर केलेले ०.९९०% कमी दर कमी करुन **२.९९% कमी दरावर काम करणेस संमती दर्शविली.** याबाबत त्यांनी त्यांचे दिनांक १८/०३/२०२१ रोजीचे पत्रान्वये लेखी कळविले आहे. शासन परिपत्रक क्रमांक : सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दिनांक २६ नोव्हेंबर,२०१८ अन्वये परफॉमस सेक्युरीटी रक्कम रुपये १,८५,१८५/- एवढ्या रक्कमेचा भरणा आठ दिवसांत संबंधित एजन्सीकडून घेण्यात येत आहे.

तरी उल्हासनगर-४ येथील छत्रपती शिवाजी महाराज नगर रहिवासी संघ चौक ते गजानन नगर प्रवेशद्वार ते एकविरा माता मंदीर पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे प्राकलनिय खर्च रु.१,८५,१८,५१८/- एवढ्या रक्कमेच्या कामाकरीता निम्न दराचे निविदाकार मे.जयहिंद रोड बिल्डर्स यांचेशी संविदा करणेस स्थायी समितीच्या मान्यतेकरीता प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.१०** **दिनांकः— ७/०७/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-४ येथील छत्रपती शिवाजी महाराज नगर रहिवासी संघ चौक ते गजानननगर प्रवेशद्वार ते एकविरा माता मंदीर पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे प्राकलनिय खर्च रु.१,८५,१८,५१८/- एवढ्या रक्कमेच्या कामाकरीता निम्न दराचे निविदाकार मे.जयहिंद रोड बिल्डर्स यांचेशी संविदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

**सर्वानुमते**

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिवः-** विषय क्रमांक १४ वाचून दाखवितात.

⇨**विषय क्र. १४**:— **डॉ. राजा रिझवानी, सेवानिवृत्त वैधकीय अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांना दिनांक ०२/०३/२०२१ ते दिनांक ०१/०९/२०२१ पर्यत ०६ महिन्याकरिता पुन्हा मानधन तत्वावर(तात्पुरत्या स्वरुरपात ) नियुक्ती देणेबबत.**

**उपमहापौर, श्री. भगवान भालेराव:—** त्यांना कायमचे करा.

**महापालिका सचिव:—** पास.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** इतिवृत्ताची वाट न पहाता पास..पास..

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

☑ **विषय क्र. १४:—** डॉ. राजा रिझवानी, सेवानिवृत्त वैधकीय अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांना दिनांक ०२/०३/२०२१ ते दिनांक ०१/०९/२०२१ पर्यत०६ महिन्याकरिता पुन्हा मानधन तत्वावर(तात्पुरत्या स्वरुरपात ) नियुक्ती देणेबाबत.

**प्रस्तावना**

सध्या कोरोना (कोव्हिड-१९) रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिका आस्थापनेवर अधिकारी/कर्मचारी यांची कमतरता लक्षात घेता शासननिर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१०००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ या निर्णयातील तरतुदीनुसार ०६ महिन्यासाठी अटी व शर्तीच्या अधिन राहून डॉ. राजा रिझवानी, सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांना कार्यालयीन आदेश क्रमांक उमपा/साप्रवि/आस्था/मुली/७३६/२०२०, दिनांक २८/९/२०२० रोजीच्या आदेशान्वये ०६ महिन्यासाठी मानधन तत्वावरअटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्त करण्यात आले होते. त्यांचा ०६ महिन्याचा कालावधी दिनांक २८/०२/२०२१ रोजी संपुष्टात आलेला आहे.

डॉ.राजा रिझवानी, सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांना उपरोक्त शासन निर्णयानुसार दि.१/३/२०२१ रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.२/३/२०२१ ते दि.०१/०९/२०२१ पर्यंत ०६ महिन्यांकरीता पुन्हा मानधनतत्वावर (तात्पुरत्या स्वरूपात) नियुक्ती करण्यासाठी मा.स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.११** **दिनांक:— ७/०७/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार डॉ. राजा रिझवानी, सेवानिवृत्त वैधकीय अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांना दिनांक ०२/०३/२०२१ ते दिनांक ०१/०९/२०२१ पर्यत ०६ महिन्याकरिता पुन्हा मानधन तत्वावर (तात्पुरत्या स्वरुरपात ) नियुक्ती देण्यास मान्यता देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

**सर्वानुमते**

सभापती / पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-** विषय क्रमांक १५वाचून दाखवितात.

---

⇨**विषय क्र. १५:– महापालिकेच्या वाहनांवर खाजगी कंपनीकडून ठेका पध्दतीने वाहनचालक उपलब्ध् करण्यासाठी मान्यता मिळण्याबाबत.**

---

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:** किती वर्षासाठी आहे हे?

**प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळे:–** एक वर्षासाठी.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:** तीन वर्षासाठी करता येईल का?

**महापालिका सचिव:–** नाही करता येणार नाही. एक वर्षासाठी करता येईल.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** भालेराव साहेब, टेंडर एक वर्षासाठी आहे.....

**महापालिका सचिव:–** पास...

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..पास..

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

☑ **विषय क्र. १५:–** महापालिकेच्या वाहनांवर खाजगी कंपनीकडून ठेका पध्दतीने वाहनचालक उपलब्ध् करण्यासाठी मान्यता मिळण्याबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेची स्वतःची वापरात असलेली एकुण ६० वाहने व वाहनचालंकाची मंजुर ६० पदापैकी सध्या आस्थापनावर १५ स्थायी वाहनचालक कार्यरत आहेत.सबब उर्वरीत मंजुर पदावर पात्र वाहनचालकानी नेमणूक अद्यापही झालेली नाही. शासन धोरणानुसार भरतीवर असलेले निबर्ध,मनपाची आर्थिक स्थिती पाहता वाहनचालक सद्यास्थितीत भरती करुन उपलब्ध् होणे लगेच शक्य् नाही.

महानगरपालिकेकडील सध्या वापरात असलेल्या एकुण ६० वाहनांवर १५ नियमित वाहनचालक व प्रभारी म्हणून नेमण्यात आलेले अन्य् (मंजुर,सफाई कामगार) इत्यादि कर्मचारी वाहनचालकांची सेवा उपलब्धता आहे. मात्र वाहनांची संख्या व वाहनचालंकाची उपलब्धता पाहता लोकहितार्थ आवश्यक असलेल्या सेवा पुरवठयामध्ये वाहनांच्या वाहनचालकांना १२-१२ तास काम करावे लागते व त्यांना सुट्टी देखील घेता येत

नाही. रुग्णवाहिका,शववाहिका व अग्निशमन अशा सेवामध्ये एका वाहनावर कमीत कमी ४ वाहनचालकांची आवश्यकता आहे.

या अनुषंगाने महापालिकेतील वाहनांची संख्या पहाता वाहनावर वाहनचालकांची कमी असल्याने वाहनचालकांची निकड पहाता ठेका पध्दतीने वाहनचालक घेणेकरीता वाहन विभागामार्फत नियमानुसार जाहिर ई निविदा प्रसिध्द करून खाजगी कंपनीकडून Minimum wages Act च्या दरानुसार प्रस्ताव मा. आयुक्त सो यांचे मंजुरीनुसार मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर केला असता मा. स्थायी समितीने ठराव क्र. १३८ दिनांक ०७/०३/२०१९ अन्वेय सदर प्रस्तावास मंजुरी दिली. परंतु सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०१९ च्या कार्यक्रमाकरीता दिनांक १० मार्च २०१९ पासुन आदर्श आचारसंहीता लागू झाल्यामुळे मंजुर ठेकेदाराशी आचार सहिता संपल्यानंतर संविदा करून वाहन विभागामार्फत ठेकेदार में.झा.पी.ॲण्ड् कंपनी, उल्हासनगर यांना जा.क्र. उमपा/वाहन/६५/१९,दिनांकः-२३/०७/२०१९, अन्वये कार्यादेश देऊन एक वर्षाकरीता ४० वाहनचालक प्रतिवाहनचालक प्रति महिना रु. २१,५८०/- या दराने माहे ऑगस्ट् २०१९ पासुन घेण्यात आली होती.तसेच विद्युत विभागाकरीता घेण्यात आलेल्या नविन ३ वाहनांकरीता विद्युत विभागानी केलेल्या मागणीनुसार सदर ठेकेदाराकडून मा.स्थायी समिती ठराव क्र.५५ दिनांक ०७/०२/२०२० अन्वये जा.क्र. उमपा/वाहन/२१३/१९, दिनांकः-०८/०२/२०२०, अन्वये कार्यादेश देऊन ६ वाढीव वाहनचालक घेण्यात आले आहेत. सदर कामाचा करारनामा माहे २३ जुलै २०२० अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे सदर कामाची ई निविदा प्रक्रिया करणे आवश्यक् आहे.तसेच जो पर्यत ई निविदा प्रक्रिया पूर्ण होत नाही तो पर्यत कामाची निकड पहाता सदर ठेकेदारास मुदत वाढ देवून वाहनचालक उपलब्ध करून घेणे योग्य वाटते.

सदर किमान वेतन अधिनियम, १९४८ च्या उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग दिनांक २४ फेंबुवारी २०१५ च्या अधिसुचना नुसार जड वाहनचालक हे Minimum wages Act च्या नोटीफीकेशनानुसार Semi skilled हया दर्जामध्ये येते. त्यामुळे प्रति वाहनचालकास अंदाजे रु १३,०००/- (तेरा हजार रुपये) व त्या व्यतिरिक्त् इतर भत्ता देणे आवश्यक् आहे.

तथापी किमान वेतन कायदयानुसार प्रति वाहनचालकास खालील प्रमाणे वेतन देणे आवश्यक् आहे.

वाहनचालकाची वर्गवारी ही परिमंडळ -१ मध्ये अर्धकुशल कामगार म्हणून येत असुन सदर चालकाचा प्रति माहे करीता येणार अंदाजीत खर्च खालील प्रमाणे आहे.

| | अर्धकुशल | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Sr. no** | **Detil** | **Amount** | **Sr. no** | **Levy Detil** | **Amount** |
| १ | किमान वेतन | रु.१३०००/- | १ | भ.नि.वि. १३०००+ ५७०५= १३<br><br>Amount restncted to १५०००/-Rs १५०००% १३ | रु. २००४/- |
| २ | विशेष भत्ता | रु.५७०५/- | २ | बोनस (१३०००+५७०५)८.३३% | रु. १५५८/- |
| ३ | घरभाडे भत्ता<br><br>(१३००० + ५७०५)५% | रु. ९३५/- | ३ | कामगार विमा ESIC<br><br>( १३०००+ ५७०५+ ९१२) ४.७५%<br><br>Amount restncted to १५०००/-Rs १५०००% ४.७५ | रु. ९३२.९/- |
| ४ | गणवेश व पावसाळी साहित्य् (१३०००) ४% | रु.५२०/- | ४ | प्रशासकिय खर्च<br><br>(१३००० + ५७०५) ५% | रु. ९३५/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | धुलाई भत्ता | रु.२३/- | | वस्तु व सेवा कर<br>(प्रशासकिय खर्चवर) (GST) १८% | रु. १६८/- |
| | **एकुण(A) In hand payment** | रु.२०१८३/- | | **एकुण Deauction Amount (B)** | रु. ६०२४/- |
| | एकुण (A+B) | रु.२६२०७/- | | | |

उल्हासनगर महापालिकेच्या वाहनांवर खाजगी कंपनीकडून ठेका पध्दतीने वाहनचालक उपलब्ध् करून घेणेसाठी वाहन विभागातर्फे सदर कामासाठी प्राकलन तयार करुन प्रशासकिय व वित्तीय मान्यता घेण्यात आली व नियमाप्रमाणे सदर कामाची ई निविदा प्रक्रिया करण्यात आली त्याची सविस्तर् माहिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| १ | **निविदा प्रसिध्द् केलेली वर्तमानपत्रे** | **१) दैनिक टाऊन दर्शन, २) दैनिक आपल महानगर, ३)दैनिक ऊल्हास विकास** |
| २ | **निविदा प्रसिध्द् करण्याची दिनांक** | **दिनांक २४/०५/२०२१ ते दिनांक २५/०५/२०२१** |
| ३ | **निविदा विक्रि कालावधी** | **दिनांक २५/५/२०२१ ते दिनांक १४/०६/२०२१** |
| ४ | **भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक १५/०६/२०२१** |
| ५ | **प्रथम मुद्दत वाढ** | - |
| ६ | **द्वितीय मुद्दत वाढ** | - |
| ७ | **तृतीय मुद्दत वाढ** | - |
| ८ | **तांत्रिक भाग उघडण्याचा दिनांक** | **दिनांक १५/०६/२०२१** |
| ९ | **आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक** | - |
| १० | **विक्रि केलेल्या निविदांची संख्या** | **३** |
| ११ | **प्राप्त् झालेल्या निविदांची संख्या** | **३** |

सदर निविदेचा तांत्रिक भाग दिनांक १५/०६/२०२१ रोजी निविदा समिती समोर उघडण्यात आला**.** त्यामध्ये **१) मे. शार्प् सर्विसेस, २) मे.झा.पी.कंपनी, ३) मे.श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था** यांनी निविदा सादर केल्या आहेत**.** त्याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे**:-**

**तक्ता क्र. २**

| **अ.क्र** | **निविदा अटी व शर्ती** | **मे. शार्प सर्विसेस** | **मे.झा.पी. कंपनी** | **मे.श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार** |
|---|---|---|---|---|
| **१** | **संस्था नोंदणी प्रमाणपत्र्** | **आहे** | **आहे** | **आहे** |
| **२** | **शासकिय/निमशासकिय संस्थामध्ये वाहन चालक पुरवठा केल्याचा मागील ३ वर्षात ठेकेदाराने अनुभवाचा दाखला अथवा कार्यादेशाच्या प्रत** | **आहे** | **आहे** | **आहे** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | **जी.एस.टी नोंदणी प्रमाणपत्र्** | **आहे** | **आहे** | **आहे** |
| ४ | **पॅन काड्र्ची प्रत** | **आहे** | **आहे** | **आहे** |
| ५ | **मागील आर्थिक तीन वर्षाची उलाढाल प्रतीवर्षी सरासरी ३ कोटी असल्याचे सनदी लेखा पालाकडून (Chartered Accountant) स्वाक्षांकीत केलेले प्रमाणपत्र** | **आहे** | **आहे** | **आहे** |
| ६ | **कर्मचारी भविष्य निधी (EPF certificate) संस्थाचे नोंदणी प्रमाणपत्र.** | **आहे** | **आहे** | **आहे** |
| ७ | **राज्य कामगार विमा कायदा १९४७ अंतर्गत ESIC नोंदणी प्रमाणपत्र.** | **आहे** | **आहे** | **आहे** |
| ८ | **पात्र / अपात्र** | **पात्र** | **पात्र** | **पात्र** |

उक्त् तक्त्यात नमुद केलेल्या माहिती नुसार निविदाकांराच्या कागदपत्रांची छाननी केली त्यामध्ये १) मे. शार्प सर्विसेस, २) मे. झा. पी. कंपनी, ३) मे. श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था, निविदाकार पात्र ठरत आहेत. प्रस्तावित कामाकरीता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रीयेमध्ये तक्ता क्र. २ मध्ये नमुद केलेल्या निविदाकारंच्या कागदपत्रांची वरील निविदा छाननी समितीने तपासणी केली आहे.

उक्त् तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार १) मे. शार्प सर्विसेस, २) मे.झा.पी.कंपनी, ३) मे. श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था, हे तीन निविदाकार पात्र ठरत असल्याने त्यांचे निविदेचा आर्थिक भाग (Financial Bid) दिनांक २३/६/२०२१ रोजी उघडण्यात आला त्याची माहिती खालील प्रमाणे.

| अ. क्र | निविदाकारांचे नाव | प्रति वाहन चालकाचे दर | प्राप्त् दर | टक्के प्रामणे |
|---|---|---|---|---|
| १ | मे. शार्प सर्विसेस | रु.२५,१०४ | रु.२५२२९.५२० | ०.५००% टक्के जास्त् |
| २ | मे.झा.पी. कंपनी, | रु.२५,१०४ | रु.२५,१०४ | ०० % टक्के (Atpar) |
| ३ | मे. श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था | रु.२५,१०४ | रु.२५३५५.०४० | १.०० % टक्के जास्त् |

उक्त् तुलनात्मक तक्तत्यानुसार लिफाफा क्र. २ च्या अहवालानुसार प्राप्त् तीन निविदाकारांपेक्षा **मं. झा.पी. कंपनी उल्हासनगर**, यांचे प्रती वाहनचालक प्राप्त् दर हे निविदा किंमतीच्या **०० % टक्के (Atpar)** रु.२५१०४/- या दराने सादर केले आहे. सदर बाब आपल्या निदर्शनार्थ सादर करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे प्रति वाहनचालक प्रति महिना रु.२५,१०४/- व ५५ वाहनचालकासाठी रु. २५१०४ X ५५ = रु.१३,८०,७२०/- (तेरा लाख ऐंशी हजार सातशे वीस रु) एवढा अंदाजे मासिक खर्च आवश्यक् आहे. रु.१३,८०,७२० X १२ = रु.१,६५,६८,६४० (एक कोटी पासष्ट् लाख आडूसष्ट् हजार सहाशे चाळीस रुपये ) एवढा अंदाजे वार्षिक खर्च होणार आहे. सदर खर्च सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता वाहन विभागाचे लेखाशिर्ष AA Part I (Daiy Wage) यामध्ये रु ६ कोटीची तरतुद उपलब्ध असून यामधुन करण्यात येईल.

या अनुषंगाने न्युनत्तम निविदाकारास **मे. झा.पी. कंपनी उल्हासनगर** यांच्याकडून उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहनांवर खाजगी कंपनीकडून ठेका पध्दतीने वाहनचालक उपलब्ध् करणेबाबत त्यांच्याशी सविदा करुन त्यांना पुढील आदेश देणेकरीता सदर गोषवारा मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव् सादर करण्यात येत आहे

**स्थायी समिती ठराव क्र.१२** **दिनांक:— ७/०७/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार न्युनत्तम निविदाकारास **मे. झा.पी. कंपनी उल्हासनगर** यांच्याकडून महापालिकेच्या वाहनांवर खाजगी कंपनीकडून ठेका पध्दतीने वाहनचालक उपलब्ध् करणेस व येणारा अंदाजित खर्च रु.१,६५,६८,६४० (एक कोटी पासष्ट् लाख आडूसष्ट् हजार सहाशे चाळीस रुपये ) यास मान्यता देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

**सर्वानुमते**

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:—** मा. सभापती तुमच्या परवानगीने मी बोलू इच्छितो की, मागच्या मिटिंगच्या वेळेस मार्च महिन्यापर्यंत ज्या दिव्यांग लोकांनी अर्ज भरले आहेत. त्यांना १२,०००/— रुपये पेन्शन दिली जाईल. परंतु मला सांगताना दु:ख होत आहे की, आम्ही पेपरमध्ये बातमी वाचतो की त्यांना ६—६ हजार मिळाले ते पण नाही मिळाले व ६ हजार ऐवजी त्यांना १२ हजार मिळाले पाहिजेत माझी अशी विनंती आहे की, आपली ही पहिली सभा आहे आपण असा आदेश दया की त्या दिव्यांग लोकांना पण या कोरोना काळात पैसाची खुप आवश्यकता आहे. लेखा विभाग व मा. आयुक्त साहेबांना मी विनंती करु इच्छितो की, त्यांना १२ हजार पेन्शन मिळाली पाहिजे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सभापती महोदय, मला काय म्हणायचे आहे की पाटोलच्या संदर्भामध्ये शहर अभियंता आणि अतिरिक्त आयुक्त....

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:—** भालेराव साहेब माझी विनंती आहे आयुक्त साहेब व सभापती जी या गोष्टीचा खुलासा करतील की, आम्ही दिव्यांग लोकांच्या खात्यावर लवकरात लवकर १२ हजार रुपये गेले पाहिजेत. त्यांचा खुप मोठे समाधान होईल.

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:—** जग्यासीजी हा मिटींगचा विषय नाही, तरी सभा संपल्यावर आपण चर्चा करा.

सांयकाळी ६.०० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. दिपक सिरवानी यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

**स्थायी समिती ठराव क्र.१२** **दिनांकः— ७/०७/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार न्युनत्तम निविदाकारास **मे. झा.पी. कंपनी उल्हासनगर** यांच्याकडून महापालिकेच्या वाहनांवर खाजगी कंपनीकडून ठेका पध्दतीने वाहनचालक

उपलब्ध् करणेस व येणारा अंदाजित खर्च रु.१,६५,६८,६४० (एक कोटी पासष्ट् लाख आडूसष्ट् हजार सहाशे चाळीस रुपये ) यास मान्यता देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

**<u>सर्वानुमते</u>**

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:—</u>** मा. सभापती तुमच्या परवानगीने मी बोलू इच्छितो की, मागच्या मिटिंगच्या वेळेस मार्च महिन्यापर्यंत ज्या दिव्यांग लोकांनी अर्ज भरले आहेत. त्यांना १२,०००/— रुपये पेन्शन दिली जाईल. परंतु मला सांगताना दु:ख होत आहे की, आम्ही पेपरमध्ये बातमी वाचतो की त्यांना ६—६ हजार मिळाले ते पण नाही मिळाले व ६ हजार ऐवजी त्यांना १२ हजार मिळाले पाहिजेत माझी अशी विनंती आहे की, आपली ही पहिली सभा आहे आपण असा आदेश दया की त्या दिव्यांग लोकांना पण या कोरोना काळात पैसाची खुप आवश्यकता आहे. लेखा विभाग व मा. आयुक्त साहेबांना मी विनंती करु इच्छितो की, त्यांना १२ हजार पेन्शन मिळाली पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** सभापती महोदय, मला काय म्हणायचे आहे की पाटोलच्या संदर्भामध्ये शहर अभियंता आणि अतिरिक्त आयुक्त....

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:—</u>** भालेराव साहेब माझी विनंती आहे आयुक्त साहेब व सभापती जी या गोष्टीचा खुलासा करतील की, आम्ही दिव्यांग लोकांच्या खात्यावर लवकरात लवकर १२ हजार रुपये गेले पाहिजेत. त्यांचा खुप मोठे समाधान होईल.

**<u>स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानी:—</u>** जग्यासीजी हा मिटींगचा विषय नाही, तरी सभा संपल्यावर आपण चर्चा करा.

सांयकाळी ६.०० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. दिपक सिरवानी यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

तुम्ही चर्चा करा.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:—</u>** आपण फक्त त्यांना असा आदेश दया की...

**स्थायी समिती सभापती, श्री. दिपक सिरवानीः—** त्यांना लवकरात लवकर मिळाले पाहीजे.

**सदस्य, श्री. राजू जग्यासीः—** होय मिळाले पाहीजेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** दुसरी गोष्ट अशी आहे रस्त्यावर मोठया प्रमाणात खडडे पडले आहेत. पाटोलची निविदा काढून बरेच दिवस झाले आहे आणि त्याच्यावर कारवाई टेंडर त्या संदर्भामध्ये आहे मला वाटते लवकरात लवकर त्याच्याबाबत निर्णय व्हावा आणि जे जे विषय प्रलंबित असतील, भाजी मार्केटच्या संदर्भामधला, इंदिरागांधी संदर्भामधला साहेब विषय असा आहे की, भाजी मार्केट सगळे असतील, महापौर बंगला, आयुक्त बंगला आणि रेस्टहाऊस आणि हॉस्पिटल, गोल मैदानाचा पार्किंगचा विषय असेल, ते जे विषय असतील मला वाटते लवकरात लवकर महासभेपुढे किंवा स्थायी समितीमुढे आणावेत आणि लवकरात लवकर त्या कामांना सन २०२२ च्या गतीमान करण्यात यावेत एक शौकांतीका अशी आहे की, आम्ही स्थायी समितीमध्ये २३ कोटी पास करून बाळासाहेब क्रिडांगण अजून पर्यत आम्ही उद्घाटन करू शकत नाही. मला वाटते त्यासाठी पण आपण आणि ते करावे प्रशासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा. या सगळया गोष्टी आहेत. कारण आम्ही जे काम करतो त्याची प्रगती त्या फाईलमध्ये दिसते. प्रत्येक्षात ते काम जर करायचे असेल तर तुम्ही आणि आम्ही दोघांनी बरोबर जाऊन ते काम लवकरात लवकर करता आले पाहीजे आणि प्रशासन आणि शासन या दोघांनाही ते दिसले पाहीजे. म्हणून माझी प्रशासनाला विनंती आहे की, आपण जितक्या लवकरात लवकर फाईली करता येतील, त्या फाईली लवकरात लवकर करून मुख्य ज्या गोष्टी आम्ही सांगितल्या आहेत, त्या लवकरात लवकर पुर्ण करा.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** मी सभापती यांना विनंती करतो की, शहराच्या विकासाचे भरपूर असे कार्य बंद पडले आहेत, त्यासाठी लवकरत लवकर महानगरपालिकेला ज्या प्लॅटची सनद मिळाली आहे, त्यांचे काम थांबले आहे, इंदिरागांधी मार्केट झाले, बोट क्लब झाले, त्याची पण सनद आपल्याला मिळाली आहे. नगरपालिकेची एक्सटेंशन महानगरपालिका गोल मैदान येथे विशेष प्राजेक्ट बनवण्यासाठी एक विशेष सभा स्थायी समितीची लागली पाहीजे.

सांयकाळी ६.०० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. दिपक सिरवानी यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर

महानगरपालिका
.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक –१२/०२/२०२१

दिनांक –१२ /०२ /२०२१ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

४

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १२/०२/२०२१, रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील महासभा सभागृह येथे शासनाचे क्रमांक कोराना-२०२० /पत्रक्र.७६/नवि-१४, दिनांक २१ डिसेंबर, २०२० च्या पत्रान्वये विहित कार्यपध्दती पालन करुन प्रत्येक्ष् सहभागाने/उपस्थितीने घेण्यांत आली, सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. विजय चाहू पाटील | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश वधारिया | सदस्य |
| ४ | श्रीम. अचर्ना करणकाळे | सदस्या |
| ५ | श्री. राजकुमार किशनचंद जग्यासी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य सभेस अनुपस्थित होते.

१) श्रीम. लिलाबाई लक्ष्मण आशान, २) श्री. राजेंद्रसिंग भुल्लर, ३) श्री. भारत रामचंद्र राजवानी, ४) श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड, ५) श्रीम. अपेक्षा भगवान भालेराव, ६) श्रीम. जया प्रकाश माखिजा, ७) श्रीम. कविता लाल पंजाबी, ८) श्रीम. कांचन अमर लुंड, ९) श्री. कुलवंतसिंह सोहता, १०. श्री. चंद्रशेखर यादव.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. आयुक्त, डॉ. राजा दयानिधी
२. श्रीमती करुणा जुईकर, अतिरीक्त आयुक्त
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४. डॉ. दिपक पगारे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
५. श्री. अप्पा गुरगुळे, नगररचनाकार
६. श्री. मंगेश गावडे मुख्य लेखापरिक्षक
७. श्री. सुर्यकांत खटके, लेखाधिकारी
८. श्री. अशोक मोरे, सहा लेखा परिक्षक
९. श्री अश्विनी अहुजा, उप अभियंता, साबांवि
१०. श्री. मनिष हिवरे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी
११. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता
१२. श्री. खियानी, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
१३. श्रीमती श्रध्दा सपकाळे, सिस्टम ॲनेलेसिस

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन, वरिष्ठ लिपिक
२. श्रीमती नर्गिस खान, लिपिक
३. श्री. बाळु भांगरे, लिपिक

दुपारी ३.११ वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १ वाचून दाखवितात.

विषय क्र १:- मागील स्थायी समिती सभेचे दिनांक २१/१२/२०२० रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. सभापती महोदय, मा. आयुक्त साहेब, सगळयांना धन्यवाद देतो. आज कोरोनाकाळ २० मार्चच्या नंतर आज पहील्यांदा आपण एकत्र बसून सभागृहामध्ये आपण अंतर ठेवून मिटींग चालवत आहेत. येणा-या दिवसामध्ये महासभेची मिटींग पण या अशाच प्रकारे सर्व जण एकत्र बसून घेतली जाईल. तो दिवस पण लवकरच येईल. जो थोडीफार अजार आहे, जो त्रास आहे तो पण दुर होऊन जाईल. मी निवेदन करतो की, आजची ही जी सभा आहे, सदस्य, कमी असल्यामुळे अनिश्चित कालावधीसाठी स्थगीत करण्यात यावी. कारण की, सभेमध्ये लोक पण कमी आहेत, फक्त ५ सदस्य उपस्थित आहेत, कोरमची पण कमी आहे आणि जेव्हा सर्व सदस्य उपस्थित असतील तेव्हा मिटींग घेण्यात यावी. तर माझे निवेदन आहे की, आजची सभा अनिश्चित कालावधीसाठी पुढची सभा नोटीस निघे पर्यंत स्थगीत करण्यात यावी.

**सभापती, श्री. विजय पाटील:-** सदस्यांचा मान ठेवून ही सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगीत करण्यात येत आहे.सभा संपली असे जाहीर करतो.

दुपारी ३.१३ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. विजय पाटील यांनी जाहीर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक –१९/०३//२०२१

दिनांक –१९ /०३ /२०२१ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

४ .अ

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १२/०२/२०२१, रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. परंतु सदरची सभा स्थगीत झाल्याने सदर सभा शुक्रवार दिनांक १९/०३/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील महासभा सभागृह येथे शासनाचे क्रमांक कोराना-२०२० /पत्रक्र.७६/नवि-१४, दिनांक २१ डिसेंबर, २०२० च्या पत्रान्वये विहित कार्यपध्दती पालन करुन प्रत्येक्ष् सहभागाने/उपस्थितीने घेण्यांत आली, सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. विजय चाहू पाटील | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | सदस्य |
| ४ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |
| ५ | श्री. राजेश वदारिया | सदस्य |
| ६ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | सदस्या |
| ७ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | सदस्या |
| ८ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | सदस्या |
| ९ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| १० | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| ११ | श्रीमती अर्चना करणकाळे | सदस्या |
| १२ | श्रीमती कंचन अमर लुंड | सदस्या |
| १३ | श्री. राजकुमार किशनचंद जग्यासी | सदस्य |
| १४ | श्री.कलवंतसिंह सोहता | सदस्य |
| १५ | श्री. चंद्रशेखर यादव | सदस्य |

तर,
खालील दर्शविलेले सदस्य सभेस अनुपस्थित होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. आयुक्त, डॉ. राजा दयानिधी
२.श्रीमती करुणा जुईकर, अतिरीक्त आयुक्त
३.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४.डॉ. दिपक पगारे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
५. श्री. मदन सोंडे, उप आयुक्त (कर विभाग)
६. श्री. नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय)

७. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी
८. श्री. मंगेश गावडे मुख्य लेखापरिक्षक
९. श्री. महेश सितलानी, शहर अभियंता
१०. श्री. सुर्यकांत खटके, लेखाधिकारी
११. श्री. अशोक मोरे, सहा लेखा परिक्षक
१२.श्री.हनुमंत खरात, उप अभियंता, (विद्युत)
१३. श्री. मनिष हिवरे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी
१४.श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता
१५.श्री. के.जे. रहेजा, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
१६.श्री. अच्च्युत सासे, सहा. आयुक्त सा. प्र.वि.)
१७. श्री. यशवंत संगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन, वरिष्ठ लिपिक
२. श्रीमती नर्गिस खान, लिपिक
३. श्री. बाळु भांगरे, लिपिक

सकाळी १२.०७ वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

**महापालिका सचिव:-** ही स्थगीत मिटींग आहे, विषय क्र. २ ..

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** दोन्ही मिटींग स्थगीत करा.

दुपारी १२.०८ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. विजय पाटील यांनी जाहीर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक –२६/०३//२०२१

दिनांक –२६ /०३ /२०२१ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

४.ब

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १२/०२/२०२१, रोजी दुपारी ३.०० वाजता स्थगीत केलेली सभाशुक्रवार दिनांक १९/०३/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगीत करण्यात आली. सदरची सभा शुक्रवार दिनांक २६/०३/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील महासभा सभागृह येथे शासनाचे क्रमांक कोराना-२०२० /पत्रक्र.७६/नवि-१४, दिनांक २१ डिसेंबर, २०२० च्या पत्रान्वये विहित कार्यपध्दती पालन करुन प्रत्येक्ष् सहभागाने/उपस्थितीने घेण्यांत आली, सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. विजय चाहू पाटील | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | सदस्य |
| ४ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |
| ५ | श्री. राजेश वदारिया | सदस्य |
| ६ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | सदस्या |
| ७ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | सदस्या |
| ८ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | सदस्या |
| ९ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| १० | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| ११ | श्रीमती अर्चना करणकाळे | सदस्या |
| १२ | श्रीमती कंचन अमर लुंड | सदस्या |
| १३ | श्री. राजकुमार किशनचंद जग्यासी | सदस्य |
| १४ | श्री.कुलवंतसिंह सोहता | सदस्य |
| १५ | श्री. चंद्रशेखर यादव | सदस्य |

तर,
खालील दर्शविलेले सदस्य सभेस अनुपस्थित होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्रीमती करुणा जुईकर, अतिरीक्त आयुक्त
२.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३.श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय)
४.डॉ. दिपक पगारे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
५. श्री. मंगेश गावडे मुख्य लेखापरिक्षक

६. श्री. सुर्यकांत खटके, लेखाधिकारी
७.श्री. अशोक मोरे, सहा लेखा परिक्षक
८. श्री. महेश सितलानी, शहर अभियंता
९.श्री. मनिष हिवरे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी
१०. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता
११.श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी
१२. श्री. नितेश रंगारी, अधिक्षक
१३. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
१४.दत्तादत्तात्रय जाधव, प्र. भंडार विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन, वरिष्ठ लिपिक
२.श्रीमती नर्गिस खान, लिपिक
३. श्री. बाळु भांगरे, लिपिक
४. विद्या आढळ, लिपीक

सकाळी३.२५ वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त, श्रीम. करुणा जुईकर या आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ होत्या.

**महापालिका सचिव:-** सभा सुरु होत आहे, पहीली सभा आहे दिनांक १२/०२/२०२१ ची स्थगीत झाली होती, दिनांक १९/०३/२०२१ ला ठेवली होती.

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र १**:—मागील स्थायी समिती सभेचे दिनांक २१/१२/२०२० रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**पास..पास..

**काही सदस्य:-** पास, पास....

सभापती, श्री.विजय पाटीलसदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .

---

☑

**विषय क्र. १** :—मागील स्थायी समिती सभेचे दिनांक २१/१२/२०२० रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव:— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव:— श्री. कलवंतसिंह सोहता

स्थायी समिती ठराव क्र. :—४३ अ      दिनांक : २६/३/२०२१

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक २१/१२/२०२१ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ६६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>
सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव-</u>** विषय क्रमांक २ वाचून दाखवितात.

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र २**:—हॉटेल एमब्रोसिया मध्येकोविड १९ साठी कार्यरत वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांची राहण्याबाबची सोय उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आली असून त्याचे देयक दि.०१/०७/२०२० ते ३०/०९/२०२० पर्यंत अदा करण्यासाठी मा. स्थायी समितीची माहितीसाठी सविनय सादर.

———————————————————————————————————————

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>**थोडी माहीती देणार का हे काय आहे?आम्हाला वाटते नेहमी जर आयुक्त साहेब नसतील तर ही प्रोव्हिजन ठेवा.चांगली गोष्ट आहे, महासभेमध्ये पण.
**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** आम्ही लोक राहत नाही तर आमच्यासाठी पण असे प्रोव्हिजन ठेवा.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>**पगारे साहेब, सांगणार का हॉटेल एमब्रोसियाचे हे काय आहे?

**<u>वैदयकीय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-</u>** सन्माननीय सभापती, महापौर मॅडम,सन्माननीय स्थायी समिती सदस्य, आपण हॉटेल एमब्रोसिया हे १/७/२०२० ते ३०/९/२०२० मध्ये ९२ दिवासात राहण्यासाठी डॉक्टर्स स्टाफ नर्स, आणि वैदयकीय कर्मचारी, या ठिकाणी आपण जवळपास ४१ वैदयकीय अधिकारी आणि १२ रुम आपण त्या ठिकाणी बुक केल्या होत्या. त्या सर्व १२ रुमची साफसफाई वैगेरे त्या ठिकाणी ठेवले होते. आपल्याकडे त्यांची यादी पण दिलेली आहे आणि आयडी कार्ड पण सर्वांचे आहेत. राहण्याचे बीला बददल रु. ६०० प्रति रुम प्रमाणे आपण भाडे निश्चित केले होते त्या ठिकाणी.त्या प्रमाणे याचे बिल आपल्याकडे माहितीसाठी आलेले आहे.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>** साहेब, चालू स्थिती काय आहे? अजून हॉटेल एमब्रोसियामध्ये आहेत का?

**<u>वैदयकीय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-</u>** नाही साहेब , आता कोणी पण हॉटेलमध्ये नाहीत.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>** हे बील आहे ते शेवटचे बील आहे का अजून बीलं यायचे बाकी आहेत.

**<u>वैदयकीय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-</u>** अजून एक आहे साहेब, एमब्रोसियाचे.अजून एक आहे.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-</u>** पगारे साहेब एमब्रोसियाचे शेवटचे आहे का? अजून दुसरे हॉटेलचे आहे.

**<u>वैदयकीय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-</u>**बाकीच्या हॉटेलचे पण आहेत सर,

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-</u>** एमब्रोसियाचे शेवटचे आहे.

**<u>वैदयकीय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-</u>**एमब्रोसियाचे हे दोन बीलं शेवटचे आहेत. हॉटेल संगमचे पण हे शेवटचे आहे, स्वामी धरमदास दरबारचे सुध्दा शेवटचे बील आहे.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u>**:— पास करणे किंवा नाही करणे हा नंतरचा विषय आहे. कोणत्याही विषयावर चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे.आपण सांगा की विषय पत्रिकेमध्ये आपण असे लिहिले आहे की जो देयक आहे १/७/२०२० ते ३०/९/२०२० पर्यंत आहे.हे आणण्यासाठी आपणास सहा महिने का लावले.या

अगोदर एमब्रोसियाचे देयक दिलेले आहे.तसेच दुस-या हॉटेलचे देयक दिलेले आहे.तर हे सहा महिन्यानंतर आज का आणले आहेत.एवढया महीन्यांनंतर त्यांना दयायचेच आहे डॉक्टर्स राहिलेले आहेत तर उशीरा का बील आणले.या आगोदर आम्ही सन्मानीय सभापती विजय पाटीलजी होते यावर चर्चा झाली होती.आणि पहिल्या वेळेस हॉटेलचे आणले होते आणि यावर भरपूर चर्चा झाली होती.त्यावेळेस का नाही आणले?

**वैदयकीय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-** एक दोन वेळेस आले होते.

**सदस्य-श्री.जमनादास पुरस्वानी:-** आले होते पण सहा महिन्यानंतर का आले. हे ऑक्टोबर नोव्हेंबर, डिसेंबर जानेवारीमध्ये यायला पाहिजे.हे आज येत आहे.यावार काय विचार केला होता की ज्यावेळेस स्थायी समितीची मुदत संपेल त्या वेळी पाठवणार का?

**वैदयकीय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-** नाही साहेब, असे काही नाही.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:- कारण सांगा ना, का आणला नाही?

**वैदयकीय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-** नाही साहेब, काहीच कारण नाही, जसेजसे बील बनले गेले तसे आणलेसर.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी**:- काय विषय चालला होता, उशीर करण्याचे कारण काय आहे, सहा महीने? आपल्याकडे बील कधी बनवून देण्यात आले सर्व तारीख आहेत तसेच त्यानंतर असे अजून काही हॉटेल चे प्रस्ताव आले आहेत. हे सर्व झाल्यानंतर सुध्दा ऐवढा उशीर केला. त्याचे कारण काय आहे?कॉन्ट्रक्टर पैसे मागत नव्हता का? मोफत देणार असे विचार करत होतात का?नंतर तुम्ही विचार केला की, बिल पाठवून दया.काही हिशोब, किताब.

**वैदयकीय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-** असे काहीच नाही.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:-** तर मग उशीर का झाला. बघा, पहिले काय झाले होते जेव्हा आपले पूर्व आयुक्त होते तेव्हा आम्ही सर्व हॉटेलवाल्यांसोबत बैठका घेतल्या होत्या. त्यामध्ये मयूर होटेल असेल, किंवा दुसरे हॉटेल्स असतील तर त्यांचे म्हणणे असे होते की आम्ही ३ महिने मोफत देणार. परंतु ३ महिनेच होतील कशावरुन परंतु त्या पेक्षा जास्त झाले. नंतर त्या ३ महिन्याचे सुध्दा बील आले.ते आम्ही दिले.आज परत बील आले आहे.तर असे ठेवून ठेवून बीले का येतात आणि आज जे बील आले आहे हे ६ महिन्यानंतर आले आहे.त्यामुळे एक तर असे करा की मिटींग ही ॲडजॉन करुन टाका.सर्व एकत्र घेवून या एकूण बीले आहेत किती? परत परत बील येत जातील आणि म्हणार की शेवटचे बील आहे.

**सभापती, श्री. विजय चाहू पाटील:-** पुढच्या वेळी त्यांचे आणू नका.

**वैदयकीय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-** होय, सर.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:-** या बीलाला आम्ही पास करत आहोत. परंतु यानंतर १५ दिवसाचा विशेष वेळ काढा. जेवढेपण कोरोनासाठी हॉटेलचे बीलं आहेत ते सर्व एकत्र घेऊन या.

**सदस्य, श्री. राजेंद्र सिह भुल्लर**:-सर्व संमतीने पास..इतिवृत्ताची वाट न पाहता.

**सदस्य, श्री. राजेश वधारिया:-** माहिती आहे, महाराजजी.

**सदस्य, श्री. राजेंद्र सिह भुल्लर**:- माहिती आहे तर...

**<u>सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- महाराजजी, आपण पास करा किंवा नका करु यां लोकांचे अकाऊंट मधून बील सुध्दा देण्यात आले आहे. त्यांना पैसे मिळालेले आहेत. हे फक्त् आपल्याकडे माहितीसाठी आलेले आहे की नोंद करा.

**<u>सदस्य,श्री.राजू जग्यासी:-</u>** हे माहितीसाठी देत आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** हे आपल्याला पास किवा बाद करायचे नाही आहे, हे फक्त माहिती नोंद करायची आहे.

**<u>सदस्य,श्री.राजू जग्यासी:-</u>**आपणपरवानगी देत नाही.

**<u>सदस्य, श्री . राजू जग्यासी:-</u>**इतिवृत्ताची वाट न पहाता पास..पास..

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

सभापती, श्री. विजय पाटीलसदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे

---

☑विषय क्र. २ :—हॉटेल एमब्रोसिया मध्येकोविड १९ साठी कार्यरत वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांची राहण्याबाबची सोय उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे पुरविण्यातआली असून त्याचे देयक दि. ०१/०७/२०२० ते ३०/०९/२०२० पर्यंत अदा करण्यासाठी मा. स्थायी समितीची माहितीसाठी सविनय सादर.

<u>प्रस्तावना</u>

साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ प्रमाणे दिनांक १३ मार्च २०२० पासुन खंड २ (१) नुसार महापालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केलेले आहे.तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६७ (३) (क) नुसार मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधिल कलम ५० (अ) अन्वये आपत्कालीन खरेदी व आपत्तीजन्य परिस्थिती किंवा धोक्याच्या कारणांमुळे राष्ट्रीय प्राधिकारण किंवा राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरण बचाव करण्यासाठी तात्काळ तरतुदी किंवा साहीत्य खरेदी करणे किंवा संसाधनांचा त्वरीत उपरयोग करणे तसेच आपत्कालीन खरेदी करण्यासासठी संबधित विभाग किंवा प्राधिकरणाला किते अधिकृत करु शकतात आणि अशा परिस्थितीत निविदा मागविण्याची आवश्यक असलेली मानक प्रक्रिया माफ केलेली मानली जाईल असे नमुद आहे.

त्याअनुषंगाने संदर्भिय पत्रान्वये हॉटेल एमब्रोसिया यांनी दि.१/०७/२० ते ३०/०९/२०२० या मधील ९२ दिवसांचा राहण्याचे कालावधीचे डॉक्टर्स, नर्स व वैद्यकिय कर्मचारी यांचे निवासाचे देयकाची मागणी या कार्यालयास केलेली आहे. तसेच सदर कालावधी मध्ये ४१ वैद्यकिय अधिकारी हे हॉटेल एमब्रोसिया मध्ये १२ रूम मध्ये वास्तव्यास असल्याबाबत त्यांचे आधार कार्ड/ओळखपत्र इत्यादी संदर्भिय पत्राबरोबर सादर केलेले आहे ते खालील प्रमाणे.

सदर हॉटेल एमब्रोसिया मध्ये राहणा-या एकूण ४१ डॉक्टर्स, नर्स व वैद्यकिय कर्मचारी यांची यादी खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of the Doctor / Officer | Bill date | Room No. |
|---|---|---|---|
| 1 | Shri. Amol Bajirav Gagurde | 1/7/20 to 30/9/20 | 101 |
| 2 | Shri. Sadanand Sampat Kamble | | |
| 3 | Shri. Jeetendra Chandrakant Malwe | | |
| 4 | Smt. Linsi Daynal Babu | 1/7/20 to 30/9/20 | 102 |
| 5 | Shri. Ranubai Dashrat Shinde | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | Smt. Rani Ravindra Khandarkar | | |
| 7 | Smt. Mamta Datatre Shinde | | |
| 8 | Smt. Rukmani Dinesh Wagmore | 1/7/20 to 30/9/20 | 103 |
| 9 | Smt. Vibhawari Vilas Jadhav | | |
| 10 | Smt. Nisha Vijay Ubale | | |
| 11 | Smt. Rekha Sakharam | | |
| 12 | Kum. Namrata Madan Chane | 1/7/20 to 30/9/20 | 104 |
| 13 | Smt. Bhawad Reshma Balkrishna | | |
| 14 | Smt. Savita Sachin Tawde | | |
| 15 | kum. Ankita Arun Chavhan | | |
| 16 | Shri. Kuldeep Rajendra Shinde | 1/7/20 to 30/9/20 | 105 |
| 17 | Shri. Deepak Dilip More | | |
| 18 | Shri. Hanumant Libaji Pawar | | |
| 19 | Smt. Archana Awahad | 1/7/20 to 30/9/20 | 106 |
| 20 | Smt. Yogita Bandekar | | |
| 21 | Smt. Pramila Rajaram Sakpal | | |
| 22 | Smt. Asmita Jawle | | |
| 23 | Smt. Rupali Sutar | 1/7/20 to 30/9/20 | 107 |
| 24 | Smt. Surekha Praween Kamble | | |
| 25 | Smt. Rupali chavan | | |
| 26 | Smt. Poonam Arwind Sawant | 1/7/20 to 30/9/20 | 108 |
| 27 | Smt. Pratibha Vitthal Kashid | | |
| 28 | Smt. Sushma Shrawan Gadhri | | |
| 29 | Smt. Roshni Ashokrav Dakate | | |
| 30 | Smt. Monika Tanaji Shinde | 1/7/20 to 30/9/20 | 109 |
| 31 | Smt. Shankita Jadhav | | |
| 32 | Smt. Aamrapali Uttam Kadam | | |
| 33 | Shri. Chander Ram Shinde | 1/7/20 to 30/9/20 | 110 |
| 34 | Shri. Satish Harish Wagela | | |
| 35 | Shri. Narendra Bhagwan Thakre | | |
| 36 | Shri. Rajaram Dhaundu Kedar | | |
| 37 | Shri. Raveena Bapu Sardar | 1/7/20 to 30/9/20 | 111 |
| 38 | Smt. Preeti Chintaman Gaikwad | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 39 | Smt. Jyoti Balkrishna Isane | | |
| 40 | Smt. Swapnil Avidat Patil | 1/7/20 to 30/9/20 | 112 |
| 41 | Smt. Ashwini Anil Nikube | | |

तात्कालीन मा. आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार हॉटेल एमब्रोसियाचे व्यस्थापक यांनी वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना राहण्यासाठी रुम दिलेले होते तथापि सदर रुमचे दर या बाबत स्पष्ट आदेश देलेले नव्हते. सदर हॉटेल व्यस्थापकाने खालील प्रमाणे देयक सादर केलेले आहे.

सदर हॉटेलचा व्यस्थापकांनी सादर केलेले देयक (संदर्भिय पत्रान्वये) खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Date | Total Person | Total Days | Rate per Day | Total Amount (Excluding GST Rate) |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **1/7/20 to 31/7/20** | **41** | **31** | **500** | **635500** |
| **2** | **1/8/20 to 31/8/20** | **41** | **31** | **500** | **635500** |
| **3** | **1/9/20 to 30/9/20** | **41** | **30** | **500** | **615000** |
| **Total Amount (No GST Rate given)** | | | | | **1886000** |

मागिल टिप्पणी पृ.क्रं.१ ते ५ च्या मधील राहण्याकरीता रू. ५००/- प्रति दिन प्रतिव्यक्ती करीता हॉटेल एमब्रोसिया देयक अदा करण्यात आले आहेत तसेच मा.स्थाया समिती यांचेकडील ठराव क्रमांक २, दिनांक १२/११/२०२० अन्वये वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांचे निवास व भोजन (Hotel Ambrosia) यांचे देयक अदा करणेकरिता माहितीसाठी मान्यता देण्यात आली होती. (सोबत ठरावाची प्रत जोडलेली आहे.)

तरी वरील दरा प्रमाणे हॉटेल एमब्रोसियाचे देयक अदा करणेकरीता खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| Sr.No. | Date | Total Person | Total Days | Rate Per Person | Total Amount (excluding GST) |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **1/7/20 to 30/9/20** | **41** | **92 days (31+31+30)** | **500** | **18,86,000/-** |

वरील तकत्यानुसार हॉटेल एमब्रोसिया यांची देयकाची रक्कम खालील प्रमाणे आहे.

| **हॉटेलचे नांव** | **देयकाचे दर** |
|---|---|
| **Hotel Ambrsia** | **१८,८६,०००/-** |
| **Total Amount (excluding GST)** | **१८,८६,०००/-** |

उपरोक्त तक्तया प्रमाणे एकुण रु.१८,८६,०००/- (आठरा लाख शहाऐंशी हजार रूपये मात्र) सदर देयक अदा करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदरचा खर्च हा सन. २०२०-२०२१ मधील विपरीत

परिस्थिती व्यवस्थापन B-२(३) या लेखाशिर्षातून किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधितून खर्च करणे प्रस्तावित आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती यांचे माहितीस्तव साविनय सादर

स्थायी समिती ठराव क्र.४४ दिनांकः—२६/३/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारहॉटेल एमब्रोसिया मध्येकोविड १९ साठी कार्यरत वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांची राहण्याबाबची सोय उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आली असून त्याचे देयक दि. ०१/०७/२०२० ते ३०/०९/२०२० पर्यंत अदा करण्याकामी प्रस्तावाची माहिती नोंद करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते
सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ३ वाचून दाखवितात.

————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र ३**:—जुनी खडी मशिन जवळ, गायकवाड पाडा, उल्हासनगर — ५ येथिल डंपिंग ग्राऊंडवरील कच-याचे सपाटीकरण करणे व त्यासाठी भाडेतत्वावर मशनरी/वाहने (डोझर, पोक्लेन इ.) प्रति तास दराने पुरविणे बाबत मे. झा.पी.ॲण्ड कंपनी, उल्हासगर यांना मुदत वाढ देण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

————————————————————————————————————————

**सदस्य, श्री.राजू जग्यासी:-**या विषयी कोण माहिती सांगणार. डंपिंग ग्राऊंड अधिकारी कोण आहेत?

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-** उल्हासनगर महानगरपालिकचे सर्वप्रथम, स्थायी समिती सभापती महोदय, मा. महापौर मॅडम, स्थायी समिती सदस्य, जुनी खडी मशीन गायकवाडा उल्हासनगर-५ येथे सध्या महानगरपालिकेचे डंपिंग ग्राऊंड आहे.त्याच्या सपाटीकरणाच्या कामासाठी गेल्यावर्षी आपण टेंडर दिले होते,मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यांना मुदतवाढ देण्यासाठीसदरचे टेंडर जे आहे ते दिनांक २१/०१/२०२१ रोजी संपुष्टात आलेले आहे.आणि सध्या आपण प्रस्ताव पाठवलेला होता.तीन महिन्यांचे मुदत वाढ(एक्सटेंशन) आणि इ-निविदा पूर्ण होईल याचामधला जो कालावधी असेल तो कालावधी ग्राहय धरुन करण्यात येईल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौर, मा.सभापती, मा.आयुक्त मॅडम आज आमच्या तूम्हीच याठिकाणी आयुक्त आहात. काही दिवसापूर्वी आमच्या सदस्यांनी, श्रीम.कंचन लुंड, श्री.अमर लुंड आणि ५ नंबरचे मंडळाध्यक्ष पदाधिका-यांनी उपोषण केले होते.५ नंबर येथे भरपूर हजारोंच्या संख्योने लोकांनी आपल्या घरात बसून उपोषण केलं होत. की उल्हासनगर-५ येथील डंपिंग ग्राऊंड हटविण्यात यावे.तसेच हे डंपिंग ग्राऊड

हटविण्यासाठी मा. आयुक्तजी यांनी आम्हाला लिखीत स्वरुपात दिली होती की आम्ही या ठिकाणी त्वरीत याठिकाणी जंतुनाशकांची फवारणी करणार जसे की ५ नंबर येथे दुर्गंधी पसरु नये, दुषीत हवा पसरु नये. त्याच बरोबर मेलेले जनावर फेकण्यात येवू नये.त्यांना कुठे तरी प्रोजेक्ट बनवून  त्याच ठिकाणी जाळण्यात यावे. आणि या डंपिंग ग्राऊडला लवकरात लवकर उसाटणे येथे आपल्याला जमीन मिळावायाची आहे त्याठिकाणी हालविण्यात येईल.उसाटणेच्या जमीन मिळाली आणि आजच महासभेमध्ये संरक्षक भिंत बनविण्याचे टेंडर आलेले आहे.हे काम सुरु झालेले आहे.परंतु मेलेले जनावरांना त्या ठिकाणी टाकत आहेत हे त्वरीत बंद करण्यात यावे.माझे असे निवेदन आहे की लवकरात लवकर उल्हासनगर-५ येथील डंपिंग ग्राऊंड हटविण्यात आले पाहिजे.उसाटणेचे जे काम आहे ते लवकरात लवकर सुरु करण्यात यावे.कारण आमचे सदस्या, श्रीम. कंचन लुंड वैगेरे यांनी जे उपोषण केले होते की ५ नबरचे डंपिंग ग्राऊंड हटविण्यात यावे.हे कायमचे उल्हासनगर ५ येथील रहणारे रहिवांशासाठी घाण, दुर्गधी इत्यादी त्रास होवू नये.हे जे आज आले आहे यासाठी ही जी मुदत वाढ आलेली आहे.याची सुध्दा मुदत ३ ते ४ दिवसाची मुदत संपत आहे.आम्ही केव्हा आणतो जेसे की आता मी डॉक्टरला सांगितले की आपण ६ महिन्यानंतर प्रस्ताव घेवून आले. हा मुदत वाढीचा प्रस्ताव सुध्दा अशाच वेळी आला आहे. जेव्हा आम्ही मुदत वाढ आज या ठिकाणी आमही करणार, मुदत वाढ वाढविली आणि गेटच्या बाहेर निघालो की मुदत वाढ संपून जाईल.३१ मार्च ची मुदत वाढ पाठविलेली आहे.आणि आज तारीख आहे २६/३/२०२१. त्यामुळे तीन चार दिवस कसे निधून जातील हे कळणारच नाही तर असे नेहमी नेहमी येत असेल तर मी असे सांगतो की,ही स्थायी समिती वरील प्रस्तावने जुनी खडी मशीन जवळ गायकवाड पाडा उल्हासनगर ५ येथील  डपिंग ग्राऊंडवर कच-याचे सपाटीकरणासाठी भाडे तत्वावर मशीन, डोजर, पोकलेन पुरविण्याबाबत झा पी कंपनी उल्हासनगर यांना मुदत वाढ देण्यास मान्यता देत आहेत तसेच उसाटणे मौजे अंबरनाथ येथे डंपिंग ग्राऊंड साठी कंपाऊंड वाल बांधणेचे प्रस्तावीत आहे व लवकरात लवकर काम चालू तसेच डीपीआर प्रकल्पाचा आराखडा , आम्ही डीपी  चा आराखडा बनविण्यासाठी कन्सलटंट ची नियुक्ती करत आहोत तर हा कन्सलटंट त्वरीत करण्यात यावा आणि जो पर्यंत याठिकाणी कंपाऊंड वाल बनविली जाईल कचरा त्याठिकाणी जाईल तोपर्यंत यास मुदत वाढ देत आहेत. ठिक आहे ना.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारिया:-</u>** मा. सभापतीजी....

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-</u>** सर, मला एक या विषयात एक थेडीशी सुचना होती, कसे आहे जेव्हा हा विषय आपण ई- निविदा केली होती आपली विहित मुदतीत इ-निविदा पूर्णही झाली असती. परंतु याच्यामध्ये न्यायालयामध्ये हे प्रकरण एक कॅान्ट्रक्टर घेवून गेल्याने आपल्याला याच्यामध्ये न्यायालयाने फेर निविदा करायला सांगितली आहे.तर फेर निविदेची प्रक्रिया आपली चालू आहे. आता त्याची  प्रक्रिया सुध्दा होईल. अंतिम मान्यतेसाठी दिलेली आहे.अंतिम मान्यतेनंतर ती फेर निविदा ही होईल.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** हे जे आपण केलेले आहे ते आपण एक वर्षासाठी केले जात आहे. त्यामुळे एक वर्ष परत डंपिंग ग्राऊंड त्याच ठिकाणी ठेवणार का? त्याला आम्ही एक वर्षाची फेर निविदा करण्यासाठी मान्यता देत नाहीत. ही स्थायी समिती आपणांस मान्यता देत आहे की, ३ महिन्याच्या आतमध्ये हे डंपिंग ग्राऊंड बंद झाले पाहिजे. आणि ५ नंबरचे काम पूर्ण झाले पाहिजे. तो पर्यंत कचरा तिथे फेकला गेला पाहिजे.यासाठी हि मन्यता ३१ मार्चला संपत आहे त्यानंतर सुध्दा जो पर्यंत उंपिंग ग्राऊंड हटविण्यात येत नाही तो पर्यंत मान्यता देत आहे.

**<u>सदस्या, श्रीम. कंचन अमर लुंड:-</u>**कंपाउंड वॉल बनलेला नाही,

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारिया:-</u>** मा. सभापतीजी, पहिल्यांदा तर हे माहिती करुन घेवू इच्छितो की, आम्ही जो ठराव नं.४५, दिनांक १३/०१/२०२० रोजी केला होता तर वर्क ऑर्डर दिल्यानंतर त्यांची वेळ (time limit)कॅन्ट्रक्टरची कधी संपली?आपण पहीले मे.झा.पी.आणि कंपनीला ठराव नं.४५, दिनांक १३/०१/२०२० यामध्ये कॅन्ट्रक्टर ला ३६५ दिवसासाठी वर्क ऑर्डर दिनांक २१/०१/२०२० ला दिलेली होती.जो दिनांक २२/०१/२०२० पासून चालू झाले.तर आपले काम हे दिनांक २१/०१/२०२१ पर्यंतच होते.बरोबर आहे.

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-** बरोबर आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारिया:-** ठिक आहे, दि.२१/०१/२०२१पर्यंत त्याला वर्क ऑर्डर होती. तर आपल्याला दुसरा टेंडर मागावायला पाहिजे होता.आपण दुसरा टेंडर कधी कॉल केला आहे.

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-** सर, विहीत मुदतीत आपण टेंडर ची प्रोसेस केली होती.

**सदस्य, श्री. राजेश वधारिया:-** तारीख सांगा, विहित मुदतीत म्हणजे काय? मोघम सांगू नका.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**आता माहिती आहे की जानेवारी मध्ये टेंडर संपत आहे तर तीन महिने पहिले ऑक्टोबर मध्ये प्रक्रिया सुरु करायला पाहिजे. परंतु या ठिकाणी असे काही होत नाही. इथे टाईमपास करुन

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:-**सभापतीजी, यालाच मुदत वाढ दयाची होती तर टेंडर का कॉल करायचा. सभापती जी, यालाच मुदत वाढ दयाची होती टेंडर का कॉल करायचा?

**सदस्य, श्री. राजेश वधारिया:-** सभातीजी, आपल्या माध्यमातून मला बोलायचे आहे, की प्रशासनाची काही तयारी नाही आहे. आम्ही साध आणि सरळ विचारलेले आहे, आपला जो गोषवारा आहे त्यामध्ये पॅरा नं.२ मध्ये लिहिले आहे की १३ तारखेचा ठराव नं.४५ त्याला दिनांक १२/०१/२०२० ला आपण वर्क ऑर्डर दिली.२१ तारखेला काम चालू झाले.ठिक आहे, आणि दिनांक २१/०१/२०२१ पर्यंत काम चालू करण्यात आले.टेंडर नविन कधी काढले?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महोदया, आपण गोषवारा जर वाचला तर आपल्या अधिका-याचा बेजबाबदारपणानिदर्शनास येईल.याठिकाणी लिहिलेले आहे की, दिनांक २१.०१.२०२१ असून सदर कामासाठी नविन अभिकर्ता नेमणूक करण्याबाबत निविदा प्रक्रिया सुरु आहे. तथापि त्यापूर्वी सदरची निविदा प्रकिया पूर्ण होणे शक्य नाही. निविदा प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी किमान ६० दिवसांचा कालावधी अपेक्षित आहे. अधिका-यांना हे माहिती आहे, की निविदा काढली तरी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ६० दिवस लागतील. तर अजून निविदा आली नाही तर ९० दिवसासाठी जर , हे सगळे माहिती आहे आणि हे सुध्दा माहिती आहे की दिनांक २१.०१.२०२१ ला हा आपला टेंडर संपुष्टात येणार आहे. तर ऑक्टोबरमध्ये , ऑक्टोबर नोंव्हेंबर, डिसेंबर, किवा नोंव्हेबर, डिसेंबर, जानेवारी ३ महिन्यापासून पहिले ९० दिवसापूर्वी निविदा काढू शकत होते. यांना स्वत:ला सर्व माहिती आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण करणेसाठी ९० दिवस लागतील. परंतु हे निविदा कधी काढतात दिनांक २१.०१ २०२१ ला की ही निविदा पूर्ण झाल्यानंतर, म्हणजे घरामध्ये आग लागली त्याच्या नंतर फायर ब्रिगेड बोलावायचे नाही.आम्ही बोलणार लागली तर लागू दया, आपण एक विहीर खोदु, विहीर खोदुन झाली तर त्यामधून पाणी काढून त्याच्यावर टाकले जाईल.हे असे काम चालले आहे, उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये.

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-** सर आम्ही विभागामध्ये जानेवारी मध्ये ई-टेंडरची प्रक्रिया चालू केली होती.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** संपण्याची तारीख कोणती होती, जानेवारी. आपण स्वत: लिहितात की ६० दिवस कमीत कमी पाहिजे.

**अतिरिक्त आयुक्त, श्रीम. करुणा जुईकर:-** सन्माननीय सभापती महोदय, सर्वसन्माननीय स्थायी समिती सदस्य, ही बाब आता हया फाईल बददल सन्माननीय सदस्यानी जो प्रश्न उपस्थित केला. तर मी टेंडर समितीच्या अध्यक्ष म्हणून जवळ जवळ एक ते दीड महिन्या पूर्वी याचे प्रोसीडींग पण केलेले आहे सर.आणि यांच्यामध्ये सर्व विभाग प्रमुखांना स्पष्ट सुचना दिलेल्या आहेत की तूम्ही टेंडर संपे पर्यंत वाट बघायची नाही.टेंडर संपत असताना टेंडर ची जी किमंत आहे त्या प्रमाणे आपला कालावधी असतो.त्या कालावधीच्या आधीच ती प्रक्रिया सुरु झाली पाहिजे. सर, आता मी त्यांना सुचना दिलेल्या आहेत की शेवटच्या क्षणाला

आलेल्या कुठल्याही फाईलवर मी सही करणार नाही एवढया स्पष्ट सुचना आपण विभाग प्रमुखंना दिल्यात . सर, हे टेंडर आता मला ज्ञात आहे की मला ६ महिने झालेले आहेत. त्यानंतर जेव्हा फाईली येतात तेव्हा माझे लक्षात यते.आणि मग अर्जंट बाब म्हणून मग मुदत वाढ दिली जाते. तर हे स्पष्ट हे तीन्ही शेरे नमूद करुन सर्व विभाग प्रमुखांच्या सहया घेवून आपण सगळयांना सुचना सर दिलेल्या आहेत. त्या प्रमाणे विभाग प्रमुखंनी कारवाई करणे अपेक्षित आहे.

**सदस्य, श्री.राजू जग्यासी:-** म्हणजे आयुक्त मॅडम आम्ही असे समजून चालायचे की या पुढे मुदतवाढीचे कोणतेही काम येणार नाही.

**अतिरिक्त आयुक्त, श्रीम. करुणा जुईकर:-** सर सुचना आपण दिलेल्या आहेत. मा. आयुक्त महोदयांच्या निदर्शनास सुध्दा ही बाब आणून दिलेली आहे आणि ही त्या त्या विभाग प्रमुखाची जबाबदारी आहे.

**सदस्य, श्री.राजू जग्यासी:-** आम्ही असे समजू की आपल्या सुचनांचे पालन होईल आणि कोणतेही मुदत वाढीचे काम येणार नाही.

**अतिरिक्त आयुक्त, श्रीम. करुण जुईकर:-** सर, शासन निर्णय जो म्हणतो त्याप्रमाणे विभाग प्रमुखंनी पालन करणे आवश्यक आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**मॅडम , याला काय करणार हया दिनांक ३१/०३/२०२१ तर संपली. मुदत वाढ पण संपली.

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-** सर, यामध्ये आता ३१ तारखेला याची मुदत संपते आहे. परंतु आपण दुसरं जे ई-निविदा करतो आहे त्याला किमान एक दीड दोन महिन्याचा कालावधी लागेल. तीन महिन्याची मुदत वाढ पुन्हा दिली तर बरे होईल.

**सदस्य,श्री. राजेश वधरीया:-** बघा पहिले, नाही, विषयाला आपण भरकटवू नका, जानेवारी ३१ तारीख २०२० ला आपण वर्क ऑर्डर दिली होती. आपल्याला माहित होते की माझी वर्क ऑर्डर २०२१ पर्यंत आहे.तीन महिने पहिले टेंडर प्रोसेस चालू व्हायला पाहिजे होती.नाही केली कोणाची चूक आहे? आता आपण सांगितले की विहित , विहित म्हणजे काय?यामध्ये एक टाईम लिमिट याचा अर्थ काय?१५ दिवस, १ महिना, २ महिने समजू, हे बघा जिथे पण अधिका-याला डिसक्रीप्सनरी पॉवर मिळत असते तिथे हे असे खेळ चालू होते.आपल्या सूचना साध्या आणि पूर्ण असायला पाहिजेत. एक वर्षाचे टेंडर आहे आणि ते संपणार आहे. तर तिन महिने पहिले टेंडर कॉल केले पाहीजे, ठीक आहे. आता यांनी सांगितले की हार्यकोर्टाने सांगितले की, आपण रिटेंडर करा.तर हायकार्टाने असे का सांगितले?जरा हयाचा सुध्दा आम्हाला खुलासा करा.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री.अशोक नाईकवाडे:-** ४ फेब्रवारीला आम्ही हे टेंडर उघडले, सर टेंडरची प्रक्रिया सुरु केली. दोन वेळा त्या निवेदेमध्ये आपल्याला प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे दोन वेळा आपल्या रदद करण्यात आली.त्यामुळे आपली वेळ लेफट झाली आणि आपण निविदि उघडली पण तेव्हा एक निविदाकार अपात्र ठरला होता. तो जो आपात्र ठरला तो आपल्या टेंडर मध्ये ज्या अटी,शर्ती होत्या त्या पूर्ण (fulfill)करत नव्हता म्हणून अपात्र ठरला होता. त्यानंतर तोआपण अपात्र म्हणून घोषीत केला.आपल्याला तिन निविदाकार त्यात मिळाले होते.जो येणार होता त्याला आपण घेषीत करत होते परंतु त्यावेळेस त्यानी नेमके कोर्टमध्ये गेले.कोर्टाने काय सांगितले की मुळ जी आपली स्थिती (कंडीशन) आहे ती मालकीची होती. आपल्याला जी वाहने हवी, आणि ती मालकी हक्क् सिध्द करु शकत नव्हता. तो जो निविदाकार आहे.म्हणून त्या बेसीस वर आपण परत कोर्टाने ऑफर केली तुम्ही त्याची बैठक घ्या. मॅडमच्या अध्यक्षतेखाली आपण बैठक घेतली . त्या बैठकीत आपण परत सर्वाचे तपासणी केली आणि तातडीने तो आपला रिपोर्ट कोर्टाला सादर केला आणि कोर्टाने तरी पण सांगितले की आपण सर्वांचे निविदा आहे त्या रदद करा आणि फेर निविदा घ्या. खूप प्रयत्न केला. प्रेझेंटेशन पण चांगले केले पण कोर्टाने जर तसा आदेश दिला तर पुढे कसे काय करायचे, आपल्याला पर्याय नसल्यामुळे फेर निविदाची प्रक्रिया सुरु केली म्हणून ती आता फेर निविदाची प्रक्रिया होईपर्यंत

वेळ लागणार आहे. तो पर्यंत आपल्याला मुदत वाढ देण्याशिवाय पर्याय नाही.कारण की बाब जी आहे ती आपल्यांना सर्वांना माहिती आहे.मान्यता घेणे गरजेचे आहे आणि सुरु ठेवणे आवयक आहे.अशी वस्तुस्थिती आहे त्यामुळे परत आपल्याला निवेदन करीत आहे की आपण मान्यता दया.

**सदस्य, श्री. राजेश वधरीया:-** बघा, प्रथमत: काम कुठुन चालू होते टेंडर मागवण्यापासून हे विभागाला माहिती आहे. की प्रत्येक वर्षी टेंडर काढत आहेत. हया टेंडरची मुदत जी आहे ती दिनांक २१/०१/२०२१ आहे. त्यानंतर सुध्दा पहिले टेंर काढत नाही आणि सांगितले जाते की १४ जानेवारीला आम्ही टेंडर फलोट(flot) केला आहे. दुसरे असे आहे की प्रशासनाने विचार केला पाहिजे.जी पण टेंडर कमिटी आहे.त्यांनी विचार केला पाहिजे की आपल्या विरुध्द एवढे कोर्ट केशेस का होत आहेत? यामध्ये लाखो रुपये वकिलाची फी भरत असतो आणि केस पण हारली जाते. आता जसे या केसमध्ये सांगितले की टेंडर परत मागवा तर कुठे ना कुठे तरी महापालिकेचे कोणत्यातरी गोष्टीस मा.उच्च न्यायालय सहमत होणार नाही.म्हणून सांगितले असेल की हे टेंडर परत मागवा.आम्ही जरी याला दिनांक ३१ /०१ पर्यंत मंजूरी देत आहेत. परंतु परत १ तारखेपासून काम बंद होणार आहे. त्याकरीता आपल्याकडे काय योजना आहे?

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री.अशोक नाईकवाडे:-** यामध्ये आपण शॅार्ट टेंडरही करु शकत नाही. शॅार्ट टेंडर करता येत असते तर आपण आता पर्यंत केल असत आणि निविदाकार निवडला असता.म्हणून यासाठी अडचण आहे.बाकी आपले काही आणि यापुढे दक्षता घेवू की बाबा जास्तीत जास्त आपल्याला परत अशी तक्रार करण्याची वेळ येणार नाही अशी आपण यापुढे दक्षता घेवू.

**सदस्य, श्री. राजेश वधरीया:-**पहिलाआपला एक गैरमज आहे तो मी दुर करत आहे ही तक्रार नाही आहे. तक्रार राहिली असती तर मी युडी सेक्रेटरी जवळ बसलो असतो. आपली तक्रार आपल्यालाच करुन काय मिळणार आहे.(सिजर कम्पलेटस टु द सिजर स्पाईफस) ही जुनी कहानी आहे. हया विभागाची तक्रार त्या उप आयुक्तांना करा, उप आयुक्तांची कम्पलेंटस ॲडीशनल करा व त्यांची कम्पलेंटस आयुक्त यांना करा काहीच होणार नाही हे आम्हाला सुध्दा माहित आहे. तक्रार करायची असली तरप्रिन्सीपल सेक्रेटरी युडी कडे जाणार. हा आमच्या सूचना आहेत. आपण ज्या चूका करत आहेत ते आम्ही तुम्हाला सांगत आहेत आणि वांरवार चूका करत आहात. ठीक आहे एक वेळा चूकी झाली. त्याला बोलतात की, बायमिस्टेक दुस-या वेळेस नाही झाली पाहिजे.जर दुास-या वेळेस चूक होत असेल तर त्यांने विचार करुन केलेली चुक असेसमजण्यात येईल हे लक्षात ठेवा.अकाऊंटॅबीलीटी आपली असेल आमची नाही.आमच्याकडे तर फक्त् दोन पानाचा गोषवारा आलेला आहे.हे वाचून आम्हाला निर्णय घ्यायचा आहे.आणि यामध्ये सुध्दा जे लिहिलेले आहे ते वाचून घ्यायचा आहे.आम्हाला तर हे माहित नाही की फाईल मध्ये कोणी काय लिहिलेले आहे. त्यामुळे काही वेळेस आमच्या साठी अशी परिस्थिती निर्माण करत आहात की आम्ही बोलत असतो परतु काही करु शकत नाही. ३१ तारखेला तुमची मुदतवाढ देखील संपत आहे.

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-**सर, सध्याची परिस्थिती विचारात घेवून ३१ तारखेला जे संपणार आहे पुढे काही ना काही तरी याच्यावरती व्यवस्था करावीच लागेल. आपण ई टेंडर क्लोज करीत आहे त्या ई टेंडरचा कालावधी पूर्ण होई पर्यंत...

**सदस्य, श्री. राजेश वधरीया:-**आपण सांगा ३१ तारखेला संपत आहे.

**सभापती, श्री. विजय पाटील:-** काही ना काही म्हणजे काय करणार आहेत?आता तुमच्या हातातला आहे का कायदयात बोलता की नुसतं काही ना काही करतोय म्हणजे कसे करणार आहेत?काही ना काही?

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-**सर आपण क्लोज करीत तर आहेतच ई टेंडरचा कालावधी संपेपर्यंत...

**सदस्य, श्री. राजेश वधरीया:-** ई टेंडर आपले एक महिना टेंडर उघडण्यामध्ये जाणार आहे. पत्र येईल आणि लिफाफा नं. १ उघडणार, पात्रतेनुसार होणर, नंतर लिफाफा नं.२ उघडणार, ती फाईल आरोग्य विभाग, त्याची

उप आयुक्त, त्यानंतर अकाऊंड विभाग, त्यानंतर ऑडीट विभाग, त्या नंतर अति.आयुक्त, त्यानंतर मा.आयुक्त असे चक्र फिरत राहणार. लिफाफा नं. १ आणि लिफाफा २ , हे सगळे करता करता आपले एक महिना निघून जाईल तसेच सुटटया वैगेरे शनिवार, रविवार सुटया त्यामुळे आम्हाला ही माहिती आहे की यामध्ये ऐवढा वेळ लागेल. जर आपण आता जरी टेंडर फलोट करत असाल तरी तीन महिने तर याच्यासाठी फायनल करण्यात जाणार आहेत.

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-** यासाठी ई-टेंडर फायनल दिले तर चांगले होईल.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** मा. सभापती जी, मनिष जी आपल्याकडून थेडी माहिती जाणून घेवू इच्छितो की एक मिनीट , सभापतीजी आपल्या परवानगीने, हयाची जी बीलींग सिस्टम आहे आपण हे ७४ लाखाचे बील दिलेले आहे. ६९ दिवस बरोबर आहे,किती दिवसासाठी आहे.आपण ८ तास दैनंदिन चालतो असे लिहिले आहे. तर पूर्ण वेळ ८ तास हया गाडया, बुलडोजर चालवले जातात का?

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-**होय चालतात.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** कोणत्या वेळेस चालविल्या जातात? आठ तास.

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-** सकाळी ८ वाजेपासून ते संध्याकाळी ५ किंवा ६ वाजे पर्यंत.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** एकही दिवस बंद नसतात.

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-** कधी कधी खराब किंवा बिघाड झालेला असेल तर.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** आपल्याला मी विनंती करतो की थेडा विचार करुन सांगा. कारण की आपण जे लिहिलेले आहे की ८ तास दररोज, आम्ही त्याला जो पैसे देत आहेत ते प्रति तासा प्रमाणे दररोज आठ तास चालली असा कोणताही दिवस नाही आला की त्या दिवसी याठिकाणी प्रोकलने आणि मशिने चालली नाहीत.असे संभव आहे का?

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-** कधी कधी असे होते की मशीन खराब होते किंवा काही अडचण येत असते तर ती मशीन थोडया वेळासाठी रिपेरसाठी बंद होत असते तेवढया वेळाचे आम्ही पैसे कट करतो.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** याच्यावरती नियंत्रण कोणचे असते?की ही मशीन आठ तास चालते का पाच तास चालते किंवा दहा तास चालली हे बघण्यासाठी यावर कोणाचे नियंत्रण असते?

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-** सर, यासाठी आम्ही त्या ठिकाणी विषेश स्वच्छता निरिक्षकाची नियुक्ती केलेली आहे. ते या सर्वा वरती नियंत्रण ठेवतात.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** कोण आहेत ते?

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-** श्री राजू निकाळजे स्वच्छता निरिक्षक हे आहेत.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** हे जे आहेत हे फक्त यांच्या साठीच आहेत का बाकीचे पण कामे बघतात.

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-** याच्यासाठी आहेत आणि त्यांना एक वार्ड सुध्दा दिलेला आहे.

**सदस्य्, श्री. भारत राजवानी:-** हे दुसरे पण काम बधतात.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** मनिषजी मला असे सांगायंचे आहे की, माझे आपण जे पण उत्तर दयाल, स्थायी समिती मध्ये आपण जबाबदारीनुसार उत्तरे दयावीत कारणी की ही सर्व चर्चा मिनिटस मध्ये रेकॉर्ड होत आहेत. की ही मशीनरी आठचे आठ तास दररोज चालत आहे.आणि आपण त्याच्या वरती अधिकरी नियुक्त केलेला आहे म्हणजे ही जबाबदारी त्या अधिका-याची असते. जर या दिवसामध्ये कोणताही असा दिवस निघून जात असेल की सुटटीचा असेल, संपाचा असेल, गाडी खराब असेल, लॉकडाऊन असेल ब-याच गोष्टी येत असतात. मोठी लिस्ट आम्ही बनवू शकतो.आपण जबाबदारीन सांगा काही अडचण असेल तीही सांगा परंतु काहीतरी बोलू नका. आपल्याला ७४ लाख रुपये देणे आहे आणि ६९ दिवस ८ तासा प्रमाणे चालले आहे. हे जबाबदारी काम आहे.हे जे आपण पैसे देत आहेत हे पैसे शहरातील जनतेकडून टॅक्स भरत आहे.आपल्याला ग्रँड येत आहे.किती वेळेसाठी रु.७४ लाख देत आहे याचा सुध्दा थेडा विचार करावा. आपण ज्याच्या जबाबदारीची कामे देतो ते बरोबर कामे पार पाडत आहेत का? आपण ७४ लाख रुपये पास केले आणि दिवसाचे ८ तासाप्रमाणे बनविले परंतु या दिवसांमध्ये असा एकही दिवस नाही की एखादी मशीन खराब किंवा लॉकडाऊन वैगेरे झाले.आले असेल की नाही. आणि त्या दिवसेची पैसे देणार. आम्हाला थोडे समजून सांगा.जर माझ्या समजण्यामध्ये काही चूक असेल तर क्लीअर करा, की आपण कोणत्या प्रकारे कसे करीत आहेत?

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-** सर एखादी मशीन ८ तास बंद असेल तर त्याचे ८ तासाचे पैसे कापण्यात येतात आणि त्याच्यासाठी तेथे आम्ही मनुष्यबळ ठेवलेले आहे. जी मशीनरी ज्या दिवशी बंद होत असेल त्या दिवसाचे, तेवढया तासांचे किंवा पूर्ण ८ तास बंद असेल तर पूर्ण ८ तासाचे बीलामध्ये कपात करण्यात येते.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** आपण या ठिकाणी जे ७४ लाख रुपये गणना(calculation) काढलेलेआहेत ते तर असेच काढलेले आहे की दररोज मशीन ८ तास चालते. आपण तपासणी करणार बघणार असे नाही काढलेले आहे.समजा उदा.एक दिवस ५ हाजर १० हजार १५ हजार त्याच्या कडे जास्त गेले तर महापालिका जास्तीचे देते.माझे बोलणे समजते आहे काय? आपण हे गणना करुन माझे कडे या ठिकाण पाठवले आहे, ते असे मानतो की सर्व दिवस ८तास मशीनरी ने काम केले आहे.हे असे मानावे लागेल किंवा मशीन बंद होत नाही.किंवा असेही सांगू नका की ज्या दिवशी मशीन बंद असेल त्या दिवशी आम्ही मजूर लावले जातात.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** जेवढा वेळ मशीन चालेल तेवढेच पैसे देण्यात यावे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** हे काय होते की आपले अधिका-यांना सांगता येत नाही. हे आम्ही एक जेसे की अंदाजपत्रक बनते, असे एकच ठेवले आहे की मशीन ८ तास चालवायची.असे समजा की मशीन दोन दिवस चालली नाही तर १६ तासाचे पैसे कापून देण्यात येतात. गाडी भाडेतत्वावर असून भाडे ठरवलेले आहे.जेवढी गाडी चालेल तेवढेच पैसे देणार जेवढा वेळ चालत नसेल त्याचे पैसे देणार नाही.असे उत्तर आपण देवू शकत नाही.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** रु. ७४ लाख हे पूर्ण देणार की त्यापैकी काही रक्कम कापण्यात येईल.

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-** सर, त्यापैकी काही रक्कम कपात होईल, डेफिनेटली कटींग होणार.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** काही रक्कम कापण्यात येईल म्हणजे त्याला यामधून कपात करुन पैसे मिळणार का? हीच रक्कम मिळेल.

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-** कपात झाली तर मायनस होवूनच पैसे मिळणार.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** यापुढे आम्ही आपल्याला परत विचरणा करु की कपात करण्यात आली आणि किती दिवसांचे पैसे कापण्यात आले आहे हे लक्षात ठेवा.

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-** जरूर.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** एक मिनिट आता ३ महिने जी मुदत वाढ आपण मागत आहेत त्याचे किती रक्कम वाढेल?

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री.मनिष हिवरे:-</u>** सर हे तेवढेच राहणार रु. ७४ लाख.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** ठिक आहे, तीन महिन्याची अजून मुदत वाढ देत आहेत. तीन महीने हे तीन महिने ते मॅडम ६ महिन्याची मुदतवाढ घ्या.

**<u>महापालिका सचिव</u>**:-मी ठराव वाचून दाखवते यामध्ये काही बदल असतील तर सांगा. ही स्थायी समिती वरील प्रस्तावने नुसार जुनी खडी मशीन जवळ गायकवाड पाडा उल्हासनगर- ५ येथील डंपिंग ग्राऊंड वरील कच-याचे सपाटीकरण करणे व त्यासाठी भाडेतत्वावर मशीनरी, वाहने, डोजर, पोकलने प्रतितास दराने पुरविणेबाबत मे. झा पी अँड कंपनी उल्हासनगर यांना मुदतवाढ देणेस मान्यता देत आहे.तसेच उसाटणे मौजे अंबरनाथ येथे डंपिंग ग्राऊड साठी कंपाऊंड वाल बांधणे हे प्रस्तावीत आहे.तसेच डी.पी.आर.प्रकल्पाचा आराखडा तयार करण्याचे काम सुरु असून तो पर्यंत पुढील तीन महीन्या पर्यंत मुदत वाढ देणेस मान्यता देत आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>**नाही कंपाऊड वाल पुर्ण होईपर्यंत, कंपाऊड वालचे काम पुर्ण होईपर्यंत. मुदतवाढ द्या.

**<u>सभापती, श्री. विजय पाटील:-</u>**इत्तिवृताची वाट न पाहता. पास..पास..

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**सभापतीजी, स्वत: बोलत आहेत की, इत्तीवृत्ताची वाट न पहाता पहील्या वेळेस ऐकायला आले आहे. सभापतीजी आपण सागितलेकी ७ वाजले होते माफी मागतो की मी हे जे बोलतो आहे.

**<u>सभापती, श्री. विजय पाटील:-</u>** महिला वर्गासाठी काही अडचणी येत असतात.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**मी आपल्याला सांगु इच्छितोकी, ज्यावेळेस मी सभापती होतो.त्यावेळी मी आयुक्तांबरोबर बसून प्री स्टँडीग कमितटी मिटीग घेत होतो आणि या गोषवा-यामध्ये कुठे काही कमी आहे हे निदर्शनास आणून देत होतो आणि यामध्ये आमचे काही प्रश्न निर्माण होवू शकतात याची तयारी करुन घेत होतो, जसे की, आता मनिषजी शांत बसले, तर शांत व्हायला नाही पाहीजे, की वेळीच त्याचे प्रश्नाचे उत्तर देता आले पाहिजे.यांची तयारी नाही.

**<u>सभापती, श्री. विजय पाटील:-</u>** यावर नंतर बोलू आता पुढचा विषय घ्या.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

सभापती, श्री. विजय पाटीलसदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे

---

☑विषय क्र. ३ :—जुनी खडी मशिन जवळ, गायकवाड पाडा, उल्हासनगर — ५ येथिल डंपिंग ग्राऊंडवरील कच-याचे सपाटीकरण करणे व त्यासाठी भाडेतत्वावर मशनरी/वाहने (डोझर, पोक्लेन इ.) प्रति तास दराने पुरविणे बाबत मे. झा.पी.ॲण्ड कंपनी, उल्हासगर यांना मुदत वाढ देण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

जुनी खडी मशीन गायकवाड पाडा, उल्हासनगर - ५ येथील डंपिंग ग्राऊंडवर सद्या स्थितीत २ पोकलेन व २ डोझर मशीन मार्फत कचरा सपाटीकरणाचे दैंनदिनी काम होत असते.

उल्हासनगर शहरात दरोज अंदाजीत ३६० मॅट्रीक टन कचरा निर्माण होत आहे.सदरचा कचरा नियमीत जुनी खडी मशिन जवळ, गायकवाड पाडा, उल्हासनगर - ५ येथिल डंपिंग ग्राऊंडवर निर्गमीत केला जातो. तसेच नागरीकांकडून करण्यात आलेल्या घराच्या डागडुगी मधुन निघणारा अतिरीक्त कचरा कचरा वाहतूक ठेकेदारामार्फत

जुनी खडी मशिन जवळ, गायकवाड पाडा, उल्हासनगर - ५ येथिल डंपिंग ग्राऊंडवर निर्गमीत केला जात आहे. सद्या पावसाळयामुळे कचरा वाहतूक करणारे वाहन डंपिंग ग्राऊंडच्या मागील बाजुस जात नसल्याने कचरा पुढील बाजुस खाली होत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी कच-याचे मोठे मोठे ढीग निर्माण झालेले आहेत. सदर ठिकाणी डोझर व पोक्लेन मशिनद्वारे नियमीत कच-याचे सपाटीकरण सुरु आहे.परंतु सद्या कचरा पुर्णता मागे नेणे २ पोकलेनद्वारे शक्य होत नाही.त्यामुळे पुढच्या बाजुस कच-याचे ढिग जमा होत आहे.१ अतिरीक्त पोकलेन मशीन वाढवील्यास कचरा कंटीग करणे व सपाटीकरणाच्या कामात खुप मदत होईल व कचरा व्यवस्थीत रित्या सपाटीकरण करुन मागील बाजुस नेता येईल.

मा. स्थायी समिती ठराव क्र. ४५ दिनांक १३/०१/२०२० रोजी अन्वये जुनी खडी मशिन जवळ, गायकवाड पाडा, उल्हासनगर - ५ येथिल डंपिंग ग्राऊंडवरील घनकच-याचे सपाटीकरणाचे कामाकरीता मे. झा पी ॲण्ड कंपनी, उल्हासनगर यांची एक वर्षासाठी अभिकर्ता म्हणून नेमणुक करण्यास मान्यता दिलेली आहे. कार्यादेश दिल्यापासून ३६५ दिवसांकरीता व जा.क्र.उमपा/आवि/उप-आ/११३/२०२०, दिनांक २१/०१/२०२० रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये दिनांक २२/०१/२०२० रोजी पासुन सुरु आहे.मे.झा पी ॲण्ड कंपनी, उल्हासनगर यांची १ वर्षासाठी अभिकर्ता म्हणून नेमणुक करण्यात आली आहे.सद्यास्थितीत सुरु असलेल्या कामाची अंतीम मुदत दिनांक २१/०१/२०२१ असून सदर कामासाठी नवीन अभिकर्ता नेमणूक करणेबाबत निविदा प्रक्रीया सुरु आहे.तथापी त्यापुर्वी सदरची निविदा प्रक्रिया पुर्ण होणे शक्य नाही.निविदा प्रक्रीया पूर्ण होण्यासाठी किमान ६० दिवसांचा कालावधी अपेक्षित आहे. करीता दिनांक ३१ मार्च, २०२१ पर्यंत किंवा नवीन अभिकर्त्याची नेमणूक होईपर्यंत जे आगोदर घडेल तो पर्यंत मेसर्स झा पी ॲण्ड कंपनी, उल्हासनगर यांना मुदत वाढ देण्याचे प्रस्तावित करण्यात येते. तरी ३१ मार्च, २०२१ पर्यंत मेसर्स झा पी ॲण्ड कंपनी, उल्हासनगर यांना २ डोझर डी -१२० व २ प्रोकलन इक्स-२०० प्रति दिन ८ तासासाठी चालवल्यास प्राप्त मंजुर दरानुसार येणारा खर्च खालिल प्रमाणे अपेक्षित आहे.

| **अ.क्र.** | **तपशील** | **आवश्यक मशनरी (नग)** | **प्रति तास रुपये** | **एकुण दिवस** | **(प्रति दिन आठ तासांसाठी) आपेक्षित खर्च रुपये** |
|---|---|---|---|---|---|
| १ | Bulldozer D-१२०<br>or quuivalent | २ | ३१५० | ६९ | ३४,७७,६००/- |
| २ | Poclain EX-२००<br>or quuivalent (with bucket) | २ | २९२० | ६९ | ३२,२३,६८०/- |
| एकूण खर्च रुपये | | | | | ६७,०१,२८०/- |

तरी ३१ मार्च, २०२१ पर्यंत मेसर्स झा पी ॲण्ड कंपनी, उल्हासनगर यांना २ डोझर डी -१२० व २ प्रोकलन इक्स-२०० प्रति दिन ८ तासासाठी चालवल्यास प्राप्त मंजुर दरानुसार रुपये ६७,०१,२८०/- ऐवढा खर्च अपेक्षित आहे.

सद्यास्थितीत कचरा डंम्प करणारे वाहने डंपींग ग्राऊंडच्या मागच्या कोप-यापर्यंत जाण्यास असमर्थ असल्याने पुढील बाजुस कचरा डंम्प होवुन कच-याचे ढिग जमा होत आहे.सद्यास्थितीत २ पोकलेन मशीन मार्फत कचरा कंटीग व कचरा मागील बाजुस नेण्यास खुप अडचण निर्माण होत आहे.त्यामुळे पुढच्या बाजुस कच-याचे ढिग जमा होत आहे.१ अतिरीक्त पोकलेन मशीन वाढवील्यास कचरा कटीग करणे व सपाटीकरणाच्या कामात खुप मदत होईल व कचरा व्यवस्थीत रित्या सपाटीकरण करुन मागील बाजुस नेता येईल.

तसेच स्वच्छता निरीक्षक तथा डंपिंग ग्राऊंड नियंत्रक यांनी सादर केलेले पत्र विचारात घेता व सहा. सार्वजनिक आरोग्य अधिकारी व मुख्य स्वच्छता निरीक्षक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता किमान १ अतिरीक्त पोकलेन इक्स-२०० मशिन दिनांक (३० दिवस) कालावधीसाठी ८ तासांसाठी पुरवठा करुन घेणे आवश्यक आहे करीता येणारा खर्च खालिल प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मशिनचा तपशील | आवश्यक मशनरी (नग) | मंजुर दर रुपये (प्रति तास) | एक महिन्यासाठी (३० दिवस) (प्रति दिन आठ तासांसाठी) |
|---|---|---|---|---|
| १ | Poclain EX-२०० or equivalent (With bucket) | १ | २९२०/- | ७,००,८००/- |

**उक्त मशनरी लावून कचरा सपाटी करणासाठी (रुपये ६७,०१,२८०/- + रुपये ७,००,८००/- = रुपये ७४,०२,०८०/-) एंकदरीत ३१ मार्च, २०२१ पर्यंत (६९ दिवस) करीता २ डोझर डी -१२० व २ प्रोकलन इक्स-२०० प्रति दिन ८ तासासाठी रुपये ६७,०१,२८०/- व ३० दिवसांसाठी १ अतिरीक्त प्रोकलन इक्स-२०० प्रति दिन ८ तासासाठी रुपये ७,००,८००/-यानुसार एकुण रुपये ७४,०२,०८०/- (चौ-यात्तर लाख दोन हजार ऐंन्शी रुपये मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च भागविण्यासाठी अंदाजपत्रक सन २०२०-२०२१ च्या भाग - १ सी-१(१) कचरा वाहतुक खर्च या लेखाशिर्षकात केलेल्या रुपये २८००००००/- तरतूद केली असून सदरचा खर्च त्यातून करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.**

**सदरच्या खर्चास व जुनी खडी मशिन जवळ, गायकवाड पाडा, भाडेतत्वावर पुरवठा करुन घेण्यासाठी मे. झा पी ॲण्ड कंपनी, उल्हासनगर यांना दिनांक ३१ मार्च, २०२१ पर्यंत किंवा नवीन अभिकर्त्याची नेमणूक होईपर्यंत जे आगोदर घडेल तो पर्यंत व ३० दिवसांकरीता १ अतिरीक्त पोकलेन इक्स-२०० मशिन प्रति दिन ८ तासासाठी पुरवठा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे.करिता सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव मा.स्थायी समिती समोर सविनय सादर.**

स्थायी समिती ठराव क्र.४५ दिनांकः—२६/३/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारतसेच सभेत आलेल्या चर्चेअंती **जुनी खडी मशिन जवळ, गायकवाड पाडा, उल्हासनगर — ५ येथिल डंपिंग ग्राऊंडवरील कच-याचे सपाटीकरण करणे व त्यासाठी भाडेतत्वावर मशनरी/वाहने (डोझर, पोक्लेन इ.) प्रति तास दराने पुरविणे बाबत, मे. झा.पी.ॲण्ड कंपनी,उल्हासनगरयांना सदर काम दिलेले आहे.**

**परंतु** उसाटणे मौजे अंबरनाथ येथे डंपिगग्रउंडसाठी कंपाउंड वॉल बांधणे हे प्रस्तावित असुन सदर कंपाउंड वॉलचे काम पूर्ण होईपर्यंत**सपाटीकरणाचे काम करणेस मे. झा.पी.ॲण्ड कंपनी,उल्हासनगर यांना** मुदतवाढ देणेस मान्यता देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र ४** :—कोव्हिड-१९ रुग्णावर उपचार करण्या करीता नेमण्यात आलेल्या डॉक्टर,नर्स व वार्डबॉय यांच्या रहाण्याकरीता घेण्यात आलेल्या स्वामी धर्मदास दरबारच्या रुमचे भाडे अदा करण्या आले असुन मा.स्थायी समितीची माहितीसाठी सविनय सादर.

---

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** पास...पास..

**काही सदस्य:-** पास, पास....

सभापती, श्री. विजय पाटीलसदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे

---

☑ विषय क्र.४:—कोव्हिड-१९ रुग्णावर उपचार करण्या करीता नेमण्यात आलेल्या डॉक्टर,नर्स व वार्डबॉय यांच्या रहाण्याकरीता घेण्यात आलेल्या स्वामी धर्मदास दरबारच्या रुमचे भाडे अदा करण्या आले असुन मा.स्थायी समितीची माहितीसाठी सविनय सादर.

प्रस्तावना

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, ज्याअर्थी सध्या जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणूची लागण झाली आहे. सदर रोगाच्या प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधनात्मक कायदा, १८९७ संदर्भ क्र. ०१ अन्वये दिनांक १४ मार्च,२०२० पासून लागू करून खंड २,३ व ४ मधील तरतूदीनूसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महापालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम आहेत, असे घोषित करण्यात आले आहे.

त्या अर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिसुचने द्वारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना अनुषंगाने तसेच महानगरपालिका क्षेत्रात कोरोना संबंधी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) "क" मध्ये नमुद केलेप्रमाणे कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंबा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुस-या दखादया नगरपालिका प्रधिका-याच्या किंवा १ (राज्य) शासनाच्या मंजुरी मान्यता किंवा प्रधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहीजे असे नमुद आहे.

आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५० (अ) अन्वये आपत्कालीन खरेदी व आपत्तीजन्य परीस्थिती किंवा धोक्याच्या कारणांमुळे राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरण बचाव करण्यासाठी तात्काळ तरतुद किंवा साहित्य खरेदी करणे किंवा संसाधनांचा त्वारीत उपयोग करणे आवश्यक आहे असे नमुद आहे. तसेच आपत्कालीन खरेदी करणेसाठी संबंधीत विभाग किंवा प्राधिकरणाला ते अधिकृत करुशकतात आणि आपत्कालीन परीस्थितीत निविदा मागविण्याची आवश्यक असलेली मानक प्रकिया माफ केलेली मानली जाईल असे नमुद आहे.

त्याअर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिसुचनेद्वारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने २४ तास आरोग्य सेवा पुरविणा-या डॉक्टर नर्स व वार्ड बॉय यांची राहण्याची सोय/व्यवस्था करणे आवश्यक आहे. याकरिता सदरस्वामी धर्मदास दरबार ट्रस्टअधिग्रहित करण्यात आली होती व सदर स्वामी धर्मदास दरबार ट्रस्ट मध्ये डॉक्टर, नर्स व वार्ड बॉय यांना राहण्याकरिता रुम्स उपलब्ध करुन देणेबाबत आदेश देण्यात आले होते.

उल्हासनगर शहरामध्ये कोविड-१९ या संसर्ग जन्य आजाराचा प्रादुर्भाव वाढत असून कोरोना बाधित रुग्णावर उपचार करण्याकरीता डॉक्टर, नर्स व वार्डबॉय यांची नियुक्ती करण्यात आली होती, सदर डॉक्टर, नर्स व वार्डबॉय यांची रहाण्याची व्यवस्था स्वामी धर्मदास दरबार ट्रस्ट येथे करण्यात आली होती. तसेच स्वामी धर्मदास दरबार ट्रस्टने दि. १८ एप्रिल, २०२० ते दिनांक १० जुलै, २०२० पर्यंत डॉकटरांना राहण्यासाठी ८ खोल्या पुरविल्या आहेत.सदर स्वामी धर्मदास दरबार ट्रस्ट, उल्हासनगर-३ यांनी सदर डॉक्टर, नर्स व वार्ड बॉय यांना राहण्याकरिता उपलब्ध करुन दिलेल्या रुम्सचे भाडयाची मागणी या कार्यालयास केलेली आहे.

सदररुम्सचे भाडयाची तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | दिनांक | एकूण दिवस | पुरविण्यात आलेल्या खोल्या | प्रति खोली आकारण्यात आलेला दर | एकूण भाडे |
|---|---|---|---|---|---|
| १) | दि. १८/४/२०२० ते दि. ३०/४/२०२० | १३ दिवस | ८ खोल्या | रु. ३५०/- | रु. ३६,४००/- |
| २) | दि. ०१/५/२०२० ते दि. ३१/५/२०२० | ३१ दिवस | ८ खोल्या | रु. ३५०/- | रु. ८६,८००/- |
| ३) | दि. ०१/६/२०२० ते दि. ३१/६/२०२० | ३० दिवस | ८ खोल्या | रु. ३५०/- | रु. ८४,०००/- |
| ४) | दि. ०१/७/२०२० ते दि. १०/७/२०२० | १० दिवस | ८ खोल्या | रु. ३५०/- | रु. २८,०००/- |
| | | | | **एकूण रक्कम** | **रु. २,३५,२००/-** |

वरील तक्त्यानुसार स्वामी साई धर्मदास दरबार ट्रस्टला एकूण भाडे रक्कम २,३५,२००/- (दोन लाख पस्तीस हजार दोनशे रुपये मात्र) सदर बाबत होणारा खर्च हा सन. २०२०-२०२१ मधील विपरीत परिस्थिती व्यवस्थापन B-२(३) या लेखाशिर्षातून किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधितून खर्च करणे प्रस्तावित आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती यांचे माहितीस्तव साविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र.४६ दिनांकः—२६/३/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारकोव्हिड-१९ रुग्णावर उपचार करण्या करीता नेमण्यात आलेल्या डॉक्टर,नर्स व वार्डबॉय यांच्या रहाण्याकरीता घेण्यात आलेल्या स्वामी धर्मदास दरबारच्या रुमचे भाडे अदा करण्या आले असुन याबाबत माहिती नोंद करीत आहे.

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ५ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र ५** :—स्वामी धर्मदास दरबार ट्रस्टमध्येवैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांना राहण्याची सोय/व्यवस्था उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात संदर्भात दि. ११/०७/२०२० ते दि.३१/०८/२०२० पर्यंत राहण्याचे भाडे देयक अदा करण्याबाबत सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती यांचे माहितीस्तव सविनय सादर.

---

**काही सदस्य:-** पास, पास....

सभापती, श्री. विजय पाटीलसदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे

---

☑ विषय क्र. ५ :—स्वामी धर्मदास दरबार ट्रस्टमध्येवैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांना राहण्याची सोय/व्यवस्था उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात संदर्भात दि.११/०७/२०२० ते दि. ३१/०८/२०२० पर्यंत राहण्याचे भाडे देयक अदा करण्याबाबत सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती यांचे माहितीस्तव सविनय सादर.

प्रस्तावना

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, ज्याअर्थी सध्या जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणूची लागण झाली आहे. सदर रोगाच्या प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधनात्मक कायदा, १८९७ संदर्भ क्र. ०१ अन्वये दिनांक १४ मार्च,२०२० पासून लागू करून खंड २,३ व ४ मधील तरतूदीनूसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महापालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम आहेत, असे घोषित करण्यात आले आहे.

त्या अर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिसुचने द्वारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना अनुषंगाने तसेच महानगरपालिका क्षेत्रात कोरोना संबंधी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) "क" मध्ये नमुद केलेप्रमाणे कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंबा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुस-या दखादया नगरपालिका प्रधिका-याच्या किंवा १ (राज्य) शासनाच्या मंजुरी मान्यता किंवा प्रधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहीजे असे नमुद आहे.

आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५० (अ) अन्वये आपत्कालीन खरेदी व आपत्तीजन्य परीस्थिती किंवा धोक्याच्या कारणांमुळे राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरण बचाव करण्यासाठी तात्काळ तरतुद किंवा साहित्य खरेदी करणे किंवा संसाधनांचा त्वारीत उपयोग करणे आवश्यक आहे असे नमुद आहे. तसेच आपत्कालीन खरेदी करणेसाठी संबंधीत विभाग किंवा प्राधिकरणाला ते अधिकृत करुशकतात आणि आपत्कालीन परीस्थितीत निविदा मागविण्याची आवश्यक असलेली मानक प्रकिया माफ केलेली मानली जाईल असे नमुद आहे.

त्याअर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिसुचनेद्वारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने २४ तास आरोग्य सेवा पुरविणा-या वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी

यांची राहण्याची सोय/व्यवस्था करणे आवश्यक आहे. याकरिता संदर्भिय पत्र क्रमांक-४ अन्वये सदर धर्मशाळा अधिग्रहित करण्यात आली होती वसंदर्भिय पत्र क्रमांक-५ नुसार सदर धर्मशाळत वैद्यकीय अधिकारी, नर्स व वार्ड बॉय यांना राहण्याकरिता रुम्स उपलब्ध करुन देणेबाबत आदेश देण्यात आले होते.

संदर्भिय क्रमांक-६ व ७ नुसार स्वामी धर्मदास दरबार ट्रस्ट, उल्हासनगर-३ यांनी सदर वैद्यकीय अधिकारी, नर्स व वार्ड बॉय यांना राहण्याकरिता उपलब्ध करुन दिलेल्या रुम्सचे भाडयाची मागणी या कार्यालयास केलेली आहे.

सदरचारुम्सचे भाडयाची तपशील खालील प्रमाणे आहे

**तक्ता –अ**

| अ.क्र | रुम्सचा कालावधी | एकुण दिवस | एकुण रुम (वातानुकूलित रुम) | प्रति रुम दर | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | दि. ११/०७/२०२० ते दि. ३१/०७/२०२० | २१ | १० | रु. ६००/- | रु.१,२६,०००/- |
| २ | दि.१/०८/२०२० ते दि. ३१/०८/२०२० | ३१ | १० | रु.६००/- | रु.१,८६,०००/- |
| ३ | दि.२८/०८/२०२० ते ३१/०८/२०२० | ४ | २ | रु.६००/- | रु.४८००/- |
| **एकुण** | | | | | **रु. ३,१६,८००/-** |

सदर स्वामी धर्मदास दरबार ट्रस्ट, उल्हासनगर-३ यांनी वरील प्रमाणे दरानुसार भाडयाचे मागणी या कार्यालयास केलेली आहे.सदरचे देयक अदा करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्वामी धर्मदास दरबार ट्रस्ट यांचे मागील देयक दि.१८/४/२०२० ते दि.१०/७/२०२० च्या दि.२७/०७/२०२० चे टिप्पणी पृष्ठ क्रमांक १ ते ३ मध्ये मा.आयुक्त सो ा यांच्या निर्देशानुसार निश्चित केलेल्या दरानुसार देयक अदा करण्यात आले आहे.सदर निश्चित केलेले दराचा तक्ता खालील प्रमाणे आहेत.

| Sr.No | Name | Accomodation |
|---|---|---|
| १ | Swami Dharamdas DarbarTrust | ३५०/- Per Room |

सदर स्वामी धर्मदास दरबार ट्रस्ट यांनी यापुर्वी देयक दि.१८/४/२०२० ते दि. १०/७/२०२० या कालावधीत दिलेल्या रुम हे Non AC होते. तसेच तक्ता –अ नुसार दिलेले रुम्स हे AC आहेत. त्यामुळे त्यांनी रुम्सच्या दरातवाढ केलेली असल्याचे कळविले आहे.

उपरोक्त तक्त्याप्रमाणे एकुण रु. ३,१६,८००/- (अक्षरी रुपये तीन लाख सोळा हजार आठशे मात्र) देयक अदा करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.सदरचा खर्च हा सन. २०२०-२०२१ मधील विपरीत परिस्थिती व्यवस्थापन B-२(३) या लेखाशिर्षातून किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधितून खर्च करणे प्रस्तावित आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती यांचे माहितीस्तव साविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ४७दिनांकः—२६/३/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारस्वामी धर्मदास दरबार ट्रस्टमध्येवैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांना राहण्याची सोय/व्यवस्था उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात संदर्भात दि. ११/०७/२०२० ते दि.३१/०८/२०२० पर्यंत राहण्याचे भाडे देयक अदा करण्याकामी माहिती नोंद करीत आहे.

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते
सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ६ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र ६**:—हॉटेल संगम रिलेक्स पॉईंट कोविड १९ साठी कार्यरत वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांची जेवणाच्या व राहण्याबाबची सोय उल्हासनगर महानरगपालिकेतर्फे पुरविण्यात आली असून त्याचे देयक दि.०१/०९/२०२० ते ३०/११/२०२० पर्यंत अदा करणेकरीता मा. स्थायी समिती यांचे माहितीसाठी सविनय सादर.

---

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** पास..पास..

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**मॅडम माझे असे म्हणणे आहे की हा जो, धरमदास दरबार आहे किंवा दुसरे कोणतेही विषय असतील ते सगळे एकत्र घ्या ना, माहीतीसाठी सादर आहेत.

**सदस्या, श्रीम. ज्योती गायकवाड:-** जे कोरोनाचे आपण इंजेक्श्न देतो ते वैक्सीन घेण्यासाठी लोकांना उल्हासनगर- ३ येथे यावे लागते. आणि या ठिकाणी एवढी गर्दी होते की, रोज शंभर वैक्सीन दिले जातात त्यामुळे तिथे ऐवढी गर्दी असते आणि चार दिवसातून एक दिवस बोलावतात आणि याठिकाणी येवून अर्धे लोक परत जातात ते लोक तिथे येऊन ५० रुपये रिक्षाला जातातआणि वांरवार येणेही लोकांना परवडत नाही. माझे माहितीसाठी मी असे सांगते की आपल्या ज्या महानगरपालिकेच्या शाळा आहेत तिथे जर आपण ती सुविधा करुन दिली तर त्यांना जवळ होवून जाईल.

**सभापती, श्री. विजय पाटील:-** डॉक्टर...

**सदस्या, श्रीम. ज्योती गायकवाड:-** वय वर्षे ४५ वर्षाच्या पुढचे वयोमनासाठी इंजेक्शन घेणे करीता, लस घेण्यासाठी.

**वैद्यकिय आरोग्य अधिकारी, श्री. दिपक पगारे:-** सन्मानीय सभापती महापौर मॅडम, आणि सन्मानीय सदस्य गण, आपल्याकडे सध्या दोनच सेंटर आहेत, त्या दोन सेंटरमध्ये त्यामुळे इतकी गर्दी होते त्यामुळे प्रत्येकाला डोस देणे जमत नाही. आणि दुसरी अडचण अशी आहे की, त्यासाठी आपल्या तीन रुम लागतात ते तीन रुम पाहिजेत आणि मॅन पॉवर तेवढा पाहिजे.

**सभापती, श्री. विजय पाटील:-** डॉक्टर , या ठिकाणी मॅन पॉवर वाढवा त्यांचे ही तेच मत आहे. तुम्ही दोन सांगू नका.त्याचा चांगला सुझाव आहे की तुम्ही वाढवा.

**<u>वैद्यकिय आरोग्य अधिकारी, श्री. दिपक पगारे:-</u>** आता आम्ही सर दिल्लीला सेंटर वाढवायला दिले आहेत.दिल्लीला जावे लागते आणि तिथून कन्फरमेशन आणावे लागते. आपल्या लेवला वाढविता येत नाही तरी आम्ही प्रयत्न करतो आणि वाढवण्यासाठी प्रयत्न करतो.

**<u>सभापती, श्री. विजय पाटील:-</u>** तुम्ही असे सांगा ना. आम्ही वाढविण्याचा प्रयत्न करतो.दिल्लीला जा नाही तर कलकत्ता जा त्यांना एवढे सांगायची आवश्यकता काय आहे?

**<u>सदस्या, श्रीम. ज्योती गायकवाड:-</u>** लोकांच्या अडचणी आपणच समजून घेतल्या पाहिजेत. लोकांना सूविधा दिल्या तर चांगलेच होईल. त्याच्यासाठी आपण सांगयचा प्रयत्न केला.

**<u>महापालिका सचिव:-</u>** विषय क्र. ६ आणि ७ एकत्र घेवू म्हणता ना. पास.. पास.. का वाचू

**<u>सदस्य, श्री. राजेशवदारिया:-</u>** पास..पास..

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

सभापती, श्री. विजय पाटीलसदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे ☝

---

☑विषय क्र. ६ :—हॉटेल संगम रिलेक्स पॉंईट कोविड १९ साठी कार्यरत वैद्यकीय अधिकारी व
आरोग्य कर्मचारी यांची जेवणाच्या व राहण्याबाबची सोय उल्हासनगर
महानरगपालिकेतर्फे पुरविण्यात आली असून त्याचे देयक दि.०१/०९/२०२० ते
३०/११/२०२० पर्यंत अदा करणेकरीता मा. स्थायी समिती यांचे माहितीसाठी
सविनय सादर.

<u>प्रस्तावना</u>

साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ प्रमाणे दिनांक १३ मार्च २०२० पासुन खंड २ (१) नुसार महापालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केलेले आहे.तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६७ (३) (क) नुसार मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधिल कलम ५० (अ) अन्वये आपत्कालीन खरेदी व आपत्तीजन्य परिस्थिती किंवा धोक्याच्या कारणांमुळे राष्ट्रीय प्राधिकारण किंवा राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरण बचाव करण्यासाठी तात्काळ तरतुदी किंवा साहीत्य खरेदी करणे किंवा संसाधनांचा त्वरीत उपरयोग करणे तसेच आपत्कालीन खरेदी करण्यासासठी संबधित विभाग किंवा प्राधिकरणाला किते अधिकृत करु शकतात आणि अशा परिस्थितीत निविदा मागविण्याची आवश्यक असलेली मानक प्रक्रिया माफ केलेली मानली जाईल असे नमुद आहे.

त्याअनुषंगाने संदर्भिय पत्रान्वये हॉटेल संगम रिलेक्स पॉंईट यांनी दि.०१/०९/२०२० ते ३०/११/२०२० या मधील ९१ दिवसांचा कालावधीचे वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांचे जेवनाचे व निवासाचे देयकाची मागणी या कार्यालयास केलेली आहे. तसेच सदर कालावधी मध्ये १८ वैद्यकिय अधिकारी व आरोग्य कर्मचारी हे हॉटेल संगम रिलेक्स पॉंईट मध्ये ०९ रूम मध्ये वास्तव्यास असल्याबाबत त्यांचे ओळखपत्र इत्यादी संदर्भिय पत्राबरोबर सादर केलेले आहे ते खालील प्रमाणे.

सदर हॉटेल संगम रिलेक्स पॉंईट मध्ये राहणा-या एकूण १८ वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांची यादी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | मंजुषा हरेश पाटोळे | अधिपरिचारीका |
| २ | विद्या रमेश जाधव | अधिपरिचारीका |

| | | |
|---|---|---|
| ३ | रेखा सुदाम जाधव | सफाईगार |
| ४ | पुनम कुडिया | सफाईगार |
| ५ | जाईबाई भिमा गायकवाड | सफाईगार |
| ६ | छाया राजाराम घोडके | आया |
| ७ | हिरा रमेश घारे | सफाईगार |
| ८ | वैशाली विष्णु जाधव | अधिपरिचारीका |
| ९ | सचिन सुधाकर पोळ | अधिपरिचारक |
| १० | सिमा नानासो पालसांडे | अधिपरिचारीका |
| ११ | संजिवनी रमेश गवळी | अधिपरिचारीका |
| १२ | रेवती शेखर तिवारी | बालरोगतज्ञ परिसेविका |
| १३ | जागृती अशोक शेलवाले | ए एन एम |
| १४ | मनिषा विकास भंडारे | अधिपरिचारीका |
| १५ | मेघा किसन पवार | अधिपरिचारीका |
| १६ | मिनाक्षी सचिन जोशी | अधिपरिचारीका |
| १७ | मनिषा वाड | ए एन एम |
| १८ | कविता पांडूरंग पारधी | ए एन एम |

तात्कालीन मा. आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार हॉटेल संगम रिलेक्स पॉईंट व्यस्थापक यांनी वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांना राहण्यासाठी रुम दिलेले होते तथापि सदर रुमचे दर या बाबत स्पष्ट आदेश देलेले नव्हते. सदर हॉटेल व्यस्थापकाने खालील प्रमाणे देयक सादर केलेले आहे.

सदर हॉटेलचा व्यस्थापकांनी सदर (मागणी) केलेले देयक (संदर्भिय पत्रान्वये) खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Date | Total Person | Total Days | Rate per Day | Total Amount (Excluding GST Rate) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 01/09/20 to 30/09/20 | 18 | 30 | 1500 | 8,10,000 |
| 2 | 01/10/20 to 31/10/20 | 18 | 31 | 1000 | 5,58,000 |
| 3 | 01/11/20 to 30/11/20 | 18 | 30 | 1000 | 5,40,000 |
| Total Amount (No GST Rate given) | | | | | 19,08,000/- |

मा.आयुक्त यांचे कडील मान्यतेनुसार मागिल टिप्पणी पृ.क्रं.१ ते ५ च्या मधील राहण्याकरीता रू. ६००/- व जेवण्याकरिता ५०० या प्रमाणे ११००/- प्रति दिन प्रतिव्यक्ती करीता हॉटेल संगम रिलेक्स पॉईंट देयक अदा करण्यात आले होते तसेच मा.स्थायी समिती यांचेकडील ठराव क्रमांक १६, दिनांक १२/११/२०२० अन्वये वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांचे निवास व भोजन हॉटेल संगम रिलेक्स पॉईंट यांचे देयक अदा करणेकरिता माहितीसाठी मान्यता देण्यात आली होती. (सोबत ठरावची प्रत जोडलेली आहे.)

तरी पृष्ठ क्र.१ ते ३ वरील तक्ता क्रमांक १ व ३ वरील तक्ता क्रमांक १ व २ मधील मंजुर दरानुसार हॉटेल संगम यांचे देयक अदा करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

सदर देयकाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

तक्ता क्र.१ राहण्याचे देयक.

| अ.क्र. | Total No. of Rooms | Total No. of Staff | Total no.of days १/९/२० to ३०/९/२० | Charges for १ member lodging | Total Amount (१८*३०*६००) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ९ | १८ | ३० days | ६००/- | ३,२४,०००/- |

तक्ता क्र.२ जेवणाचे देयक.

| अ.क्र. | Total No. of Rooms | Total No. of Staff | Total no.of days १/९/२० to ३०/९/२० | Charges for १ member lodging | Total Amount (१८*३०*५००) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ९ | १८ | ३० days | ५००/- | २,७०,०००/- |

तक्ता क्र.३ राहण्याचे देयक.

| अ.क्र. | Total No. of Rooms | Total No. of Staff | Total no.of days १/१०/२० to ३०/११/२० | Charges for १ member lodging | Total Amount (१८*६१*६००) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ९ | १८ | ३० days | ६००/- | ६,५८,८००/- |

तक्ता क्र.१ व ३ अनुसार.

| तक्ता क्रमांक | देयक | Total Amount with GST |
|---|---|---|
| तक्ता क्र.१ | राहण्याचे देयक.(Charge for lodging) | ३,२४,०००/- |
| तक्ता क्र.२ | जेवण्याचे देयक. (Charge for Boarding) | २,७०,०००/- |
| तक्ता क्र.३ | राहण्याचे देयक. (Charge for lodging) | ६,५८,८००/- |
| **Total Amount** | | **१२,५२,८००/-** |

वरील तकत्यानुसार हॉटेल संगम रिलेक्स पॉईंट यांची देयकाची रक्कम खालील प्रमाणे आहे.

| हॉटेलचे नांव | देयकाचे दर |
|---|---|
| | |

| | |
|---|---|
| Hotel Sangam Relax Point | **१२,५२,८००/-** |
| Total Amount (excluding GST) | **१२,५२,८००/-** |

उपरोक्त तक्तया प्रमाणे एकुण रु १२,५२,८००/- (अक्षरी रुपये बारा लाख बातन्न हजार आठशे रूपये मात्र) सदर देयक सन. २०२०-२०२१ मधील विपरीत परिस्थिती व्यवस्थापन B-२(३) या लेखाशिर्षातून किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून प्राप्त विशेष निधी मधुन खर्च करण्याबाबत, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३) (क) अन्वये मा.आयुक्त सो. यांना दिलेल्या अधिकारानुसार या या देयकांची रक्कम अदा करण्याकरीता मा.स्थायी समिती यांचे माहितीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ४८ दिनांकः—२६/३/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारहॉटेल संगम रिलेक्स पॉईट कोविड १९ साठी कार्यरत वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांची जेवणाच्या व राहण्याबाबची सोय उल्हासनगर महानरगपालिकेतर्फे पुरविण्यात आली असून त्याचे देयक दि.०१/०९/२०२० ते ३०/११/२०२० पर्यंत करण्याकामी माहिती नोंद करीत आहे.

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते
सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री. राजेश वधरीया:-** नाही विषय क्र. ७ माहितीसाठी नाही आहे.

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ७ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र ७**उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या कोव्हिड-१९ DCH व DCHC रुग्णालयातील रुग्णांकरिता रक्त तपासणी व इतर तपासणी साठी खाजगी प्रयोगशाळे कडुन केलेली तपासणीच्या अंदाजित खर्च रु १५,००,०००/-(कोविड संपेपर्यंत) अपेक्षित आहे तरी सदर खाजगी प्रयोगशाळा सुरु करण्यात आलेली असुन मा,स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

---

**सदस्य, श्री राजेश वधरीया:-** पगारे साहेब आपण जावू नका आज आपलेच सगळे विषय आहेत.

**वैद्यकिय आरोग्य अधिकारी, श्री. दिपक पगारे:-** सर आपल्याकडे कोवीड जे पेशंट एडमिट होतात कोव्हिडने त्यांकरीता त्याच्यासाठी इरीटीन लेवल, एचबी, सीबीसी, त्यांचे इंटर ल्युपीन लेवल, ब्लडशुगर ब्लडयुरीया इत्यादीसाठी आपल्याकडे लॅब कुठलीच नसल्यामुळे आपल्या महापालिकेतर्फ त्याकरीता आपण ही लॅब घेतलेली आहे.या साठी तीन लोकांचे लॅबचे टेंडर आले होते त्यापैकी जी सर्वात कमी आहे त्यास आपण दिलेले आहे आणि त्या ठिकाणी रु. १५

लाखाची त्यासाठी मंजूरी करुन ठेवलेली आहे सध्या तीन ते चार लाख रुपये पेशंटच्या तपासण्या वैगरे करण्यासाठी आलेले आहेत.

**<u>सदस्य्, श्री. राजेश वधरीया:-</u>** मा. सभापती जी, आपण टेस्ट दिलेले आहे., एबीजी, सीबीसी, एकसरे ब्लड क्लचरल, युरीन क्लचरल वैगेरे ज्या पण आहेत, यांचा दर काय आहे?यामध्ये लिहीले नाही आपण.

**<u>वैद्यकिय आरोग्य अधिकारी, श्री. दिपक पगारे:-</u>** हयाचा सगळयाचा आपल्याकडे तक्ता आहे, सर. एबीजी चे ६५० रुपये प्रति केस प्रमोण दिलेले आहे. त्यानंतर २०० रुपये प्रति इसीजी. एक्सरेचे ३०० रुपये प्रति प्रत आणि बाकीचे ब्लड क्लचरल ५१५ आहे, युरीन क्लचरल ४०० रुपये या प्रमाणे दिलेले आहेत. सिरम ,ए,बी. ७० रुपये, एबी.एस.आर.६० रुपये, एल.एफ.टी. ६८ रुपये, इनल फक्शन टेस्ट ३०० रुपये, सिरम इलेक्ट्रोलाईट ३०० रुपये,सिरम टी ३४० रुपये,सिरम एलडीएच लेवल, सिरम एल टी लेवल, सिरम इडी डायमर हे सगळे आहेत. सर आपल्याकडे.

**<u>सदस्य्, श्री. राजेश वधरीया:-</u>** ही जागा आपली आहे का?

**<u>वैद्यकिय आरोग्य अधिकारी, श्री. दिपक पगारे:-</u>** जागा आपली नाही आहे, सर.

**<u>सदस्य्, श्री. राजेश वधरीया:-</u>** जो लॅब कोणार्क रेसीडेन्सी मध्ये उघडली आहे ती,

**<u>वैद्यकिय आरोग्य अधिकारी, श्री. दिपक पगारे:-</u>** ती आर.टी.पीसी.आर .लॅब आहे सर.

**<u>सदस्य्, श्री.राजेश वधरीया</u>**- फक्त आर.टी.पीसी.आर.आहे.हे जनरल आहे.

**<u>वैद्यकिय आरोग्य अधिकारी, श्री. दिपक पगारे:-</u>**हे जनरल आहे.

**<u>सदस्य,श्री. राजू जग्यासी:-</u>** या ठिकाणी कोणताही पेशंट येवून टेस्ट करु शकतो.

**<u>वैद्यकिय आरोग्य अधिकारी, श्री. दिपक पगारे:-</u>**जो पेशंट आपल्या सेंटर मध्ये अॅडमीट आहे त्यांचीच टेस्ट होते.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** हा जो विषय आहे. कोरोना पेशंट आपल्या हॉस्पीटल मध्ये अॅडमीट होत आहेत त्यांची विविध प्रकारची टेस्ट होत असतात त्या टेस्टसाठी तीन महिन्याचे १५ लाख रुपयांचे यांनी प्रवधा घेतले आहे. अंदाजित १५ लाख येवू शकतात १४ लाख सुध्दा येवू शकतात. त्यांचे दर आपल्याकडे निश्चित आहेत का? खजगी लॅबव्दारे जे टेस्ट करतात, कोणाचे एक्सरे करावा लागतो, कोणचे ब्लड टेस्ट हे डॉक्टर ठरवू शकतात, यास सर्व संमतीने मान्यता देत आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>**सर्व संमतीने मान्यता देत आहे.

**<u>सदस्य, श्री.राजू जग्यासी:-</u>**पास..पास..इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

सभापती, श्री.विजय पाटीलसदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

☑विषय क्र. ७ :—उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या कोव्हिड-१९
DCH व DCHC रुग्णालयातील रुग्णांकरिता रक्त तपासणी व इतर तपासणी
साठी खाजगी प्रयोगशाळे कडुन केलेली तपासणीच्या अंदाजित खर्च रु
१५,००,०००/-(कोविड संपेपर्यंत) अपेक्षित आहे तरी सदर खाजगी प्रयोगशाळा
सुरु करण्यात आलेली असुन मा,स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आदेशित करण्यात येते की, ज्याआर्थी सध्या जगभरात पसरलेल्या करोना विषाणूची लागण झाली आहे. सदर रोगाच्या प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने करोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधनात्मक

कायदा, १८९७ संदर्भ क्र. ०१ अन्वये दिनांक १४ मार्च २०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनूसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महापालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम आहेत असे घोषित करण्यात आले आहे.

त्याअर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिनूचनेव्दारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने तसेच महानगरपालिका क्षेत्रात कोरोना संबंधि विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) “क” मध्ये नमूद केलेप्रमाणे कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुसऱ्या दखादया नगरपालिका प्रधिकाऱ्याच्या किंवा १ (राज्य) शासनाच्या मंजूरी, मान्यता किंवा प्रधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहीजे असे नमूद आहे.

आपत्ती व्यवस्थापण कायदा २००५ मधील कलम ५० (अ) अन्वये आपत्कालीन खरेदी व आपत्तीजन्य परीस्थिती किंवा धोक्याच्या कारणांमुळे राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राणिकरण बचाव करण्यासाठी तात्काळ तरतुद किंवा साहीत्य खरेदी करणे किंवा संसाधनांचा त्वारीत उपयोग करणे आवश्यक आहे असे नमूद आहे. तसेच आपत्कालीन खरेदी करणेसाठी संबंधित विभाग किंवा प्राधिकरणाला ते अधिकृत करुशकतात आणि आपत्कालीन परीस्थितीत निविदा मागविण्याची आवश्यक असलेली मानक प्रक्रिया माफ केलेली मानली जाईल असे नमूद आहे.

त्याअर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिनूचनेव्दारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने तसेच महानगरपालिका क्षेत्रात कोरोना संबंधि विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. संदर्भिय पत्र क्रमांक-४ अन्वये वैद्यकीय अधिक्षक शासकीय प्रसुतीगृह व दवाखाना, उल्हासनगर-४ यांनी त्याचे काव्हिड रुग्णालयात को-मॉर्बीड व अतिगंभीर अवस्थेतील रुग्ण उपचारार्थ दाखल होत असतात. सदर रुग्णांची रक्त तपासणी व इतर तपासणी करणेबाबत या कार्यालयास कळविले आहे. तसेच रेड क्रॉस, टाऊन हॉल व इमर DCHC येथील कोरोना बाधित रुग्णांस आरोग्य सेवा देणे आवश्यक आहे. सदर कामा करिता नियुक्त करण्यात येणारी लॅब/संस्था (MD pathologist) ही सदर कोव्हिड रुग्णालयात जाऊन येथिल कारोना बाधीत रुग्णाचे रक्त नमुने तपासणी करिता संकलीत करुन त्यांचा अहवाल विहित कालावधीत कोव्हिड रुग्णालयास सादर करणे आवश्यक आहे.

सदर तपासणीची सुची पुढील प्रमाणे आहे

**लॅब इन्वेस्टीगेशन टेस्ट व इतर टेस्ट**

| अ.क्र | तपासणीचे नाव |
|---|---|
| १ | ABG |
| २ | ECG |
| ३ | XRAY CHEST |
| ४ | BLOOD CULTURE |
| ५ | URIN CULTURE |
| ६ | SPUTON FOR AFB |

| | |
|---|---|
| ७ | CBC ESR |
| ८ | LIVER FUNTION TEST |
| ९ | RENAL FUNCTION TEST |
| १० | ELECTROLYTE |
| ११ | SERUM<br>C REACTIVE PROTEIN |
| १२ | SERUM LDH LEVELS |
| १३ | SERUM FERRITIN LEVELS |
| १४ | SERUM D-DIMER |
| १५ | SERUM ITERLEUKIN ६ LEVELS |
| १६ | SERUM PROCALCITONIN TEST |
| १७ | DENGUE ANTIGEN TEST |
| १८ | MALARIA ANTIGEN TEST |
| १९ | C.O.E |

सदर रक्त तपासणी व इतर तपासणी करिता होणारा खर्च हा रुग्णालयात भरती होणा-या रुग्णांच्या संख्येनुसार व भिषक (Physician) यांनी रुग्णांना दिलेल्या रक्त तपासणी सल्ल्यानुसार येणारा खर्च निश्चित होईल. सदर कोरोना बाधित रुग्णासंदर्भात मागील तीन महिन्याची रुग्ण सरासरी  खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र** | **महिना** | **एकुण रुग्ण** | **सरासरी (प्रति दिन)** |
|---|---|---|---|
| १ | जुन | १५३६ | ४९.५ |
| २ | जुलै | ४८७६ | १५७.२ |
| इइइ३ | ऑगष्ट | १०१० | ३२.५ |

वरील प्रमाणे मागील ३ महिन्याची रुग्ण सरासरी पाहता एका रुग्णांच्या रक्त तपासणी व इतर तपासणी करिता अंदजित रु.५४६०/- ऐवढा खर्च अपेक्षित आहे.यावरुन वरील प्रमाणे सरासरी दर व सद्य परिस्थिती पाहता सदर कोरोना बाधित रुग्णांची रक्त तपासणी व इतर तपासणी करिता अंदाजित रु. १५,००,०००/- अपेक्षित आहे. तसेच सदरचा खर्च हा सन २०२०-२०२१ मधील विपरीत परिस्थिती व्यस्थापन B-२(३) या लेखाशिर्षातुन किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधातून करण्याबाबात मा.स्थायी समिती यांचे मान्यतेसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ४९ दिनांक:—२६/३/२०२१

सुचकाचे नाव :— राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारउल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या कोव्हिड-१९ DCH व DCHC रुग्णालयातील रुग्णांकरिता रक्त तपासणी व इतर तपासणी साठी खाजगी प्रयोगशाळे कडुन केलेली तपासणीच्या अंदाजित खर्च रु १५,००,०००/-(कोविड संपेपर्यंत) यास मान्यता देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाचीसही / —

अनुमोदकाचीसही / —

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ८ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.८**कंत्राटी अभियंता यांची ०६ महिन्याच्या मुदतवाढ देणेबाबत.

---

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:-** साहेबांना माईक दया.

**उप आयुक्त (मुख्यालय),श्री. अशोक नाईकवाडे:-** नमस्कार, आपल्या महानगरपालिकेमध्ये एकूण १२ कंत्राटी तत्वावर अभियंते नियुक्त केलेले आहेत, आपला स्थायी समितीची ठरावक्र. ७८ दि.२१/०७/२०२० नुसार मान्यता मिळालेली आहेआणि वेगवेगळया पीडब्ल्युडी, पाणी पुरवठा, नगररचना या विभागामध्ये कार्यरत आहेत त्यांची मुदत दि. १५/१२/२०२० रोजी संपुष्टात आलेली आहे.ते अद्याप कार्यरत आहत आपल्याकडे काम करतात तर त्यांना पुढील ६ महिन्याची मुदतवाढ देण्यासाठी आपल्याकडे प्रस्ताव मांडलेला आहे. ज्या विभागामध्ये ते काम करत आहेत. त्या विभाग प्रमुखाकडून आपण माहिती घेतलेली आहे आणि त्यांनी हया अभियंत्याची आवश्यकता आहे त्यांच्याकडे कामाचे स्वरुप तेवढे उपलब्ध आहे त्यामुळे त्यांना मान्यता दयावी अशी विभाग प्रमुखांनी आपल्याला विनंती केलेली आहे त्यानुसार हा प्रस्ताव आपल्या समोर मान्यतेसाठी सादर करत आहे.

**सदस्य्, श्री. राजेश वधरीया:-** मा. सभापतीजी, माझ्या माहिती प्रमाणे हा प्रस्ताव तिस-या वेळेस करत आहेत. पहिले दोन वेळा झालेला आहे.हा दुस-यांदा आहे. हा कायदेशीर प्रश्न आहे की सदरच्या अभियंत्यांना आपण ६ महीन्यासाठी कामावर ठेवले आणि ब्रेक देऊन परत घेत आहेत तर हे कायमस्वरुपी नोकरी मिळावी असा क्लेम करु शकत नाही का? असे पहिले सुध्दा लिहिले आहे की तरी उपरोक्त अभियंता दि. १६ /१२/२०२० रोजी एक दिवसाचा खंड देऊन दि.१६/१२/२०२० पासून ६ महिन्याच्या कालावधीसाठी नियुक्त करण्यासाठी मा.स्थायी समितच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.आता यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे की एक दिवासचा ब्रेक देत आहेत. २४० दिवस जे भरत आहेत तर आपल्याला त्यांना कायमस्वरुपी घ्यावेच लागेल अशी माझी समज आहे.तो कृपया या मुददयावरती प्रशासनाने खुलासा करावा.

**उप आयुक्त (मुख्यालय),श्री. अशोक नाईकवाडे:-** आपला मुददा खुप चांगला आहे. परंतु त्या मुददयाच्या अनुषंगाने आपण त्या लोकांना बांधून घेतले.त्यांच्याकडून आपण १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवरती लिहून घेतलेले आहे. त्यांना कायमस्वरुपाचे कोणतेही हक्क सांगाता येणार नाहीत. त्यांना कुठलेही लाभ मिळणार नाहीत. निव्वळ ते कंत्राटी तत्वावरच काम करतील. त्यांना नियुक्तीचे कायस्वरुपाचे कुठलेही लाभ आपण देणार नाहीत. आणि त्यांना मागणी करता येणार नाही.

**<u>सदस्य्, श्री. राजेश वधरीया:-</u>** समजा त्यांनी १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवरती आपणास लिहून दिले. आणि नंतर कोर्टात गेले, की त्यावेळेस मला नोकरी पाहिजे होती आणि हे लिहुन देणार तरच आम्ही तुम्हाला कामावर घेणार, नाही तर कामावर घेणार नाही.मी नाईलाजास्तव लिहुन दिले.बघा आपण प्रशासकीय अधिकरी आहेत. आम्हाला कायदेशीर सल्ला पाहिजे की अशा परिस्थितीत काय होवू शकते.विधी विभागाने हे केले पाहिजे. आपण ही फाईल ची प्रक्रिया करताना विधी विभागाचा सल्ला घेतलेला आहे का?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** तीन महिन्याची मुदतवाढ यामध्ये सुध्दा झाली आहे.

**<u>सदस्य्, श्री. राजेश वधरीया</u>**:- जो पर्यंत आम्ही मंजूरी देणार नाही तो पर्यंत मुदत वाढ मिळणार नाही. त्यांनी पहीलेच विषय आणला आहे, दिनांक १२/०२ आणलेले आहे.मिटींग आता होत आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** दि. १७/१२/२०२० रोजी संपत आहे.

**<u>सदस्य्, श्री .राजेश वधरीया</u>**:- आजचे उदया चालत आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- मा. महोदया, पहिले डंपिंग ग्राऊंड विषय सांगितलेला आहे.आता हा दुसरा विषय आहे, हे जे आपले अभियंता आहेत, त्यांची १६/१२/२०२० रोजी मुदत संपत आहे, १५/१२/२०२० रोजी संपत असून एक दिवसाची खंडीत करुन परत घेत आहेत. आणि दि.१७/१२/२०२० ही घेण्याची तारीख आहे आणि स्थायी समिती मध्ये प्रस्ताव येत आहे दि. २६/०३ रोजी येत आहे आणि विषय पित्रिकेवरती दि. १२/०२ ला घेतला आहे. परत तीन महिने उशीरा आला आहे, अजेंडा निघाला म्हणजे प्रस्ताव उशिरा आणला आहे.एक महिना नाही तर दोन महीने पहीलेच आणायला पाहीजे.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय),श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** सर, त्यांचे आपण विभाग प्रमुखांकडून माहिती घेत होतो, त्यांना आपल्याकडे त्यांची आवश्यकता आहे का? काम देण्यासाठी पुरेशा आहे का? हे पूर्ण केले आणि जानेवारी मध्ये प्रस्ताव दिलेला आहे.

**<u>सदस्य्, श्री. राजेश वधरीया:-</u>** माझा प्रश्न हा नाही आहे की, या विभागांना आवश्यकता आहे किंवा नाही, हे आम्हालाही माहित आहे गरज आहे. विभागाने सागितले आवश्यकता आहे ठिक आहे.प्रश्न ऐवढाच आहे की हे कायमस्वरुपी सेवेचा क्लेम करणार का? आणि क्लेम केला तर कार्टात असे केसेस मध्ये काय झालेले आहे?त्यासाठी आपणा विधी विभागाचा सल्ला घेतला पाहिजे.विधी विभागाकडून सल्ला घेवून फेर सार करा.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय),श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** त्यांच्याकडून आपण स्टँप पेपरवती लिहून घेतलेले आहे आणि हे पण लिहून घेलेले आहे की त्यांना कायम नियुक्तीच्या अनुषंगाने करता येणार नाही असे आपण त्यांच्याकडून लिहून घेतलेले आहे. आणि ब्रेक देत असल्यामुळे त्यांचे क्लेम सुध्दा सक्सेस होत नाही.

**<u>सदस्य्, श्री. राजेश वधरीया:-</u>** कोणकडून सुध्दा प्रेशरमध्ये नाईलाजास्तव घेतलेले ॲफीडेव्हीट कोर्टात किती वेळ टिकणार आहे? ते सांगतील की माझेकडून जबरदस्तीने घेतले आहे मी लिहून दिले.जसे की पुलिस मध्ये होत असते.साहेब मला सांगितले की, लिहून दया, मी लिहून दिले.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय),श्री. अशोक नाईकवाडे:-</u>**ॲफीडेव्हीट मध्ये शेवटचा पॅराग्राफमध्ये मी माझ्या मर्जीप्रमाणे लिहून देत आहे असे लिहून दिलेले आहे आणि एक्सीकुट मूजीस्ट्रेटच्या नोटरी समोर लिहून दिलेले आहे.

**<u>सदस्य्, श्री. राजेश वधरीया</u>**:- नाही, आमचे ठराव असा करणार की माझी अशी सुचना आहे की, हा प्रस्ताव प्रशासनास परत पाठवत आहेत, यामध्ये कायदयाचा सल्ला घेवून यास फेर सादर करावे.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>**आता पर्यंत त्यांचे ३ महिने संपलेले आहेत त्यांचे पगार आम्हाला दयावे लागते.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** एक दिवसाचा खंड देवून त्याना मिळत नाही. वदरिया साहेब एक दिवसाचा खंड दिला तर त्यांना २४० दिवसांचा त्यांना कायमस्वरुपी मिळत नाही.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-</u>**साहेब आपल्याला हे ज्ञान बरोबर माहित आहे का की हे जर कोर्टात गेले तरी टिकणार नाहीत.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** त्यांना जी आम्ही ही ऑर्डर दिली आहे त्यामध्ये सर्व अटी शर्ती अधिन राहून लिहून दिलेले आहे. त्यामुळे क्लेम करु शकत नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र भुल्लर:-** एक दिवसाचा खंड दिला तर क्लेम करु शकत नाही.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** आपण जे सांगत आहेत तसे आम्ही काही ठेवलेले नाही.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** आता पर्यंत हे सर्व पगाराविना काम करत आहेत, अजून पर्यंत त्यांना पगार मिळालेले नाही असे वाटते.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**होय सर.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** पगाराविना काम करत आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र भुल्लर:-** हे आपण पास करीत आहे आणि नंतर पुढे लिगलचा ओपीनीयन घेवून परत पाठवू.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**नंतरचा लिगल ओपनियन घेऊन सबमिट करु.

**सदस्य, श्री. राजेंद्र भुल्लर:-** पास.. पास..इतिवृत्ताची वाट न पाहता.

**सदस्य, श्री. राजेश वधरीया:-** यामध्ये आपण एक अट टाकू की जर कोणी असा क्लेम केला आणि कार्टातून काही क्लेम पास झाला तर त्याची जबाबदारी प्रशासनाची राहील. आमची जबाबदारी राहणार नाही.

महापालिका सचिव- आता जसे साहेबांनी सागितले की, यांना आता १७/१२/२०२० पासून मुदतवाढ देत आहेत आणि पुढच्या वेळी विधी विभागाचा अभिप्राय घेवून नंतरच सादर करावा व तसेच जर या बाबतीत कोणी क्लेम केले तर संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील. इतिवृत्ताची वाट न पाहता पास. मंजूर.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-** मंजूर.

**काही सदस्य:-** पास, पास....

सभापती, श्री.विजय पाटीलसदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

☑विषय क्र. ८ :— कंत्राटी अभियंता यांची ०६ महिन्याच्या मुदतवाढ देणेबाबत.

प्रस्तावना

मा. स्थायी समिती ठराव क्र. ७८, दिनांक २१/७/२०२० नुसार मान्यता दिल्यानुसार कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/५९७/२०२०, दिनांक २०/०८/२०२० रोजीच्या आदेशान्वये महापालिकेच्या अभियांता यांची कमतरता लक्षात घेता कंत्राटी स्वरुपात ठोक मानधन तत्वावर ०६ महिन्याच्या (दिनांक १६/६/२०२० ते दिनांक १५/१२/२०२० पर्यंत) कालावधी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन विविध विभागामध्ये महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ५३ (१) अन्वये नियुक्ती करण्यात आली होती. ०६ महिन्याचा कालावधी दिनांक १५/१२/२०२० रोजी संपुष्टात आली होती.

| अ.क्र. | नियुक्ती देण्यात आलेल्या अभियंताचे नांव | नेमणुक करण्यात आलेल्या विभागाचे नाव |
|---|---|---|
| १ | श्री. ओंकार चंद्रकांत सोनवणे | नगररचना विभाग |
| २ | श्री. हर्षद मनोहर प्रधान | प्रभाग समिती क्र १ |
| ३ | श्रीम. स्नेहल अशोक सोनटक्के | नगररचना विभाग |
| ४ | श्रीम. पुजा प्रकाश सरगर | पाणी पुरवठा विभाग |
| ५ | श्री. लौकीक रमाकांत तिजोरे | नगररचना विभाग |
| ६ | श्री. चेतन प्रकाश चव्हाण | प्रभाग समिती क्र २ |

| | | |
|---|---|---|
| ७ | श्री. गणेश अशोक घुबे | पाणी पुरवठा विभाग |
| ८ | श्री. मयुर विकास पाटील | सार्वजनिक आरोग्य विभाग |
| ९ | श्री. पियुष प्रमोद शिंदे | प्रभाग समिती क्र ३ |
| १० | श्री. राहुल रविंद्र पवार | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ११ | श्रीम. कल्याणी चंद्रकांत गजरे | नगररचना विभाग |
| १२ | श्री. राकेश चंद्रकांत पवार | प्रभाग समिती क्र.४ |

तरी उपरोक्त अंभियंता यांना दिनांक १६/१२/२०२० रोजी एक दिवसाचा खंड देवुन दिनांक १७/१२/२०२० पासुन पुढील ०६ महिन्याच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यासाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र.५०दिनांकः—२६/३/२०२१ सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कंत्राटी अभियंता यांची १७/१२/२०२० पासुन ०६ महिन्याच्या मुदतवाढ देण्यास मान्यता देत आहे आणि पुढच्या वेळी विधी विभागाकडून अभिप्राय घेवुन त्या नंतर सादर करावे.

तसेच

जर याबाबत कोणी न्यायालयात गेले तर त्याची जबाबदारी प्रशासनाची राहील.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते
सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ९ वाचून दाखवितात.

———————————————————————————————————————

➪ **विषय क्र.९**महापालिकेच्या विविध विभागामध्ये कंत्राटी स्वरुपात काम करणा-या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांना रु.२०,०००/- वरुन रु.४०,०००/-मानधन देणेबाबत.

———————————————————————————————————————

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** तर आता यापुढे मान्य केलेल्याअनुषंगानेच हा विषय घेतला आहे, यामध्ये आपले मा. महापौर साहेबांनी या सर्व कंत्राटी कामगारांना मानधन ४० हजार करावे असे आपल्याला लेखी कळविले होते.त्याअनुषंगाने आम्ही इतर सर्व महापालिकाकडून काय वस्तुस्थिती आहे ती मागणी केली होती.त्यामध्ये पुणे महानगरपालिकेमध्ये रु.३०,००० आणि रु.३५०००/- रुपये दिले जातात. भिंवडी निजामपूरकर महानगरपालिका आहे तिथे ३०,०००/- रुपये दिले जातात. आणि शासनाचा जो दर आहे तो प्रति दिन १५६० रुपये आहे त्यानुसार तो ४६,५००/- रुपये

होतो. त्याच अनुषंगाने आपला प्रस्ताव आहे की ३० हजार रुपये त्यांना ठोक दयावे आणि त्यांचा वाहन वापर, येण्याजाण्यासाठी आणि मोबाईल चा वापर आणि इतर भत्त्यासाठी १० हजार असे मिळून एकूण ४० हजार रुपये हया लोकांना मानधन देण्यास मान्यता मिळावी, असा आमचा प्रस्ताव आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधरीया**:- नाही, नाही, मला पाहिले हे सांगा की, पहिला विषय आपण जो घेतला हे तेच कामगार आहेत. पहिले त्यांना आपण काय देण्यात येत होते.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** २० हजार रुपये.

**सदस्य, श्री. राजेश वधरीया**:- २० हजार रुपये आणि त्यांची नियुक्ती आपण कशी केली होती?

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** करार पध्दतीने.

**सदस्य, श्री. राजेश वधरीया:-** हे लोक आपल्याकडे डायरेक्ट आले का की साहेब आम्हाला कामावर घ्या आणि आपण घेतले. आपण वृत्तपत्रात जाहिरात दिली होती.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**यासाठी आम्ही वृत्तपत्रात जाहीरात दिली होती आणि त्याबाबतची सर्व प्रक्रिया पूर्ण केली होती. त्यांची मुलाखात घेतली.

**सदस्य, श्री. राजेश वधरीया:-** त्यामध्ये पैसे दयायचे लिहिले होते का?

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** संपुर्ण प्रक्रिया पूर्ण करुनच घेतले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधरीया:-**हे बघा, आपण वृत्तपत्रात जाहीरात दिली की, जे बरोजगार असतील, ज्यांनी कोर्स केलेला असेल, किंवा कोणी डिग्री घेतलेली असतील त्यांनी शैक्षणिक आर्हता पूर्ण अशंनी अर्ज करावेत अशी वृत्तपत्रात जाहीरात दिली असेल. त्यांना आमही २० हजार रुपये देणार. आता आपण त्यांना ३५ हजार, ४० हजार रुपये देणार आहेत. तर ज्यांना २० हजारामध्ये काम करावयाचे नव्हते त्यांनी अर्जच केला नाही की मला २० हजार रुपयामध्ये परवडत नाही आणि बॅक डोअरने इंन्ट्री करुन आपण त्यांना पगार वाढवून देत आहात. तर हे त्या लोकाबरोबर अन्याय आहे जे राईट ऑफ इक्वीलीटीचे खनन होत आहे. त्यामुळे हा प्रस्ताव जर पास होत असेल त्या लोकांचे पगार डबल होतील. तर त्या पेक्षा हे चांगले आहे की आपण नवीन जाहीरात देण्यात यावी की आम्ही आम्ही ४० हजार रुपये देणार आहेत. जे.जे.लोकांना यायचे असेल त्यांना येवू दया तसेच यांना सुध्दा अर्ज करु दया.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** ४० हजार रुपयात या पेक्षा चांगले प्रशिक्षित उमेदवार येवू शकतात.

**सदस्य, श्री. राजेश वधरीया**:- त्यांची शैक्षणिक पात्रता काय होती?आणि आता काय आहे?हे कळेल. मला असे वाटते की नैसर्गिक दृष्टीने सुध्दा प्रस्ताव चांगला वाटत नाही. आपण परत एकदा जाहीरात देण्यात यावी आणि त्यामुध्ये असे नमूद करा की आम्ही ४० हजार रुपये देण्यात येतील. नंतर त्यांना ४० हजार दया परंतु पहिले आहेत त्यांना २० हजार रुपये दया जो पर्यंत नविन येत नाही तोपर्यंत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** आम्ही असा ठराव करत आहे की, जी यांची मुदत वाढ आपण जून पर्यंत वाढविलेली आहे तो पर्यंत हे याच पगारावर काम करावे लागेल, की जो आपण टेंडर मागवला होता. त्याच बरोबर ही सभा आदेशीत करीत आहे की, जून मध्ये संपणारआहे तर तीन महीने लागणार जाहिरात देणे, त्यांना बोलावणे मुलाखत घेणेहहहजारनियुक्ती करायची असेल तर अर्ज मागवणे, मुलाखात घेणे इत्यादीसाठी तर तीन महिने वेळ लागेल. त्यामुळे ४० हजाराच्या मानधनावरती नविन अभियंताची भरती करणेबाबात जाहीरात देण्यात यावी. यामध्ये नविन कोणी येतील तसेच आता आहेत ते सुध्दा येतील आणि त्यांची मुलाखत घेवून पात्र ठरविण्यात यावे आणि यानंतर मुदतवाढ देणार नाही हे नमूद करा.यास अंतिम मुदतवाढ देत आहेत. या नंतर देणार नाही तोपर्यंत आपण हे काम पूर्ण करा.नंतर परत आणा तीन महीन्याचा पगार झाला.नियम काय आहे की एकाला न्याय आणि दुस-यावर अन्याय आम्ही याठिकाणी ट्रस्टी बसले आहेत, यांची भरती २० हजार रुपयामध्ये केली होती.आणि त्यांची मुदत संपेपर्यंत २० हजारातच काम करतील. आता आपल्याकडे तीन मिहिन्याचा वेळ आहे.या तीन महीन्यामध्ये आपण नोटीस काढणे, पेपरमध्ये टाकणे, जाहिरात देणे इत्यादी आणि जे मुलाखतीस येणार इत्यादी ची प्रक्रिया आपण तीन महीने पूर्ण करुन घेवू शकतो आणि यामध्ये मानधान ४० हजार टाकण्यात यावे, किवा ५० हजार मानधान दयावे याला सुध्दा आम्ही मान्यता देण्यास तयार आहेत. परंतु चांगले

अभियंता ऐकुण येतील. २० हजार ऐकुण जे लोक आले नव्हते माझ्याकडे जवळ जवळ १० अभियंता आले होते, डिग्री होल्डर ते म्हणत होते की, ३० ते ३५ हजार करा, २० हजारामध्ये काय काम करणार?

**सदस्य, श्री. राजेश वधरीया:-** महाराष्ट्र शासनाचे दर १५६० रुपये आहेत. या बरोबरच विषय संपला. इथे लिहीले आहे की यासोबत प्रत जोडलेली आहे. परंतु प्रत आहे नाही आणि मागून थेट १० नंबरचा प्रस्ताव आहे, त्यामुळे आमचे असे म्हणणे आहे की हे मंजूर करणार परतु यासाठीआपण नविन जाहीरात देवून परत अभियंते मागविण्यात यावेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**त्यांची मागणी मान्य करणार नाही, कारण कधी बोलणार ४० हजार करो, १ लाख करो, असे नाही.

**महापालिका सचिव**:-मी ठराव वाचत आहे, ही स्थायी समिती वरील प्रस्तावाने नुसार महापालिकेच्या विविध विभागामध्ये कंत्राटी स्वरुपात काम करणारे कनिष्ठ अभियंते यांना रुपये २० हजारावरुन ४० हजार रुपये मानधन देण्यात मान्यता देत नाही तसेच प्रशासनाला निर्देश देते की त्यांनी तीन महिन्याच आत नव्याने जाहीरात मागवून जो दर तुमहांला हवा आहे प्रशासनास जो योग्य वाटेल तो पगार देवून नव्याने इंजिनिअर घेण्यासाठी जाहीरात देण्यात देवून नविन इंजिनियर भरती करावी.करार पध्दतीने भरती करावी.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** भरती नाही, ठेकेदार पध्दतीने.

**महापालिका सचिव:-** ते मी लिहीते.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** तीन महीन्याच्या आतमध्ये ठेकेदार पध्दतीने नविन इंजिनियर.

**महापालिका सचिव:-**तीन महीन्याच्या आतमध्ये कंन्ट्राटी पध्दतीने पुन्हा नविन जाहिरात मागवून करावे.

**सदस्य, श्री.भारत राजवानी**- इतिवृत्ताची वाट न पाहता. पास..पास..

**महापालिका सचिव:-**इतिवृत्ताची वाट न पाहता, राजवानी साहेब बोलेले आहेत.

**काही सदस्य:-** पास, पास....

सभापती, श्री.विजय पाटीलसदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.👍

---

☑ विषय क्र. ९ :—महापालिकेच्या विविध विभागामध्ये कंत्राटी स्वरुपात काम करणा-या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांना रु.२०,०००/- वरुन रु.४०,०००/-मानधन देणेबाबत.

प्रस्तावना

मा. महापौर, उल्हासनगर महानगरपालिका यांनी दिनांक ०८/०९/२०२० रोजीच्या पत्रान्वये महापालिकेच्या विविध विभगामध्ये कंत्राटी स्वुरुपात काम करणा-या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांना रु २०,०००/- वरुन रु. ४०,०००/- मानधन देण्यासाठी कळविण्यात आले होते.

दिनांक २१/१/२०२१ रोजी मा. आयुक्त साहेब यांनी दिलेल्या निर्देशनुसार भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी व पुणे महानगरपालिका यांचेकडील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर सहा महिन्याच्या मुदतीसाठी करार पध्दतीने नेमणूक करणेत आलेल्या उमेदवारांच्या वेतनाबाबत माहिती घेण्यासाठी निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार खालील महानगरपालिकेमध्ये करार पध्दतीने कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर नियुक्ती करण्यात आलेल्या उमेदवारांचे वेतन आहे.

| अ.क्र. | महानगरपालिकेचे नाव | करार पध्दतीचे नेमणू करावयाचे वेतन |
|---|---|---|
| १ | पुणे महानगरपालिका (अ-वर्ग) | १) पदवी- रु. ३५०००/- (मासिक वेतन)<br>२) पदविका – रु. ३०,०००/-(मासिक वेतन) |
| २ | भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका (ड-वर्ग) | १) मान्यता विद्यापीठाची (स्थापत्य) अभियांत्रिकी शाखेची पदवी . रु. ३०,०००/- (मासिक वेतन) |

| | | |
|---|---|---|
| ३ | कनिष्ठ अभियंता या पदाचे महाराष्ट्र राज्य दर सुची | एका दिवसाचे रु. १५६०/- याप्रमाणे (सोबत प्रत जोडली आहे) |

तरी मा.महापौर, उल्हासनगर महानगरपालिका यांची मागणी लक्षात घेता वरील नमुद केलेल्याप्रमाणे ड-वर्ग महानगरपालिकेप्रमाणे रु.३०,०००/- व पेटोल, मोबाईल भत्ता, एकवेळा म्हणून रु.१०,०००/- एकूण रु. ४०,०००/- करारपध्दतीने मासिक मानधन देण्यासाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र.५१ दिनांकः—२६/३/२०२१ सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारमहापालिकेच्या विविध विभागामध्ये कंत्राटी स्वरुपात काम करणा-या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांना रु.२०,०००/- वरुन रु.४०,०००/-मानधन देण्यास मान्यता देत नाही.

**तसेच**

प्रशासनाला निर्देश देण्यात येत आहे की, त्यांना आवश्यक वाटल्यास नव्याने जाहिरात मागवून प्रशासनाला योग्य वाटेल तो पगार ठरवून तीन महीन्याच्या आत कंत्राटी पध्दतीने नविन अभियंत्याची भरती करावी.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते
सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १० वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.१०**उसाटणे ता. अंबरनाथ याठिकाणी घनकचरा व्यवस्थापनाकरीता कंपाउंड वॉल बांधणेसाठी**मे.ए. एम. रामचंदानी**यांची निम्न दराची निविदा मान्य करण्यास व निविदाकाराशी संविदा करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

---

**सदस्या, श्रीम. कंचन लुंडः-** ही कम्पाऊंड वाल बांधण्यासाठी किती वेळ लागेल यासंबंधी मला माहिती सांगावी.या विषयी कोण माहीती देणार?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**शहर अभियंता सांगतील की, ही कम्पाऊंड वाल बांधण्यात येणार आहे त्याची टेंडर संपण्याची वेळ आणि मुदत संपण्यासाठी अजून किती महिने शिल्लक आहेत. सदरील काम पूर्ण करण्याची मुदत किती आहे? आमची काहीच हरकत नाही. जिथे आवश्यकता आहे तिथे आपले अधिकारी जावू शंकतात. आमच्या सदस्या ने प्रश्न विचारला आहे की कम्पाऊंड वाल बांधण्याकरीता किती वेळ लागेल ते सांगा.विषय संपला.

**सभापती, श्री. विजय पाटील:-** जमनुजी तो पर्यंत पुढचा विषय घ्या.जेई येत आहेत, तो पर्यंत पुढचा विषय घ्या.

**महापालिका सचिव-** हा विषय अजेंडावर चालूच राहीलआणि मिनिटस मध्ये पण.जेई येई पर्यंत राहू दया, कारण की, मिटींगचा विषय आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:-आपण आताच विषय घेऊ. फक्त हे करा की मे.एम.रामचंदानी की, कामाची मुदत आणि वेळ जी टेंडर मध्ये आहे त्या वेळेत सदरचे काम वेळेत पूर्ण करण्यास जबाबदार राहील. काम पूर्ण झाले पाहिजे.

**सदस्या, श्रीम. कंचन लुंड:-** सभापती सर, कंपाऊड वाल जी लावली जाईल तेव्हा त्याच्या आतमध्ये सेग्रीगेसन प्लांटचे आहे त्यासाठी बोलू इच्छिते की, पुढच्या मिटींग मध्ये अजेंडावर सेग्रीगेसन प्लांटचे घेण्यात यावे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** आजच घेतले आहे.

**सदस्या, श्रीम. कंचन लुंड:-**फक्त कंपाऊड वाल लावून काहीच होणार नाही.

**महापालिका सचिव:-** यामध्ये मी लिहिले आहे की निविदा मध्ये नोंद केल्याप्रमाणे विहित मुदतीत काम पूर्ण करणेस ठेकेदारास बंधनकारक राहील आणि संबंधित अधिका-यानी त्यावर नियंत्रण ठेवावे. इतवृत्तची वाट न पाहता.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**इतिवृत्ताची वाट न पाहता पास.. पास..

**काही सदस्य:-** पास, पास....

सभापती, श्री.विजय पाटीलसदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे. 👍

---

☑विषय क्र. १० :—उसाटणे ता. अंबरनाथ याठिकाणी घनकचरा व्यवस्थापनाकरीता कंपाउंड वॉल बांधणेसाठी मे.ए. एम. रामचंदानी यांची निम्न दराची निविदा मान्य करण्यास व निविदाकाराशी संविदा करणेस मा.**स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्तावना

**उसाटणे ता. अंबरनाथ याठिकाणी घनकचरा व्यवस्थापनाकरीता कंपाउंड वॉल बांधणे** आवश्यक असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सदर कामाचे रुपये**५०११८५०५/-** एवढया खर्चाचे प्राकलन तयार करुन सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्यात आली व नियमाप्रमाणे सदर कामाची निविदा प्रक्रिया करण्यात आली त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.१**

| | | |
|---|---|---|
| १. | प्राकलनीय खर्च | रु.५०११८५०५/- |
| २. | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २४/११/२०२० |
| ३. | निविदा विक्री कालावधी | दिनांक २४/११/२०२० ते १८/१२/२०२० |
| ४. | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १८/१२/२०२० |
| ५. | प्रथम मुदतवाढ | - |

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

| | | |
|---|---|---|
| ६. | द्वितीय मुदतवाढ | - |
| ७. | तृतीय मुदतवाढ | - |
| ८. | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक २२/१२/२०२० |
| ९. | आर्थिक भाग उघडल्याचा दिनांक्र | दिनांक २०/०१/२०२१ |
| १०. | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |
| ११. | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

सदर निविदेचा तांत्रिक भाग दिनांक २२/१२/२०२० रोजी निविदा समिती समोर उघडण्यात आला. त्यामध्ये**१) मे. ॲकॉर्ड असोसिएट्स २) मे.ए.एम.रामचंदानी ३) मे.वसंत कन्स्ट्रक्शन कंपनी इंडिया** यांनी निविदा सादर केल्या आहेत. त्याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे :

**<u>तक्ता क्र.२</u>**

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. ॲकॉर्ड असोसिएट्स | मे. ए.एम. रामचंदानी | मे. वसंत कन्स्ट्रक्शन कंपनी इंडिया |
|---|---|---|---|---|
| १. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती मागील ३ वर्ष | होय | होय | होय |
| २. | कामाचा अनुभव मागील ३ वर्षाचे वार्षिक उत्पन्न | होय | होय | होय |
| ३. | पॅन कार्डाची प्रत | होय | होय | होय |
| ४. | संस्था /कंपनी नोंदणी ( भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे दस्ता ऐवज | होय | होय | होय |
| ५. | ई.पी.एफ. व जी.एस.टी. प्रमाणपत्र प्रत | होय | होय | होय |
| ६. | कंत्राटदाराची निविदा भरण्याच्या सक्षमता | होय | होय | होय |
| ७. | निविदेमध्ये दिलेल्या नमुन्यात रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे. | होय | होय | होय |
| ८ | कंत्राटदाराची घोषणा | होय | होय | होय |
| ९ | मागील ५ वर्षातील कंत्राटदाराची कमाल उलाढाल देय असलेल्या कामाच्या वार्षिक किंमतीच्या कमीत कमी ७५ टक्के इतकी असवी | होय | होय | होय |
| १०. | पात्र/अपात्र | पात्र | पात्र | पात्र |

प्रस्तावित कामाकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रीयेमध्ये तक्ता क्र.२ मध्ये नमुद केलेल्या निविदाकारांच्या कागदपत्रांची वरील निविदा छाननी समितीने छाननी केली आहे.

उक्त तक्त्यात नमुद केलेल्या निविदाकारांच्या कागदपत्रांची छाननी केली.त्यामध्ये **१) मे.ॲकॉर्ड असोसिएट्स २) मे.ए.एम.रामचंदानी ३) मे. वसंत कन्स्ट्रक्शन कंपनी इंडिया** हे तीन ही निविदाकार पात्र ठरत असल्याने त्यांचे निविदेचा आर्थिक भाग (Financial Bid) दिनांक २०/०१/२०२१ रोजी उघडण्यात आला. त्याची माहिती खालीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **निविदाकारांचे नाव** | **दिलेले दर (टक्के प्रमाणे)** |
|---|---|---|
| १ | **मे. ॲकॉर्ड असोसिएट्स** | दिलेले दर ३.०६०% टक्के कमी |
| २. | **मे. ए.एम.रामचंदानी** | दिलेले दर ४.०६०% टक्के कमी |
| ३. | **मे. वसंत कन्स्ट्रक्शन कंपनी इंडिया** | दिलेले दर ०.९००% टक्के जास्त |

वरील तक्त्यात नमुद उल्हासनगर महानगरपालिका **उसाटणे ता.अंबरनाथ याठिकाणी घनकचरा व्यवस्थापनाकरीता कंपाउंड वॉल बांधणे**या कामाकरीता **मे.ए. एम. रामचंदानी**यांनी ४.०६०% टक्के कमीदर सादर केले आहे. सदर दर निम्न आहेत.

तरी **मे.ए. एम. रामचंदानी**यांची निम्न दराची निविदा मान्य करण्यास व निविदाकाराशी संविदा करणेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.५२ दिनांकः—२६/३/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारउसाटणे ता. अंबरनाथ याठिकाणी घनकचरा व्यवस्थापनाकरीता कंपाउंड वॉल बांधणेसाठी **मे.ए. एम. रामचंदानी**यांची निम्न दराची निविदा मान्य करण्यास व निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

लवकरात लवकर सदर कंपाऊड वाल बांधणे आवश्यक आहे, निविदेमध्ये नोंद केल्या प्रमाणे विहीत मुदतीत काम करणे ठेकेदारास बंधनकारक राहील आणि संबिधित अधिका-यांनी त्यावर नियंत्रण ठेवावे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते
सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ११ वाचून दाखवितात.

————————————————————————————————

⇨**विषय क्र. ११**हॉटेल एमब्रोसिया मध्येकोविड १९ प्रतिबंधात्मक उपाययोजना साठी कार्यरत
वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय कर्मचारी यांची राहण्याबाबची सोय उल्हासनगर
महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आली असून त्याचे देयक दि. ०१/१०/२०२० ते
०८/१२/२०२० पर्यंत अदा करण्याकरीता मा.स्थायी समितीच्या माहितीसाठी सविनय
सादर.

————————————————————————————————

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** नोंद झाली.

**महापालिका सचिव:-** ठिक आहे ही मिटीग संपली आहे.

**काही सदस्य:-** पास, पास....

सभापती, श्री.विजय पाटीलसदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

☑विषय क्र. ११ :—हॉटेल एमब्रोसिया मध्येकोविड १९ प्रतिबंधात्मक उपाययोजना साठी कार्यरत वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय कर्मचारी यांची राहण्याबाबची सोय उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आली असून त्याचे देयक दि. ०१/१०/२०२० ते ०८/१२/२०२० पर्यंत अदा करण्याकरीता मा.स्थायी समितीच्या माहितीसाठी सविनय सादर.

प्रस्तावना

साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ प्रमाणे दिनांक १३ मार्च २०२० पासुन खंड २ (१) नुसार महापालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केलेले आहे.तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६७ (३)(क) नुसार मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधिल कलम ५० (अ) अन्वये आपत्कालीन खरेदी व आपत्तीजन्य परिस्थिती किंवा धोक्याच्या कारणांमुळे राष्ट्रीय प्राधिकारण किंवा राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरण बचाव करण्यासाठी तात्काळ तरतुदी किंवा साहीत्य खरेदी करणे किंवा संसाधनांचा त्वरीत उपरयोग करणे तसेच आपत्कालीन खरेदी करण्यासासठी संबधित विभाग किंवा प्राधिकरणाला किते अधिकृत करु शकतात आणि अशा परिस्थितीत निविदा मागविण्याची आवश्यक असलेली मानक प्रक्रिया माफ केलेली मानली जाईल असे नमुद आहे.

त्याअनुषंगाने संदर्भिय पत्रान्वये हॉटेल एमब्रोसिया यांनी दि.१/१०/२०२० ते ०८/१२/२०२० या मधील ६९ दिवसांचा राहण्याचे कालावधीचे वैद्यकीय अधिकारी व वैद्यकिय कर्मचारी यांचे निवासाचे देयकाची मागणी या कार्यालयास केलेली आहे. तसेच सदर कालावधी मध्ये ४१ वैद्यकिय कर्मचारी हे हॉटेल एमब्रोसिया मध्ये १२ रूम मध्ये वास्तव्यास असल्याबाबत त्यांचे ओळखपत्र/आधार कार्ड इत्यादी संदर्भिय पत्राबरोबर सादर केलेले आहे ते खालील प्रमाणे.

सदर हॉटेल एमब्रोसिया मध्ये राहणा-या एकूण ४१ वैद्यकीय अधिकारी व वैद्यकिय कर्मचारी यांची यादी खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of the Doctor / Officer | Bill date | Room No. |
|---|---|---|---|
| 1 | Shri. Amol Bajirav Gagurde | | |
| 2 | Shri. Sadanand Sampat Kamble | 01/10/2020 to 08/12/2020 | 101 |
| 3 | Shri. Jeetendra Chandrakant Malwe | | |
| 4 | Smt. Linsi Daynal Babu | | |
| 5 | Shri. Ranubai Dashrat Shinde | 01/10/2020 to 08/12/2020 | 102 |
| 6 | Smt. Rani Ravindra Khandarkar | | |
| 7 | Smt. Mamta Datatre Shinde | | |
| 8 | Smt. Rukmani Dinesh Wagmore | 01/10/2020 to 08/12/2020 | 103 |

| | | | |
|---|---|---|---|
| 9 | Smt. Vibhawari Vilas Jadhav | | |
| 10 | Smt. Nisha Vijay Ubale | | |
| 11 | Smt. Rekha Sakharam | | |
| 12 | Kum. Namrata Madan Chane | 01/10/2020 to 08/12/2020 | 104 |
| 13 | Smt. Bhawad Reshma Balkrishna | | |
| 14 | Smt. Savita Sachin Tawde | | |
| 15 | kum. Ankita Arun Chavhan | | |
| 16 | Shri. Kuldeep Rajendra Shinde | 1/7/20 to 30/9/20 | 105 |
| 17 | Shri. Deepak Dilip More | | |
| 18 | Shri. Hanumant Libaji Pawar | | |
| 19 | Smt. Archana Awahad | 01/10/2020 to 08/12/2020 | 106 |
| 20 | Smt. Yogita Bandekar | | |
| 21 | Smt. Pramila Rajaram Sakpal | | |
| 22 | Smt. Asmita Jawle | | |
| 23 | Smt. Rupali Sutar | 01/10/2020 to 08/12/2020 | 107 |
| 24 | Smt. Surekha Praween Kamble | | |
| 25 | Smt. Rupali chavan | | |
| 26 | Smt. Poonam Arwind Sawant | 01/10/2020 to 08/12/2020 | 108 |
| 27 | Smt. Pratibha Vitthal Kashid | | |
| 28 | Smt. Sushma Shrawan Gadhri | | |
| 29 | Smt. Roshni Ashokrav Dakate | | |
| 30 | Smt. Monika Tanaji Shinde | 01/10/2020 to 08/12/2020 | 109 |
| 31 | Smt. Shankita  Jadhav | | |
| 32 | Smt. Aamrapali Uttam Kadam | | |
| 33 | Shri. Chander Ram Shinde | 01/10/2020 to 08/12/2020 | 110 |
| 34 | Shri. Satish Harish Wagela | | |
| 35 | Shri. Narendra Bhagwan Thakre | | |
| 36 | Shri. Rajaram Dhaundu Kedar | | |
| 37 | Shri. Raveena Bapu Sardar | 01/10/2020 to 08/12/2020 | 111 |
| 38 | Smt. Preeti Chintaman Gaikwad | | |
| 39 | Smt. Jyoti Balkrishna Isane | | |
| 40 | Smt. Swapnil Avidat Patil | 01/10/2020 to 08/12/2020 | 112 |
| 41 | Smt. Ashwini Anil Nikube | | |

तत्कालीन मा. आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार हॉटेल एमब्रोसियाचे व्यस्थापक यांनी वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय कर्मचारी यांना राहण्यासाठी भाडेतत्वावर रुम्स उपलब्ध करुन दिले होते. परंतु सदर रुम्सच्या दराबाबत कोणतेही स्पष्ट आदेश दिलेले नव्हते.सदर हॉटेल व्यस्थापकाने खालील प्रमाणे देयक सादर केलेले आहे.

सदर हॉटेलचा व्यस्थापकांनी सादर केलेले देयक (संदर्भिय पत्रान्वये) खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Date | Total Person | Total Days | Rate per Day | Total Amount (Excluding GST Rate) |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **1/10/20 to 31/10/20** | **41** | **31** | **500** | **6,35 , 500/-** |
| **2** | **1/11/20 to 30/11/20** | | **30** | | **6,15,000/-** |
| **3** | **1/12/20 to 08/12/20** | | **08** | | **1,64 , 000/-** |
| **Total Amount (No GST Rate given)** | | **41** | **69** | **500** | **14,14,500/-** |

टिप्पणी पृष्ठ क्रमांक १ ते ७ मधील मा.आयुक्त सा.ो., यांचेकडील मान्यतेनुसार मंजूर दर रू.५००/- प्रति दिन प्रतिव्यक्ती राहण्याकरीता या प्रमाणे देयक अदा करण्यात आले होते. तसेच मा.स्थायी समिती यांचेकडील ठराव क्रमांक २, दिनांक १२/११/२०२० अन्वये वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय कर्मचारी यांचे निवासचे देयक अदा करणेकरिता (Hotel Ambrosia) यांना माहितीसाठी मान्यता देण्यात आली होती. (सोबत ठरावाची प्रत जोडलेली आहे.)तरी वरील दराप्रमाणे हॉटेल एमब्रोसियाचे यांचे देयक अदा करणेकरीता खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| Sr.No. | Date | Total Person | Total Days | Rate Per Person | Total Amount (excluding GST) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/10/20 to 08/12/20 | 41 | 69 days (31+30+08) | 500/- | 14,14,500/- |

उपरोक्त तक्तया प्रमाणे एकुण रु.14,14,500/- (अक्षरी रुपये चौदा लाख चौदा हजार पाचशे रूपये मात्र) देयक अदा करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदरचा खर्च हा सन. २०२०-२०२१ मधील विपरीत परिस्थिती व्यवस्थापन B-२ (३) या लेखाशिर्षातून किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्याविशेष निधितुन खर्च करण्याबाबत, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३) (क) अन्वये मा.आयुक्त सो. यांना दिलेल्या अधिकारानुसार या देयकांची रक्कम अदा करण्याकरीता प्रस्तावीत करण्यात आलेले आहे.सदर देयक अदा करण्याकरीता मा.स्थायी समितीच्या माहितीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र.५३ दिनांक:—२६/३/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार हॉटेल एमब्रोसिया मध्ये कोविड १९ प्रतिबंधात्मक उपाययोजना साठी कार्यरत वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय कर्मचारी यांची राहण्याबाबची सोय उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आली असून त्याचे देयक दि. ०१/१०/२०२० ते ०८/१२/२०२० पर्यंत अदा करण्याकामी माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

दुपारी ४.३५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती, श्री.विजय पाटील यांनी जाहीर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

टिप्पणी पृष्ठ क्रमांक १ ते ७ मधील मा.आयुक्त सा.ो., यांचेकडील मान्यतेनुसार मंजूर दर रू.५००/- प्रति दिन प्रतिव्यक्ती राहण्याकरीता या प्रमाणे देयक अदा करण्यात आले होते. तसेच मा.स्थायी समिती यांचेकडील ठराव क्रमांक २, दिनांक १२/११/२०२० अन्वये वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय कर्मचारी यांचे निवासचे देयक अदा करणेकरिता (Hotel Ambrosia) यांना माहितीसाठी मान्यता देण्यात आली होती. (सोबत ठरावाची प्रत जोडलेली आहे.)तरी वरील दराप्रमाणे हॉटेल एमब्रोसियाचे यांचे देयक अदा करणेकरीता खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| Sr.No. | Date | Total Person | Total Days | Rate Per Person | Total Amount (excluding GST) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1/10/20 to 08/12/20 | 41 | 69 days (31+30+08) | 500/- | 14,14,500/- |

उपरोक्त तक्तया प्रमाणे एकुण रु.14,14,500/- (अक्षरी रुपये चौदा लाख चौदा हजार पाचशे रूपये मात्र) देयक अदा करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदरचा खर्च हा सन. २०२०-२०२१ मधील विपरीत परिस्थिती व्यवस्थापन B-२ (३) या लेखाशिर्षातून किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्याविशेष निधितुन खर्च करण्याबाबत, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३) (क) अन्वये मा.आयुक्त सो. यांना दिलेल्या अधिकारानुसार या देयकांची रक्कम अदा करण्याकरीता प्रस्तावीत करण्यात आलेले आहे.सदर देयक अदा करण्याकरीता मा.स्थायी समितीच्या माहितीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र.५३ — दिनांकः—२६/३/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार हॉटेल एमब्रोसिया मध्ये कोविड १९ प्रतिबंधात्मक उपाययोजना साठी कार्यरत वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय कर्मचारी यांची राहण्याबाबची सोय उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आली असून त्याचे देयक दि. ०१/१०/२०२० ते ०८/१२/२०२० पर्यंत अदा करण्याकामी माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

दुपारी ४.३५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती, श्री.विजय पाटील यांनी जाहीर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:- १५/०७/२०२१

दिनांक:- १५/०७/२०२१ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

०३

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक १५/०७/२०२१, रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृह येथे मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील शासनाचे क्रमांक कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४, दिनांक २८ जुन, २०२१ च्या पत्रान्वये विहित कार्यपध्दती पालन करुन सभेस ऑनलाईन ॲपद्वारे घेण्यांत आली, सदर सभेत खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश वदारीया | सदस्य |
| ४ | श्री. भगवान भालेराव | सदस्य |
| ५ | श्री. राजकुमार किशनचंद जग्याशी | सदस्य |
| ६ | श्रीम. जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ७ | श्री. कलवंतसिंह सोहता | सदस्य |
| ८ | श्री. चंद्रशेखर यादव | सदस्य |
| ९ | श्रीम. अर्चना करणकाळे | सदस्या |
| १० | श्रीम. कविता लाल पंजाबी | सदस्या |
| ११ | श्रीमती कंचन अमर लुंड | सदस्या |
| १२ | श्री. रमेश महादेव चव्हाण | सदस्य |
| १३ | श्री.आकाश पाटील | सदस्य |
| १४ | श्री. स्वप्नील बागुल | सदस्य |
| १५ | श्रीमती सुनिता बगाडे | सदस्या |
| १६ | श्री. गजानन शेळके | सदस्य |

तर,
खालील दर्शविलेले सदस्य सभेस अनुपस्थित होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. डॉ. राजा दयानिधी, आयुक्त
२. श्रीमती करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव
४. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय)
५. श्री. मदन सोंडे, उप-आयुक्त (सा.आ.वि.)
६. श्रीमती प्रियांका राजपुत, उप आयुक्त (कर विभाग)
७. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी

८. श्री. मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक
९. श्री. सुर्यकांत खटके, लेखाधिकारी
१०. श्रीम. अनिता सपकाळे, वैद्यकीयआरोग्य अधिकारी
११. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीयआरोग्य अधिकारी
१२. श्री. महेश सितलानी, शहर अभियंता
१३. श्री. तरुण सेवकांनी, उप अभियंता (सा.बा.वि.)
१४. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता
१५. श्री. अजय एडके, सहा. आयुक्त
१६. श्री. मनिष हिवरे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी
१७. श्री. रहेजा, शाखा अभियंता (पा.पु.वि.)
१८. श्रीमती श्रध्दा सपकाळे,सिस्टीम ॲनालिस्ट, मा.त.विभाग
१९. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता
२०. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी
२१. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२२. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती नर्गिस खान, लिपकी
२. श्री. बाळू भांगरे, लिपीक

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** मिटींग सुरु करा.

**महापालिका सचिव:-** सन्माननिय सदस्य कृपया सध्या कोरानाचा प्रादुर्भाव असल्यामुळे शासनाचे आदेश आहेत की, सदस्यांना सभागृहामध्ये बसता येणार नाही, त्यांनी ऑन लाईन मिटींगमध्ये सहभागी व्हावे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मी मा. सभापतीची परवानगी घेतली आहे, माझे नेटवर्क बंद आहे.

**महापालिका सचिव:-** मा. सभापती शासनाचे आदेश आहेत, या आदेशाचे पालन झाले पाहीजे, म्हणून मी तुमच्या निदर्शनास आणून देत आहे. ही ऑनलाईन सभा आहे, कोरोनाचा प्रादुर्भाव होऊ नवे म्हणून नियम पाळायचे आहेत.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** ठिक आहे.

दुपारी ३.२० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

**महापालिका सचिव:-** विषय क्र.१...

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**सभापतींना माझी विनंती आहे की,विषय क्र.२० हा पहिला घ्यायला पाहीजे, मला महत्वाच्या कामासाठी जायचे आहे, त्यामुळे मी चर्चा करुन निघून जाईल.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** सचिव मॅडम विषय क्रमांक २० पहिले घ्या.

**महापालिका सचिव:-** मा. सभापती यांनी विषय क्र.२० प्रथम घ्यायला सांगितला आहे. पण चर्चा आणि ठराव हा अनुक्रमानुसारच येईल.

---

**⇨ विषय क्र १:— माहे एप्रिल २०१९ ते मार्च २०२० अखेरचा जमा खर्चाचा वार्षिक अहवाल**

---

**महापालिका सचिव:-** विषय क्रमांक १ वाचून दाखवितात.

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र १:**—महापालिका नव्याने तयार केलेल्या आर.टि.पी.सी.आर. लॅब करीता आवश्यक साहीत्य उपलब्ध करुन देणेबाबत.

———————————————————————————————————————

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**कोण सांगणार आहे?

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** पहिला नंबरचा विषय घ्या.

**महापालिका सचिव:-** सभापती महोदय आम्हांला आदेश देण्यात यावा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** त्या दिवशी मिटींग झाली होती ना, तेव्हा आयुक्त साहेब, उपस्थित होते.

**महापालिका सचिव:-** शासनाचे आदेश आहेत ना, आम्ही नाही सांगू शकत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** नाईकवाडे साहेब बोला, बोला.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** मा. सभापती, सन्माननिय सदस्य, आयुक्त साहेब, आपल्या वार्डामध्ये कोईड-१९ चा प्रादुर्भाव झाला होता त्यानुसार तो रोखण्यासाठी आपल्याकडे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६ मधील कलम ५ आयुक्तांना या आर.टी.पी.सी. आर. लॅब वैगेरे तयार करण्यासाठी आणि त्यासाठी साहीत्य खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे. त्यानुसार आपण आर.टी.पी.सी. आर. लॅब स्थापन करण्यात आलेले आहे आणि त्या आर.टी.पी.सी. आर. लॅब तयार केल्या नंतर तो **४५,७५,७९५/-**एवढा खर्च झालेला आहे, तो स्थायी समितीच्या माहीतीसाठी, अवलोकनासाठी सादर करण्यात आलेला आहे. तरी यास मान्यता दयावी.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** माहीतीसाठी आहे ना, ठिक आहे, पास..पास..

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:-** माहीतीसाठी नाही, आम्ही बोललोच नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**मला हे सांगा, तुम्ही हे जे लिहीलेले आहे, हे काम करण्यासाठी प्राधिकारी म्हणून घोषित केलेले आहे. तसेच महाराष्ट महानगरपालिका अधिनियममहाराष्ट्र महानागरपालिका अधिनियम अनुसुचि ड मधील प्रकरण ५ कलम (२) (२) अंतर्गतआयुंक्तांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे. ऑर्डर कधी दिली होती? आता बंद केले आहे, ती तारीख तुमच्याकडे असेल ना.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**जो पर्यंत रोगप्रतिबंधक आवश्यकतेनुसार आपण खरेदी केलेले आहे.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**याच्यामधील सर्व वस्तु एका वेळी खरेदी केलेल्या आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** वर्क ऑर्डर कधी दिली?

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**तारीख तर माहीती नाही पण सन २०१९-२०२० पासून सुरुवात केली आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ६५, दिनांक १८/०३/२०२० अन्वये कोविड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी वैद्यकिय व इतर बाबींची उपलब्धता तातडीने होण्यासाठी शासन निर्णयानुसार किंवा इतर आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यासाठी साहित्य वस्तू, औषधे व अनुषंगिक बाबी निविदेशिवाय थेट खरेदीकरीता महाराष्ट्र महानागरपालिका अधिनियम अनुसुचि ड मधील प्रकरण ५ कलम (२) (२) अंतर्गत आयुंक्तांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.ठिक आहे, त्याच्या नंतर हा ठराव झालेला आहे. दिनांक ७/०२/२०२० ला स्थायी समिती ठराव क्रमांक ७६ सुचयकाचे नाव श्री. जमनादास पुरस्वानी, अनुमोदकाचे नाव श्री. भगवान भालेराव यामध्ये आयुक्तांना ५ (२) (२) मध्ये अधिकार दिले होते, ते आम्ही परत घेतलेले आहेत, यामध्ये जे पण काही आहे, याची माहीती आम्हांला दयायला सांगितले आहे. परंतु आज पर्यंत त्यांना माहीती मिळाली नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**पहीले देशमुख साहेबांना अधिकार दिले होते, त्या नंतर आपल्याला अधिकार दिले आहेत, तो महाराष्ट्र शासनाचा अधिकार आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**अधिकार आहेत, आपण आपले अधिकार परत घेतले जे अधिकाराचा वापर केला आहे त्याची माहीती देण्यात यावी. आता इथे उल्लेख केला साथ रोग प्रतिबंधक कायदा १८९७ प्रमाणे दिनांक १३ मार्च २०२० पासुन खंड २(१) नुसार महापालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केलेले आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६७(३) नुसार मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.६७(३)सी मध्ये इमरजेन्सी इमिडेटली ॲक्शन सर्व्हिस ऑफ पब्लिक ऑर दि प्रोटेक्शन ऑफ कॉप्रोरेशन ॲज दि इमरजेन्सी टू जस्टीफाय ऑर टू ॲक्वायर नॉट विथ स्टॅडींग दॅट सच ॲक्शन पेनाल्टी पॅकिंगअंडर डिसाईड विदाउट सेक्शन ॲप्रुल ऑथरेटी ऑर सब ऑदर म्युनसिपल ऑथरेटी फॉर दि स्टेट गव्हर्नमेंट प्रोव्हाईडट दॅट स्टॅडींग कमिटी टू दि कार्प्रोरेशन ॲन्ड ॲक्शन टू टेकींग कार्प्रोरेश्न ॲन्ड रिझल्ट ऑर टेकींग दि सिन ॲन्ड अमाउंट ऑफ दि कास्ट एनी इन्कॉयर ॲन्ड लाईटली टू दि इन्कायर ऑफ दि प्रोव्हिजन ऑफ डीसाइड हे बजेटच्या बाहेर आहे, तुम्हांला इमिडेटली स्थायी समितीला सांगायचे आहे की, आम्ही हे दिले आहे, आम्ही तुमच्या अधिकाराला आव्हान करु शकत नाहीत.६७(३) सी मध्ये तुम्हांला अधिकार आहेत. ते खरे आहे, परंतु आम्हांला माहीती झाले पाहीजे. आम्ही नाही म्हणत नाही आणि दुसरी गोष्ट

गोषवा-यामध्ये आपण एका ठरावाचा उल्लेख केला आहे.दुस-या ठरावाच इथे उल्लेखच केला नाही. याचा अर्थ काय आहे. तुम्ही नंतर आले आहेत, परंतु तुमच्या विभागाचे लोक सुरुवातीपासून आहेत, त्यांची जबाबदारी आहे की, संपुर्ण माहीती देणे. हा अपुर्ण गोषवारा आहे, स्थायी समिती समोर आला आहे, तर मला वाटते की, हा डिफर झाला पाहीजे. हा आपण बनवून परत घेऊन या.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**माझ्या अधिका-याकडून जी चुक झाली आहे तरसर त्या बददल काही दुमत नाही, पण जो खर्च झालेला आहे, तो खर्च आपण कुठे वाया घातलेला नाही परंतु ही बाब जी आहे, ती अतिशय तातडीची आहे, महत्वाची आहे आणि त्यावर आपण अगोदरच खर्च केलेला आहे. म्हणून मान्यता देण्याची विनंती करतो.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**मान्यतासाठी आहेच नाही, तो फक्त अवलोकनासाठी आलेला आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** अवलोकनांसाठी त्याला आमचा विरोध नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**तुम्ही जे काम केले आहे, आयुक्त साहेबांनी खुप चांगले काम केले आहे, वै्द्यकीय विभागाने केले आहे आणि सर्वांनी चांगले काम केले आहे. फक्त गोषवा-यामध्ये आले पाहीजे, गोषवारामध्ये बदल करुन परत सभेमध्ये घेऊन या.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**याच्या पुढे आम्ही लक्ष देवू माहीतीसाठी आहे आणि आपल्या सभेचा हा अमुल्य वेळ आहे, हा वेळ वाया जाऊ नये म्हणून मी आपल्याला विनंती करती आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** पास..पास..

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** मी सगळयांना सांगू इच्छितो की, परत एक वेळा निट तपासणी करा. नंतरच्या मिटींगमध्ये घेऊन या डिफर.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**सभापती त्या काळामध्ये पुर्णपणे लॉकडाऊन होते, आयुक्त साहेबांनी आणि त्या ठेकेदारांनी कसे काम केले असेल? त्याची साधी कल्पना करा आणि त्या काळात आता जर विचार कराल त्या काळामध्ये एकही दुकान उघडे नव्हते. त्या माणसाने कशा पध्दतीने केले असेल? कुठून मिस्तरी आणले असतील, कशा पध्दतीने बनवले असेल? आणि आपण विचार केला कशी परिस्थिती होईल. त्या काळामध्ये झालेला आहे आणि त्यांच्या अधिकारामध्ये त्यांनी बनवलेले आहे. आयुक्तांनी आपल्या माहीतीसाठी सादर केलेले आहे, त्यामुळे तो पास करण्यात यावा.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-**माझा विचार डिफर करण्याचा आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**उप आयुक्त मुख्यालय यांनी सांगितले की, याच्यामध्ये चुकी आहे, त्यांनी मान्य केले आहे, चुक केली तर आम्ही परत करायला तयार आहेत ना, आम्ही मनाई केली नाही. तुम्ही चुकी सुधारणार नाही का?

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-**तुम्ही चुक सुधारुन घ्या.विषय डिफर.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**परत घेऊन येतील ना.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**माहीतीसाठी सादर केलेले आहे. पास.. करा.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-**याला आम्ही डिफर करतो.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**डिफर करण्याचा काय विषय नाही. डिफर करायचा असेल तर मतदान घ्या. सभापती महोदय मतदान घ्या. आयुक्तांनी मेहनत घेऊन केले आहे आणि आपल्या ठाणे जिल्हामध्ये पहिले लॅब् बनले आहे. पालकमंत्री यांनी आयुक्तांचे अभिनंदन केले आहे.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-**फेल करु नका.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**फेल चा प्रश्नच येत नाही, ही काय मंजुरी नाही, माहीतीसाठी दिलेला आहे, तो अगोदरच पास आहे. मा. महापौर आणि मी स्वत: लॅबचे उदघाटन केले आहे.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>** त्यांनी चुक केली आहे, ते सुधारणा करणार आहेत आणि या लॅबचा आपल्या शहराला फायदा आहे, काहीच नुकसान नाही. हे आपण सगळे मान्य करु. या फ्रिजचे आपण लिहीले आहे २६० थोडे जास्त वाटतात. परंतु त्यावेळीची परिस्थिती होती, दर जास्त झाले आहेत.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>**आहो, राजू भाई त्यावेळची परिस्थिती वेगळी होती, त्या वेळचे बोला.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** १२ रुपयाला पेन मिळतो तो २८ रुपये लिहीले आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- मा. सभापतीजी, भालेराव कृपया, आपण हा विषय माहीतीसाठी आहे, कोणीही विरोध करणार नाही. परंतु आयुक्त साहेबांना याची माहीती असायला पाहीजे की, यामध्ये चुक झाली आहे, आम्हांला पुर्ण विश्वास आहे की आयुक्त साहेब जे पण करतात, ते चांगलेच करतात. असे आहे की, हे मला माहीतीच पाहीजे गरजेचे नाही. तर आपण याला पास करुकाही हकत नाही. परंतु इथे सदस्य, सांगत आहेत की, आपण पुढच्यासाठी बेलसिट, पेन्सीलचे दर जरा जास्तच आहेत. खुपच काही वाढवलेले आहे तर ठिक आहे याला आपण सर्व संमतीने पास करीत आहेत. परंतु इथून पुढे चांगल्या प्रकारे बाजारातून माहीती घेऊन घ्यायला पाहीजे. जर ५० रुपयाचे बेलसिट ६० रुपयाला मिळत असेल तर ठिक आहे. परंतु ५० रुपयाचे बेलसिट २०० रुपयाला मिळत असेल तर खुपच वाईट आहे. यामध्ये आय.एस. मार्कचेच पाहीजे असे गरजेचे नाही.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>** भविष्यात रेट बाबत लक्ष ठेवण्यात यावे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय येथे ६५ कॅमेरे बसवले आहेत, त्यामध्ये एका कॅमेरेची किंमत ३५००/- रुपये इतकी आहे, त्यांची किंमत ६५००/- एवढी दाखवली आहे. त्या वेळी ही गोष्ट का नाही समोर आली.दुसरी गोष्ट आज जमनादास पुरस्वानी यांनी दिलेले निर्देश् आणि जग्यासी साहेब रेट बददल जे पण असेल आता हा विषय आम्ही पास करीत आहेत.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** हाआपल्या माहीतीसाठी आहे ना. पास करण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** ठराव असा बनवा की, शासनाने याचे जे दर आहेत, ते पडताळणी केले असतील आणि आपल्याकडे फक्त माहीतीसाठी पाठवला आहे. माहीती परत पाठवू शकत नाही, माहीती घ्यायलाच लागेल. आपण माहीती घेतली आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** ही माहीतीची नोंद केली, त्याच बरोबर प्रशासनाने दर पडताळणी करुन लक्ष देण्यात यावे.

**<u>महापालिका सचिवव:-</u>** माहीतीची नोंद केली आणि दोन मुददे टाकण्यात येतील.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास….

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

## ☑ <u>विषय क्र.१:-</u>महापालिका नव्याने तयार केलेल्या आर.टि.पी.सी.आर. लॅब करीता आवश्यक साहीत्य उपलब्ध करुन देणेबाबत

**<u>प्रस्तावना</u>**

**मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ६५ दिनांक १८/०३/२०२० अन्वये कोविड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी वैद्यकिय व इतर बाबींची उपलब्धता तातडीने होण्यासाठी शासन निर्णयानुसार किंवा इतर आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यासाठी साहित्य वस्तू, औषधे व अनुषंगीक बाबी निविदेशिवाय थेट खरेदीकरीता महाराष्ट्र महानागरपालिका अधिनियम अनुसुचि ड मधील प्रकरण ५ कलम (२) (२) अंतर्गत आयुंक्तांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.**

**उल्हासनगर शहरामध्ये कोविड-१९ या संसर्ग जन्य आजाराचा प्रादुर्भाव वाढत असून सदर आजारावर नियंत्रण ठेवणेकरीता संक्रमीत रूग्णांना उपचार घेणेकरीता व संशयीत रूग्णांना कॉरंटाईन करून ठेवणेकरीता महापालिकेमार्फत RTPCR LAB ची स्थापणा करण्यात आलेली आहे.**

साथ रोग प्रतिबंधक कायदा १८९७ प्रमाणे दिनांक १३ मार्च २०२० पासुन खंड २(१) नुसार महापालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केलेले आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६७(३) नुसार मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

त्याअनुषंगाने महापालिकेची नविन लॅब उभ्यारण्याकरीता मे. झा.पी.इंम्रा.लिमिटेड यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.सदर बाबत झालेल्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ .क्र. | साहीत्याचा तपशिल | संख्या | Jha P infra Pvt.Ltd. | |
|---|---|---|---|---|
| | | | Rate per Nos | Total |
| १ | १२x१२ self with railing | ४५ ft | ९४० | ४२३३० |
| २ | १०x१० self with railing | ३० ft | ७८० | २३४०० |
| ३ | Flexible rubber to glass edges | १२ ft | ८०० | ९६०० |
| ४ | Bottom lock and key to glass door | १७ ft | १६९० | २८७३० |
| ५ | Handel to door (big) | ०६ ft | १२९० | ७७४० |
| ६ | Handel to door (small) | १८ ft | ११३० | २०३४० |
| ७ | Wall cloth hanger | ३० ft | २१२ | ६३६० |
| ८ | Automatic door closer | ११ ft | ८९० | ९७९० |
| ९ | Gas kit for glass doors | ११ ft | २७८० | ३०५८० |
| १० | Providing profile framing to glass | ३०० ft | १९५ | ५८५०० |
| ११ | Eureka Forbes fobo vact & Mop robotic Vaccum cleaner with UV | ०५ | ३२९९० | १६४९५० |
| १२ | Magnetic Glass cleaners with automatic mations | २० | ३९७० | ७९४०० |
| १३ | Floring Carpeet २६ X १२ Mtr. | ०१ | ७८००० | ७८००० |
| १४ | Artificial Green Grass ४०X३.५ Mtr. | ०१ | १२८०० | १२८०० |
| १५ | Matting Door Mats | १० | ३९० | ३९०० |
| १६ | Bed ३X७, Teak wood | ०२ | १९७४० | ३९४८० |
| १७ | Sofa Set ३X६ & ३X४ | ०१ | ८५००० | ३५००० |
| १८ | Glass Table | ०२ | ४५६० | ९१२० |
| १९ | Wall Fitted Glass | ०२ | ३७५० | ७५०० |
| २० | Wooden Stools २ X २ | १० | ११५० | ११५०० |
| २१ | Mattress for bed | ०२ | १२७५० | २५५०० |
| २२ | Pillow | ०२ | ६९० | १३८० |
| २३ | Bed sheets | ०२ | ५०० | १००० |
| २४ | Blankets | ०२ | ७४० | १४८० |
| २५ | Plywood, १० m.m., Teak wood, ११X२२ Ft. २ nos. | ४८४ sq.ft. | २८६ per sq.ft. | १३८४२४ |
| २६ | Sunmica, ४८४ sq. ft. | ४८४ sq.ft. | १२२.५० per sq.ft. | ५९२९० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७ | **File cabinet wall Fitting Size २×२ per cabinet** | ०८ nos | ४१५० | ३३,२०० |
| २८ | **Shoe Rack** | ०२ nos | ६१३० | १२,२६० |
| २९ | **Wall Ply ११×३** | ०३ nos | ७३१० | २१,९३० |
| ३० | **Trolley Glass** | ०३ nos | १२८०० | ३८४०० |
| ३१ | **Store Room Rack (Steel Mode)** | ०२ nos | ७८८० | १५७६० |
| ३२ | **Table (size ६×४)** | ०४ | १४९०० | ५९,६०० |
| ३३ | **Table (size २×४)** | ०७ | ११२८० | ७८,९६० |
| ३४ | **Table (size ४×४)** | ०२ | १२९५० | २५,९०० |
| ३५ | **Revolving chairs** | २० | ६१५० | १,२३,००० |
| ३६ | **Plastic chairs** | २० | ६८० | १३,६०० |
| ३७ | **Revolving tools** | १५ | ३९६० | ५९,४०० |
| ३८ | **Reception Table (६×४)** | ०१ | १४९७० | १४९७० |
| ३९ | **Printed Letter Heads** | २०००० | ६.८० | १,३६,००० |
| ४० | **Printed Invlops** | २०००० | ४.६० | ९२,००० |
| ४१ | **Round Stamp** | ०५ | १७३ | ८६५ |
| ४२ | **Name Head stamps** | ०५ | २७१ | १३५५ |
| ४३ | **Date Stamp** | ०५ | २७२ | १३६० |
| ४४ | **Authority Singnature stamp** | ०५ | २७५ | १३७५ |
| ४५ | **Dettol Soap** | १०० | २७ | २७०० |
| ४६ | **Dettol Liquid (३०Ltr)** | ३०० | ३४७ | १०४१०० |
| ४७ | **Dettol Handwash** | ३०० | १५८ | ४७४०० |
| ४८ | **Dettol Bathroom Cleaner (५० Ltr)** | ६४५ | ५० | ३२२५० |
| ४९ | **Bathroom Brusher** | ०५ | २९५ | १४७५ |
| ५० | **Room Sprays** | २५ | १९५ | ४८७५ |
| ५१ | **Pen** | ४०० | २५ | १०००० |
| ५२ | **Pencil** | २५ | १४५ | ३६५० |
| ५३ | **Eresor** | १६५ | ०५ | ८२५ |
| ५४ | **Sharpner** | ७८ | ०२ | १५६ |
| ५५ | **Big Scale** | १० | २४ | ४२० |
| ५६ | **Small Scale** | १० | २८ | २८० |
| ५७ | **Ragister A ४ size** | १०० | ८८ | ८८०० |
| ५८ | **Ragister Big** | १०० | ४७८ | ४७८०० |
| ५९ | **Note Book** | १०० | २७ | २७००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६० | Stappler Big | ५ | ९६ | ४८० |
| ६१ | Stappler Small | ५ | ७६ | ३८० |
| ६२ | Stappler PinBig | २० Box | ६७६ | १३५२० |
| ६३ | Stappler Pin Small | ३० | ५५८ | १६७४० |
| ६४ | Printing Paper | ५० | ७७८ | ३८९०० |
| ६५ | Permanent Marker Small | ५० | २६ | १३०० |
| ६६ | Permanent Marker Big | ५० | ६८ | ३४०० |
| ६७ | Highlighter | ३८६ | १० | ३८६० |
| ६८ | A ४ size lining Paper | ५००० | २.६० | १३००० |
| ६९ | Box file | २९६ | १०० | २९६०० |
| ७० | Cardboard File | ८६ | १०० | ८६०० |
| ७१ | Folder File | १०० | २६ | २६०० |
| ७२ | Plastic Folder | १००० | ३.८० | ३८००० |
| ७३ | Mouse Pads | १० | २९५ | २९५० |
| ७४ | Cutter Big | १० | १३ | १३० |
| ७५ | Cutter Small | १० | ०८ | ८० |
| ७६ | Flag Pads | १०० | २७८ | २७८०० |
| ७७ | Note Pads | ५३ | ५० | २६५० |
| ७८ | Note Pads Small size | ५० | ४६ | २३०० |
| ७९ | Sheets (२" X १० Ft.) | २४० | ६३१ | १५१४४० |
| ८० | Tea cup with Soucer | ४ set | ५२० | २०८० |
| ८१ | Glass containess | १० set | ३१५ | ३१५० |
| ८२ | Tray plastic | ०५ | २६७ | १३३५ |
| ८३ | Spray Bottle | २० | ७७ | १५४० |
| ८४ | Pump Bottle | २० | ७८ | १५६० |
| ८५ | Dust Bin २४० Ltr | ०३ | २८२० | ८४६० |
| ८६ | Dust Bin १२० Ltr | ०८ | १८६० | १४८८० |
| ८७ | Dust Bin १० Ltr | १९ | ३८० | ७२२० |
| ८८ | Dust bin Table | ५० | ९५ | ४७५० |
| ८९ | Wire extencen ३ pin Socket | १० | २९० | २९०० |
| ९० | Wall Fans in container | ५ | १९८० | ९९०० |
| ९१ | Buckets for Bathroom | १० | ३९० | ३९०० |
| ९२ | Cheaning equipmet | ---- | ४८०० | ४८०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९३ | Tea machine | ०१ | १७६८८ | १७६८८ |
| ९४ | Electric kettle | ०२ | १६५० | १६५० |
| ९५ | Hand Napkin | ५० | १२२ | ६१०० |
| ९६ | Big Napkin | ३० | १७९ | ५३७० |
| ९७ | Glass Plates | १० | ३५५ | ३५५० |
| ९८ | Dustbin Plastic Bags | ३००० | ३.६० | १०८०० |
| ९९ | Sun Board Banner | Lum sum | ८६००० | ८६००० |
| १०० | Flex Banner | Lum sum | ३१००० | ३१००० |
| १०१ | LED Light Logos | Lum sum | ९१००० | ९१००० |
| १०२ | Euroclean Eureka forbes | ०१ | ३६१०० | ३६१०० |
| १०३ | Heath Pro Eureka forbes | ०१ | २०९०० | २०९०० |
| १०४ | Steam clener Eureka forbes | ०२ | ९६५० | १९३०० |
| १०५ | Thermal Gun Eureka forbes | ०१ | १४१०० | १४१०० |
| १०६ | Dr.Arogurd scrr Eureka forbes | ०५ | ३२०३३ | १६०१६५ |
| १०७ | Coronaguard Eureka forbes | ०३ | ३७३६६ | ११२०९९ |
| १०८ | Table size ६ft×४ft | ०१ | २९१०० | २९१०० |
| १०९ | Revolving chair | ०२ | ८९५० | १७९०० |
| ११० | Revolving chair | ०४ | ३२२५ | १२९०० |
| १११ | Revolving tools | ०४ | ३००० | १२००० |
| ११२ | Sofa ३ft×३ft | ०१ | १२६०० | १२६०० |
| ११३ | Sofa ५ft×३ft | ०१ | १४८०० | १४८०० |
| ११४ | Sofa ४ft×३ft | ०१ | १४७०० | १४७०० |
| ११५ | Center bale | ०१ | ६२०० | ६२०० |
| ११६ | Rolling cuttens to window & Bathroom | ०१ | २८४०० | २८४०० |
| ११७ | Iron Portable Contener for RTPCR Lab १०×२२ | ०२ | २,९९,५०० | ५,९९,००० |
| ११८ | Iron Portable Contener for RTPCR Lab ५×५ (सुरक्षा रक्षकांकरीता) | ०१ | ८०,००० | ८०,००० |
| ११९ | Aqua grad Eureka forbes | ०१ | २७,००० | २७,००० |
| १२० | Fridge २६० Ltr | ०२ | ३२००० | ६४,००० |
| १२१ | Fridge १३० Ltr | ०३ | १५००० | ४५००० |
| १२२ | Biomattryc machine | ०१ | ८००० | ८००० |
| १२३ | Water Dispencer | ०२ | १२००० | २४००० |
| | Total | | | ३८,१३,१६३/- |
| | २% consaltancy chargres | | | ७६,२६३/- |

| | | |
|---|---|---|
| | GST १८ % | ६,८६,३६९/- |
| | Grand Total | ४५,७५,७९५/- |

**मे. झा.पी.इंम्प्रा.लिमिटेड यांचे मार्फत RTPCR LAB येथे पुरविण्यात आलेल्या साहीत्यासाठी एकूण खर्च रु. ४५,७५,७९५/- एवढा खर्च झालेला आहे.तरी सदर बाबत झालेल्या खर्चाची माहीती मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सविनय सादर.**

**स्थायी समिती ठराव क्र.१३** **दिनांक : १५/०७/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मे.झा.पी.इंम्प्रा.लिमिटेड यांचे मार्फत आर.टि.पी.सी.आर. लॅब येथे पुरविण्यातआलेल्या साहित्यासाठी झालेला एकुण खर्च रु.४५,७५,७९५/-च्या माहीतीची नोंद करीत आहे.**

**तसेच**

**१) देयक अदा केल्यापुर्वी दर तपासण्याची जबाबदारी संबंधित विभागाशी राहिल.**
**२) यापुर्वी ५(२)(२) अंतगर्त केलेल्या कामाची माहिती स्थायी समिती समोर आणण्याचे निर्देश दिले होते तरी या बाबतची माहिती त्वरीत स्थायी समिती समोर आणण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.**

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक २ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र २**:—संभाव्य कोवीड-१९ तिस-या लाटेचा धोका लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजना पुर्व तयारी करण्यासाठी उमपाचे नव्याने सुरु करण्यात येणा-या DCHC/DCH रुग्णालयासाठी आवश्यक असलेले वैद्यकीय लघु उपकरणे (Medical Small Instrument) ही जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे यांच्याकडील ई-निविदा न्युनतम दर सादर करणा-या पुरवठादार/संस्थेकडुन थेट खरेदी करण्याकरिता मा.स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

---

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी, श्री. दिपक पगारे:**-सन्मननिय सभपती, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, आपल्याकडे आता दुसरी लाट जवळ जवळ ओसरत आलेली आहे, तिसरी लाट येण्याची शक्यता जास्त असल्यामुळे मा. मुख्यमंत्री साहेब, टास्क फोर्स, आय.एम.ए. आणि आताच आपल्याकडे गव्हर्नमेंट ऑफ इंडियाची टिम आली होती, त्या मिटींगला मी पण गेला होतो. त्यामध्ये सांगण्यात आले की, लवकरात लवकर आपण तिस-या लाटेसाठी आपली निययोजन करुन

तयारी करावी. जिथे जिथे तुम्ही रुग्यालय सुरु करीत आहेत, ते लवकरात लवकर अशा पध्दतीचा त्यांनी आदेश दिलेले आहेत. त्या प्रमाणे आपण हॉस्पिटल सुरु करीत आहोत अँटीलीयामध्ये त्या करीता लागणारे जे इन्स्ट्रुमेंट आहेत, ते इन्सट्रुमेंट आपल्याला ठोणे सिव्हिल येथे जे दरपत्रक मिळणार आहेत, तिथे टेंडर झालेले आहे, त्यामध्ये जे एन.एल. आहेत, त्या एन. एलकडून आपण साहीत्य खरेदी करणार आहोत. जर आपण टेंडर प्रासिजर आपण इथे आपल्या लेवलला केली असती तर त्या ठिकाणी आपल्याला भरपूर दिवस त्या ठिकाणी खर्च झाले असते. त्या प्रमाणे आपण ठोणे ग्रामीण रुग्यालय येथून एन.एलकडून आपण साहीत्य खरेदी करणार आहोत. तरी मंजुरीसाठी आपल्या समोर सादर करीत आहोत, तर आपण त्याला मंजुरी देण्यात यावी आपल्याला नम्र विंनती आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. सभापती माहोदय, मा. आयुक्त साहेब, हा जो एन. एल कडून ठाणेचा साहित्य खरेदी करणार आहेत, याच्या पहीले पण सन २०१९-२०२० मध्ये कोरोना आलाहोता आणि आपण हे सर्व सामान खरेदी केले होते.आता यामध्ये एक शब्द लिहीले आहे, मी जास्त बोलणार नाही, डॉक्टर साहेब बसले आहेत. पण हे पिस लिहीले आहेत, हे ३० काय आहेत, ३०० हजार लिहीले आहेत का? ३० पिस आहेत. १४ नंबरचा लिहीले आहे ३० ऑक्सी मिटर हे फक्त ३० नग आहेत का? मला फक्त हेएकच पाहीजे बाकीचे काहीच नाही सिंगल ऑक्सी मिटर ७८५००...

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी, श्री. दिपक पगारे:-**सर ते मॉनिटर आहेत,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**मी विचारत आहे की, आपण कोणते ऑक्सी मिटर तर आपण इथे स्पष्ट लिहा ना. हा गोषवारा पालिकेमध्ये जाणार आहे, मा. आयुक्त साहेब, जर डॉ. राजा दयानिधी, आयुक्त असे नाव आले तर आम्हांला सांगायला त्रास होतो, तर हे करेक्शन करुन घ्या.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी, श्री. दिपक पगारे:-**होय करेक्शन करुन घेऊ.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**आमच्या बददल मिडिया आम्हांला बोलत असतात.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**हे जे ठाणे सिव्हिल टेंडर करतात असे काही बॉऊन्स आहे का?

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहेत ते समजून आले नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**याच्यापेक्षा पण कमी रेटमध्ये मिळू शकते मार्केटमध्ये

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** आयुक्त साहेबांना बोलू दया.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**आपण आपले पैसे वाचवू शकतो, तर हे कशाला करायचे?

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-** मा. अध्यक्ष मोहदय, कोविड-१९ साठी आपण् तयारी करीत आहेत, त्याच्यामध्ये दोन विषय आहे, एक एखादया एजेन्सीने जर अगोदर केंद्र ओपन करुन दिले तर त्याच्या आधारे आपण त्यांना वर्क ऑर्डर देवू शकतो. दुसरे म्हणजे आपण आपल्या स्तरावरुन टेंडर काढू शकतो. जर आपल्या स्तरावर एवढया साहित्याचे टेंडर काढू शकणार असेल तर त्यासाठी वेळ खुप लागणार आहे.तर माणूस काय करतो की, एखादया शासकीय यंत्रणेने रितसिर प्रोसेस करुन त्यांना वर्क ऑर्डर दिली असेल आणि त्याच गोष्टी सुध्दा आपण करु. पण सध्या आपल्या ऑलरेडी ठाणे सिव्हिलच्या सर्जनच्या माफ्रत टेंडरींग केले आहे, त्याच्या इवनडेट आपण घेतलेली आहे. त्याच्यामध्ये आपण त्यांनाच देण्यासाठी प्रस्तावीत करीत आहे. समजा असे करायचे नसल्यास दुसरी एजेन्सीला टेंडरच्या रेटमध्ये असेल तर ते टेक्नीकली व्हॅलीड आहे का?व्हॅलीड होऊ शकतो का? हे आपल्याला चेक करता येणार आहे. परंतु एखादया गव्हर्नमेंट एजेन्सीने छाननी करुन तो जर पात्र ठरला असेल, तर ते टेक्नीकली पात्र होईल आणि त्याच्या नंतर ते फायनलसियल होईल. बाकीच्या एजेंन्सीकडून आपल्याकडे जे काही प्राप्त होत आहे, आपण शासकीय यंत्रणेमध्ये असे गृहीत धरतो की, तुमची निवड झाली असेल तर हे तांत्रिकरित्या व बाकीच्या मुददयामध्ये ते सक्षम आहेत. असे ग्राहय धरले जाते. जर समजा हे आपल्याला करायचे नसेल तर आपल्याला पुन्हा टेंडरमध्ये जावे लागेल त्याच्यासाठी वेळ लागेल. ही वस्तुस्थिती आहे. त्याच्यामध्ये मा. स्थायी समितीने विचारविनिमय करुन तुम्ही निर्णय घ्यावा. परंतु त्याच्यामध्ये मी हे ॲड करु इच्छितो की, आपल्याकडे रेग्युलर टेंडरकॉल करायचे असल्यास तर आपल्याकडे वेळ खुप लागणार आहे, आपल्याकडे सेंटर गव्हर्नमेंटची टीम येऊन गेली आहे.त्यांनी सांगितले की, आपण दुस-या एजेंन्सीला देवू शकत नाही. आपल्याला टेंडर करायला लागेल किंवा त्यांना दयायला लागेल. आपण कमिटीने सेट करावे. दुसरी एक गोष्ट जे काही साहित्य निधी लागणार आहे, २० एप्रिल २०२१ च्या ते एम.एम.आर.डी.ए. चे एक पत्र आहे.जे काही आपण खरेदी करणार आहोत, त्याचा निधी आपल्याला एम.एम.आर.डी.ए. कडून मिळेल. हॉस्पिटल उभे करण्यासाठी हा एम.एम.आर.डी.ए. चा निधी आहे आणि आपल्याकडे त्यांचे पत्र पण आले आहे. तुम्ही जे काही खरेदी करणार आहेत, वर्क ऑर्डर आम्हांला पाठवा

म्हणून आणि पैसे सुध्दा तिकडूनच येणार आहेत. माझ्या माहीती प्रमाणे एम.एम.आर.डी.ए. आपल्याला पैसे देणार नाहीत. ते त्यांनाच देणार आहेत असे माझे सांगणे आहे. आपण दोन्ही करु शकतो, त्यांना पण देवू शकतो. पण आपल्याकडे यांच्याकडू येणे योग्य होईल असे आमचे म्हणणे आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** सन्माननिय आयुक्त साहेब, तुम्ही आता सांगितले की, आपण त्यांना दयायचे ठरले आहे, प्रोसेस करायला आपल्याला एक दिड महीना लागेल. आयुक्त साहेब माझी तुम्हांला विनंती आहे. यांचे आता जसे सांगितले ना रेट संदर्भामध्ये तफावत आहे, काही लोक आम्हांला भेटले त्यांच्याशी चर्चा केली ५०० रुपये कमी रेटने दयायला तयार आहेत. मला वाटते याला आम्ही मान्यता देत आहे, पण आमची भुमिका एक आहे, याच्यामध्ये काही कमी करता येईल का? काही वाचवता येईल का? समोरचा माणूस मार्केट रेट देत असेल तर तुम्ही याची शहानिशा करा. हा कोइडचा विषय आहे, तरी तुम्ही खात्री करा. कारण समोरचा कमी रेटला दयायला तयार आहे. मागच्या वेळेसारखी परिस्थिती आम्हांला दाखवायची वेळ आली नाही पाहीजे. हे शासनाचे पैसे आहेत, त्याच्यामुळे तुम्ही लक्ष दयावे ही विनंती आहे.आयुक्तांना प्राधिकृत करुन वाटाघाटी करणेत यावे.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-** विषय क्र. २ नंबरची चर्चा चालू आहे.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, ज्याआर्थी सध्या जगभरात पसरलेल्या करोना विषाणूची लागण झाली आहे. सदर रोगाच्या प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने करोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधनात्मक कायदा, १८९७ संदर्भ क्र. ०१ अन्वये दिनांक १४ मार्च २०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनूसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महापालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम आहेत असे घोषित करण्यात आले आहे.

त्याअर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिनूचनेव्दारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने तसेच महानगरपालिका क्षेत्रात कोरोना संबंधि विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) “क” मध्ये नमूद केलेप्रमाणे कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुसऱ्या दखादया नगरपालिका प्रधिकाऱ्याच्या किंवा १ (राज्य) शासनाच्या मंजूरी, मान्यता किंवा प्रधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहीजे असे नमूद आहे.

आपत्ती व्यवस्थापण कायदा २००५ मधील कलम ५० (अ) अन्वये आपत्कालीन खरेदी व आपत्तीजन्य परीस्थिती किंवा धोक्याच्या कारणांमुळे राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राणिकरण बचाव करण्यासाठी तात्काळ तरतुद किंवा साहीत्य खरेदी करणे किंवा संसाधनांचा त्वारीत उपयोग करणे आवश्यक आहे असे नमूद आहे. तसेच आपत्कालीन खरेदी करणेसाठी संबंधित विभाग किंवा प्राधिकरणाला ते अधिकृत करुशकतात आणि आपत्कालीन परीस्थितीत निविदा मागविण्याची आवश्यक असलेली मानक प्रक्रिया माफ केलेली मानली जाईल असे नमूद आहे.

महानगरपालिका अधिनियम १९४१ कलम ३१९ नुसार शहरात कोणत्याही वेळी कोणत्याही दुधंर रोगांचा प्रार्दुभाव झाला असेल किंवा प्रार्दुभाव होण्याची भिती निर्माण झाली असेल अशा प्रसंगी किंवा कोणत्याही सांसर्गीक रोग उद्भवला असेल किंवा शहरातील गुराढोरांमध्ये त्याचा प्रार्दुभाव होण्याचा संभव असेल अशा प्रसंगी अधिनियमाच्या आणि नियमाच्या किंवा त्या वेळा अंमलात असलेल्या अन्य कोण्त्याही कायद्याच्या सामान्य तरतुदी त्या प्रयोजनासाठी अपुऱ्या आहेत असे आयुक्तांना वाटेल तर त्यास शासनाच्या मंजूरीने नियमांत विनिर्दिष्ट करण्यात आले असतील असे आणि अशा रोगाच्या प्रार्दुभाव किंवा प्रसारात प्रतिबंध करणेसाठी त्यास आवश्यक वाटतील त्या उपाययोजना करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान केले आहेत.

त्याअर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिनूचनेव्दारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.महाराष्ट्र शासनाकडील आदेशान्वये ज्या शहरात २०० पेक्षा जास्त कोविड सदृश्य रुग्ण आढळले आहे.त्या शहरात RTPCR प्रयोगशाळा स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली होती.त्यान्वये उल्हासनगर महानगरपालिकेसाठी नवीन RTPCR प्रयोगशाळा स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेने कोणार्क रेसिडेंसी, शहाड स्टेशन जवळ, उल्हासनगर-१ येथे उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेतील जनतेस २४ तास आरोग्य सेवा पुरविण्यासाठी RTPCR प्रयोगशाळा सुरु करण्यात आलेली आहे. सदर RTPCR प्रयोगशाळेसाठी लागणारी यंत्र सामग्री शासनाकडून पुरविण्यात आलेली आहे. सदर प्रयोगशाळा सुरु करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकाकडे प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने संदर्भिय पत्र क्रमांक-४ अन्वये Lab Care Plus Diagnostic Consultancy यांना मनुष्यबळ नेमणूक करणेबाबत आदेशित करण्यात आलेले आहे. उल्हासनगर शहरातील कोवीड रुग्णांचे स्वॅब नमुने तपासणीसाठी NIV व Haffkine मुंबई येथे पाठविण्यात येत होते, सदर तपासणी अहवाल दोन ते तीन दिवसांनी उपलब्ध होत असे, त्यामुळे रुग्णांवर विहित कालावधीत करता येत नव्हते व रुग्ण वाढण्याचा संभाव्य धोका अधिक होता.

सदर कोवीड -१९ ची माहामारीची परिस्थिती पाहता उल्हासनगर शहरातील कोवीड संशयित रुग्णांची स्वॅब तपासणी तात्काळ होऊन तात्काळ अहवाल प्राप्त होण्यासाठी सदर RTPCR प्रयोगशाळा सुरु करुन त्यांला ICMR ची मान्यता घेणे आवश्यक होते. याकरिता सदर लॅब तात्काळ सुरु करुन उल्हासनगर शहरातील जनतेस आरोग्य सेवा पुरविण्यासाठी खालील प्रमाणे वैद्यकीय प्रयोगशाळा साहित्य व उपकरणांची आवश्यकता होती. तसेच मा. जिल्हाधिकारी, ठाणे , मा. उपसंचालक, मुंबई मंडळ, ठाणे व मा. जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, ठाणे यांनी सदर ठिकाणी प्रत्यक्षदर्शनी भेट देवुन तेथिल कामाची पाहणी केलेली आहे.

सदरबाब ही कोव्हिड-१९ शी संबंधीत असल्याने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) “क” मध्ये नमुद केलेप्रमाणे व संदर्भिय परिपत्रक क्रमांक-३ अन्वये प्रकरण क्रमांक ३ (विशेष परिस्थितीतील खरेदी) मधील अनुक्रमांक ३.३.१ (तातडीचा खरेदी आदेश) नुसार विशेष परिस्थितीतीमध्ये तातडीच्या परिस्थितीत प्रशासकीय विभाग प्रमुख यांना रु. १ कोटी पर्यतची तातडीची खरेदी त्यांचे स्तरावरुन करता यईल. त्यानूषंगाने कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव व कोरोना रुग्णांची संख्या लक्षात घेता तसेच राज्यात व जिल्हयात सर्वत्र कडक लॉक डाऊन असताना तातडीने RTPCR प्रयोगशाळा सुरु करण्यासाठी M/s. Jha.P. Infra Pvt. Ltd या संस्थेने खालील प्रमाणे वैद्यकीय प्रयोगशाळा साहित्य व साधन सामग्री RTPCR प्रयोगशाळेस माहे ऑक्टोंबर-२०२० पासुन आज पर्यत पुरवठा केलेला आहे. संदर्भिय पत्र क्रमांक-७ अन्वये Lab Care Plus Diagnostic Consultancy या संस्थेने सदर वैद्यकीय प्रयोगशाळा साहित्य व सामग्रीचा साठा RTPCR प्रयोगशाळेत स्विकारुन त्यांचे वापराबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे तसेच मा. आयुक्त साहेब यांनी दिलेल्या निर्देशानुसार नियुक्त केलेले लॅब इनचार्ज डॉ. रिजवानी यांनी प्रत्यक्ष भेट देवुन याबाबत पाहणी कलेली आहे.

तक्ता - अ

| अ.क्र | साहित्याचे नाव | एकूण मागणी | M/s. Jha.P. Infra Pvt. Ltd |
|---|---|---|---|
| | | | |

| | | | प्रति नग दर | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | Anterooms Hanger | १० Nos. | रु. २५/- | रु. २५०/- |
| २ | Nitrile Gloves Small | ५० Box | रु. १,८००/- | रु. ९०,०००/- |
| ३ | Nitrile Gloves Medium | ५० Box | रु. १,७००/- | रु. ८५,०००/- |
| ४ | Lab. Court Aprons colour codes | ५० Piece | रु. ४५०/- | रु. २२५००/- |
| ५ | Disinfected Spray | ३०० Piece | रु. २००/- | रु. ६००००/- |
| ६ | PCR Work Station (Big) | १ Piece | रु. ९६,०००/- | रु. ९६,०००/- |
| ७ | UV Chambers | १ Piece | रु. ९०००/- | रु. ९०००/- |
| ८ | १०० % Ethonol Moliculor Grade | २० Piece | रु. १७,००/- | रु. ३४,०००/- |
| ९ | Autoclave Machine | १ Piece | रु. ५२,०००/- | रु. ५२,०००/- |
| १० | RNA Extration Kits | ९६ Kits | रु. २८१०/- | रु. २,६९,७६०/- |
| ११ | N९५ Mask | २००० Piece | रु. २६/- | रु. ५२,०००/- |
| १२ | Shoes Cover | २००० Piece | रु. १९/- | रु. ३८,०००/- |
| १३ | Head Cap | १००० Piece | रु. १.९९/- | रु. १९९०/- |
| १४ | Hand Sanitizer ५ Liter | ३५० Can | रु. ८५०/- | रु. २,९७,५००/- |
| १५ | Rubber Shoes Cover | २००० Piece | रु. १८/- | रु. ३६,०००/- |
| १६ | Triple Layer Face Mask | १०००० Piece | रु. २.९९/- | रु. २९,९००/- |
| १७ | Diluent For DNA/RNA Extraction | २० Bottel ५००ml | रु. २,८८८/- | रु. ५७,७६०/- |
| १८ | RNase Kill | २० Bottel १००ml | रु. १,८९९/- | रु.३७,९८० /- |
| १९ | Centrifuge tubes १५ml | १० Pack (Each Pack१० Piece) | रु. १,९०८/- | रु.१९,०८० /- |
| २० | Centrifuge tubes ५०ml | १० Pack (Each Pack१० Piece) | रु. २,४५०/- | रु.२४,५०० /- |
| २१ | Steam Indicator tape | १ Piece | रु. १,७८०/- | रु.१,७८० /- |
| २२ | Hi Disposable Bags (Autoclavable Bags) | १० Pack (Each Pack२०० Piece) | रु. ६,२४३/- | रु.६२,४३० /- |
| २३ | Optical Sealing Film (For Extraction Plate) | १० Pack (Each Pack१०० Piece) | रु.३२,६८१ /- | रु.३,२६,८१० /- |
| २४ | ८-Strip tubes & Optically clear flat caps | ५ Pack (Each Pack२०० Piece) | रु.७,५५२ /- | रु.३७,७६० /- |
| २५ | Nuclease Free Water ५००ml | ५०० | रु.४४.१७ /-Per ml | रु.२२,०८५/- |
| २६ | HI४ Cooler | ३ Piece | रु.९,१३१ /- | रु.२७३९३ /- |
| २७ | PCR Racks | १ Piece | रु. ४२,८९०/- | रु.४२,८९०/- |
| २८ | Micro Centrifuge racks | ५ Pack (Each Pack१ Piece) | रु.४,६१९ /- | रु.२३,०९५ /- |
| २९ | Beaker १००ml | २ Pack (Each Pack ६ | रु. ९७७/- | रु.१९५४ /- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | Piece) | | |
| ३० | PCR plate ९६ well Adhesive seal | १x१००No-२०No | रु.१७७८४.५ /- | रु.१७७८४.५ /- |
| ३१ | Wash bottle | १० Piece | रु. १,३९९/- | रु.१३,९९०/- |
| ३२ | ७०% IPA | ५ Piece (Per Piece २.५ltr) | रु. ५,३३८/- | रु.२६,६९०/- |
| ३३ | ५ml Bottel For Solution | १० Piece | रु. २,८२/- | रु.२,८२०/- |
| ३४ | Disacrd Container १.५ltr | १० Piece | रु. १,९९/- | रु.१,९९०/- |
| ३५ | Measuring Cylender १००ml Glase | ५ Piece | रु. ९००/- | रु.४,५००/- |
| ३६ | Beaker ५००ml Glase | ५ Piece | रु. ६२४/- | रु.३१२०/- |
| ३७ | Tissu Roll Longe | २००० Piece | रु.२९/- | रु.५८,०००/- |
| ३८ | Tissu Roll Shot | २००० Piece | रु.२२/- | रु.४४,०००/- |
| ३९ | Tissu Box | २००० Piece | रु.४५/- | रु.९०,०००/- |
| ४० | ७०% Ethanol | १० Can ५ltr | रु.८७०/- | रु.८,७००/- |
| ४१ | Spray Bottel | ५० Piece | रु.५०/- | रु.२,५००/- |
| ४२ | Steamer For Staff | २ Piece | रु.४८०/- | रु.९६०/- |
| ४३ | Ziplock Bag Big | ५००० Piece | रु.१२/- | रु.६०,०००/- |
| ४४ | Ziplock Bag Midum | ५००० Piece | रु.१०/- | रु.५०,०००/- |
| ४५ | Ziplock Bag Small | ५००० Piece | रु.९/- | रु.४५,०००/- |
| ४६ | Cotton Roll Long (५००mg) | ४५० Piece | रु.१६०/- | रु.७२,०००/- |
| ४७ | Cotton Roll Shot | ४५० Piece | रु.१४५/- | रु.६५,२५०/- |
| ४८ | Screw Cap vial Storege Box | २४ Box | रु.१,४५५ /- | रु.३४,९२०/- |
| ४९ | Autoclave Tape | १० Piece | रु. ८००/- | रु.८,०००/- |
| ५० | RNase Shiled | २० Piece | रु.४४२/- | रु.८,८४०/- |
| ५१ | Timer | २ Piece | रु.४५०/- | रु.९००/- |
| ५२ | Dettol Liquide (१ Ltr.) | १५० Bottel | रु.३५०/- | रु.५२,५००/- |
| ५३ | Garbage Bags Black Color Normal Big | १०००० Piece | रु. २.३०/- | रु.२३,०००/- |
| ५४ | Garbage Bags Black Color Normal Small | १०००० Piece | रु.१.६० /- | रु.१६०००/- |
| ५५ | High Disposable Bags Yellow Color | १०००० Piece | रु.१२ /- | रु.१,२०,०००/- |
| ५६ | High Disposable Bags Red Color | १०००० Piece | रु.१२/- | रु.१,२००००/- |
| ५७ | High Disposable Bags Green Color | १०००० Piece | रु.१२/- | रु.१,२००००/- |
| ५८ | High Disposable Bags Black Color | १०००० Piece | रु.१२/- | रु.१,२०,०००/- |
| ५९ | Sealing Strips | ५००० Piece | रु.३.३०/- | रु.१६,५००/- |
| ६० | Fumigation Machine | १ Piece | रु.१५०००/- | रु.१५०००/- |
| ६१ | Sleepers | २० Piece | रु. १८९ /- | रु.३७८०/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६२ | Ethanlo ८०% | १० Bottel | रु.९८० /- | रु. ९८००/- |
| ६३ | Transparent Eye Glasses | ३० Piece | रु. ९९/- | रु.२९७०/- |
| ६४ | Plates (Therofisher) | 200 Nos. | रु. ९९८६/- | रु.१९,९७,२००/- |
| ६५ | PCR Work Station (Small) | 1 Nos. | रु. १५०००/- | रु.१५०००/- |
| एकुण | | | | रु.५१,१४,१३२/- |
| १८ % GST | | | | रु.९,२०,५४४/- |
| एकुण बरीज | | | | रु.६०,३६,६७६/- |

तरी वरील प्रमाणे तक्ता-अ नुसार वैद्यकीय प्रयोगशाळा साहित्य व वैद्यकीय उपकरणांची खरेदी करिता रु.६०,३६,६७६/- (अक्षरी रुपये साठ लक्ष छत्तीस हजार सहाशे त्र्याहत्तर मात्र) एवढा खर्च झालेला आहे. सदरचा खर्च हा सन २०२१-२०२२ मधील विपरीत परिस्थिती व्यस्थापन B-२ (३) या लेखाशिर्षातुन किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधातून करण्यात यईल. त्यानुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३ (ड) च्या अधीन राहून प्रकरण ५ (२) (२) अन्वये M/s. Jha.P. Infra Pvt. Ltd यांचेकडून RTPCR प्रयोगशाळेसाठी मागणीनुसार वरील प्रमाणे तक्ता अ नुसार पुरवठा करण्यात आलेले वैद्यकीय प्रयोगशाळा साहित्य व सामग्री करीता झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी व सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती यांच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १९ दिनांक : १५/०७/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील RTPCR लॅब सुरु करण्या करीता मे.झा.पी. इन्फ्रा प्रा.लि.यांचेकडून वैद्यकीय प्रयोगशाळासाहित्य व उपकरणांची खरेदी करणेत आलेला खर्च रक्कम रु.६०,३६,६७६/- यास मान्यता देत आहे.**

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ८ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.८:-उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोरोना सेंटरवर सुरक्षेच्यादृष्टीने शासनाने स्थापन केलेल्यासुरक्षा रक्षक मंडळ, सानपाडा मुंबई, यांचेकडून४८सुरक्षारक्षक पुरविणेबाबत.**

---

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**हा विषय वेगळा आहे. आपले सुरक्षा रक्षक मंडळाकडून आपले जे कोव्हिड केंद्र निर्माण केलेले आहेत. तिथे सुरक्षा रक्षक पुरविण्यासाठी आपण अगोदर घेतलेले आहेत. आपल्याकडे ज्या दराने आहेत रु. २५,४५०/-या दराने४८लोकांना आपण घेतलेले आहेत फक्त कार्योत्तर मंजुरीसाठी आपल्याकडे सादर केले आहे, इमर्जन्सीमध्ये त्यामुळे कोव्हिड असल्यामुळे सुरक्षा रक्षकांनाआणिहे १३ मार्च, २०२१ पासून घेतलेले आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**हा विषय मागच्या वेळेस पण आला होता. डिफर केले होते.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**नाही नाही. डिफर केलेला विषय पुढे आलेला आहे. हा दुसरा आहे. अग्निशमन विभागाचा तो विषय होता. सुरक्षा रक्षक जे आहेत ४८ तात्काळ लागणार होते. कोव्हिड केंद्र जिथे निर्माण केले होते . कारण पेशन्ट आणि त्यांचे नातेवाईक आणि येणारे इतर लोक यांचा उपद्रव खुप होत होता. त्यामुळे आपण हे सुरक्षा रक्षक ठेवून त्यांना नियंत्रणात ठेवले होते.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** ठिक आहे पास.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** धन्यवाद.

**महापालिका सचिव :-**पास हा विषय सर्व संमतीने इतिवृत्ताची वाट न पाहता.

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री.दिपक सिरवानी:-सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑ **विषय क्र. ८:-उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोरोना सेंटरवर सुरक्षेच्यादृष्टीने** शासनाने स्थापन केलेल्या **सुरक्षा रक्षक मंडळ, सानपाडा मुंबई, यांचे**कडून ४८ **सुरक्षारक्षक पुरविणेबाबत.**

**प्रस्तावना**

सध्या जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणूची **दूसरी लाट** राज्यात पसरलेली आहे. सदर रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत. त्या दृष्टीने राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (**Covid**-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंध कायदा १८९७ दिनांक २३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २ , ३ व ४ मधील तरतुदीनुसार आधिसूचना निर्गमित केलेली आहे.
आणि ज्याअर्थी वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २ (१) नुसार महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात **covid**-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे घोषित करण्यात आलेली आहे.

**उल्हासनगर महानगरपालिका सुरक्षा विभागाच्या आस्थापनेवर एकुण ९६ सुरक्षा रक्षकांची पदे शासन स्त्रावर मंजुर असुन आज रोजी ४१ पदे भरलेली आहे व ५५ पदे रिक्त् आहेत. उक्त् पदापैकी २५ सुरक्षा रक्षक महनगरपालिकेच्या विविध विभागात वॉलमन , शिपाई, लिपीक म्हणुन कार्यरत अहेत व महापालिका आस्थापनेवर सुरक्षा रक्षकाचे ५५ पदे रिक्त् आहेत.**

महापालिका वैद्यकीय आरोग्य विभागाकडून कोरोना सेंटरसाठी आणि कोरोना **covid**-१९ हॉस्पिटलसाठी महापालिका **सुरक्षा विभागाद्वारे सुरक्षारक्षक मिळणे कामी सतत मागणी होत आहे.**परंतु सुरक्षा विभागाकडे सुरक्षा रक्षक मागणीपेक्षा कमी असल्याने पूर्तता करणे शक्य होत नाही. १० **को**रोना सेंटर,हॉस्पिटल/ १ तपासणी सेंटर/२ लसीकरन केंद्र आणि १ वार रूम **तसेच नव्याने ३ लसिकरण केंद्र व ६ हेल्थ्ा पोष्ट** इत्यादि ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडून **४८** सुरक्षारक्षक तात्काळ घेणे आवश्यक आहे.

**सरकारी निमसरकारी क्षेत्रे / उपक्रम/ शासकिय मंडळे, महामंडळे / महानगरपालिका/ स्थानिक स्वराज्या संस्था/ सहकारी संस्था/ शासकीय कार्यालये इत्यादींना ज्या-ज्या वेळी सुरक्षा अधिकारी/ सुरक्षा रक्षक यांची अवश्याकता असेल त्या-त्या वेळी संबंधितांनी यापुढे खाजगी अभिकरणामधून सुरक्षा अधिकारी/सुरक्षा**

**रक्षक यांची मागणी न करता शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडूनच सुरक्षा अधिकारी किंवा सुरक्षा रक्षक यांची मागणी करावी. व त्यातुनच आप-आपल्या आस्थापनेमध्ये सुरक्षा रक्षकांची नेमणूक करावी. वर नमुद ज्या संस्था यापुढे शासनाच्या सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षक घेणार नाहीत त्या संस्थामधील संबंधीत जबाबदार अधिकरी हे दंडात्ाक कारवाईस पात्र राहील, असे निर्देश आहेत.**

यापुर्वीतत्कालीन आयुक्त **यां**च्या दिनांक ८/१०/२०१३ रोजीच्या मान्यतेने तसेच मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ६६ दिनांक ३०/१२/२०१४ अन्वये महापालिका **व कार्यक्षेत्रा**चेरक्षण करण्यासाठी **शासनाने स्थापन केलेल्या** सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्या करिता) यांचेकडील २१ + १० **+ ५०** = ८१ सुरक्षा रक्षक घेण्यात आलेले **आहे.** ते सध्या महापालिका सेवेत कार्यरत **असुन त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात येत आहे**.
उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात असणाऱ्या **को**रोना सेंटर येथे आज रोजी बरेच नागरिक कोरोना **संक्रमि**त झाले असल्याने ते उपचार घेत आहेत. सदर ठिकाणी शिस्त आणि अनुशासनाचे पालन व्हावे या दृष्टीकोनातून सुरक्षा व्यवस्था असणे अत्यंत आवश्यक आहे. उल्हासनगर महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व कोरोना सेंटरमध्ये मा. आरोग्य अधिकारी उल्हासनगर महानगरपालिका यांनी **वेळोवेळी** दिलेल्या पत्रानुसार सुरक्षा रक्षकाची **२४** तास नियुक्ती करण्यासाठी महापालिका सुरक्षा विभागाकडे सतत मागणी होत आहे. मागणी पेक्षा सुरक्षा रक्षक कमी असल्यामुळे पूर्तता करणे शक्य होत नाहि परिणमी. मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्या करिता) यांचे कडून सुरक्षा रक्षक घेणे उ**चित** वाटते.

मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्या करिता) यांचे कडून घेण्यात येणाऱ्या सुरक्षा रक्षकाच्या पगारात दर दोन वर्षांनी व इतर भत्यात दर सहा महिन्यांनी वाढ होत असते. त्याप्रमाणे मूळ वेतन + विशेष भत्ता /महागाई भत्ता = किमान वेतन, नोंदीत सुरक्षा रक्षकांचा किमान वेतनावर मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन मुख्य मालकाने ४५.२५ % दराने लेव्ही देणे मुख्य मालकाला बंधनकारक आहे त्याचप्रमाणे घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता व अतिकालिक भत्ता यावर ३.२५ % दराने लेव्ही देणे मुख्य मालकाला बंधनकारक राहील. प्रति सुरक्षारक्षकास १ महिन्याकरिता २५,४५० तर **४८** सुरक्षा रक्षकांना एका महिन्याकारीता **१२,२१,६००/-** तर **४८** सुरक्षा रक्षकांना ६ महिन्याकरिता **७३,२९,६००/-** एवढा खर्च अपेक्षित आहे.

**शहरातील अलगीकरण कक्षाकरीता सुरक्षा रक्षक घेण्यासाठी आपत्ती व्ावस्थापन कायदा २००५ मधील कलम ५० व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (३) अन्वये मान्यता देण्यास हरकत नाही .**

सबब **शासनाने स्थापन केलेल्या** सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्हा) **मा.** सचिव यांचेकडून तत्काळ **४८** सुरक्षा रक्षक हे **०६** महिन्यांकरिता घेणे अपेक्षित आहे. यावर येणारा खर्च महापालिका अंदाजपत्रकातील अ. **१ (२४)** आस्थापना खर्च रोजंदारी / मानधन इत्या**दी किंवा कोव्हिड १९** या **विषाणूचा** प्रादुर्भाव**रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त् झाल्यास सदर विशेष निधीतून** खर्च करण्यासाठी **कोव्हिड महामारीचा प्रादूर्भाव लक्षात घेता** सुरक्षा सेवा आवश्यक बाब**असल्याने** कार्योत्तर मंजूरी**च्या आधिन राहून** प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे करिता **गोषवारा** मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. २०** **दिनांक : १५/०७/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारउल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोरोना सेंटरवर सुरक्षेच्यादृष्टीने**शासनाने स्थापन केलेल्या**सुरक्षा रक्षक मंडळ, सानपाडा मुंबई, यांचे**कडून४८**सुरक्षारक्षक** कोव्हिड महामारीचा प्रादर्भाव लक्षात घेता **सुरक्षा सेवा आवश्यक बाब**असल्यास**प्रशासकीय व वित्तीय मान्यतादेत आहे.**

**<u>परंतु</u>**

**सदर कामी उपायुक्त (मुख्यालय) यांची सुरक्षा रक्षक निवडून घेण्याची जबाबदारी असेल.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची** सही/—

**अनुमोदकाची** सही/—

**सर्वानुमते**

**सभापती/पीठासीन अधिकारी**

**स्थायी समिती सभा**

**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ९ वाचून दाखवितात.

---

**⇨विषय क्र.९:- उल्हासनगर-१ शहाड येथील रिजेन्सी ॲन्टेलिया येथे कोव्हिड -१९ रुग्णांच्या पार्टीशन व सिलिंग बांधणेचे कामास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणे.**

---

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**७० टक्केमध्ये कसे होणार हे काम?

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** पार्टीशियन तिथे बनवले असेल ना.

**अतिरिक्त् आयुक्त्, श्रीमती करुणा जुईकर:-**सन्माननीय सभापती महोदय, मा. आयुक्त् सर आणि सन्माननीय सदस्य, सदर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ई-टेंडर आपण केले होते सर आणि पहिल्यांदा उल्लेख केल्याप्रमाणे १९ एप्रिल ला जे शासनाचे पत्र होते आणि एम एम आर डी ए ने आपल्याला तात्काळ वर्क ऑडर दिल्या होत्या त्याशिवाय आपल्याला पैसे मिळणार नाहीत. त्याच्यामुळे हे टेंडर कमी दराचे स्विकारले आहे. पण जेवढे २६ टक्के कमी स्विकारण्याचे एवढेच कारण आहे की, तात्काळ काम सुरु होणे, कारण पार्टीशनचे काम झाल्याशिवाय आपल्याला बेड ठेवता येणार नाही, बेडला जोडणी करता येणार नाही म्हणून आम्ही स्विकारले. पण शासन निकषानुसार आपण याच्यात जास्तीचे सुरक्षा ठेव आहे ते पण आपण भरून घेतले आहे. आणि काम मुदतीत करणे ही पुर्ण जबाबदारी ठेकेदार आणि संबंधीत विभाग प्रमुखांना आपण लेखी हमीपत्र घेवून दिलेली आहे. त्यामुळे सर काम लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीने हे आपण स्विकारले आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव :-**२६ टक्के कमी आहे हे कसे काय. कसे काम करायचे.

**अतिरिक्त् आयुक्त्, श्रीमती करुणा जुईकर:-** सर आपण त्याच्याकडून दर आणि सुरक्षा बाबत दोन्ही गोष्टी लिहून घेतल्या आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**सुरक्षेसाठी काय काय घेतले आहे, एवढे बिलो काम होईल का त्याच्यापेक्षा रदद करुन टाका.

**अतिरिक्त् आयुक्त्, श्रीमती करुणा जुईकर:-** हे फक्त पार्टीशन आहे सर, हे टेंडर आपले आहे. ते लिगल शहर अभियंता सांगतील.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**विषय असा आहे की, मा. सभापतीजी, मा. अतिरिक्त आयुक्त मॅडम, उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये जेव्हा कोणताही ई निविदा होते. तेव्हा प्रत्येक निविदेमध्ये सारख्याच पध्दतीचा वापर झाला पाहिजे. कुणाचे १५ टक्के खाली गेले आहे तर आम्ही बोलतो की, काम नाही करु शकत. कुणाचे २६ टक्के मध्ये आहे तर त्यात आयुकत त्यांनी अनामत/डिपॉझिट रक्कम भरली आहे. आता हे जे पार्टीशन लागेल, ते पार्टीशन कशाचे लागणार. त्याची जाडी किती असेल, त्यात स्लायडींग किती असेल, आज मी पार्टीशन १०० रुपये फुट मध्ये करुन देतो. आणि तेच २० रुपये फुटमध्ये ही करुन देवू शकतो. कारण की त्याची साईज, काम करण्याची पध्दत, सिलिंग आहे कोणती सिलिंग असेल, या सर्व बाबींची माहिती जर त्या निविदेमध्ये असेल तर ते सांगितले पाहिजे. आणि २६ टक्के खाली तो काम कसे

करु शकतो. किंवा दुसरे लोक नाही करु शकत. हे आपले म्हणणे आहे, आपली प्रशंसा स्थायी समितीमध्ये किती वेळा आम्ही केली आहे. कमी दर असलेल्या लोकांना आपण काढून टाकले आहे की व्यवस्थित काम होणार नाही. परत कधी असे होते, लाख रुपये खर्च करण्याच्या जागेवर १ लाख १० हजार केले गेले तर काम चांगले होते. आम्ही आताच एल वन चे विषय वाचले, येथे ५० लाखा ऐवजी १० लाखाच्या वस्तु घेतल्या आहेत, न वाचता ठाण्यामध्ये एल वन आला आहे आम्ही पण एल वन ला दिले आहे. येथे आम्ही कमी दर वाल्याला नकार देतोय कारण की आम्हांला माहित आहे की, त्याच्या कामाची कोणती ही ओळख नाही. तो कोणते सिलिंग करणार, कोणते पार्टीशन करणार, जाडी किती असेल, कोणता माल वापरणार, त्याची कोणतीही माहिती येथे नाही आहे. पार्टीशन करायचे आहे. पार्टीशियन कोणीही करु शकते त्यामुळे याला रिजेक्ट केले जावे आणि परत टेंडर करण्यात यावा. तीन दिवससचे ठेवा, सात दिवसाचे ठेवा. त्यामध्ये क्वालिटी ठेवा की हे पार्टीशन कसे करायचे आहे आणि त्याची सिलिंग कोणती करायची आहे. तीन प्रकारची सिलिंग असते, एक पीओपी ची सिलिंग असते, एक वॉटर प्रुफ सिलिंग असते, हे पण तीन दर्जाचे आहेत. यासाठी शहर अभियंता, अभियंता यांना विचारा, त्याच्या दर्जाचे वर्णन करा, असा दर्जाचे आम्हांला पाहिजे व तशी निविदा काढा. आपण ३ दिवसाची नोटीस काढा आणि हे लवकरात लवकर करायचा प्रयत्न करा. औषधाने वाचणार आणि सिलिंगने मरणार.

**अतिरिक्त् आयुक्त्, श्रीमती करुणा जुईकर:-**पार्टीशनबददल देवू शकतील. लवकरात लवकर काम होण्यासाठी तांत्रिक माहिती शहर अभियंता देतील.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** सितलानीजी बोला.

**उप अभियंता, श्री. तरुण सेवकानी:-** पार्टीशन जे राहील ते पी. व्ही. सी. फिक्स राहील आणि जी सिलींग आहे ती फायबर चे आम्ही कन्सीडर केले आहे. सर्व आयटम दिले आहेत. आणि सर्व वर्णन दिले आहेत.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**परफॉम्स होईल की नाही ही शहर अभियंता यांची जबाबदारी राहील. तिसरी लाट येणार आहे म्हणून आपल्याला खुप प्रेशर आहे आणि जर का परिस्थिती तशी निर्माण झाली तर मग प्रशासनावर तुम्ही जबाबदारी टाकणार आणि प्रशासन अडचणीत येईल. तर आपण स्विकारले तर बरं होईल.

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-** आता परत दोन माहीने जाणार आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** हा रिजेक्ट करुन आयुक्तांना प्राधिकृत करा.

**आयुक्त्, डॉ. राजा दयानिधी:-** जो पर्यंत पार्टीशियन करणार नाही, तो पर्यंत ऑक्सिजन प्लांट उभारु शकत नाही.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-** याला ब्लॅक लिस्ट करुन टाका.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**ऑक्सीजन प्लांट लवकर सुरु करा असे प्रशासनाचे सक्त आदेशआहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**आमचा कोणताच उददेश नाही, पण जर कमी दरात मिळत असेल तर चांगले मिळाले पाहिजे. त्यासाठी खास अभियंता पाहिजे आहे. त्यामध्ये १० टक्क्यानंतर जसे १-१ टक्का वाढत जातो तसे १७ टक्क्यानंतर होत जातो ना डिपॉझिट.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** नंतर आपण ऑडीट करु.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**ठिक आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**त्याच्या कामाचा दर्जा चांगला असला पाहिजे. पहीली गोष्ट त्याचे पार्टीशन हे आय. एस. आय. मार्कचे असले पाहिजे, नाही तर काही तरी ते आणून टाकणार त्याची पीयुपी जी आहे सिलिंग ती वॉटर प्रुफ असले पाहिजे आणि आपल्या शहर अभियंता यांनी तपासणी करण्यापेक्षा सार्वजनिक बांधकाम विभागातील उप अभियंता किंवा शहर अभियंता यांना बोलवून वैयक्तिक तपासण्यास लावणे. कारण तो हॉस्पिटलचा विषय आहे. त्याच्या बिला संदर्भात् एम. बी. वर सितलानी जी ऐका एम. बी. वर सार्वजनिक बांधकाम विभागातील उप अभियंता किंवा शहर अभियंता यांची सही असली पाहिजे. कारण त्यांनी एकदा दर्जा १० टक्के दाखवला की एकदम चांगले होईल. मॅडम जिल्हा परिषदेच्या वर माहिती आहे ना तुम्हांला क्रास तपासणी चालते आणि इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..

**महापालिका सचिव:-** हा विषय पास झाला आहे आणि वरील अटीं व शर्तीनुसार समावेश करुन.

**काही सदस्य:-** पास, पास….

**सभापती, श्री.दिपक सिरवानी--** **सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .** 

---

☑ **विषयक्रं. ९:-उल्हासनगर-१ शहाड येथील रिजेन्सी ॲन्टेलिया येथे कोव्हिड -१९ रुग्णांच्या पार्टीशन व सिलिंग बांधणेचे कामास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणे.**

## प्रस्तावना

**उल्हासनगर-१ शहाड येथील रिजेन्सी ॲन्टेलिया येथे कोव्हिड -१९ रुग्णांच्या उपचाराकरीता पार्टीशन व सिलिंग बांधणे आवश्यक असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सदर कामाचे रुपये रु.१,१४,२९,०६३/-एवढया खर्चाचे प्राकलन तयार करुन सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्यात आली व नियमाप्रमाणे सदर कामाची निविदा प्रक्रिया करण्यात आली त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.**

**तक्ता क्र.१**

| | | |
|---|---|---|
| १. | प्राकलनीय खर्च | रु.१,१४,२९,०६३/- |
| २. | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०५/०५/२०२१ |
| ३. | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०५/०५/२०२१ ते ११/०५/२०२१ |
| ४. | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम | दिनांक ११/०५/२०२१ |
| ५. | प्रथम मुदतवाढ | - |
| ६. | द्वितीय मुदतवाढ | - |
| ७. | तृतीय मुदतवाढ | - |
| ८. | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक ११/०५/२०२१ |
| ९. | आर्थिक भाग उघडल्याचा दिनांक़ | - |
| १०. | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ८ |
| ११. | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ८ |

**सदर निविदेचा तांत्रिक भाग दिनांक ११/०५/२०२१ रोजी निविदा समिती समोर उघडण्यात आला. त्यामध्ये १)मे.ॲकॉर्ड असोशिएट्स २)मे.झा.पी. ॲन्ड कं.३)मे. महेंद्रा रीलेटर्स ॲन्ड इं. ४) मे. ए.एम. रामचंदानी ५)मे.मां भवानी कंस्ट्रक्शन ६)मे. राजेश कंस्ट्रक्शन ७) मे.रवी एंटरप्रायझेस ८) मे. साई कंस्ट्रक्शन** यांनी निविदा सादर केल्या आहेत. त्याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे :-

**तक्ता क्र.२**

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.ॲकॉर्ड असोशिएट्स | मे.झा.पी. ॲन्ड कं. | मे. महेंद्रा रीलेटर्स ॲन्ड इं. | मे. ए.एम. रामचंदानी | मे.मां भवानी कंस्ट्रक्शन | मे. राजेश कंस्ट्रक्शन | मे. रवी एंटरप्रायझेस | मे. साई कंस्ट्रक्शन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती मागील ३ वर्ष | होय | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| २. | कामाचा अनुभव मागील ३ वर्षाचे वार्षिक उत्पन्न | होय | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ३. | पॅन कार्डाची प्रत | होय | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ४. | संस्था /कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे दस्तऐवज | होय | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ५. | ई.पी.एफ. व जी.एस.टी. प्रमाणपत्र प्रत | होय | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ६. | कंत्राटदाराची निविदा भरण्याच्या सक्षमता | होय | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ७. | निविदेमध्ये दिलेल्या नमुन्यात रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे. | दुसरा लिफाफा उघडणेपुर्वी सादर करणे | दुसरा लिफाफा उघडणेपुर्वी सादर करणे | दुसरा लिफाफा उघडणेपुर्वी सादर करणे | दुसरा लिफाफा उघडणेपुर्वी सादर करणे | दुसरा लिफाफा उघडणेपुर्वी सादर करणे | दुसरा लिफाफा उघडणेपुर्वी सादर करणे | दुसरा लिफाफा उघडणेपुर्वी सादर करणे | दुसरा लिफाफा उघडणेपुर्वी सादर करणे |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक |
| ८ | कंत्राटदाराची घोषणा | होय | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ९ | पात्र/अपात्र | पात्र | पात्र | पात्र | पात्र | पात्र | पात्र | पात्र | पात्र |

**उक्त तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार निविदाकांराच्या कागदपत्रांची छाननी पुर्ण करण्यात आली. सदर छाननीत १)मे.अॅकॉर्ड असोशिएट्स २)मे.झा.पी. अॅन्ड कं.३)मे.महेंद्रा रीलेटर्स अँन्ड इं. ४) मे.ए.एम. रामचंदानी ५)मे.मां भवानी कंस्ट्रक्शन ६)मे. राजेश कंस्ट्रक्शन ७) मे.रवी एंटरप्रायझेस ८) मे. साई कंस्ट्रक्शन यांनी निविदा सादर केल्या आहेत. सर्व निविदाकार पात्र ठरले आहेत. तरी तक्ता क्र.२ मधील सर्व निविदाकार पात्र ठरत असल्याने त्यांचे निविदेचा आर्थिक भाग (Financial Bid) उघडणेस हरकत नाही.**

**तक्ता क्र.३**

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | दिलेले दर (टक्के प्रमाणे) |
|---|---|---|
| १. | मे.अॅकॉर्ड असोशिएट्स | दिलेले दर ८.०१० % टक्के कमी |
| २. | मे.झा.पी. अॅन्ड कं. | दिलेले दर १.५०० % टक्के कमी |
| ३. | मे. महेंद्रा रीलेटर्स अँन्ड इं. | दिलेले दर ७.५०० % टक्के कमी |
| ४. | मे. ए.एम. रामचंदानी | दिलेले दर २६.३२० % टक्के कमी |
| ५. | मे.मां भवानी कंस्ट्रक्शन | दिलेले दर २३.०४० % टक्के कमी |
| ६. | मे. राजेश कंस्ट्रक्शन | दिलेले दर १७.९५० % टक्के कमी |
| ७. | मे. रवी एंटरप्रायझेस | दिलेले दर ५.५०० % टक्के जास्त |
| ८. | मे. साई कंस्ट्रक्शन | दिलेले दर २६.५१० % टक्के कमी |

**वरील तक्त्यात नमुद उल्हासनगर-१ शहाड येथील रिजेन्सी अॅन्टेलिया येथे कोव्हिड -१९ रुग्णांच्या उपचाराकरीता पार्टीशन व सिलिंग बांधणे या कामाकरीता निम्न निविदाकार मे. साई कंस्ट्रक्शन यांनी २६.५१०% टक्के कमी दर सादर केले आहेत. मे. साई कंस्ट्रक्शन यांना शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि.२६ नोव्हेंबर,२०१८अन्वये लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर मे. साई कंस्ट्रक्शन यांना Performanance Security रु.३३,१४,५००/- ही रक्कम स्विकृती पत्र प्राप्त झाले पासून आठ दिवसात भरणे आवश्यक आहे.**

**महाराष्ट्रात कोव्हिड-१९, या साथीच्या रोगाची तिसरी लाट सुरू होणार असल्याने सदर काम शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार तातडीने सुरू करावयाचे**आहे.

तरी **सदर कामाकरीता निम्न दराचे मे. साई कंस्ट्रक्शन यांचेशी संविदा करणेस** मा.स्थायी समितीच्या मान्यतेकरीता सादर करणेस आदेशार्थ सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. २१ — दिनांक : १५/०७/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारउल्हासनगर-१ शहाड येथील रिजेन्सी अॅन्टेलिया येथे कोव्हिड १९ रुग्णांच्या पार्टीशनव सिलिंग** बांधणे **करीता निम्न दराने निविदाकार मे. साई कंस्ट्रक्शन यांचेशी संविदा करणेस मान्यता देत आहे.**

**तसेच**

१) **ठेकेदाराने केलेल्या कामाचा दर्जा चांगला पाहीजे.**

२) **पार्टीशन आय.एस.आय मार्कचे पाहीजे, व सिलिंग वॉटरप्रुफ असले पाहिजे,**

३) **सदर काम महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उप अभियंता यांच्या देखरेखीखाली झाले पाहीजे व महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता यांची एम. बी.वर १०टक्के स्वाक्षरी असली पाहीजे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची** सही/—

**अनुमोदकाची** सही/—

**सर्वानुमते**

**सभापती/पीठासीन अधिकारी**

**स्थायी समिती सभा**

**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १० वाचून दाखवितात.

---

➪ **विषय क्र.१०** :- कोवीड-१९ या कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी सेंच्युरी क्लब समोरील रिजन्सी अॅन्टेलिया कॉम्प्लेक्स शहाड, उल्हासनगर-१ येथे ऑक्सिजन जनरेशन प्लांट उभारणी करणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

---

**वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-**ऑक्सीजन निर्मितीचा पी.एस.एल प्लॉट आहे,तो आपल्याला अॅन्टेलियाला बसवायचे आहे. ते काम चालू आहे याचा निधी आपल्याला शासनाकडूनच मिळणार आहे. एम. एम. आर. डी. ए. तर्फे प्लांट उभारणी करुन देणार आहेत. मंजूरीसाठी सादर.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** त्यांना जे दर देत आहेत ते दर फिक्स आहेत की देणार आहेत.

**वैदयकिय आरोग्य अधिकारी,डॉ. दिपक पगारे:-**हा दर बाकी महानगरपालिकेमध्ये ही लावला आहे. हे दर शासनाकडूनच आलेले आहेत.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**म्हणजे जे आपण जे दर देतात ते शासनाकडून आलेले आहेत.

**वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-**होय.

**सदस्य, श्री राजू जग्यासी :-**ही माहीती घेण्यासाठी विचारत आहे, ठिक आहे. चेअरमन जी. बघा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** ऑक्सीजन प्लांट आपण उभारणार आहेत, नाशिक सारखी परिस्थिती निर्माण झाली नाही पाहीजे.

**वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-**हा तो प्लान्ट नाही. तयार होतील हा जो प्लान्ट आहे.

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी,:-**हा ऑक्सिजन जे आहे तो सामान्यत: आपण दोन प्रकारे वापर करतो एक असा आहे तो गॅसेस ऑक्सिजन हे वायुरुपमध्ये राहते आणि दुसरे जे आहेत ते द्रव पदार्थातील ऑक्सिजन असतात त्यानंतर आपला बाकीचा मोठा टंक असतो. आता दुस-या लाटेमध्ये ऑक्सिजनची कमतरता ब-याच ठिकाणी झाली होती. त्याच्यामध्ये एक अडचण अशी होती की, आपल्याकडे ऑक्सिजन उपलब्धच नव्हता. आता ही मशीन अशी आहे. आपले जसे ऑक्सिजनट्रान्समिटर आहे ते आपल्याकडे existing हवामधुन ऑक्सिजन काढून देतात. त्याची मोठी मॉडेल म्हणजे ते १०० बेड १५० बेड असा एक प्लान्ट आहे. तर हा पीएसए म्हणजे presser sabsoction त्यामध्ये काय करते ते चालू केल्यानंतर आपल्या वातावरणामध्ये सगळी हवा घेवून त्याच्यामधुन ऑक्सिजनला घेवून त्या ऑक्सिजनला purify करुन आपल्या पाईप लाईनला देईल आणि हे जे आहे ते आपल्याला backup आहे. म्हणजे जे आपले नेहमीचे ऑक्सिजन आहे. आपण तीथे टाकी सुध्दा बसवणार आहेत. backup मध्ये राहील म्हणजे समजा जर एखादी अपवादात्मक परिस्थिती आली त्यामध्ये आपल्याकडे ऑक्सिजन रिफिलिंग असो किंवा दुस-या कोणाकडेही उपलब्ध नसेल, तर ही मशीन चालू

केल्यास काही दिवसाकरीता ही मशीन पण ऑक्सिजन पुरवठा करु शकते. दुस-या लाटेमध्ये काय झाले होते आपल्या सगळयांकडे रिकामे सिलेंटर होते, परंतु भरण्यासाठी ऑक्सिजन नव्हते. तर आता राज्य शासनाने मोठया प्रमाणात ही अडचण टाळण्यासाठी प्रत्येक महानगरपालिकेने त्यांच्या स्तरावर आणि जिल्हा लेवलवर स्तरावर एक किंवा दोन त्यांच्या स्थायीच्या अनुषंगाने इएससी ऑक्सिजन जनरेशन प्लांट उभारणी केलेली आहे या ऑक्सिजन प्लान्टची क्षमता ९०० मीटर दर मिनिटाला आहे. जवळपास १०० ते १५० बेड त्याच्यावर आपण चालू शकतो. जो पर्यंत आपल्याकडे backup आहे. हे फक्त् बॅकपसाठी आहे. त्याच्यासाठी आपल्याला एक शेड बनवायला लागतो. त्याच्या नंतर हा मशीनला बसवावा लागतो. तर आपल्याकडे आधीच शेड बनवले आहे. ही ऑक्सिजन जनरेशन प्लांट आहे पीएससी आहे. बाकीच्या सगळया महानगरपालिकेत दोन तीन चार केलेली आहे. सध्या आपल्याकडे एक आवश्यक आहे. त्याच्यामध्ये आपल्याला एक वर्षाचा मेन्टेनस आहे.त्याच्यामध्ये आपण एक करु शकतो, दुस-या कर्मचा-याला आपण ठेवू शकतो.मेन्टेनससाठी दुस-या एजेन्सीला सप्रेट आपण नेमणूक करु शकतो.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-</u>**कधी पर्यंत होणार आहे.

**<u>आयुक्त्, डॉ. राजा दयानिधी:-</u>**आता हे शेड संपल्यानंतर फक्त मशीनरी आणून लावायची. मशीनरी त्यांच्याकडे तयार आहे. त्यांना मंजूरी देतो १५-२०मिनिटांचा वेळ मशीन बसवणेसाठी लागतो. त्याच्यासाठी सिव्हील गोष्टी महत्वाच्या होत्या क्वालिटी पुर्ण झाली आहे.

**<u>महापालिका सचिव, :-</u>**बरोबर आहे. कोणी तरी बोलावे लागेल ना.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..पास..

**<u>महापालिका सचिव:-</u>** विष्य क्र. १० पास झाला आहे. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास….

**<u>सभापती, श्री.दिपक सिरवानी:-</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे**.**

---

**☑विषय क्र.१०:—कोवीड-१९ या कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी सेंच्युरी क्लब समोरील रिजन्सी ॲन्टेलिया कॉम्प्लेक्स शहाड, उल्हासनगर-१ येथेऑक्सिजन जनरेश प्लांट उभारणी करणेबाबत चा प्रस्ताव मा.स्थायीसमितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.**

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, ज्याआर्थी सध्या जगभरात पसरलेल्या करोना विषाणूची लागण झाली आहे. सदर रोगाच्या प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने करोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधनात्मक कायदा, १८९७ संदर्भ क्र. ०१ अन्वये दिनांक १४ मार्च २०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनूसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महापालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम आहेत असे घोषित करण्यात आले आहे.

त्याअर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिनूचनेव्दारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने तसेच महानगरपालिका क्षेत्रात कोरोना संबंधि विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) "क" मध्येनमूद केलेप्रमाणे कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुसऱ्या दखादया नगरपालिका प्रधिकाऱ्याच्या किंवा १ (राज्य) शासनाच्या मंजूरी, मान्यता किंवा प्रधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहीजे असे नमूद आहे.

आपत्ती व्यवस्थापण कायदा २००५ मधील कलम ५० (अ) अन्वये आपत्कालीन खरेदी व आपत्तीजन्य परीस्थिती किंवा धोक्याच्या कारणांमुळे राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राणिकरण बचाव करण्यासाठी तात्काळ तरतुद किंवा साहीत्य खरेदी करणे किंवा संसाधनांचा त्वारीत उपयोग करणे आवश्यक आहे असे नमूद आहे. तसेच आपत्कालीन खरेदी करणेसाठी संबंधित विभाग किंवा प्राधिकरणाला ते अधिकृत करुशकतात आणि आपत्कालीन परीस्थितीत निविदा मागविण्याची आवश्यक असलेली मानक प्रक्रिया माफ केलेली मानली जाईल असे नमूद आहे.

त्याअर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिनूचनेव्दारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. या करिता सदर आजारवर मात करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात खालील प्रमाणें CCC, DCHC व DCH रुग्णालय सुरु करण्यात आलेले आहेत.

सद्यस्थितीत कोवीड-१९ ची दुसरी लाट आलेली असून रुग्ण संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ होत आहे.त्यान्वये वाढीव खाटा व ऑक्सिजनचा तुटवडा निर्माण होत आहे.याकरिता सेंच्युरी क्लब समोरील रिजन्सी अॅटेलिया कॉम्प्लेक्स शहाड, उल्हासनगर-१ या इमारती मध्ये २०० खाटांचे संपुर्ण सुविधासह DCH/DCHC कोवीड रुग्णालय सुरु करुन करोनो संक्रमित रुग्णास आरोग्य सेवा पुरविण्यात येणार आहे. सद्यस्थितीत उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत सुरु असलेल्या कोवीड रुग्णालयाकरिता प्रति दिन ६ MT ऑक्सिजनची आवश्यकता आहे. वरील प्रमाणे सेंच्युरी क्लब समोरील रिजन्सी अॅटेलिया कॉम्प्लेक्स शहाड, उल्हासनगर-१ येथे नव्याने DCHC सुरु केल्यास उल्हासनगर महानगरपालिकेस प्रतिदिन ९ MT पेक्षा जास्त ऑक्सिजनची गरज आहे. राज्यात ऑक्सिजनची वाढती मागणी व त्यानुषंगाने निर्माण झालेली टंचाई विचारात वरील प्रमाणे ९ MT साठवण क्षमता निर्माण केल्यानंतर देखिल प्रत्याक्षात ऑक्सिजन कितपत उपलब्ध होईल याबाबत साशंकता आहे. त्यामुळे ऑक्सिजन निर्मितीचा पर्याय विचारात घेणे अनिवार्य झाले आहे.

यानुषंगाने या क्षेत्रामध्ये कार्यरत असणा-या मे. टेक्नोमेट एंटरप्राईजेस, पुणे यांचेकडून सेंच्युरी क्लब समोरील अॅटेलिया कॉम्प्लेक्स शहाड, उल्हासनगर-१ या ठिकाणी ९६० लि/मि क्षमतेच्या ऑक्सिजन निर्मिती प्लान्टची उभारणी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी सदर प्लान्ट उभारणेबाबचे खालील प्रमाणे दरपत्रक सादर केले आहे. सदरचा हा प्लान्ट उभारल्यास दररोज १२७८ लिटर (सुमारे ०७ डयुरा सिलेंडर) लिक्वीड ऑक्सिजन उपलब्ध होणार आहे.

A) Cost of Onside Oxygen generation unit (Supply, Installation, Testing & Commissioning):

| Sr.no | Discription | Make/Model | No. of Unit | Unit Price Rs. |
|---|---|---|---|---|
| १ | Onsite Oxygen generator with air compressor/Refrigeration Air dryer Air Tank/Oxygen Tank Filters (Pre, After and Bacteria Filters) Oxygen Generator Sensor, Manifold system for secondary oxygen supply,<br>*to suit equivalent to १७० to २२० cylinder per day.<br>Suit for ९६० LPM. (१७२८ Ltr per day/०७ Dura Cylinder)<br>And ५७.६ cum/hr. | Trident/GO९६० | ०१. No | १,४०,००,०००/- |
| | GST १२ % | | | १६,८०,०००/- |
| **Grant Total** | | | | **१,५६,८०,०००/-** |

उपरोक्त् दरपत्रकानुसार मे.टेक्नोमेट एंटरप्राईजेस, पुणे यांना रु. १,५६,८०,०००/- एवढी रक्कम द्यावयाची आहे. मात्र सदर कामाचे कार्यादेश देत असताना त्यांनी ८० टक्के रक्कम अगाऊ मिळणे व उर्वरित २० टक्के रक्कम सदर प्लान्ट कार्यान्वित झाल्यानंतर देणे असे अटी शर्ती मध्ये नमूद केलेले आहे. त्यान्वये सदर संस्थेस उपकरणा पोटी देय रक्कम रु. १,४०,००,०००/- अधिक जीएसटी पैकी अग्रीम (८०% Advance ) या रक्कमेधून ५ % सुरक्षा अनामत रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम अग्रीमापोटी आपणास अदा करण्यात येईल. तथापी ही रक्कम देण्यापुर्वी प्रकल्पाच्या मुळ

किंमती एवढया रक्कमेची बॅक गॅरन्टी/धनादेश महानगरपालिकेकडे जमा करावे व बॅक गॅरन्टी/धनाकर्ष/धनादेश प्राप्त् झाल्यावर अॅडव्हान्स देण्यात येईल.

आपत्कालीन परिस्थिती व बाजारामध्ये ऑक्सिजनच्या उपलब्धतेची कमतरता विचारात घेता ऑक्सिजनचा साठा करण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था निर्माण करण्याची नितांत गरज निर्माण झालेली आहे. निविदा मागवुन प्रत्यक्ष कार्यस्थळावर ऑक्सिजन निर्मितीचा प्लॉन्ट उभारणे व ती व्यवस्था कार्यान्वित करण्यासाठी किमान तीन महिन्याचा कालावधी लागेल मात्र सद्यस्थितीत इतका कालावधी उपलब्ध नाही. त्यामुळे विनानिविदा वरील प्रमाण प्राप्त दरपत्रकानुसार ऑक्सिजन निर्मितीचा प्लॉन्ट झाल्यानंतर सद्याची ऑक्सिजनची कमतर्ता कमी होऊन उल्हासनगर महानगरपालिकेच्या कोवीड -१९ उपचार रुग्णालयामध्ये रुग्णांना ऑक्सिजनची चांगली सुविधा देणे शक्य होईल व यामुळे कोरोना बाधित रुग्णांचा जीव वाचु शकेल.

शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या ऑक्सिजनच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही बाबचे निर्देश कृपया विचारात घेवुन विना निविदा मे. टेक्नोमेट एंटरप्राईजेस, पुणे यांचेकडून प्रत्यक्ष कार्यस्थाळावर ऑक्सिजन निर्मिती करणारा ९६० लिटर/मिनीट (१७२८ लिटर प्रति दिन/०७ डयूरा सिलेंडर) क्षमतेचा प्लॉन्ट उभारणे व ही व्यवस्था ०१ महिन्यात कार्यान्वित करण्यासाठी व याबाबतचा निधी शासनाकडुन मागविणेसाठी प्रस्तावित करण्यात येते आहे. सदर ऑक्सिजन प्लांट उभारणी करुन कार्यान्वित करण्यासाठी रु. १,५६,८०,०००/- ऐवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधातून

करण्यासाठी व सदरचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.कोवीड-१९ या कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी सेंच्युरी क्लब समोरील रिजन्सी अॅटेलिया कॉम्प्लेक्स शहाड, उल्हासनगर-१ येथे ऑक्सिजन जनरेश प्लांट उभारणी करणेबाबत चा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. २२** **दिनांक : १५/०७/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. चंद्रशेखर यादव

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारकोवीड-१९ या कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करणेसाठी सेंच्युरी क्लब समोरील रिजन्सी ॲन्टेलिया कॉम्प्लेक्स शहाड, उल्हासनगर-१ येथे ऑक्सिजन जनरेश प्लांट उभारणेकरिता अंदाजित रक्कम रुपये१,५६,८०,०००/- यास मान्यता देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ११ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.११**.:-संभाव्य कोवीड-१९ तिस-यालाटेचाधोकालक्षातघेताप्रतिबंधात्मकउपाययोजनापुर्वतयारी करण्यासाठीउमपाचेनव्यानेसुरुकरण्यातयेणा-या DCHC/DCH रुग्णालयासाठीआवश्यक

Adult & Pediatric Ventilator Make & Model : M/s eVent Medical Ltd USA, Model : eVolution 3eहेहाफकिनबायोफार्मासिटीकलकॉर्पोरेशनलि. खरेदीकक्षयांचेकडील कार्यादेशानुसार M/s. Trivitron Health Care Pvt Ltd. यांचेकडीलमंजुरदरानुसारखरेदी करण्याकरितामा.स्थायीसमितीयांचेपुर्वमान्यतेसाठीसविनयसादर.

---

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..पास..

**वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-**हे हॅन्टीलेटर आहेत.

**काही सदस्य:-** पास, पास....

**महापालिका सचिव, :-**विषय क्र. ११हा पास झाला आहे. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री.दिपक सिरवानी-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

**☑विषय क्र.११ :—** संभाव्य कोवीड-१९ तिस-या लाटेचा धोका लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजना पुर्व तयारी करण्यासाठी उमपाचे नव्याने सुरु करण्यात येणा-या DCHC/DCH रुग्णालयासाठी आवश्यक Adult &Pediatric Ventilator Make & Model : M/s eVent Medical Ltd USA, Model : eVolution 3e हे हाफकिन बायो फार्मासिटीकल कॉर्पोरेशन लि. खरेदी कक्ष यांचेकडील कार्यादेशानुसार M/s. Trivitron Health Care Pvt Ltd. यांचेकडीलमंजुर दरानुसार खरेदी करण्याकरिता मा.स्थायी समिती यांचे पुर्व मान्यतेसाठी सविनय सादर.

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आदेशित करण्यात येते की, ज्याआर्थी सध्या जगभरात पसरलेल्या करोना विषाणूची लागण झाली आहे. सदर रोगाच्या प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने करोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधनात्मक कायदा, १८९७ संदर्भ क्र. ०१ अन्वये दिनांक १४ मार्च २०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनूसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महापालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम आहेत असे घोषित करण्यात आले आहे.

त्याअर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिनूचनेव्दारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने तसेच महानगरपालिका क्षेत्रात कोरोना संबंधि विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) "क" मध्ये नमूद केलेप्रमाणे कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अ शा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुसऱ्या एखादया नगरपालिका प्रधिकाऱ्याच्या किंवा १ (राज्य) शासनाच्या मंजूरी, मान्यता किंवा प्रधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहीजे असे नमूद आहे.

आपत्ती व्यवस्थापण कायदा २००५ मधील कलम ५० (अ) अन्वये आपत्कालीन खरेदी व आपत्तीजन्य परीस्थिती किंवा धोक्याच्या कारणांमुळे राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राणिकरण बचाव करण्यासाठी तात्काळ तरतुद किंवा साहीत्य खरेदी करणे किंवा संसाधनांचा त्वारीत उपयोग करणे आवश्यक आहे असे नमूद आहे. तसेच आपत्कालीन खरेदी करणेसाठी संबंधित विभाग किंवा प्राधिकरणाला ते अधिकृत करुशकतात आणि आपत्कालीन परीस्थितीत निविदा मागविण्याची आवश्यक असलेली मानक प्रक्रिया माफ केलेली मानली जाईल असे नमूद आहे.

त्याअर्थी उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सदर अधिसुचनेव्दारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने तात्काळ आरोग्य सेवा पुरविणे आवश्यक आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचे स्वत:चे रुग्णालय नाही व वैद्यकीय यंत्रणा उपलब्ध नाही. या करिता सदर आजारवर मात करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात उमपाचे स्वता:चे दोन नवीन रुग्णालय सुरु करणे प्रस्तावित असून सदर कोवीड कालावधीत त्याचा वापर DCHC/DCH रुग्णालय म्हणुन करण्यात येणार आहे. सदर रुग्णालयातील खाटांची मर्यादा प्रति २०० खाटा (एकुण ४०० खाटा) असून यामध्ये प्रति ३० आय.सी.यु. खाटा (एकुण ६० खाटा) आहेत.

सदर नव्याने सुरु करण्यात येणा-या कोवीड रुग्णालया अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जनतेस आरोग्य सेवा पुरविण्यात येणार आहे. कोरोना विषाणू आजाराची दुसरी लाट आलेली असून सद्यस्थितीत कोरोना बाधित रुग्णांच्या संख्येत मोठया प्रमाणावर वाढ झालेली आहे तसेच संभाव्य कोवीड-१९ तिस-या लाटेचा धोका लक्षात घेता कोवीड रुग्णांची संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरिता कोवीड रुग्णांस तात्काळ आरोग्य सेवा पुरविण्यासाठी वैद्यकीय उपकरण (**Adult & Pediatric Ventilator**) उपलब्ध असणे आवश्यक आहे.सदर वैद्यकीय उपकरण (**Adult & Pediatric Ventilator**) विहित कालावधीत तात्काळ खरेदी करणे आवश्यक आहे.याकरिता ई-निविदा प्रक्रिया केल्यास जास्तीचा कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर बाब ही कोवीड-१९ शी संबंधित असल्याने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोरोना आजारातील Mucormycosis या रोगाने पिडीत नागरिकांवर उपचार करणेसाठी **Adult & Pediatric Ventilator Make & Model: M/s eVent Medical Ltd USA, Model: eVolution 3eDCHC/DCH (Regency Antilia ) येथे बसविण्या करिता Haffkine Bio Pharmaceutical Corporation Limited Procurement Cell यांच्या कडून निश्चित केलेल्या दरा प्रमाणे (No. 4623 / Haffkine / Procurement Cell / E-3548/ Adult & Pediatric Ventilator / 2021-22 Date 07/05/2021), यांनी M/s Trivitron Healthcare Pvt ltd.** यांचेकडून संदर्भ क्र. ५ अन्वये थेट खरेदी करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**सदर Haffkine Bio Pharmaceutical Corporation Limited Procurement Cell यांच्या कडून निश्चित केलेल्या दरानुसार खालील प्रमाणे** वैद्यकीय उपकरण (**Adult & Pediatric Ventilator**) **खरेदी करिता खर्च होणे अपेक्षित आहे.**

| Sr. No. | Name of the item | Specification of item | Quantity | Unit Rate including GST (Rs.) | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| १ | **Adult & Pediatric Ventilator Make & Model : M/s eVent Medical Ltd USA**<br><br>**Model : eVolution 3e** | As per Annexure X | 10 | 11,84,960/- | 1,18,49,600/- |

तरी वरील प्रमाणे वैद्यकीय साहित्य सामग्री ही सामान्य रुग्णालय ठाणे येथित ई-निविदेत न्युनतम दर सादर करणा-या पुरवठादार/संस्थांच्या यांच्याकडुन वरील प्रमाणे मंजुर दरानुसार थेट खरेदी करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर वैद्यकीय उपकरण (**Adult & Pediatric Ventilator**)खरेदी करिता 1,18,49,600/- (अक्षरी रुपये एक कोटी अठरा लक्ष एकोनपन्नास हजार सहाशे मात्र ) ऐवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा सन २०२१-२०२२ मधील विपरीत परिस्थिती व्यस्थापन B-२(३) या लेखाशिर्षातुन किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधातून करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.संभाव्य कोवीड-१९ तिस-या लाटेचा धोका लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजना पुर्व तयारी करण्यासाठी उमपाचे नव्याने सुरु करण्यात येणा-या DCHC/DCH रुग्णालयासाठी आवश्यक Adult & Pediatric Ventilator Make & Model : M/s eVent MedicalLtd USA, Model : eVolution 3e हे हाफकिन बायो फार्मासिटीकल कॉर्पोरेशन लि. खरेदी कक्ष यांचेकडील कार्यादेशानुसार M/s. Trivitron Health Care Pvt Ltd. यांचेकडील मंजुर दरानुसार खरेदी करण्याकरिता मा.स्थायी समिती यांचे पुर्व मान्यतेसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. २३** **दिनांक : १५/०७/२०२१**

**सुचकाचे नाव :— श्री. चंद्रशेखर यादव**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके**

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारसंभाव्य कोवीड-१९ तिस-या लाटेचा धोका लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपायोजनेची पुर्व तयारी करण्यासाठी उमपातर्फे नव्याने सुरु करण्यात येणा-या C/DCH रुग्णालयासाठी आवश्यकAdult & Pediatric Ventilator Make & Model : M/s eVent Medical Ltd USA, Model : eVolution 3eहे हाफकिन बायो फार्मासिटीकल कॉर्पोरेशन लि. खरेदी कक्ष यांचेकडील कार्यादेशानुसार M/s. Trivitron Health Care Pvt Ltd. यांचेकडीलवैद्यकीय उपकरण** (**Adult & Pediatric Ventilator**)**अंजाजित खर्च रुपये 1,18,49,600/- (अक्षरी रुपये एक कोटी अठरा लक्ष एकोनपन्नास हजार सहाशे मात्र ) यासमंजुर दराने खरेदी काणेस मान्यता देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही / —

**सर्वानुमते**

सभापती / पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १२ वाचून दाखवितात.

———————————————————————————————————————————

⇨ **विषयक्र.१२.** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कोव्हिड – १९ या साथरोगाने बाधीत झालेल्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी Oxygen Concentrator Machine of १० liters capacity खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजूरीसाठी सविनय सादर.

———————————————————————————————————————————

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** याची गरज काय आता जो ऑक्सिजन प्लांट लावत आहेत आपल्याकडे सर्व ऑक्सीजन आहेत, ऑक्सिजनची कमी असेल त्याला ऑक्सिजन मशीन लावतात. आपल्याला जर ही मशीन घ्यायची असेल तर आम्ही प्रत्येक बेडला हिच मशीन घेवून ठेवू ना. कशाला ऑक्सिजन प्लांट करायचे. तस बघितले तर याची आवश्यकता नाही. करणार कुठे तर आम्ही काय.

**वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-** DCHC च्या आत पेशन्ट कधीपण अति गंभिर होउ शकतो.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :-** नाही नाही आवश्यकता आपल्याला का लागेल.

**वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-** तेच सर ऑक्सिजन जर DCHC च्या आत लागले तर DCHC...

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :-** किती बेड आहेत.

**वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-** ५६० बेड आहेत आपल्याकडे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :-** आतापर्यंत सव्वा वर्ष झाले कोरोना आपल्याकाडेआहे ते किती घेतले आहेत आपल्याजवळ.

**वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-** एक पण नाही घेतला सर.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** काहीच नाही घेतला.आम्ही तर शिफट करत होतो. पेशन्ट बरा होऊ घरी जातो त्यानंतर त्याला गरज लागली तर लावतात.

**वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-** सरकारने गाईडलाईन्स दिल्या आहेत की तुमची ऑक्सिजनची कपॅसिटी वाढवा. आपल्याला जर ऑक्सिजन नाही मिळाला. तर आपली ऑक्सिजन १५ मेट्रिक टन प्रतिदिन उपयोगात येत होता. आणि त्याच्या तीन पट वाढवून दयायचा आहे तर वापर होतो.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** सर आपले काय मत आहे.

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-** आमच्याजवळ ऑक्सिजनचा जो स्त्रोत आहे तो तीन प्रकारचा आहे. एक जम्बो सिलेंडर आहे, त्याच्यात गॅसेस आहे आणि दुसरा आमच्याजवळ लिकवीड आहे तो आम्ही टाकीमध्ये लावतो व तिसरा जो आहे तो ऑक्सिजन जनरेशन हवेतून ऑक्सिजन काढणे. पीक वेळ जेव्हा येते तेव्हा काय होते आहे आपल्याजवळ दोन बाबींची कमतरता पडते. एक आपल्याला बेडची कमतरता पडते. आपण कितीही करा. दुसरे ऑक्सिजनची कमतरता

पडते. किती पण करा. तर हे जे Oxygen Concentrator यासाठी आहे की, जर कोणाला गरज भासली तर जसे आमचा ट्रिपल सी आहे.जेथे ऑक्सिजन राहत नाही. दुसरे हॉस्पिटल आहेत जेथे ऑक्सिजन राहत नाही. आमच्याजवळ जास्त पेशन्ट आहेत. तर त्याला मॉडलेर लेवलचे ऑक्सिजन पाहिजे. ज्याचा ९२ ते ९४ यामध्ये असेल आणि ज्याला ऑक्सिजन लागतो. तेव्हा आम्ही काय करतो त्याला ताबडतोब पाईप लाईन ऑक्सिजन DCHC/ तेथे ठेवून पेशंटला लावला जातो. जोपर्यंत तो वापर करतो तोपर्यंत तो आमच्यासाठी backup साठी असतो. आणि राहीली गोष्ट ऑक्सीजन किती लागतात. बाकी काही लोकांनी डोनेट केले होते. आमच्याजवळ प्रॉपर ऑक्सिजनचा साठा नाही आहे. तर जेव्हा आमच्याजवळ हा साठा असेल तर आम्ही आणखी जास्त प्रोटेबल राहतात. ऑक्सिजन प्रोटेबलमुळे काय होईल की, आम्ही ताबडतोब घेवून जाउ शकतो. कुठेपण आणि कोणी वृध्द मनुष्य असेल जो शिफट नाही होउ शकत त्याला थोडया किमतीत ऑक्सिजन देवू शकतो. आमच्याजवळ बँकचा आम्ही असच वापर करू शकतो ज्याला पाहिजे त्याला देवू शकतो. आणि आता आम्ही जे घेतोय तो काय करत आहे खरेदीचा प्रस्ताव आम्ही मंजूरी घेवून ठेवतो. आवश्यकता भासली म्हणजे जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा त्यांना एक दिवस आधी सांगितले की, आपण देवू शकतो. म्हणजे जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा त्यांना ऑर्डर दयायची. प्रस्ताव तयार करत आहोत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>**हे जे Concentrator आहेत ते कोणत्या कंपनीचे आहेत?

**<u>वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-</u>M/s Diagnopharm** कंपनीचे आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>**बघा, यामध्ये खुप चांगल्या चांगल्या कंपनीचे Concentrator आहेत. असे तर अंबरनाथमध्ये पण बनवतात. ५० हजारापासुन ६० हजारापर्यंत कारण हे Concentrator मी स्वत: विकत घेतले आहे. यासाठी इतक्या लवकर आवश्यकता नाही.

**<u>वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-</u>** त्याची कंपनी पण त्यांनी ठरवून दिलेली आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>**ठिक आहे, तुम्ही बोलले हॉस्पिटल बनवायचे आहे खुप तात्काळ ठिक आहे बनवा, ऑक्सिजन प्लांट लावणे खुप गरजेचे आहे लावा. जोपर्यंत पार्टीशन नाही लागणार तोपर्यंत हे नाही लागायचे, लावा. हे Concentrator आज ऑर्डर दिली तर उदया लगेच मिळतो. आपल्याला किती पाहिजे आहेत मी आणून देतो. परंतु यासाठी आपण निविदा मागवा. तीन चार कंपनीची नावे लिहून करुन १५ दिवस किंवा महिना लागू दया. Oxygen Concentrator आवश्यकता नाही. पेशन्ट जेव्हा घरी जातो तेव्हा पण कामी येतो. आम्ही नंतर पॉलिसी निर्णय करु. आम्ही जेव्हा घरी जातो. कोणी मागत असेल तर आम्ही ५ दिवस ६ दिवससाठी घरी पण देणार. परंतु त्याची आपण निविदा मागवा. हे असे आम्ही नाही देवू शकत ठाणेवाल्यासारखे.

**<u>वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-</u>** जिल्हाधिकारी यांचे पत्र आहे १०० टक्के देणार आहेत.

त्यांची कंपनीसुध्दा त्यांनीच ठरवून दिलेली आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** ७९ हजार रुपये आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>**याचा दर जास्त आहे कारण मी घरी आणले होते.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** आयुक्तांनी जे जे महत्वाचे आहेत, त्यांना आम्ही मान्यता दिली आहे.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता :-</u>**निविदा मागवा सर.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** टेंडर करा सर, निविदा काढायला सांगितले आहे.

**<u>आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-</u>**वित्तीय मान्यता दिली आहे आणि टेंडर कॉल करायला सांगितले आहे.

**<u>महापालिका सचिव:-</u>**या प्रस्तावात वित्तीय मान्यता दिली आहे आणि टेंडर कॉल करायला सांगितले आहे, असे ठरावामध्ये येईल.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी--</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

☑**विषय क्र.१२ :- उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कोव्हिड—१९ या साथरोगाने बाधीत झालेल्या रुग्णांवर उपचार करयासाठी Oxygen Concentrator Machine of १० liters capacity खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजूरीसाठी सविनय सादर.**

प्रस्तावना

**कोव्हिड-१९ साथ रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने रोगाचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि. १३ मार्च २०२० पासून लागू करण्याची अधिसूचना निर्गमित केलेली आहे.**

**वरील आदेश अधिनियम व नियमानूसार महापालिका आयूक्त हे सक्षमत प्राधिकारी घोषित करुन त्यांना त्यांच्या कार्याक्षेत्रात कोव्हिड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी ज्या ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहेत त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे घेषित करण्यात आले आहे.**

**त्या अर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिसुचनेद्वारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना अनुषंगाने तसेच महानगरपालिका क्षेत्रात कोरोनासंबंधी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.**

**तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) "क" मध्ये नमुद केलेप्रमाणे कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंबा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुस-या दखादया नगरपालिका प्रधिका-याच्या किंवा १ (राज्य) शासनाच्या मंजुरी मान्यता किंवा प्रधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहीजे असे नमुद आहे.**

**आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५० (अ) अन्वये आपत्कालीन खरेदी व आपत्तीजन्य परीस्थिती किंवा धोक्याच्या कारणांमुळे राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरण बचाव करण्यासाठी तात्काळ तरतुद किंवा साहित्य खरेदी करणे किंवा संसाधनांचा त्वरीत उपयोग करणे आवश्यक आहे असे नमुद आहे. तसेच आपत्कालीन खरेदी करणेसाठी संबंधीत विभाग किंवा प्राधिकरणाला ते अधिकृत करु शकतात आणि आपत्कालीन परिस्थितीत निविदा मागविण्याची आवश्यक असलेली मानक प्रकिया माफ केलेली मानली जाईल असे नमुद आहे.**

**उपरोक्त विषयान्वये कोरोना विषाणु Covid-१९ अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोरोना आजारातील Mucormycosis या रोगाने पिडीत नागरिकांवर उपचार करणेसाठी Oxygen Concentrator Machine of १० liters capacity संदर्भिय क्र. ४ अन्वये ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचे कार्यादेश क्र. ठामपा /६४३ दि. १४/०५/२०२१ नुसार M/s Diagnopharm या संस्था कडून खरेदी करण्यासाठी सादर केलेली आहे. M/s Diagnopharm संस्थेचे दर खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | तपशिल | परिमाण | अंदाजपत्रकीय दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | Oxygen Concentrator Machine of १० liters | 100 | 79000/- | 79,00,000/- |

**उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दैनंदिन वाढण्या-या कोविड १९ ची रुग्ण संख्या विचारात घेऊन व भविष्यामध्ये Mucormycosis या रोगाने वाढणारी रुग्णसंख्या यांचा अंदाज ठरवुन तात्काळ**

**Mucormycosis च्या रुग्णांकरीता प्रभावी ठरत असलेले Oxygen Concentrator Machine of १० liters capacity, M/s Diagnopharm या संस्था कडून खरेदी करण्यासाठी सविनय सादर.**

**तरी Oxygen Concentrator Machine of १० liters capacity, M/s Diagnopharm या संस्था कडून खरेदी करण्यासाठी सविनय सादर. सदर साहित्य खरेदीकरिता जिल्हा नियोजन समिती (DPC) यांच्या कडून निधी मागणीचा प्रस्ताव रक्कम रु. 79,00,000/- तसेचसदर Oxygen Concentrator Machine of १० liters capacity, M/s Diagnopharm या कंपनी कडून खरेदी करणेकरिता मा. स्थायी समिती यांचे मंजूरीसाठी सविनय सादर.**

**स्थायी समिती ठराव क्र.२४** **दिनांकः—१५/०७/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कोव्हिड — १९ या साथरोगाने बाधीत झालेल्या रुग्णांवर उपचार करयासाठी Oxygen Concentrator Machine of १० liters capacity M/s Diagnopharmया कंपनी कडून खरेदी करणेसाठी वित्तीय मान्यता देऊन नव्याने निविदा मागविणेचे प्रशासनास निर्देश देत आहे.**

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते
सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १३ वाचून दाखवितात.

---

⇨**विषय क्र १३**:—कोवीड — १९ या कोरोना विषाणूमुळे उभ्दवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी सेंच्युरी कल्ब समोरील रिजन्सी ॲटेलिया कॉम्पलेक्स शहाड, उल्हासनगर — १ या इमारती मध्ये सुरु करण्यात येणाऱ्या २०० खाटांचे DCH/DCHC कोवीड रुगणालयामध्ये वैद्यकीय ऑक्सिजन पाईप लाईन करणे संदर्भात लघु ई-निविदा प्रसिध्द करण्याकरिता मा. स्थायी समिती यांचे पुर्व मान्यतेसाठी सविनय सादर.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..पास..

**महापालिका सचिव:-** पास. इतिवृत्ताची वाट न पहाता.

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री.दिपक सिरवानी-सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

☑ **विषय क्र.१३:-** **कोवीड – १९ या कोरोना विषाणूमुळे उभ्दवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी सेंच्युरी कल्ब समोरील रिजन्सी अॅटेलिया कॉम्पलेक्स शहाड, उल्हासनगर –१ या इमारती मध्ये सुरु करण्यात येणाऱ्या २०० खाटांचे DCH/ DCHC कोवीड रुगणालयामध्ये वैद्यकीय ऑक्सिजन पाईप लाईन करणे संदर्भात लघु ई-निविदा प्रसिध्द करण्याकरिता मा.स्थायी समिती यांचे पुर्व मान्यतेसाठी सविनय सादर.**

प्रस्तावना

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येत की, ज्याआर्थी सध्या जगभरात पसरलेल्या करोना विषाणूची लागण झाली आहे. सदर रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने करोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधनात्मक कायदा, १८९७ संदर्भ क्र. ०१ अन्वये दिनांक १४ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३ व ४ मधील तरतूदीनूसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महापालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम आहेत असे घोषित करण्यात आले आहे.

त्याअर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिनूचनेद्वारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने तसेच महानगरपाकिा क्षेत्रात कोराना संबंधि विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिलका अधिनियम १९४९चे कलम ६७ (३) "क" मध्ये नमूद केलेप्रमाणे कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिलकच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुसऱ्या एखादया नगरपालिका प्रधिकाऱ्याच्या किंवा १ (रज्य) शासनाच्या मंजूरी, मान्यता किंवा प्रधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहीजे असे नमूद आहे.

आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५० (अ) अन्वये आपत्कालीन खरेदी व आपत्तीजन्य परीस्थिती किंवा धोक्याच्या कारणांमुळे राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरण बचाव करण्यासाठी तात्काळ तरतुद किंवा साहित्य खरेदी करणे किंवा संसाधनांचा त्वरीत उपयोग करणे आवश्यक आहे असे नमुद आहे. तसेच आपत्कालीन खरेदी करणेसाठी संबंधीत विभाग किंवा प्राधिकरणाला ते अधिकृत करु शकतात आणि आपत्कालीन परिस्थितीत निविदा मागविण्याची आवश्यक असलेली मानक प्रकिया माफ केलेली मानली जाईल असे नमुद आहे.

त्याअर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिसूचनेद्वारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.या करिता सर आजारवर मात करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात खालील प्रमाणे CCC, DCHC व DCH रुग्णालय सुरु करण्यात आलेला आहोत.

सद्यस्थितीत कोवीड-१९ची दुसरी लाट आलेली असून रुग्ण संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ होत आहे.त्यान्वये वाढीव खाटा व ऑक्सिजनचा तुटवडा निर्माण होत आहे. याकरिता सेंच्युरी कल्ब समोरील रिजन्सी अॅटेलिया कॉम्प्लेक्स शहाड, उल्हासनगर -१ या इमारती मध्ये २०० खाटांचे संपुर्ण सुविधासह DCH/DCHC कोवीड रुग्णालय सुरु करुन करोनो संक्रमित रुग्णस आरेग्य सेवा पुरविण्यात येणार आहे. याकरिता नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या DCH/DCHC कोवीड रुग्णालय वैद्यकीय ऑक्सिजन पाईप लाईन

**करणे आवश्यक आहे. याकरिता संदर्भिय प९ क्रमांक -११ अन्वये मनपा ने नियुक्त केलेल्या ऑक्सिजन सल्लागार यांनी सदर नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या DCH/DCHC कोवीड रुग्णालयातील ऑक्सिजन पाईप लाईन करिता येणाऱ्या खर्चाचे प्राकलन या कार्यालयास सादर केले आहे. त्याचा तपशील पूढील प्रमाणे आहे.**

| Name of Work: Procurement of CENTRAL OXYGEN AND VACUUM SYSTEM | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Contract No: | | | | | |
| SCHEDULE OF WORK / ITEM(S)ANNEX "A" | | | | | |
| Sl.No | Description of Work / Item(s) | No. of Qty | Units | Estimated Rate | Total |
| | | | | | Rate |
| 1.00 | OXYGEN SYSTEM | | | | |
| 2.00 | SITC Of Indigenous 5 x 5 size main manifold complete with middle frame with chain for individual cylinder along with Non Return Valves for every cylinder.It should CE | 1.00 | No. | 85000.00 | 85000.00 |
| 3.00 | SITC Of Indegious , Digital Fully Automatic Control Panel for Oxygen 2100lpm,NFPA-99 standards, It should fully complies and meets NFPA-99 standards only. Country of origin certificate must be submitted. It should be UL Listed/ETL Listed.<br>It shall be dome loaded fully automatic control panel and shall have digital display.<br>Panel should be integrated with pressure gauges, regulators and control switching components inside panel. Should have digital LCD display ( LCD screen size 10incg or above ) the actual running status of bank in use. The unit should be compact and housed in a NEMA Type-1 enclosure with locking provision. It should be fully automatic type and shall switch from “Bank in Use” to “Reserve Bank” without fluctuation in the final line pressure. After the switchover, the “Reserve Bank” shall then become the “Bank in Use” and the “Bank in Use” shall become the “Reserve Bank.” The control panel includes a line gauge, two bank gauges and incorporates six LED’s: two green for “Bank in Use,” two yellow for “Bank Ready” and two red for “Bank Empty” on the front of the cabinet.<br>The manifold shall consist of two bank regulators (dome bias) used to reduce the cylinder pressure to the two line regulators which in turn controls the final line pressure.The manifold has an intermediate and line relief valve that is internally connected to a common vent port, terminating into a 1/2" FNPT pipe. The header bars shall be equipped with highpressure shutoff valves outside the cabinet to allow for emergency isolation of the header bars.<br>The header bar shall incorporate integral check valves for each station. The manifold is equipped with pressure transducers, which sends information to the main circuit board for operation of the fail-safe relay which transmits a remote signal to the master alarm or buzzer.The external shut-off valves connecting to the header bars must be ball valves capable of withstanding pressure of 3,000 psi. The manifold shall be installed in accordance with the requirements stated by NFPA 99, CGA,HTM 02-01,EN ISO 7396 1&2 ,Country of origin certificate must be submitted. It | 1.00 | No. | 175000.00 | 175000.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **should be UL Listed/ETL Listed.** | | | | |
| **4.00** | **SITC Of Indegious , 2+2 size Emergency manifold complete with middle frame with chain for individual cylinder along with Non Return Valves for every cylinder .It should CE compliance.oxygen cylinder emergency manifold with 4nos. double stage oxygen high flow regulator installed in parallel and controlled by 15mm NB full port brass ball valve duly electro plated. The construction of the emergency manifold will be similar to the oxygen manifold mention above including the middle frame.** | **1.00** | **No.** | **21000.00** | **21000.00** |
| **5.00** | **SITC Of Indegious ,Outlets SSV type- bottom loading Oxygen. NFPA ,UL Listed/ETL Listed certificate. Should fully complies with NFPA-99 standards or CGA standards. 0r HTM02-01 or BS EN ISO 7396 1&2. It should be duly USFDA or UL Listed or ETL Listed. The body shall be of 1-5/16" [33 mm] diam¬eter, one piece brass construction. For positive pressure gas services, the outlet shall be equipped with a primary and secondary check valve and the secondary check valve shall be rated at a maximum of 200 psi [1,379 kPa] in the event the primary check valve is removed for maintenance. Outlet bodies shall be gas specific by indexing each gas ser¬vice to a gas specific dual pin indexing arrangement on the respective identification module. It should have large color coded front plate shall be used for ease of gas identification and aesthetic appeal.<br>It should have one piece chromed fascia plate shall frame the outlet. With the back rough-in mounted, the outlet shall adjust from 3/8" [10 mm] to 1" [25 mm] variation in wall thickness. It should have modular design. It should have 360°** | **200** | **Nos** | **2750.00** | **550000.00** |
| **6.00** | **SITC Of Indigenous BPC Oxygen flow meter with Humidifier Bottle. 0-15 L/min standard flow rate. It should CE compliance.** | **200** | **Nos** | **1450.00** | **290000.00** |
| **7.00** | **SITC of Indegious , Oxygen High Pressure Rubber tube white color.** | **25** | **Mtr.** | **190.00** | **4750.00** |
| **8.00** | **VACUUM SYSTEM** | | | | **0.00** |
| **9.00** | **SITC Of Base Frame Mounted Indigenous Oil Lubricated Reciprocating Vacuum Pumps , Model V255 each having 34.60 cfm PD with 5 HP 3 Phase electric motor.** | **2.00** | **Nos** | **195000.00** | **390000.00** |
| **10.00** | **SITC Of Indigenous Vacuum Receiver Tank 1000 ltr.** | **1.00** | **No.** | **110000.00** | **110000.00** |
| **11.00** | **SITC Of Indigenous Vacuum Silencer** | **2.00** | **No.** | **15500.00** | **31000.00** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **12.00** | **SITC Of Indigenous ,Gas Outlets SSV type- bottom loading Vacuum. NFPA Type,UL Listed/ETL Listed certificate Should fully complies with NFPA-99 standards or CGA standards.or 0r HTM02-01 or BS EN ISO 7396 1&2.. The body shall be of 1-5/16" [33 mm] diam¬eter, one piece brass construction. For positive pressure gas services, the outlet shall be equipped with a primary and secondary check valve and the secondary check valve shall be rated at a maximum of 200 psi [1,379 kPa] in the event the primary check valve is removed for maintenance. Outlet bodies shall be gas specific by indexing each gas ser¬vice to a gas specific dual pin indexing arrangement on the respective identification module. It should have large color coded front plate shall be used for ease of gas identification and aesthetic appeal.<br>It should have one piece chromed fascia plate shall frame the outlet. With the back rough-in mounted, the outlet shall adjust from 3/8" [10 mm] to 1" [25 mm] variation in wall thickness. It should have modular design and include a gas specific 16 ga. [1.6 mm] steel mounting plate designed to permit on-site ganging of multiple outlets, in any order, on 5" [127 mm] spacing. It should be cleaned and degreased for medical gas service, factory assembled and tested. It should be Indexed to eliminate interchangeability of gas services. It** | **200** | **Nos** | **2750.00** | **550000.00** |
| **13.00** | **SITC Of Indigenous Ward Vacuum Unit with Regulator, Collection Jar of 600 ml with Bracket** | **200** | **Nos** | **2550.00** | **510000.00** |
| **14.00** | **SITC Of Indigenous ,Vacuum High Pressure Rubber tube Yellow color.** | **110** | **Mtr** | **190.00** | **20900.00** |
| **15.00** | **SITC Of Medical Grade Copper Pipes BS EN 13348:2016 BSI Kite Mark, Copper Pipes used should be solid drawn, seamless, Deoxidized phosphorus,non-arsenical, half hard, tempered and degreased, Manufactured as per BS EN 13348: 2016 in eitherR250 half hard or R290 hard Meeting the requirements as per the Medical grade Copper pipe standards.<br>Degreasing of pipe shall be such that there is less than 20mg/m2 (0.20mg/dm2 of<br>hydrocarbons on the degreased surface when tested by method specified by BS EN 13348: 2016.<br>It should also have LLOYD third party inspection of copper pipes.<br>The supplier should provide Manufacturer's Test Certificate of copper pipes for physical Properties and chemical composition.<br>Copper pipes joined by silver brazing method for copper to brass. Inert gas welding technique should be used by passing Nitrogen gas inside the copper pipes during brazing, in order toavoid carbon deposition inside the copper pipes.<br>All copper pipes and fittings like bends, Tees, reducers and straight couplings should be As per EN 1254-1.<br>Copper pipes to be fixed with walls with suitable saddles and supports after erection,<br>All the pipes should be cleaned or purged with the help of dry nitrogen gas, &Should be tested with dry Nitrogen** | | | | **0.00** |
| **16.00** | **35 mm OD x 1.2 mm thick** | **50** | **Mtrs** | **1360.00** | **68000.00** |
| **17.00** | **28 mm OD x 1 mm thick** | **50** | **Mtr** | **950.00** | **47500.00** |
| **18.00** | **22 mm OD x 1 mm thick** | **150** | **Mtr** | **720.00** | **108000.00** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **19.00** | **15 mm OD x 1 mm thick** | **400** | **Mtr** | **620.00** | **248000.00** |
| **20.00** | **12 mm OD x 0.7 mm thick** | **25** | **Mtr** | **520.00** | **13000.00** |
| **1.00** | **SITC Of Indegious ,Digital Medical Gas Area Alarm NFPA-99 standards, It should fully complies and meets NFPA-99 standards only.<br>Country of origin certificate must be submitted.<br>It should be UL Listed/ETL Listed certificate must be submitted.<br>The alarm shall be microprocessor based with a 10" screen and capable of monitoring up to 8 sensors. Sensors shall be mounted locally (in the rough-in box) by installing the copper pipe provided or mounted remotely.<br>Sensors shall be automated for gas specific detection.<br>Area alarm shall be fabricated from 18 gauge steel with a 3/8" O.D. type "K" copper pipe for connection to the service line.<br>The default set-points shall be +/- 20% variation from normal condition.<br>In the calibration mode High/Low set-points shall be adjustable by on board push buttons.<br>To view the set points and audible alarm sound level, press and hold the mute button for twenty (20) seconds.<br>The digital sensors can be mounted locally or remotely utilizing shielded twisted pair wiring up to 500 ft.<br>The sensors shall be designed to create interference barrier for increased RFI/EMI protection.<br>The LCD brightness and volume shall be field adjustable.<br>The LCD display shall be readable in poor lighting conditions.<br>Screen text shall be customizable for gas locations.<br>The sensors shall be gas specific with a DISS nut and a nipple.<br>The LCD sensors' operating range shall be the following:<br>Mid-pressure: 0-99 psi; Oxygen and Vacuum. The alarm shall conform to UL Standard 1069** | **4** | **Nos** | **24000.00** | **96000.00** |
| | **Indigenous , Isolation Valve with Indegenous Brass fittings** | | | | **0.00** |
| **22.00** | **35mm** | **4** | **Nos** | **3550.00** | **14200.00** |
| **23.00** | **28mm** | **6** | **Nos** | **2750.00** | **16500.00** |
| **24.00** | **22 MM.** | **15** | **Nos** | **2250.00** | **33750.00** |
| **25.00** | **15 mm** | **40** | **Nos** | **1750.00** | **70000.00** |
| **26.00** | **Central line connection to PSA plant** | **1** | **Nos** | **15000.00** | **15000.00** |
| **27.00** | **Central line Conection for liquid Oxygen and Vaporiser system** | **1** | **Nos** | **15000.00** | **15000.00** |
| **28.00** | **Bed Head Panel vertical with cutouts for outlet points, electrical sockets, length as per drawing** | **40** | **Nos** | **35000.00** | **1400000.00** |
| | | | | **Total** | **4882600.00** |

**वरील प्रमाणेसदर वैद्यकीय ऑक्सिजन पाईप लाईन लावण्यासाठी रु ४८,८२,६०० (अठ्ठेचाळीस लाख ब्यांऐंशी हजार सहासे) ऐवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा सन २०२१-२०२२ मधील विपरीत परिस्थिती व्यस्थापन B-२(३) या लेखाशिर्षातुन किंवा या विषणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधीतून करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. स दरबाब मा.स्थायी समिती यांचे पुर्व मान्यतेसाठी सविनय सादर.**

स्थायी समिती ठराव क्र. २५ दिनांकः—१५/०७/२०२१

सुचकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :—श्री. राजेश वदारिया

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कोवीड — १९ या कोरोना विषाणूमुळे उभ्दवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी सेंच्युरी कल्ब समोरील रिजन्सी ॲटेलिया कॉम्पलेक्स शहाड, उल्हासनगर — १ या इमारती मध्ये सुरु करण्यात येणाऱ्या २०० खाटांचे DCH/DCHC कोवीड रुगणालयामध्ये वैद्यकीय ऑक्सिजन पाईप लाईन लावण्यासाठी लघु ई-निविदा प्रसिध्दसाठी येणारे अदाजित खर्चास रुपये ४८,८२,६०० (अठ्ठेचाळीस लाख ब्याऐंशी हजार सहाशे मात्र) यास मान्यता देत आहे.**

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १४ वाचून दाखवितात.

---

**⇨विषयक्र.१४.कोविड-१९ साथरोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता कंत्राटी स्वरुपात नेमणूका केलेल्या वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या मानधनात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजूरीसाठी सविनय सादर.**

---

**वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-** कोईडची साथ सुरु होऊन एक वर्षे झालेला आहे, एक वर्षाच्या काळामध्ये मागचे वॉर्ड बॉय यांनी जे काम केलेले आहे. त्यांच्याकरीता आम्ही मानधन वाढीचा विषय आणलेला आहे. डॉक्टरर्स नर्सेस, वार्डबॉय यांनी जे काम केलेले आहे, त्यांच्या करीता आम्ही मानधन वाढीचा प्रस्ताव इथे आणलेला आहे. आता जे आपण एप्रिलमध्ये भरती केलेली आहे. डॉक्टर्स, नर्सेस आणि वार्डबॉय यांची त्यांना आपण ज्या प्रमाणे मानधन देत आहे, त्याच धर्तीवर आधी जे डॉक्टरांनी, नर्सेस आणि वार्डबॉया यांनी काम केलेल आहे, तर त्यांनाही त्या प्रमाणे देण्यात यावे म्हणून आम्ही हा प्रस्ताव आणलेला आहे.

**सदस्य, श्री. जमनुदास पुरस्वानी:-** माननीय सभापती जी, मला खुप दुख होत आहे सांगायला की, फक्त मी नाही कोणताही नगरसेवक आज वॅक्सीन जे कार्य चालू आहे कोणता पॉलिसी निर्णय नाही घेवू शकत. जेवढे पण संविधानिक पदाधिकारी बसले आहेत. महापौर, उपमहापौर, विरोधी पक्षनेता, सभागृह नेता, स्थायी समिती सभापती, यांनी पॉलिसी कोणी पॉलिसी बनविली आहे. किंवा आमच्या अधिकारी, डॉक्टर यांनी कोणती पॉलिसी विचारली आहे. वॅक्सीन कधी लावणार, रात्री १०.०० वाजल्या नंतर कुठे वॅक्सीन लावणार व कोणत्या पॉलिसी कधी कधी आम्ही फोन करतो ऑन लाईन लावणार. आणि सकाळी येत की आपण ऑफ लाईन आहे. आम्हांला वेगवेगळया संस्था सांगतात की, आज

ऑफलाईन आहे आम्हांला तर माहितच नाही. आज ऑनलाईन आहे. ५० ऑनलाईल आहे. पहिला डोस आज दुसरा डोस उदया ते आज कोणता डोस हे त्यांनाच माहित नसते. जे मनात येईल ते करतात. ८४ दिवसांनतर दुस-या डोस वाल्यांना .....लावले पाहिजे. परंतु माझ्याजवळ ९०,१०० दिवस असलेले लोक धक्के खातात. सर्व मनमानी चालली आहे. मी धन्यवाद करतो आपल्या आयुक्त साहेबांना मी छोटासा मेसेज पाठविला की आता पहिला डोस थांबवा. दुसरा डोस चालू करा. व दुस-याच दिवशी जर आपल्याजवळ दुसरा डोस लागणार दुसरा डोस असणा-यांना तर पुर्ण करा. ते एक दुस-यांच्या पायाखाली येतील. ते धक्काबुक्की खावून .... वॅक्सीन लावण्याची जबाबदारी आपली आहे. कारण की आपण त्यांना पहिला डोस लावला आहे. दुसरा डोस घेणारे सांगत आहेत की, हॉस्पीटल बंद करा जर आपल्याजवळ वॅक्सीन नाही तर. ज्या व्यक्तीला वॅक्सीन लावली जातात. आमच्या एक महिन्याचे रेकॉर्ड बघणार तर त्या एक महिन्यात वॅक्सीन लावली तर त्यांना सांगा हिशोबाने जर वॅक्सीन लावली तर २०२६ पर्यंत उल्हासनगरची वॅक्सीन पुर्ण होईल. आणि सर्व डॉक्टरांना, नर्सना खुप खुप धन्यवाद. की ५ वर्षात आपण पुर्ण केले. १००० -२००० वॅक्सीन पण लागत नाहीत. ३००० वॅक्सीन संपल्या. आज चालू झाले पहिला डोस लावला, दुसरा डोस लावला हे जे डॉक्टर येथे आलेले आहेत. वैदयकिय अधिकारी, डॉक्टर एम बी बी एस जर ऑफलाईन २०० व्यक्ती आहेत तर कोण ठरवणार कोणाला लावणार कोणाला नाही. जे लोक सकाळपासून येवून उभे राहतात. परंतु त्यांना आत नाही घेतले जात. आणि बाकी फोन येतात हा माझा नातेवाईक, हा माझा कर्मचारी, हा राजा रिजवानी पाठवला. हा पगारे साहेबांनी पाठविला. हा जमनु पुरस्वानी यांनी पाठविला. किंवा डॉ. राजा दयानिधी यांनी पाठविला आहे. हा काय प्रकार आहे. यातून एक पॉलिसी निर्णय घ्या. आम्हांला कुपन दया. ऑफलाईन वॅक्सीन असतील तर माझ्या पण ३ लोकांना लागली पाहिजे ना. लोक येवून धक्का खाणार. तर आपण कुपन पध्दत ठेवा. आज ऑनलाईनची पध्दत काय आहे. ऑफलाईन मध्ये ५०० ऑनलाईनमध्ये ५०० वॅक्सीन लावतात. तर उल्हासनगर च्या लोकांना ५० वॅक्सीन लागतात व ४५० वॅक्सीन बाहेरच्या लोकांना लावतात. आणि उल्हासनगरच्या लोकांची हीच अडचण आहे की, जेव्हा पण आम्ही ऑनलाईन चालू केले फुल दाखवत आहे. कोणी कल्याण कोणी बदलापूर

**सदस्य, श्री.भगवान भालेराव:-**तुम्ही जर ऑफ लाईन ५०० ठेवले तर ४०० उल्हासनगरचेच झाले पाहीजेत.

**सदस्य, श्री. जमनुदास पुरस्वानी:-** दया नाकुपन. आपण कूपन वाटा. आम्हांला काय तुम्ही ऑनलाईन अशी व्यवस्था करा. की उल्हासनगरच्या लोकांसाठी लावले जाईल. ऑफलाईनमध्ये असे झाले पाहिजे. आज स्थायी समिती सभापती असू दया, आज महापौर जी, आज उपमहापौरजी, खुप सारे शहरातील लोक आहेत. त्यांच्या पण अपेक्षा असतील ५ कुपन दया वॅक्सीन लावून येणार. त्यांचे काय आहे माझ्याजवळ रेकॉर्डींग आहे. माझ्याजवळ मॅसेज आहे. मी एक दिवस,दोन दिवस, तीन दिवस चार दिवस विचारले दोन जणांना पाठवायचे आहे. आज नाही परवा पाठवा. आज नाही २.०० वाजता पाठवा डॉक्टरचा शिक्का आहे आणि २.०० ते ४.०० पर्यंत धक्का खावून तो परत आला. वॅक्सीन नाही लावली. आणि फोन पण बंद आणि ४.०० वाजल्यानंतर फोन उचल्यानंतर मॅडमचे उत्तर आहे की मी मिटींगमध्ये गेली होती. अरे असे काय आहे हे. याचे लोक येणार त्याचे लोक येणार टोकन बंद करा. नाहीतर पुर्ण बंद करा. आम्ही २५ वर्षापासुन नगरसेवक आहोत. लोकांची काहीतरी अपेक्षा असेल ना. याचा अर्थ हे जे डॉक्टर व नर्स आहेत ते वेळेला कोणालाही वॅक्सीन लावून देणार आणि जे इकडचे ट्रस्टी आहेत. कुणाला नाही लावू शकत. हे अंधेर नगरी चौपट राजा सारखे काम चालू आहे. कोणतीही पॉलिसी नाही.

**सदस्या, श्रीमती कविता पंजाबी:-**जमनुभाई साहेब आपण बिलकुल बरोबर बोलत आहात. अंधेर नगरी चौपट राजा झाले आहे. खरी गोष्ट आहे.

**सदस्य, श्री. चंद्रशेखर यादव:-**मा. सभापती साहेब, जमनुजी, माझा आवाज येतोय,

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**वैद्यकीय अधिकारी ७५ वरुन १ लाख करतात एवढी मोठी वाढ.५० टक्के वाढ.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** ५० टक्के पगार वाढ आणि वॅक्सीन नाही.

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-**सन्माननिय सभापती महोदय, आपण डॉक्टर व नर्सचा दुसरा निर्णय घेतला होता आपल्याला दुस-या लाटेमध्ये आणखीन डॉक्टरची गरज पडली होती. त्यावेळेस आपण एक दोनदा भरती करण्याचा प्रयत्न केला पण आपण जो ५० हजार पगार त्यांना देतो. त्यामुळे आपल्याला चांगला प्रतीसाद मिळाला नाही. तेव्हा आपण आजूबाजूचा महानगरपालिका बघितले तेव्हा बाजुच्या महापालिकेमध्ये एम. बी. बी.एस. ला प्रत्येक महिन्याला मानधन रुपये एक लाख देतात आणि त्यानंतर बी. डी. एस. आणि नंतरच्या लोकांना ७५ हजार पण आपल्याकडे त्यास एक्सीटींग लोकांना ५० हजार देत होतो, नॉन एम बी बी एस ना. आणि एम. बी. बी. एस.ला ७५ हजार देतो. जेव्हा

आपल्याकडे दुस-या वेळेला कोरोना वाढला होता त्यामध्ये त्यांना ७५ हजार दिले होते. आता असे असताना जे जुने लोक होते ते २०-२५ वर्षे काम करत होते. ते आता पण ५० हजारवरच काम करत होते. त्याचेमध्ये त्यांचे काम एक असले तरी असले तरी नंतरच्या लोकांना रिक्युटमेंट केलेल्या लोकांना ५० हजारच पगार देत होतो.जे एच.पीमध्ये पुर्वीपासून आपल्याकडे काम करत होते ते लोक ५० हजारावर काम करीत होते.त्या वेळेस त्यांचे एक प्रमाणे त्यांना जेव्हा तीन पाळीत काम केले जाते. ते लोक ५० हजारावरच होते. तर त्यावेळेस त्यांचा एक प्रकारे डिस्टीमेंट सारखे वाटत होते म्हणून आपण अगोदर एखादा डिपॉलटी आणायचा म्हणून त्यांना पण आपण पगार वाढीचा प्रस्ताव करतो. जे काय आता समानता आणायची म्हणून त्यांना पण पगार वाढीचा आपण प्रस्ताव करतो. त्याच्यामध्ये मी आणखी पण कळवू इच्छितो काही लोकांचा लेखी निवेदन मला प्राप्त झाले होते आणि काही लोकांनी माझ्याकडे विनंती पण केली होती समजा आजूबाजूच्या एरियामध्ये नॉन एम. बी. बी. एस. ला ७५ हजार देत असेल तर आणि आपण इकडे त्यांना ५० हजार देतो. तर काही लोकांनी काम बंद करण्याच्या मुडवर होते कारण त्यांची पण ही वस्तुस्थिती आहे. एखादया एरियामध्ये सर्वांना एक सारखे होते. असे पण प्रस्तावीत केले. दुसरे आपल्याकडे तीन प्रकारचे डॉक्टर आहेत,एक आपल्याकडे कोव्हीड हॉस्पिटलमध्ये काम करणारे डॉक्टर असतात, हे पेशन्टकडे बघतात. दुसरे आपल्याकडे नागरी आरोग्य केंद्र आहे तिकडे काम करणारे कर्मचारी आहेत. त्याच्याबरोबर नॉन कोव्हीड काम करणारे कर्मचारी आहेत, म्हणजे जे पोलिओचे वॅक्सीन असो, लहान मुलांना वॅक्सीन असो, गरोदर मातांचे असो, क्षयरोगाचे लोकांचे असो आणि कुष्ठरोगाच्या लोकांचे असो असे आपल्याकडे २० ते २५ राष्ट्रीय आणि राज्याचे जेवढया आरोग्य योजना आहेत त्या योजनांचे अंमलबजावणी करण्याचे काम हे लोक करतात. तर त्यामध्ये काही लोकांना आपण वॅक्सीनची डयुटीपण लावली आहे. तर हे सगळयांच्या संदर्भात आपण असा प्रस्ताव करतोय जे लोक आपल्याकडे युनिफॉर्मलिटी आपल्याकडे काम करीत आहेत, त्या लोकांना युनी फॉर्म्लिटी दिली पाहीजे हा हेतू आहे आणि म्हणूनच मी प्रस्ताव सादर केला होता.नंतर मा. महोदयांनी आपल्याकडे वॅक्सीनचा मुददा उपस्थित केला होता. त्याच्यामध्ये मी स्पष्टीकरण देवू इच्छितो की, आपल्याकडे वॅक्सीनचे प्रमाण होतात. आपल्याकडे लोकसंख्येच्या हिशोबाने वॅक्सीन होतात. जसे आपल्या ठाणे जिल्हाच्या पॉप्युलेशनच्या तुलनेतून उल्हासनगर ची लोकसंख्या आहे ५ ते ६ टक्के जेवढे वॅक्सीन येताातठाणे जिल्हयासाठी विभागणी झाली आहे, त्यामध्ये ठाणे ग्रामीण जिल्हा आणि ६ महानगरपालिका त्या सगळयांचे लोकसंख्येच्या हिशोबाने आपल्याकडे वॅक्सीन होते जे प्रमाण आपल्याकडे येत आहे त्याच्यामध्ये आपण जास्तीत जास्त लोकांना दयायचा प्रयत्न करतो. हे ही आपल्याला मान्य करावे लागेल की, प्रत्येक वेळेला जे लोक सर्वांना वॅक्सीनसाठी जातात त्यांना कधी कधी वॅक्सीन मिळतात कधी कधी वॅक्सीन मिळत नाही. ही वस्तुस्थिती आहे, पण आपल्याकडे साठा कमी असल्यामुळे ही अडचण येते. दुसरे जेव्हा ऑनलाईन आणि ऑफलाईनचा मुददा आहे, मागील काही दिवसांमध्ये काही माहिती आपण काढलेली आहे. जेव्हा ऑनलाईनमध्ये तुम्ही अर्ज करताना दोन गोष्टी होतात एक तुम्ही उल्हासनगरचे रहिवासी आहेत. परंतु तुम्हांला उल्हासनगरच्या वॅक्सीन केंद्रात भेटू शकत नाही. यामध्ये तुम्हांला पर्याय आहे की उल्हासनगर व्यतिरिक्त सुध्दा तुम्हांला वॅक्सीन मिळू शकते स्लॉट आला की तुम्हांला वॅक्सीन मिळू शकते. जसे बाकीचे लोक उल्हासनगर मध्ये येवून त्यांना ऑनलाईनमध्ये स्लॉट भेटते तसेच उल्हासनगर शहराच्या लोकांना सुध्दा नॉन उल्हासनगरमध्ये स्लॉट भेटतील. काही लोकांना कल्याणमध्ये, काही लोकांना मुरबाडमध्ये, काही लोकांना बीएमसी मध्ये भेटतात. ही ऑनलाईन पध्दत अशी आहे की, कोणी कुठे पण जावू शकतो. डेटाच्या हिशोबाने जेवढे ऑनलाईन केलेले आहे किमान आपल्याकडे ६० ते ७० टक्के लोकांना उल्हासनगरच्या रहिवासी लोकांना वॅक्सीन देण्यात आलेली आहे. आता राहीला प्रश्न ऑफलाईन वॅक्सीनबददल, ऑफलाईन वॅक्सीन करताना आपण समान्यत: आपल्याकडे वॅक्सीनची मागणी जास्त असल्याने, आणि आपल्याकडे पुरवठा कमी असल्याने आपण ऑफलाईन मध्ये किती टोकन दयायचे आहे त्याच्या नियंत्रण ठेवणे थोडे कठीण होणार आहे. म्हणूनच आपण ऑनलाईनला घेतले होते. परंतु मधल्या काळात ब-यापैकी वॅक्सीन दिल्या होत्या जसे की, आठवडयातून एक दिवस संपुर्णपणे ऑफलाईन. त्यानंतर ५० टक्के ऑफलाईन आणि ५० टक्के ऑनलाईन काही मेजरस्टेप आपण घेत होतो. परंतु संपुर्ण ऑफलाईन करण्यामध्ये आपल्याकडे ही अडचण होत आहे की, आपल्याकडे जेव्हा तुम्ही एखादा प्रौढ एखादे केंद्र तुम्ही ऑफलाईन मधून जाहिर केले असेल तर त्या केंद्रच्या बाजूलाच जी गर्दी आहे ती टाळताना खुप अडचणी निर्माण होतात. त्यामध्ये आपल्याला शारीरिकअंतराचे पालन होत नाही. म्हणूनच आपल्याकडे ऑफलाईन थोडे कमी केले आहे. परंतु येणा-या दिवसामध्ये जसे आपल्याकडे वॅक्सीनच्या साठयात वाढ होईल. त्याच्यामध्ये आपण टप्प्या-टप्प्यामध्ये सुध्दा आपण ऑफ लाईनच्या संख्या वाढवणार आहेत. आता नंतरचा प्रश्न कोणाला पहिला डोस दुसरा डोस वगैरे सामान्यत: आपल्याकडे जे निर्देश वरुन येतात. किंवा कोणा कोणाला दयायचे आहे, ते आपल्याला संध्याकाळी निर्देश मिळतात. प्रत्येक दिवसाचा दिवस संपल्यानंतर म्हणूनच आपण संबंधीत लोकांना कळवतो. आता हे मान्य आहे की काय, ते खुलासा विवरण कधी कधी उशीरा येतो. परंतु उदा. जसे आपण शासनाच्या निर्देशानुसार आपण एक दिवशी जे परदेशी जाणारी मुले आहेत त्यांच्यासाठी आपण एक सेशन घेतले होते, त्याच्यानंतर तृतीय पंथाचे जे लोक आहेत तशी एक सुचना आली होती की त्यांचे एक सेशन घ्या. हे मान्य आहे की, आपल्याकडे साठा

नसल्यामुळे जसा आपल्याकडे साठा वाढणार त्याप्रमाणे आपण लोकांना वाढण्याची शक्यता आहे. चौथा खाजगी हॉस्पिटला एक दोन खाजगी हॉस्पिटलला सुध्दा वॅक्सीन देण्यासाठी आपण परवानगी दिलेली आहे. परंतु त्यांच्याकडे सुध्दा वॅक्सीनचा साठा उपलब्ध नसल्यामुळे ते पण खरेदीसाठी आपण देणार आहे. कमी असल्यामुळे बाकीच्या महापालिकेत काही मोठ-मोठी खाजगी हॉस्पिटल आहेत स्वखर्चातून वॅक्सीनचा खरेदी केले आणि जे शासनाचा दर आहे त्याच्या हिशोबाने लोकांना देणे सुरु केले. परंतु आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेने काय केले, कोणत्याही खाजगी हॉस्पिटलच्या मार्फत वॅक्सीलेशन होत नसल्यामुळे सगळे जे वॅक्सीनचे ताण आहे. ते महापालिकेवरच पडले आहे. हया सगळया अडचणीमुळे आपण करु शकलो नाही. परंतु सन्माननीय नगरसेवक महोदयांनी जे जे काही मुददे उपस्थित केले आहेत ती  वस्तुस्थिती आहे. ते आपल्याला मान्यच करावे लागेल. परंतु आणखीन आपल्याला करायचे आहे.प्रयत्न करतोय. धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव :-</u>** आता आपण सांगितले की, आपल्याकडे माणसे नाहीत. आता कोव्हीडची परिस्थिती एवढी वाईट नाही. आपल्याकडे एवढे डॉक्टर तुम्ही दाखवले एवढे डॉक्टर भरपुर आहेत जर तुम्ही नाही नाही ही जवळजवळ ३७ डॉक्टर आहेत. तुम्ही जो गोषवारा दिला आहे, त्यामध्ये बीएचए एमएस आणि बीएएमएस दिले आहे त्यांना ५० व ७५ हजार तर खालील तक्त्यामध्ये तुम्ही दिले आहे की, बीडीएस डॉक्टरांना ५० ते ५५ हजार दिले आहेत, नक्की काय.

**<u>आयुक्त, डॉ. राजा दयानिधी</u>** :- डॉक्टरांमध्ये दोन प्रकारचे डॉक्टर आहेत एक जे पेशन्टच्या संपर्कात येवून काम करणारे ते आपल्याकडे हेल्थ पोस्टचे डॉक्टर असतील, अम्ब्युलंसमध्ये बसणारे डॉक्टर असतील, आणि आपल्या कोव्हीड केंद्रात बसणारे डॉक्टर असतील, हे सर्व पेशन्टची काळजी घेतात. त्यांना इंजेक्शन दयायचे असो, त्यांचे परिक्षण करावयाचे असो ते लोक, आता दुस-या प्रकारचे वार रुममध्ये बसलेले लोक पेशन्टच्या संपर्कात येत नाही. ते फोन करतात. त्यांचा कमी धोका आहे. ते समक्ष पेशन्टच्या संपर्कात येत नाहीत. म्हणूनच समजा बाकीच्या महापालिकेमध्ये सुध्दा वार रुमच्या लोकांना पण समान सारखीचा पगार देतात.तरी पण जास्त धोका नाही नाममात्र वाढीव पगार देत आहोत हे वार रुम साठीचे झाले. त्याच्यामध्ये आपण स्वातंत्रय आहे. समजा एखादयाला सांगु शकतो की, एखादयाला तुम्हांला पेशन्ट केअर मध्ये जायचे असेल तर तुम्ही जावू शकता. परंतु  ब-यापैकी हे जे वॉर रुम मध्ये काम करणारे डॉक्टर सुरुवातीपासून जेव्हा घेतानाच असे सांगितले आहे आम्ही पेशन्टच्या संपर्कात येणार नाही. आम्ही पेशन्टला बघत नाही म्हणून त्यांचे कमी केले. आवश्यकता आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव :-</u>** आता ...

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी :-</u>** वॅक्सीनचा विषय तर आपण सांगितला परंतु काही समाधान त्यातुन मिळाले नाही. एक सेंकद, मी काही सुचवू इच्छितो की, जे ऑनलाईन आम्ही करत आहोत यामध्ये आपण असे नाही करु शकत का, ऑनलाईन केवळ उल्हासनगरचे लोकच येवू शकतील. असे पॉसिबल नाही का

**<u>आयुक्त, डॉ. राजा दयानिधी</u>** :- नाही.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी :-</u>** असे शक्‌य नाही. ठिक आहे.

**<u>आयुक्त, डॉ. राजा दयानिधी</u>** :- मी दिल्लीमध्ये आहे आणि मी उदया मुंबईला जात आहे. माझे मुंबईमध्ये वॅक्सीन आहे तर दिल्लीचा नागरीक असताना, सुध्दा मी मुंबईमध्ये माझे स्लॉट नोंदवू शकतो. परंतु माझ्याकडे एक प्रस्ताव आला होता, त्यामध्ये आपण हया कोव्हीड पोर्टलचा लिंक करुन माझ्याकडे एक-दोन लोक हे स्फॉटवेअरचे लोक आले होते. ते म्हणाले की, साहेब आपण त्याच्यामध्ये फक्त उल्हासनगरच्या लोकांसाठी आपण वेगळे ऑनलाईन सिस्टीम करु. सध्यातरी आपण टोकन असे देत आहोत ऑफलाईनमध्ये. जेव्हा आपण हे करणार आहेत शारिरीक म्हणजे ऑफलाईन करतेवेळेस फक्त उल्हासनगर शहरातील लोकांसाठी एक वेगळे पोर्टल तयार करु. ज्या दिवशी आपण संपुर्ण लोकांना ऑफलाईन देणार आहोत. त्यादिवशी त्यांना तरी बुक केले तर त्यांना कोव्हीडमधून काही लिंक करु शकतो का. असे एक-दोन प्रस्ताव माझ्याकडे आलेले आहेत. तर मी विचार करतो होत असेल तर आमच्या नियंत्रणात होत असेल तर आपण नक्की करु. मी तुम्हांला सांगतो यासाठी पण जेव्हा स्लॉट जास्त वेळ राहत नाही कारण सगळे लोक शहरातील असो बाकीचे लोक असतील ते लोक त्या वेळेत ते पोर्टल उघडूनच ठेवतात.

**<u>आयुक्त, डॉ. राजा दयानिधी</u>** :- ते आम्ही करतोय.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी :-**एक दिवस दिव्यांग लोक असो, विदेशात जाणारे लोक असो, १८ वर्षावरील अशी वर्गवारी करा. त्यांच्यासाठी कायम स्वरुपी एक केंद्र ठेवा म्हणजे गर्दी पण होणार नाही. आणि त्या लोकांचा त्रास पण कमी होईल. खुप गरजेचे आहे सर हे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव :-** राजू भाईंच्या सुचना चांगल्या आहेत. तर हा विषय पास झाला.

**सदस्य, श्री. जमनुदास पुरस्वानी :-** अरे असं कस पास झाला. अरे बाबा वाढवायचे आहेत, पण काही नियम असेल.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव :-**आवश्यकता आहे, कोणता नियम असतो, अरे नियमात दिले आहे.

**सदस्य, श्री. जमनुदास पुरस्वानी :-** २० टक्के वाढवायचे आहे.

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी** :- एमबीबीएस डॉक्टर काम करत होते. मागच्या वेळेस कमी लोक होते २५ हजार मध्ये घेतले होते. त्यांना आम्ही १ लाख रुपये दिले होते. पहिलेच आपण २५ हजार वाढवले आहे. जुने लोक होते आपल्याला सर्वांना माहिती आहे. तिसरा परदेशात जाणा-या लोकांसाठी दररोज नाही करु शकत. म्हणून त्यांचा पहिला डोस साठी आम्ही घेतले होते. तर सर्व लोकांसाठी दुसरा डोस आम्ही १ किंवा २ महिन्यांनी देणार आहोत. मध्येच काही लोक आलेले आहेत. तर आम्ही एक काम करु शकतो कारण की व्हिसा, पासपोर्ट चेक करुन त्यांना पहिला डोस देवू. परंतु आपल्या सन्माननीय नगरसेवक यांनी सांगितले कोणी परदेशात जाणारे लोक आहेत त्यांचा पहिला डोस चुकला आहे. म्हणजे त्यादिवशी ते नाही येवू शकले. आमच्या जवळ १०० लोकांची यादी तयार होत असेल तर त्यांच्यासाठी आम्ही पहिला डोससाठी सेक्शन ठेवू शकतो. समजा, आमच्या डेटा आहे एक बॉटलमध्ये १० लोकांना देवू शकतो. आणि आपल्याला माहित झाले की आपल्याकडे ३० लोक आहेत त्या हिशोबाने तयारी करुन ठेवू शकतो.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी, श्रीम. अनिता सपकाळे:-** Emergency असेल .कोणाला हॉस्पीटलमध्ये किंवा कोणाला परदेशात जायचे असेल, नोकरीसाठी आणि विदयार्थ्यांसाठी जसे सर म्हणतात ते बरोबर आहे. १५ टक्के आपण सेक्शन नाही लावू शकत. मग कदाचित आम्हांला असे सांगितले की Emergency असेल, ऑफलाईन लोक उपलब्ध असतील त्यांना आपण तिथे पण एक-एक दोन दोन डोस दिले ना सर,दिले आहेत.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** परदेशात जाणा-यांसाठी आपण तर सर्व लोकांसाठी दुसरा डोस आम्ही दोन किंवा तीन महिन्यानंतरच करु शकतो.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी, श्रीम. अनिता सपकाळे:-**परंतु आपण ज्यांना परदेशात जायचे आहे. दुस-या डोस साठी मार्गदर्शनच नाही. ज्यांना लवकर जायचे आहे.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**बोलत नाही, अंबरनाथ नगरपालिकेमध्ये कायम स्वरुपी डोस ठेवले आहे. तिथे दिव्यांग, परदेशात जाणारे किंवा १८ वर्षावरील सगळयांना थेट जावून वॅक्सीन घेतात.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी, श्रीम. अनिता सपकाळे:-**सर आपण १० ऑफलाईन ठेवतो ना सर ते खरच त्यासाठीच असतात.

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी**:- राजू भाई शक्य झाले तर, सर चला आपण बघून घेवू.

**सदस्य, श्री. जमनुदास पुरस्वानी:-**दुस-या डोससाठी आपण बोलत आहात की माझ्याकडे एक दिवस कोणताही केंद्र दया, एक व्यक्ती पण गेटजवळ मिळाला तर मी नगरसेवक पद सोडून देईन. आपण काय करता २०० लोक येतात तर २०० लोकांना कुपन दया. दुसरा डोस वाल्यांना लवकर पुर्ण करा. दुस-या डोससाठी तयारी करा, सेंकड डोस मिळाले नाहीत, लोक इकडे तिकडे भटकत आहेत.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी, श्रीम. अनिता सपकाळे:-**फस्ट्र डोसचा इश्यु नाही, सेकंन्ड, आपल्याकडे सेंटर आहेत ते डायरेक्ट जावू शकतात.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** आमचे एकच म्हणणे आहे आता तुम्ही बोलताय सगळयात जास्त बोलायला लागले आहात. जवळ जवळ ८१ नगरसेवक आपल्याकडे आहेत. ८१ नगरसेवकांना कमीत कमी तुम्ही किती देणार आहात.

माहितीच मिळत नाही. आम्ही आज कुठल्या केंद्रावर जावून चेक करायचे. आज कुठल्या याच्यावर किती ऑफलाईन आहे. कशावर टाकले आहे. विभाग प्रमुखांच्या ग्रुपवर टाकले आहे का. आम्ही नाहीत तेथे.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी, श्रीम. अनिता सपकाळे:-** आम्ही त्यांना कुंपन देत असतो.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** प्रत्येक नगरसेवक, पदाधिकारी जवळ जवळ ८१ नगरसेवकांना किती देणार आहेत. तर एका नगरसेवकाला पाच-पाच माणसे दिली पाहीजेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** टोकन सिस्टीम चालू करा.

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-** ठिक आहे, टोकन सिस्टीम.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी, श्रीम. अनिता सपकाळे:-**सर काल पासूनच आपण ऑफ लाईन करीत आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव :-**आठवडयामध्ये एक-दोन दिवस केले तरी चालेल, पास..

**महापालिका सचिव :-**पास. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री.दिपक सिरवानी-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

**☑विषय क्र.१४ :- कोविड-१९ साथरोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता कंत्राटी स्वरुपात नेमणूका केलेल्या वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या मानधनात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजूरीसाठी सविनय सादर.**

प्रस्तावना

**उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील कोविड-१९ बाधित रुग्णाच्या उपचाराकरीता महानगरपालिकेमार्फत कोविड-१९ रुग्णालये (DCH) तयार करण्यात आलेले आहेत. सदर रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी, जी.एन.एम., ए.एन.एम व वॉर्ड बॉय यांची तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करुन त्यांच्यामार्फत कोविड-१९ हा साथरोग नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.**

**तथापि, कोविड-१९ च्या दुसऱ्या लाटेत रुग्ण संख्यात प्रंचड प्रमाणात वाढ झाल्याने वरील पदाची वैद्यकीय आरोग्य विभागास अत्यंत गरज भासली. त्यामुळे महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागात काम करण्यास अधिकारी/कर्मचारी इच्छुक/तयार होण्यासाठी त्यांना इतर महानगरपालिका प्रमाणे मानधनात वाढ करणे तथा इतर महानगरपालिकाप्रमाणे मानधन देणे आवश्यक होते.**

**तसेच, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी दिलेल्या मानधनावरील जाहिरातीस कमी प्रतिसाद मिळाल्याने नवी मुंबई महानगरपालिका, यांनी दिलेल्या मानधनानुसार कंत्राटी पध्दतीने पद भरणा करण्यासाठी दिनांक ८/४/२०२१ रोजी जाहिरात प्रसिध्द करुन थेट मुलाखत आयोजित करण्यात आली. सदर जाहिरातीस प्रचंड प्रतिसाद मिळून मुलाखतीमध्ये वैद्यकीय अधिकारी, जी.एन.एम., ए.एन.एम प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषधनिर्माता व वॉर्ड बॉय या पदासाठीच्या पात्र उमेदवारांना तात्काळ तात्पुरत्या स्वरुपात अटी व शतीच्या आधिन राहून थेट नियुक्ती देऊन वैद्यकीय आरोग्य विभागात हजर करुन घेण्यात आलेले आहेत.**

**वरील प्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेता प्रत्यक्ष कोविड-१९ रुग्णांच्या कार्यरत वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांना तक्ता "अ" प्रमाणे व वॉररुम मध्ये कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांना तक्ता "ब" प्रमाणे मानधन दिनांक १५ एप्रिल, २०२१ पासून लागू करण्याचे मा. स्थायी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.**

**तक्ता "अ"**

| अ.क्र. | पदनाम | जुने मानधन | नविन (सुधारीत) मानधन |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी, एम.बी.बी.एस | ७५,०००/- | १,००,०००/- |
| २ | वैद्यकीय अधिकारी, आयुष/ बी.डी.एस./ बी.एच.एम.एस./ बी.ए.एम.एस. | ५०,०००/- | ७५,०००/- |
| ३ | स्टाफ नर्स ( जी.एन.एम) | ३०,०००/- | ४५,०००- |
| ४ | ए.एन.एम. | २५,०००/- | ३५,०००/- |
| ५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | - | ३०,०००/- |
| ६ | औषध निर्माता | - | ३०,०००/- |
| ७ | कक्ष सेवक (वॉर्ड बॉय) | १८,०००/- | २०,०००/- |

**तक्ता "ब"**

| अ.क्र. | वाररुमध्ये कार्यरत वैद्यकीय अधिकारी | जुने मानधन | नविन (सुधारीत) मानधन |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी, बीडीएस | रुपये ५०,०००/- | ५५,०००/- |

**तरी, वरील प्रमाणे मानधनकंत्राटी स्वरुपात नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजूरीसाठी सविनय सादर.**

स्थायी समिति ठराव क्र. २६ — दिनांकः—१५/०७/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. चंद्रशेखर यादव

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार**कोविड-१९ साथरोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता कंत्राटी स्वरुपात नेमणूका केलेल्या वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या मानधनात वाढ करणेस मान्यता देत आहे.**

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १५ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.१५.**:- कोविड-१९ साथरोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता कंत्राटी स्वरुपात नेमणूका केलेल्या वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या मानधनात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजूरीसाठी सविनय सादर.

---

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>**मुदतवाढ देणेस टेक्नीकल प्रॉब्लेम येऊ शकतो, त्यामुळे नविन भरतीची प्रोसेस सुरु करा.

**<u>वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-</u>** आपण त्यांना एक दिवसाचा खंड देऊन आपण करु शकतो.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>**मी सांगतो याबाबत यांना कंटीन्यु करु नका याला मान्यता देत नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:-</u>**मा. सभापतीजी या विषयाबाबत मी काही बोलू इच्छितो.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>**मी या विषयाबाबत टेंडरबाबत १९९७-१९९८ मध्ये नंतर आम्ही भरती चालू केली. नाला सफाई कामगारांना ३० दिवस सफाई कामगार ज्यांना आपण घेतले. १०० रुपये पगारावर. एक वर्ष, दोन वर्ष होतील तर १८० दिवसापेक्षा जास्त दिवस जर झाले तर फक्त ३० ठेवून ११ दिवसांचा खंड दिला. परंतु एक जण कोर्टात गेला व तो बोलला माझे २०० दिवस भरले आहेत. मला कायम करा. तर त्याला कायम करण्याचे आदेश मिळाले. तेव्हा आम्ही मजूर घेणे बंद केले. नंतर आम्ही ठेकेदार पध्दतीवर नाला सफाई चालू केले. तो तर एक गरीब नाला सफाई करणारा होता. हे तर डॉक्टर, नर्स हे सर्व कोर्टात जातील या सर्वांना आपण कसे कायम स्वरुपासाठी भरती करणार. तर त्यासाठी ज्यांची ज्यांची तारीख उशीरा आहेत १४, १०,११,१२ आता नाही झाली आहे. तर आपण दुस-या लोकांना भरती करणे सुरु करा आणि या लोकांना आपण कायम नका करुएक दिवसाचा खंड दया. नाही तर पुढे जावून महानगरपालिकेला अडचण येईल आणि हे सर्व लेबर कोर्टात जातील, कोर्टात जातील आणि ऑर्डर घेऊन येतील की, मला कायम करा असे घेवून येतील. मग आपण काय करणार? त्यासाठी यांना मान्यता नाही दयायची. ज्यांचे ज्यांचे जेव्हा जेव्हा संपत आहे त्यानंतर दुस-या लोकांना घ्या. ६ महिन्यानंतर.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:-</u>**मा. सभापतीजी, मी बोलू इच्छितो.

**<u>आयुक्त, डॉ. राजा दयानिधी</u>**:- मागच्या वेळेस खालीलप्रमाणे आहे काही लोकांचे एप्रिल, मे, जून महिन्यात संपले होते परंतु त्यावेळेस दुस-या आठवडयात असताना अस्थायी असे नव्हते त्याचबरोबर स्थायी पद त्या लोकांना काम थांबणे योग्य नसताना आपण त्यांना काम करण्यास घेतले आहे. आता आपल्याकडे दोन अडचणी आहेत एक साहेबांनी म्हटले आहे ते बरोबर आहे. असे असेल तर एक कालावधी ठरवून जुलै पर्यंत नंतर ऑगस्ट मध्ये नवीन रिक्युटमेंट ठरवू. आमचा प्रस्ताव असा आहे. ज्या ज्या लोकांना मुदत वाढ दयायची आहे. त्या त्या लोकांकडून आपण संमतीपत्र घेणार आहोत. प्रतिज्ञापत्र घेणार आहोत, की हे तात्पुरत्या स्वरुपातील आहे याची मला जाणीव आहे. जे लोकांना मान्य राहील त्यांनाच आपण मुदतवाढ देणार आहेत. तिसरा एक आहे कर्मचा-याचे जे आहे जेव्हा मंजुरीची गोष्ट येते, मी हे बोलू इच्छितो की, कोव्हीडमध्ये कर्मचारी बदलत असतात. आपल्याकडे ६० डॉक्टर होते आता आमच्याजवळ ३७ डॉक्टर आहेत. ते बदल होत राहणार आपल्याजवळ मंजूर जरी असेल पुर्ण महानगरपालिकेत फक्त ६ मेडिकल अधिकारी मंजूर आहेत. आम्ही मार्च २०२० पासुन जेव्हा कोव्हीड चालू झाला आहे.५० डॉक्टर, ६० डॉक्टर याची काळजी आम्ही घेत आहेत. हे स्पष्ट आहे की, मुदतवाढ देण्यासाठी टिपिकल अडचण ही होती की, जे एप्रिल मध्ये संपत आहे. स्थायी समिती सभा झालीच नाही. कारण मंजूरी घेतल्याशिवाय यांना नाही घेवू शकत. एप्रिल मध्ये आम्ही नाही थांबू शकत. तर आम्ही सांगितले त्यांनी जे काळजीने काम केले आहे. कुणाचे मार्चमध्ये, कुणाचे एप्रिलमध्ये, कुणाचे जूनमध्ये संपले आहेत् त्यांच्याकडून काम करुन घेतले आहे. ज्यांचे मध्येच काम संपले. त्यांची काही गरज नव्हती त्यांना आम्ही काढून टाकले आहे. मुदतवाढ दिली नाही दिली. जसे ३० जून ला बरेच लोकांची मुदतवाढ संपली होती त्या सर्वांना आम्ही मुदतवाढ नाही दिली. जे आपल्याला पाहिजेत आहेत त्यांचाच प्रस्ताव पाठवला आहे. तरी पण आपल्याला संयुक्तिक वाटत आहे तर आम्हांला थोडा वेळ पाहिजे आहे. तरी पण आपल्याला जर ऑगस्ट जुलै मध्ये संपत बाकी नव्याने असे करताना सुध्दा आपण हे काम पण करु शकतो. याचा जो नमुना आहे तो आम्ही तयार केला आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** अंडर टेकिंग करुन करा.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** १० व्या महीन्यातले करु नका, जेव्हा १० व्या महीतला विषय येईल तेव्हा करा.

**<u>आयुक्त, डॉ. राजा दयानिधी</u>** :- ठिक आहे बरोबर. त्यावेळेला बघु चालेल.

**<u>वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-</u>** गव्हर्नमेंट ऑफ इंडियाची टीम अ आली होती त्यांनी सांगितले होते तुमच्याकडे जो स्टॉफ आहे डॉक्टरर्स आहे, नर्स आहे त्यांना तुम्ही सोडू नका. कारण नंतर ते मिळणार नाही, दुसरीकडे जातील आणि त्यांनी असे सांगितले की गेले तर पुन्हा तुम्हांला मिळणार नाहीत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** पुढे जेव्हा १० महिने संपतील....

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी** :- सन्माननीय सभासदांचे म्हणणे एवढेच आहे की, असे करताना आपण कुठलाही लिगल अडचण त्यांच्यानंतर जे वित्तीय अडचण येणार आहे ती व्हायला नको त्यासाठी खात्री करा असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. आणि त्याच्यामध्ये आम्हीही सहमत आहेत. तर आपण काळजी घेवू. धन्यवाद..

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** पास..पास..

**महापालिका सचिव:-** हा विषय पास झाला आहे. इतिवृत्ताची वाट न पाहता. सभापती साहेब पुढचा घेउ.

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री. दिपक सिरवानी-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

**☑विषय.क्रं.१५ :- कोविड-१९ साथरोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता कंत्राटी स्वरुपात नेमणूका केलेल्या वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यते साठी सविनय सादर.**

**प्रस्तावना**

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी दिनांक ३०/६/२०२१ रोजीच्या पत्रानवये सद्यस्थितीत कोविड-१९ रुग्ण संख्येमध्ये घट झाली आहे परंतू, शासनाने संभाव्य तिसऱ्या लाटेबाबत अवगत केले असल्याने खालीलप्रमाणे वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांना पुनर्नियुक्ती देण्यास विंनती केलेली आहे.**

**अ. वैद्यकीय अधिकारी : DCH-५, DCHC-५, CCC-४, CCC शाळा क्रमांक २९-४, नागरीक आरोग्य केंद्र -११, मुख्यालय-३, RTPCR-४ असे एकूण ३६ वैद्यकीय अधिकारी यांची आवश्यकता आहे.**

**ब. कक्ष सेवक : DCH-५, DCHC-५, CCC तहसिल -३, CCC शाळा क्रमांक २९-३, नागरीक आरोग्य केंद्र -१२, मुख्यालय-३, असे एकूण ३१ कक्षसेवक यांची आवश्यकता आहे.**

**क. परिचारिका/स्टाफ नर्स : कोविड-१९ लसीकरण लक्षात घेता एकूण ३२ परिचारीकांची आवश्यकता आहे.**

**२. वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने विधी अधिकारी यांनी महानगरपालिका ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी करीता कंत्राटी पध्दतीने कर्मचारी यांनी नियुक्ती करु शकत नाही. त्यामुळे Services of such employees may not be extended further. May appoint such fresh employees again following the whole process of such employment असे अभिप्राय दिलेले आहेत.**

**३. विधी अधिकारी यांच्या अभिप्रायानुसार दिनांक ४/७/२०२१ रोजी दुपारी १२ : ०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस अतिरिक्त आयुक्त, उप-आयुक्त (मुख्यालय), वैद्यकीय आरोग्य अधिकारी, विधी अधिकारी उपस्थित होते.**

**सदर बैठकीमध्ये कोविड-१९ मध्ये नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्ती आदेशातील अटी व शर्ती मध्ये स्पष्टता करण्यात आलेली असल्याने व शासनाकडून तिसऱ्या लाटेच्या शक्यतेचे संकेत मिळाल्याने संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या कडून खालील अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र / शपथपत्र घेऊन मुदवाढ देण्यासाठी सर्वानुमते निर्देश दिलेले आहेत.**

**वरील प्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेऊन वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या शिफारशीनुसार मा. स्थायी समितीच्या शिफारशीच्या अधिन राहून खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.**

**कार्यालयीन आदेश :-**

**कोविड-१९ च्या तिसऱ्या लाटेची सभांव्य शक्यता विचारात घेऊन सेवा कालावधी संपल्याच्या दिनांकापासून एक दिवसाचा तात्रिक खंड देऊन पुढील ०६ महिने किंवा कोविड-१९ संपेपर्यंत (जे आगोदर घडेल तो पर्यंत) खालील वैद्यकीय अधिकारी , परिचारीका / स्टाफ नर्स यांना मा. स्थायी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यात येत आहे.**

**तक्ता “अ”**

| अ.क्र. | अधिकारी यांचे नाव | पदनाम | सेवा कालावधी संपुष्टीचा दिनांक | मुदतवाढ प्रस्तावित |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | डॉ. प्रेरणा जाधव | वैद्यकीय अधिकारी | ८/७/२०२१ | ७/१/२०२२ |
| २ | डॉ. वैशाली नाईक | वैद्यकीय अधिकारी | ११/७/२०२१ | १०/१/२०२२ |
| ३ | डॉ. रुतूजा महाळूंगे | वैद्यकीय अधिकारी | ११/७/२०२१ | १०/१/२०२२ |
| ४ | डॉ . भूमिका गिरी | वैद्यकीय अधिकारी | १३/७/२०२१ | १२/१/२०२२ |
| ५ | डॉ. सुभांगी देवरे | वैद्यकीय अधिकारी | ११/१०/२०२१ | १०/४/२०२२ |
| ६ | डॉ. प्राजंली पेंडणेकर | वैद्यकीय अधिकारी | ११/८/२०२१ | १०/२/२०२२ |
| ७ | डॉ. श्रध्दा साबळे | वैद्यकीय अधिकारी | २१/१०/२०२१ | २०/४/२०२२ |
| ८ | डॉ. अर्चना भदाणे | वैद्यकीय अधिकारी | ११/७/२०२१ | १०/१/२०२२ |
| ९ | डॉ. रोहन नागरे | वैद्यकीय अधिकारी | ८/६/२०२१ | ७/१२/२०२१ |
| १० | डॉ. अम्रिता मोरे | वैद्यकीय अधिकारी | १८/८/२०२१ | १७/२/२०२२ |
| ११ | डॉ. विशाखा भालेराव | वैद्यकीय अधिकारी | १९/१०/२०२१ | १८/४/२०२२ |
| १२ | डॉ. शलाका भालेराव | वैद्यकीय अधिकारी | ६/६/२०२१ | ५/१२/२०२१ |
| १३ | डॉ. रिन्सी सॉमूअल | वैद्यकीय अधिकारी | १९/१०/२०२१ | १८/४/२०२२ |
| १४ | डॉ. ज्ञानेश्वर आव्हाड | वैद्यकीय अधिकारी | १२/१०/२०२१ | ११/४/२०२२ |
| १५ | डॉ. वृषाली राठोड | वैद्यकीय अधिकारी | १८/१०/२०२१ | १७/४/२०२२ |
| १६ | डॉ. अंकिता पाटील | वैद्यकीय अधिकारी | १४/१०/२०२१ | १३/४/२०२२ |
| १७ | डॉ. चित्रा पाटील | वैद्यकीय अधिकारी | १८/१०/२०२१ | १७/४/२०२२ |
| १८ | डॉ. अर्चना शर्मा | वैद्यकीय अधिकारी | १२/१०/२०२१ | ११/४/२०२२ |
| १९ | डॉ. आरती सुरवसे | वैद्यकीय अधिकारी | १२/१०/२०२१ | ११/४/२०२२ |
| २० | डॉ. बजरंगसिग चव्हाण | वैद्यकीय अधिकारी | १४/१०/२०२१ | ११/४/२०२२ |
| २१ | डॉ. मोनिका जाधव | वैद्यकीय अधिकारी | २०/१०/२०२१ | १९/४/२०२२ |
| २२ | डॉ. अम्रपाली छाजेड | वैद्यकीय अधिकारी | १४/१०/२०२१ | १३/४/२०२२ |
| २३ | डॉ. पल्लवी पगारे | वैद्यकीय अधिकारी | २०/७/२०२१ | १९/१/२०२२ |
| २४ | डॉ. उज्वला गिते | वैद्यकीय अधिकारी | १२/१०/२०२१ | ११/४/२०२२ |
| २५ | डॉ. रोशना शिंदे | वैद्यकीय अधिकारी | १४/१०/२०२१ | १३/४/२०२२ |
| २६ | डॉ. जागृती कंठे | वैद्यकीय अधिकारी | १२/१०/२०२१ | ११/४/२०२२ |
| २७ | डॉ. शैला चपटे | वैद्यकीय अधिकारी | ७/८/२०२१ | ६/२/२०२२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८ | डॉ. कविशा सिंग | वैद्यकीय अधिकारी | ९/१०/२०२१ | ९/१०/२०२१ |
| २९ | डॉ. सुमेध इगोंले | वैद्यकीय अधिकारी | ५/८/२०२१ | ४/२/२०२२ |
| ३० | डॉ. गुलमोहर रेड्डी | वैद्यकीय अधिकारी | ९/८/२०२१ | ८/२/२०२२ |
| ३१ | डॉ. हनुमंत करांडे | वैद्यकीय अधिकारी | १२/१०/२०२१ | ११/४/२०२२ |
| ३२ | डॉ. अनमोल शिंदे | वैद्यकीय अधिकारी | १२/१०/२०२१ | ११/४/२०२२ |
| ३३ | डॉ. जयराज जाधव | वैद्यकीय अधिकारी | १२/१०/२०२१ | ११/४/२०२२ |
| ३४ | डॉ. दिक्षा भालेराव | वैद्यकीय अधिकारी | १२/१०/२०२१ | ११/४/२०२२ |
| ३५ | डॉ. अमित मोटवानी | वैद्यकीय अधिकारी | ५/८/२०२१ | ४/२/२०२२ |
| ३६ | डॉ. वृशाली जावळे | वैद्यकीय अधिकारी | २५/६/२०२१ | २४/१२/२०२१ |
| ३७ | डॉ. दर्शना बनसोडे | वैद्यकीय अधिकारी | १९/१०/२०२१ | १८/४/२०२२ |
| ३८ | सुष्मिता खंडागळे | जी.एन.एम. | २६/५/२०२१ | २५/११/२०२१ |
| ३९ | हेमलता लंघी | ए.एन.एम. | ४/६/२०२१ | ३/१२/२०२१ |
| ४० | पुष्पा वैसाणे | जी.एन.एम. | ४/६/२०२१ | ३/१२/२०२२ |
| ४१ | रागिनी ढोंगडे | ए.एन.एम | १६/६/२०२१ | १५/१२/२०२१ |
| ४२ | प्रज्ञा तडगे | जी.एन.एम. | १६/६/२०२१ | १५/१२/२०२१ |
| ४३ | प्रियंका मोरे | जी.एन.एम. | १६/६/२०२१ | १५/१२/२०२१ |
| ४४ | राजश्री खैरे | जी.एन.एम. | २०/६/२०२१ | १९/१२/२०२१ |
| ४५ | राजश्री पंधारे | ए.एन.एम. | २३/६/२०२१ | २२/१२/२०२१ |
| ४६ | मनिषा रेंगडे | ए.एन.एम. | २३/६/२०२१ | २२/१२/२०२१ |
| ४७ | नम्रता खंडागळे | जी.एन.एम. | ५/७/२०२१ | ४/१/२०२२ |
| ४८ | ज्योत्स्ना क्षेत्रे | जी.एन.एम | ३०/७/२०२१ | १/१/२०२२ |
| ४९ | जीवन मांडवे | कक्षसेवक | ६/६/२०२१ | ५/१२/२०२१ |
| ५० | शंतनू पट्टे | कक्षसेवक | ६/६/२०२१ | ५/१२/२०२१ |
| ५१ | अविनाश सोनावणे | कक्षसेवक | ६/६/२०२१ | ५/१२/२०२१ |
| ५२ | गोपाळ किसन दिघे | कक्षसेवक | ६/६/२०२१ | ५/१२/२०२१ |
| ५३ | मनिषा लोखंडे | कक्षसेवक | ६/६/२०२१ | ५/१२/२०२१ |
| ५४ | सागर येगडे | कक्षसेवक | ६/६/२०२१ | ५/१२/२०२१ |
| ५५ | प्र फुल पारडे | कक्षसेवक | ६/६/२०२१ | ५/१२/२०२१ |
| ५६ | प्रदिप चव्हाण | कक्षसेवक | ६/६/२०२१ | ५/१२/२०२१ |
| ५७ | गणेश परदेशी | कक्षसेवक | ६/६/२०२१ | ५/१२/२०२१ |
| ५८ | गणेश  चौधरी | कक्षसेवक | ६/६/२०२१ | ५/१२/२०२१ |
| ५९ | नितीन साळवे | कक्षसेवक | ६/६/२०२१ | ५/१२/२०२१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६० | अजय आहेर | कक्षसेवक | ६/६/२०२१ | ५/१२/२०२१ |
| ६१ | हेमत सिंग | कक्षसेवक | २३/६/२०२१ | २२/१२/२०२१ |

तक्ता "ब"

| अ.क्र. | अधिकारी यांचे नाव | पदनाम | सेवा कालावधी संपुष्टीचा दिनांक | सेवा कालावधी वाढविल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | डॉ. ज्योती प्रसाद | वैद्यकीय अधिकारी | ०८/०६/२०२१ | १३/७/२०२१ |
| २ | डॉ. अक्षय पालसम्बकर | वैद्यकीय अधिकारी | ३०/०६/२०२१ | १३/७/२०२१ |
| ३ | डॉ. साधना गायकर | वैद्यकीय अधिकारी | ०८/०७/२०२१ | १३/७/२०२१ |
| ४ | डॉ. मनिषा खेमानी | वैद्यकीय अधिकारी | १३/७/२०२१ | १३/७/२०२१ |
| ५ | डॉ. हेमलता होके | वैद्यकीय अधिकारी | १३/७/२०२१ | १३/७/२०२१ |
| ६ | डॉ. भाग्यश्री बकाने | वैद्यकीय अधिकारी | १३/७/२०२१ | १३/७/२०२१ |

**वरील तक्ता "अ" मधील अधिकारी /कर्मचारी यांना पुढील ६ महिने किंवा कोविड १९ संपेपर्यंत जे अगोदर घडेल तो पर्यंत मुदत वाढ देणे व तक्ता "ब" मधील रकाना क्रमांक ४ यांच्या सेवा रकाना क्रमांक ५ मध्ये नमुद केल्याच्या राहतील. सबब, वरील प्रमाणे प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सविनय सादर.**

स्थायी समिती ठराव क्र. २७ दिनांक:—१५/०७/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार** कोविड-१९ साथरोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता कंत्राटी स्वरुपात नेमणूका केलेल्या वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना मुदतवाढ देणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

1) कंत्राटी स्वरुपात नेमणूका केलेल्या वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना मुदतवाढ देण्या आधीसदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार प्रतिज्ञापत्र घेणे प्रशासनास बंधनकारक असेल
2) ज्या कर्मचायांची मुदत ऑक्टोबर २०२१ पासुन संपत आहे त्यांना मुदत वाढ देण्यात येऊ नये.
3) यांची मुदत संपल्यानंतर नव्याने जाहिरात देऊन भरती प्रक्रिया सुरु करण्यात प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते
सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १६ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषयक्र.१६**.उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या उमपा कोव्हिड-१९ DCH व DCHC रुग्णालयात दाखल झालेले रुग्णांसाठी लॅब इन्वेस्टीगेशन टेस्ट व इतर रक्त नमुने टेस्टकरिता कार्योत्तर परवानगी देणे संदर्भात मा. स्थायी समिती यांचे मान्यतेसाठी सविनय सादर.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**डिफर.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**भालेराव एकीकडे आपण देतो आणि एकीकडे डिफर. काय आहे हे?

**वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. दिपक पगारे:-**रक्त तपासणीसाठी आहे सर.

**वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिजवानी:-**माननीय सभापती महोदय, आयुक्तजी गोषवारा असा आहे की, महानगरपालिकेत कुठलीही लॅब उलब्ध नव्हती. आम्ही त्यांच्याकडून दरपत्रक मागविले होते. उल्हासनगरचे जेवढे रहिवासी होते लॅबोरेटीवाले आम्ही दरपत्रक मागविले आम्ही आणि सरांनी भेट दिली. त्यातून आम्ही प्राईम लॅब जेवढे हॉस्पिटलमध्ये कोव्हीडची पेशन्ट ॲडमिट होतात त्या सर्वांची टेस्ट करण्यासाठी मान्यता दिली. मागच्या दोन महिन्यापुर्वी काही रक्कमेचा गोषवारा ५७ लाख येथे जेव्हा दुसरी लाट आली तेव्हा आम्ही सरांशी चर्चा करुन बाकी टेस्ट आहेत १८-२० आहेत अशा एकूण ३८ जेवढे पण आमचे कोव्हीड पेशन्ट येत होते त्यांची आम्ही लॅब टेस्ट केली.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**ही जी लॅब आहे आमचे कोरोनाचे जे पेशन्ट ॲडमिट होतात त्यांची आम्ही टेस्ट करतो. आता कोणाला देतात.

**वैदयकिय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिजवानी:-** प्राइम लॅब.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**आपण तिला दिले ना कुठतरी १५ दिवस दया. खुप कमी झाले आहे. कशाला जुने देत आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** १ महिन्यासाठी आजच टेंडर कॉल करा, विषय क्र. १६ मध्ये ठरावामध्ये टाका की आम्ही एक महिन्याच्या आत निविदा मागवणार, १५ ऑगस्ट पर्यंत जोपर्यंत टेंडर आहे. दुसरा तोपर्यंत आम्ही यालाच कायम करत आहोत.

**महापालिका सचिव:-**१५ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे आणि नव्याने टेंडर कॉल करायला सांगितला आहे.

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री. दिपक सिरवानी-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

☑ **विषयक्रं.१६:- उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या उमपा कोव्हिड-१९ DCH व DCHC रुग्णालयात दाखल झालेले रुग्णांसाठी लॅब इन्वेस्टीगेशन टेस्ट व इतर रक्त नमुने टेस्टकरिता कार्योत्तर परवानगी देणे संदर्भात मा. स्थायी समिती यांचे मान्यते साठी सविनय सादर.**

**प्रस्तावना**

सविनय सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिका मार्फत सुरु करण्यात आलेले DCHC व DCH कोवीड रुग्णाल शांतीनगर उल्हासनगर-३ या रुग्णालयात कोवीड संक्रमित रुग्णांस तात्काळ आरोग्य सेवा रक्त नमुने तपासणी सेवा पुरविण्यासाठी स्थानिक स्तरावर दरपत्रके मागविण्यात आली होती. सदर दरपत्रकामध्ये १.मे.प्राईम डायग्नोस्टिक लॅब २.मे.परफेक्ट लॅब ३.मे.रेडियन्स लॅब ४.मे.क्लिनिक्युर डायग्नोस्टिक लॅब या चार खाजगी प्रयोगशाळानी सहभाग घेतला होता, या चार खाजगी प्रयोगशाळा पैकी मे. पाईम डायग्नोस्टिक लॅब सर्व सोयी सुविधासुस्ज व अद्यावत साधनसाम्रगी/ उपकरणे असलेल्या व कमी दराचे दरपत्रक सादर केलेल्या प्रमाणे या खाजगी प्रयोगशाळेची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच मा. स्थायी समितीनी तक्ता अ मध्ये रक्त नमुने व इतर तपासणी साठी मा.स्थायी समिती ठराव क्र.४९ दिनांक २६/०३/२०२१ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर मे.पाईम डायग्नोस्टिक लॅब यांनी सादर केलेले दर पुढील प्रमाणे आहे.

**तक्ता अ**

| अ.क्र | रक्त नमुने तपासणीचे नाव | नग | दर |
|---|---|---|---|
| 1 | ABG | 1 | 650/- |
| 2 | ECG | 1 | 190/- |
| 3 | XRAY CHEST | 1 | 290/- |
| 4 | BLOOD CULTURE | 1 | 370/- |
| 5 | URINE CULTURE | 1 | 190/- |
| 6 | SPUTUM FOR AFB | 1 | 60/- |
| 7 | CBC ESR | 1 | 40/- व 10/- |
| 8 | LIVER FUNCTION TEST | 1 | 250/- |
| 9 | RENAL FUNCTION TEST | 1 | 150/- |
| 10 | SERUM ELECTROLYTE | 1 | 150/- |
| 11 | SERUM C REACTIVE PROTEIN | 1 | 145/- |
| 12 | SERUM LDH LEVELS | 1 | 145/- |
| 13 | SERUM FERRITIN LEVELS | 1 | 390/- |
| 14 | SERUM D-DIMER | 1 | 550/- |
| 15 | SERUM ITERLEUKIN 6 LEVELS | 1 | 1390/- |
| 16 | SERUM PROCALCITONIN TEST | 1 | 1390/- |
| 17 | DENGUE ANTIGEN TEST | 1 | 190/- |
| 18 | MALARIA ANTIGEN TEST | 1 | 75/- |
| 19 | COMPLETE URINE EXAMINATION | 1 | 50/- |

तसेच संभाव्य कोवीड १९ चा दुस-या लाटेचा धोका लक्षात घेता कोवीड रुग्णांस रुग्ण सेवा देण्यासाठी तातडीच्या प्रसंगी असल्यामुळे वरील प्रमाणे तक्ता- अ मधील रक्त नमुने तपासणी वगळून इतर रक्त नमुने तपासणी करण्याची आवश्यकता भासल्यास सदर रक्त नमुने तपासणी संदर्भात चर्चा करण्यात आली. सदर नियुक्त संस्था मे. प्राईम डायग्नोस्टीक लॅब यांच्याशी केलेल्या चर्चा अंती तातडीच्या प्रसंगी करावयाच्या इतर रक्त नमुने तपासणी बाबतचे खालील प्रमाणे दर व संमतीपत्र या कार्यालयास प्राप्त झालेला आहेत.

**तक्ता ब**

| अ.क्र | इतर रक्त नमुने तपासणीचे नाव | नग | दर |
|---|---|---|---|
| 1 | LIPID PROFILE | 1 | 150/- |
| 2 | DENGUE NS 1 | 1 | 190/- |
| 3 | DENGUE IGG,IGM,NS 1 | 1 | 350/- |
| 4 | HBA१C | 1 | 220/- |
| 5 | ELECTROLYTE | 1 | 150/- |
| 6 | MALARIA PARASITE (MP) | 1 | 40/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | COVID ANTIBODIES (ANTI SARS COV २) | 1 | 320/- |
| 8 | CHOLESTROL ONLY | 1 | 100/- |
| 9 | TRIPLE H (HIV, HCV, HBSAG) | 1 | 600/- |
| 10 | HIV | 1 | 200/- |
| 11 | HCV | 1 | 200/- |
| 12 | HBSAG | 1 | 200/- |
| 13 | VDRL | 1 | 100/- |
| 14 | GENE EXPERT | 1 | 1950/- |
| 15 | VITAMIN B१२ | 1 | 450/- |
| 16 | VITAMIN D३ | 1 | 650/- |
| 17 | T3, T4, TSH (Thyroid) | 1 | 160/- |
| 18 | LEPTOSPIRA IGM | 1 | 450/- |
| 19 | SPUTUM ROUTINE EXAMINATION | 1 | 250/- |
| 20 | SPUTUM CULTURE & AMP SENSIVITY | 1 | 190/- |
| 21 | PROTHROMBIN TIME (PT) | 1 | 120/- |
| 22 | BSF/BSPP/BSR | 1 | 20/- |
| 23 | CREATININE ONLY | 1 | 50/- |
| 24 | SGOT | 1 | 50/- |
| च25 | SGPT | 1 | 50/- |
| 26 | TROPONIN – I | 1 | 550/- |
| 27 | TROPONIN – T | 1 | 700/- |
| 28 | BLEEDING TIME &AMP CLOTTING TIME (BT/CT) | 1 | 100/- |
| 29 | PTT | 1 | 120/- |
| 30 | WIDAL | 1 | 50/- |
| 31 | CALCIUM | 1 | 60/- |
| 32 | CK-MB | 1 | 250/- |
| 33 | G६PD | 1 | 150/- |
| 34 | BLOOD GROUP | 1 | 50/- |
| 35 | २ DECHOCARDIOGRAPHY | 1 | 1400/- |
| 36 | STOOL ROUTINE | 1 | 50/- |
| 37 | ANTI TPO | 1 | 1600/- |
| 38 | TRIGLYCERIDES | 1 | 100/- |

वरील प्रमाणे कोवीड रुग्णांस रुग्ण सेवा देण्यासाठी तातडीच्या प्रसंगी असल्यामुळे तक्ता- अ मधील  रक्त नमुने तपासणी वगळून रक्त नमुने व इतर तपासणी करण्याची आवश्यकता भासल्यास याबाबत मे.प्राईम डायग्नोस्टिक लॅब यांनी **तक्ता-ब** नुसार निश्चित केलेल्या दराप्रमाणे  DCHC, DCH व CCC कोवीड १९ रुग्णालयातील  कोवीड संक्रमित रुग्णास तात्काळ रक्त नमुने तपासणी व इतर तपासणी करण्यासाठी व रुग्णांच्या तपासणीनुसार होणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.सदर  रक्त नमुने तपासणी व इतर तपासणी करिता अंदाजित एकुण रु ५०,००,०००/- खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा सन २०२१-२०२२ मधील विपरीत परिस्थिती व्यवस्थापन B-२(३) या लेखाशिर्षातुन किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधीतून करण्याबाबत मा.स्थायी समिती यांचे मान्यतेसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. २८** **दिनांक:—१५/०७/२०२१**

**सुचकाचे नाव :—श्री. भगवान भालेराव**

**अनुमोदकाचे नाव :—श्री. कलवंतसिंह सोहता**

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारमे.प्राईम डायग्नोस्टिक लॅब यांनाउल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या उमपा कोव्हिड-१९ DCH व DCHC रुग्णालयात दाखल झालेले रुग्णांसाठी लॅब इन्वेस्टीगेशन टेस्ट व इतर रक्त नमुने टेस्टकरिता होणारा  अंदाजित खर्च रु. ५०,००,०००/-यास मान्यता देत आहे.**

**तसेच**

**दिनांक 15/07/2021 ते 15/08/2021 पर्यत मुदत वाढ देऊन नव्याने निविदा मागविणे प्रशासनास निर्देश देत आहे.**

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

**सुचकाची** सही/—

**अनुमोदकाची** सही/—

**सर्वानुमते**

**सभापती/पीठासीन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १७  वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १७.उल्हासनगर-४ प्रभाग क्र.१५ मधील पेन्सील फॅक्टरीच्या बाजूला महादेव नगर येथेपेव्हमेंट रोड व नाली बनविणे.**

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** १ लाख वाढीव करण्यास मान्यता देत आहे. किती बिलो आहे? सभापती जी, १५ पेक्षा जास्त दयायचेच नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** किती टक्के बिलो आहे?

**उप-आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**३.९९० टक्के कमी आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**३९ लाख ४ टक्के आहे आणि यात म्हणजे १ लाख ६० हजाराची बचत होत आहे. तर १ लाख ६० हजाराचे वाढीव काम करण्यासाठी परवानगी दिली जावी.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**जेवढे बिलो आहे, तेवढे जास्त काम करण्यासाठी देण्यात यावे.उत्तर दिले आहे ते जास्तीचे काम करण्यासाठी ३९ लाख ४० हजार ५०० त्याच्या पुढचे वाढीव काम होईल.

**उप-आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**काम असेल तर

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**अजून काम आहे. अजून २ कोटी रुपये दया.

**महापालिका सचिव:-**मग आदेश मिळणार नाहीत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..पास..

**महापालिका सचिव:-**विषय क्र. १७ व १८ दोन्ही विषय पास झाले आहेत. उल्हासनगर -१ येथील शिवनेरी नगर पासून ते तानाजीनगर (एम.आय.डी.सी.) पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे पास इतिवृत्ताची वाट न पाहता

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री.दिपक सिरवानी-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

**☑ विषय क्रं.१७:-उल्हासनगर-४ प्रभाग क्र.१५ मधील पेन्सील फॅक्टरीच्या बाजूला महादेव नगर येथे पेव्हमेंट रोड व नाली बनविणे.**

प्रस्तावना

**उल्हासनगर-५ प्रभाग क्र.१७ मधील शिवकॉलनी येथे सि.सि.पॅसेज व नाली बनविणे आवश्यक असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सदर कामाचे रुपये ३९,९६,५००/- एवढया खर्चाचे प्राकलन तयार करुन सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्यात आली व नियमाप्रमाणे सदर कामाची निविदा प्रक्रिया करण्यात आली त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.**

**तक्ता क्र.१**

| | | |
|---|---|---|
| १. | प्राकलनीय खर्च | रु. ३९,९६,५००/- |
| २. | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २३/०३/२०२१ |
| ३. | निविदा विक्री कालावधी | दिनांक २३/०३/२०२१ ते |
| ४. | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम | दिनांक १५/०४/२०२१ |
| ५. | प्रथम मुदतवाढ | - |
| ६. | द्वितीय मुदतवाढ | - |
| ७. | तृतीय मुदतवाढ | - |
| ८. | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १६/०४/२०२१ |
| ९. | आर्थिक भाग उघडल्याचा दिनांक | - |
| १०. | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |
| ११. | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

**सदर निविदेचा तांत्रिक भाग दिनांक १६/०४/२०२१ रोजी निविदा समिती समोर उघडण्यात आला.त्यामध्ये १) मे.झा.पी.ॲन्ड कं. २) मे.रवि इंटरप्रायझेस ३) मे. रीषी कंस्ट्रक्शन यांनी निविदा सादर केल्या आहेत. त्याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे :-**

**तक्ता क्र.२**

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. झा.पी. ॲन्ड कं. | मे.रवि इंटरप्रायझेस | मे. रीषी कंस्ट्रक्शन |
|---|---|---|---|---|
| १. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती मागील ३ वर्ष | होय | होय | होय |
| २. | कामाचा अनुभव मागील ३ वर्षाचे वार्षिक उत्पन्न | होय | होय | होय |
| ३. | पॅन कार्डाची प्रत | होय | होय | होय |
| ४. | संस्था /कंपनी नोंदणी ( भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे दस्ताऐवज | होय | होय | होय |
| ५. | ई.पी.एफ. व जी.एस.टी. प्रमाणपत्र प्रत | होय | होय | होय |
| ६. | कंत्राटदाराची निविदा भरण्याच्या सक्षमता | होय | होय | होय |
| ७. | निविदेमध्ये दिलेल्या नमुन्यात रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे. | होय | होय | होय |
| ८ | कंत्राटदाराची घोषणा | होय | होय | होय |
| ९ | पात्र/अपात्र | पात्र | पात्र | पात्र |

**उक्त तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार निविदाकांराच्या कागदपत्रांची छाननी पुर्ण करण्यात आली. सदर छाननीत १) मे.झा.पी.ॲन्ड कं. २) मे.रवी एंटरप्रायझेस ३) मे.रीषी कंस्ट्रक्शन हे ०३ निविदाकार पात्र ठरले आहेत. सदर पात्र निविदिकारांचा निविदेचा आर्थीक भाग दि. १७/०६/२०२१ रोजी उघडण्यात आला त्यांनी सादर केलेल्या दरांची माहिती पुढीलप्रमाणे आहे**

**तक्ता क्र.३**

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | दिलेले दर (टक्के प्रमाणे) |
|---|---|---|
| १. | **मे.झा.पी. ॲन्ड कं.** | ३.९९० % टक्के कमी |
| २. | **मे.रवी एंटरप्रायझेस** | ०.९९० % टक्के कमी |
| ३. | **मे.रीषी कंस्ट्रक्शन** | १.२०० % टक्के जास्त |

**वरील तक्त्यात नमुद उल्हासनगर-४ प्रभाग क्र.१५ मधील पेन्सील फॅक्टरीच्या बाजूला महादेव नगर येथे पेव्हमेंट रोड व नाली बनविणे या कामाकरीता निम्न निविदाकार मे.झा.पी. ॲन्ड कं.यांनी ३.९९० % टक्के कमी दर सादर केले आहेत. मे.झा.पी. ॲन्ड कं.यांना शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि.२६ नोव्हेंबर,२०१८अन्वये लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर मे.झा.पी. ॲन्ड कं.यांना Performanance Security रु.४०,०००/- एवढी रक्कम आठ दिवसात भरणे आवश्यक आहे.**

**. तरी मे.झा.पी. ॲन्ड कं.यांची निम्न दराची निविदा मान्य करण्यास व निविदाकाराशी संविदा करणेस मा.स्थायी समितीचे पटलावर मान्यतेस्तव प्रस्तावित.**

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u>२९ <u>दिनांक:—१५/०७/२०२१</u>

सुचकाचे नाव :—श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :—श्री. कलवंतसिंह सोहता

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारमे.झा.पी. ॲन्ड कं.यांच्या निम्न दराची निविदाने संविदा करणेउल्हासनगर-४ प्रभाग क्र.१५ मधील पेन्सील फॅक्टरीच्या बाजूला महादेव नगर येथे पेव्हमेंट रोड व नाली बनविणेसाठी मान्यता देत आहे.**

**<u>तसेच</u>**

**मुळ निविदेतील रक्कमे पेक्षा कमी दराने निविदा भरली असुन उर्वरीत भरलेल्या रक्कमेचे प्रशासनास आवश्यक वाटल्यास वाढीव काम करणेस मान्यता देत आहे.**

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

**<u>सर्वानुमते</u>**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव-</u>** विषय क्रमांक १८ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषयक्र. १८ .उल्हासनगर -१ येथील शिवनेरी नगर पासून ते तानाजीनगर (एम.आय.डी.सी.) पर्यंतचारस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे**

---

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास….

**<u>सभापती, श्री.दिपक सिरवानी-</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे. 👍

---

☑ **विषय.क्रं.१८ :-उल्हासनगर -१ येथील शिवनेरी नगर पासून ते तानाजीनगर (एम.आय.डी.सी.)पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे**

<u>प्रस्तावना</u>

**उल्हासनगर -१ येथील शिवनेरी नगर पासून ते तानाजीनगर (एम.आय.डी.सी.) पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे आवश्यक असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सदर कामाचे रुपये ४९,२०,२००/- एवढया खर्चाचे प्राकलन तयार करुन सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्यात**

आली व नियमाप्रमाणे सदर कामाची निविदा प्रक्रिया करण्यात आली त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. १**

| | | |
|---|---|---|
| १. | प्राकलनीय खर्च | रु.४९,२०,२००/- |
| २. | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०७/०१/२०२१ |
| ३. | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०७/०१/२०२१ ते |
| ४. | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक २८/०२/२०२१ |
| ५. | प्रथम मुदतवाढ | - |
| ६. | द्वितीय मुदतवाढ | - |
| ७. | तृतीय मुदतवाढ | - |
| ८. | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक २५/०३/२०२१ |
| ९. | आर्थिक भाग उघडल्याचा दिनांक़ | दिनांक २१/०५/२०२१ |
| १०. | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ५ |
| ११. | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ५ |

सदर निविदेचा तांत्रिक भाग दिनांक २५/०३/२०२१ रोजी निविदा समिती समोर उघडण्यात आला.त्यामध्ये१) मे.ए.एम.रामचंदानी २) मे.शशिकांतजगत्यानी ३) मे.श्री साईनाथ कन्स्ट्रक्शन ४) मे.बी.आर. कन्स्ट्रक्शन ५) मे.जकनुश कन्स्ट्रक्शन यांनी निविदा सादर केल्या आहेत. त्याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे

**तक्ता क्र.२**

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.ए.एम. रामचंदानी | मे. शशिकांतजगत्यानी | मे. श्री साईनाथ कन्स्ट्रक्शन | मे. बी.आर. कन्स्ट्रक्शन | मे.जकनुश कन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती मागील ३ वर्ष | होय | होय | होय | होय | होय |
| २. | कामाचा अनुभव मागील ३ वर्षाचे वार्षिक उत्पन्न | होय | होय | होय | होय | होय |
| ३. | पॅन कार्डाची प्रत | होय | होय | होय | होय | होय |
| ४. | संस्था /कंपनी नोंदणी ( भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे दस्ताऐवज | होय | होय | होय | होय | होय |
| ५. | ई.पी.एफ. व जी.एस.टी. प्रमाणपत्र प्रत | होय | होय | होय | होय | होय |
| ६. | कंत्राटदाराची निविदा भरण्याच्या सक्षमता | होय | होय | होय | होय | होय |
| ७. | निविदेमध्ये दिलेल्या नमुन्यात रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे. | होय | होय | होय | नाही | होय |
| ८ | कंत्राटदाराची घोषणा | होय | होय | होय | होय | होय |
| ९ | पात्र/अपात्र | पात्र | पात्र | पात्र | अपात्र | पात्र |

उक्त तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार निविदाकांराच्या कागदपत्रांची छाननी केली.त्यामध्ये मे.बी.आर.कन्स्ट्रक्शन या निविदाकारांने रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्राची मूळ प्रत देण्याकरिता कळविले होते.परंतु सदर निविदाकाराने प्रतिज्ञापत्राची मूळ प्रत जोडलेली नसल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात येत आहे.१) मे.ए.एम.रामचंदानी २) मे.शशिकांतजगत्यानी ३)

मे. श्री साईनाथ कन्स्ट्रक्शन ४) मे.जकनुश कन्स्ट्रक्शन हे चारही निविदाकार पात्र ठरत असल्याने त्यांचे निविदेचा आर्थिक भाग(Financial Bid) उघडण्यात आला त्याची माहिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | दिलेले दर (टक्के प्रमाणे) |
|---|---|---|
| १. | मे. ए.एम.रामचंदानी | दिलेले दर ११.०८० % टक्के कमी |
| २. | मे. शशिकांतजगत्यानी | दिलेले दर २.५००% टक्के जास्त |
| ३. | मे. श्री साईनाथ कन्स्ट्रक्शन | दिलेले दर १.६२२% टक्के जास्त |
| ४. | मे.जकनुश कन्स्ट्रक्शन | AT PAR |

वरील तक्त्यात नमुद उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर -१ येथील शिवनेरी नगर पासून ते तानाजीनगर (एम.आय.डी.सी.) पर्यंतचा रस्ता सिमेंट काँक्रीट करणे या कामाकरीता मे. ए.एम.रामचंदानी यांनी ११.०८०% टक्के कमी दर सादर केले आहे. सदर दर निम्न आहेत. शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि.२६ नोव्हेंबर,२०१८अन्वये लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर निम्न दराच्या निविदाकाराने Performance Security Deposit आठ दिवसाच्या आत जमा करणे आहे. मे. ए.एम.रामचंदानी यांनी रु.१,०२,३५०/- एवढया रक्केमेचे परफॉमन्स सिक्युरीटी आठ दिवसात भरणे आवश्यक आहे.

तरी मे.ए.एम. रामचंदानी यांची निम्न दराची निविदा मान्य करण्यास व निविदाकाराशी संविदा करणेस मा.स्थायी समितीचे मान्यतेस्तव प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ३० दिनांकः—१५/०७/२०२१

सुचकाचे नाव :— श्री.भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :—श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारमे. ए.एम. रामचंदानी यांच्या निम्न दराची निविदाने संविदा करणे उल्हासनगर -१ येथील शिवनेरी नगर पासून ते तानाजीनगर (एम.आय.डी.सी.)पर्यंतचा रस्ता सिमेंट काँक्रीट करणेकामी मान्यता देत आहे

तसेच

मुळ निविदेतील रक्कमे पेक्षा कमी दराने निविदा भरली असुन उर्वरीत भरलेल्या रक्कमेचे प्रशासनास आवश्यक वाटल्यास वाढीव काम करणेस मान्यता देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १९ वाचून दाखवितात.

---

**विषयक्र. १९.**उल्हासनगर शहरासाठी जुन्या भुयारी गटार योजनेचे खडेगोलवली येथे असलेले मलशुध्दीकरण केंद्र व जागेची सुरक्षा ठेवणेसाठी सुरक्षा रक्षक नेमणेबाबत.

---

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**पास इतिवृत्ताची वाट न पहाता.

**सदस्य, श्री. गजानन शेळके:-** पास..पास..

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री. दिपक सिरवानी-- सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

**विषय क्र. १९ :— उल्हासनगर शहरासाठी जुन्या भुयारी गटार योजनेचे खडेगोलवली येथे असलेले मलशुध्दीकरण केंद्र व जागेची सुरक्षा ठेवणेसाठी सुरक्षा रक्षक नेमणेबाबत.**

## प्रस्तावना

**उल्हासनगर शहरासाठी जुन्या भुयारी गटार योजनेचे खडेगोळवली येथे असलेले मलशुध्दीकरण केंद्र व जागेची सुरक्षा ठेवणेसाठी सुरक्षारक्षक नेमणे असल्याने पाणी पुरवठा विभागातर्फे सदर कामाचे रु.३०,१८,२७५/- एवढ्या खर्चाचे प्राकलण तयार करुन सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्यात आली आहे. मा. आयुक्त सो., यांचे मान्यतेने जनसंपर्क अधिकारी यांना दिनांक १६/०९/२०२० रोजीच्या सकाळ, मिड-डे, व धनुषधारी या वृत्तपत्रामध्ये जाहिरात देवून ई निविदा मागविण्यात आली होती. सदर ई निविदेच्या तांत्रिक बाबींचा लिफाफा दिनांक २८/०९/२०२० रोजी उघडण्यात आला. कागदपत्रांची छाननी केली असता तीनही निविदाकार तांत्रिकदृष्टया पात्र आहेत. त्यामुळे लिफाफा क्र.०२ (आर्थिक भाग दर) उघडण्यासाठी निविदा समिती सदस्यांची मान्यता घेणेसाठी सादर करणेत आले होते. या समितीची मान्यता घेतल्यानंतर दिनांक ०८/१२/२०२० रोजी ठेकेदार / प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत लिफाफा क्र.०२ (आर्थिक भाग दर) उघडण्यात आला.त्याप्रमाणे तीन पात्र निविदा धारकांनी भरलेले दर खालील प्रमाणे आहेत.**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | प्राकलनीय किंमत | सादर केलेला दर | एकुण रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. हर्षल टेकनिक्स, नाशिक | | ०.१ टक्के कमी दराने | रु. ३०,१५,२५६.६४५ | I |
| २ | मे. कल्पतरु इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रक्टर, उल्हासनगर | रु.३०,१८,२७५/- | ५ टक्के जादा दराने | रु. ३१,६९,१८८.६६६ | II |
| ३ | मे. शुभ इंटरप्रायझेस, बदलापुर | | ७.५ टक्के जादा दराने | रु.३२४४६४५.५३९ | III |

**वरील ०३ निविदाधारकापैकी मे. हर्षल टेकनिक्स, नाशिक यांचे निविदेचे दर अंदाजित किंमतीच्या दरापेक्षा ०.१ टक्के कमी दराने आहेत. त्यानुसार या कामाची एकुण किंमत रु.३०,१५,२५६.६४५ एवढी येते, सदर दर इतर एजन्सीपेक्षा तुलनात्मकरित्या न्युनतम व कमी असल्याने, वाजवी वाटतात. मे. हर्षल टेकनिक्स, नाशिक यांनी सादर केलेल्या न्युनतम निविदेची किंमत रु.२५.०० लाखापेक्षा जास्त असल्याने आर्थिक मंजुरीसह त्यांच्याशी करारनामा करुन कार्यादेश देण्यासाठी वित्तीय मान्यता घेणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने गोषवारा तयार करण्यात आला असुन, मान्यतेसाठी शिफारस करण्यात येत आहे. सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीची आर्थिक मंजुरी मिळणेसाठी मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करणेत येत आहे.**

<u>स्थायी समिती ठराव क्र. ३१</u> <u>दिनांकः—१५/०७/२०२१</u>

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारउल्हासनगर शहरासाठी जुन्या भुयारी गटार योजनेचे खडेगोलवली येथे असलेले मलशुध्दीकरण केंद्र व जागेची सुरक्षा ठेवणेसाठी मे. हर्षल टेकनिक्स, नाशिक यांनी सुरक्षा रक्षक नेमणेस मान्यता देत आहे.**

**<u>तसेच</u>**

**सदर सुरक्षा रक्षकनेमण्यासाठीउपआयुक्त (मुख्यालय) यांनी स्वत:मुलाखत घेऊन यादी अंतिम करावी**

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव-</u>** विषय क्रमांक २० वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र २०:—माहे एप्रिल २०१९ ते मार्च २०२० अखेरचा जमा खर्चाचा वार्षिक अहवाल**

---

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मा. सभापतीजी, हा जो विषय स्थायी समितीच्या समोर आला आहे, माहे एप्रिलल २०१९ ते मार्च २०२० अखेरचा जमा खर्चाचा वार्षिक अहवाल. यामध्ये ऑडीट केल आहे, असे इथे दिसून येत नाही. हा जो जमा खर्चाचा अहवाल आहे, हा एप्रिल २०१९ ते मार्च २०२० पहीले पण एप्रिल २०१९, डिसेंबर २०१९ चा अहवाल आला आहे. दिनांक १५/०७/२०२० स्थायी समितीचा ठराव क्रमांक ७५ आम्ही हा ठराव केला होता. ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे एप्रिल २०१९ ते डिसेंबर २०२० अखेरच्या जमा खर्चास वार्षिक अहवालास मान्यता देत आहे व उत्पन्न वाढीच्या उपाययोजनेस प्रशासनास योग्य पावले उचलणेस निर्देश देत आहे. १) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १०५ नुसार लेखा विभागाने साप्ताहीक अहवाल स्थायी समिती समोर सादर करणे, प्रशासनास निर्देश देत आहे.

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०६ नुसार त्रुटी असल्यास कोणत्याही वेळी स्थायी समिती समोर सादर करणे प्रशासनास निर्देश देत आहे.

३) तसेच महसुल उत्पन्न वाढ होण्याच्या दृष्टीने उप आयुक्त मुख्यालय यांचे अध्यक्षखाली समिती गठित करण्यात आलेली असून त्या समितीने केलेल्या कारवाईचा अहवाल पुढील स्थायी समिती समोर सादर करण्याचे प्रशासनास निर्देश

देत आहे. तर जो ठराव आम्ही पास केला होता, त्याचा कोणताही इम्पलीमेशन झाले नाही. म्हणजे सेक्शन १०५ हे सांगत आहे की, आडीट करुन प्रतयेक आठवडयाला जो खर्च होतो, त्या ऑडीटचा रिपोर्ट महानगरपालिकेच्या चिफ ऑडीटरला दिले पाहीजे. परंतु कलम १०६ मध्ये असे आहे की, जर तिथे ऑडीट करीत असतांना काही त्रुटी दिसत असतील तर लवकरात लवकर स्थायी समितीला सांगायचे आहे. अशी कोणतीही गोष्ट आज पर्यत ऑडटरकडून आमच्या समोर आली नाही. याचा अर्थ असा आहे की, ऑडीटर जो काम करायचे आहे, त्यामध्ये ते यशस्वी होत नाहीत किंवा त्यांच्याकडून काम होत नाही. असा काय इश्यु आहे? आम्ही पहीले पण एक वेळा चर्चा केली आहे आणि निर्देश दिले आहेत आणि निर्देशनाचे पण कोणतेही पालन होत नाही. मी आपल्या समोर सेक्शन १०५ वाचत आहे. विकली स्कुरनी ऑफ अ‍ॅकाउंट बाय म्युनसिपल चिफ ऑडीटर अ‍ॅन्ड स्कुरनी अ‍ॅकाउंट बाय स्टॅडींग कमिटी, म्युनसिपल चिफ ऑडीटर सेल्फ कंडक्ट विकली एक्सामिनीशन ऑफ ऑडीट ऑफ दि म्युनसिपल अ‍ॅकाउंट सेल्फ रिपोर्ट देअर आर टू दि स्टॅडींग कमिटी गीव्ह मी अलसो फॉर्म टाईप टू टाईम सच प्रेड अ‍ॅन्ड सिप्ट कंडक्ट इन्डपेन्डली एन्ड एक्सामिशन ऑडीट आफ दि म्युनसिपल अ‍ॅकाउंट फॉर दिज प्रपोजल स्टॅन्डींग कमिटी आफ म्युनसिपल चिफ ऑडीटर सेल्फ अ‍ॅस म्युनसिपल अकाउंड अ‍ॅन्ड ऑल रेकॉर्डस अ‍ॅन्ड करसपॉडींग रिलेटींग देअर टू अ‍ॅन्डी दि कमिशनर सेल्फ फॉर दि फर्निीस दि स्टॅन्डींग कमिटी ऑर दि म्युनसिपल चिफ ऑडीटर एनी एक्सपेमेशन कन्स्डरींग रिस्पेसन्स अ‍ॅन्ड डिस्डीप्युशन वुच दि मी कॉल फॉर आता १०५ च्या हिशोबाने साहेब हा रिपोर्ट आहे. असे प्रत्येक वेळी यांचे असेच असते की, आमच्याकडे वेळेवर रिपार्ट आला नाही किंवा त्यांच्याकडे स्टाफ नाही. पहीले जेव्हा म्युनसिपल कौन्सील, नविनच महापालिका बनली होती, त्यावेळेस संगणक नव्हते. आज आपल्याकडे कॉप्युटरराईज झाले आहे. माझ्या माहीती प्रमाणे अकाउंट विभाग जो आहे, तो संपुर्णपणे कॉप्युटरराईज आहे. पहीले त्यांनी कस्टमाईज बनवले आहे, यामध्ये जी.एस.टी, आय.पी. वेगवेगळे रिपोर्ट एका बटनावर क्लिक केले तर जनरेट होतात. त्याच्या नंतरही आपल्याकडे अकाउंटचे डिटेल यायला नाही पाहीजे. आता इथे काय लिहीतात, विषय बघा की, जमा खर्चाचा वार्षिक अहवाल, जमा खर्चाचा वार्षिक अहवाल नाही पाहीजे. आम्हांला पाहीजे, अकाउंडचे डिटेल, अकाउंटचे इन कमिंग आणि आऊट गोविंग दोन्ही असते. फक्त जमा ऑडीट करुन आम्हांला काय दाखवत आहेत? धिस इज आय वॉच आणि पुर्ण वर्षाभरामध्ये सेक्शन १०६ मध्ये त्यांची कोणतीही रिपोर्ट आपल्याकडे आली नाही की मी ही पावती बघितली, मी ही पावती मधून एवढे कमी केले आहे. आम्ही आ खर्च केला, तो खर्च आमच्याकडून जास्त झाला आहे. काय झाले, कुठे त्रास झाला आहे? का झाले यासाठी कोण जबाबदार आहे? असे कोणतेही रिपोर्ट इथे दिले नाहीत. कलम १०५, १०६ साठी मी परत परत सांगितले आहे की, दिनांक १५/०७/२०२० चा ठराव आपल्या समोर आहे. याचे स्पष्टीकरण आम्हांला मिळाले पाहीजे, असे का होत आहे?

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिहं सोहता:-</u>** मा. सभापतीजी,

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** बोला बोला.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिहं सोहता:-</u>**सभापतीजी माझे आवाज येत आहे ना, माझे सन्माननिय सदस्य, श्री. राजेश वदारिया यांनी विषय उचलला आहे, अकाउंटकडून ऑडीटसाठी पेपर जातात का, त्यांनी पाठवले आहेत का?

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>**आता विषय निघाला आहे, चर्चा चालू आहे,

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिहं सोहता:-</u>**तिकडून पाठवला आहे की, नाही, याची पण माहीती देण्यात यावी.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>**आजच विषय आला आहे, त्यावर चर्चा चालू आहे.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिहं सोहता:-</u>**मला ही माहीती दया, अमाउंडकडून आला आहे की नाही?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** सभापती महोदय, राजेश वदारिया यांनी मुददा उपस्थित केला आहे, मला वाटते दिड वर्षे पण श्री. राजेश वदारिया सभापती होते, त्या काळामध्ये तुम्ही आता जे बोलत आहेत, ते झाले नाही. तेव्हा पण सहा, सहा महीन्यामध्ये तीन तीन महीन्यामध्ये यायचे. तेव्हा तुम्ही आता पण मान्य केले पाहीजे, याच्या नंतर पुढचे कसे करायचे? ते सांगा. आता यांना मान्यता दया आणि पुढे जे नविन कसे करता येईल, तशी भुमिका आयुक्तांना सांगा. आता झाले आहे, पुर्वी आपल्या काळामध्ये तसे कधी झाले नाही. आम्ही या संदर्भामध्ये तुम्हांला विचारले होते, तेव्हा तुम्ही सगळे पास करुन घेतले आहेत. मग आता एका सभापतीला एक निर्णय आणि एका सभापतीकडे आल्या नंतर वेगळा निर्णय तर मला वाटते याच्यात सुधारणा होईल. असे आयुक्तांना सांगायला पाहीजे आणि सुधारणा करायला लावले पाहीजे. आता हा जो विषय आला आहे, हा मंजुर करायला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मा. सभापतीजी, श्री. भालेराव त्या वेळेस स्थायी समितीचे सभापती नव्हते. त्यामुळे त्यांना या गोष्टीची माहीती नाही आहे. तर दिनांक १५/०७/२०२० चा जो हा ठराव आहे. तो पण माझ्या कार्यकाळामधला आहे. मी मिटींग घेतली आहे. आयुक्तांना पत्र लिहीले आहे. ते सर्वासाठी ऑल रेकॉर्ड आहे. त्या वेळी आम्ही परत परत शासनाच्या लक्षात आणून दिले आहे की, सेक्शन १०५ च्यामध्ये खर्चाचा आणि जमाचा टोटल अकाउंट डिटेल प्रत्येक आठवडयाला स्थायी समितीच्या समोर आला पाहीजे आणि यामध्ये जर तुम्हांला काही त्रुटी मिळाल्या तर त्या कलम १०६ अंतर्गत इमिडेटली आमच्या समोर आल्या पाहीजेत. त्यासाठी एक आठवडा थांबण्याची गरज नाही. अता इथे पण त्यांनी इथे केले आहे, जमा खर्च अकाउंटमध्ये रिसीप्ट अॅन्ड एस्पेंडीचर या दोन गोष्टी येतात. माझ्या कार्यकाळामध्ये रिसीप्टचा अहवाल दिला आहे. एस्पेंडीचरचा कोणताही अहवाल दिला नाही. हेच वर्षा नु वर्षे परत परत सांगून सुध्दा, परत परत आयुक्ताबरोबर मिर्टीग करुन सुध्दा तरी काहीच होत नाही.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** सभापती महोदय, श्री. राजेश वदारिया दिड वर्षे सभापती होते, त्यांच्या कार्यकाळामध्ये का करुन घेतले नाही?

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** तेव्हा विषय आला होता का?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** विषय आला होता अशा किती तरी महासभा, स्थायी समिती सभा आठवडयाभरामध्ये होतात. आता तीन चार महीन्यामध्ये स्थायी समिती सभा झाली आहे.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>**आता विषय आपल्या समोर आला आहे, त्यामुळे आपण बोलत आहेत. प्रत्येक जण या विषयावर चर्चा करु शकतो.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>**नाही, नाहीया विषय संदर्भामध्ये आपली स्थायी समितीची सभा आठवडयामध्ये लागली पाहीजे तेव्हा तो विषय होईल. आपली मिटींग एक एक महीना, लागत नाही स्टेटमेंट देण्यासाठी स्थायी समितीची मिटींग आवश्यक आहे.या सगळया गोष्टींचा विचार केला तर आपण प्रशासनाला .....

**<u>सभापती , श्री. दिपक सिरवानी:-</u>** निर्णय घेण्यासाठी स्थायी समितीची मिटींग घेणे गरजेचे आहे का?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>**होय.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते समजून आले नाही.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. सभापतीजी, मी सन १९९७ मध्ये स्थायी समितीचा सदस्य झालो होतो आज पण रेकॉर्ड काढून बघा विषय एक असेल, दोन असतील प्रत्येक बुधवारी स्थायी समितीची मिटींग होत होती. आज विषय श्री. राजेश वदारिया यांनी उचलला आहे, यामध्ये राजेशजीने असे बोलले, भगवान भालेराव यांनी असे सांगितले हा विषय नाही. विषय आहे की, दुरुस्ती कशी केली जाईल.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>**होय, माझे तेच माझे तेच म्हणणे आहे,

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**पहीले स्पष्ट तर करु दया. आपण पण त्यांच्या बाजूने बोलत आहेत,

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** या विषयामध्ये कुठे ना कुठे बदल झाला पाहीजे. हे कसे झाले, असेच का झाले ृ, असे का नाही झाले, माझे म्हणणे हे आहे की, अधिका-याने संपुर्ण खुलासा करायला पाहीजे. काही तरी सुधारण झाली पाहीजे. जेवढी सुधारणा करता येईल तेवढी केलीच पाहीजे. जसे की, मुदतवाढ मुदतवाढ केव्हा होते, ६ महीने मुदत वाढ करा १ जानेवारी पासून ते जुन पर्यंत आणि विषय केव्हा येतो, जुलै महीन्यामध्ये ६ महीन्याची मुदतवाढ करण्या पेक्षा १२ महीन्याची मुदतवाढ करा. जुन पर्यंत आणि प्रस्ताव येतो जुलैमध्ये तेव्हा मुदतवाढ पुर्ण होते. तर या सर्व गोष्टींवर आपल्या

अधिका-यांनी लक्ष दिले पाहीजे. राजेशजीचे पण म्हणणे बरोबर आहे. आम्ही परत परत लक्ष आकर्षित करीत आहेत, त्याच्या नंतरही इतिवृत्तात रेकॉर्ड झाल्या नंतरही जर असेच होत राहीले तर हे न्याय योग्य नाही. यामध्ये कुठे ना कुठे सुधारणा झाली पाहीजे आणि याच्या नंतर मा. सभापतींना निवेदन करतो की, प्रत्येक आठवडयामध्ये, पंधरा दिवसामध्ये बैठक लागली पाहीजे. सगळयांचा अहवाल आला तर एकच विषय ठेवा, आम्ही एक विषयावर मिटींग घेऊ गरज नाही की, २२ विषय आले तर मिटींग लागली पाहीजे. दोन विषय असतील, चार विषय असतील कमीत कमी जसी की, विभागप्रमुखांची बैठक होत होती, आमचे पुर्वीचे आयुक्त होते, ते मिटींग लावत होते. त्याप्रमाणे आमची पण विभागप्रमुखांशी मुलाखत होईल. विषय आले तर कामे पण होतील, काही चर्चा होईल. तर या विषयावर अधिका-याने उत्तर दयायला पाहीजे आणि सुधारणा केली पाहीजे की, पुढे आपण काय करायचे?

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** गावडेजी बोला.

**<u>मुख्य लेखा परिक्षक, श्री. मंगेश गावडे:-</u>** मा. सभापती महोदय, मा. सदस्य, श्री. राजेश वदारिया साहेबांनी जो मुददा उचलला होता, कलम १०५ व १०६ अन्वये १०५ मध्ये असे आहे की, अर्थसंकल्पीय जमा खर्चाचा अहवाल दर सात दिवसांनी मा. स्थायी समिती समोर मला सादर करायचा आहे आणि दुसरा एक विषय त्यांनी काढला होता की, महानगरपालिका अधिनियम १०६, महानगरपालिका अधिनियम असा सांगतो की, आर्थिक वर्ष संपल्या नंतर लवकरात लवकर एक वर्षाचे ऑडीट करुन मा. स्थायी समिती समोर सादर करायचा आहे. सर मी सन २०१९ ला जॉईड झालो, हजर झाल्या नंतर प्रथमत: पाहीले तर सन २०१३-१४ पासून ते सन २०१६- २०१७ पर्यंतचे ऑडीट इन कंप्लीट होते. ऑडीट केले गेले नव्हते. तर त्याच्या नंतर मी पुर्व नियोजन करुन ते ऑडीट सुरु केले. माझ्याकडे फक्त तीन क्लार्क आहेत. त्या पैकी एक आवक-जावकसाठी असते, एकाला हार्टचा प्रॉब्लेम आहे, काही बोलेले तर हार्टचा प्राब्लेम येतो आणि तिसरा इलेक्शनच्या डयुटीला आहे आणि सगळयांना सुचना दिलेल्या आहेत, हा पहीला मुददा याच्या नंतर सन २०१३-१४ पासून ते सन २०१६- २०१७ पर्यंतचे ऑडीट पुर्ण करुन १०६ अन्वये तो अहवाल मा. स्थायी समिती समोर सादर केलेला आहे आणि त्यानुसार विभागाला कारवाई करण्यासाठी स्थायी समितीने आदेश दिलेला आहे. आता विषय राहीला आहे की, १०५ चा मा. सदस्य महोदयांना सांगू इंच्छितो की, सदर वर्षाचा अहवाल, माझ्याकडे दिनांक २१ जानेवारीला २०२१ ला माझ्या कार्यालयात दाखल झाला. त्याच्यामध्ये महीला बालकल्याण आणि लेखेतील पेन्शनच्या संदर्भात काही माहीती अपुर्ण होती, त्यामुळे या सर्वांची माहीती मी पुन्हा पत्राने मागविली . त्यामध्ये महीला बालकल्याणची माहीती मला अप्राप्त झाली आणि लेखा विभागाची मला दिनांक ०२/०३/२०२१ ला माझ्याकडे प्राप्त झाली. त्याच्या नंतर तो लेखा पुर्ण करुन मी २५ मार्च २०२१ मा. स्थायी समिती समोर मान्यतेसाठी ठेवलेला आहे. बैठक न झाल्याने मधी एवढा वेळ गेलेला आहे. तिसरे होते की, सदस्य, महोदयांनी याच्यामध्ये फक्त् रिसीप्टचे दाखवले होते, खरे तर याच्यामध्ये मागच्या बाजुला पान आहे, तो कदाचित त्यांनी पाहीले नसेल तर याच्यामध्ये ज्या काही त्रुटी आहेत, त्या मागच्या वेळेस सुध्दा दर्शविलेल्या होत्या आणि या वेळेस सुध्दा दर्शविलेल्या आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** हे सर्व इतिवृत्तात येत असते, तरी कृपया आपण सांगावे.

**<u>मुख्य लेखा परिक्षक, श्री. मंगेश गावडे:-</u>**सर्व प्रथम डबल एन्ट्री प्रमाणे अकाउंट मेन्टेन केले गेले पाहीजे. तर ते मेन्टेन्स होत नाहीत, तेव्हास सध्या माझ्याकडे बॅलेन्स सिट वैगेरे ते प्राप्त झालेले नाही. तर माझी वैव्यक्तिक अशी सुचना राहील, विनंती राहील की, डबल एन्ट्री सिस्टीम प्रमाणे अकाउंट मेन्टेन करावे. त्याच्या नंतर अर्थसंकल्पीय अंदाज प्रमाणे आपले जे रुटीक आहे, ते फार कमी आहे. म्हणजे आपले जे उत्पन्न आहे, ते फारच कमी येते, मालमत्ता कर, स्थानिक संस्था कर बिल वसुली या आपल्याला मिळणा-या जे सोर्सेश आहेत, त्या भरपूर कमी आहेत. या संदर्भात मी यापुर्वी पण बोललो होतो. एकुण खर्च झालेला आहे, जो आपण फायनल बजेट करीत असतो त्याच्यापैकी ८४.५१ टक्के झालेला आहे. तथापी महीला आणि बालकल्याण आणि दिव्यांग कल्याणकारी योजना यांचे स्वतंत्र लेखाशिर्ष नसल्यामुळे मला त्याच्यावर भाष्य करता आले नाही. जो मॅडेटरी खर्च असतो ५ टक्के, ३ टक्के आता सन २०२०-२०२१ च्या अंदाजपत्रकामध्ये बजेटच्या रेन्यु सॅलरीमध्ये जो आपण मंजूर करतो त्याच्यापेक्षा १६० टक्केने जास्त खर्च झालेला आहे. अंशासमध्ये १२३.४२ टक्के जास्त खर्च झालेला आहे. ॲडमिनमध्ये १०८ टक्के खर्च जास्तीचा झालेला आहे. ॲडमिनीस्टरी १५५.६३ आणि सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये १४५.५८ टक्के खर्च मंजुर करतो त्याच्यापेक्षा जास्त झालेला आहे. म्हणजेच एकंदरीत आपण सुधारीत अंदाजपत्रकात काही हेडसमध्ये जास्तीचा खर्च झालेला आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** आपण सभापती नाहीत, मला बोलू दया, पहीले म्हणजे तुमच्यासाठी मी सेक्शन १०६ वावून दाखवतो. रिपोर्ट माय दि चिफ ऑफिसर उपलब्ध असलेली कामे ती इनव्हली मटेरिअल इन फॉरच्युनेटली ऑर इन ॲबिलिटी वूच ही मी इच एनीटाईम आफ दि एक्सफर्डीचर ऑर दि रिकव्हरी ऑफ मनी बी टू दि कार्पोरेशन ऑर इन दि म्युनसिपल अकाउंडस तुम्हांला इमिडेटली आमच्या समोर आणायचे आहे, खर्चात असेल किंवा यायचे असेल ती माहीती आम्हांला आता पर्यंत दिलेली नाही. आता तुम्हीच सांगितले आहे, जसे तुम्ही परिस्थिती सांगितली आहे, यामध्ये तीन नंबरमध्ये आपण लिहीले आहे की, मालमत्ता कर विभाग, यामध्ये आपण टॉवर्स चा आणि जी.आय.एस. मॅपिंगचा सार्वजनिक बांधकाम विभाग वसुली करतात ओ.एफ.सी. केबलचा कुठेच उल्लेखच केला नाही. ही गोष्ट आम्ही स्थायी

समितीमध्ये आयुक्तां समोर परत परत सांगितले आहे. ओ.एफ.सी. केबलचा जो टार्गेट आहे, तो पुर्णच होत नाही. नगररचनाकार विभागाला आपण जे टार्गेट दिला आहे तो पण पुर्ण होत नाही, टॅक्स विभागाचा टार्गेट कधीच पुर्ण होत नाही. फक्त् चार ओळीचे तेच लिहीत आहेत.

**मुख्य लेखा परिक्षक, श्री. मंगेश गावडे:-**मा. सभापतीजी, आपली १०० टक्के वसुली झालेली नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**आपण याबाबतीत काय एक्शन घेतली आहे?

**मुख्य लेखा परिक्षक, श्री. मंगेश गावडे:-**या बाबत माझे अभिप्राय आहेत, एल.बी.टी. डिपार्टमेंट त्या बददल सांगू शकेल. कारण त्या बाबतीची उचित कार्यवाही त्यांना करायची असते.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**आता आपण सांगितले की, सन २०२०-२०२१ च्या अंदाजपत्रकाच्या हिशोबाने लाइट विभाग १०८ टक्के, पब्लिक हेल्थ सार्वजनिक बांधकाम १९२ टक्के, टेकनिकल १५५ टक्के, चिफ लाईट ११३ टक्के, पब्लिक हेल्थ ६८५ टक्के, गार्डन इन्प्रुमेंट ११२ टक्के, एम.डब्ल्यु ११७ टक्के, अंडरग्राउंड १२३ टक्के, स्कुल विभाग १७२ टक्के, पाणी पुरवठा १००.२८ टक्के आता आपल्याकडे बजेट कन्ट्रोल रजिस्टर असतो, एस्टीमेट आपल्याकडे येत असतात की आपण यामध्ये १० करोड रुपये ठेवले आहेत. ज्या वेळेस जास्त खर्चाची मंजुरी येत असते, ते प्रस्ताव आपण मंजूर कसे करतात. हा खर्च आपण पोस्ट ऑडीट केले असेल आणि प्रि ऑडीट केला असेल, प्रिऑडट होते तर परंतु आपल्याकडे होत नसेल. जेव्हा कोणतेही एस्टीमेट बनतात ते अकाउंटकडून ऑडीटला जातात. आपल्याकडे बजेट कन्ट्रोल रजिस्टर आहे. ते संगणकीय आहे. आपल्याला फंडामध्ये एक रोड बनवायचा आहे, १० करोड रुपये ठेवले आहेत आणि आपल्याकडे ११ करोडची एस्टीमेट आले तर आपण ॲप्रुल कसे केले? याचा अर्थ असा आहे की, आपण बजेट कन्ट्रोल रजिस्टर बघतच नाहीत. तर हा जास्त खर्च कसा केला, तुम्हीच लिहीत आहेत. १७२ टक्के सार्वजनिक बांधकाम विभागाचे झाले, ॲडमिनीस्टर १५५ टक्के झाले बजेटपेक्षा जास्त खर्च होणे हा एक खुप मोठा प्रश्न चिन्ह आहे की, आपण खर्च कुठून केला आहे? बजेटमध्ये प्रोव्हिजन नाही आहे. त्याच्यापेक्षा जास्त खर्च कसा झाला?

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** आता याच्यावर भरपूर चर्चा झालेली आहे, तुम्हांला चर्चा करायची नसेल तर पास करुन टाका बाकीचे पण विषय महत्वाचे आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**तुम्ही म्हणतात की, अकाउंट डिपार्टमेंटकडून लवकर येत नाही, तुम्ही सांगा की, त्यांनी कधी पर्यंत डिटेल दिले आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** त्यांनी सांगितले आहे ना, की प्रत्येक आठवडयाला देण्यात येईल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** माझा एक प्रश्न आहे की, आता बजेटमध्ये १०० टक्के ते १५५......

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** आम्ही मतदानाची मागणी करीत आहे.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-** आपण त्याला दुरुस्त करा.

या वेळी काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते समजून आले नाही.

**मुख्य लेखा परिक्षक, श्री. मंगेश गावडे:-**मा. सभापती महोदय, आता जो मा. सदस्यांनी प्रश्न विचारल आहे की, बजेट कन्ट्रोल रजिस्टरपेक्षा जास्त खर्च झालेला आहे. असे तसे तर या बददल मी नम्रपणे सांगू इच्छितो की, बजेट कन्ट्रोल करणे पुर्णपणे जबाबदारी त्या विभागाची आणि लेखा विभागाची आहे. त्या संदर्भात पुर्ण सिस्टीम ऑन लाईन आहे. त्याचे पासवर्ड फक्त त्या संबंधित विभागाच्या एचओडीला यांचेकडे आहे. त्यामध्ये दुसरा माणूस कोणी ढवळाढवळ करु शकत नाही, मुददा क्रमांक एक आता हा जो झालेला आहे, कुठलेही काम बजेट नसतांना मंजूर झालेला नाही. कारण ऑलरेडी

वरील तक्त्यात नमुद माहीती नुसार उल्हासनगर-१ प्रभाग क्र.३ येथील खुनी खड्डा येथे कंपाउंड वॉलचे काम करणे या कामाकरीता निम्न निविदाकार **मे. शिवानी कन्स्ट्रक्शन** यांनी दिलेले दर **नियोजीत दराप्रमाणे (AT PAR)** दर सादर केले आहेत व सदरचे दर निम्न आहेत. **मे. शिवानी कन्स्ट्रक्शन** यांना दोन टक्के सुरक्षा अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.

तरी **मे. शिवानी कन्स्ट्रक्शन**यांची निम्न दराची निविदा मान्य करण्यास व महाराष्ट्र महानगरपालिकअधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अंतर्गत मा.आयुक्त यांचे स्तरावर **मे.शिवानी कन्स्ट्रक्शन**यांचेशी संविदा करणेकामी स्थायी समितीच्या पटलावर मान्यतेस्तव सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.९७** — **दिनांक : १७/१२/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार**उल्हासनगर-१ प्रभाग क्र.३ येथील खुनी खड्डा येथे कंपाउंड वॉलचे काम करणेसाठी** निम्न दराचे निविदाकार **मे. शिवानी कन्स्ट्रक्शन** यांचेशी संविदा करणेस **मान्यता देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ३ वाचून दाखवितात.

---

## ➪ विषय क्र ३ :— माहे एप्रिल 2021 ते सप्टेंबर 2021 अखेरचा जमा खर्चाचा अहवाल

---

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मा. सभापतीजी जर आपण माझा माईक जरी बंद केला, तरी माझे बोलणे कोणीच थांबवू शकत नाही. मी काही गोष्टीवर आपले लक्ष आकर्षित करु इच्छितो की, एम.सी.ए. ची रिपोर्ट आहे, म्युनसिपल चिप ऑडीटर त्यांचा एक रिपोर्ट आहे, माहे एप्रिल, २०२० ते मार्च २०२० पर्यंत एक वर्षाचा संपुर्ण अहवाल होता. आम्ही ठराव क्रमांक ३२ दिनांक १५/०७/२०२१ स्थायी समितीमध्ये हा विषय होता. आयुक्त साहेब माझे बोलणे जरा लक्षपुर्वक ऐकाल तर मला चांगले वाटेल. दुसरा त्यांची रिपोर्ट आहे माहे एप्रिल २०१९ ते मार्च २०२० तो पण स्थायी समिती ठराव क्र.०१अ दिनांक ०७/०७/२०२१ तिसरा आहे, माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२१ ठराव क्र. ३६, दिनांक २०/०८/२०२१ माहे एप्रिल, २०२१ ते जुलै २०२१ स्थायी समिती ठराव क्र. ४६ दिनांक २७/०९/२०२१ माहे एप्रिल २०२१ ते ऑगस्ट २०२१ स्थायी समिती ठराव क्र. ६६ दिनांक २८/१०/२०२१ आणि आता ऍटम नंबर ३ माहे एप्रिल २०२१ ते सप्टेंबर, २०२१ चा अखेरचा जमा खर्चाचा अहवाल. या सर्व अहवालामध्ये काहीच वेगळे नाही. जसे आकडे दिले गेले आहेत, लेखा विभागाकडून दिले आहेत, तसेच आकडे या रिपोर्टमध्ये टाकले आहेत आणि माहे एप्रिल, २०२१ ते सप्टेंबर, २०२१ अ, ब, क, या मुळ अंदाजपत्रकात ज्या फिगर अपेक्षित होते आणि सन २०२१ मध्ये एवढी रक्कम आली आहे. जो टोटल ३३ टक्के आहे. माहे सप्टेंबर, २०२१ रोजी, एवढी रक्कम जमा झाली आहे आणि टोटल रक्कम एवढी आहे.सदर जमा मुळ अंदापत्रक २.९७ एवढी आहे. अर्थसंकल्पात नमुद केलेल्या बाबीमध्ये खालील विभागाची उत्पन्न वाढण्याची ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. एक मालमत्ता विभाग, सॉरी मालमत्ता कर विभाग, पाणी पुरवठा विभाग हे मा. सभापतीजी मी आपल्याला रिपोर्ट देत आहे, काही रिपोर्ट मी आयुक्तांना पण देतो. आपण वाचून बघा आयडेंटीकल सेम रिपोर्ट आहेत. मालमत्ता कर नविन ॲसेसमेंट करायला पाहीजेत. अनाधिकृत कनेक्शन कापायला पाहीजेत. हे करायला पाहीजे ते करायला पाहीजे. दोना पॅराचा अहवाल आहे. शेवटी जे कनुयुजन आहे, या मध्ये लिहील आहे की, सर्व प्रकारची शासकीय देणी अदा करण्यात यावी. प्रत्येक रिपोर्ट तसाच आहे. ही फिगर लेखा विभागाकडून यांच्याकडे येते, ते फॉरमेंटमध्ये टाकतात आणि जो यांची रिपोर्ट बनली आहे, ती सेम रिपोर्ट प्रत्येक वेळी देत असतात. याचा अर्थ काय आहे की, यांनी रिपोर्ट बनवलीच नाही. ही रिपोर्ट इनकम्पलिट आहे. यांनी लिहीले आहे की, गव्हर्नमेंट डयुज पेड केली पाहीजे. परंतु हे लिहीले नाही की, आज पर्यंत गव्हर्नमेंट डयुज पेडींग किती आहेत? ज्या वेळी मा. आयुक्त श्री. सुधाकर देशमुख यांनी व्हाईट पेपर दिले होते की, त्यांनी १०० करोड किंवा ४०० करोड सांगितले होते. हा डयुज गव्हर्नमेंटचा आहे. आपण प्रॉपर्टी टॅक्स घेत असाते. प्रॉपर्टी टॅक्सचे दोन टॅक्स आहेत. ते आपण घेत असतो. तर गव्हर्नमेंटला पे केले किंवा नाही केले, जसे की, जी.एस.टी.चा पेमेंट आपण कट करीत असतो. इनकम टॅक्सचा टी.डी. एस. कट करीत असतात. तो गव्हर्नमेंटचा डयु पे केला किंवा नाही केला गेला आणि कोणते गव्हर्नमेंटचे डयुज थकबाकी आहे, त्याची सविस्तर माहीती दयायला पाहीजे होती आणि ती थकबाकी का आहे? ही पण माहीती या महासभेला दयायला पाहीजे होती. एवढया वेळेपासून सेक्शन १०६ ची रिपोर्ट आली नाही. याचा अर्थ मी असा समजू का यांना कोणतीही मिस एप्रोप्रिएशन मिळाले नाही. देन इट मन ऑल इज वेल सर्व काही ठिक चालले आहे आणि जर सर्व काही ठिक चालले आहे, तर मग लोकल सेल्फ गव्हीर्नमेंटचा व सी.ए.जी. चा जो रिपोर्ट येत असतो, त्यामध्ये आपले तयार का केले नाही. प्रत्येक वेळी लिहीले जाते की, इनकंप्लीट प्रॉपर्टी टॅक्स इनकम नाही आहे. एम.आर.टीपीमध्ये आम्ही जो उददेश दिला आहे, तो नाही आहे. प्रॉपर्टी टॅक्समध्ये जी आपली थकबाकी आहे. ते वसुल होत नाही. आम्ही महासभेमध्ये ठेकेदाराला एक वर्षाचा एक्सटेंशन दिले आहे. त्याचे कोणतेही स्पेशल बिल आज पर्यंत निघाले नाही. तुम्हांला माहीती माझ्या पहीले असेल. प्रॉपर्टी टॅक्सचा कोल्बोला काम दिले आहे, त्याचे काम थांबवले होते, एक्सटेंशन नसल्यामुळे त्याला एक्सटेंशन देवून सुध्दा वेळ झाला आहे. परंतु मला जी माहीती दिली आहे की, त्याचे एक्सटेंशन दिल्या नंतरही एक पण स्पेशल नोटीस मिळाली नाही. आता स्पेशल नोटीस मिळणार नाही, लोक ऑब्जेक्शन सजेशन घेणार नाहीत, त्याची हिअरींग होणार नाही. हिअरींग झाल्या नंतर स्पींकींग ऑर्डर पास होणार नाही. तर आपण बिल कसे काढणार? आम्हांला आपण इथे प्रेजेंटेशन दाखवले की. आपण ४०० फुटच्या जागी ८००० हजार फुट शोधली आहे. ५०० फुटच्या जागी ५००० शोधली आहे. शोधून आपण जर डब्यामध्ये बंदकरुन ठेवली आहे आणि आज डिसेंबर संपणार आहे. या वेळी जर आपण स्पेशल नोटीस काढत नाहीत ज्या सन २०१९ मध्ये स्पेशल नोटीस काढायला पाहीज्या होत्या. नोटीस निघाल्या पण होत्या पण कोरोनामुळे थांबल्या गेलया, तर आज इन्कम होहणार कसे? आज काही व्यापारी लोकांचे मंडळ घोषणा करीत आहेत की, आमची मागणी आहे की, आम्हांला अभय योजना दया. तर आपण कमीत कमी क्लीयर करा की अभय योजना कोणतीच दिली जाणार नाही. जर देणार आहेत तर आपण घोषणा करा की, आम्ही देत आहेत. त्यामुळे उत्पनावर फरक पडत आहे. दुसरी गोष्ट म्हणजे ही जो रिपोर्ट आहे, तो सप्टेंबरची रिपोर्ट आहे. ऑक्टोंबर, नाव्हेंबर निघून गेले आहेत. दोन महीन्याची रिपोर्ट अजून आला नाही. तर मला म्युनसिपल चिफ ऑडीटर यांनी सांगावे की, त्यांना डाटा कधी मिळाला आहे आणि अजून पर्यंत रिपोर्ट का दिला गेला नाही?

**<u>प्र. मुख्य लेखा परिक्षक, श्री. विजय खेडकर:-</u>** नमस्कार सर, हा जो रिपोर्ट आहे, तो सप्टेंबर अखेरचा आहे, आपल्याला ऑक्टोंबर, नोव्हेंबरची माहीती उपलब्ध झाली का आपण लगेच रिपोर्ट तयार करु.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** माहीती प्राप्त झाली आहे का?

**<u>प्र. मुख्य लेखा परिक्षक, श्री. विजय खेडकर:-</u>** अजून नाही झाली सर.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** नाही झाली तर का नाही झाली?

**<u>प्र. मुख्य लेखा परिक्षक, श्री. विजय खेडकर:-</u>** सप्टेंबरची माहीती प्राप्त झाली त्याच्या नंतर लगेच अहवाल तयार केला.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** कधी प्राप्त झाला?

**<u>प्र. मुख्य लेखा परिक्षक, श्री. विजय खेडकर:-</u>** १६ नोव्हेंबर, २०२१ ला.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** आता १६ नोव्हेंबर ते डिसेंबर आपण घेऊन आले. ते नोव्हेंबर मला माहीती आहे की, आपल्याला आयुक्तांनी क्लियर कट आदेश दिले आहेत, प्रत्येक महीन्याचा अहवाल जसे ही पुर्ण होइल, हे बघा आपण लेखा विभागामध्ये टॅली सॉफटअर आहे, जो आपल्या स्टाफ कडून डिझाईन केले आहे. दुसरे आपल्याकडे सर्व ऑडीट सिस्टम आहे, हया सर्व सुविधा आणि संगणकीय आपल्याकडे आहे. एवढे झाल्या नंतरही जर आपल्याकडे डाटा उशिराने येत असेल, तो तुमचा प्रॉब्लेम आहे, आमचा प्रॉब्लेम नाही. सप्टेंबरचा रिपोर्ट ऑक्टोंबरमध्ये पाहीजे, ऑक्टोंबरचा रिपोर्ट नोव्हेंबरमध्ये पाहीजे, नोव्हेंबरचा रिपोर्ट डिसेंबरमध्ये पाहीजे. सेक्शन १०५ नुसार प्रत्येक आठवडयाला रिपोर्ट यायला पाहीजे. जर आपण सांगत आहेत की, आपल्याकडे स्टाफची कमतरता आहे, तर हे एक्सक्युज करुन आपण तुमच्या जबाबदारी पासून पळू शकत नाहीत. नाही तर आपण आयुक्तांच्या मार्फत किंवा गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्राला लिहा की, सेक्शन १०५ अमेंयमेंट करा. लोक काम करु शकणार नाहीत. दुसरी गोष्ट आपल्याकडे रिपोर्ट आला आहे, रिपोर्ट आले नाही तर कॅफोने खुलासा करायला पाहीजे की, अजून ऑक्टोंबर नोव्हेंबरचा रिपोर्ट का दिला नाही?

**<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:-</u>** सन्माननिय सभापती, मा.आयुक्त, सर्व सन्मानिनिय सदस्य, सप्टेंबर इन्डपर्यंतची माहीती लेखा परिक्षण विभागाला दिलेली आहे. ऑक्टोंबर आणि नोव्हेंबरची माहीती सोमवारी त्या विभागाला देण्यात येईल. आमची लेखा विभागाच्या लिपीक होत्या, श्रीम. जागृती मॅडम त्यांची मुलगी ॲडमीट असल्यामुळे...

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** ऑक्टोंबरची माहीती नोव्हेंबरमध्ये दयायला पाहीजे. नोव्हेंबरची पण दिली नाही, ती डिसेंबरमध्ये दयायला पाहीजे, ती अजून पर्यत दिली नाही. तर आपण सोमवारी देणार का? असे तर नाही आपण देणारच नाहीत, आता पर्यंत दोन महीन्यामध्ये का दिली नाही? त्याचे कारण काय?

**<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:-</u>** आमच्याकडे ज्या लिपीक होत्या, त्यांची मुलगी ॲडमीट होती म्हणून त्या येऊ शकल्या नाहीत. त्यामुळे उशिर झाला आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** लिपीक कामावर येत नाही

**<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:-</u>** जागृती मॅडम आहेत, त्या सॉफटवेअर हॅन्डल करतात.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** कधी पासून येत नाही?

**<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:-</u>** एक महीन्यापासून येत नाहीत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** एक महीन्या पासून का दिड महीन्यापासून.
**<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:-</u>** दिड महीन्यापासून

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** चौकशी करा, आली आहे किंवा नाही.

**<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:-</u>** आली आहे, जॉईंड झाली आहे. सोमवारी रिपोर्ट मिळेल सर.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** आता आयुक्त् साहेब, एक दिवस पण जर हेड क्वाटर सोडतात तर अतिरिक्त आयुक्त यांना चार्ज देवून जातात. अमेरीकेचे राष्ट्राध्यक्ष २४ तासासाठी बाहेर गेले होते, तर तर व्हाईस प्रेसीडेंटला चार्ज देवून गेले होते आणि आपली लिपीक एक महीना, दोन महीन्या पासून नाहीत, तर कोणाला तरी चार्ज दिला पाहीजे. दुसरा माझा एक प्रश्न आहे की मॅन्युअल ज्या पावत्या काढल्या जातात, जसे की, हॉकर्सची पावती, डिस्पेशंरीची पावती, प्रॉपर्टी टॅक्स ची पावती हया काही पावत्या मॅन्युअल काढल्या जातात. तर काय प्रत्येक पावतीची आपण वेरीफाय करतात का? कारण की भरपूर वेळा घोटाळा उघड झाला आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** तुम्ही तीन महीन्याचा रिपोर्ट देवू शकत नाहीत, तर एक महीन कमिशन नाही घेतले तर.....

**<u>प्र. मुख्य लेखा परिक्षक, श्री. विजय खेडकर:-</u>** सर पावतीच्या बाबतीत जे आहे. त्यासाठी आता परिपत्रक तयार करायला घेतले आहे. माझ्याकडे चार्ज आल्यापासून पावती आपण चेक करु शकणार नाहीत, पण आपण दोन शॅम्पल चेक शकणार आहेत. ऑडीटच्या दृष्टीने आणि दोन महीन्याचे पुर्ण चेक करणार आहोत. दोन महीन्याचे ऑडीट करणार आहोत. पावतीच्या बाबतीत आणि प्रेऑडीट पण होते आणि पोस्ट ऑडीटच्या दृष्टीने आपण सर्व विभागांना परिपत्रक काढले आहे. त्यांना स्टॅम्प डयुटी रिकव्हरीसाठी आपण सगळया विभागांना स्टॅम्प डयुटीचा जो ॲक्ट आहे, तो दिलेला आहे. याच्या पहीले आपण १०० रुपयावर फक्त ॲग्रीमेंट करायचो तर आपण ५०० रुपयावर स्टॅम्प केला आहे आणि दुसरे म्हणजे जेव्हा पासून माझ्याकडे चार्ज आला आहे, तेव्हा पासून दोन तीन परिपत्रक काढून विभागाला कळविले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाला डिफेक्ट लायबिलिटीसाठी नविन जी.आर. आला होता. खरे तर त्याची अंमल बजावणी दोन वर्षापुर्वी व्हायला पाहीजे होती. एक एक वर्षाचा डिफेक्ट लायबिलिटी पिरीयड आहे. तोही त्यांच्याकडून होत नव्हता. त्यांना ते परिपत्रक दिले आहे आणि दुसरे विमाच्या बाबतीत जे आहे, तेही परिपत्रक त्या विभागाला दिले आहेत, ज्या काही चार पाच मेजरमेंट आपल्या चालू होत्या या दोन महीन्यात त्यांना पाच ते सहा पत्र दिले आहेत.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** माझा असा विचार आहे की, हा जो रिपोर्ट आहे, तो कॉपी पेस्ट केले आहे आणि इनकम्पलिट आहे. तर माझे आयुक्त साहेबांना निविदन आहे की, हा रिपोर्ट आपण परत घ्या आणि म्युनसिपल चिफ ऑडीटरला सांगा की, हा रिपोर्ट पुर्ण चांगल्या प्रकारे बनवून आम्हांला परत देण्यात यावे. यामध्ये जे लिहीत आले आहेत, जो पॅरा त्यांनी पहीलेच बनवून ठेवला आहे. यामध्ये फक्त फिगरचा बदल आहे. मी तीन रिपोर्ट आयुक्त साहेबांना दिले आहेत. हे तीन रिपोर्ट सभापतींना दिले आहेत. तर हे इट इज दि ओनली आय वॉच माझी विनंती ही आहे की, जे बाकीचे विभाग आहेत, आज मालमत्ता विभाग आहे, या विभागामध्ये भरपूर इनकम आहे. होर्डीगची इनकम आहे, ॲडवरटायझिंग इनकम आहे. आपल्याकडे भरपूर इनकम आहेत. त्याचे कुठे पोहचले कुठ पर्यंत इनकम आहे.हॉट ऑफ एक्सपेंडीचर, एक्सपेडीचरच्या बाबतीत आपण एक शब्द पण लिहीले नाही की, पाच पैसे इथे खर्च करायला पाहीजे होते, आपण १० पैसे खर्च केले आहे. नाही तर सिंगल वर्ड यु आर रिटर्न फॉर दॅट की इथे एक रुपया खर्च जास्त केला आहे, एक रुपया कमी केला आहे. असे का केले हे का केले? ते का केले? कुठे पण आपण खर्चाच्या विषयी काहीच सांगितले नाही. आपा लिहीले आहे ग्रॅडस मिळाली आहे, ग्रॅंड कोणती कोणती मिळाली आहे. आपल्याकडे १५ व्या वित्त आयोगाचे पैसे आहेत, ते एप्रिल महीन्यापासून येऊन पडले आहेत. हा मुददा मी पहीले पण स्थायी समितीमध्ये उचलला होता आणि आपण ठराव पण केला होता की, हे किती पैसे आले आहेत आणि कोणकोणत्या कामासाठी आले आहेत आणि त्यासाठी आपण काय काय प्रबंध केले आहे? ती माहीती आम्हांला दयायला पाहीजे. ती आज पर्यंत मिळाली नाही. तर आपल्याकडे कोणती ग्रॅंड आली आहे, त्यामधून किती पैसा खर्च झाला आहे आणि किती पैसा बाकीआहे? किती पडून आहेत?

**<u>प्र. मुख्य लेखा परिक्षक, श्री. विजय खेडकर:-</u>** सर हा जो बॅलेन्सचा आहे, ते शीट बनवत होते, बॅलेन्स शिट बनत आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** सर बघा, मी बोलू इच्छितो एम.सि.ए. बरोबर, त्यांच्याकडून आम्ही समाधानी नाही झालो तर आम्ही आयुक्त साहेब यांच्या बरोबर बोलू. आपण आपल्या लिपीकाचे नाव घेतात तर मला वाटते की, आपण त्यांच्यावर अवलंबून आहेत. तुम्हांला त्यांच्याकडून काम घ्यायचे आहे. कसे काम घ्यायचे आहे, ती तुमची जबाबदारी आहे. नाही तर एक्झीक्युटीव पॉवर मला दया. मी आपल्याला करुन दाखवतो कोणते काम कसे होते. परंतु महाराष्ट्र म्युनसिपल ॲक्टमध्ये माझ्याकडे एक्झीक्युटीव पॉवर नाही. फरक तर एवढाच आहे ना. तर माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे किंवा सुचना म्हणा तुम्ही जे पण समजा. हा रिपोर्ट परत मागे घेऊन चांगल्या प्रकारे कारण की, सहा महीन्यामध्ये रिवेन्यु यायला पाहीजे. ते आले नाही, हे मान्य करायला पाहीजे. जो लॉस झाले आहे, ते मान्य करीत आहेत. गव्हर्नमेंटचे डयुज सांगत नाहीत, गव्हर्नमेंटचे डयुज दयायला पाहीजे. परंतु कधी दयायला पाहीजे होते. का दिले नाहीत? कोणी थांबवले हा संपुर्ण अहवाल आला पाहीजे, हा इनकम्पलीट आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** मा. आयुक्तजी, राजेश वदारिया यांनी सांगितले तुम्हांला ज्या सुचना दिल्या, आता तुम्ही ऑक्टोंबर आणि नोव्हेंबर दोन बाकी राहीले आहेत ना, आता हे मागे घ्या आणि सगळे एकत्र आणा आणि तो विषय पुढच्या मिटींगला संपवून टाका. ऑक्टोंबर आणि नोव्हेंबरचे एकत्र करुन घेऊन या.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. आयुक्तजी, परत घेऊन या पण मला बोलायचे आहे. हा जो रिपोर्ट बनत आहे, हा आपण स्थायी समितीच्या सदस्यांना देतात. अजून कोणाला हा रिपोर्ट दिला जातो. जर स्थायी समितीच्या सदस्यांना मिळाले तर इतर अधिका-यांना पण जायला पाहीजे. यामध्ये ज्या त्रुटी राहून जातात, जसे की, आपण रिपोर्टमध्ये लिहीले आहे की, मालमत्ता कर विभागाच्या बाबतीत, तर मालमत्ता विभागाच्या बाबतीत ज्या त्रुटी आहेत, त्यांना कोण दुर करणार? जसे की, आपण लिहीले आहे की, अर्थसंकल्पात मालमत्ता कर विभागाकडून माही एप्रिल, २०२१ ते डिसेंबर २०१ मध्ये एकुण रक्कम १३८ करोड आपल्याला पाहीजे. ते १३८ करोड यायला पाहीजे. परंतु आपल्याकडे आले आहेत

फक्त् १४ करोड रुपये जो की फक्त १०.१५ टक्के आहे. ही रिपोर्ट आपण तर पाठवून दिली, डॉक्टरांनी आजार सांगितला आहे, सोनाग्राफीवाल्यानी आणि एक्सरेवाल्यानी. परंतु याच्यावर उपचार कोणी तरी डॉक्टरच करेल ना. आता या १३८ करोड पर्यंत कसे पोहचू शकतो? त्यासाठी काय करायला पाहीजे? त्यासाठी जे टॅक्स विभागाचे संबधित अधिकारी आहेत, टॅक्स विभागाची रिक्व्हरी फक्त् १० टक्के आली आहे. पण महानगरपालिका फक्त् दोन गोष्टींवर अवलंबून आहे. एक तर सरकारकडून जो ग्रँड येत असतो आणि टॅक्स व पाण्याचे बिल आपण जो वसुल करीत असतो आणि नगररचना विभागाकडून जर काही प्लॉन पास झाले तर पैसे येतात. जर १३८ करोड मधून फक्त् १० टक्के येतील तर आपला बजेट ३१ मार्च पर्यंत पुर्ण करु शकतच नाही. आता डिसेंबर संपला आहे, १० टक्केवरुन जास्तीत जास्त १५ टक्के झाले असेल. नंतरआपण बघू. बाकी राहीले जानेवारी, फेब्रुवारी, मार्च मी मा. आयुक्तां बरोबर या विषयावर चर्चा केली होती. दिवाळीचा जो कालावधी असतो, त्या वेळी लोकांकडे पैसे असतात. लोक भरण्यासाठी तयार होतात. एक प्लॅट टू रुम हॉल ज्यांची पाण्याच्या बिला बरोबर टॅक्सचे बिल ६ हजार किंवा ८ हजार पर्यंत आहे, उल्हानगर महानगरपालिकेमध्ये ६ हजार किंवा ८ हजार, किंवा ९ हजार मध्ये पाण्याचे बिल ३६०० मिळून येते आणि लाईटचे बिल ९ ते १० हजार असते, एक महीन्याचे. परंतु लाईटचे बिल एक पण महीन्याचे डयु राहत नाही. प्रत्येक महीन्याला ९ हजार रुपये लाईटचे बिल करु शकतात. परंतु आपले टॅक्स ९ हजार रुपये एक वर्षाचे भरत नाही. याचे कारण आहे की, आपण लोकांपर्यंत जात नाही. लाईटवाल्यांना १२ महीन्यामध्ये १२ वेळा जावे लागते. प्रत्येक प्रॉपटीसाठी जावे लागते आणि प्रॉपर्टी तेवढयाच आहेत सर. मा. आयुक्तजी जेवढया लाईटच्या प्रॉपर्टी आहेत, तेवढयाच आपल्या प्रॉपर्टी आहेत. थोडा फार फरक असेल. एका घरामध्ये दोन लाईट मिटर असतील, परंतु हे लोक प्रत्येक महीन्याला पोहचतात आणि प्रत्येक महीन्याला पैसे जमा करतात. आपल्याला वर्षातून एकच वेळा जायचे आहे. आपल्याला एक वर्षे ९ हजार घ्यायचे आहे, ते एका महीन्याला ९ हजार घ्यायचे आहे आणि घेतात पण.त्यांचे थकत राहत नाही. परंतु आपले १ करोड, २ करोड थकीत राहते. ते अपण जमा करु शकत नाही. परंतु आपण प्रत्येक वर्षी १३८ चे लक्ष आणि आपण प्रत्येक वर्षी १३८ चे लक्ष पार करु शकत नाहीत. तर माझा या ऑडीटला पण विरोध नाही. ऑडीटच्या विषयी राजेशजीने सांगितले, भालेराव यांनी सांगितले की, व्यवस्थीत करायला पाहीजे. त्याच बरोबर ज्या विभागाचा अहवाल ऑडीट डिपार्टमेंट देत आहे, त्या अधिका-यांनी लक्ष दिले पाहीजे आणि मा. आयुक्तांना निवेदन करतो की, बाकीची कामे सोडून आपल लक्ष डिसेंबर आणि जानेवारीमध्ये फक्त् टॅक्सवरच असले पाहीजे. जर आम्ही कोणाच्याही घरी एक वेळा, दोन वेळा जाणार आहेत, तर मला पुणर्र विश्वास आहे की, प्रत्येक जण टॅक्स भरेल. असे नाही की, कोणाच्या जवळ टॅक्स भरण्यासाठी ९ हजार नाहीत. ते लोक प्रत्येक महीन्याला ९ हजार लाईटचे बिल भरतात. परंतु टॅक्स भरत नाहीत. त्याचे कारण हे आहे की, आपले लोक तिथे जातच नाहीत आणि आपण आज बिल पण व्यवस्थित त्यांना पोहचू शकत नाहीत. आपण काही वेळा महीलांना बिल दिले त्यांनी बिल वाटप केले, दुस-या पध्दतीने पोहचवण्यात आले. परंतु आपल्याकडे चांगली व्यवस्था नाही. या व्यवस्थेला कशा प्रकारे ठिक अरण्यात यावे. तर ही टॅक्स रिकव्हरी प्रतेक दिवशी ७० लाख, ७५ लाख, ८० लाख मिळाले तर आपण १३८ करोड लक्ष गाठू शकतो. नाही तर आम्ही पोहचू शकत नाही. कारण की, आपल्याकडे ९० दिवस आहेत. ९० दिवसामध्ये ९० करोड वसुल झाले पाहीजेत. तर सर ही गोष्ट लक्षात ठेवा. ज्या संबंधित मॅडम आहेत त्यांच्या बरोबर पण चर्चा केली होती, एक बैठक घेतली होती की, ५ लाखापेक्षा टॅक्स कोणाचा आहे? एक लाखापेक्षा टॅक्स कोणाचा आहे? अशा लोकांना पण टार्गेट करायचा आहे. १ लाखाच्यावर आपल्या ५ हजार प्रॉपर्टी आहेत. जर आपण ५ हजार लोकांकडून टॅक्स घेतले तर कमीत कमी ५ करोड रुपये आपल्याला येतील. परंतु आपण या गोष्टींवर लक्ष देत नाहीत.एक तर हे केले पाहीजे आणि माझा दुसरा उददेश आहे की, आपण कोल्बो ग्रुपला जे काम दिले आहे, ते १ एप्रिलच्या नंतर जे बिल बनतील, ते बिल नविन बिल बनायला पाहीजेत. कारण की, आपण ५० करोड, ७५ करोडची जी वाढ पाहीजे ते आपल्याला टॅक्समध्ये वाढवून मिळतील. ते आपल्याला सन २०२२ मध्येच वाढवून मिळाले पाहीजेत. नाही तर एक वर्षे अजून मागे होऊन जाईल. त्यासाठी आपल्याला काय करायचे आहे? जी रिपोर्ट आपल्याकडे आले आहे, त्यांना नोटीस इश्यु करण्यात याव्यात. समजा १० टक्के, १५ टक्के कोल्बोचे काम अजून बाकी आहे, ते काम चालूच राहील. त्याचे रिपोर्ट ऑलरेडी एक वषापुर्वी, दोन वर्षापुर्वी आले आहे. आपण एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे तर त्यांना कमीत कमी नोटीस गेली पाहीजे. जी चोरी आहे, जी चोरी पकडण्यात आली आहे, त्या चोरीचे बिल नोटीसच्या स्वरुपात जायला पाहजे. त्याचे ऑब्जेक्शन काय येते हे बघायला पाहीजे आणि आपल्याला १ एप्रिल पर्यंत हे काम क्लीयर करायला केले पाहीजे. यामुळे ५० करोड रुपये शहराला वाढवून मिळतील. याच बरोबर आपण अधिका-यांना जर ओरड असेल तर मी आपले अधिकारी श्री. नाईकवाडे यांना धन्यवाद पण देतो. मी काही वर्षापासून भरपूर उप आयुक्त बघितले आहेत. परंतु खरे तर या शहरामध्ये उत्पन्न कशा प्रकारे वाढले पाहीजे? ते खुप मेहनत करीत आहेत, वेगवेगळे प्रस्ताव आणत आहेत. त्यांनी हातगाडीचा पण जो प्रस्ताव बनवून आणला, त्याच्यामध्ये अजून रुपांतर करुन की, आपण निविदा करुन एक फिक्स रक्कम माहीती होईल. आज किती पावत्या बनवल्या जातील पुढे जाऊन पावत्या कमी होतील. स्वभाविकच आहे, रोज आपण दहा हजार गाडयां पर्यंत पोहचू शकत नाहीत. तर वेगवेगळे चार प्रभाग समितीचे टेंडर असतील. दुसरा पार्किगचा पण एक चांगला विषय आणला होता. त्याला विरोध पण झाला. विरोध करणेचे कारण हे होते की, चांगल्या प्रकारे प्रेजेंटेशन झाले नाही. आपण त्याला पण अशा प्रकारे आणायला पाहीजे. प्रत्येक प्रभाग समितीमध्ये ज्या ज्या गाडया रस्त्यावर उभ्या असतात, त्यांच्याकडून पार्किंग चार्ज वसुल करायचा आहे.रोडचे नाव मेंनशन करु नका. रोडचे नाव मेनशन केले तर विरोध होईल की, माझा रोड का टाकला? राजू जग्यासीच्या इथे विरोध होइल की, राम चौक् का टाकण्यात आले, गोलमैदान का टाकले आपल्याला प्रत्येक जागेवरुन घ्यायचे आहे. आपण असे पण करु शकतो की, रात्रीच्या वेळेस जेव्हा गाडया रोडवर पार्किंग केल्या जातात, रात्री १२.०० वाजेपासून सकाळी १०.०० वाजे पर्यंत, त्यांच्याकडून आपण टॅक्स वसुल करा. कमीत कमी

गाडी पार्किंग कोणालाही ऑब्जेक्शन होणार नाही. रात्री १२.०० ते सकाळी १०.०० पर्यंत तो पर्यंत गाडया निघून जातील. आज कार पार्किंग करुन जातात, आठ आठ दिवस कार तेथून हालवत नाही. तिथेच पडून असतात. आता पोलिस डिपार्टमेंटची गाडी, पोलिस ऑफिसच्या बाहेर, ट्राफिक ऑफिसच्या बाहेर तीन महीने एकजण उभी करुन गेला होता. पोलिसाचे बोर्ड लावला होता. एक छोटेसे उदाहरण देत आहे. मी एक नंबर पोलिस विभागाला सांगितले, ए.सी.पी. साहेबांना सांगितले ते बोलले की, गाडी इथून काढण्यात येईल. तर तीन महीने गाडी काढली नाह. संपुर्ण कचरा झाला होता. मेन रोडवर खुर्च्या लावल्या आहेत, परंतु लोक बसू शकत नाहीत. मी त्यांना टवीट केले १५ मिनिटात गाडी तेथून काढण्यात आली. लोक रस्त्यावर गाडया पार्किंग करतात, त्यांच्यावर शुल्क लावले जात नाही. तर हे शुल्क पण लावले पाहीजे आणि आपल्याला पण ऑल पार्टीच्या लोकांनी राजकारणातून बाहेर निघून शहरहितासाठी जर काही करायचे असेल, उत्पन्न वाढवायचे आहे. तर असे येईल की, आम्हांला विकास पाहीजे, वार्डचा विकास झाला पाहीजे. शहरासाठी विकास पाहीजे. या विकासासाठी एका गोष्टीची आम्हाला आवश्यकता आहे. तो आहे निधी तो निधी आणण्यासाठी उत्पन्न वाढवले पाहीजे. तर मी निवेदन करतो की, टॅक्सच्या स्वरुपात किंवा अन्या स्वरुपात आणला पाहीजे. अधिका-यांना मा. आयुक्तजी आपण टार्गेट दया की, प्रत्येक महीन्याला २५ कराड रुपये पाहीजेत. कारण की, आपण प्रत्येक महीन्याला १ करोड आणले तर आपण १०० करोड पर्यंत पोहचू शकतो. त्यासाठी जर काही अधिकारी पाहीजे असतील, नळाचे कनेक्शन कट करा, प्रत्येक घराला व्हिजीट दया. आमचे कोणतेही लोकप्रतिनिधी विरोध करणार नाहीत. प्रभाग समितीमध्ये आपले जे आठ अधिकारी आहेत, त्यांना टार्गेट दया की, प्रत्येक दिवशी १ करोड रुपये यायलाच पाहीजे. एक बैठक लावून मी निवेदन करतो की, याच्यावर लख दिले पाहीजे. हे ऑडीट जानेवरीचे दुस-या महीन्यामध्ये आले तर आम्हांला आनंद होईल.७० टक्के, ८० टक्के रिकव्हरी आम्ही केली आहे, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** सन्माननिय सभापती महोदय, जमनु पुरस्वानी यांनी टॅक्सच्या संदर्भामध्ये मुददा उपस्थित केला आहे. आज टॅक्सच्या उप आयुक्तच नाहीत. मला वाटते टॅक्सच्या संदर्भामध्ये आपण पुढच्या सोमवार, मंगळवारी विशेष टॅक्सच्या संदर्भामध्ये एक बैठक आयोजित करावी. वेळ कमी आहे आणि आपली वसुली फार कमी आहे. त्यामुळे पुढच्या दोन दिवसामध्ये सोमवार किंवा मंगळवार टॅक्सच्या संदर्भामध्ये टॅक्सचे सर्व वसुली अधिकारी, अतिरिक्त् आयुक्त, उप आयुक्त आणि सर्व कर्मचारी अशी एक बैठक मला वाटते स्थायी समितीमध्ये लावण्यात यावी आणि हा अहवाल व्यवस्थितपणे पुढच्या सभेमध्ये मांडा आणि हा विषय मागे घेतला एवढे तरी बोला.

**<u>प्र. मुख्य लेखा परिक्षक, श्री. विजय खेडकर:-</u>** सर आपण ज्या सुचना केल्या आहेत ना, तशा सुधारण करण्यात येतील, तीन महीन्याचा अहवाल, वेगवेगळा महीन्याचा सादर करतो, डिसेंबर अखेर पर्यंत आणि याच्यात ऑडीटच्या ज्या सुचना आहेत, हा जो फॉर्मेट आहे, तो पुर्वीपासून तसाच होता. आता हा विषय मागे घेत आहे.

**<u>महापालिका सचिव:-</u>** हा विषय मागे घेतला आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मी आपल्या इमानदारीची दाद देतो की, कोनीही अधिकारी आपली चुक मान्य करीत नाहीत, आपण सांगीतले की, जो फॉर्मेट होता तो तसाच पुढे चालू होता. यासाठी मी आपल्याला धन्यवाद देतो. खरे बोलण्याची पण एक हिम्मत होते. ती तुमच्यामध्ये आहे.
**<u>महापालिका सचिव:-</u>** विषय क्रमांक ४ वाचून दाखवितात.

---

**⇨ विषय क्र ४ :— उल्हासनगर-३ येथील शांतीनग रस्मशान भुमी येथे डीझेलशव-दाहिनी बसविणे या कामास मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.**

---

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** पास..पास..

**<u>सदस्या, श्रीम. अर्चना करणकाळे:-</u>** मा. सभापती व आयुक्त साहेब, उल्हासनगर-१ मध्ये पण स्मशान भुमीची आवस्था खुपच वाईट आहे. मी दोन वेळा पत्रव्यवहार करुन सुध्दा बजेट नाही म्हणून ते पत्र परत कच-याच्या डब्यामध्ये जाते. तुम्हांला पत्र दिले आहे, तर तिथे स्मशान भुमीसाठी पत्र देण्यात यावे, ही तुम्हांला विनंती आहे.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** आपण आपला प्रपोजल दया,

**<u>सदस्या, श्रीम. अर्चना करणकाळे:-</u>** मी पत्र दिलेले आहे साहेब.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मा. सभापतीजी, मी प्रशासनाकडून पहीले माहीती घेऊ इच्छितो की, मी हे ऐकले होते की, अशा चार शवदाहिनी आपल्याला डी.पी.डी.सी. तर्फे प्रत्येक स्मशानभुमीमध्ये लावून मिळत आहेत. तर तो काय प्रपोजल होता किंवा ऐकण्यासाठी होते.

**<u>शहर अभियंता, श्री.महेश सितलानी:-</u>** मा. सभापतीजी, मा. आयुक्तजी, मा. अतिरिक्त आयुक्त, मा. सदस्यजी आपल्यासाठी माहीती आहे की आपण शववाहिनी शांतीनगरमध्ये बसवणार आहेत. ती आपल्या पैशातून आहे. असे चार

प्रपोजल आम्ही डी.पी.डी.सी. ला पाठवले आहे. प्रत्येक स्मशानभुमीमध्ये एक एक बसवणार आहेत. परंतु मान्यता अजून आली नाही. जेव्हा मान्यता येईल तेव्हा बसविण्यात येईल.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** ओके,

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** तर शिवसेनेचे जे वरिष्ठ सदस्य आहेत, श्री. रमेश चव्हाणजी, श्री. कलवंतसिंगजी, चंद्रशेखर यादवजी, मी त्यांना विनंती करतो की, यासाठी पालकमंत्री यांच्या बरोबर बोलू कारण की, आपल्याकडे पैशाची आधीच कमतरता आहे.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** राजेशजी, उप महापौर पण डी.पी.डी.सी. चे सदस्य आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** होय, माझ्या लक्षात नव्हते, मी त्यांना पण विनंती करतो की, डी.पी.डी.सी. मध्ये पण उप महापौरजी सदस्य आहेत, तर तेथून निधी आण्यासाठी मदत करण्यात यावी. हे पहीले आपण आपल्या निधीमधून करु, जर तेथून निधी आला तर आपण तिकडून घेण्यात यावे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** धन्यवाद सर.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** असा ठराव आपण करु की, पहीले आपण आपला पैसा खर्च करु आणि डी.पी.डी.सी. आपल्याला फंड देत असेल, तर तो डि.पी.डी.सी. तर्फे खर्च करण्यात यावा. असे करुन ठराव बनवू.पहीले आपण आपल्या फंडामधून करीत आहेत, आम्ही मंजूर केले आहे. परंतु डी.पी. डी.सी. चे जेव्हा फंड येतील, तर ते झाले पाहीजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** होय पहीले असेच करा.

**सदस्य, श्रीम.अर्चना करणकाळे:-** सदया तेथे रिपेरींग तरी करुन घ्या.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** डी.पी.डी.सी. किंवा उल्हासनगर महापालिकेच्या निधीतुन जे पहीले येईल त्यातून करुन घेऊ.

**सदस्य, श्रीम.अर्चना करणकाळे:-** काय करणार तिथे रिपेरींग करणे खुप गरजेचे आहे.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** शवदाहिनी नाही बोलत, त्या रिपेरींगचे बोलत आहेत.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** तुमचा प्रपोजल पुढे पाठविण्यात येईल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** भालेरावजी पहीलेच बोलेले आहेत, इतिवृत्ताची वाट न पहाता.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** मी कधी बोललो आहे.

**महापालिका सचिव:-** इथे लिहीले आहे, निमन्न दराचे निविदाकार मे. चिरंतन उद्योग यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे. तसेच इतर ठिकाणी लावतांना डी.पी.डी.सी. चा निधी किंवा महापालिकेचा निधी जे पहीले येईल त्यातून करण्यात यावे, इतिवृत्ताची वाट न पहाता पास..

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:- सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑ **विषय क्र. ४ :—उल्हासनगर-३ येथील शांतीनगर स्मशानभुमी येथे डीझेल शव-दाहिनी बसविणेया कामास मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावना**

**उल्हासनगर-३ येथील शांतीनगर स्मशानभुमी येथे डीझेल शव-दाहिनी बसविणे** आवश्यक असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सदर कामाचे रुपये ९१,७९,३४९/- एवढया खर्चाचे प्राकलन तयार करुन सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्यात आली व नियमाप्रमाणे सदर कामाची निविदा प्रक्रिया करण्यात आली त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.१**

| | | |
|---|---|---|
| १. | प्राकलनीय खर्च | **रु.९१,७९,३४९/-** |
| २. | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १०/०८/२०२१ |
| ३. | निविदा विक्री कालावधी | दिनांक १०/०८/२०२१ ते १७/०८/२०२१ |
| ४. | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १७/०८/२०२१ |
| ५. | प्रथम मुदतवाढ | - |
| ६. | द्वितीय मुदतवाढ | - |
| ७. | तृतीय मुदतवाढ | - |
| ८. | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक २०/०८/२०२१ |
| ९. | आर्थिक भाग उघडल्याचा दिनांक़ | दिनांक ११/११/२०२१ |
| १०. | विक्री केलेल्या निविदांची संख्या | २ |
| ११. | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |

सदर निविदेचा तांत्रिक भाग दिनांक **२०/०८/२०२१**रोजी निविदा समिती समोर उघडण्यात आला.त्यामध्ये**१) मे.चिरंतन उद्योग २) मे. कल्याणी एंटरप्रायझेस** यांनी निविदा सादर केल्या आहेत. सदर निविदे मध्ये मुदतवाढ देण्यात आली होती. त्यामध्ये अंतिमत: प्राप्त दोन निविदांमधून निविदाकाराची निवड करणे आवश्यक आहे. त्याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे :-

**तक्ता क्र.२**

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. चिरंतन उद्योग | मे. कल्याणी एंटरप्रायझेस |
|---|---|---|---|
| १. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती मागील ३ वर्ष | होय | होय |
| २. | कामाचा अनुभव (मागील ३ वर्षाचे) (इलेक्ट्रीकल,गॅस व डीझेल) | होय | होय |
| ३. | पॅन कार्डाची प्रत | होय | होय |
| ४. | संस्था /कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे दस्ताऐवज) | होय | होय |
| ५. | ई.पी.एफ. व जी.एस.टी. प्रमाणपत्र प्रत | होय | होय |
| ६. | कंत्राटदाराची निविदा भरण्याच्या सक्षमता | होय | होय |
| ७. | निविदेमध्ये दिलेल्या नमुन्यात रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे. | होय | होय |
| ८. | कंत्राटदाराची घोषणा | होय | होय |
| ९. | पात्र/अपात्र | **पात्र** | **पात्र** |

उक्त तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार निविदाकांराच्या कागदपत्रांची छाननी केली.त्यामध्ये **१) मे.चिरंतन उद्योग २) मे. कल्याणी एंटरप्रायझेस**हे दोन निविदाकार पात्र ठरतअसल्याने त्यांचे निविदेचा आर्थिक भाग (Financial Bid)उघडण्यात आला. त्याची माहिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | दिलेले दर (टक्के प्रमाणे) |
|---|---|---|
| १. | **मे. चिरंतन उद्योग** | **AT PAR** |
| २. | **मे. कल्याणी एंटरप्रायझेस** | दिलेले दर ५.०००% टक्के जास्त |

उक्त तक्त्यात नमुद केलेल्या**उल्हासनगर-३ येथील शांतीनगर स्मशानभुमी येथे डीझेल शव-दाहिनी बसविणे**या कामाकरीता **मे. चिरंतन उद्योग**यांनी प्राकलनीय दराप्रमाणे**(AT PAR)** दर सादर केले आहेत. सदर दर निम्न आहेत.

तरी **मे. चिरंतन उद्योग**यांची निम्न दराची निविदा मान्य करण्यास व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अंतर्गत मा.आयुक्त यांचे स्तरावर **मे.चिरंतन उद्योग**यांचेशी संविदा **करणेकामी स्थायी समितीच्या पटलावर मान्यतेस्तव सविनय सादर.**

**स्थायी समिती ठराव क्र.९८** **दिनांक : १७/१२/२०२१**

**सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी**

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारउल्हासनगर-३ येथील शांतीनगर स्मशानभुमी येथे डीझेल शव-दाहिनी बसविणेसाठी** निम्न दराचे निविदाकार **मे.चिरंतन उद्योग**यांचेशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

इतर ठिकाणी डीझेल शव-दाहिनी बसविताना डी.पी.डी.सी.चा किंवा महापालिकेचा निधी जे अगोदर असेल त्यामधून करण्यात यावे.

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-** विषय क्रमांक ५ वाचून दाखवितात.

---

**⇨विषय क्र ५ :— ट्राफिक वार्डन यांना मुदतवाढ व अर्थ सहाय्य निधीस मंजुरी मिळणेबाबत.**

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ट्राफिक पोलीसांच्यातर्फे कोणी अधिकारी आज उपस्थित आहे का. हा त्यांना जरा बोलवा. तर त्यांच्याकडून समजून घेवू.

**पी.आय., श्री. शहाजी शिरोळे:-** मा. सभापती महोदय, वरिष्ठ अधिकारी, विरोधी पक्ष नेते, मा. सदस्य आपण आम्हांला जे काही प्रश्न विचारणार आहात ते विचारु शकता.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** साहेब पहिले आपण आपला परिचय तर दया.

**पी.आय., श्री. शहाजी शिरोळे:-** मी विठ्ठलवाडी वाहतुक उप विभाग येथे प्रभारी अधिकारी आहे. माझ्याकडे १० वार्डन आहेत आणि त्या वार्डनचे मानधन ६ महिने झाले, तेव्हा पासून देण्यात आलेले नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. आयुक्तजी, ही खुप दु:खाची गोष्ट आहे की, एकतर आम्ही वार्डनला ठराविक पगार देतो. गरीब लोक वार्डनचे काम करतात. त्यानंतर त्यांचा पगार त्यांना दर महिन्याला मिळाला पाहिजे. तो पण २ — ३ लाख पण नाही आहे. तीन लाख रुपये पण माझ्या मते ६ लाख X ३२ वार्डन आहेत. ६ लाख पण आपण दोन अडीच लाख त्यांना बारा महिन्याला नाही देवू शकत. ६ महिन्यानंतर आपण त्यांना पगार देतो. हे आमच्या महानगरपालिकेत नाहीतर

आम्ही त्यांना वार्डन नाही देणार, आम्ही वार्डन नाही देणार. हा आरोप आमच्यावर लागत असेल तर वारंवार लोक आम्हांला बोलत असतील. मी जेव्हा पोलीस स्टेशनला काही कामानिमित्त जातो. तेथील अधिका-यांशी बोलणे होते. तर आम्हांला प्रेमाने बोलतात की वार्डनचा पगार दिला नाही. वार्डन आमची रस्त्यात गाडी थांबवून बोलतात साहेब आपण तर काही बोला की आम्हांला पगार नाही मिळाला आहे. हे कसे दु:ख आहे की, मी चव्हाण साहेबांना फोन केला होता १ नंबर पोलीस स्टेशन साहेब ६ महिन्यापासुन वार्डनला पगार मिळाला नाही. चव्हाण साहेबांचे बोलणे होते की, २ महिन्यापासुन दिला नाही. तर चव्हाण साहेबांनी हा खुलासा केला पाहिजे की, वार्डनचा जेव्हा बील येतो ३ लाखासाठी आमची महानगरपालिका ६ करोडचे बजेट आहे ३ लाखासाठी गरीब माणसाचे घराचा खर्च चालतो त्यावर. तर ६ महिने वार्डन बिचारे कुठून खर्च चालवणार. हा खुलासा करायला पाहिजे. चव्हाणजी आपल्याला जगभराचे बील नजरेस येतात, मी जास्त बोलू इच्छित नाही, परंतु हे जे २ लाख ३ लाख आपण देतात ना यामुळे ३२ घरांचे परिवार चालत आहेत. त्यांच्या घरात पीठ, डाळ, तांदुळ येतो. ही खुप दु:खाची गोष्ट आहे. आज आपल्याला बुडुन मेले पाहिजे माझे जो पगार येतो १० हजार तो नंतर देण्यात यावा. या सभागृहातील सदस्यांचे नंतर देण्यात यावे. वार्डन जे उन्हात उभे राहतात ना आपण एक दिवस उभे राहून दाखवा. तर आपल्याला माहित होईल की, दोनशे रुपयात काम कसे होते. तर हे दु:ख आहे सर, विचार केला पाहिजे. जे गरीब घरातील लोक आहेत त्यांच्याकडे अर्धा किलो तेल कसे येत असेल. तांदुळ कसे येत असेल. आज अधिका-याने येथे सांगितले आहे ६ महिन्यापासुन पगार मिळाला नाही. तुमच्यासाठी आणखी दु:खाची गोष्ट आहे ही आपण उप महापौर आहात. आपण या विषयाला गंभीरपणे घेतले पाहिजे. स्थायी समिती सभापती महोदय, ही छोटी गोष्ट नाही ३२ लोकांना मिळवून २ लाख मिळते आहे आणि आम्ही ६ महिने देत नाही. मला सांगा ६ महिन्यात अकाउंटमधून किती बील काढली आहेत?

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-</u>** चव्हाण साहेब उत्तर देत आहेत ना.

**<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:-</u>** सन्माननीय सभापती महोदय, मा. आयुक्त व सन्माननीय सदस्य् आपली कोविडमुळे स्थायी समिती जून किंवा जुलै मध्ये झाली त्यावेळेस त्यांना एकदम ६ महिन्याची आपण मुदतवाढ दिली आणि त्यांचे एकदम ६ महिन्याचे बील माझ्याकडे सप्टेंबरमध्ये आले. तर त्यापैकी ३ महिन्याचा पगार आपण त्यांना अदा केलेला आहे. आयुक्त् सरांनी पण सुचना केली होती. नाईकवाडे सरांशी पण माझी चर्चा झाली. एका वेळेस १ महिन्याचे व गेल्यावेळेस २ महिन्याचे असे ३ महिन्याचे वेतन आपण दिलेले आहे.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-</u>** प्रत्येक महिन्याचे का देत नाही?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** ऐका सभापती साहेब, आयुक्त साहेब आपण समजदार आहात, आपण शहरात एवढे चांगले काम करत आहात. आता आपण सांगा घुमुन फिरुन प्रश्न आहे की नाही की, स्थायी समितीने जुनमध्ये दिले. स्थायी समितीचा काय संबंध. आम्ही मुदतवाढ काय दिली. की आम्ही यांना घेत आहोत. आपल काय आहे सप्टेंबरमध्ये बील आला दया, ऑक्टोबरमध्ये बील आला दया, नोव्हेंबर बील आला दया, स्थायी समितीचे नाव आपण का घेत आहेत?

**<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:-</u>** स्थायी समितीचे नाव नाही सर, त्यांचा मुदतवाढचा प्रश्नच

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मुदतवाढ आम्ही जूनमध्ये केली.

**<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:-</u>** जून मध्ये केले पण त्यांचा बील सप्टेंबरमध्ये आले.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** देवून टाकायचे ६ महिन्याचे सप्टेंबरमध्ये

**<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण</u>** :- सप्टेंबरमध्ये ३ महिन्याचे दिले आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** का दिले तीन महीन्याचे महानगरपालिकेत. १२ लाख रुपये आपल्याजवळ नव्हते का. आणि सप्टेंबर पासुन ऑक्टोबर पर्यंत किती करोडचे बील निघाले आहेत ६ लाख रुपयांत ३२ परिवार चालतात. तीन महिन्यासाठी विचार करण्यासारखी गोष्ट आहे साहेब, छोटी छोटी ३५ वार्डन किंवा ४० वार्डन घराच्या परिवारावाचे दोन वार्डन सर्वांचा घर परिवार चालतो. आणि आम्ही येथे बोलतो की, सप्टेंबर मध्ये ३ महीन्याचे बिल अदा केले. आपण एक ठेकेदाराचे बील घेणार ज्याचा करोडोचा बील असेल. जसे २ करोड महिन्याचे आहे. आपण २ लाख रुपये ३२ परिवारांचे रोखणार. आपण सांगा काय न्याय व्हायला पाहिजे, न्याय काय आहे?

**<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:-</u>** बील थांबवले नाही जमनुभाई. बील त्यांना दिले आहे.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:-** आम्ही तुमच्यावर आरोप लावले नाही. मी निवेदन करतो की, जर वॉर्डन ठेवायचे असतील तर ठेवा नाहीतर नाही. माझा विरोध आहे वॉर्डनसाठी. जर ठेवायचे असतील तर त्यांना दर महिन्याला पगार दया.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** चव्हाणजी, आपण पण सप्टेंबरचा पाठवून दया आणि लवकर त्यासाठी विलंब नका करु. जमनुजीचा तोच अर्थ आहे. ३ महिने ते लोक कसे चालवत असतील आता आपण बोलत आहात की, सप्टेंबर दिले आहे आता दिवाळी आहे. वार्डन लोकांनी दिवाळी कशी साजरी केली असेल. ठिक आहे. मी आपल्याला पण विनंती करतो की, आपण दर महिन्याला बील पाठवा.

**सदस्य,श्री. भगवान भालेराव:-** ते काढून दया मुदतवाढीचा आम्ही देतो.

**सदस्य, श्री. कलवंत सिंग सोहता:-** मा. सभापतीजी, आयुक्त् साहेब वार्डनचा इश्यु आहेच आहे. स्मशान भुमीचे बील काल परवाच त्यांचे ट्रस्टी आले होते. रुपचंदानीजी तेच तेथील लाकडांचा पगार पण आम्ही वेळच्यावेळी देत नाहीत. आणि त्यांचा काही इश्यु

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :-** नाही, नाही, दोनच गोष्टी चव्हाण साहेब थांबवतात. प्रत्येकाला तिथेच जायचे आहे मला पण, तुम्हांला पण, सर्वांना स्मशानभुमीमध्ये लाकडांचे बील थांबवून याचा लाख रुपयांचा फक्त बील असतो.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** जमनुजी, दिव्यांगाचा पण बिल थांबवतात.

**सदस्य, श्री. कलवंत सिंग सोहता:-** जमनुजी दिव्यांगांचा पण थांबवितात.

**मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:-** सर, आता जमनु साहेब बोलले स्मशानभुमीचे बील केव्हा येते आणि त्यांचा चेक कधी इश्यु होतो त्याचा पुर्ण रेकॉर्ड मागवा. नाही, नाही, एक मिनिट सर स्मशानभुमीचे आजच बील आले आहे. माझी स्वाक्षरी होवून, ऑडिटची पण स्वाक्षरी होवून ते पाठवतात वैदयकिय आरोग्य विभाग त्यांच्याकडून बिल येत असतो.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :-** माझे एक निवेदन आहे, मा. आयुक्तजी, दर महिन्यामध्ये २-३ वेळा स्थायी समिती बैठक होते. १ तारखेपासुन किती किती चेक काढले गेले त्याची माहिती स्थायी समिती आली पाहिजे. कोणाकोणाला मिळाले आम्ही काहीच नाही बोलत याचा अर्थ असा नाही स्मशानभुमीचा नाही दिव्यांगाचा नाही, वार्डनचा नाही.

**सदस्य, श्री. कलवंत सिंग सोहता:-** चव्हाणजी, ते बेवारीश मृतदेहांचे पण ब-याच काळापासून प्रलंबित आहे. ते पण बघा. जेवढे लवकर होईल.

**मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:-** जमनुजी एक निवेदन आहे, स्मशान भुमीचा जे आहे. विभागाने एक वर्षाचा एकत्र मंजूर करुन दयायचा आहे. म्हणजे अकाउंटमध्ये जेव्हा बील येईल.

**सदस्य, श्री. कलवंत सिंग सोहता:-** चव्हाणजी, परत तीच गोष्ट या विभागातून त्या विभागावर आरोप प्रत्यारोप.

**मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:-** अकाउंड विभागात जेव्हा बील येईल तेव्हा माझा

**सदस्य, श्री. कलवंत सिंग सोहता:-** एक माणुसकीच्या नात्याने हे जे संवेदनशील मुददे आहेत त्यांना बघितले पाहिजे. भालेरावजी मोकळे होवून बोला जे बोलायचे आहे ते.

**सदस्य,श्री. भगवान भालेराव:-** तुमची गोष्ट खरी आहे. हे आधीपासूनच बोलतात, तुमचे बील माझ्याकडे बीलच आले नाही. बील आले तर ते देतील. बील आले नाही ज्या यंत्रणा बील देत नाहीत त्यांच्याबददल आपण बोलले पाहिजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** भालेरावजी आता हे काय बोलले ६ महिन्याचे सप्टेंबरमध्ये आले तर मी ३ महिन्याचे दिले. बील आले ना.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** पहिले वार्डनचा विषय पुर्ण करा. ते अधिकारी पण उभे आहेत. पहीले हे क्लीयर करा.

**सदस्य,श्री. भगवान भालेराव:-** जून महिन्यात आपण मुदतवाढ दिली आहे. जमनुजी एक मिनिट यांनी बील कधी दिले. यांनी काय चुकी केली जर सप्टेंबरला बील दिले. जून ला जर मुदतवाढ मिळाली आहे तर जुलैला बील दयायला पाहिजे

होते. एकदा तुम्ही चुकी करायची, आणि परत सांगता का तुम्ही त्यांना बील ठिक आहे. मला काय चव्हाण परिस्थिती अशी आहे की त्यांच्याकडे बील आले तर ते देतील. बील देणारी यंत्रणाच जर कमजोर असेल तर त्याच्यासाठी आपण बोलले पाहिजे.

**सदस्य, श्री. कलवंत सिंग सोहता:-** भगवानजी तर्कविर्तक करण्याचा हा विषय नाही. माणुसकीच्या नात्याने या विषयावर नाही बोलू देणार.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** माणुसकीच्या नात्याने म्हणजे काय?

**सदस्य, श्री. कलवंत सिंग सोहता:-** कोणत्या अधिका-यावर आरोप करत आहेत का. मी बोलतो या विषयाला उशीर करायला नाही पाहिजे. एवढच बोललो ना.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** कुलवंतजी, भालेराव साहेब,

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** ठिक आहे चव्हाण साहेब आता आपण जे पण मुद्दे सांगितले आहेत आपण चांगल्या खुर्चीवर बसले आहेत, देवाने आपल्याला चांगला हुददा दिला आहे. मानवतेच्या आधारे असे पगार जिथे केले जाते त्यांना आधी प्राधान्य दया.

**मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:-** ठिक आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारिया:-** दोन मिनिट मी त्याच विषयावर बोलतोय यात पहिला जो ठराव पास झाला आहे. पहिले तो दि. ७/०७/२०२१ चा आहे. तर तो दि.५/०२/२०२२ पर्यंत कायम आहे. दि.५/०२/२०२२ ला अजून वेळ आहे तर माझ्या मते हे डिफर करून, यातील जे उल्हासनगर क्र. १,२ व ३ चे जे अधिकारी आहेत. त्यांच्याशी पण आम्हांला काही वार्तालाप करायचे आहे. तर ते आज उपस्थित नाहीत. मी ठिक बोलत आहे की, आपण आहेत त्यापैकी.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** पहिले परिचय दिला नाही.

**सदस्य, श्री. राजेश वधारिया:-** जे अधिकारी होते पहिले धरणे साहेब होते. आपण आता त्यांच्या जागेवर आले. मध्ये दुसरे होते. लवकरच बदली करुन निघून गेले.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** माझी विनंती आहे वार्डनचे काम थांबविले नाही पाहिजे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** पास. पास.

**सदस्य, श्री. कलवंत सिंग सोहता:-** पास. पास.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** इतिवृत्ताची वाट न पाहता.

**सदस्य, श्री. राजेश वधारिया:-** दिले पाहिजे, परंतु मी सभापतीजींना निवेदन करतो की, ट्राफिक वर एक बैठक लावा त्यात आमचे काही इश्यु असतील त्याच्यावर आम्हांला बोलायचे आहे.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** ओके

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** सभापती महोदय, आयुक्त् साहेब, विषय प्रस्तावाची सुचना आहे. त्या अगोदर मला एक विषय मांडायचा आहे. साहेब आता शाळा चालू झालेल्या आहेत आणि कोविडच्या काळामध्ये मागील दोन वर्षापासून अगदी स्लम एरियातून विद्यार्थी आपल्या महानगरपालिकेच्या शाळेत येतात आणि स्लम विद्यार्थी कोव्हीडच्या काळात त्यांची परिस्थिती अधिक खलावली आहे. तर मला असे वाटते साहेब आता शाळा चालू झाल्या मला वाटते लवकरात लवकर पुढच्या काळात भुमिका घेऊन बॅग आणि त्यांचे गणवेश या संदर्भामध्ये साहेब आपण लवकरात लवकर काही तरी उपाययोजना केली पाहीजे. आपण त्यांना मधल्या काळामध्ये सुविधा नाही देवू शकलो. कोणत्याही माध्यमातून आपण त्यांचे ऑनलाईन नाही घेऊ शकलो. तरी आपण जर दप्तर शाळा आणि त्यांच्या ज्या गरजा आहेत, सामान तातडीने आल्या पाहीजेत. अशी अनेक दोन दिवसात ती फाईल लवकरात लवकर करण्यास साहेब आपण सांगावे, धन्यवाद.

**महापालिका सचिव:-** यामध्ये ०५/०२/२२ नंतर दिनांक ०७/०२/२२ लिहू का? मुदतवाढ दिनांक ०७/०२/२२ ते पुढील एक वर्षासाठी

**काही सदस्य:-** पास, पास....

सभापती, श्री. दिपक सिरवानी:- सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .

---

☑ विषय क्र. ५ :— ट्राफिक वार्डन यांना मुदतवाढ व अर्थसहाय्य् निधीस मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावना

उपरोक्त् विषयान्वये उल्हासनगर शहरातील वाहतुक कोंडीच्या समस्या दुर करणेकामी वाहतुक पोलीस यांचे मदतीकरीता नियुक्त् करण्यात आलेले एकुण ४५ ट्राफिक वार्डन यांची मुदत संपुष्ठात येत असल्यामुळे त्यांना मुदतवाढ व किमान वेतनानुसार रु.६०००/- मानधनावर नियुक्त करणेबाबत सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुर करणेत आलेला आहे.

सध्या उल्हासनगर शहरातील कल्याण अंबरनाथ् रोड रुदीकरण तसेच महत्वाच्या चौकात, सण उत्सवामध्ये वाहतुक पोलीस अंमलदारासोबत वाहतुक नियमाना करीता ट्राफिक वॉर्डन यांची मोठया प्रमाणात मदत होत असुन उल्हासनगर शहरात या पुर्वी होणाया वाहतुक कोंडीच्या तुलनेने सध्याची वाहतुक कोंडी ही ट्राफिक वार्डन यांचे मदतीने सुरळीत करण्यात येते.

तसेच शहर वाहतुक उपविभाग उल्हासनगर येथे उपलब्ध् असलेले मनुष्यबळ हे आपुरे असल्याने ट्राफिक वॉर्डन याची मोठया प्रमाणात वाहतुक नियमनाकरीता मदत होत आहे. ज्या प्रमाणात सामान्या नागरीकांना वाहतुक कोंडीचा सामना हा अंरुद रस्ते,रस्त्यावरील बस्तांना मांडुन बसलेले फेरीवाले, हातगाडीवाले, कटलरी सामाना विक्रेते, दुकानदार यांनी फुटपाथ काबीज केल्याने वाहतुकीकरीता प्रत्याक्षात रस्ता अंरुद होतो अशावेळी ट्राफिक वार्डन यांचे मदतीने वाहतुक कोंडी सोडवुन वाहतुक नियमन करण्यात येते.

तरी उल्हासनगर शहरातील उल्हासनगर व विठठलवाडी वाहतुक पोलीस अंमलदार यांना मदतीस असलेले ४५ ट्राफिक वॉर्डन यांना नियुक्ती ठिकाणी मुदतवाढ करुन मिळणेस विनंती आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत उल्हासनगर शहरातील वाहतुक कोंडीच्या समस्या दुर होणेसाठी शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर व विठठलवाडी यांना शहरातील वाहतुक समस्यांचे निराकरण करणेसाठी आत्तापर्यत खालीलप्रमाणे मंजुरी प्राप्त होवुन अर्थसहाय्यास मंजुरी दिली आहे.

१. मा. स्थायी समिती ठराव क्र ०१ दिनांक १३/०९/२०१२ अन्वये २० ट्राफिक वार्डन यांना अटी शतीच्या आधारे मानधन तत्वावर अर्थसहाय्यास मंजुरी दिलेली होती.
२. सदर वार्डन यांचा एक वर्षाचा कालावधी संपुष्ठात आला असता मा. स्थायी समिती ठराव क्र. ५६ दिनांक १७/१२/२०१३ अन्वये वार्डन यांची सेवा सन २०१३-१४ साठी चालू ठेवुन आणखी ५ ट्राफिक वार्डन म्हणजे एकुण २५ वार्डन नेमणेस व त्यांचे मानधन रु.२००० च्या ऐवजी रु. ४००० अशी वाढ करण्यास मान्यता दिलेली होती.
३. सन २०१४- १५ मध्ये मा. स्थायी समिती ठराव क्र. ७१, दिनांक ०२/०१/२०१५ अन्वये २५ ट्राफिक वार्डन यांना मुदतवाढ दिली.
४. सन २०१५- १६ मध्ये मा. स्थायी समिती ठराव क्र. १०० दिनांक १४/०३/२०१६ अन्वये २५ ट्राफिक वार्डनयांना मुदतवाढ दिली.
५. सन २०१६- १७ मध्ये मा. स्थायी समिती ठराव क्र. ८१, दिनांक ०७/१०/२०१६ अन्वये २५ ट्राफिक वार्डन यांना अर्थसहाय्य मंजुरी दिलेली आहे.
६. मा. स्थायी समिती ठराव क्र. २४ दिनांक ८/०९/२०१७ अन्वये २५ ट्राफिक वार्डन याच्या अर्थसहाय्यास मंजुरी देण्यात आली आहे.
७. मा. स्थायी समिती ठराव क्र. ५७ दिनांक १६/११/२०१७ अन्वये २० ट्राफिक वॉर्डन यांच्या अर्थसहाय्यास मंजुरी देण्यात आली आहे.
८. मा. स्थायी समिती ठराव क्र. ३२ दिनांक ०४/०९/२०१८ अन्वये ४५ ट्राफिक वार्डन याच्या अर्थसहाय्यास मंजुरी मिळणेबाबत.
९. मा. स्थायी समिती ठराव क्र. ५१ दिनांक ०२/११/२०१८ अन्वये ट्राफिक वॉर्डन यांच्या मानधनात वाढीसमंजुरी मिळण्याबाबत.
१०. मा. स्थायी समिती ठराव क्र. ५९ दिनांक ०७/२/२०२० अन्वये ४५ ट्राफिक वॉर्डन यांच्या अर्थसहाय्यास मंजुरी मिळणेबाबत.

**११. मा. स्थायी समिती ठराव क्र. ०३ दिनांक ०७/७/२०२१ अन्वये ४५ ट्राफिक वॉर्डन यांच्या अर्थसहाय्यास मंजुरी मिळणेबाबत.**

**वाहतुक शाखेस टाफिक वार्डन २५ अधिक अतिरिक्त् २० ट्राफिक वार्डन असे एकुण ४५वार्डन यांना मानधन मिळणेबात विनंती केल्यानुसार मा.स्थायी समिती ठराव क्र. ५१ दिनांक ०२/११/२०१८ अन्वये ट्राफिक वार्डन यांना उदरानिर्वाहसाठी प्रति वार्डन रु.६०००/- एवढे मानधन देण्यास मान्यता दिलेली आहे.**

**उपरोक्त् नमुद मुदा क्र. ११ प्रमाणे एकुण ४५ ट्राफिक वार्डन यांचा कालावधी दि ०५/२/२०२२ रोजी सपुष्टात येणार आहे.पुढील एकवर्षाकरीता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन त्यांचया अर्थसहाय्यास मंजुरी देण्याचे प्रस्तावित आहे.**

**१) संबंधीत अतिरिक्त ४५ ट्राफिक वॉर्डन यांची नियुक्ती करण्याची जबाबदारी पोलीस विभागाची राहील.**
**२) संबंधीत अतिरिक्त ४५ ट्राफिक वॉर्डन यांना प्रतिमाह रु. ६०००/- एवढे मानधनमहानगरपालिकेतर्फे सहाय्यक पोलिस आयुक्त, शहर वाहतुक उपशाखा, उल्हासनगर विभाग यांचेकडून देयक प्राप्त झालयावर अर्थसहाय्य स्वरुपात देण्यात येईल.**
**३) ट्राफिक वार्डन यांच्या सेवेचा महानगरपालिकेशी कोणताही संबंध राहणार नाही.**
**४) ट्राफिक वॉर्डन यांना सेवेत असताना काही अपघात झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी ट्राफिक पोलीस विभागाची राहील.संबंधीत सर्व ट्राफिक वार्डन यांच्या उपस्थितीबाबत व कर्तव्याबाबत पोलिस विभागाचे नियंत्रण राहील.**
**५) वाहतुक व्यवस्था ही शहरातील मुख्य् समस्या आहे.या व्यवस्थेला सुधारणे गरजेचे असल्याने सदरचे कार्य महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३) (अ) अन्वये पार पाडणे आवश्यक् आहे.**

**सदर वार्डन यांना रु.६०००/-(मासिक मानधन) X४५(ट्रॅाफिक वार्डन) X१२(महिने) = ३२,४०,०००/- रुपये मानधापोटी वार्षिक एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च वर्ष २०२१-२२२ चे अंदाजपत्रकात A-१ (२४) Part १ ( Traffic Sing) या लेखार्शिषात रु ४ कोटी एवढी तरतुद उपलब्ध् आहे.**

**यास्त्व मा.स्थायी समिती ठराव क्र. ०३ दिनांक ०७/७/२०२१ अन्वये नियुक्तीचा एक वर्षाचा कार्यकाल दि ५/२/२०२२ रोजी संपुष्ठात येणार आहे.वाहतुक नियमनासाठी एकुण ४५ ट्राफिक वार्डन यांना पुढील एक वर्षाकरीता अर्थसहाय्य् मंजुरी मिळण्याबाबत सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीसाठी पटलावर सादर करण्यात येत आहे.**

स्थायी समिती ठराव क्र.९९ दिनांक : १७/१२/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार ४५ ट्राफिक वार्डन यांना दिनांक ०७/०२/२०२२ पासून पुढील एका वर्षासाठी मुदतवाढ व अर्थसहाय्य् निधी देणेस मान्यता देत आहे.**

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते
सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ६ वाचून दाखवितात.

---

**➪ विषय क्र ६ :—** **प्रस्तावाचीसुचना**

आर्थिक बजेट २०२१—२२ नुसार स्थायी समिती सदस्य निधी करिता २ करोड रूपये निधीची तरतुद करण्यात येऊन देखिल अदयाप पर्यत सदर निधी प्राप्त झााला नाही किंवा त्यासंबंधित कोणत्याही कामास परवानगी मिळाली नसल्याने त्याबाबत चर्चा करून निर्णय घेणेबाबत .**पालिका सदस्य सुचक म्हणून श्री. राजेश वदारिया व अनुमोदक श्री. भगवान भालेराव यांचा प्रस्ताव विचारात घेणे.**

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. सभापतीजी, आपण मला साथ देत नाहीत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** निधी पण देणार नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** काय आहे, आपले करोडो रुपयाचे काम झाले आहेत आणि आपल्याला महीती पण नसेल की, मागच्या वेळी आयुक्त् श्री. हांगे साहेबांकडून पास करुन दिले होते.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**आयुक्त साहेबांची गोड बोलून आपण खुप कामे करुन घेतली आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** राजेशजीचे खुप खुप धन्यवाद. हांगे साहेब, फक्त राजेशजीचे ऐकत होते. परंतु आपले डॉ. राजा दयानिधी सगळयाचे ऐकत असतात.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. सभापतीजी, आपल्याला सांगितले जाते की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या तिजोरीची चावी, आपल्या १६ लोकांकडे आहे. तर आपण सांगतो की, चावी तर आपल्याकडे आहे. परंतु ती ज्या बटव्यामध्ये ठेवली आहे, तो बटवा आयुक्त् साहेबांकडे आहे, आमच्याकडे चावी पण नाही. आज आपल्या वार्डाची जी परिस्थिती आहे. ती कोणाकडून लपवली नाही. आम्ही कारोना काळामध्ये जे सहकार्य केले आहे. आमच्या वार्डाचे एस्टीमेट बनले नव्हते. हांगे साहेब आपले एस्टीमेट करुन गेले, ते श्री. सुधाकर देशमुख साहेबांनी कॅन्सल करुन टाकले.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-** म्हणजे जमनुजीचे जे काम करायचे होते, ते राहूनच गेले.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** नाही, नाही, जमनुजी त्यामध्ये लक्की आहेत, त्यांनी पहीले वर्क ऑर्डर घेतल्या होत्या.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** आपण केले होते, परंतु नंतर सर्व रदद झाले.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ठिक आहे, आम्ही आमची जबाबदारी निभावली होती. तर आज वार्डाचा आतील परिस्थिती अशी आहे की, आम्ही वार्डामध्ये तोंड दाखवण्याच्या लायक नाही. काही दिवसापुर्वी माझ्याकडे एक शिष्टमंडळ आले होते. तर मी त्यांना ही गोष्ट सांगितली होती की महानगरपालिकेची पोझिसन ठिक नाही आहे आणि याच्यामुळे हे होत नाही. तर ते लोक माझ्यावर एवढे नाराज झाले की, त्यांनी मला ज्या परिस्थिती लिहून पाठवल्या आहे, त्याचे मी स्क्रिन सॉट तुम्हांला सगळयांना पाठवित आहे. स्थायी समिती सदस्यांमध्ये हे बघा सर्व आपले रिस्पेक्ट करतात. परंतु ऑफिसमध्ये आपण सांगितले की, फंड नाही आहेत. टॅक्स बाकी आहे, सर्वच भरत नाही. आम्ही कंम्प्लेट घेऊन आलो आहे, ब्लॉकचे वेळेच्या पहीले सर्व टॅक्स भरले जातात. पहीले १० वर्षापासून नविन ब्लॉक बनवू मिळाले नाहीत. सिमेंट कॉक्रिट ब्लॉकचे बोलत आहेत. काय एक चांगले रोड पॅसेज आम्ही आशा बाळगू शकत नाही का आपणाकडून? जर वाईट वाटले तर माफ करा. जयराम वदारियाची बिल्डींग बनली त्या वेळेस रिपेरींग केले, आम्हांला आपणाकडून नविन ब्लॉकची आशा आहे, सर. जर आम्ही वार्डामध्ये कोणाला बोललो तर त्यांना वाईट वाटते. तर आपण आम्हांला सांगितले जाते की, महापालिकेकडे पैसे नाहीत, थकबाकी बाकी आहे. माझ्या गल्लीची टॅक्स क्लीयर आहे आपण चेक करा. आम्हांला हे पाहीजे साहेब की, दोन दोन करोडचा जो निधी आहे. आम्हांला काहीच नाही पाहीजे, कमीत कमी २५ लाखाचे निधी पाहीजे. १० टक्के कलेक्शन तर दिसत आहे ना. एवढा तर अधिकार आहे, तर १० टक्के आम्ही १२.५० टक्केच मागत आहेत. आपण सांगत आहे की, आपल्याकडे १० टक्के येतील, २० टक्के येतील आम्हांला १० टक्के दया. आम्ही आहेत तेवढेच मांगत आहेत, आम्ही जास्त मांगत नाहीत. आम्हांला एवढे पाहीजेत, आमच्या वार्डामध्ये कामे झाली नाहीत. या गोष्टी त्रासाच्या आहेत, आणि आयुक्त् साहेबांनी बघीतले आहे.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** उत्तरा बरोबर आयुक्त साहेब, निधी पण देणार आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** वदारिया साहेब, आयुक्त् साहेब बोलतील.

**आयुक्त्, डॉ. राजा दयानिधी:-** सन्माननिय सभापती, सन्माननिय सदस्यांनी जो मुददा उपस्थित केला आहे, त्याच्यावर मी सांगू इच्छितो की, ऑल रेडी आपण ब-याच एस्टिमेट मागील एक दोन महीन्यामध्ये पास केलेल्या आहेत. आता पुन्हा स्थायी समितीच्या सदस्यांची फंड दयायचा असेल तर आता आपली आर्थिक परिस्थिती खराब आहे. समजा स्थायी समितीला फंड दयायच्या असेल तर जी कामे रक्कम आहे ती परत करुन कॅन्सल करावे लागेल. ते करण्यापेक्षा माझी विनंती आहे की, या वर्षी स्थायी समिती सदस्यांना फंड देणे शक्य होणार नाही. करायचे असेल तर आय विल कॉल एस्टिमेट बॅक मी त्याच्यामध्ये ॲडजेस्ट करुन देतो.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** साहेब हे बघा, सभापतींना किती दिले मला माहीत नाही. परंतु मी १५ सदस्यांच्यातर्फे सभापतींना विनंती करतो की, जर यामध्ये १५ सदस्यांना देत असतील तर पावने चार करोड होतात आणि जर यामध्ये सभापती पण येत असतील तर ४ करोड होतात. ही मोठी रक्कम नाही. आज एवढया कालावधीमध्ये माफ करा मी जे बोलत आहे, ३४ हजार स्पेशन नोटीस सभापतीकडे जेव्हा मिटींग झाली होती, मी आपल्या लक्षात आणून दिले होते. आपण सांगितले की, मुदतवाढ झाली नाही. जनरल बॉडीमध्ये मुदतवाढ झाली, मॅडम आपल्याला माहीती आहे का कधी मुदतवाढ दिली किंवा विभागाचे कोणी अधिकारीआहेत का ते सांगू शकतील की, मुदतवाढ दिली आहे. माझ्या माहीतीनुसार सप्टेंबर ते डिसेंबर आज दोन, अडीच महीने झाले आहेत साहेब. ३४ हजार नोटीस निघाल्या नाहीत. तर त्यांचे बिल कधी निघणार? तर पैसे जमा करण्याचे जे दायीत्व आहे, ते प्रशासनाचे आहे. तर काही गोष्टी प्रशासनाने आमच्या ऐकायच्या असतात ना, आम्ही जर सांगत आहेत तर आम्ही असे थोडे म्हणत आहेत की, माझा बिल बनवू नका. माझी बॅक् आज माझी प्रॉपर्टी आहे, माझी प्रॉपर्टी बॅंक ऑफ बडोदाला भाडयाने दिली आहे. मला बिल मिळाले ते बॅंकने भरायला पाहीजे होते. मी बॅंकेकडून पैसे भरुन टाकले. तर मी कधीच अधिका-यांकडे आलो नाही की, सर माझे पैसे घेऊ नका, उलट आम्ही ज्या दिवशी बिल येते त्याच दिवशी पेड करीत असतो आणि मला त्यामुळे ६६७ रुपये डिस्कॉउंड प्रत्येक वर्षी मिळते. ५ टक्के डिस्कॉउंड मिळते. तर जेव्हा पे करीत असतो आणि लोकांना पे करण्यासाठी उत्साहीत करती असतो आणि प्रशासनाला प्रत्येक कामामध्ये आम्ही मदत करती असतो. आज टॉवरचे २० हजाराचे टॅक्स असेल, उल्हासनगर महानगरपालिकेची जमीन टॉवरसाठी दयायची असेल, हातगाडीचा मुददा असेल किंवा अजून जो रिवेन्यु करायची असेल, जसे की, ॲडीस्टाईजमेंट टॅक्स आहे, ते मी यांना सांगितले, पार्किंग आहे, भरपूर मुददे आहेत, परंतु आम्ही पण समजो की, आपल्याकडे अधिकारी कमी आहेत, आम्ही पण समजून घेतो, लोक कमी आहेत, तर त्या हिशोबाने कामे होत आहेत. तर आपण प्राव्हेट एजेन्सी नियुक्त करा. जे तुम्हांला डिटेल एस्टिमेट बनवून देतील, आता टेंडर केला आहे इंजिनियरचा, २० इंजिनियरचा टेंडर झाला, तर त्यामध्ये इश्यु येणार आहे. तर ते २० इंजिनियर आपल्याला मिळतील, त्यामुळे कामामध्ये स्पिड मिळेल. जर आज एस्टिमेट बनली त्याची वर्क ऑर्डर देता देता दोन महीने निघून जातील. काम अजून तीन महीने निघून जातील. ते बिल आपल्या लेखा विभागामध्ये पोहचतील पुढच्या वर्षी जुन, जुलैमध्ये, त्याच्या नंतर पेमेंट येते.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. आयुक्तजी, मा. सभापतीजी, राजेश वदारिया यांनी जो विषय ठेवला आहे, मी त्यांना धन्यवाद देतो की, यांनी सर्व सदस्यांची इच्छा बोलून दाखवली आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** उप महापौरांची सही घेतली आहे,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** सर एक विषय त्यांनी काढला की, टॅक्स विभागामध्ये भरपुर काम बाकी आहे, दुसरे सर बजेटची उत्पन्न कुठून कुठून करणार आहेत, आपण अभ्यास करणार, नंतर आपण फेब्रुवरीमध्ये बसतो, जानेवारीमध्ये बसतो, तेव्हा आपल्या लक्षात येते की, आपली मालमत्ता खुप पडून आहेत, मार्केट पडले आहे, दुकाने आहेत, फ्लॅट आहेत, आपण प्रत्येक बजेटमध्ये ठेवत असतो की, १० करोड, २० करोड या मालमत्तेपासून वसुल होतील. आज पर्यंत आपिण विकू शकलो नाही, त्यांना भाडयावर देवू शकत नाही आणि आपण काहीच करु शकलो नाही. ते निधीशी कनेक्टेड आहेत आणि त्या प्रॉपर्टी बिल्डरांकडे आहेत, त्या आपण घेऊ शकलो नाहीत. आर्धी प्रॉपर्टी बिल्डरांकडे आहेत, हा निधी राजेश वदारिया यांनी ५० बोलायला पाहीजे होते. परंतु मी इकडे उठून आलो तर त्यांनी २५ लाख बालून टाकले. २५ लाख देण्यासाठी साहेब तयार आहेत. भालेरावजी बोलतील तर साहेब, दोन मिनीटांत देणेसाठी तयार होतील.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** एक गोष्ट मी मान्य करतो की, बोलण्यामध्ये मी जास्त हुशार नाही,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** सर्वांचे निवेदन आहे मा. आयुक्तजी आपण २५ लाख, ४ करोड होतात.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** मी विनंती करतो की, प्रत्येक वर्षी गीव्हन टू ऑल दि मेंबरर्स् ऑफ स्टॅंडींग या वर्षी मिळणार नाही तर माझ्या सभापतीच्या कालावधीमध्ये डाग लागेल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** टॅक्सची रीकव्हरी, कोल्बोचे बिल, नोटीस जे पण इश्यु राहीले आहेत, त्यांना आम्ही संपुर्णपणे सहयोग, संपुर्ण स्थायी समिती तुमच्या बरोबर उभे राहती आणि आपण सांगणार असतील तर आम्ही आमच्या वार्डामध्ये कॅम्प लावून पण कलेक्शन करुन देवू आणि एक एक करोड, दोन दोन करोड कलेक्शन करणे आमच्यासाठी मोठी गोष्ट नाही. श्री. राजू जग्यासी आहेत, सर्व आहेत, एक छोटीशी विनंती आहे, उप महापौरांना संपुर्ण स्थायी समिती

पाच वर्षे सभापती राहीलेले भाग्यशाली म्हणावे लागेल श्री. राजेश वदारिया यांना भाग्यशालीचे काम करणार तर भाग्य उघडेल. महानगरपालिकेचा.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** मा. सभापतीजी, मा. आयुक्त् साहेब, ही जी विनंती आम्ही सर्व सदस्यांनी आपल्या समोर ठेवली आहे आणि आज पर्यंत आपला सयोग आम्हांला मिळाला आहे आणि आमचा संयोग तुम्हांला मिळाला आहे. तर सर हा निवडणूकीचा वर्षे आला आहे, आपण सगळया बाजूने विचार केला पाहीजे आणि आम्ही तुमच्याशी सहमत आहेत की, कुठे ना कुठे फंडाची कमी आहे, त्यामुळे ही परिस्थिती आहे. सर आम्ही बजेटमध्ये जी रक्कम ठेवली आहे, ती संपुर्ण आम्ही मागणी करीत नाहीत, आम्ही अजून पण आपल्याला संयोग करण्यासाठी तयार आहेत. असा एखादा प्रपोजल दया, जसे जमनुजीने सांगितले की, आम्ही आपल्याला २५, २५ लाख कलेक्शन करुन देवू तो फंड तुम्ही आम्हांला दया. यामध्ये कंडीशन ठेवा, सर आम्ही महापालिकेचे उत्पन्न वाढवण्यासाठी तयार आहेत. असे नाही की, आम्ही वन साईड बोलत आहेत. आपण आम्हांला सांगा की, जो नगरसेवक ५० हजार कलेक्शन घेऊन येईल, तर फंड देतो, आम्ही जावून मेहनत करु सर. हे आपल्यासाठी करणार आहेत, ही महापालिका आपली आहे. फंड येईल तर आपल्या शहराचे डेव्हलेपमेंट होणार आहे आणि जर कर्मचा-यांची कमी आहे, तर आम्ही स्वत: जाऊ आम्हांला फक्त तारीख दया की, पंधरा दिवसाच्या आतमध्ये किंवा एक महीन्यामध्ये २५, २५, ५०, ५० लाख घेऊन या. आम्ही आमच्या वार्डामध्ये कॅम्प ठेवत आहेत, परंतु आपण कमेटमेंट करा की, २५ लाख, ५० लाख आणा मी तुमच्या वार्डासाठी फंड देईल. सर आम्ही वन साईड काम करण्यासाठी तयार आहेत, तर सर आम्ही आपल्याकडून आशा बाळगतो की, जसे की, राजेशजी आणि इतर सदस्यांच्या भरपूर अपेक्षा आहेत, सर प्रशंशा जास्त कोणाचीच करायला नाही पाहीजे. परंतु आपण आयुक्त म्हणून शहरामध्ये आले आहेत, तर लोकांची आपल्याकडून भरपुर अपेक्षा आहेत की एक चांगले अधिकारी आमच्या शहराला मिळाले आहेत. तर आम्ही अपेक्षा करतो की, काही ना काही चांगले फंड आम्हांला मिळतील, ज्यामुळे आज पर्यंत डेव्हलेपमेंट झाले आहे. कोराना काळामध्ये दोन वर्षे उत्पन्न घटले होते. दोन वर्षे आम्हीकाहीच मागू शकलो नाही आणि त्या वेळेस मागणे पण उचित नव्हते, प्लीज सर.

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-** मा. सभापती महोदय, आता सदस्यांनी ज्या उपस्थित केलेल्या सुचना आहेत, त्या सुचनांचा मी थोडा विचार करतो आणि तुम्हांला देण्याचा प्रयत्न करतो.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ठिक आहे, आमचा ठराव आम्ही पास करीत आहेत, साहेब सुचना आणली आहे, तर ठराव तर करायलाच लागेल ना.

**महापालिका सचिव:-** ठरावामध्ये काय लिहायचे आहे? ते सांगा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ठराव २५ लाख रुपये निधी प्रत्येक सदस्यांना मिळाला पाहीजे.

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री. दिपक सिरवानी- सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑

**विषय क्र. ६ :—प्रस्तावाची सुचना**

**आर्थिक बजेट २०२१—२२ नुसार स्थायी समिती सदस्य निधीकरिता २ करोड रूपये निधीची तरतुद करण्यात येऊन देखिल अदयाप पर्यंत सदर निधी प्राप्त झाला नाही किंवा त्यासंबंधित कोणत्याही कामास परवानगी मिळाली नसल्याने त्याबाबत चर्चा करून निर्णय घेणेबाबत. पालिका सदस्य सुचक म्हणून श्री. राजेश वदारिया व अनुमोदक श्री. भगवान भालेराव यांचा प्रस्ताव विचारात घेणे.**

**प्रस्तावना**

मी या प्रस्तावाच्या सूचनेद्वारे असे लक्षात आणू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या आर्थिक बजेट २०२१-२०२२ नुसार सर्व स्थायी समिती सदस्य यांना शहरातील विकास कामांकरीता प्रत्येक सदस्यांकरिता २ करोड रुपये निधीची तरतुद करण्यात आली होती. परंतु सांगताना वाईट वाटते की, सदर निधी किंवा निधीमार्फत होणा-या विकास कामांकरीता अजून पर्यंत सदरील निधीची रक्कम प्राप्त झाली नाही.

23

म्हणून मी या प्रस्तावाच्या सूचनेद्वारे विनंती करतो की, सदर विषय गांर्भियाने घेऊन येणा-या महासभेमध्ये या विषयावर चर्चा करुन ठोस निर्णय घेण्यात यावा, ही विनंती.

**दिनांक : १७/१२/२०२१**

**स्थायी समिती ठराव क्र. १००**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती सभेत झालेल्या चर्चेनुसार आर्थिक बजेट २०२१—२२ नुसार स्थायी समिती सदस्य निधीकरिता २ करोड रूपये निधीची तरतुद करण्यात आली असून स्थायी समितीच्या सदस्यांना प्रत्येकी २५ लाख रुपये निधी देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**
सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-** विषय संपले आहेत.

सायंकाळी ५.२२ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती, श्री. दिपक सिरवानी यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक –१९/०३/२०२१

दिनांक –१९ /०३ /२०२१ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १९/०३/२०२१, रोजी दुपारी ११.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील महासभा सभागृह येथे शासनाचे क्रमांक कोराना-२०२० /पत्र क्र.७६/नवि-१४, दिनांक २१ डिसेंबर, २०२० च्या पत्रान्वये विहित कार्यपध्दती पालन करुन प्रत्यक्ष सहभागाने/उपस्थितीने घेण्यांत आली, सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. विजय चाहू पाटील | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | सदस्य |
| ४ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |
| ५ | श्री. राजेश वदारिया | सदस्य |
| ६ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | सदस्या |
| ७ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | सदस्या |
| ८ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | सदस्या |
| ९ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| १० | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| ११ | श्रीमती अर्चना करणकाळे | सदस्या |
| १२ | श्रीमती कंचन अमर लुंड | सदस्या |
| १३ | श्री. राजकुमार किशनचंद जग्यासी | सदस्य |
| १४ | श्री.कुलवंतसिंह सोहता | सदस्य |
| १५ | श्री. चंद्रशेखर यादव | सदस्य |

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. आयुक्त, डॉ. राजा दयानिधी

२.श्रीमती करुणा जुईकर, अतिरीक्त आयुक्त

३.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव

४.डॉ. दिपक पगारे, वैदयकीय आरोग्य अधिकारी

५. श्री. मदन सोंडे, उप आयुक्त (कर विभाग)

६. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय)

७. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी

८. श्री. मंगेश गावडे मुख्य लेखापरिक्षक

९.श्री. महेश सितलानी, शहर अभियंता

१०. श्री. सुर्यकांत खटके, लेखाधिकारी

११.श्री. अशोक मोरे, सहा. लेखा परिक्षक

१२.श्री.हनुमंत खरात, उप अभियंता, (विद्युत)

१३. श्री. मनिष हिवरे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी

१४.श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता

१५.श्री. के.जे. रहेजा, शाखा अभियंता, पाणी पुरवठा

१६.श्री. अच्युत सासे, सहा.आयुक्त सा.प्र.वि.)

१७. श्री. यशवंत संगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन, वरिष्ठ लिपिक

२.श्रीमती नर्गिस खान, लिपिक

३. श्री. बाळु भांगरे, लिपिक

४. श्रीमती विदया आढळ, लिपिक

सकाळी ११.३० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

**सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी :-** समोर बघितले तर मा. महापौर मॅडम छोटया खुर्चीवर बसले आहेत, त्यामुळे आम्ही पण जमिनीवर बसणार आहोत. तर कृपया त्यांची खुर्ची बदला.

**महापालिका सचिव:-** पहिली सभा सुरु होत आहे. मा. महोदयांनी सभा सुरु करण्यास सांगितले आहे. विषय आहे वर्ष २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक तयार करणे. आता मा. आयुक्त साहेब, मा. सभापती आणि सर्व समिती पुढे अंदाजपत्रक सादर करतील.

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १ वाचून दाखवितात.

---

## ⇨ विषय क्र १:– o"kZ 2021&2022 ps vankti=d r;kj dj.ksckcr-

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. सभापतीजी, आम्हांला तर अपेक्षा होती की, ज्याप्रकारे केंद्रीय बजेट घेण्याच्या वेळी आणि स्टेट बजेट घेण्याच्या वेळी लॅपटॉप वर किंवा टेपद्वारे देण्यात येते. तर आता या वेळी पण आयुक्त साहेब ज्या प्रकारे काही नवीन कल्पना देतील, परंतु पेपरचा बजेट बघून वाटते की, जुनी स्टाईल वापरली जाते. नविन भारत देश आहे, तर नवीन विचार आपण स्विकारले पाहिजेत.

**<u>आयुक्त, डॉ. राजा दयानिधीः—</u>** मी. डॉ. राजा दयानिधी, आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका वित्तीय वर्ष २०२१—२०२२च्या अर्थसंकल्पासाठी आयोजित विशेष सभेत, मा. महापौर, मा. स्थायी समिती सभापती महोदय, सर्वसन्माननीय सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करतो. उल्हासनगर महानगरपालिकेच्या माझ्या कार्यकाळातील अर्थसंकल्पीय अंदाज सादर करण्याचे सौभाग्य मला प्राप्त झाले आहे. त्याबद्दल मी आभारी आहे.

आपणा सर्वांना जाणीव आहे की, महानगरपालिकेचे अंदाजपत्रक तयार करावयाची प्रक्रिया हि तीन टप्प्यांची असते. सर्वप्रथम अधिनियमाचे कलम ९५ नुसार आयुक्तांनी उत्पन्न व खर्चाचे अंदाज स्थायी समितीसमोर सादर करावयाचे असतात. अंदाजपत्रक तयार करण्याचे अधिकार जनतेने निवडून दिलेल्या जनप्रतिनिधी यांना आहेत. हे अधिकार स्थायी समिती सदस्यांना अधिनियमाचे कलम ९६ अन्वये प्राप्त आहेत. स्थायी समिती सदस्यांनी तयार केलेले अंदाजपत्रक जसेच्या तसे किंवा फेरबदल करून अंतिम करण्याचे अधिकार मा. महासभेस प्राप्त आहेत.

याउक्ती प्रमाणे मी सन २०२०—२१ चे सुधारीत व सन २०२१—२२ चे जमा व खर्चाचे अंदाज मा. स्थायी समितीस सादर करीत आहे.

## वित्तीय वर्ष सन२०२०—२१ चे सुधारित अंदाज

| | |
|---|---|
| आरंभिची षिल्लक | :—81.09कोटी |
| उत्पन्न | :— 425.76कोटी |
| खर्च | :— 425.48कोटी |

वित्तीय वर्ष सन २०२०—२१ च्या सुधारित अंदाजपत्रकात खालील लेखाशिर्षात सुधारीत वाढ केली आहे.

- एडस्, टी.बी. व इतर रोग या लेखाशिर्षा अंतर्गत रु. २०.०० कोटीची तरतुद केली आहे.
- टेंडर व इतर नोटीस जाहिरात खर्च या लेखाशिर्षा अंतर्गत रु. ८० लक्षाची तरतुद केली आहे.
- प्रभाग समिती क्र.१,२,३ व ४ मधील प्रभाग क्षेत्रात मूलभूत सेवा व प्रभाग क्षेत्रात मूलभूत सेवा (दुर्बल घटक) या लेखाशिर्षा अंतर्गत प्रत्येक नगरसेवकांसाठी रु. २ लक्ष वाढीव प्रमाणे रु. १.५६ कोटीची तरतुद केली आहे.

## वित्तीय वर्ष २०२१—२२चे जमा व खर्चाचे अंदाज

| | |
|---|---|
| आरंभिची शिल्लक | :— २८.४० लक्ष |
| उत्पन्न | :— ४३०.४५ कोटी |
| खर्च | :— ४३०.२८ कोटी |

| संकिर्ण | रक्कम (कोटीत) |
|---|---:|
| मनपाचे स्वतःचे उत्पन्न | 167.52 |
| अनुदान | 260.65 |
| असाधारण लेखे | 2.28 |
| कर्ज | 0.00 |
| एकुण | 430.45 |

सन 2021—22 चे मुळ अंदाजपत्रक

जमा व खर्चाचा अंदाजानुसार रुपया कसा येईल याचा तपषील

| अ.क्र. | लेखा शीर्ष | उत्पन्न | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मालमत्ताकर | १०८.१०कोटी | २५.११: |
| २ | पाणी पट्टीकर | ३५.०० कोटी | ८.१३: |
| ३ | एम.एम.आर.टी.पी. अंतर्गतवसूली | १२.५६कोटी | २.९२: |
| ४ | परवानेफी व इतर शुल्क | ८.००कोटी | १.८६: |
| ५ | एल.बी.टी. , वित्तआयोग व इतर अनुदाने | २६०.६५कोटी | ६०.५५: |
| ६ | इतर | ६.१४कोटी | १.४३: |
| | एकूण | ४३०.४५कोटी | १००.००: |

मालमत्ता कर

- स्थानिक संस्था कर रद्द झाल्यामुळे मालमत्ता कर हा महानगरपालिका उत्पन्नाचा महत्वाचा मुख्य स्त्रोत आहे. सदर स्त्रोतापासुन जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात येत आहेत.
- माहे १८ फेब्रुवारी २०२१ ते ३१ मार्च २०२१ पर्यंतअभय योजना जाहीर करण्यात आली असून मालमत्ता कर हा महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. सद्यस्थितीत अंदाजे १,७७,००० मिळकतींवर अंदाजे ६५ कोटी वार्षिक कर आकारणी करण्यात येत आहे. चालू वर्षाच्या सुरुवातीस अंदाजे ५२०.४१ कोटी मिळकत धारकांकडून येणे बाकी आहे. परंतु दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र राज्यामध्ये कोव्हीड—१९ या आजाराचा झपाटयाने प्रसार झाल्यामुळे कोव्हीड—१९ नियंत्रणाचा एक भाग म्हणून राज्यात तसेच महानगरपालिका क्षेत्रात लॉकडाउन करण्यात आले होते. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ही माहे मार्च २०२० मध्ये पहिला रुग्ण आढळुन आल्याने लॉकडाउन सुरु करणेत आले होते.
- लॉकडाउनच्या कालावधीत नागरिकांना कराची बिले मुदतीत बजावता आली नाहीत. त्यामुळे नियमित कर भरणा करणारे करदात्यास कराची रक्कम आगाउ भरण्यापासून असलेली सवलत प्राप्त झालेली नाही. या कारणास्तव व जनप्रतिनिधींच्या मागणीनुसार विशेष बाब म्हणून दिनांक १८ फेब्रुवारी २०२१ पासून अभय योजना सुरु करण्यात आली आहे.

पाणीपट्टी

- वित्तीय वर्ष २०२१—२२ मध्ये पाणीपट्टी वसूलीपोटी ३५कोटीचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे.

एम.आर.टी.पी.अधिनियमाअंतर्गत वसुली

- उल्हासनगर शहराच्या विकास आराखडा नुकताच मंजुर करण्यात आलेला आहे. त्याच्याशी संबंधित विकास नियंत्रण नियमावली दिनांक०२/१२/२०२०मंजुर करण्यात आलेली आहे. या डी.सी.आर मध्ये एफ.एस.आय जे पुर्वी फक्त १ होता तो आता ३ते ५ पर्यंत वाढवला आहे.
- याशिवाय क्लस्टर डेव्हलपमेंटसारखे अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. सदर डी.सी.आरप्रमाणे विकासक आता महापालिकेत पैसे भरुन टी.डी.आर खरेदी करु शकणार आहेत. डी.सी. आर मध्ये उपलब्ध या सर्व तरतूदीमुळे मोठया प्रमाणात विकास शुल्क व प्रिमियमची वसूली होणार आहे.
- त्यामुळे वर्ष २०२१—२२ मध्ये रु. १२.५६कोटीचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.

केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान

- एल.बी.टी.बंद झाल्यानंतर शासनाकडून जी.एस.टी.अनुदान रु. १६.२५ कोटी प्रति महा प्राप्त होत आहे.
- याशिवाय वित आयोगाच्या शिफारशीमुळे अनुदान, मुद्रांक शुल्क अनुदान, रस्ता अनुदान, आमदार निधी, खासदार निधी, दलितवस्ती सुधारणा अनुदान व इतर अनुदाने महापालिकेस प्राप्त होत आहेत.

- यासर्व अनुदानापोटी रु.२६०.६५ कोटी अनुदान वर्ष २०२१—२२ मध्ये प्राप्त होईल असा अंदाज आहे.

## कर व दर वाढ

- नव हस्तांतरण शुल्क :—

| अ.क | तपषिल | दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. (अर्ज दाखल करतांना भरणा करणे आवष्यक) | वरसाहक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. (अर्ज दाखल करतांना भरणा करणे आवष्यक) |
|---|---|---|---|
| 1 | निवासी | किमान रु. 1500/— कमालकर योग्य मुल्याच्या 2 टक्के यापैकी जे जास्त असेल ते. | रु.1000/— |
| 2 | अनिवासी | किमान रु. 3500/— कमालकर योग्य मुल्याच्या 2 टक्के यापैकी जे जास्त असेल ते. | रु.2500/— |

## सन 2021—22 चे मुळ अंदाजपत्रक
## जमा व खर्चाचा अंदाजानुसार रुपया कसा जाईल याचा तपषील

| अ.क्र. | लेखा शीर्ष | खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | पगारभत्ते व इतरप्रशासकीय खर्च | 141.26 | 32.81 % |
| 2 | एम.आय.डी.सी. | 78.40 | 18.21 % |
| 3 | कर्जपरतफेड | 8.48 | 1.97 % |
| 4 | शहररोशनाई | 9.00 | 2.09 % |
| 5 | कचरावाहतूक व जंतूनाशकइत्यादी | 10.70 | 2.49 % |
| 6 | उदयाने | 1.96 | 0.46 % |
| 7 | अग्निशमन व आणिबाणी व्यवस्थापन | 4.55 | 1.06 % |
| 8 | दवाखाना व आरोग्य विषयककार्यक्रम | 22.21 | 5.16 % |
| 9 | रस्ते व पायाभूतसुविधाविकास | 52.27 | 12.14 % |
| 10 | प्रभागसमित्या | 3.12 | 0.72 % |
| 11 | पाणी पुरवठा | 13.45 | 3.12% |
| 12 | मलनिसारण | 4.30 | 1.00 % |
| 13 | भुयारीगटार | 6.50 | 1.50 % |
| 14 | प्राथमिकशिक्षण | 38.00 | 8.82 % |
| 15 | परिवहनसेवा | 0.30 | 0.07 % |
| 16 | असाधारणलेखे | 16.28 | 3.78 % |
| 17 | महिला व बालकल्याण | 5.00 | 1.16 % |
| 18 | इतर | 11.79 | 2.73 % |
|  | एकूण | 427.57 | 99.30 % |
| 19 | अमृत योजना | 3.00 | 0.70 % |
|  | अमृत योजनेसह एकूण | 430.57 | 100.00% |

## सन 2021—22 चे मुळ अंदाजपत्रकमधील बांधील खर्च **(Committed Exp.)**

| अ.क | संकिर्ण | रक्कम (कोटीत) |
|---|---|---|
| 1 | पगार भत्ते व इतर | 131.71 |
| 2 | प्रशासकीय खर्च | 9.54 |
| 3 | एम.आय.डी.सी. | 78.40 |
| 4 | कर्ज परत फेड (पाणी पुरवठा योजना) | 0.10 |
| 5 | अमृत योजना कर्ज परतफेड | 8.38 |
| 6 | शहर रोशनाई | 5.35 |
| 7 | महिला व बालकल्याण | 5.00 |
| 8 | दिव्यांग व्यक्तींसाठी कल्याणकारी योजना | 5.00 |
| 9 | दुर्बल घटक वसाहतीत विकास कार्य | 11.30 |
| 10 | पा.पु. इमारती विद्युत टेलिफोन बिल | 4.25 |
| 11 | प्राथमिकशिक्षण | 38.00 |
|  | TOTAL | 297.04 |

**सन 2021–22 चे मुळ अंदाजपत्रकमधील न वचनबध्द खर्च (NonCommitted Exp.)**

| अ.क्र | संकिर्ण | रक्कम (कोटीत) |
|---|---|---|
| 1 | विद्युत | 3.65 |
| 2 | सार्वजनिक आरोग्य | 10.70 |
| 3 | सार्वजनिक बांधकाम | 35.97 |
| 4 | प्रभाग समिती | 3.12 |
| 5 | उद्यान | 1.96 |
| 6 | अग्निषमन | 4.55 |
| 7 | सुरक्षा | 0.10 |
| 8 | वैद्यकीय आरोग्य | 22.21 |
| 9 | पाणी पुरवठा | 9.20 |
| 10 | मलःनिसारण | 4.30 |
| 11 | भुयारी गटार | 6.50 |
| 12 | परिवहन | 0.30 |
| 13 | इतर | 11.41 |
| 14 | असाधारणलेखे | 16.28 |
| 15 | अमृत योजना/जे.एन.एन.यु. आर.एम/सु.ज.न.यो. | 3.00 |
| | एकुण | 133.25 |

**उपरोक्त स्त्रोतापासुन प्राप्त होणा–या रक्कमेचा विनियोग करण्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.**

**पगारभत्ते व प्रशासकिय खर्च**

- महापालिकेत अंदाजे २१५० अधिकारी/कर्मचारी व १६९० सेवा निवृत्त वेतन धारक आहेत. शिवाय राज्य शासनाने दिनांक ०१ जानेवारी २०१६ पासून ७ वा वेतन आयोग लागू केला असून वित्तीय वर्ष २०२१–२२ मध्ये पगारभत्ते खर्चासाठी १४१.२६कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

**सार्वजनिक आरोग्य**

- उल्हासनगर शहरात निर्माण होणा–या कच–याचे संकलन, साठवण व वाहतूक, किटकनाशक व जंतूनाशके खरेदी तसेच शहर स्वच्छता आराखडया अंतर्गत कच–यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्यासाठी 10.70 कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

**शहर रोषणाई**

- शहर रोषणाईसाठी महापालिका हद्दीत अंदाजे १८००० पथ दिवे लावण्यात आलेले आहेत.
- वित्तीयवर्ष २०२१–२२ च्या अंदाजपत्रकात विद्युत व्यवस्थेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी रु. ९.००कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

**उद्याने विकास**

- उद्यानांसाठी वर्ष २०२१–२२ रु.१.९६ कोटीच्या अंदाज पत्रकात तरतुद करण्यात आलेली आहे.

**सार्वजनिक बांधकाम**

- मा. महापौर, मा. आयुक्त यांचे निवास्थान या साठी रु. १ कोटीची तरतुद केली आहे.
- विश्राम गृहासाठी रु. १ कोटीची तरतुद नवीन हॉस्पीटल बांधणेसाठी रु. २ कोटी यांचा समावेश आहे.
- छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे बनविणेसाठी रु. ५० लक्ष ची तरतुद केली आहे.

भुयारी गटार

- वित्तीयवर्ष २०२१—२२ च्या अंदाजपत्रकात संबंधित लेखाशिर्षा अंतर्गत रु. ६.५० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.
- तसेच वाहन व मशिनरी खरेदी { यांत्रिकीकृत रोबोटद्वारे मॅनहोल्सची (Manholes) सफाई—ओ एम } या लेखाशिर्षा अंतर्गत १ कोटीची तरतुद करण्यात आली आहे.

प्राथमिक शिक्षण

- वित्तीय वर्ष २०२१—२२ च्या अंदाजपत्रकात रु. ३८ कोटीची (वेतन, बांधकाम व दुरुस्ती) महानगरपालिकेकडून तरतूद करण्यात आलेली आहे.

वैद्यकीय आरोग्य

- दवाखाना व आरोग्य विषयक कार्यक्रम यासाठी २२.२१ कोटी तरतुद केली आहे.
- Comorbidity ( Diabetes, Hypertension etc) असलेल्या व्यक्तींना कोव्हीडचा संसर्ग तीव्र होण्याची शक्यता आहे. म्हणून Comorbidity असलेल्या लोकांची नियमित प्रमाणे घरोघरी जाऊन स्क्रीनींग करुन औषोधोपचार इ. महानगरपालिकामार्फत करण्याची संकल्पना आहे. सदर(Non Communicable Disease Programme) स्कीम साठी रु. ३कोटीची तरतुद केली आहे.
- तसेच औषधे खरेदीसाठी रु. २ कोटीची तरतुद केली आहे.

राष्ट्रीय कार्यक्रम

- केंद्र सरकार व राज्य शाासनाच्या धोरणानुसार आर्थिक दृष्टया दुर्बल व्यक्ती दिव्यांग व्यक्ती, महिला व बाल कल्याण तसेच इतर राष्ट्रीय कार्यक्रमाअंतर्गत खालील प्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

| अ.क | तपषिल | रक्कम |
|---|---|---|
| 1 | महिला व बालकल्याण | 5.00कोटी |
| 2 | दिव्यांग व्यक्तींसाठी कल्याणकारी योजना | 5.00 कोटी |
| 3 | दुर्बल घटक वसाहतीत विकास कार्य | 11.30कोटी |
| 4 | वेडे व कुष्ठ रोगी कल्याण योजना | 5 लक्ष |
| 5 | कुटुंब नियोजन कार्यक्रम | 5लक्ष |
| 6 | हिवताप व डेंग्य प्रतिबंधात्मक उपाय | 50 लक्ष |
| 7 | एडस् टी.बी.व इतर साथीचे रोग प्रतिबंधात्मक उपाय | 10.00कोटी |
| 8 | माझी वसुंधरा अभियान | 2.00कोटी |

दायित्व

- सद्यस्थितीत लेखा विभागामध्ये रु. 49 कोटींची प्रलंबित देयके असून विविध विभागांकडे प्रलंबित असलेली परंतु लेखाविभागात सादर न झालेली देयके 41 कोटीसह एकुण प्रलंबित देयकाची रक्कम 90 कोटी आहे.
- प्रलंबित देयके 90 कोटीपैकी 1/3 म्हणजेच रु. 30 कोटींची प्रलंबित देयके सन 2021—22 मध्ये अदा करण्याचा महापालिकेचा मानस आहे व उर्वरीत रक्कम रु. 60 कोटीची प्रलंबित देयके येणा—या 02 वर्षात प्रदान करण्याचा संकल्प केला आहे.

प्राप्त परिस्थितीमध्ये 'स्वावलंबन व काटकसर या तत्व व धोरणाशिवाय पर्याय नाही' सदर धोरणानुसार शहरवासियांना जास्तीत जास्त सेवा व सुविधा पुरविण्याकरिता आवश्यक तो निधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. तसेच कोरोनाच्या दुस—या लाटेचा सामना करण्यासाठी उल्हासनगर शहरानी महानगरपालिका सतत प्रयत्न करत असून पुन्हा याद्वारे प्रत्येक शहरवासीयांना त्रिसुत्र :— मास्क लावणे, हात स्वच्छ धुणे व सुरक्षित अंतर ठेवणे या सुत्राचे काटेकोर पालन करण्याचे आव्हान करुन मी माझे निवेदन संपवितो.

जय हिंद!जय महाराष्ट्र!

**सभापती, श्री. विजय पाटील:-** हा जो बजेट सादर केलेला आहे, त्यासाठी खरे म्हणजे आपल्याला वेळ दिली पाहीजे होती. वेळ फार कमी दिली आहे, तरी सुध्दा दोन दिवस अभ्यास करुन याच्यावर उल्हासनगरसाठी चांगल्याच चांगल्या गोष्टी आपण आणू या आणि या बजेटचा दोन दिवस अभ्यास करुन २२ तारखेला सकाळी मिटींग लावू या.

**सदस्य, श्री.जमुनादास पुरस्वानी:-** मा. सभापतीजी, मा. आयुक्त साहेब, आपल्याला खुप खुप धन्यवाद ! आपण आज खुप मेहनत करुन १९ मार्च ला आपण सुंदर त-हेने स्थायी समिती पुढे बजेट प्रस्तुत केले आहे. बी.पी.एम.सी. ॲक्टनुसार शहराचे कर व दर निश्चित करणे हे २० फेब्रवारीच्या पहिले स्थायी समितीमध्ये पास होऊन महासभेत पारीत झाले पाहिजे. परंतु आपण खुप सुंदर त-हेने जसे लोकांवर कोणताही बोजा कोणती अडचण येणार नाही. कर आणि दराची वृध्दी न करु शकते, ती मुदत वेळ ही संपली आहे. जर कर आणि दर वाढले तर कोरोनाने जे लोक पहिलेच पीडीत आहे, त्यांना आणखी भार पडणार आहे. त्यासाठी आपण २० फेब्रवारीच्या आधी प्रस्तुत नाही केले, त्यासाठी आम्ही भारतीय जनता पार्टीतर्फे व स्थायी समितीच्या सर्व सदस्यांतर्फे आपले खुप खुप अभिनंदन. त्या बरोबरच आज १९ मार्च ला खुप सुंदर त-हेने बजेट येथे प्रस्तुत केलेला आहे. परंतु या नेहमी बजेट वाचण्यासाठी स्थायी समितीमध्ये बजेट येतो, तेव्हा सर्व सदस्य त्याचा अभ्यास करण्यासाठी व त्या बजेटमध्ये फेरबदल करण्यासाठी कमीत कमी ८ दिवसांचा कालावधी घेतात. ८ किंवा १० दिवसात बजेट वाचून आम्ही त्याला येथे स्थायी समितीमध्ये पारीत करतात आणि नंतर महासभेत तो बजेट येतो. माझ्या मते आजपर्यंत जो माझा अनुभव आहे २४ वर्षांचा त्यामध्ये आज १९ मार्च पर्यंत महासभेत आम्ही बजेट पारीत करीत असतो. लास्ट २० तारीख पर्यंत होत असते. कधी कधी असे पण झाले असेल, की बजेट ३१ मार्च पर्यंत आम्ही पास पण केला असेल. परंतु स्थायी समितीमध्ये असा एक दिवस पण नाही की, बजेट आले आणि आम्ही दोन दिवसांत अभ्यास करु आणि दोन दिवसांत पास कर आम्ही २२ तारखेस या बजेटला पारीत करु शकतो. असे कधी झाले नाही. आज शुक्रवार आहे. आणि शनिवार, रविवार ला सुट्टी आहे. सर्व गटनेता, सर्व पदाधिकारी बसून त्यासाठी कमीत कमी ६ किंवा ८ दिवसांचा वेळ लागतो. आपआपसांत बजेट वर चर्चा करुन माझा तर हेच निवेदन असेल की, आपण अनिश्चित काळासाठी स्थगित करा. कारण बजेटवर अभ्यास होऊ शकेल. कमीत कमी चांगल्या त-हेने कोरोना काळात किती आमची कमतरता राहीली आहे. काय काय लोकांना सुविधा दयावयाची आहेत? काय काय वसूली बाकी राहीली आहे? कुठे आम्ही कमी पडलो?, आणि काय काय आम्हांला करायचे आहे? हे सर्व करण्यासाठी आम्हांला वेळ कमीत कमी ८ किंवा १० दिवस लागणारच लागणार.

**सदस्य, श्री.राजू जग्यासी:-** मा. अध्यक्ष महोदय...

**सदस्य, श्री.जमुनादास पुरस्वानी:-** नाही. नाही. काय गरज आहे? आपण मार्चमध्ये आणा, एप्रिलमध्ये आणा. फेब्रुवारी माझ्या मते पास करा. जसे की आयुक्तांनी आणला आहे, तसे पास महासभा लावा. आजच महासभा ठेवा.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** जी बी मध्ये आणायचे होते हे तर पहिलेच माहित असणार ना आपल्या लोकांना. हे आज थोडेच माहित झाले. मी अध्यक्ष, सभापतीशी बोलत आहे. सर

**सदस्य, श्री.जमुनादास पुरस्वानी :-** हे बघा, फक्त लेखाधिकारी यांना चेक काढण्या शिवाय दुसरे काही काम नाही. बजेट काय बनवणार ते. सुट्टीवर जातात तरी १०-१० चेक सही करुन जातात. त्यांना फक्त पेमेंट वाटायचे आहे.

याशिवाय त्यांना काय काम नाही आणि बजेट बोलतात १ एप्रिलच्या अगोदर का करायचे आहे? दुस-या वर्षात करायचे ना मा. आयुक्त साहेबांनी खुप चांगल्या प्रकारे अध्ययन करुन दिले आहे, त्याला पास करा ना. आम्ही सर्व पास करण्यास तयार आहोत. जसे की, मा. आयुकत एक आय.एस.आय. अधिकारी आहेत. त्यांनी खुप अभ्यास केला असेल ना बजेट वर. तर आम्ही परत का बजेट वाचू? आम्ही आयुक्तांनी दिलेला बजेट पास करायला पाहीजे. आम्हांला आयुक्तांवर काही तक्रार आहे का? त्यांनी तर पुर्ण फेब्रुवारी, पुर्ण मार्च यासाठी लावला आहे. आज बजेट दिला आहे. आजच्या आज पास करा बजेट. बजेट पास करुन आज महासभेचा एजेंडा काढा आणि महासभेमध्ये पण बजेट पास करा.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** आता पास करा बजेट.

**सदस्य, श्री.जमुनादास पुरस्वानी:-** बजेट पास करायला पाहीजे असाच. पुर्ण दिवस पडलेला आहे. सर्व सदस्य बसून चर्चा करु आणि आजच्या आज पास करा बजेट. कशाला २ दिवस ३ दिवस पाहिजे. आयुक्त सर्वेसर्वा आहेत. ज्यांना संपुर्ण माहिती आहे. त्यांनी तर चांगल्या प्रकारे बजेटचा अभ्यास केला असेल. याच्यावर आम्हांला शंका नाही आहे. आम्ही आयुक्तांच्या सोबत आहोत. चालवयाची त्यांना आहे महापालिका. आज कोरोना काळात काय काय अडचणी आल्या आणि आमचे लेखाधिकारी यांना पैसे वाटण्यापासून सवड नाही. काय बनवणार बजेट?

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** मा. सभापतीजी, जेव्हा पण बजेट स्थायी समितीमध्ये आयुक्ताद्वारे दिला जातो तेव्हा एक पावर पॉईंट प्रेझेंटेन्शन दिले जाते. ज्यामुळे सदस्यांना या बजेटमध्ये काय काय आहे? ते समजायला सोपे जाते आणि या वेळेस तर पावर पॉईंट प्रेझेंटेन्शन दिसून येत नाही आणि आयुक्त साहेबांची जे भाषण आहे त्याची पण एक प्रत आम्हांला मिळायला पाहिजे. फक्त त्यांनी बोलले आणि आम्ही समजायचे तर ते कठीण आहे. एक आयुक्त साहेबांची जे भाषण आहे त्याची पण एक प्रत आम्हांला मिळायला पाहिजे. हे तर सर्वांना माहित आहे, सेक्शन ९५ मध्ये आयुक्त अकाउंटचे तपशिल स्थायी समितीला देतात आणि स्थायी समिती बजेट बनवते. आणि मग महासभेत बजेट पास होतो. ही प्रकिया तर सर्वांना माहित आहे. या हिशोबाने प्रशासनाकडून उशीर झालेला आहे. त्यासाठी आम्ही जबाबदार नाहीत. त्याला जेवढा वेळ लागयाचा तो लागणारच.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** मा. सभापतीजी, पहिले तर आमचे आदरणीय भाई, जमनुदास पुरस्वानी यांनी आयुक्त साहेबांचे आभार मानून धन्यवाद केले. त्यांनी खुप चांगल्याप्रकारे बजेट वाचले व येथे मांडले. आज खरच हरेश इदनानी यांची आम्हांला आठवण येते. जसे राजेश वधारीया भाई यांनी सांगितले की, पावर पॉईंट प्रेझेंटेन्शन सर्व सदस्यांना सांगितले जाते की, विहित वेळेत बजेट सादर केला जातो. तर मी परत परत ही गोष्ट न सांगता मला वाटते की, प्रशासनाने याचा खुलासा करावा की, बजेटला एवढा उशीर झाला, बजेट त्याचे कारण काय आहे. आम्हांला वेळ दिला जात नाही. आम्ही अभ्यास नाही करणार, तर विचारांचे आदान-प्रदान कसे करणार न करताच पास करायचे. तो प्रशासनाकडून उत्तर पाहिजे. आपले लक्ष नव्हते काय. का आपल्याकडून चुक झाली. या खुप सारे अशी कामे होती, की जे बजेट पेक्षा जास्त महत्तवाचे होते, त्याच्यावर आपण लक्ष दिले आहे. की शहरातील खुप मोठे विकासाची कामे करीत होता. का खुप मोठे आणखी काही कार्य करीत होतात. बजेट ज्याला बोलले जाते महानगरपालिकेचे, तेच आपण वेळेवर देत नाहीत. कृपया याचा खुलासा करा.

**मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:-** सन्माननीय सभापती महोदय, सन्माननीय आयुक्त साहेब, सर्व माननीय सदस्य्, बजेट विहीत कालावधीतच सादर करण्याची जबाबदारी परंतु मला स्वत:ला ८ मार्च रोजी कोरोना पॉझिटिव्ह झालो. त्यानंतर १७ दिवस म्हणजे २२ फेब्रुवारी पर्यंत मी स्वत: कोरोन्टाईन असल्यामुळे वेळ लागला. तत्कालीन माझ्यानंतर ज्यांकडे तो चार्ज होता त्यांनी बजेटचे काही पाहिले नव्हते, परंतु आम्ही सर्वजण संपर्कात होतो. त्यामुळे थोडासा वेळ लागलेला आहे. यामध्ये जाणीवपुर्वक विलंब किंवा असे काही झालेले नाही.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** आता काय समाधान काढणार यावर? जरुरीचे आहे आम्हांला या महिन्याच्या शेवट पर्यंत बजेट पास करणे किंवा पुढे घेऊन जायचे.

**<u>सदस्य, श्री.जमुनादास पुरस्वानी:-</u>** पावर पॉईंट प्रेझेंटेन्शन नाही. आपण बोलत आहात की, आपल्याला कोरोना कोणत्या तारखेला झाला.

**<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:-</u>** ८ फेब्रुवारीला.

**<u>सदस्य, श्री.जमुनादास पुरस्वानी:-</u>** ८ फेब्रवारी आज पर्यंतचा रेकॉर्ड आहे, २४ वर्षाचा ८ फेब्रवारीच्या पहीलेच बजेट स्थायी समितीमध्ये आला आहे. एक पण दिवस नाही २४ वर्षामध्ये की, ८ फेब्रुवरी नंतर आला आहे, तरी आपण ८ फेब्रवारी पर्यंत दयायला पाहिजे होता. आम्ही आजपर्यंत २४ वर्षात पहिल्या वेळेस ८ फेब्रवारीच्या पहिले आले आहे बजेट. ८ फेब्रुवारी नंतर तुम्हांला कोरोना झाला आहे तर ८ फेब्रुवारीला आपण बजेट दयायला पाहीजे होता. त्यानंतर आपल्याला कोरोना झाला. फेब्रवारी घेवून जायचे आपण वाट पाहता होता की, ८ फेब्रवारी पर्यंत मी नाही देणार. कोरोना होणार आहे, आजपर्यंत ८ फेब्रवारी १९९६ पासुन महानगरपालिका बनली आहे. सन २०२० पर्यंत मागच्या वर्षी २० मार्च ला लॉक डाउन झाले. तोपर्यंत आम्ही बजेट पण केले होते. स्थायी समितीमध्ये पण केले होते. महासभेमध्ये पण केले होते आणि या वर्षात आपण ८ फेब्रवारी ला आजारी होतात आणि त्याचे उदाहरण देत आहेत की, मी आजारी असल्यामुळे नाही देवू शकत. ८ फेब्रवारीच्या पहिलेच आपल्याला स्थायी समिती पुढे बजेट दयायचा होता. कारण मागच्या २४ वर्षात नेहमी ८ फेब्रवारीच्या पहिले आले आहे. कर, दर निश्चित होतात, कर, दर वाढवायचे येते, कमी करावयाचे येते, यावेळे कोरोना काळात एप्रिल, मे, जून तीन महिन्या पर्यंत पुर्ण शहरातील एक पण दुकान उ्घडले नाही. त्यांचे पाणीचे बील कमी करायचे होते. लोकांनी पाणी भरलेच नाही. कमर्शिअल बील माझे दुकान आहे. जर मी ३ महिने दुकानच नाही उघडले म्हणजे मी पाणी नाही भरले. तर मी पाण्याचे कमर्शिअल बील भरत आहे. ज्यांना मीटर नाही आहे. ९५ प्रतिशत कमर्शिअल ज्यांना मीटर नाही आहे. काय आपण विचार नाही केला. लोक अडचणीत होते. कर आणि दर निश्चित करण्यास लोक काही कमी करावे लागेल नाही. आपण कोणत्याही प्रकारची काळजी नाही घेतली. आणि आपण बेजबाबदार अधिका-यासारखे उत्तर देत आहात की, ८ फेब्रवारीला मला कोरोना झाला होता, परंतु ८ फेब्रवारीच्या पहिलेच आपल्याला स्थायी समितीपुढे बजेट दयायचा होता.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>** आम्हांला जर कोणाचे बील कमी करावयाचे असेल तर मालमत्ता कर कमी करायचे असेल, पाणी बील कमी करावयाचे असेल तर त्यासाठी काय करावयाचे सांगा. रस्ता काय आहे आता, आम्हांला वाटते की, शहरातील जनता कोराना काळामध्ये खुप काही भोगले आहे आणि आपल्याला पण कोरोना झाला होता. लोकांची मानसिक स्थिती खुप खराब आहे. आम्हांला वाटते की, लोकांचे टॅक्स कमी करा, पाणी बील कमी करा. तर काय आम्ही आता ते करु शकतो का? खुलासा करा.

**<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:-</u>** मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे २० फेब्रुवारी च्या पहिले दर वाढ किंवा कमी करु शकतो.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>** म्हणजे तुम्ही आमचा अधिकार काढून टाकला.

**<u>सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:-</u>** २० फेब्रुवारी कमी करणे म्हणजे ५ किंवा फेब्रुवारी ला स्थायी समितीमध्ये आला पाहिजे. ६-७ दिवस आम्ही घेणार. १० फेब्रुवारी पर्यंत आम्ही पास करणार. ७ दिवसांचा अजेंडा काढून १८ किंवा १९ ला महासभा करणार. याचा अर्थ हा होतो २० फेब्रुवारीच्या पहिले महासभेत पारीत झाले पाहिजे. म्हणजे स्थायी समितीपुढे ५ फेब्रुवारीच्या पहिले आले पाहिजे. आणि आपण आजारी होतात ८ फेब्रुवारीला. तर ८ फेब्रुवारीपर्यंत आपण का नाही देवू शकले. ५ फेब्रुवारी २० फेब्रुवारीपर्यंत आपण स्थायी समितीपुढे का नाही दिला. आपण याआधी ही या महापालिकेत काम केले आहे. आपण कधीच खुर्चीवर बसत नाही. कोणी नगरसेवक आपल्या पुढे येवून प्रश्न करेल की आपण बजेट की तयारी केली किंवा नाही त्याच्या आधीच आपण उठून जातात. कशाप्रकारचे वागणे चालले आहे आपले महानगरपालिकेच्या आत. कोणता असा अधिकारी आहे महासभाचा ट्रस्टी

आहे, जो नगरसेवक जेव्हा आपल्याला भेटायला येतो, कोणत्या कामासाठी येतो, जेव्हा ते दरवाजा उघडतात, आपण उठून उभे राहतात, मी येतो ५ मिनिटाच्या आत, हे काय वागणे आहे आपले? हे जरुरी नाही का कोणत्या कामासाठी आले आहेत. कोणाचे बोलणे ऐकायचे नाही का. जर आपलाच बेजबाबदारपणा चालवायचा आहे लोकांना अचडणीत ढकलायचे आहे. तर शहरास खडडयात टाकायचे आहे का. हाच आपला कारभार चालला आहे. मा. आयुक्तजी आपण एक चांगले अधिकारी आहात. पुर्ण सभागृह आपल्याशी संतुष्ट आहे. कोरोना काळात येवून आपण पुर्ण शहरात कोरोना मुक्त खुप चांगले पाउल उचलले आहे. त्याचे कौतूक केले जात आहे. पण असे अधिकारी जे आपल्याला पण चुकीचे मार्गदर्शन करतात व फिरवतात. अशा अधिका-यापासुन आपल्याला सावधान राहीले पाहिजे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** बोला सभापतीजी.

**सभापती, श्री. विजय पाटील:-** प्रशासनाच्या बाजूने जो पण अधिकारी आहे. ज्याची पण चुकी यामध्ये झाली आहे. मी आयुक्तांना सांगतो की त्यांना नोटीस देण्यात यावी की का नाही आपण वेळेत काम केले आणि आजची मिटिंग आहे. ती २२ तारखेला ११.०० वाजता ठेवण्यात येईल.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** मॅडम त्यांना महासभेमध्ये आणण्यासाठी किती दिवस लागणार? आपल्या हिशोबाने कोणती तारीख पाहिजे ते कायदयाच्या हिशोबाने सांगा.

**महापालिका सचिव:-** आपण जी. बी. ३१ तारखेला ठेवली तरी चालेल.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** आम्ही २२ ठेवू की २३ ला ठेवू . २२ ला ठेवू.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** सभापतीजी २२ तारखेला ठेवा आणि उदया अन ऑफिशली पावर पॉइंट प्रजेटेंशन ठेवून सर्व गटनेत्यांना बोलवा आपल्या सर्व नेत्यांना बोलवा. आमच्या सर्व नेत्यांना बोलवून चर्चा करुन २२ तारखेपर्यंत येवून जाईल.

**सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:-** मा. आयुक्त् साहेब आपण आपल्या अधिका-यांना पण सांगा आमच्याकडे वेळ खुप कमी आहे. उदया आणि परवा दोन दिवस जे पण बजेटशी संबंधीत अधिकारी आहेत ते येथे उपस्थित रहा. पॉवर पॉईट प्रजेटेंशन जसे की राजेशजी बोलले पुर्ण माहिती दया जेणेकरुन आम्ही बजेटला सोमवारच्या दिवशी पास करु शकतो.

**सभापती, श्री. विजय पाटील:-** ही मिटिंग २२ तारखेला दुपारी १२.०० वाजता ठेवा.

दुपारी १२.०७ वाजता सभेचे कामकाज स्थगित केल्याचे सभापती, श्री. विजय पाटील यांनी जाहीर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक – २२/०३/२०२१

दिनांक– २२/०३/२०२१ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

५.अ

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची विशेष सभा शुक्रवार दिनांक १९/०३/२०२१, रोजी सायंकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. परंतु सदरची सभा स्थगित झाल्याने सदर सभा सोमवार दिनांक २२/०३/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्या वरील महासभा सभागृहा येथे शासनाचे क्रमांक कोरोना-२०२०/ प्र. क्र. ७६/नवि-१४, दिनांक २१ डिसेंबर २०२० च्या पत्रान्वये विहित कार्यपध्दती पालन करुन प्रत्यक्ष सहभागाने/उपस्थितीने खालील विषयासाठी आयोजित केली आहे. सदर सभेत खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. विजय चाहू पाटील | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेंद्रसिंग भुल्लर | सदस्य |
| ४ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |
| ५ | श्री. राजेश वदारिया | सदस्य |
| ६ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | सदस्या |
| ७ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | सदस्या |
| ८ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| ९ | श्रीमती अर्चना करणकाळे | सदस्या |
| १० | श्री. राजकुमार किशनचंद जग्यासी | सदस्य |
| ११ | श्री. कुलवंतसिंह सोहता | सदस्य |
| १२ | श्री. चंद्रशेखर यादव | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य सभेस अनुपस्थित होते.

१. श्रीम. अपेक्षा भगवान भालेराव, २. श्रीम. जया प्रकाश माखिजा, ३. श्रीम. कंचन अमर लुंड.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. आयुक्त, डॉ. राजा दयानिधी
२. अतिरिक्त आयुक्त, श्रीम. करुणा जुईकर
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४. श्री. मदन सोंडे, उप आयुक्त (कर)
५. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय)
६. डॉ. दिपक पगारे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
७. श्री. मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक
८. श्री. सुर्यकात खटके, लेखाधिकरी
९. श्री. अशोक मोरे, सहा. लेखा परिक्षक
१०. श्री. महेश सितलानी, शहर अभियंता

११. डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१२. श्री. महेंद्र पंजाबी, सहा. आयुक्त
१३. श्री. अच्युत सासे, सहा. आयुक्त
१४. श्री. मनिष हिवरे, अधिक्षक
१५. श्री. नितेश रंगारी, अधिक्षक
१६. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता
१७. श्रीम. श्रध्दा सपकाळे, सिस्टम ॲनेलेसिस
१८. श्री . दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
१९. श्रीम. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थामक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीम. मनिषा महाजन, वरिष्ठ लिपीक
२. श्रीमती नर्गिस खान, लिपीक
३. श्री. बाळू भांगरे, लिपीक
४. श्रीमती विदया आढळ, लिपीक

दुपारी, १२.२० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

<u>सदस्य, श्री.जमुनादास पुरस्वानी:—</u> आता १२ वाजून ३१ मिनिटस झाले आहेत. कोरम पण आहे. तर मिटिंग सुरु करण्यासाठी मी निवेदन करतो. मी आज आपले चेअरमन आले नाहीत. तर आमचे पुर्व स्थायी समिती श्री. राजेश वधारीया यांचे नाव मी सुचक म्हणून करतो. आजची ही बैठक राजेश वधारीया सुरु ठेवतील.

<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:—</u> मी अनुमोदन करतो. प्लीज राजेशजी आइए.

या वेळी सभापती, श्री. विजय पाटील यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>महापालिका सचिव:—</u> ही १९ तारखेची स्थगित सभा सुरु होत आहे. मा. सभापतीने आदेश दिले आहेत.

**<u>महापालिका सचिव-</u>** विषय क्रमांक १ वाचून दाखवितात.

---

## ⇨ विषय क्र १:— सन 2020&2021 ps सुधारीत vankti=d r;kj dj.ksckcr-

---

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> मी आपल्या थोडा करेक्ट करत आहे. जो बजेट २०—२१ चा आहे. त्याचा पण रिव्हीजन आहे. रिव्हीजन बजेट येतो सोबत मॅडम. रिव्हीजन बजेट बनविले नाही याचा अर्थ असा आहे २०—२१ मध्ये जो बजेट बनविले होते. त्यामध्ये कोणतेच बदल झाले नाही. आपण जो टार्गेट ठेवले होते, तो अचिव झाला आपण जो खर्च दाखवला होता ते सर्व खर्च झाले आहेत आणि त्यामध्ये प्रशासनास कोणतेही रिव्हीजन नाही करायचे का?

<u>सदस्य, श्री.भारत राजवानी:—</u> सदस्यांना कॉपी दया. जर बनविली आहे तर सर्व सदस्यांना दया.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> साहेब हे बघा, एजेंडावर काही लिहीले नाही आणि नाही पहिल्या पानावर कुठेही लिहील नाही कुठे आहे ते तर सांगा ना. पान नंबर सांगा काही तरी सांगा तरी. माईक दया त्यांना

<u>लेखाधिकारी, सुर्यकातं खटके:—</u> पहिल्या पानावरच आहे, त्यामध्ये प्रिटींग मिस्टेक झाली आहे. २१—२२ चा बजेट पहिल्या पानावर आहे.

<u>सभापती, श्री. विजय पाटील:—</u> साहेब नंबर तरी सांगणार का? नंबर त्यावर टाकले आहेत ना.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> हे बघा पहिले येतो तो एजेंडा, एजेंडावर जर आपण विषय आणत असतो, २१—२२ चा बजेट, तर आम्ही सन २०२१—२०२२ लिहू कोणताच प्रॉब्लेम नाही. हा रिजन बजेट नाही होणार.

<u>सभापती, श्री. विजय पाटील:—</u> रिव्हाईज बजेट तर होणारच ना, असे कसे काय? कसे होणार नाही, तो तर करायचाच आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> आपण मला एक गोष्ट सांगा सचिव मॅडम, २०२०—२१ जो अजेंडा वर आयटम नाही आहे. त्यावर आम्ही चर्चा करुन पास करु शकतो का?

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u> बहूमताने घेउु शकतो. पण कोणी तरी समोर पाहिजे ना, काय आहे किती आहे?

<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया:—</u> आपण आपला अजेंडा रिव्हाइज करा. की २०२०—२१ चा बजेट चे रिव्हीजन आणि २१—२२ चा बजेट बनवायचा आहे.

<u>सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी :—</u> पहिल्या पहिल्या पानावरच आपण लिहिले आहे. अजेंडावर घ्यायचे महानगरपालिकेचा २०२०—२१ सुधारीत अंदाजपत्रक व २१—२२ चे मुळ अंदाजपत्रक.

<u>महापालिका सचिव:—</u> ठिक आहे. मी तशी अजेंडात दुरुस्ती करते. आता आम्हांला पत्र असे आले आहे की, २१—२२ चे एवढच पत्र आले. आणि मी ते दुस—या दिवशी वाटले. त्यामुळे मी जो विषय आला तो लिहिला आहे. आता ॲड करतो आणि रिव्हाइज बजेटसुध्दा मध्ये पुन्हा धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया: —</u> या साठी आम्ही पहिले सुधारीत बजेटवर बोलणार. तुम्ही जा. तुम्हांला जायचे आहे तर. मा. सभापतीजी अधिकारी पण कमी उपस्थित आहेत. बजेटची महत्वाची मिटिंग आहे. तर त्यात सर्व अधिकारी उपस्थित असायला पाहिजे.

<u>सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:—</u> मा. सभापती महोदय मा. आयुक्त साहेब येथे जो सन २०२०—२०२१ चे अंदाजपत्रक दिले आहे. त्यानुसार अंदाजपत्रक ३७४.८६ कोटी ८६ लाख दाखवले आहे. ३७४.८६ कोटी ८६ लाख रुपये आले आहेत. आणि उत्पन्न ५० कोटी रुपये दाखवले आहे की, अजून येणार आहेत. आता फक्त आणि फक्त १० दिवस बाकी आहे हे वर्ष संपायला. तर कृपया हे सांगा की हे ५१ करोड रुपये कुठून येणार. आणि दुसरा खर्च लिहिला आहे ३४३ करोड आणि दुसरा जो खर्च लिहिला आहे होण्याचे ८२ करोड होणार आहे. तर याची कृपया माहिती दया. हे जे आकडे आहेत ते कशाप्रकारे आपण दिले आहे त्याची माहिती कृपया सभागृहात दया.

<u>लेखाधिकारी, श्री. सुर्यकांत खटके:—</u> मा. व्यासपीठ, सर्व सन्माननीय गण, येथे जे उत्पन्न दाखवले आहे. तो टॅक्सपासून, पाणीपटटीपासून, जो आपला कर आहे येत्या १० दिवसांत येतील सर,

<u>सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:—</u> १० करोड आएगा. १० दिवसांत येतील का?

<u>लेखाधिकारी, श्री. सुर्यकांत खटके:—</u> अंदाज आहे की, येणार आहेत .

<u>सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:—</u> हे तर अंदाज आहे. आता एवढी अभय योजना सुरु झाली. सगळे काही झाले तर जेवढी वसूली करायची होती, तेवढी वसूली आम्ही करु नाही शकलो आणि आता आम्ही आणि ८ दिवसात आम्ही अपेक्षा करत आहोत की, ५० करोड रुपये अजून येणार आहेत. त्यात काही तरी आकडे असले पाहिजेत.

<u>लेखाधिकारी, श्री. सुर्यकांत खटके:—</u> हे जे कर भरण्याचे जे आपल्या इथे आहे उल्हासनगर मार्च अंतिम पर्यंत लोक भरतात सर, आणि आम्ही लोक अपेक्षा करतो की, लोक भरतील. आणि ५० करोड उत्पन्न आपल्याला येईल सर. हे जे आकडे आहेत. ते यापुर्वीचे ते १० दिवसापुर्वीचे आहेत. आणि यात खुप सारे कर आम्हांला मिळालेला आहे. तो हे ५० करोड येतील हे १० करोड प्रशासनाला .....

<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया:—</u> मा. सभापतीजी, जसे आम्ही हे बजेटचे पुस्तक उघडतो. तर त्यात पहिले जे उत्पन्न आणि प्रयोजन आहे, यामध्ये पहिला पहिला जो पाठ आला आहे तो आहे, शिक्षण विभागाचा

आहे. मला असे वाटते की, शिक्षण विभागाचा वेगळा बजेट का येत आहे? सन २०१३ पर्यंत स्कूल बोर्ड होते. तेव्हा आम्ही समजत होतो की, वेगळा त्याचा बजेट असतो. जो पहिला स्कुल बोर्ड पास करत होते नंतर महानगरपालिका पास करत होती. जसे परिवहनचा आहे, पहिले परिवहन पास करणार मग आम्ही करणार. नंतर वृक्ष प्राधिकरण समिती आहे त्याचे बजेट पास होणार मग आम्ही करणार. यामध्ये काही खर्च काही उत्पन्न असे दाखवले आहे की, शिक्षण मंडळ कार्यालय व महानगरपालिका शाळेतील दुरध्वनी खर्च, नवीन नळ जोडणी, पाणी टाकी ये वो सभापती व शिक्षण सदस्याचे प्रवास भत्ता, शिक्षण मंडळ सदस्याचे सभेचा भत्ता, सभापती व शिक्षण सदस्याचे मानधन ठिक आहे. हे काय आपण अजून पण सन २०१३ च्या मानसिकतेत जगत आहात. महाराष्ट्र शासनाने एक अधिनियम पारीत करुन नंतर त्याचे ॲक्ट बनविले सर्व महानगरपालिकेतून शिक्षण मंडळाला काढून टाकले. तर शिक्षण मंडळ शिक्षण विभाग बनला. आणि त्याचे सर्व काम जसे दुसरे विभाग करतात तसे शिक्षण विभाग पण काम करेल. त्याचा वेगळे बजेट होऊच शकत नाही.

<u>उप आयुक्त, (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:—</u> शिक्षण मंडळाचे मर्जींगचे, प्रोसेसचे काम चालू आहे. अजून ते महानगरपालिकेमध्ये मर्ज झाले नाही. जेव्हा शिक्षण मंडळ महानगरपालिकेमध्ये मर्ज होईल. तेव्हा त्यांचा वेगळा बजेट बनवला जाणार नाही.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया:—</u> आयुक्तांचा फक्त एक एक्झुकिटीव्ह आदेश कारण की, ऑर्डनसवर अधिनियमावर किंवा ॲक्ट वर तर ना आयुक्त आहे, ना ही महासभा आहे. सिर्फ आयुक्तांचा एक एक्झुकिटीव्ह आदेश या या अधिनियमान्वये आम्ही यांना समावेश केला.

<u>उप आयुक्त, (मुख्यालय), श्री.अशोक नाईकवाडे:—</u> तीच प्रोसेज चालू आहे. जेव्हा मर्ज होईल उल्हासनगर महानगरपालिकेत तर त्याचा वेगळा बजेट नाही बनवले जाणार. आता त्यामुळे याचा वेगळा बजेट बनवला आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया:—</u> तर मला सांगणार का याला किती वेळ लागणार आहे? कारण हे मागच्या महासभेत पण ही बाब झाली होती. त्यावेळी सांगितले की, तो प्रोसेज चालू आहे. आज पण सांग आहेत की, प्रोसेस चालू आहे. ती प्रोसेस अजून किती दिवस, किती महिने, किती वर्ष चालणार?

<u>उप आयुक्त, (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:—</u>ते आता काही दिवसामध्ये हाईल.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u> किती दिवसामध्ये?

<u>उप आयुक्त, (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:—</u> धोरणात्मक निर्णय आहे, काही दिवसामध्ये सर होऊन जाईल.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया:—</u> धोरणात्मक निर्णय झाला आहे ऑर्डनस आला आहे, ॲक्ट बनला आहे, आता आपण कोणतो धोरणात्मक निर्णय घेणार आहेत. कोण घेणार आहे धोरनात्मक निर्णय? काय आयुक्त साहेब घेणार धोरणात्मक निर्णय. की हि स्थायी समिती निर्णय घेणार की, महासभेच्या निर्णयाची गरज आहे. एकदा ऑर्डीनस आले अधिनियम बनला बाब संपली. त्याच्यावर तर जनरल बॉडी हे बघा एक बी.पी.एम. सी. ॲक्ट आहे.

<u>उप आयुक्त, (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:—</u> **सन्माननिय व्यासपिठा, अध्यक्ष महोदय,** सन्माननिय सदस्य, हा जो विषय आहे, तो याच्या फाईनल केसवर अवलंबून आहे. शेवटया टप्प्यात आहे १० या १५ दिवसांत आदेश निघेल.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया:—</u> ठिक आहे. आता सुधारीत बजेट २०—२१ ची सुधारीत बजेट आहे. सॉरी २०—२१ ची सुधारीत. आता यामध्ये जी वसूली झाली नाही. आपण टार्गेट कमी केले आहे. त्याच्यावर चर्चा करणे आवश्यक आहे की हे जे आपले टार्गेट आहे का पुर्ण झाले नाही. आमच्या महानगरपालिकेमध्ये जी.आय.एस. मॅपींग झाले आहे. त्याचे आज पर्यंत नविन बील का नाही निर्गमित केले? स्पेशल नोटीस का नाही निर्गमित झाल्या? आपला सर्वात मोठा जो वसूलीचा स्त्रोत आहे, तो आहे मालमत्ता कर, याच प्रॉपर्टी टॅक्समध्ये आपण करोडो रूपये खर्च करून जी.आय.एस. मॅपिंग केले. शासनाने आम्हांला धमकी दिली की, आपण जी.आय.एस. नाही केले तर आम्ही अनुदान बंद करु. आम्ही जी.आय.एस. मॅपींग केले

आहे. जी.आय.एस. झाल्यावर त्याचा इम्पलींमेशन कुठ पर्यंत झाला आहे नाही झाला आहे तर का नाही झाला नाही? आम्हांला माहिती दया.

<u>सदस्य, श्री. मदन सोंडे, उप आयुक्त, (कर विभाग):—</u> सभापती महोदय, मा. आयुक्त साहेब, सन्माननीय सदस्य स्पेशल नोटीसा गेलेल्या आहेत त्यांची सुनावणी बाकी आहे. ती आपण कोरोनामुळे थांबवल्या आहेत आणि आता का होत नाही तर आता आपले कर वसूलीचे काम चालू होते. अभय योजना लागू केली होती. तथापी आपले लोक प्रयत्न करत आहेत. रोज शनिवार, रविवार ऑफिस चालू आहेत. आता पर्यंत ६४.५० लाख वसूली झालेली आहे. आता ७ —८ दिवस हातात आहेत. तर आमच जास्तीत जास्त वसूली करण्याचे काम चालू आहे. त्यात आमच्या एका कर निरिक्षकाला कोरोना पण झालेला आहे. त्यामुळे थोडे कोरोनामुळे कमी आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया:—</u> आमच्या माहितीनुसार सभापतीजी, मागच्या मार्च महिन्यापर्यंत लॉकडाउन लागायच्या आधी काही स्पेशल नोटीस काढल्या होत्या. नंतर या कोरोनाच्या काळात ३ महिन्यापर्यंत सर्वत्र लॉकडाउन होते. नंतर हळू हळू पी— १, पी— २ च्या हिशोबाने चालू झाले आणि दिवाळी येता येता सर्व काम जवळ जवळ फक्त लोक ट्रेन सोडून बाकी उल्हासनगर चे सर्व काम आपल्या स्थितीत आले. तर स्पेशल नोटीस देण्यासाठी कोणी थांबविले होते आपल्याला? आपण किती नोटीसा दिल्या?

<u>सदस्य, श्री. मदन सोंडे, उप आयुक्त, (कर विभाग):—</u> सर, स्पेशल नोटीस दिलेल्या आहेत. फक्त त्यांच्या सुनावणी घेणे बाकी आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया:—</u> मी तेच विचारतो आहे, आपण किती नोटीस दिलेल्या आहेत? आणि आपल्याकडे किती उत्तरे आली आणि किती ऑब्जेक्शन आले?

<u>सदस्य, श्री. मदन सोंडे, उप आयुक्त, (कर विभाग):—</u> हरकतींवर सुनावणी घेणे बाकी आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया:—</u> हा तर आपण पुन्हा त्यांना नोटीस देणार. कारण कोरोना काळात बरेच सारे लोक हरकती नाही टाकू शकल्या.

<u>सदस्य, श्री. मदन सोंडे, उप आयुक्त, (कर विभाग):—</u> तो नोटीस देणार.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया:—</u> तर आम्ही वसूली कसे करणार? जी.आय.एस. चा फायदा एक वर्षाचा आपला गेला.

<u>सदस्य, श्री. मदन सोंडे, उप आयुक्त, (कर विभाग):—</u> जी.एस.आय. चा थोडे काम बाकी आहे सर.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया:—</u> जेवढे झाले आहे. जे प्रेझेंटेशन आम्ही स्थायी समितीमध्ये पाहिले होते. की, ८०० फुटाच्या जागेवर ४००० फुटाचे आम्हांला दुकान सापडले आहे. जर तुम्ही त्यांना स्पेशल नोटीस नाही देणार तर सुनावणी पुर्ण नाही करणार तर बील कसे काढणार? याची प्रक्रिया तर आपल्याला पण माहित आहे आणि आम्हांला पण माहित आहे.

<u>सदस्य, श्री. मदन सोंडे, उप आयुक्त, (कर विभाग):—</u> सुनावणी बाकी आहे, लवकरात लवकर करण्यात येईल.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया:—</u> दुसरी गोष्ट आहे साहेब जोपर्यंत आपण नवीन स्त्रोत नाही शोधणार तोपर्यंत याच टॅक्स वर आपल्याला हा बजेट बनवायचा काही अर्थ नाही. ही फक्त फॉरमॅलिटी आहे. ओएफसी केबलचा आम्ही एक पॉलिसी बनविली होती. माझ्या मताने केडीएमसी, ठाणे, भाईंदर सर्व पॉलिसींचा अभ्यास केल्यानंतर जे चांगले दर होते. ते आम्ही बनवले. माझ्या कार्य काळात दिड वर्षात चार आयुक्त झाले. हांगेजी, सुधाकर देशमुखजी, समीर उन्हाळेजी आणि आपण आता दयानिधीजी, ओएफसी केबलमध्ये आम्हांला करोडो यायला पाहिजे होते. फक्त दोन रोड घेतो एक कल्याण—बदलापूर रोड आणि एक कल्याण—मुरबाड रोड आहे. स्वत: अतिरिक्त आयुक्त मॅडमने त्यांना रेड हॅन्ड विना परवानगी काम करताना पकडले. स्थायी समिती हॉलमध्ये मिटिंगमध्ये आयुक्त साहेब उपस्थित होते. त्यांनी त्यांना सुचना दिल्या, उप अभियंता एफआयआर फाईल करेल. नाही केल्या. मी साहेबांना विचारले साहेब नाही झाले साहेब बोलले मी एक परिपत्रक काढतो. ठिक आहे, साहेबांनी परिपत्रक काढले. नंतर उप अभियंता यांचेकडे

गेलो. उप अभियंता बोलले मी पण परिपत्रक काढणार. त्यांनी पण परिपत्रक काढले. उप अभियंता यांना अधिकृत केले की आजपर्यंत एकही कारवाई करा. आजपर्यंत एकही एफआयआर दाखल झाला नाही आणि एक ही कारवाई झाली नाही. सुधाकर देशमुख यांच्या वेळी फक्त २०० मी. त्यांनी अनधिकृत काम केले होते त्यांच्यावर त्यांनी एफआयआर केले. दुप्पट ते लोक पैसे भरुन गेले. आणि आता हात जोडून उभे राहतात की साहेब आमचा एफआयआर काढा. किलो मीटर पासून किलो मीटर पर्यंत त्यांची लाईन आहे. किती वेळा सर्वाना मी शहर अभियंता, आयुक्त साहेब यांना त्याचे फोटो पाठवले. ओ.एफ.सी. केबवाले मजा करीत आहेत. दिनेश इंजिनियरींगवालेने आमच्याकडून डंपिंगचे काम घेतले. त्यांनी स्वतः वायर टाकून दिल्या आणि ते दुस—याला भाडयाने देत आहेत. सर्व गोष्टी आपल्या जवळ आम्ही आणले आहे. साहेब हे होत आहे. आणि आमची रिव्हीन्यु जात आहे. परिपत्रक काढले उप अभियंता तरीपण झोपले आहेत. कोणतीच कारवाई होत नाही. तर आआपल्या बजेटचे टार्गेट कधी पण चांगले होणार नाहीत. बजेटवर जाहीरातीचा टेंडर आहे, आयुक्तांची सही झाल्या नंतरही आयुक्तांनी मंजुर करून दिले की, महासभेमध्ये पाठवा, सहा महीने श्री. देहेरकर यांच्या चेंबरमध्ये पडून होते. त्याच्या नंतर महासभेमध्ये आले, त्या महासभेमध्ये निर्णय नाही झाला, सांगितले की, महापौरांकडे निर्णय होईल. आम्हांला आज पर्यंत अवगत केले नाही की, काय निर्णय झाला? उप महापौर श्री. भगवान भालेरावजी यांनी सांगितले की राजेशजी तुम्हांला मिटींगमध्ये बोलवण्यात येईल. मला बोलावले नाही ठिक आहे. मी महससभेमध्ये, स्थायी समितीच्या मिटींगमध्ये तर बोलू शकतो. जाहीरातीचा आपण टेंडर चार वर्षापासून काढत नाही महसुल बुडत आहे, त्याला जबाबदार कोण आहे? अॅकाऊटीबिलिटी तर ठेवावीच लागेल ना. जबाबदारी स्विकारावी तर लागेल Regularisation of illegal buildings ठप्प पडले आहेत. १०,००० केसेस प्रलंबित आहेत. रोज लोक फाईल घेवून येतात. साहेब आमची बिल्डींग Regularize करा दया. ३८ बिल्डींग पडल्या आहेत. २८ लोकांचा त्यामध्ये मृत्यु झाला आहे. महापालिकेने काही बिल्डींग रिकाम्या केल्या आहेत, सिल केल्या आहेत. आपण Regularize नाही करणार तर बिल्डींग परत कशी बनणार? Regularize मध्ये या महानगरपालिकेला माझा अंदाज आहे की, ३०० करोड रुपये येईल. का नाही होत आहत? याचे उत्तर कोण देणार आम्हांला? आम्ही सिमेंट कॉंक्रिटच्यावर सिमेंट कांक्रिटचे रोड बनवत जात आहोत. कल्याण बदलापुर रोड सिमेंट कॉंक्रिट जलदगतीने चालू आहे. काही जागांवर पुर्ण झाले आहे. तिथे ट्रक उभे राहण्यास सुरू झाले आहेत. पार्किंग चालू झाले आहे. काय आम्ही सिमेंट कॉंक्रिट रोड ट्रक्स पार्किंगसाठी बनवले आहेत. जिथे पण रोड मोठा बनवला जातो. तिथे ट्रक्स, गुड व्हेकलस उभे राहतात. पार्किंग लागू करा त्यांना. आम्ही रोड पैश्यांनी बनविले आहे. महानगरपालिकेचे पैसे आहेत. त्या लोकांनी टॅक्सचा पैसा दिलेला आहे. त्यांच्याकडून पार्किंग चार्ज घ्या. फुकट कशाला? आम्ही सिंगापूरला फिरायला गेलो होतो. तिथे गाईडने आम्हांला पहिल्या दिवशीच सांगितले की, एक शब्द बोलला जो मी नेहमी लक्षात ठेवतो की सिंगापूरमध्ये काहीही फुकट मिळणार नाही. पाणी सुध्दा बाटलीमध्ये आपल्याला विकत मिळेल. तर येथे जे आपल्याला पाहिजे आहे ते पैशांनी मिळणार. इथे सर्व वस्तू लोकांना फुकट पाहिजे. प्रत्येक सुविधा लोकांना फुकट पाहीजेत. पार्किंगसाठी असेल किंवा अन्य सुविध असतील सगळयाच फुकट पार्किंगसाठी आम्ही चार निविदा केल्या. आज उल्हासनगर स्टेशन, शहाड स्टेशन, विठठलवाडी स्टेशनमध्ये पार्किंगचेदुसरे लोक पैसे घेतात. शहाड या ठिकाणी ठिक आहे, ती रेल्वेची जागा आहे. विठठलवाडी आणि उल्हासनगर रेल्वे स्टेशन पुर्व—पश्चिम कोणी थांबविले आहे. किती वेळा आम्ही बोललो आहोत. स्थायी समितीमध्ये, जनरल बॉडीमध्ये की सर त्याची निविदा काढा. जोपर्यंत नवीन स्त्रोत आपण शोधणार नाही, तोपर्यंत काहीच होणार नाही. नंतर आरक्षण प्लॉटची आम्हांला त्यांना सनद मिळाली. बोर्ड क्लब, इंदिरा गांधी गार्डन, गोल मैदान, महानगरपालिका भवन, महानगरपालिकेचे एक्सटेंशन त्याच्यावर पण काहीच नाही. सनद घेवून अडीच वर्ष झाले. बोर्ड क्लबच्या बाहेर एकदम प्राइम लोकेशनवर आमचा प्लॉट आहे. तिथे पैसे दया आणि वापरा शौचालय बनविले. काय योजना आहे. प्राइम लोकेशनचा प्लॉट आहे. आणि आपल्याला बनवायचाच आहे तर ५० फुट लांब ५० फुट रुंद अशा प्रकारे बनवा. १० फुट आपला पुढचा गेला असता. हे आपण ५० फुटाचा मार्जिन गेले. उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगरमध्ये सर्वात मोठी Landlord आहे आणि त्या Land पासून आमचे जे उत्पन्न आहे ते झिरो आहे. बिल्डरांनी आम्हांला बिर्टेबल आरक्षण सहीत जी जागा दिली आहे. ती किती वर्षापासुन धक्के खात आहे. किती वेळा स्थायी समितीमध्ये, जनरल बॉडीमध्ये बोललो याची विल्हेवाट लावा. याची निविदा काढा. कुणाला भाडयाने दया. कुणाला विकून टाका, रिजन्सीमध्ये आताच मार्केट तयार झाले आहे, मी मध्यंतरी साहेबांना सांगितले होते, भाडयाने दया, आज मार्केटमध्ये भाडे चांगल्या प्रकारे मिळत आहे. मार्केट Multinational कंपन्य आहत, बॅंक आहेत. खुप चांगला महसूल मिळतो. सुरक्षित उत्पन्न आहे. या गोष्टींचा आपण उपयोग करणार नाही तर येणा—या

जनरेसनाला आपण काय देवून जाणार? आपल्या जवळ एवढया इस्टेट आहेत, रिजेन्सीच्या पैशावर प्रोजेक्ट बनत आहे. कंपनी हजारो, करोडो रूपये कमवेल आपल्याकडे त्याच्यापेक्षा जास्त जमिन पडलेली आहे. आपण त्याचा काहीच करीत नाही. ज्या सिंधी शाळा बंद झाल्या आहेत, गुजराती शाळा बंद झाल्या आहेत, ज्या मराठी शाळा बंद झाल्या आहेत, त्या बनवून घ्या, खाली कमर्शिअलबनवा आणि वरती शाळा बनवा. हे कमर्शिअल शहर आहे, एक इंचचा काम आपल्याला उपयोग होऊ शकतो. कोणी मनाई केली आहे. आज नेहरू चौक, मार्केट एरियामध्ये पार्किगचा त्रास होत आहे, गोलमैदान येथे पी.पी. मॉडेलवर पार्किंग बनवले पाहीजे. पार्किगसाठी एफ.एस.आय. लागत नाही साहेब, मल्टिलेवल पार्किंग बनवा. आज कुठे पण जा आठ माळे, दहा माळे पार्किंग आहे. पार्किंगपासून आपल्याला उत्पन्न मिळेल. युडीची जमिन आहे, सि.आर.टू. मंत्रालया जवळू विधान भवनाच्या बाजुला तिथे पार्किंग बनवा, शहरामध्ये सर्वांत जास्त पार्किंगचा त्रास आहे. ठाण्यामध्ये एक रूपया दर चालला आहे, इथे लोक तीन रूपये देण्यासाठी तयार आहेत की आम्हांला पार्किंगसाठी जागा दया, आमची गाडी सेफ जागेवर सुरक्षित राहील. आपल्या जवळ जागा आहे, आपण बनवत नाही. प्लॅन सॅगसन होत नाहीत. पहीले सांगितले जात होते की, नविन रूल येणार आहे, त्याच्या नंतर होईल. ठिक आहे, २ डिसेंबरला तो पणअआला आहे, त्याच्या नंतरही उत्पन्न का होत नाही? लोक आपल्याकडे का येत नाहीत? बिल्डर का येत नाहीत? त्यांनी जर जमिनी घेतल्या आहेत तर कारण काय आहे? बोलायला पाहीजे ना कारण काय आहे? बिल्डरांना बोलवा की, तुम्हांला काय त्रास आहे? हिरे साहेब होते, त्यांनी जनता दरबार जसा सिस्टम चालू केली होती. स्वत: बसत होते, टी.पी. बसत होते, संबंधित विभागाचे उप आयुक्त बसत होते, एक एक बिल्डर, आर्किटेकला बोलवत होते, तुमचा कोणता प्लॅन पेडींग आहे, कुठे पेंडींग आहे? काय प्रॉब्लेम आहे? ऑफिसर बोलत होते की, साहेब हा प्रॉब्लेम आहे. तुम्ही आताच्या आता मला करेक्शन करून दया, मी आताच तुम्हांला प्लॅन पास करून देतो, याच महानगरपालिकेमध्ये झाले आहे. मी दुस—या महापालिकेचे सांगत नाही. याच महानगरपालिकेची गोष्ट आहे. आपण एक चांगले अधिकारी आहेत, आम्ही तुमच्याकडून आशा करतो की, हा जो सुजाव आम्ही देत आहे, तो तुम्ही बघा. कोणतीही संस्था चालवण्यासाठी नविन इनकम सोर्स पाहीजे आणि समोर आपण एक्सपेडीचर कमी करायचे आहे. या बजेटमध्ये साहेब आपण जो खर्च दिला आहे, मला कुठेच दिसले नाही की, खर्च कमी करण्याचे प्लॅनिंग आपण विचार केला आहे.

<u>सभपती, श्री. विजय पाटील:—</u> वदारिया साहेब आपण चांगल्या पध्दतीने इनकम सोर्स सांगितला आहे, मला वाटते की, याच्यावर आयुक्त साहेबांनी मिटींग घेऊन, सगळयांना बोलावून आणि दोन चार मिटींग जर आपण घेतल्या तर साहेब याचा रिझल्ट एकदम फास्ट येईल. आपण मेन मेन आहेत त्यांना बोलावून करण्यात यावे.

<u>सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:—</u> मा. आयुक्त साहेब, राजेश वदारिया सदस्यांनी जेवढे पण उपाय सुझाव दिलेले आहेत, हे सर्व बजेटमध्ये आपण प्रावधान केले होते, तीन वर्षापासून, चार वर्षापासून आपण करीत आले आहेत. परंतु एक रूपयाचे पण उत्पन्न आपल्याला तेथून आले नाही. जसे जाहिरातीच्या बाबतीत त्यांनी सांगितले आहे, त्याच्यासाठी पण महापौर कार्यालयामध्ये एक बैठक ठेवण्यात आली होती, टेंडर येत नाही किंवा त्याचे दर जास्त वाटत आहेत, काय त्रास आहे, एक वेगळा विभाग बनवून उप आयुक्त नियुक्त करून जसे की, पार्किंगचा विषय सांगितला आहे की आज असे होत आहे की, उल्हासनगरमध्ये येणा—या दिवसामध्ये चालण्यासाठी जागा मिळणार नाही. जर आपण रात्रीच्या वेळी बघितले तर संपुर्ण गोलमैदान बघा, ५ नबरचा एरिया बघा, तीन नंबरचा एरिया बघा, गाडया, कार ट्रक सर्वच उभ्या आहेत. तर आम्ही मागच्या वेळेस पण मा. आयुक्तांना सुझाव दिला होता की, रात्रीच्या पार्किंगसाठी पैसे घेतले पाहीजे. जर प्रायव्हेट कर आहे, रात्रीच्या वेळी पार्किस सोडून महानगरपालिकेच्या जागेवर पार्किंग करीत असेल, रात्री ११. ०० वाजेपासून तर सकाळी ८.०० वाजेपर्यंत, ज्या गाडया लावत आसतात, त्यांनी पार्किंग भरले पाहिजे. कमीत कमी १० करोड रूपये उत्पन्न आपण पार्किंगकडून करू शकतो. आम्हांला एक वेळा जळगांव महानगरपालिकेमध्ये अभ्यास करण्यासाठी घेऊन गेले होते, जळगांव महानगरपलिकेचा टोटल बजेट ३० प्रतिशत मार्केटच्या उत्पन्नातून होत असतो, मार्केटचे भाडे एवढचे मिळते की, महापालिकेचा बजेट ३० प्रतिशत मिळत असतो आणि आपण येथे फक्त टॅक्स आणि पाण्याच्या बिलावर अवलंबून आहेत, पाण्याचे बिल पण आपण जेवढे भरतो त्याच्यापेक्षा कमी वसुल करीत असतो. आपल्याला आपल्या घरातून पैसे भरायला लागतात. आपण सगळे गहाण आणि टॅक्सवर अवलंबून आहेत. प्रॉपर्टी जी आपल्या जवळ आहे, जी बिल्डरांनी आपल्याला दिली आहे. ती किती तरी वर्षापासून पडून आहे. कमीत कमी मागच्या पाच बजेटांनी आपण लिहीले आहे की, २० करोड रूपये प्रॉपर्टी सेल करून

कलेक्शन करणार आहेत किंवा प्रॉपर्टी लिजवर देणार, जसे राजेशजीने सांगिले आहे की, मोठमोठया कंपन्या भाडयावर घेण्यासाठी तयार आहेत. परंतु आपली प्रॉपर्टी अशीच सडत आहे, बंद प्रॉपर्टी जर आपण आपले घर पण बंद करून ठेवणार असतील ५ वर्षे, १० वर्षे तशीच ठेवाल तर ५ ते ६ लाख रूपये रिपेर करण्यासाठी खर्च होतील. आपल्याला पैसे तर मिळत नाही, त्या उलट आपला पैसा वेस्ट करीत आहेत, वाया घालवत आहेत. रेग्युलाजेशनचा काम पण पुर्णपणे बंद पडले आहे. जर असे छोटे छोटे काम जर आपण करून १०० करोडोपेक्षा अधिक उत्पन्न प्रत्येक वर्षी करू शकतो. तर या गोष्टींवर विशेष लक्ष दयायला पाहीजे आणि एकच गोष्ट आपण बोलत असतोकी, आपला प्रॉपर्टी टॅक्स ५०० करोड रूपये बाकी आहे, आम्ही परत परत लिहून देणार की, २०० ते ३०० करोड रूपये वसुली होईल. तर हा एक बोगस बजेट जसे की काही वर्षापासून तसाच चालत आला आहे, तसाच होईल. तर नविन उत्पन्न कशा प्रकारे करण्यात यावे, नविन उत्पन्न कुठून आणण्यात यावेत. यावर विषेश लक्ष देण्यात यावे आपले जेवढे पण माजी मार्केट आहेत, दुसरे मार्केट आहेत, जी पण प्रॉपर्टी असेल जसे की, बोट क्लबचे दिले आहे. जेव्हा मी सन १९९९ मध्ये नगररचनाकार सभापती होतो, तेव्हा आपले स्विमिंगपुल आणि टाऊन हॉल बंद पडले होते, १५ वर्षापासून बंद पडले होते. त्याच वेळी आम्ही दोन्हींचा टेंडर काढला आणि आज आपल्याकडे दोन चांगल्या वास्तु शहरात बंनल्या आहेत. त्याचा लोक उपयोग करीत आहेत आणि महापालिकेला पण पैसे मिळत आहेत. तसेच काही गोष्टी ज्या शाळा आहेत, शाळांची जर सनद आपल्याकडे येत असेल, टायटल जर क्लियर होत असेल तर त्या पण आपण वेगवेगळया संस्थांना देवून डेव्हलेप करून त्यांच्यापासून आपण उत्पन्न मिळवू शकतो. तर अशा प्रकारे जो पर्यंत नविन उत्पन्नाचा कोणताचा मार्ग मिळत नसेल तो पर्यंत आपण दुस—यावर, अवलंबून आहे कोणी सांगितले आहे की, “परायाधिन सुख स्वप्ने नाही” पराधिन व्यक्तीला स्वप्नात पण सुख उत्पन्न होत नाही आणि आज आपण संपुर्णपणे पराधिन आहेत. आपण ग्रॅंडवर निर्भर आहेत, तर एक महीना उशिर झाला तर आपण त्रस्त होऊन जातो आणि आपण पगार पण देवू शकत नाही आणि पगार पण या वेळेस खुप उशिरा झाले आहे. आता सातवा वेतन आयोग सुरू होईल. त्याच्या नंतर अनेक प्रकारचे खर्च वाढत चालेले आहेत. त्यांच्यावर कन्ट्रोल पण लागत नाही, उलट खर्च चालला आहे. तर मी राजेश वदारिया यांना खुप खुप धन्यवाद देतो की, त्यांनी खुप चांगल्या प्रकारे इथे आज प्रस्तुत केले आहे. यावर विशेष लक्ष देण्यात यावे, जसे की, त्यांनी एका प्लॅनवर बोलेलेले आहेत की, मा. आयुक्त हिरे साहेब जेव्हा होते, तेव्हा असेच होत होते की, प्लॅन होत नव्हते तेव्हा आम्ही यावर त्यांना एक सल्ला दिला की सर्वच लोक भटकत आहेत, प्लॅन पास होत नाहीत, उत्पन्न पण मिळत नाही. त्यांनी १५, १५ दिवसांमध्ये एक कॅम्प लावला की १५ दिवसामध्ये दोन दिवस आम्ही काहीच काम करणार नाही. जेवढया पण लोकांचे प्लॅन पेडींग पडले आहेत. त्यासाठी आयुक्त बसतील, उप आयुक्त बसतील, नगररचनाकार बसतील, सर्व लोक बसतील आणि संपुर्ण हॉलमध्ये अर्किटेक बसतील आपआपले फाईल घेऊन आणि २४ तासाच्या आतमध्ये फाईल क्लियर होईल. तर असे उत्पन्न जनरेट झाले. तर आज पण नविन डी.सी. रूल आले आहे. खुप लोकांचे काम पेडींग आहेत, असे ५०, १०० करोड रूपये आपल्याला खुपच लवकर जमा होऊ शकतात. तर मी एक वेळा परत आपल्याला निवेदन करतो की, याच्यावर लक्ष देण्यात यावे.

<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:—</u> सन्माननिय आयुक्त साहेब, मा. अध्यक्षजी, खुप चांगल्या गोष्टी माझे भाऊ श्री. राजेश वदारिया आणि श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितल्या आहेत, परंतु काही महत्वाचे पॉईंट जेव्हा आपण बजेट पेश करीत असतो, उदा. आपण आपले घरचे बजेट पण बनवत असतो, जर एक छोटासा छोटा माणूस सुध्दा बजेट बनवत असतो. तर तो हिशोब करीत असतो की, माझे उत्पन्न किती होतईल आणि उत्पन्नाचे सोर्स कुठून मिळतील? तर तो आपला खर्च फिक्स करीत असतो. असे खुप विषय आहेत की, तेथून आपण उत्पन्न वाढवू शकतो. परंतु जो प्रमुख मुद्दा आपल्या महापालिकेला लागू होत असतो, तो आहे टॅक्सचा मुद्दा. जसे की आता एक मुद्दा येथे आला आहे, जी.आय.एस. मॅपिंगचे काम केले आहे, ते अर्धे राहीले आहे. आयुक्त साहेब, मी आपल्या लक्षात आणून देतो की, प्रत्येक वेळी आपण बजेटवर सर्वांचे लक्ष आकर्षित करीत असतो की, आपल्या शहरामध्ये अशी खुप प्रॉपर्टी आहेत. आज पर्यंत त्यांची ॲसेसमेंट झाली नाही आणि वाईट पण वाटते सर कारण की, परत परत आम्ही हे बोलत आले आहेत. परंतु त्या गोष्टींवर कोणाचेही लक्ष जात नाही आणि लक्षात असून तरी सुध्दा कोणी करायला तयार नाहीत. कारण काही पण अशू शकते. याचे उदाहरण मी मागच्या वेळेस पण जेव्हा बजेट होते, मी त्यावेळी पण आयुक्त, श्री. खतगांवकर साहेबांना एक उदाहरण दिले होते. जर आपल्याला वाटत असेल की, आपल्या शहरातील सर्वच्या सर्व प्रॉपर्टीचे ॲसेसमेंट व्हायला पाहीजे. तर माझी एक विनंती आहे की, आपण काहीच न करता विद्युत वितरण विभागाला आपण पत्र लिहा की, आपल्या शहरामध्ये

किती प्रॉपर्टींना मिटर बसवले आहेत, रेसीडेन्सीयल असतील, कमर्शिअल असतील उदारणार्थ त्यांच्याकडून जर पत्र आले की, १ लाख रूपये मिटर बसवले आहेत. त्याच्या नंतर आपला महपालिकेचा कर विभाग आहे, ते तिथे बघतील की आपण किती लोकांकडून प्रॉपर्टी टॅक्स घेत आहेत. तर आपल्याला ६० हजार, ७० हजार मिळतील. म्हणजे ज्या लोकांना मिटर मिळाले आहेत, ते लोक राहत आहेत. लाईटचचे बिल भरत आहेत, म्हणजे फरक त्वरीत आपल्या समोर येईल. त्यामुळे आपल्याला स्टाफला वारंवार बोलण्याची आवश्यकता होणार नाही. फरक समोर येईल की,जर एवढे लोक लाईट वापरत आहेत आणि लाईटचे मिटर तिथे लावले आहेत. तर टॅक्स का येत नाही? आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आपण असे काही रूल तयार करा, परिपत्रक काढा, नोटीस काढा की, येणा—या दोन किंवा तीन महीन्यामध्ये जर एखादया कर निरीक्षकाच्या एरियामध्ये ॲसेसमेंट न करता प्रॉपर्टी मिळाली तर त्याच्यावर ॲक्शन घेतली जाईल. आपण करू शकतो, ती काय मोठी गोष्ट नाही. आपण त्यांना पगार देत आहेत, त्यांचे काम आहे. आज सर भरपूर लोक बोलत आहेत, ॲसेसमेंट न झालेल्या प्रॉपर्टी पडल्या आहेत. ठिक आहे हे गेले भेटून आले, बोलणे झाले झाले संपले आणि इथे पण अधिकारी कमी आणि काम जास्त आहे. या गोष्टींवर आपले लक्ष जात नाही. जर एका व्यक्तीची नोटीस निघत असेल येणारे दोन महीने आम्ही तुम्हांला देत आहेत, आता पर्यत जे झाले ते झाले. परंतु दोन महीन्या नंतर कोणी पण एक अधिकारी नियुक्त करून आपल्या एरियामध्ये जर कोणतीही ॲसेसमेंट न झालेली प्रॉपर्टी मिळाली तर त्याची जबाबदारी त्यांची राहील, याची जबाबदारी उप आयुक्तांची राहील. हे बघा काम कसे होईल. तर हे लोक अलर्ट होऊन जातील. सर हा महत्वांचा पॉईंट आहे, आपण कार्य पुढे चालवू शकतो आणि टॅक्स वाढवू शकतो. दुसरे भरपूर असे रेग्युलायजेशनचा मुद्दा आहे. परंतु सर जेव्हा रेग्युलायजेशन झाले नव्हते, तेव्हा आम्हांला खुप आशा होत्या की, एक वेळा उल्हासनगरमध्ये ऑर्डीनेशन पास होईल आणि रेग्युलायजेशन होईल. तर करोडो, अरबो रूपये फंड आपल्या महानगरपालिकेला मिळतील आणि आता पण येऊ शकतात. परंतु सन्माननिय आयुक्त साहेब, फक्त आपल्याला हे काम फास्ट करायला पाहीजे. कुठे कुठे अडचणी रेग्युलायजेशन करणे आणि प्लॅन अप्रुव करणे. जसे आम्ही सांगितले की, प्लॅन अप्रुव करण्यासाठी वेगवेगळे कॅम्प लावले होते. असे आपण कॅम्प लावा आणि बिल्डरांना बोलवा ते समोर येतील आणि आज ते आपले प्रिमियम भरण्यासाठी तयार आहेत. त्यामुळे आपल्या महापालिकेचे उत्पन्न वाढेल आणि बाकी सारे, इंदिरागांधी मार्केटचे आपल्याला उदाहरण देवू इच्छितो सर, इंदिरागांधी भाजी मार्केट आजच्या स्थितीला रिकामे पडले आहे, जर आपल्याला वाटते की, तो मार्केट सुधारणा करून भाडयाने देवून उत्पन्न मिळवू शकतो. परंतु आश्चर्याची गोष्ट आहे सर आपण आजच्या तारखेला रिकाम्या मार्केटचे लाखो रूपये लाईटचे बिल भरत आहेत. मला खुप आश्चर्य वाटते सर तिथे सर्वत्र भंगार पडलेला आहे. आपण त्याचा वापर करीत नाहीत, परंतु प्रत्येक महीन्यामध्ये त्याच्यावर खर्च करीत आहेत. लाईटचे बिल आपण भरत आहेत. तर या गोष्टींवर कोण लक्ष देणार आहे? म्हणजे सर मी याचे एक उदाहरण दिले आहे. अशा भरपूर वस्तु आहेत, त्यासाठी एखादे अधिकारी नियुक्त करून अशा ज्या ज्या आपल्या प्रॉपर्टीज आहेत, त्या आपण सुधारणा करून भाडयाने देवू शकतो, भाडयाने देवून आपण उत्पन्न मिळवू शकतो. तर सर माझे असे पॉईंट होते, बाकीचे सर्व पॉईंट आम्ही समोर ठेवले आहेत आणि आम्ही आशा करतो की, आपण रिझल्ट देतील. या कार्यामध्ये आम्हांला रिझल्ट मिळेल आणि महापालिकेचे उत्पन्न अधिक अधिक वाढेल असे आपण प्रयत्न करू, धन्यवाद.

**सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:—** नविन बजेटवर बोलणार आहेत का राजेशजी, सर्वात पहीले पहीले....

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—** नविन बजेटवर बोलणार आहेत, परतु परवा आपण जो बजेट बनवला आहे, त्याची कॉफी अजून आपल्याकडे आली नाही.

**सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:—** हीच कॉपी आहे, आता अपण बनवणार आहेत ना.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—** जी चर्चा केली आहे, त्याची कॉपी आम्हांला दयायला पाहीजे.

**सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:—** मा. आयुक्त साहेबांनी जो बजेट दिला आहे, त्यामध्ये पहीले पहीले पानावर जी पाणी पट्टीची वाढ दाखवली आहे. आर.सी.सी. साठी ७२००, पत्रयाच्या घराचे ६०० रूपये आणि झोपडपट्टीचे ४८०० रूपये असे केले आहे. कारण की कर आणि दर समय सिमा २० फेब्रुवारीला समाप्त होत आहे. याच्या नंतर इथे दिले आहे की, कोणत्याही प्रकारचे पाणी पट्टीचे कर वाढ आम्ही सर्व संमतीने अमान्य करीत आहेत. त्याच्या नंतर इथे जो अन्य करांची पण वाढ दाखवली आहे, कारण की,

आम्ही कोणत्याही प्रकारचे कर आणि दर वाढ करू शकत नाही. त्यामुळे कोणत्या प्रकारचे कर आणि दर जो प्रस्तावीत केले आहे वाढ सर्व संमतीने मी या ठिकाणी निवेदन करतो की, आम्ही अमान्य करीत आहेत. वारस हक्कांचे हस्तांतर प्रकरणात नाव हस्तांतर शुल्कात वाढ त्याला पण आम्ही वाढ न करता अमान्य करीत आहे. मा. आयुक्तांद्वारे वाढवण्यात आलेले कोणत्या प्रकारचे पाणी पट्टी आणि अन्य कर यांनी वाढवलेले आहेत, त्यांना स्थायी समितीमध्ये मी प्रस्ताव ठेवत आहे की, सर्व संमतीने हे अमान्य करीत आहेत किवा बी.पी. एम.सी. ॲक्टच्या अंतर्गत समय सिमा पण समाप्त झालेली आहे आणि हे वर्षे एकदम खराब स्थितीमध्ये गेला आहे. सन २०२०—२०२१ एप्रिल पासून आज पर्यंत लॉकडाऊनमुळे सगळे बिजनेस ठप्प पडले आहेत. त्यामुळे कोणतेही कर आणि दर अमान्य करीत आहेत आणि त्याच बरोबर निवेदन पण करतो की, मा. आयुक्तांनी एप्रिल, मे, जुन तीन महीन्याचे जे कमर्शियल पाण्याचे बिल या वेळी कोणत्याही दुकानदाराने आपल्या दुकानाचे शटर पण खोलेले नव्हते. परंतु त्यांना मिनीमम बिल येत आहे. कारण की, त्यांना मिटर लावले नाहीत, त्यांना पाण्याचे बिल येते. जे पाणी त्यांनी भरलेच नाही, वापरच केला नाही, तर पाण्याचे बिल का पाठवत आहेत? काहीनी पाणी भरले असतील ज्यांचे कनेक्शन असतील त्यांनी, परंतु दुकाने उघडलेली नाहीत, शटर उघडलेले नाहीत. कारण की लॉकडाऊन लागला होता. त्यांना कोणतेच बिल पाठवायला नाही पाहीजे. त्याच बरोबर एप्रिल, मे, जुनचे पाण्याचे कमर्शियल बिल ज्यांच्याकडे मिटर नाहीत, ज्यांना मिटर आहेत, त्यांना बिल पाठवले असतील आम्ही इथे बोलणार नाहीत. परंतु जो पाण्याचे बिल मिटर नसतांना येत असते, कमर्शियल तीन महीन्याचे कमी करण्यासाठी स्थायी समिमती शिफारस करीत आहे.

<u>सभापती, श्री. विजय पाटील:—</u> यामध्ये पाण्याचे बिल आणि टॅक्सचे बिल याच्यात जेवढा फरक येत आहे, तो जेवढा आहे, तेवढाच ठेवायचाआणि त्याच्यामध्ये पण ५० करोड, जेवढे  कमी पडतील ते दुसरीकडून आपले उत्पन्न वाढवावे आणि ते जेवढे आहे, तेवढेच करावे. याच्यात कुठेही एक रूपया पण वाढला नाही पाहीजे. जे आपल्याला बजेटमध्ये कमी पडतात ते दुसरीकडून वसूली करावी, म्हणजे दुसरीकडून उत्पन्न वाढवावे. तसे आता बरेच उत्पन्न वाढवण्याचे साहेबांनी पण लिहून ठेवलेले आहे. तर तिकडूनच वाढवावे आणि पाण्याच्या बिलामध्ये कुठेही एक रूपया वाढवू नका.

<u>महापालिका सचिव:—</u> सर्व संमतीने पास का?

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> प्रपोजल हे आहे की, जेव्हा लॉकडऊन झाले होते, मार्चच्या १८  किंवा २० तारखेपासून उल्हासनगरमध्ये लॉकडऊन झाले होते. तर तीन महीन्या पर्यंत सर्व कमर्शिअल स्टॅबलिसमेंट, सर्व दुकाने बंद होते. फॅक्टरीया, इन्डद्वीयल स्टॅबलिसमेंट आपल्याकडे सर्व दुकाने बंद असल्यामुळे  आणि इन्डद्वीयल स्टॅबलिसमेंट बंद झाल्यामुळे त्यांना पाण्याचे बिल पण दयावे लागत आहे आणि त्यामध्ये आम्ही सांगितले की हाऊस टॅक्समध्ये काहीच सुट देणार नाही. तर कमीत कमी पाण्याचे ज्यांनी वापर केले नाही आणि काही लोकांना एवरेज पण दिले जाते. ७५ हजार लिटर प्रत्येक महीन्यामध्ये, ७५ हजार आले कुठेन? दोन महीन्यापुर्वी २५ हजार देत होते, हे काही विशेष अधिकार महानगरपालिकेकडे नाहीत. अधिका—यांकडे तर बिलकुल नाही. पहीले बिल जात होते २५ हजार एवरेज नंतर परत दोन महीन्यानंतर केले ७५ हजार एवरेज कुठून आणले? काय डाटा आहे, आपल्याकडे? तुमच्या मनमर्जीनुसार असे झाले नाही पाहिजे. तर आपण इथे हा ठराव पास करीत आहेत की तीन महिन्याचे कमर्शिअल इन्डस्ट्रीयल स्टॅबलिसमेंटला बिल गेले नाही पाहिजे आणि जर बिल गेले असेल तर त्यांचे बिल माफ करायचे आहे.

<u>लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके:—</u> वदारिया सर याच्यामध्ये कायदयाचे नियम तपासून पुढील कारवाई करण्यात येईल. एक्झ्युटीव्ह पॉवर आपल्या अधिकारमध्ये आहेत ना साहेब.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> आम्ही तर बजेटमध्ये ठराव करत आहेत, कारवाई करण्याचे काम तुमचे आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u> आम्ही पार्किंग विषयी बोललो होतो, सभापती साहेब, पार्किंगचा आम्ही महासभेमध्ये ठराव केला होता की पार्किंगच्या विषयी जबाबदारी श्री. भदाणे यांना दिली जावी. ते आपल्याला पार्किंचे पैसे चांगल्या प्रकारे वसुली करून देतील. महासभेमध्ये तसा ठराव आहे.

<u>सभापती, श्री. विजय पाटील:—</u> पर्सनल सद्या तरी आता कोणाचे नको.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u> पर्सनली याच्यामध्ये काय आले?

<u>सभापती, श्री. विजय पाटीलः—</u> त्यांना तुम्ही करायला सांगा. पण असे एखादया व्यक्तीचे नको.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u> या व्यक्तीचा महासभेमध्ये ठराव पास आहे. आपण सर्वांनी केला आहे. फक्त तुमच्या लक्षात आणून देत आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारियाः—</u> यांनी फक्त लक्षात आणून दिले आहे, आयुक्त साहेब बघतील. आता पर्यत जी चर्चा झाली आहे, इथ पर्यंत सुधारीतवर आता बजेटवर ज्यांना चर्चा करायची आहे, त्यांनी करावी, नंतर ठराव करू. बजेट सन २०२१—२०२२ पहिले बजेटमध्ये शासन आयुक्त साहेब सांगतात की, एवढे यायला पाहिजे किंवा जायला पाहिजेत सांगत असतात. आपण बजेट बनवत असतो. तर हे आकडे जे आहेत हजारात आहेत तर लाखामध्ये झाले पाहिजेत. भरपूर महीला आहेत, स्थायी समितीच्या सदस्या आहेत, समजण्यासाठी त्रास होत आहे. आपण पुर्ण आकडा लिहा किंवा लाखामध्ये करा. पहीला आकडा आहे आपला बांधकाम परवानगी नकाशे— २, ७४, ५ हजार, ५ हजार म्हणजे तीन झिरो अजून लावून परत आकडा येईल. परंतु हेच २७४५० झाले तर आम्ही समणार की, हे २४६ करोड आहेत.फिगर लाखामध्ये असायला पाहीजे. करोडोमध्ये राहीले तर चांगले होईल. २४७.५ मी माझ्या मनाचे सांगत नाही. दुस—यांचे सांगत आहे. हे बघा साहेब, बजेट जे १६ सदस्य स्थायी समितीचे बनवत असतात आणि नंतर जेव्हा महासभेमध्ये जातो, ते अशा प्रकारे झाले पाहीजे की, जे नविन सदस्य निवडून आले आहेत. त्यांना पण समजले पाहीजे. तर आपण यामध्ये ठराव करून देवू की, महासभेमध्ये जे बजेट येईल ते लाखोमध्ये येईल किंवा करोडोमध्ये येईल. हजारोमध्ये राहणार नाही. आकडे हजारमध्ये आले नाही पाहीजे.

<u>लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटकेः—</u> आदरणीय महोदय, महाराष्ट्र शासनाचे बजेटही हजारमध्ये होत असतो, हजारोमध्ये होत असतो. तर आपण आपला बजेट लाखो आणि करोडोमध्ये कसे करणार?

<u>सदस्य, श्री. राजेश वदारियाः—</u> पहिले तर महाराष्ट्र म्युनिसिपल ॲक्ट यामध्ये अशी तरतुद आहे का? बजेट हजारोमध्ये बनवायचे आहे. ही प्रथा चालत आली आहे. बनवत आले आहेत तर कधी चेंज करणार नाहीत. असे नाही बदलाव प्रत्येक वेळी येतच राहील आणि येत राहतील. घटना बनवले आज किती अमेंडमेंट आले आहेत? कुठे कायदयामध्ये लिहले आहे, आपण सांगा. जर कायदयामध्ये असे कुठे पण नाही हजारोमध्ये तर आपण आपल्या हिशोबाने बजेट बनवणार. जे आमचे नविन निवडून आलेले सदस्य यांना समजायला पाहीजे. त्यांना समजायला सोपे जाईल. ठिक आहे, ठराव बनणार नाही. स्थायी समिती सभापतीनी इन्ट्रेक्शन दयावे. जो बजेट आम्हांला आयुक्तांनी सन २०२१—२०२२ करीता उत्पन्न व खर्चाचे अंदाज सादर केले होते. त्याला आपण काही फेरफार करून अशा प्रकारे मंजुर करीत आहेत. बांधकाम परवाना व नकाशे छाननी फी २७४५, महानगरपालिका शिक्षण कर २० हजार शिक्षण करातील सुट ६०० म्हणजे इन टू थाऊजंड, रोजगार करावरील सुट १००, रोजगार हमी कर ५०००, अग्निशमन कर ७५००, सर्वसाधारण कर १०२५००, पथकर ३०,०००, माझ्या हिशोबाने ही कॉपी प्रशासनाला दिली तर चालेल का मॅडम का पुर्ण वाचू मी आमची चर्चा काल झाली होती. सर्व गटनेता, सिनियर लोक होते. ही कॉपी सभापतींना तर दिली आहे. मेन मेन वाचून झाल्या नंतर मी आयुक्तांना देतो. यामध्ये खर्चाच्या बाबतीत पण आम्ही चेंजेस केले आहे. ते आपण बघा. यामध्ये कन्फयुजन आहे. ८०० करोड आणि खर्च आहे ७९९ करोड यामधून कमीत कमी ५८ लाख ६० हजाराची शिल्लक आहे आणि नगरसेवकांचे मानधन, सभा, इतर भत्ते व लेखा शिर्ष अंतर्गत मा. महापौर, मा. उप महापौर, मा. स्थायी समिती सभापती, सर्व सभापती, सदस्य, इतर समितीचे वाहन भत्ता प्रत्येकी रूपये १० हजार वाढ करण्यात येत आहे. नगरसेवक निधीसाठी करण्यात आलेला एकुण तरतुदमध्ये नामनिर्देशित सदस्यांसाठी प्रत्येकी ३० लाख निधीचा समावेश आहे. नविन दिवाबत्ती बसवणे लेखाशिर्षक सर्व नगरसेवकांसाठी प्रत्येकी ५ लाख रूपयेचा समावेश आहे. समाज मंदिर, वेलकम गेट यात, यात्रिनिवास, स्पोर्टस, स्टेज बनवणे या लेखाशिर्षकात अंतर्गत संत रोहीदास व महर्षि वाल्मिकी समाज मंदिर बांधण्याच्या कामासाठी रूपये २ कोटीचा समावेश आहे. आरोग्य केंद्र व लेखाशिर्षक अंतर्गत लॅब बांधण्या कामासाठी १ कोटीचा समावेश आहे. पुतळे स्मारक व राष्ट्रीय दिवस या लेखाशिर्षात छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत कवरराम, झुलेलाल साई यांचे पुतळे बांधण्यासाठी ६ कोटींची तरतुद केली आहे. मार्केट दुरूस्ती व निगा या लेखाशिर्षा अंतर्गत उल्हासनगर शहरातील भाज्यांच्या व फळांच्या मार्केटसाठी २ कोटींची तरतुद केली आहे. उल्हासनगर स्टेशन ते वडोलगांव येथे पुल बांधण्यासाठी लेखाशिर्ष अंतर्गत सी.एच.एम. कॉलेज ते

उल्हासनगर स्टेशन आणि संजयगांधी जवळ ब्रिजचे काम करण्यासाठी ५ कोटींची तरतुद केली आहे. चौकांचे सुशोभिकरण या लेखाशिर्ष अंतर्गत संत भगतराम चौक यांचे डेव्हलेपमेंट करण्यासाठी ५० लाखाचा समावेश आहे. नविन रस्ते, सिमेंट कॉंक्रिट या लेखाशिर्ष अंतर्गत डेव्हलेपमेंट ऑफ रोड, इंडर्स्टीज एरिया यासाठी २ कोटींचा समावेश आहे. उद्यान बनवणे व लेखाशिर्षक डेव्हलेपमेंट ऑफ फुल पाखरू उद्यान मेडीस्टेशन योगा गार्डन तसेच महीलांसाठी उद्यानासाठी ३ कोटींची तरतुद केली आहे. अंदाजपत्रक छापून प्रत्येक पालिका सदस्यांना देण्यासाठी व्यवस्था मुख्य लेखाधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानला जाईल. तसेच इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता थेट अंमलात येईल. आता काही सदस्यांनी त्यांच्या वार्डाचे काम दिले आहेत ते मी वाचत आहे. सिमेंट क्रॉंक्रिट रोड बॅरेक नंबर ९६९ ते सुखदेव कंपाऊड ५० लाख सिमेंट कॉंक्रिट रोड, सेक्शन—२० ५० लाख, सिमेंट कॉंक्रिट रोड अशोक टॉकिज ते मिल्टरी तलाव ५० लाख, साहेब आता त्यांनी दिले आहेत, तर वाचायला लागतील कोणालाही मनाई मी करू शकत नाही. आपण पण दया, वाचुन दाखवेल. पॅनल ११ इप्रुमेंट ऑफ इंदिरागांधी गार्डन ५० लाख, पॅनल ११ इप्रुमेंट ऑफ नियर ९०२, बॅरेक नंबर ९०२, ५० लाख, पॅनल ११ इप्रुमेंटेन रोडरी गार्डन ५० लाख, बॅरेक १८३५ न्यु क्लॉथ मार्केट फारवर लाईन रोड ३ करोड, उल्हासनगर—५ टॅकर पॉईंट बॅरेक नंबर २०७१ ते २०४६ २ करोड रूपये उल्हासनगर—५, महेश सोसायटी पासून बॅरेक नंबर १२६ सचानंद गोखलानी घरापर्यत रोड, नाली बनवणे. २ करोड रूपये, बसंतराम दरबार पासून मथुरा महल उल्हासनगर—१ नालीसाठी ३ करोड रूपये, आमदार कार्यालया पासून हिरा मॅरेज हॉल, बॅक ऑफ बडोदा, मारूती स्टॅंड उल्हासनगर —२, ५ करोड रूपये, एम टू ५० रोड ड्रेन, बॅरेक नंबर ६८२, बॅरेक नंबर ६७४ किंग प्लाझा, बॅरेक नंबर ६७३ बालाजी नास्ता शॉप, आशाराम चौक रिकॉरमेंट ५० लाख, अजून एक आहे, श्री. भगवान भालेरावजी यांनी मला दिले आहे. रामभाऊ चौक ते संतोषी माता मंदिर वडार कॉली रस्ता कॉंक्रिटीकरण व बाजुची नाली बांधणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते हनुमान नगर वीरू यादच्या घरांपर्यंतचा रस्ता कॉंक्रीटीकरण व बाजुची नाली बांधणे. गांधीनगरमधील रस्ता कॉंक्रीटीकरण व बाजुची नाली बांधणे. तरी वरील कामे नमुद करणे....

<u>सभापती, श्री. विजय पाटील:—</u> वदारिया साहेब, जेवढे पण नगरसेवकांचे पत्र आहेत, ते सर्व एकत्र दया आणि आपण बसून....

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> ज्या सदस्यांनी जसे की, श्री. भालेरावजी, आहेत, उप महापौर ते इथे उपस्थित नाहीत, महेश सुखरामनी आहेत, ते सुध्दा इथे उपस्थित नाहीत, श्री. जमनादास पुरस्वानी व श्रीम. पंजाबी मॅडम यांनी मला वाचण्यासाठी दिले आहेत. तर हे मी तुमच्या समोर वाचून दाखवले आहे.

<u>सभापती, श्री. विजय पाटील:—</u> प्रत्येकाचे एकत्रित दया, आपण बरोबर बसून नगरसेवकांशी चर्चा करून...

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> वरिष्ठ सदस्य, आहेत, श्री. भुल्लर महाराज यांचे म्हणणे आहे की, वाचून दाखवा आणि अजून दुस—याचे असतील ते पण याच्यामध्ये ॲड करण्यात येतील.

<u>सभापती, श्री. विजय पाटील:—</u> सर्व पत्र एकत्र दयायचे आहेत,

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> प्रभाग तीन मध्ये शहाड फाटक वि.पी. नाईक कॉलनी येथे ४ व्यासाची जिर्ण जलवाहीनी बदली करून नविन जलवाहीनी टाकणे अपेक्षित खर्च २० लाख, प्रभाग तीन मध्ये शहाड फाटक वि.पी. नाईक कॉलनी येथे सेंच्युरीची लाईन टाकणे खर्च २० लाख, प्रभाग तीन अंबा अपार्टमेंट ते मंगलमुर्ती अपार्टमेंट पर्यंत मोठा नाला बनवणे अपेक्षित खर्च १ करोड, प्रभाग तीन मध्ये आनंद मेथूनगर ते स्वामी विवेकानंद शाळा समोर वाल्मिकीनगर येथील उद्यानाचे आरक्षित उद्यान विकसित करणे, अपेक्षित खर्च १ करोड, प्रभाग तीन मध्ये भवानी मंदिर पासून जवाहर बेकरी पर्यंत २५० सिमेंट कॉंक्रिट रोड, रस्ता बनवणे खर्च ५७ लाख हे सर्व आणि आपण बरोबर बसून जो बजेट बनवला होता, तो मी तुम्हांला देतो आणि हा बजेट आपण समजून याला पास करण्यात येईल, धन्यवाद.

<u>सभापती, श्री. विजय पाटील:—</u> हे पत्र सोडून जे आपल्या बजेटमध्ये आहे, लेखा विभागाने इतिवृत्ताची वाट न बघता, महापौरांकडे, महासभेपुढे सादर करण्यात यावे. हे जे पत्र आले आहेत, ते सोडून याच्यावर आम्ही चर्चा करून तुमच्याकडे देवू. महासभेपुढे आणू, धन्यवाद.

<u>महापालिका सचिव:—</u> ठराव दिला आहे, सर्व संमतीने मंजूर. ठिक आहे, इतिवृत्ताची वाट न पहाता वदारिया सरांनी वाचला आहे, मी पुन्हा वाचत नाही. वाचायचे असेल तर तसे सांगा.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

**<u>सभापती, श्री. विजय पाटील-</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑विषय :— <u>महानगरपालिकेच्या सन २०२०—२०२१ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०२१ —२०२२ चे मुळ अंदाजपत्रक.</u>

अंदाजपत्रक हे महानगरपालिकेची वार्षिक बाब आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदीप्रमाणे प्रत्येक वर्षी सर्व प्रथम उत्पन्न व खर्च यांचे अंदाज आयुक्तांनी तयार करावयाचे आहेत. सदर अंदाजात अधिनियमाचे विविध कलमान्वये महानगरपालिकेस पार पाडावयाची कार्य व कर्तव्ये तसेच प्राथमिक शिक्षण निधीत घ्यावयाच्या अनुदानाची रक्कम अशा बाबींसंबंधी कराव्या लागणा—या खर्चाची तरतुद करणे आवश्यक आहे तसेच पुढील वर्षात या अधिनियमाच्या तरतुदीन्वये जे कर लादणे आवश्यक असेल अशा कराधानासंबधीच्या प्रस्तावांचे विवरण पत्र व कराधाना पासून मिळणा—या जमा रक्कमांचे अदांज ही सादर करणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेता, प्रत्येक बाबी अंतर्गत अपेक्षित उत्पन्न व अपेक्षित खर्च यांचे वर्गीकरणासहित अंदाजपत्रक तयार करण्याच्या प्रयोजनासाठी सादर करण्यात येत आहेत.

सन २०२०—२०२१ चे सुधारीत अंदाज व सन २०२१—२०२२ चे मूळ अंदाजपत्रकासंबधी तपशिल पुढील प्रमाणे.

<u>सन २०२०—२०२१</u> <u>चे सुधारीत अंदाजपत्रक</u> :—

सन २०२०—२०२१ साठी एकूण रुपये ८२१.७६ कोटी चे मुळ अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले होते . मागील ८ महिन्याचे प्रत्यक्ष उत्पन्न लक्षात घेता, २०२०—२०२१ वर्षासाठी खालीप्रमाणे सुधारीत अंदाज तयार करण्यात आले आहे .

(आकडे हजारात)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ अंदाजपत्रकीय उत्पन्न | : | रुपये. | ३७४८६०९ | |
| ब अंदाजपत्रकीय उत्पन्न | : | रुपये. | ..... | |
| क अंदाजपत्रकीय उत्पन्न | : | रुपये. | ५०९०३६ | ४२५७६४५ |
| अ अंदाजपत्रकीय खर्च | : | रुपये. | ३४२९६८० | |
| ब अंदाजपत्रकीय खर्च | : | रुपये | १००० | |
| क अंदाजपत्रकीय खर्च | : | रुपये. | ८२४१२५ | ४२५४८०५ |

प्रत्येक वर्षाप्रमाणे मालमत्ता कर, पाणी पट्टी व अन्य करापोटी अधिक वसुली होईल, महानगरपालिका मालमत्ता विनियोग करण्यात येईल असे गृहित धरुन स्थायी समितीने अंदाज तयार केले होते तथापि त्यानुसार वसुली करण्यात आलेली नाही. प्रत्येक वर्षात उत्पन्नाचे अवास्ताविक अंदाज गृहित धरुन विविध लेखाशीर्षातर्गत विविध प्रकल्पासाठी तरतूद करण्यात येते . वर्षाअखेर उत्पन्नाचे अवास्ताविक उद्दिष्टे पार पाडणे शक्य होत नाही परंतु खर्च मात्र पुर्ण करण्यात येतो. काही वर्षापासून सुरु असलेल्या या प्रथेमूळे कर्जाची अदायगी करणे शक्य होत नाही व ठेकेदार व पुरवठादारांचे थकीत देयकांचे प्रमाणही वाढत चालले आहे. नोव्हेंबर २०२० पासून ७ व्या वेतन

आयोग लागू झाला असून त्याची थकबाकी अदा करावयाची आहे. महानगरपालिकेने जे.एन.एन. यु.आर.एम. योजनेत पाणी पुरवठा प्रकल्प पुर्ण केले असून त्यासाठी महापालिकेने ६९ कोटी कर्जाची एम.एम.आर.डी.ए. या वित्तीय संस्थेकडून उभारणी केलेली आहे. त्याची परतफेड अंदाजे ८ कोटी प्रति वर्ष सुरु झालेली आहे. एम.आय.डी.सी. ने दिनांक १/४/२०१३ पासून ७००० ऐवजी ८००० प्रति घन लिटर दर निश्चित केली आहे. एम.आय.डी.सी. ने पाण्याच्या दरात वाढ केल्यामूळे महापालिकेस प्रत्येक वर्षात पाणी खरेदी पोटी ४३ कोटी रुपये देणे आवश्यक आहे. महापालिका सुरूवातीपासूनच खरेदीपेक्षा कमी दराने ग्राहकांना पाणी पुरवठा करीत आहे. त्यामूळे महापालिकेची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे या सर्व बाबी लक्षात घेता, महापालिकेच्या वित्तीय स्थितीत सुधार होईपर्यंत काही कालावधीसाठी अति आवश्यक कामे वगळता सर्व कामांना पुर्णविराम देणे गरजेचे राहील.

महानगरपालिकेचे सन २०२१—२२ चे मूळ अंदाजपत्रक :—

आर्थिक वर्ष २०२१—२२ साठी तयार करण्यात आलेला उत्पन्न व खर्चाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे .

(आकडे हजारात)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ अंदाजपत्रकीय उत्पन्न | : | रुपये. | ३७३०८९५ | |
| ब अंदाजपत्रकीय उत्पन्न | : | रुपये. | १००० | |
| क अंदाजपत्रकीय उत्पन्न | : | रुपये | ५७२५६६ | ४३०४४६१ |
| अ अंदाजपत्रकीय खर्च | : | रुपये. | ३०५५६८४ | |
| ब अंदाजपत्रकीय खर्च | : | रुपये. | ३००० | |
| क अंदाजपत्रकीय खर्च | : | रुपये | १२४४१६१ | ४३०२८४५ |

शिक्षण विभागाचे सन २०२१ — २२ चे मुळ अंदाज :

प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील पार पाडावयाची कार्ये व कर्तव्य लक्षात घेता, उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे वर्ष २०२१—२०२२ साठी खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये | : | ७४११७२/— |
| अंदाजपत्रकीय खर्च रुपये | : | ७४०००० /— |
| अखेरची शिल्लक रुपये | : | ११७२/— |

उपरोक्त दर्शविलेल्या एकूण अंदाजात रुपये ३६०००० /— शासकीय अनुदान व रक्कम रु ३८००००/— महापालिका वर्गणी म्हणून अपेक्षित करण्यात आले आहे.

सबब शिक्षण विभागाचे सन २०२१—२०२२ चे अंदाजपत्रक स्थायी समिती मान्यतेसाठी प्रस्तावीत करीत आहे.

शिक्षण विभागाचे सन २०२० — २१ चे सुधारित अंदाज :

शिक्षण विभागाचे वर्ष २०२०— २१ करिता मुळ अंदाजपत्रकीय तरतुद, जमा व खर्चाच्या प्रत्येक लेखा शिर्षात प्रत्यक्ष झालेले उत्पन्न व खर्च तसेच महापालिकेची वित्तिय परिस्थिती लक्षात घेता ,

शिक्षण विभागाचे वर्ष २०२० –२०२१ चे अंदाजपत्रक पुढील प्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्तावित आहे.
.

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : ६८६०५८/–

अंदाजपत्रकीय खर्च रुपये : ६८५३२२/–

अखेरची शिल्लक रुपये : ७३६/–

परिवहन उपक्रमाचे अंदाज :

**परिवहन उपक्रमाचे वित्तीय वर्ष 2020–2021 चे उत्पन्न व खर्चाचे सुधारीत व वर्ष 2021–22 चे मूळ अंदाज पुढील प्रमाणे तयार करण्यात आले आहे.**

(आकडे हजारात)

| अ. क. | उत्पन्न तपशिल | वर्ष 2020–21 मूळ अंदाज | वर्ष 2020–21 सुधारित अंदाज | वर्ष 2021–22 मूळ अंदाज | अ. क. | खर्च तपशिल | वर्ष 2020–21 मूळ अंदाज | वर्ष 2020–21 सुधारित अंदाज | वर्ष 2021–22 मूळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | परिवहन सेवा उत्पन्न | 1000 | –– | 1000 | 1 | किरकोळ खर्च | 2000 | –– | 2000 |
| 2 | बस खरेदी अनुदान (अमृत योजना) | 2000 | –– | 0 | 2 | सभासदांना मानधन, सभा व इतर भत्ते | 1500 | 1000 | 1000 |
| | अ अंदाजपत्रकातून वर्ग | 32500 | 1000 | 2000 | 3 | सभासद प्रशिक्षण व प्रवास खर्च | 2000 | –– | 0 |
| | | | | | 4 | बस, बस डेपो, खांबे व इतर खर्च | 30000 | 0 | 0 |
| | **एकूण** | 35500 | 1000 | 3000 | | **एकूण** | 35500 | 1000 | 3000 |

उत्पन्न व खर्चाचे अदांज लक्षात घेता राहणारी तुट ''अ'' अदांजपत्रकातुन वर्ग करण्यास मजुंरी देण्यात आली आहे.

वृक्ष प्राधिकरणाचे अंदाजपत्रक :

**नागरी क्षेत्रात झाडांचे संरक्षणासाठी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे रक्षण व संरक्षण अधिनियम करण्यात आले आहेत. सदर अधिनियमातील तरतूदीनुसार झाडांची लागवड , संरक्षण इत्यादी बाबींसाठी स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करावयाचे आहे. त्यानुषंगाने वर्ष 2020–2021 चे सुधारित व 2021–22 चे मूळ अंदाज वृक्ष प्राधिकरण समिती मार्फत दिनांक 12/03/2020 रोजी पुढील प्रमाणे तयार करण्यात आले आहे.**

(आकडे हजारात)

| अ.क. | उत्पन्न तपशिल | वर्ष 2020–21 मूळ अंदाज | वर्ष 2020–21 सुधारित अंदाज | वर्ष 2021–22 मूळ अंदाज | अ.क. | खर्च तपशिल | वर्ष 2020–21 मूळ अंदाज | वर्ष 2020–21 सुधारित अंदाज | वर्ष 2021–22 मूळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वृक्ष कर | 10000 | 6500 | 10000 | 1 | उदयाने विभाग पगार | 20335 | 16000 | 18000 |
| 2 | अमृत योजना (बगीचे विकास) अनुदान | ..... | ..... | ..... | 2 | नवीन झाडे माती व ट्री गार्डस इ.लावणे | 2500 | 2000 | 2500 |
| 3 | अमृत योजना (बगीचे विकास) उमपा हिस्सा | ..... | ...... | ..... | 3 | वृक्ष गणना | 2500 | ..... | 1000 |
| 4 | वृक्ष तोडण्यासाठी अनामत रक्कम | 100 | 10 | 100 | 4 | नर्सरीची निगा व विकास | 500 | 0 | 0 |
| 5 | अ अंदाजपत्रकातून वर्ग करावयाची रक्कम | 89335 | 41490 | 23000 | 5 | झाडे व रोपांचे प्रदर्शन | 500 | 0 | 0 |
| | | | | | 6 | उदयाने निगा व दुरुस्ती | 20000 | 20000 | 5000 |
| | | | | | 7 | नवीन उदयाने | 50000 | 10000 | 5000 |
| | | | | | 8 | प्रशिक्षण व अभ्यास दौरा | 500 | ..... | 500 |
| | | | | | 9 | वृक्ष तोडण्यासाठी अनामत रक्कम परतावा | 100 | ..... | 100 |
| | | | | | 10 | वृक्ष तोडणे | 2500 | ..... | 1000 |
| | | | | | 11 | अमृत योजना (बगीचे विकास) | 0 | 0 | ..... |
| | एकूण | 99435 | 48000 | 33100 | | एकूण | 99435 | 48000 | 33100 |

उत्पन्न व खर्चाचे अदांज लक्षात घेता राहणारी तुट ''अ'' अदांजपत्रकातुन वर्ग करण्यास मजुंरी देण्यात आली आहे.

शिक्षण विभागाचे अंदाजपत्रक, परिवहन उपक्रमाचे अंदाजपत्रक , वृक्ष प्राधिकरणाचे चे अंदाजपत्रक , आयुक्तांचे महापालिकेसाठी सन २०२०–२१ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०२१–२२ चे जमा व खर्चाचे अंदाज व इतर प्रस्ताव

तसेच प्रशासनाकडून प्राप्त करण्यात आलेल्या इतर माहितीच्या अनुषंगाने घेवून अधिनियमाचे कलम ९६ नुसार अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यासाठी प्रस्तावीत आहे.

**स्थायी समिती ठराव कमांक : 43, दिनांक 22/03/2021**

**सुचकाचे नाव : श्री. कलवंतसिंह सोहता, श्री. राजेश वधारीया.**

**अनुमोदकाचे नाव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, श्रीम. कविता लाल पंजाबी.**

ही स्थायी समिती शिक्षण विभागाचे अंदाजपत्रक , परिवहन उपक्रमाचे अंदाजपत्रक, वृक्ष प्राधिकरणाचे अंदाजपत्रक, आयुक्तांचे महापालिकेसाठी सन २०२०—२०२१ चे सुधारित अंदाजपत्रक, आयुक्तांचे सन २०२१—२२ चे जमा व खर्चाचे अंदाज वर्ष २०१९—२०२० चे लेखा विवरण पत्र , अर्थसहाय देवून पुरविण्यात येणा—या सेवांचा तपशिल तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९६ मधील सर्व तरतूदी व सभेत चर्चेअंती सुचविलेली फेरफार विचारात घेवून खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

१) मालमत्ता कर : नाव हस्तांतरण फी च्या दरात प्रस्तावित वाढ स्थायी समितीचा स्वतंत्र ठराव क्र. दि. २२/०३/२०२१, अन्वये अमान्य करण्यात आलेली आहे.

२) पाणी पट्टी दर : पाणी पट्टी च्या दरात प्रस्तावीत वाढ स्थायी समितीचा स्वतंत्र ठराव क्र. दि. २२/०३/२०२१, अन्वये अमान्य करण्यात आलेली आहे.

३) वर्ष २०१९—२० मध्ये अर्थसहाय देवून पुरविण्यात येणा—या सेवांबाबतचा तपशिल विचारात घेवून महापालिकेच्या इतर उपलब्ध निधीतून अर्थसहाय कायम ठेवण्यात येत आहे. पाणी पुरवठा, साफसफाई, मलजलाची विल्हेवाट, दिवाबत्ती, व परिवहन उपक्रम यासाठी देण्यात येणारे अर्थसहाय मालमत्ता करातील सामान्य कर या उत्पन्नाच्या बाबीतून वर्ग करण्यात यावे.

४) वर्ष २०१९—२० चे लेखा विवरण पत्र, कर्ज विवरण पत्र, विविध खात्यात जमा रक्कम, आयुक्तांचे वित्तीय परिस्थिती बाबत अभिप्राय, इतर विवरण पत्र, प्रलंबीत कामे व देयकांच्या माहितीची नोंद घेण्यात येत आहे. प्रलंबित कामे लवकरात लवकर पुर्ण करून विकास कामाना गती देण्यात यावी.

शिक्षण विभागाचे सन २०२१—२२ चे मूळ अंदाजपत्रक पुढील प्रमाणे फेरफार करुन मंजुर करण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

| उत्पन्न | ३८०००० | खर्च | ३८०००० |
|---|---|---|---|
| मनपा वर्गणी | +267123 | नविन शाळेंच्या इमारतीवरील खर्च, अस्ति. असलेली प्राथ. शाळा इमारत व शि.मंडळ कार्या.देख.खर्च व इतर खर्च | +267123 |
| एकुण | ६४७१२३ | एकुण | ६४७१२३ |

उपरोक्त दर्शविलेल्या एकूण अंदाजात रु. १९७१०३/— शासकीय अनुदान व रक्कम रु. ६४७१२३/— महापालिकेकडून महापालिका वर्गणी म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

शिक्षण विभागाचे सन २०२०—२१ चे सुधारित अंदाजपत्रक :

शिक्षण विभागाचे सन २०२०—२१ चे मूळ अंदाजपत्रक पुढील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये | : | ६८६०५८/— |
| अंदाजपत्रकीय खर्च रुपये | : | ६८५३२२/— |
| अखेरची शिल्लक रुपये | : | ७३६/— |

परिवहन उपक्रमाचे अंदाजपत्रक :

परिवहन उपक्रमाचे वित्तिय वर्ष २०२०-२०२१ चे सुधारित व वर्ष २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्रक पुढील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

| अ. क. | उत्पन्न तपशिल | वर्ष 2020—21 मूळ अंदाज | वर्ष 2020—21 सुधारित अंदाज | वर्ष 2021—22 मूळ अंदाज | अ. क. | खर्च तपशिल | वर्ष 2020—21 मूळ अंदाज | वर्ष 2020—21 सुधारित अंदाज | वर्ष 2021—22 मूळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | परिवहन सेवा उत्पन्न | 1000 | —— | 1000 | 1 | किरकोळ खर्च | 2000 | —— | 5000 |
| 2 | बस खरेदी अनुदान (अमृत योजना) | 2000 | —— | 0 | 2 | सभासदांना मानधन, सभा व इतर भत्ते | 1500 | 1000 | 1000 |
| | अ अंदाजपत्रकातून वर्ग | 32500 | 1000 | 57000 | 3 | सभासद प्रशिक्षण व प्रवास खर्च | 2000 | —— | 2000 |
| | | | | | 4 | बस खरेदी , बस डेपो, खांबे व इतर खर्च | 30000 | 0 | 50000 |
| | **एकूण** | 35500 | 1000 | 58000 | | **एकूण** | 35500 | 1000 | 58000 |

वृक्ष प्राधिकरणाचे अंदाजपत्रक :

वृक्ष प्राधिकरण अधिनियमाचे कलम १६ मधील तरतूदीस अधिन राहून वृक्ष प्राधिकरण उपक्रमाचे वर्ष २०२०-२०२१ चे सुधारित व वर्ष २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्रक पुढील प्रमाणे फेरफार करुन मंजुर करण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

| अ.क. | उत्पन्न तपशिल | वर्ष 2020–21 मूळ अंदाज | वर्ष 2020–21 सुधारित अंदाज | वर्ष 2021–22 मूळ अंदाज | अ.क. | खर्च तपशिल | वर्ष 2020–21 मूळ अंदाज | वर्ष 2020–21 सुधारित अंदाज | वर्ष 2021–22 मूळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वृक्ष कर | 10000 | 6500 | 10000 | 1 | उदयाने विभाग पगार | 20335 | 16000 | 18000 |
| 2 | अमृत योजना (बगीचे विकास) अनुदान | ..... | ..... | ..... | 2 | नवीन झाडे माती व ट्री गार्डस इ. लावणे | 2500 | 2000 | 2500 |
| 3 | अमृत योजना (बगीचे विकास) उमपा हिस्सा | ..... | ...... | ..... | 3 | वृक्ष गणना | 2500 | ..... | 1000 |
| 4 | वृक्ष तोडण्यासाठी अनामत रक्कम | 100 | 10 | 100 | 4 | नर्सरीची निगा व विकास | 500 | 0 | 0 |
| 5 | अ अंदाजपत्रकातून वर्ग करावयाची रक्कम | 89335 | 41490 | 23000 | 5 | झाडे व रोपांचे प्रदर्शन | 500 | 0 | 0 |
| | | | | | 6 | उदयाने निगा व दुरुस्ती | 20000 | 20000 | 5000 |
| | | | | | 7 | नवीन उदयाने | 50000 | 10000 | 5000 |
| | | | | | 8 | प्रशिक्षण व अभ्यास दौरा | 500 | ..... | 500 |
| | | | | | 9 | वृक्ष तोडण्यासाठी अनामत रक्कम परतावा | 100 | ..... | 100 |
| | | | | | 10 | वृक्ष तोडणे | 2500 | ..... | 1000 |
| | | | | | 11 | अमृत योजना (बगीचे विकास) | 0 | 0 | ..... |
| | एकूण | 99435 | 48000 | 33100 | | एकूण | 99435 | 48000 | 33100 |

महापालिकेचे सन २०२१—२२ चे अंदाज :

मालमत्ता कर, पाणी पुरवठा व इतर थकबाकी या सर्व बाबी लक्षात घेता आयुक्तांनी वर्ष २०२१—२२ करिता उत्पन्न व खर्चाचे जे अंदाज सादर केले आहेत ते पुढील प्रमाणे फेरफार करून मंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

| उत्पन्न (आयुक्तांचे अंदाज) | ४३०४४६१ | खर्च (आयुक्तांचे अंदाज) | ४३०२८४५ |
|---|---|---|---|
| बांधकाम परवाना व नकाशे छाननी फी | +2665000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेंवा प्रभाग समिती क्र.१ | +4800 |
| महापालिका शिक्षण कर | +20000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेंवा प्रभाग समिती क्र.२ | +4200 |
| शिक्षण करावरील सुट | +600 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेंवा प्रभाग समिती क्र.४ | +5400 |
| शिक्षण कर | +30000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा प्रभाग समिती क्र.४ दुर्बल घटक | +6000 |
| रोजगार हमी करावरील सुट | +100 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा प्रभाग समिती क्र.१ दुर्बल घटक | +7200 |
| रोजगार हमी कर | +5000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा प्रभाग समिती क्र.२ दुर्बल घटक | +7200 |
| अग्निशमन कर | +7500 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेंवा प्रभाग समिती क्र.३ | +7800 |
| सर्व साधारण कर | +102500 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा प्रभाग समिती क्र.३ दुर्बल घटक | +4200 |
| पथकर | +30000 | संगणक साहित्य | +8300 |
| मोठया निवासी जागेवरील सुट | +250 | समाज मंदिर, वेलकम गेट,यात्री निवास,स्पोटर्स कॉ.स्टेज इ. नुतनीकरण व बनविणे | +70000 |
| वृक्ष कर | +2500 | उल्हास स्टेशन व वडोल गांव येथे पुल बांधणे | +45000 |
| मल प्रवाह कर | +25000 | उदयाने बनविणे | +25000 |
| मल प्रवाह सुविधा लाभकर | +10000 | वाहन तळ बनविणे | +47500 |
| पाणी पुरवठा लाभ कर | +17500 | शाळा बांधणी खर्च, तक्षशीला अभ्यासिका एम पी एस सी, यु पी एस सी, इ. पुर्वतयारी केंद्र. | +20000 |
| पाणी बिले वसूली (कर) | +170000 | नगरसेवक निधी | +37100 |

| | | | |
|---|---|---|---|
| पाणी बिले वसूली पा.पु. | +30000 | नगरसेवक निधी (दुर्बल घटक ) | +32800 |
| इतर मनपा इमारतीपासून मिळणारे उत्पन्न आणि बी.ओ.टी प्रोजेक्टस् | +499900 | शहरातील मृत्यू झालेल्या व्यक्तिच्या अंतविधीसाठी लाकुड खर्च | +2500 |
| ओ.एफ.सी. केबल घालणे फी | +130000 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन | +50000 |
| विकास शुल्क | +137500 | गलिच्छ वस्त्यात विकास कार्य | +139000 |
| | | दुर्बल घटक वसाहतीत विकास कार्य | +149000 |
| | | उप महापौर निधी | +60000 |
| | | शिक्षण कर परतावा | +30000 |
| | | विपरित परिस्थिती व्यवस्थापन | -5000 |
| | | रोजगार हमी कर परतावा | +5000 |
| | | महापालिका इमारतीत अग्निशमन यंत्रणा बसविणे | +500 |
| | | गटनेता निधी | +10000 |
| | | आरोग्य केंद्र | +10000 |
| | | माहिती व तंत्रज्ञान सेवा खर्च | +55000 |
| | | माहिती व तंत्रज्ञान साहित्य | +17000 |
| | | चौकांचे सुशोभिकरण | +4900 |
| | | सभागृह नेता निधी | +50000 |
| | | विरोधी पक्ष नेता निधी | +50000 |
| | | अंत्यविधी स्थाने दुरूस्ती व निगा | +24000 |
| | | उदयाने दुरुस्ती | +15000 |
| | | रस्ते दुरूस्ती व निगा | +90000 |
| | | महापौर निधी | +70000 |
| | | नगरसेवकांना मानधन,सभा व इतर भत्ते | +20000 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मनपा मुख्य इमारत | +15000 |
| | | मनपा इमारती बनविणे (इतर ) | +5000 |
| | | नवीन रस्ते (डांबरीकरण ) | +90000 |
| | | नवीन रस्ते सिमेंट कॉंक्रीट | +490000 |
| | | आणीबाणी परिस्थितीत रात्रीची व्यवस्था साहित्य | +2400 |
| | | कारंजे दुरूस्ती व चालविणे | +4000 |
| | | इतर खर्च | +5000 |
| | | प्राथमिक शिक्षण | +267100 |
| | | नवीन कारंजे बसविणे | +4900 |
| | | सार्वजनिक वाचनालय | +9000 |
| | | जंतुनाशक खरेदी | +15000 |
| | | कचरा वाहतूक खर्च | +200000 |
| | | मार्केट दुरूस्ती व निगा | +49500 |
| | | प्रवेशद्वार,यात्री निवास,समाज मंदिर स्पोटस काम स्टेज व इतर महापालिका इमारती दूरूस्ती व निगा | +2500 |
| | | स्थायी समिती सभापती निधी | +50000 |
| | | सिंधुभवन उभारणे | +10000 |
| | | महापालिका इमारतीत सौर उर्जा बसविणे. | +15000 |
| | | विशेष समित्या सभापती निधी | +27000 |
| | | स्थायी समती सदस्य निधी | +150000 |
| | | स्टेशनरी | -500 |
| | | पुतळे स्मारक व राष्ट्रीय ध्वज इ. बनविणे | +65000 |
| | | नवीन दिवाबत्ती एल.ई.डी बसविणे. | +10500 |
| | | नवीन दिवाबत्ती एल.ई.डी.ई बसविणे (दुर्बल घटक) | +20000 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नवीन दिवाबत्ती खरेदी (दुर्बल घटक) | +30000 |
| | | नवीन दिवाबत्ती खरेदी व बसविणे | +7500 |
| | | दिवाबत्ती दुरूस्ती व निगा (दुर्बल घटक) | +15000 |
| | | स्वच्छ महाराष्ट्र अभियान | +15000 |
| | | लसटोचणी खर्च आणि मास्क | +40000 |
| | | प्रभाग समिती सभापती निधी | +20000 |
| | | दिव्यांग व्यक्तींसाठी कल्याणकारी योजना | +171278 |
| | | महिला व बाल कल्याण | +171278 |
| | | सभासद प्रशिक्षण व प्रवास खर्च | +2000 |
| | | बस खरेदी व बस डेपो उभारणे खर्च | +50000 |
| | | परिवहन सेवा देखभाल दुरुस्ती खर्च | +3000 |
| | | अमृत योजनेंतर्गत विकास कार्य (भुयारी गटार ) | +150000 |
| | | बुस्टर पंपिंग मशीनरी खरेदी | +5000 |
| | | कुपनलीका/जेटपंप बसविणे खर्च | +5000 |
| | | शौचालय मुता—या निष्कासीत केलेल्या जागेवर सी.सी. पेसेज बनविणे. | +5000 |
| | | दुर्बल घटक वसाहतीत नाले व गटार बनविणे खर्च | +35000 |
| | | दुर्बल घटक वसाहतीत शौचालय व मुता—या बांधणी | +35000 |
| | | सार्व. शौचालय व मुता—या बांधणी | +15000 |
| | | पा.पु. इमारती विदयुत टेलीफोन बिले | +7500 |
| | | फीडर लाईन बसविणे | +2500 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | माहिती व तंत्रज्ञान सेवा खर्च | +2500 |
| | | खेमानी नाला मलनिसारण व्यवस्था | +70000 |
| | | मलप्रवाह वाहन निगा | +5000 |
| | | भुयारी गटार निगा | +2500 |
| | | भुयारी गटार जोडणी साहित्य खरेदी व बसविणे | +27500 |
| | | भुयारी गटार जोडणी साहित्य निगा | +7000 |
| | | बुस्टर मशीनरी चालवणे खर्च | +20000 |
| | | इतर आकस्मिक खर्च | +3500 |
| | | पावर पंप व पा.पु. साहित्य खरेदी व बसविणे खर्च (नवीन (दुर्बल घटक) | +45000 |
| | | पा.पु. साहित्य खरेदी (दुरूस्ती) | +45000 |
| | | पावर पंप व पा.पु. साहित्य खरेदी व बसविणे (नवीन) | +5000 |
| | | पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसवणे, दुरूस्ती (दुर्बल घटक) | +45000 |
| | | वाहन व मशिनरी खरेदी{यांत्रिकीकृत सांडपाणी सफाई– ओ ॲन्ड एम) | +10000 |
| | | सार्वजनिक शौचालय व मुता—या दुरूस्ती | +15000 |
| | | कुपनलीका दुरूस्ती खर्च | +15000 |
| | | बुस्टर मशीनरी निगा व दुरूस्ती | +17000 |
| | | दुर्बल घटक वसाहतीत शौचालय मुता—या नाले गटार व कलव्हट इत्यादी खर्च | +25000 |
| | | ड्रेनेज पंप प्लांट,ड्रेनेज पंप स्टेशन निगा व दुरूस्ती | +7500 |
| | | वालधुनी नाल्याचे सुशोभिकरण. | +10000 |
| | | निवडणूक खर्च | +32500 |
| एकुण | ८१८७८११ | एकुण | ८१८३७०१ |
| | | अखेरची शिल्लक | ४११० |

उत्पन्न : ८१८७८११

खर्च : ८१८३७०१

अखेरची शिल्लक : ४११०

नगरसेवकांना मानधन ,सभा व इतर भत्ते या लेखा शिर्षा अंतर्गत मा. महापौ, उप महापौर, स्थायी समिती सभापती, सर्व सभापती सदस्य, इतर समित्या यांचा वाहन भत्ता प्रत्येकी रु. १०,००० ची वाढ करण्यात आली आहे.

नगरसेवक निधीसाठी करण्यात आलेल्या एकूण तरतूदीमध्ये नामनिर्देशित सदस्यांसाठी प्रत्येकी ३० लाख नगरसेवक निधीचा समावेश आहे.

नवीन दिवाबत्ती { एल.ई.डी} बसविणे यज्ञ लेखाशिर्षात नामनिर्देशित सदस्यांसाठी प्रत्येकी ५ लाख रुपयांच्या समावेश आहे.

समाज मंदिर, वेलकम गेट,यात्री निवास,स्पोटर्स कॉ.स्टेज इ. बनविणे या लेखाशिर्षा अंतर्गत संत रोहिदास व महर्षि वाल्मीकी समाज मंदिर या कामासाठी रु. २ कोटी रुपयांच्या समावेश आहे.

आरोग्य केंद्र या लेखाशिर्षात लॅब बांधणेया कामासाठी रु. १ कोटीचा समावेश आहे.

पुतळे स्मारक व राष्ट्रीय ध्वज इ. या लेखाशिर्षात छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबा साहेब आंबेडकर, संत कंवाराम, झुलेलाल साई यांचे पुतळे बांधणीसाठी रु. ६ कोटीची तरतुद केली आहे.

मार्केट दुरूस्ती व निगा या लेखा शिर्षा अंतर्गत उल्हासनगर शहरातील भाज्यांचे व फळांचे मार्केट साठी रु. २ कोटीची तरतुद केली आहे.

उल्हास स्टेशन व वडोल गांव येथे पुल बांधणे या लेखा शिर्षा अंतर्गत सी. एच.एम कॉलेज ते उल्हास स्टेशन आणि संजय गांधी नगर जवळच्या ब्रीजचे काम करणेसाठी रु. ५ कोटीची तरतुद केली आहे.

चौकांचे सुशोभिकरण या लेखा शिर्षात अंतर्गत संत भगत कंवाराम चौक याचे डेव्हलोपमेंट करणेसाठी रु. ५० लक्ष चा समावेश आहे.

नवीन रस्ते सिमेंट कॉक्रीट या लेखा शिर्षात डेव्हलपमेंट ऑफ रोडस इन इंडस्ट्रीयल एरियासाठी रु. २ कोटीचा समावेश केला आहे.

उदयाने बनविणे या लेखा शिर्षात डेव्हलपमेंट ऑफ फुलपाखरु उद्यान, मेडीटेशन, योगा गार्डन, तसेच महिलांसाठी उद्यानासाठी रु. ३ कोटीची तरतुद केली आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:- मा. महापौरजी ने एक खूप सुंदर विषय आणला आहे.आणि आमची सर्वाची सहमतमी आहे. या विषयामुळे लोकांच्या मनामध्ये काही चुकीचे गैरसमज करुन घेतले जावू नयेत. यासाठी फक्त हयाच वर्षासाठी ८ मार्च २०२१ रोजी जेवढी मुली जन्माला आलेल्या आहेत, त्यांची एफडी करण्यासाठी १ लाख रुपये देत आहेत. त्याच बरोबर...

**सदस्य, श्री. भारत राजवानी**:- जर १० च्या वर जास्ती जन्मालाआले असतील तरी खाजगी किंवा सरकारीमध्ये जन्मलेल्या मुलीसाठी, सर्वांना लाभ मिळाला पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>** हा लाभ फक्त या वर्षासाठीच मिळेल हे मी वारवांर सांगत आहे. या पुढे दुसरी योजना राबविली जाईल, ठिक आहे ना.

**<u>लेखाधिकारी, श्री. सुर्यकांत खटके:-</u>** ही फक्त या वर्षापुरतीच आहे.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>** खटके साहेब, हा एक  जोडलेला विषय आहे, जसे की या मुलींना देत आहेत, तसेच दिव्यांग(हँडीकॅप) लोकांचे अर्ज भरलेले आहेत आणि स्थायी समितीमध्ये ठराव पास केलेला आहे. की या सर्वाना मार्च अखेर पर्यंत पैसे देण्यात यावेत. आता पर्यंत या दिव्यांग(हँडीकॅप) लोकांची काय परिस्थिती आहे आणि कोरोना रोगामुळे आगोदरच अडचणीमध्ये आहेत, आणि ज्यांनी इथे ग्रँडसाठी ॲपलीकेशन केले आहे, मा. आयुक्त मॅडम, ते भ्रमणध्वनी व्दारे वारंवार चौकशी करत आहेत. त्यांना याची आवश्यकता आहे.त्यांना कोणाला ६ हजार दयायचे आहेत तर कोणाला १२ हजार दयायचे आहेत, त्या प्रमाणे दिव्यांगाना दोन तीन दिवसामध्ये पेमेंट दया. मा. आयुक्त मॅडम आपण आदेश देण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>**इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**<u>महापालिका सचिव</u>**:- यामध्ये काही बदल करावे लागतील, जे बोलेले आहे ते ठराव वाचून दाखवत आहे, की ही योजना राबविण्यास हरकत नाही. जन्मलेल्या शहरातील सर्व नवजात मुलींच्या नावाने प्रत्येकी १ लाख रुपये फिक्स डिपॉझीट ठेवण्यास मान्यता आहे.परंतु सदर योजना ही फक्त् या वर्षा पुरतीच आहे.जे वरती नमूद केले आहे, सन २०२०-२०२१ कि २०२१-२०२२.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:-</u>**जे वर्ष गेले ते सन २०२०-२०२१ मध्ये येईल.

**<u>महापालिका सचिव</u>**:- ही योजना सन २०२०-२०२१ या वर्षा करीता लागू करण्यात येत आहे. त्या नंतर नविन योजना राबवावी.इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:-</u>** या मध्ये जो खाजगी रुग्णलयातून येतील त्यांना सुध्दा सर्वाना देण्यात यावे.

**<u>महापालिका सचिव:-</u>** देवू शकतात का, प्रशासनाने क्लिअर करावे की यांना आपण देवू शकतो क?

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** जो खजगी रुग्णलायात जन्म झाले आहे त्यांना सुध्दा देण्यात यावे.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:-</u>**त्या पण मुली आहेत ना.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-</u>** सर्व मुलींचा जन्म ८ मार्च रोजी झालेला आहेत त्या.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>**ज्या मुलींचा जन्म् ८ मार्च रोजी सरकारी आणि खाजगी रुग्णालयात झालेला आहे अशा सर्व मुलींना त्याचा लाभ देण्यात यावा.

**<u>सदस्या, श्रीम.कविता पंजाबी:-</u>** महापौरजी, याचा लाभ सर्व मुलीना दया.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:-</u>** जरी १० पेक्षा जास्त मुलींचा जन्म झाला असेल तरी त्यांना देण्यात यावा.

**<u>सभापती, श्री. विजय चाहू पाटील:-</u>** खुप चांगली गोष्ट आहे, आता जरा शांतता राखा. हा विषय पास झाला आहे.

**<u>सदस्य,श्री. भारत राजवानी:-</u>** ते मिनिटस मध्ये मी बोललेलो आहे. ते घेतलेले नाही म्हणून मी सांगत आहे.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-</u>** सभापतीजी, दि. ८ मार्च २०२० रोजी सरकारी आणि खाजगी रुग्णलयात किवा घरात आपल्याकडे महानगरपालिकेमध्ये जे दाखल्यासाठी येत असतात यानुसार या दिवशी  जन्मलेल्या सर्व मुलींना याचा लाभ देण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>**सर्वांना देण्यात येईल.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी</u>**:- आणि जर कोणतीही महिलाचे माहेर बाहेर आहे ती बाहेर सुध्दा जावून डिलिवरी होत असेल परंतु त्यांचे कुटुब उल्हासनगर मध्ये आहे.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>**हे थोडे आपण करु शकतो.

**<u>महापालिका सचिव:-</u>** ठिक आहे, आता तुम्ही जसे म्हणलात दि. ८ मार्च रोजी शासकीय, खजगी, घरगुती, उल्हासनगर शहरात जन्मलेल्या स्थानिक  मुलींना लाभ देण्यात येत आहे.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-</u>** पास.करीत आहेत.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>**पास..पास..इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>महापालिका सचिव</u>**:-  इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

**<u>सभापती, श्री.विजय पाटील-</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

☑विषय क्र. ४ :—दिनांक ८ मार्च, २०२१रोजी या जागतिक महिला दिनानिमित्ताने ८ मार्च रोजी जन्मलेल्या शहरातील सर्व नवजात मुलींच्या नावाने प्रत्येकी रू. १,००,०००/-
(एक लाख रूपये मात्र) फिक्स डिपॉझीट करणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका, महिला व बालकल्याण विभागातंर्गत विविध प्रकारचे योजना राबविण्यात येतात यावेळी महिला व बालकल्याण विभागातर्फे उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दिनांक ८ मार्च हा महिला जागतिक दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे.

दिनांक ०८ मार्च २०२१ या जागतिक दिनानिमित्त राज्यातील विविध शहरात महिला विषयी विविध कार्यक्रम व उपक्रम राबविले जात आहे.तसेच शासन देखील महिलांवर होणारे अत्याचार तसेच स्त्रीभुरण हत्या यावर कडक कायदा देखील अमंलात आणत असून बेटी बचाव, बेटी पढाव अशी योजना राबवित आहे. असे असतांना ८ मार्च या जागतिक

महिला दिनानिमित्ताने शहरात जन्मलेले नवजात मुलींच्या नावाने "**महापौर नवजात बालिका ठेव योजना**" या नावाने प्रत्येकी रू. १,००,०००/- (एक लाख रूपये मात्र) एवढे फिक्स डिपॉझिट रक्कम राष्ट्रीयकृत बॅंकेत ठेवून वयाच्या १८ व्या वर्षी त्याचा लाभ त्या बालिकेस मिळावा अशी मा. महापौर यांची संकल्पना आहे.

मा. आयुक्त सो., यांच्या दिनांक ०१/०३/२०२१ रोजीच्या मान्यतेने उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात दिनांक ०८ मार्च रोजी जन्माला येणाऱ्या मुलीच्या नावाने "**महापौर नवजात बालिका ठेव योजना**" या नावाने प्रत्येकी रू. १,००,०००/- (एक लाख रूपये मात्र) ठेव योजना राबवून त्याचा लाभ देण्यात यावा.

महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २००५/प्र.क्र.२५५/०५/नवि-२० दिनांक ०८/११/२०१० अन्वये राखीव तरतुदीतून महिला व बालकल्याण समितीने खर्च करण्याबाबत निर्देश दिलेले आहे. सदर शासन निर्णयात शासनाने मान्य केलेल्या वरील योजना तसेच इतर उपयुक्त योजना तयार करून राबविण्याचे पुर्ण अधिकार महानगरपालिकांच्या आयुक्तांना देण्याचे नमूद केले आहे. यासाठी सन C-४ (३) महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये १७ कोटी इतकी तरतुद केली होती. तथापि मागिलवर्षी आलेल्या कोव्हिड महामारीमुळे या लेखाशीर्षामध्ये त्यापैकी १७ कोटी तरतुद शिल्लक आहे.

तरी वर नमुद केल्याप्रमाणे "**महापौर नवजात बालिका ठेव योजना**" महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यासाठी मा.स्थायी समिती पटलावर मंजूरी घेणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.मान्यतेस्तव सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र.५७ दिनांक : २६/०३/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भारत राजवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारदिनांक ८ मार्च, २०२१रोजी या जागतिक महिला दिनानिमित्ताने ८ मार्च रोजी सरकारी दवाखाने, खाजगी दवाखाने, घरी जन्मलेल्या उल्हासनगर शहरातील सर्व नवजात मुलींच्या नावाने प्रत्येकी रू. १,००,०००/- (एक लाख रूपये मात्र) फिक्स डिपॉझीट करणेस मान्यता देत आहे.

परंतु

सदर योजना ही फक्त या वर्षापुरती जे वर्षे नमुद केले आहे.सन २०२०-२०२१ साठी लागू करण्यात येईल.त्यानंतर नविन योजना राबवावी.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते
सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ५ वाचून दाखवितात.

---

➪ **विषय क्र.५** उल्हासनगर महानगरपालिका तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाया योजना करण्याकरिताऑक्सिजनसल्लागाराची (Oxygen Consultant) मानधनतत्वावर नियुक्तीसमुदतवाढदेणेबाबतसदरचाप्रस्तावमा.स्थायीसमितीयांचेमाहितीसाठीसविनयसादर.

---

**महापालिका सचिव**:- पास..

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री.विजय पाटील-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे. 👍

☑**विषय क्र. ५** :—उल्हासनगर महानगरपालिका तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपायायोजना करण्याकरिता ऑक्सिजन सल्लागाराची (Oxygen onsultant) मानधन तत्वावर नियुक्तीस मुदतवाढ देणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती यांचे माहितीसाठी सविनय सादर.

प्रस्तावना

वरिल विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिके मध्ये तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर श्री.गुरूप्रसाद गडकरी, मे. वायु सोल्युशन, यांची ऑक्सिजन सल्लागाराची (Oxygen Consultant) उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रात कोविड १९ प्रतिबंधात्मक उपाययोजना संदर्भात सर्व DCHC व DCH रूग्णालयांकरीता रू. ६०,०००/- प्रति माह या प्रमाणे माहे सप्टेंबर २०२० ते माहे डिसेंबर २०२० या ४(चार) महिन्यांकरीता नेमणूक करण्यात आली होती. त्याअनुषंगाने सदर कालावधी मध्ये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामधील कार्यारत DCH व DCHC रूग्णालयांची व ऑक्सिजन पुरवठा करणा-या उपकरणांची ऑक्सिजन सल्लागार (Oxygen Consultant) यांचे कडुन तपासणी सुरू केलेली आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिकेतर्फे कोविड-१९ बाधित रूग्णांच्या उपचाराकरीता खजगी DCHC रूग्णालयांना परवानगी देण्यात आली होती.त्याअनुषंगाने सदर रूग्णालयांमधील ऑक्सिजन उपकरणांची सुस्थितीमध्ये असलेबाबत श्री.गुरूप्रसाद गडकरी, मे. वायु सोल्युशन, सल्लागार (Oxygen Consultant) यांचे कडुन पडताळणी करणे करीता आदेशित करण्यात आले होते. सदर सर्व रूग्णालयांची श्री. गुरूप्रसाद गडकरी, मे.वायु सोल्युशन, सल्लागार (Oxygen Consultant) यांचे कडुन नियमितपणे पडताळणी करण्यात येत आहे.

तसेच श्री.गुरूप्रसाद गडकरी, मे.वायु सोल्युशन, सल्लागार (Oxygen Consultatian) यांची मुदत माहे ३१ डिसेंबर, २०२० मध्ये संपत आहे. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिकेतर्फे नव्याने २ DCH रूग्णालय शांतीनगर, शहिद अरूणकुमार वैद्य (टाऊन हॉल) व १ DCHC रूग्णालय रेडक्रॉस रूग्णालय येथे सुरू करण्यात येणार असल्यामुळे तसेच इतर कोविड-१९ करीता कार्यरत रूग्णालये सदर ठिकाणच्या ऑक्सिजन पुरवठया विषयी सल्लागाराची (Oxygen Consultant) यांची आवश्यकता लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच संभाव्य कोवीड-१९ च्या दुस-या लाटेचा धोका लक्षात घेता उपरोक्त कामाकरीता ऑक्सिजन सल्लागार(Oxygen Consultant) यांची आवश्यकता वाटते.

सबब वरील सर्व परिस्थिती लक्षात घेता श्री.गुरूप्रसाद गडकरी, मे. वायु सोल्युशन, सल्लागार(Oxygen Consultant) यांना एक दिवसांचा खंड देवुन दि. ०२/०१/२०२१ ते ३१/०३/२०२१ पुढील कालावधीत साठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरचा खर्च हा सन. २०२०-२०२१ मधील विपरीत परिस्थिती व्यवस्थापन B-२(३) या लेखाशिर्षातून किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधितून करणे प्रस्तावित आहे. सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती यांचे माहितीस्तव सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र.५८ दिनांक : २६/०३/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारउल्हासनगर महानगरपालिका तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपायायोजना करण्याकरिता ऑक्सिजन सल्लागाराची (Oxygen onsultant) मानधन तत्वावर नियुक्तीस मुदतवाढ देणेबाबतच्या प्रस्तावाची माहिती नोंद करीत आहे.
या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते
सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ६ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.६**जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणू रोगाच्या प्रसार टाळण्यासाठी उल्हासनगर

महापालिकातर्फेप्रतिबंधात्मक उपाययोजना करणे व आवश्यक वैद्यकीय साहित्य Q Covid-१९ AG Detection Kit खरेदी करुन देयक अदाकरण्यात आले असुन मा. स्थायी समितीची माहितीसाठी सविनय सादर.

———————————————————————————————————————

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** पास..पास..

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री.विजय पाटील-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

☑विषय क्र. ६ :—जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणू रोगाच्या प्रसार टाळण्यासाठी उल्हासनगर महापालिका तर्फे प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे व आवश्यक वैद्यकीय साहित्य Q Covid-१९ AG Detection Kit खरेदी करुन देयक अदा करण्यात आले असुन मा.स्थायी समितीची माहितीसाठी सविनय सादर.

प्रस्तावना

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, ज्याअर्थी सध्या जगभरात पसरलेल्या करोना विषाणूची लागण झाली आहे. सदर रोगाच्या प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने करोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधनात्मक कायदा, १८९७ संदर्भ क्र. ०१ अन्वये दिनांक १४ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३ व ४ मधील तरतूदीनूसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महापालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम आहेत असे घोषित करण्यात आले आहे.

१. **महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ३१९ नुसार शहरात कोणत्याही वेळी कोणत्याही दुर्धर रोगांचा प्रार्दुभाव झाला असेल किंवा प्रादुर्भाव होण्याची भिती निर्माण झाली असेल अशा प्रसंगी किंवा कोणत्याही सांसर्गीक रोग उदभवला असेल किंवा शहरातील गुराढोरांमध्ये त्याचा प्रादुर्भाव होण्याचा संभव असेल अशा प्रसंगी अधिनियमाच्या आणि नियमाच्या किंवा त्या वेळा अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या सामान्य तरतुदी त्या प्रयोजनासाठी अपु-या आहेत असे आयुक्तास वाटेल तर त्यास राज्य शासनाच्या मंजूरीने नियमांत विनिर्दिष्ट करण्यात आले असतील असे आणि अशा रोगांच्या प्रार्दुभाव किंवा प्रसारास प्रतिबंध करणेसाठी त्या स आवश्यक वाटतील त्या उपाययोजना करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान केले आहेत.**

२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन अधिसुचना कोरोना २०२० प्र.क्र.५८/आरोग्य/५ दिनांक १४ मार्च २०२० मधिल मुददा क्र. १२ **मध्ये नमुद केल्याप्रमाणे या नियमावलीची अमंलबजावणी करणा-या प्राधिकृत अधिका-याविरुद्ध कोव्हीड १९ चा प्रार्दुभाव रोखण्यासाठी सदभावनेने केलेल्या किंवा करण्यात येणा-या कृती बद्दल अंमलबजावणीच्या अनुषंगाने अन्यथा दोषी नाहीत तो पर्यत कोणताही कार्यवाही अथवा गुन्हा दाखल करता येणार नाही. तसेच नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील प्रकरण ९ कलम ५० अ मध्ये खालिल प्रमाणे विहीत करण्यात आलेले आहे.**

**" Emergency Procurment & Accounting - Whether by reason of any threatening disaster situation or disaster, the National authority or the state authority or the district authority is satisfied that immediate procurement of provisions or materials or the immediate application of resources are necessary for rescue or relief -**

**(a) it may authorize the concerned department or authority to make the emergency procurement and in such case, the standard procedure requiring inviting of tenders shall be deemed to be waived ; "**

३. **या अधिकारा नुसार उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) चा प्रार्दुभाव रोखणेसाठी आवश्यकता असलेले साहीत्य जी.ई.एम पोर्टलवरुन किंवा इ** निविदा पदधतीने खरेदी केली असता सदर साहीत्य प्राप्त होण्यासाठी कालावधी जास्त लागू शकतो ही शक्यता नाकारता येत नाही.

४. महाराष्ट्र शासन उद्योग उुर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रं.भांखस-२०१४/प्र.क्र/८२भाग-३/उद्योग - दिनांक १/१२/२०१६ मधील परिच्छेद ३.२.१ नुसार सदर खरेदी ३ लाखांपेक्षा जास्त किंमतीची असल्याने ई-निविदा करण्याचे सुचित केलेले आहे. परंतू सदर खरेदी ही आपत्कालीन परीस्थितीशी निगडीत असल्याने नैसर्गिक आपत्तीच्या काळात या शासन निर्णयातील परिच्छेद ३.३.१ खालिल प्रमाणे विहीत करण्यात आलेले आहे.

**" खरेदी अधिका-याने नैसर्गीक आपत्ती आणि माहीती/माणसे/मालमत्ता यांची मोठया प्रमाणात झालेली हानी, ज्यामुळे विभागाचे कामकाज बंद पडते अशा परीस्थीतीचे वर्गीकरण आपत्कालीन परीस्थीती म्हणुन करावे. तातडीच्या आदेशाव्दारे खरेदी, फक्त आपत्कालीन परीस्थीती उदभवेल तेव्हा आणि जेव्हा गरजेची पुर्तता नेहमीच्या खरेदी कार्यपध्दतीतुन होउ शकणार नाही, अशा वेळी करावी.अशी खरेदी अकल्पित किंवा अनपेक्षीत अशा परीस्थतीचा परीणाम म्हणुन करण्यात यावी. तथापी अपुरे नियोजन, दुर्लक्षित आवश्यकता, मागील माहीतीचा चुकीचा वापर/अनुमानाचा अभाव, या कारणामुळे उदभवलेल्या परीस्थीतीत तातडीच्या आदेशाव्दारे खरेदीचे समर्थन करणे फार अवघड होईल."**

५.सध्या कोरोना विषाणूचा वाढता प्रादुभाव पाहता रोज १५० ते २०० कोरोना बाधीत रुग्ण आढळून येत आहेत त्यामुळे प्रार्दुभाव रोखणेसाठी तसेच हाय रिस्क कॉन्टॅक्ट टेसिंग करणे आवश्यक आहे. तथापी वरील परिस्थिती विचारात घेता या विपरीत परीस्थिती मध्ये कोव्हीड विषाणूचा प्रार्दुभाव रोखणे व नागरीकांचे आरोग्य व सामाजिक हीत यासाठी साहित्य खरेदी करणे अत्यंत आवश्यक आहे.

त्याकरीता शासनानी ठरवुन दिलेली विहीत पद्धत जसे की, जी.ई.एम/ई निविदा पद्धतीने खरेदी प्रक्रिया केल्यास बराच कालावधी उलटण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापी महाराष्ट्र शासन उद्योग उुर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रं.भांखस-२०१४/प्र.क्र/८२भाग-३/उद्योग -४ दिनांक १/१२/२०१६ मधील परिच्छेद ३.३.१ नुसार विहीत पदधतीचा वापर न करता तातडीच्या आदेशाव्दारे खरेदी, फक्त आपत्कालीन परीस्थिती उदभवेल तेव्हा आणि जेव्हा गरजेची पूर्तता नेहमीच्या खरेदी कार्यपदधतीमधुन होउु शकणार नाही अशावेळी करावी. सदर खरेदी अकल्पित किंवा अनपेक्षित (ExtraOrdinary unforeseen circumstances) अशा परीस्थितीचा परीणाम म्हणून तातडीने करणे अपेक्षीत आहे.

**१. महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ५ नियम २(२) अन्वये कोरोना या संसर्गजन्य आजाराची लागण उल्हासनगर महापालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांना होवू नये म्हणून स्थायी समिति विषय क्रमांक ५ ठराव क्रमांक ६५ दिनांक १८/०३/२०२० रोजीच्या ठरावानुसार कोव्हीड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी वैद्यकिय व इतर बाबींची उपलब्धता तातडीने होणेसाठी शासन निर्देशानुसार किंवा इतर आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यासाठी साहीत्य, वस्तु, औषधे व अनुषंगीक बाबी निविदेशिवाय थेट खरेदी करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड मधिल प्रकरण ५ (२)(२) अंतर्गत आयुक्तांना प्राधिकृत करण्यात आले आहे.**

**वरील सर्व पार्श्वभुमीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून कोवीड-१९ तातडीची बाब म्हणून खालील साहीत्याची खरेदी करणे आवश्यक आहे.**

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १ | Q Covid -१९ A G Detection Kit | ४९५० |

**उल्हासनगर महानरगपालिका क्षेत्रामध्ये कोरोना आजाराने पिडीत नागरीकांवर उपचार करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत Q Covid-१९ AG Detection kit खरेदी आवश्यक आहे.वरील संदर्भीय ५ नुसार क्रमांक कोरोना -२०२०/प्र.क्र.१७३/ आरोग्य -५ दि. २२ जुन २०२० रोजीचा शासन निर्णय कोविड-१९ बाधेसाठी सद्य:स्थितीत आर.टी.पी.सी.आर ही एकमेव निदान चाचणी आहे या चाचाणीसाठी आर.टी.पी.सी.आर मशीनरी/टुर्नेट/सी.बी.नॅट यांच्याद्वारे चाचाण्या केल्या जातात आर.टी.पी.सी.आर.चाचणीसाठी लागणारा वेळ तसेच सी.बी.नॅटव्दारे तपासणीसाठी एका वेळी केवळ एक वे चार मर्यादेत होणा-या तपासण्या तसेच कार्टीज ची अनुपलब्धता व जास्तीची किंमत ही या चाचाण्यांबाबची उणे बाजु आहे. कोविड बाधेची निश्चित लवकरात लवकर होण्यासाठी अनेक प्रयोगशाळांमध्ये संशाधन सुरु आहे. आता आय.सी.एम.आर ने तपासणीअंती Standard Q Covid-१९ Ag Detection Kit द्वारे SARS-COV-२ चे अॅन्टीजेन निदान होत असल्याचे खतरजमा केलेली आहे.या टेस्टमुळे निगेटिव्ह निदान करण्याचे प्रमाण ९९.३ ते १०० टक्के आहे. तर पॉझीटिव्ह निदान चे प्रमाण ५०.६ मे ८४ टक्के रुग्णाच्या शरीरातील व्हायरल लोड नुसार आहे. त्यामुळे अत्यंत तातडीच्या प्रसंगी ही किट वापरुन निदान करता येणे शक्य असल्याने कोविड-१९ साठी रॅपिड अॅन्टीजेन टेस्ट करण्यास आय.सी.एम.आर सह ऑल इंडीया इन्स्टीटयुट ऑफ मेडीकल सायन्सनेही तपासणीअंती SD Biosensor या एकमेव कंपनीच्या Standard Q Covid-१९ Ag Detection Kit ला मान्यता दिलेली आहे असे कळविण्यात आलेले आहे.**

**"M/S SD Biosensor" या कंपनीचे Q Covid-१९ Ag Detection Kit Rate per Test Rs ४५०/- शासन निर्णय प्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहेत."**

| Sr. No. | Name Of Comsumbles | Mode Of Purchase | Total Kits | Rate in Rs. | Qty Of Test | Total Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Q Covid-१९ AG Detection Kit | 67(3) C | 198 kits | 450/- Per Test | 4950/- | 22,27,500/- |
| GST 12% | | | | | | 2,67300/- |
| Grand Total | | | | | | 24,98,800/- |

त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दैंनदिन वाढणा-या कोविड-१९ ची रुग्णसंख्या विचारात घेवुन व भविष्यामध्ये वाढणा-या रुग्णसंख्या यांचा अंदाज ठरवुन तात्काळ कोविड-१९ च्या रुग्णांकरिता प्रभावी ठरत असलेले **Q Covid-१९ Ag Detection Kit संदर्भिय शासन निर्णयनुसार M/S SD Biosensor या कंपनी कडुन वरील प्रमाणे खरेदी करणे करीता** रु 24,94,800/- (चोबीस लाख चौ-याण्णवे हजार आठशे रुपये मात्र) एवढा खर्च सन. २०२०-२०२१ मधील विपरीत परिस्थिती व्यवस्थापन B-२ (३) या लेखाशिर्षातून किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधितून करणे प्रस्तावित आहे.तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती यांचे माहितीस्तव साविनय सादर.

स्थायी समिति ठराव क्र.५९दिनांक : २६/०३/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारजगभरात पसरलेल्या कोरोना विषाणू रोगाच्या प्रसार टाळण्यासाठी उल्हासनगर महापालिका तर्फे प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे व आवश्यक वैद्यकीय साहित्य Q Covid-१९ AG Detection Kit खरेदी करुन देयक अदा करणेस रु 24,94,800/- (चोबीस लाख चौ-याण्णवे हजार आठशे रुपये मात्र) एवढा खर्च आले असुन माहिती ची नोद करीत आहे.

सुचकाचीसही / —

अनुमोदकाचीसही / —

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ७ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.७**स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत सर्वेक्षण- २०२१ अन्वये उल्हासनगर शहरातील नागरीकांमध्ये स्वच्छते बाबत जनजागृती करण्यासाठी साहित्य पुरवठा करुन घेण्यासाठी मे. राहुल एंटरप्रायझेस, उल्हासनगर यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणेबाबत..

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:- माहिती नोंद तर करणार पण या विषयी कोण सांगणार?अधिकारी कोण आहेत?हे हस्त पत्रक कोणला मिळालेले नाहीत. ७८ हजार हस्तपत्रक कोणत्याही नगरसेवकाला मिळालेले नाहीत.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** कोण आहे?कोणाला हस्त पत्रक मिळाले आहेत आणि कोणत्याटॉलेटला पेंटीग करण्यात आलेले आहे. तसेच कोणत्या शौचालयावर(टॉयलेट) पेंटींग करण्यात आली आहे. गोषवा-यामध्ये तर भरपूर काही लिहिलेले आहे याची माहिती देण्यात यावी, कृपा करा.त्यांना आपण १२ लाख रुपये देत आहोत, किती देत आहेत?आपल्याला माहीती झाली पाहीजे की, यांनी कोणाला दिले आहे?काय केले आहे?

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनीष हिवरे:-**सन्मानीय सदस्यांनी विचारणाकेलेली, अँगल अडवरटाझींग पूणे, यांनी ८३ टक्यांपेक्षा कमी दराने सदरची निविदा भरलेली होती.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:- माननीय अधिकारीजी, ते आम्ही सगळे वाचले आहे, जे आपण गोषवा-यामध्ये लिहिलेले आहे ते आम्ही विचारत नाही की सगळयात कमी दर असणा-यास दिलेले आहे. आपल्या आदरणीय अतिरिक्त आयुक्त मॅडम, कमी दर वाल्यांना नकार देत असतात. बोलतात की १५ टक्यापेक्षा कमी असेल त्यांना काम देणार नाही.आपण किती टक्यांनी बीलो प्रमाणे काम दिलेले आहे?हे किती कमी दर आहे?
**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनीष हिवरे:-** हे २८टक्के दर आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:- माननीय अतिरिक्त आयुक्त महोदया, या शहरासाठी आपला एक चांगला विचार महाराष्ट्रासाठी आपण दिलेला आहेकी जो कमी दर वाले ठेकेदार आहेत ते बरोबर कामे करीत नाहीआणि अशा भरपूर निविदा रदद करुन फेरसादर करण्यासाठी सागितले आहे. तर हे २८ टक्के बीलो काम आले आहे, यामध्ये लिहीले आहे, मला तर शहरामध्ये एक पण काम निदर्शनास आले नाही.यामध्ये लिहीले आहे की, भिंतीवरपेंटींग, पहीले काम आहे, पॅनल निहाय हस्तपत्रके दोन्ही बाजूने ७८ नगरसेवकांना हजार, हजार देण्याचे आहे.एका पण नगरसेवकाला हस्तपत्रक मिळाले आहे का?

सदस्य, श्री. राजू जग्यासी:— आम्हाला तर मिळालेले नाही.

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:— भिंतीवर पेंटींग केलेली कुठे दिसण्यात आली नाही त्यानंतर शासनाव्दारे जनजागुती स्वच्छ सर्वेक्षण २०२१ होर्डिंग लोंखंडी असे काहीच निदर्शनास आलेले नाही. शौचालय संदेश, माझे वार्डामध्ये ८ सीट, १० सीटर एकूण २० शौचालये आहेत. एकाही शैचालयावरती स्वच्छतेबाबतचा संदेश नाही आहे. २०

शैचालयाचे फोटो माझेकडे आहेत तसेच दिवाळाचे सुध्दा फोटो आहेत. तर हा स्वच्छतेचा संदेश कुठे गेला आणि त्यानंतर स्वच्छतेबाबतचे एक गाण लिहिलेले आहे. हे तर आम्ही अजून ऐकलेलेच नाही. आज स्थायी समिती सभेमध्ये स्वच्छतेबाबतचे गाणं तर ऐकवण्यात यावे. कुठे गेले ते गाण. आणि असेच माहितीसाठी सादर. १२लाख रूपये २८ टक्के बिलो काम. मा. अति. आयुक्त महोदया २८ टक्क्यांनी बिलो काम कसे काय मंजूर केले. जर आपण १५ टक्के पेक्षा जास्त देत नाहीत.

<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u> मा. सभापती, मा. सर्व सभागुह, सदरची निविदा ही काढलेली होती ही स्वच्छतेचे सर्वेक्षण २०२०—२१ साठी काढली होती. आणि सदरचे काम हे शासनाशी निगडीत असल्यामुळे विहित मुदतीत ते काम करणे आवश्यक होते त्यामुळे कमिटीने जे बिलो २८ टक्के आलेले होते त्यांचेसाठी आपण हे न्युनतम दर असल्याने त्यांना हे काम दिले होते. सदरचे कामामध्ये ज्या ज्या ठिकाणी आवश्यकता होती त्या त्या ठिकाणीच भिंतींना कलर केलेले आहे पेंटींग कलेले आहे, तसेच….

<u>सदस्य,श्री.राजू जग्यासी:—</u> आवश्यक आहे हे कोणी सुचवायचे.

<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>आवश्यक हे आम्ही आपल्या स्वच्छता निरिक्षक आहेत त्यांना सांगण्यात आले की प्रत्येक पॅनलमध्ये ज्या ठिकाणी चौक आहेत किंवा असे ठिकाण ज्या ठिकाणी जास्तीत जास्त लोकांच्या दुष्टीस पडतील त्या भागातील भिंतीवरती कलरींग करावे.

<u>सदस्य,श्री.राजू जग्यासी:—</u> एकूण किती स्केअर मिटर काम करायचे होते?

<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u> एकूण २० हजार फुटाचे काम होते,

<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:—</u> २० हजार फुट.

<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>माफ करा. २५ हजार स्केअर फुट. जवळजवळ प्रत्येक पॅनल मध्ये आम्ही-पत्येक पॅनल १००० हजार स्केअर फुट काम केलेले आहे.

<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:—</u> प्रत्येक पॅनलमध्ये

<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>होय प्रत्येक पॅनलमध्ये.

<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:—</u> आम्ही या ठिकाणी ८ ते १० सदस्य बसलेले आहेत. कृपया करून सांगावे कोणचे पॅनलमध्ये झालेले आहे.

<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>समजा एका पॅनलमध्ये चार नगरसेवक आहेत, तर त्यांच्या पॅनलमध्ये १००० स्केअर फुट.

<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:—</u>म्हणजे आता आम्ही इथे १० नगरसेवक बसले आहेत, तर प्रत्येकाच्या पॅनलमध्ये १०००, १००० फुटाचे काम झाले असेल ना.

<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>होय सर.

<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:—</u>सर्व सदस्य सहमत आहेत का?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> पहीले जो ठेकेदार होता, प्रत्येक नगरसेवकांना विचारून कुठे पेटींग करायची आहे, शौचालय कुठे आहे? कुठे मॅसेज दयायचे आहे आणि तिथे जाऊन करून आले असते आणि शहरामध्ये तीन वर्षापासून स्वच्छतेचे मॅसेज दिसत होते. हे अचानक २८ टक्के कमी काम दिले आहे. काहीच दिसत नाही.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u> लोकांना माहीती पण नाही.

<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>या वर्षाची अवेरनेसमध्ये मागच्या वेळेची जी कॉन्टीटी होती, त्याच्या आर्धे कॉन्टीटी केली आहे आणि २० हजार स्केअर फुट…

<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:—</u>नगरसेवकांच्या पॅनलमध्ये झाले नाही, ते इथे बसले आहेत.ज्यांच्या इथे झाले आहे, त्यांनी कृपया करून सांगा.

<u>सदस्या,श्रीम. कांचन अमर लुंड:—</u> माझे पॅनलमध्ये झालेले आहे.

<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u> पेमेंट करण्याच्या वेळी सर्व स्वच्छता निरिक्षकाकडून ज्या ज्या ठिकाणीझाले आहे...

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—</u>झींगल सॉग कुठे आहे? जरा ऐकविण्यात यावे.

<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>झींगल सॉग हे जे सॉग आहे हे आगोदरच फेसबुक वरती टाकलेले आहे. उल्हासनगर महानगरपालिका...

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—</u> आज या ठिकाणी आम्हाला हे सॉग ऐकवा. मोबाईलवर चालू करून.

<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u> उल्हासनगर म्युन्सीपल कॉरपोरेशन फेसबुकावरती आपण गेलात तर त्या त्याठिकाणी दोन झींगल सॉग आपल्याला दिसतील.

<u>सदस्य,श्री राजू जग्यासी:—</u> हॅडबील किती छापलेले आहेत?

<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u> हॅडबील तर एक ऐजन्सी होती त्यांचे दर खूप कमी होते. ते जस्टीफाय मध्ये ते करू शकणार नाहीत असे लिहिलेले होते. त्यामुळे हॅड बील यावेळी आम्ही छापलेले नाही आहेत.

<u>सदस्य,श्री.राजू जग्यासी:—</u> १२ लाखामध्ये हॅडबील नाही आहेत.

<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u> नाही.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—</u> त्यांचेवरती काय कारवाई केली? आज जर मला पूर्ण शहरामध्ये संदेश दयायचा असेल, हॅडबील वाटायचे असतील, तसेच लोकामध्ये जनजागुती कारायची असेल, तीन महिने पहिले आपण टेंउर काढले आणि कोणी एका ठेकेदाराने बीलो काम टाकले आणि त्यांनंतर तो कामच करत नाही. आता आपण सांगितले की ते काम करत नाही.तर त्याचयावर काय करवाई? म्हणेजेच दुसरा टेंडर रिकॉल केला नाही, दुस—या कोणाला टेंडर दिले नाही. किंवा अशीच वर्क ऑर्डर दिली असती रू.५० हजाराची किंवा १ लाखाची की हॅडबील बनवा. हॅडबील साठी किती खर्च होईल, २लाख रूपये, किंवा मॅनयअली टेंडर काढायलापाहिजे होता सात दिवसामध्ये तो आला असता. परंतु आपण यासाठी काय केले,एका ठेकेदाराने कम बीलो दरामध्ये भरले आणि त्यांनी आवश्यक मालाचा पुरवठा केला नाही. आपण काय कारवाई केली ही कारवाई केली की हॅड बील वाटलेच नाही. आणि आपले शहर स्वच्छ भारत अभियानामध्ये आरदणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजीने प्रतियोगिता लावण्यात आलेली आहे. त्यामध्ये १०० च्या खाली स्थानावर आहे. कारण काय आहे तुम्ही हॅड बील वाटणार नाहीत. घरांघरामध्ये गेले नाही, हॅडबील वाटले नाही, लोकामध्ये जनजागुती केली नाही. तर लोकांमध्ये जागृती कशी निर्माण होणार. आण टेंडर सुध्दा काढला होता नरंतु ठेकेदाराने मालाचा पुरवठा केला नाही. आपण उत्तर दिले की टेंडर बीलो आले होते माल दिला नाही. सोडून दिले, ही कोणती पध्दत आहे. जर कोणताही कॉन्ट्क्टर बीलो टेंडर भरत असेल आणि तो काम करत नसेल त्याला संपुर्ण महाराष्ट्रामध्ये काळया यादी मध्ये टाका आणि सर्व महपालिकांमध्ये पाठवा की यांनी आपले १ ते २ लाखाचे इएमडी सोडून दिले,बिलो केले आणि महापालिके सोबत धोका दिलेला आहे. परंतु आपण काय करत आहात १५ टक्केपेक्षा कमीअसलेल्यांना रिकॉल करत आहात मा. महोदया आपण सांगा की २८ टक्के बीलो असणा—याला कसे काम दिले कमीत कमी याचा जरा खुलासा आपण करावा.

<u>सदस्य,श्री.राजू जग्यासी:—</u>मा. आयुक्त साहेब, अध्यक्षजी, केणे साहेब आपल्याला एक सुचना होती की हे जे २५ हजार स्केअर फुट एजेन्सीने काम केले आहे आपण थोडा वेळ घेवून पुढच्या मिटींग पर्यंत सर्व सदस्यांना आपण आम्हाला फक्त माहिती दया की कोण कोणते लोकेशन होते १००० मीटरची जागा आहे तर अशी २५ ठिकाणे असतील, ५०० ची असेल तर ५० जागा असतील, त्याची यादी जर आम्हाला दिली तर आम्हाला माहिती मिळेल कुठे कुठे २५ हजार स्केअर मिटर वर काम केलेले आहे.

<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u> सर्व सदस्यांना यादी दिली जाईल.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—</u>** ज्या शौचालय वरती डिजिटल संदेश कुठे कुठे आहे ते बॅरेक नंबर प्रमाो, वार्डवाईज प्रमाणे देण्यात यावे. आपण २८ टक्के बीलो काम कसे दिले याचे उत्तर दयावे.

**<u>अतिरिक्त आयुक्त, श्रीम. करूणा जुईकर:—</u>** मा. सभापती महोदय, सर्व सन्मानीय सदस्य, आपण जे मला एकटीला पॉईंट आउट करीत आहात त्याबददल माझा आक्षेप आहे, सगळयात महत्वाचे निविदा समितीमध्ये सदस्य आहेत आणि सगळयांनी मिळून घेंतलेले तो निर्णय आहे. त्यामुळे मी एकटीने जे निर्णय घेतला आहे असे जे आपण म्हणता त्याबददल मा. सभापती महोदय, ते माझे एकटीचे निर्णय नाही आहेत. २—फाईल वर जे लिहिलेले आहे सर्व अकाउंट? ऑडीट, संबंधित विभागाचे उपायुक्त, उपायुक्त मुख्यालय, आण मी अशी मिळून ती कमिटी आहे. ज्या प्राप्त परिस्थिती विभागाने सादर केलेल होते, त्यानुसार नंबर दोन जो बीलो आपण बोलता तर तो शासन निर्णय बोलतो मी स्वत: बोलत नाही किंवा कमिटी बोलत नाही. नंबर ३. ज्या पध्दतीमध्ये, ज्या वेळेत आरजेन्सी बघून संधित विभागाने पुट अप केले असावे त्याबददल विभागाने आपल्या फाईल वर जी कारवाई झालेली आहे,मा. आयुक्त महोदयांच्या मान्यतेने झालेली आहे त्यामुळे त्याबददल ते आपल्याला सबंधित विभाग प्रमुख सांगू शकतील.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—</u>**संबंधित विभागाने सांगांवे की बीलो मध्ये टेंडर आणला आणि हॅडबील तर आम्हाला मिळालेच नाही. हॅडबील किती टक्के बीलो होते हे जरा सांगा.आलाच नाही माणूस आणि भरून दिले. आज या टैंडरला तिन महिने झाले, हॅडबीलाचे कोणी नाही आले. बीलो भरून पळून गेला त्यासाठी आपण काय उपाययोजना केली. आज आम्हाला १०० झाडू पाहिजेत, प्रत्येक वार्ड मध्ये दोन दोन झााडू दयायचे आहेत. एकूण १६० झाडू ठेकेदार भरणार नाही म्हणून काय मागवणार नाही का? आज प्रत्येक घरा घरात हॅड बील वाटायचे आहेत आणि तिन महिने पहिले ठेकेदार आला आणि त्यांनी सांगितले की मी एक रूपयामध्ये एक हॅडबील देणार. आपल्याला अशी भुल देवून निघून गेला आणि परत माल घेवून आलाच नाही. तिन महिने होवून सुध्दा हॅडबील कुठून घ्यायचे वैगेरे यावर कारवाईच केली नाही. एक लाख, दोन लाखाच्या कामाने शहरामध्ये स्वच्छतेचा संदेश जात असतो की ओला कचरा वेगळा टाका, सुका कचरा वेगळा टाका, रस्त्यात कचरा फेकू नये. कुंडीतच कचरा टाकावा. स्वच्छ भारत अभियानामध्ये भाग का घेत आहात. भाग घेवू नका अशा ब—याचशा महापालिका भाग घेत नाही. त्यामुळे आपल्याला हार्डिंग लावा लागणार नाही त्यावरील होणारा खर्च वाचू शकतो.यामध्ये भाग घ्यावाच असे नाही ब—याचशा महानगरपालिका भाग घेत नसतील आणि ज्या महापालिका भाग घेतात त्या पहिल्या क्रमांकावर येत असतात आणि आपण शंभरमध्ये येतो का येतो तर आपले अधिकारी **लापरवाही** करत असतात. काय करतात की समजा २०० झााडू मागायचे आहेत, ठेकेदाराने सांगतले की मी एक रूप्याला देतो चलो ठिक आहे. ठेकेदार या वर्षी नाही आला तर दुस—या वर्षी देणार तो पर्यंत मागवणारच नाही. जर मला माझया घरात मला झाडू घ्यायचा आहे, झाडू ५० रूपयाला मिळत असेल मी बाजारामध्ये दोन दुकामध्ये झाडूचे दर विचारणार, कोणी ४५ रूपयाला देईल जर नाही दिला तर मी ५० रूपये किमतीचा झाडू विकत घेतो. मी असे नाही बोलू शकत की मी एक वर्ष घरात झाडूच लावणार नाही. हे काय आहे. शासनाने आणि प्रशासनानेचे काम बघून मा. महापौजी.

**<u>सभापती, श्री. विजय चाहू पाटील:—</u>** जमनुजीं यांच्या विषयाकडे प्रशासनाने पूर्ण लक्ष देवून त्याच्यावर त्यांना पुढच्या सभे मध्ये पूर्ण माहिती त्यांना देण्यात यावी.सर्व सभागृहाला देण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री.राजेश वदारिया:—</u>**मा. सभापतीजी आपला मी आभारी आहे मला बोलायला संधी दिली. माझे ही काही प्रश्न आहेत आपण A4 साईजच्या कागदावर छपाई केली तर A4 साईजच्या कागदाची थिकनेस/जाडी काय आहे? पेपरची थिकनेस **जी.एस.एम**.पासून मानली जाते. सगळयांना माहीती असेल, कोणती थिकनेस होती?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**राजेश जी आपल्या लक्षात नाही आले की मी काय बोललो.ते बोलेले आणलेस नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u>** माझे बोलणे तुम्ही ऐकतच नाही. अर्ध्यातच बोलत असतात. ज्या वेळेस आपण हा टेंडर कॉल केला. त्यामध्ये आपण जी.एस.एम. दिला नाही.त्याने माला पुरवठा केला नाही म्हणून नाहीतर जर त्याने A4 साईज चा कागद पुरवला असता. आणि त्यानी पुढे असे म्हटले असते की साहेब आपण तर A4 लिहिलेले आहे. त्या कागदाची जाडी किती पाहिजे हे दिलेलेच नाही ना. आपण गुणवत्ता quality दिलेली नाही फक्त संख्या quantity दिलेली आहे. ही होर्डिंग

मिळाली आहे का. की ती पण हारवली आहे. सांगा ना. ठिक आहे. त्यानी आपल्याला फ्रेम दिलेली आहे का?

<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>दिलेले आहेत,

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u>दिलेले आहेत, केणे साहेब हां बोलत आहेत. ठिक आहे.

<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>शहरातील मुख्य, मुख्य चौकामध्ये प्रवेश गेट वरती होर्डिंग लावलेले आहेत. आणि **लॅट लॉग** वरती त्याची फोटोज काढलेले आहेत. जेवढया स्केअर फुटचे होर्डिंग लावलेले असतील तेवढेच पैसे त्यांना दिले जातील.त्यांचे **लॅट लॉग** वरती काढलेले फोटो बिलासोबत त्याचे फोटोज देणे अनिवार्य आहे.

<u>सभापती, श्री. विजय चाहू पाटील:—</u> एकाच विषयावरती चर्चा करणे, मी त्यांना सांगितले की, पुढच्या मिटींग मध्ये पूर्ण माहिती सभागृहाला देण्यात येईल.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u> मा. सभापतीजी, माझे प्रश्न यांच्या पेक्षा वेगळे आहेत.

<u>सभापती, श्री. विजय चाहू पाटील:—</u> सर्व प्रश्नाचे....

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u> सर्व प्रश्न म्हणेजे काय? प्रश्न मी विचारलेलेच नाही आहेत. तर त्यांना उत्तर कसे काय माहिती असेल. नाही विचारणार आता मी एक इंटरेस्टींग बोलत आहे.

<u>सभापती, श्री. विजय पाटील:—</u>आता या विषावरती बोलू नका, इंटरेस्टींग  नको, मुख्य विषयावरती बोला.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u> याच विषयावर बोलत आहे.

<u>सभापती, श्री.विजय चाहू पाटील:—</u> बोला.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u> उल्हासनगर महानगरपालिकाने ३० वर्षासाठी जेन्ट्री आणि साईन बोर्ड म्हणजे दिशाफलकाचे टेंडर बीओटी तत्तवावर दिलेले आहे. ब—याच वेळा मी स्थायी समिती मध्ये मी सांगितलेले आहे आणि त्यामधुन ५५ टक्के जागा ही आपली आहे, उल्हासनगर महानगरपालिके जवळ आहे. तर मग ही फ्रेम बनविण्याची काय आवश्यकता आहे? मला सांगू शकता? महानगरपालिकेच्या बाहेरच दिशा फलक लावलेला आहे त्यामध्ये ५५ टक्के जागा आपली आहे. तर दुसरी फ्रेम का बनवत आहात? हे काय कारभार चालला आहे. “आंधेरी नगरी चौपट राजा” फ्रेम त्यांनी लावली ती फ्रेम कुठे गेली? असे १० हजार फ्रेम लावले समजा १० हजार मला दिसतात. साहेब,कन्फर्म केले तर किती असतील? १०हजार स्केअर फुट, तर आता सुध्दा फ्रेम लावलेले आहेत की लावल्यानंतर परत ते उतारुन घेवून गेले. कारण की फ्रेम तर आपली मालमत्ता झाली ना ते खुलासा करणार. अजून एक वस्तुस्थिती दाखवत आहे. एक वर्षापूवी माझे कार्यालयाच्या बाहेर एक भिंत बनविण्यात आली. तर त्याच भिंतीवर २०२० हे वर्ष खोडून २०२१ असे केले. मी याचा फोटो आपणांस पाठवत आहे. मी सभापतीजी यांना, मा. अति. आयुक्त मॅडम यांना, केण जी आणि मनिषजी यांना फोटो पाठवत आहे. बघा २०२० हे खोढून २०२१ केले आहे. हा विषय थोडा वेगळा आहे दुसरे म्हणजे आयुक्त सोहेब आता नाही आहेत तरी मी त्यांना धन्यवाद देत आहे की मा. आयुक्त  यांनी कमीत कमी हा विषय माहीतीसाठी आणला आहे. या विषयाला आम्ही पेडींग ठेवू किंवा काय? तर हे सर्व आमचे आरोप आहेत त्याची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे.लवकरात लवकर काही नाही, त्यांना  वेळ निश्चित करून दया.एक महिन्याचा असेल, १५ दिवसांचा असेल किंवा १० दिवसांचा.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:</u> मा. सभापती जी, तो पर्यंतठेकेदाराचे बील थांबविणत यावे.जो पर्यंत आपण याचे उत्तर समाधानकारक देत नाही तसेच आरोग्य विभागातील अधिकारी समाधानकारक उत्तर मिळत नाही तो पर्यंत यांचे बील थांबविण्यात यावे.

<u>सदस्य,श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u> कॉन्ट्क्टरला याचे बील मिळाले का? हे तर पहिले विचारा.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u> नाहीतर असे व्हायला नको की याचे पैसे आगोदरच दिले गेलेत. साहेब आपण सांगा. आपण बोला साहेब, खटके साहेबांना माईक दया.

<u>लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके:—</u> सर, याचा पेमेंट अजून देण्यात आलेले नाही.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया</u>:— सध्या यांचा पेंमेट थंबविण्यात येवून याची संपूर्ण सविस्तर माहिती स्थायी सतिमी समोर आणावी.

<u>सभापती, श्री.विजय चाहू पाटील</u>:— याविषयी संपूर्ण सविस्तर माहिती जो पर्यंत देत नाहीत तो पर्यंत त्यांचे बील थांबवून ठेवावे.

<u>लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके</u>:— होय सर,

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया</u>:— माहिती अपूर्ण आणि चूकीची सादर केल्यामुळे प्रशासनाला परत पाठवत आहेत. पूर्ण माहितीसह परत सादर करावा, फेरसादर करावा.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

**<u>सभापती, श्री.विजय पाटील-</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

☑

**विषय क्र. ७** :—स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत सर्वेक्षण- २०२१ अन्वये उल्हासनगर शहरातील नागरीकांमध्ये स्वच्छते बाबत जनजागृती करण्यासाठी साहित्य पुरवठा करुन घेण्यासाठी मे. राहुल एंटरप्रायझस, उल्हासनगर यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

"स्वच्छ सर्वेक्षण २०२१" ची माहिती नागरिकांपर्यंत पोहचावी म्हणुन नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी खालिल नमुद साहित्य पुरवठा करुन घेण्याकरीता ई-निविदा प्रसिध्दीच्या प्रस्तावास दिनांक २७/१०/२०२० रोजी अन्वये प्रस्तावास मान्यता दिलेली होती. त्यानुसार सदर साहित्य पुरवठा करुन घेण्यासाठी ई-निविदा क्र. 2020-UMC-622144-1 अन्वये निविदा मागविण्यात आली होती.सदर निविदेचा पहिला लिफाफा (तांत्रिक) दिनांक १८/११/२०२० रोजी सायं.०५:०१ वा.ई-निविदा कक्षात उघडण्यात आला आहे.

ई-निविदा कक्षा मार्फत प्राप्त झालेल्या अहवालाअन्वये खालिल ६ निविदाकांराच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या.

१) मे. ए. एम. रामचंदानी, उल्हासनगर
२) मे. अँगल ॲडव्हटॉयझिंग, पुणे
३) मे. कुगण कन्स्ट्रक्शन, अंबरनाथ
४) मे. नवनिर्माण कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर
५) मे. ओम मनिष एंटरप्रायझेस, उल्हासनगर
६) मे. राहुल एंटरप्रायझस, उल्हासनगर

उक्त ६ ही निविदाकार यांनी निविदा भरतेवेळी निविदेतील अटि व शर्तीनुसार कागदपत्राची पुर्तता केली असल्याने सर्व ६ ही निविदाकारांचा (दुसरा लिफाफा) वित्तीय लिफाफा दिनांक ११/१२/२०२० रोजी सांयकाळी ०४:०० वाजता उघडण्यात आला. पात्र ६ ही निविदाकारांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

**<u>तुलनात्मक तक्ता</u>**

| अ.क्र | साहित्याचे नांव व त्यांचा तपशिल | आवश्यक मालाचा (परिमाण | मे. ए. एम. रामचंदानी, उल्हासनगर | मे. अँगल ॲडव्हटॉइजिंग, पुणे | मे. कुगण कन्स्ट्रक्शन, अंबरनाथ | मे. नवनिर्माण कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर | मे. ओम मनिष एंटरप्रायझेस, उल्हासनगर | मे. राहुल एंटरप्रायझस, उल्हासनगर | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पॅनल निहाय हस्तपत्रके दोन्ही बाजुने (Both side) छपाई करणे (A4 Paper size) हिंदी व मराठी भाषामध्ये पॅनल निहाय | ७८००० नग | २.४४० | **<u>१.०१०</u>** | ३.५०० | २.९०० | २.५२० | १.२४० | ७८,७८०/- |
| २ | भिंतीवर पेन्टींग (Wall painting) चित्र रंगवणे | २५००० स्के.फिट | ३६.०२० | २९.५०० | २९ | २३.४०० | २५.२०० | **<u>१९.४००</u>** | ४,८५,०००/- |
| ३ | शासनाद्वारे जनजागृती स्वच्छ सर्वेक्षण-२०२१ चा मजकुर प्रसिध्दीसाठी हॉर्डींग लोखंडी फ्रेमसह बसवूण देणे. | १०००० | ३९.०६० | ५६.६४० | ४८ | ४१.३०० | ४२.३०० | **<u>३२</u>** | ३,२०,०००/- |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | शौचालयांवर संदेश डीजीटल पेंट व इतर | ५००० चौ.फुट | १०२.९९० | ६८.४४० | ७८ | ६९.३०० | ७२ | **५२** | २,६०,०००/- |
| ५ | जींगल सॉग, ऑडीओ ॲण्ड व्हीडीओ, ३ मिनिटे (लिरीक्स,सिंगर, शुटींग, डबिंग इत्यादी) | प्रति सॉग (३ मिनिटे) एकुण १ क्लिप | १३८००० | २५३७०० | १२०००० | ९६३०० | ९९००० | **७००००** | ७०,०००/- |
| **एकुण खर्च** | | | | | | | | | **१२,१३,७८०/-** |

अ.क्र.१ वरील पॅनल निहाय हस्तपत्रके दोन्ही बाजुने (Both side) छपाई करणे (A4 Paper size) हिंदी व मराठी भाषेमध्येपॅनल निहाय पुरवठासाठी मे.अँगल ॲडव्हटॉइजिंग, पुणे यांनी सर्वात कमी दर अंदापत्रकीय दराच्या ८३ टक्क्यापेक्षा अधीक दराने कमी भरले होते. व अ.क्र. २ ते ५ वरील १) भिंतीवर पेन्टींग (Wall painting) चित्र रंगवणे, २) शासनाद्वारे जनजागृती स्वच्छ सर्वेक्षण-२०२१ चा मजकुर प्रसिध्दीसाठी हॉर्डींग लोखंडी फ्रेमसह बसवूण देणे, ३) शौचालयांवर संदेश डीजीटल पेंट व इतर, ४) जींगल सॉग, ऑडीओ ॲण्ड व्हीडीओ, ३ मिनिटे (लिरीक्स,सिंगर, शुटींग, डबिंग इत्यादी) साहित्य पुरवठासाठी मे. राहुल एंटरप्रायझस, उल्हासनगर यांनी सर्वात कमी दर अंदाजपत्रकीय दराच्या २८ टक्क्यापेक्षा अधीक दराने कमी भरले होते. म्हणजेच अ.क्र. १ ते ५ वर नमुद केलेले सर्व साहित्य त्यांच्या समोर दर्शविलेल्या परीमाणा नुसार खरेदीकरीता रुपये १२,१३,७८०/- (रुपये बारा लाख तेरा हजार सातशे ऐंन्शी मात्र.) ऐवढा खर्च अपेक्षित आहे. प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा ४१% पेक्षा जास्त दराने कमी होता.

अशा परिस्थितीत शासन निर्णय, क्रमांक : सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२, दिनांक २७/०९/२०१८ मध्ये पृष्ठ क्र. २६ पैकी १९ वर ४.६ वर सुचना निर्गमीत केल्यानुसार अंदाजपत्रकीय दराच्या १० टक्क्यापेक्षा अधीक दराने कमी असलेल्या निविदा प्राप्त झाल्यास त्यांच्या स्विकृती संदर्भात सुधारीत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत त्यानुसार जा.क्र.उमपा/आवि/स.सा.आ.अ./१६/२०२०, दिनांक २९/१२/२०२० रोजीच्या पत्राअन्वये मे. अँगल ॲडव्हटॉइजिंग, पुणे व जा.क्र.उमपा/आवि/स.सा.आ.अ./१७/२०२०, दिनांक २९/१२/२०२० रोजीच्या पत्राअन्वये मे. राहुल एंटरप्रायझेस, उल्हासनगर यांना दरांबाबत सविस्तर तपशीलासह (Justification of Rate) करीता दिनांक ३१/१२/२०२० रोजी सकाळी ११:०० वाजता निविदा समिती समोर उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार दिनांक ३१/१२/२०२० रोजी दोन्ही निविदाकार यांचे प्रतिनीधी मा.उप-आयुक्त (मुख्यालय) तथा निविदा समिती सदस्य यांच्या समोर उपस्थित राहुन सदर कामाबाबत लेखी पत्र सादर केले आहे. मेसर्स ॲगल ऍडव्हटायझिंग, पुणे यांनी दिलेल्या पत्रान्वये आम्ही रुपये १.०१/- प्रति नग या दरात हस्तपत्रके दोन्ही बाजुने (Both side) छपाई करणे (A4 Paper size) (हिंदी व मराठी) ७८००० नग छपाई करुन विभागाकडे पोहोचविण्याचे काम करण्यास तयार आहोत. परंतू अंदापत्रकीय दराच्या ८३ % अधीक दराने कमी भरले असल्याने (८३-१५=६८%X२=१३६%) या प्रमाणे रक्कम रुपये ६,३६,४८०/- Demand Draft परफॉर्मन्स सिक्युरीटीजमा करण्याबाबत विचार करु असे म्हणून असमर्थता दर्शविली आहे व मेसर्स राहुल एंटरप्रायजेस, उल्हासनगर यांनी नमुद केलेल्या तुलनात्मक तक्ता अन्वये २) भिंतीवर पेन्टींग (Wall painting) चित्र रंगवणे, ३) शासनाद्वारे जनजागृती स्वच्छ सर्वेक्षण-२०२१ चा मजकुर प्रसिध्दीसाठी हॉर्डींग लोखंडी फ्रेमसह बसवूण देणे, ४) शौचालयांवर संदेश डीजीटल पेंट व इतर, ५) जींगल सॉग, ऑडीओ ॲण्ड व्हीडीओ, ३ मिनिटे (लिरीक्स,सिंगर, शुटींग, डबिंग इत्यादी) साहित्य पुरवठासाठी सादर केलेले दर बाजारभावाप्रमाणे भरलेले आहेत. तसेच मी ना नफा ना तोटा या स्तरावर काम करण्यास तयार आहे. त्याकरीता सर्वात कमी दर अंदापत्रकीय दराच्या २८% अधीक दराने कमी भरले असल्याने (२८-१५=१३%X२=२६%) या प्रमाणे रक्कम रुपये ४,०९,५००/- Demand Draft परफॉर्मन्स सिक्युरीटीजमा करण्याबाबत तयारी दर्शविली आहे. त्यामुळे मा. आयुक्त यांनी मेसर्स राहुल एंटरप्रायजेस, उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्यास दिनांक २२/०१/२०२१ रोजी अन्वये सदर प्रस्तावास मान्यता दिली आहे.

त्याअन्वये मेसर्स राहुल एंटरप्रायजेस, उल्हासनगर यांच्याकडून अ.क्र. २ ते ५ वर नमुद केलेली कामे करुन घेण्याकरीता एकुण खर्च रुपये ११,३५०००/- (अक्षरी अकरा लाख पसत्तीस हजार मात्र) अपेक्षित असून मेसर्स राहुल एंटरप्रायजेस, उल्हासनगर यांच्याशी संविदा करुन त्यांना कार्यादेश देण्यात आला आहे.

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (ड) अन्वये मा.स्थायी समिती पटलावर माहितीस्तव सादर.

स्थायी समिती ठराव क्र.६०दिनांक : २६/०३/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत सर्वेक्षण- २०२१ अन्वये उल्हासनगर शहरातील नागरीकांमध्ये स्वच्छते बाबत जनजागृती करण्यासाठी साहित्य पुरवठा करुन घेण्यासाठी मे. राहुल एंटरप्रायझस, उल्हासनगर यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती अपुर्ण व चुकीची असल्यामुळे फेरसादर करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ८ वाचून दाखवितात.

———————————————————————————————————————————

**विषय क्र.८**आयसीएम सीआरऑलईंडियाइन्स्टीटयुटऑफमेडीकलसायन्सयांनीM/s SD Biosensor Healthcare Private Limited याएकमेवकंपनीच्या Standard Q Covid-१९ Ag Detection किटलामान्यतादिलेलीआहेत्यानुसारउल्हासनगरमहानगरपालिकेतर्फे ५००० Test (२०० Kit) Q Covid-१९ AG Dectection Kit महाष्ट्रशासन निर्णयानुसारसदरM/s SD Biosensorकंपनीयांचेकडुनखरेदीकरण्यातआलेल्या किटचाखर्चरक्कमरुपये २४,३६,०००/- हेदेयकअदाकरण्याबाबतमा. स्थायीसमिती यांचेमान्यतेसाठीसविनयसादर.

———————————————————————————————————————————

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— अति आवश्यक विषय आहे. पास. इतिवृत्ताची वाट न पाहता.

मेडिकल डॉक्टरचा आहे, डॉक्टरचे काम आम्ही थांबवत नाही.

महापालिका सचिव:— पास सर्व संमतीने.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—इतिवृत्ताची वाट न पहाता.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— विषय क्र. ९ सुध्दा या सारखाच आहे.

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री.विजय पाटील-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

विषय क्र. ८ :—**आय सी एम आर सह ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ मेडीकल सायन्सयांनी M/s SD Biosensor Healthcare Private Limited या एकमेव कंपनीच्या Standard Q Covid-१९ Ag Detection किटला मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उल्हासनगर महापालिकातर्फे ५००० Test (२०० kit) Q Covid-१९ AG Detection Kit महाराष्ट्रशासन निर्णयानुसार सदर M/s SD Biosensor कंपनी यांचे कडुन खरेदी करण्यात आलेल्या किटचा खर्च रक्कम रु.२४,३६,०००/- हे देयक अदा करण्याबाबत मा.स्थायी समिती यांचे मान्यतेसाठी सविनय सादर.**

प्रस्तावना

ज्याअर्थी सध्या जगभरात पसरलेल्या करोना विषाणूची लागण झाली आहे. सदर रोगाच्या प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने करोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधनात्मक कायदा, १८९७ संदर्भ क्र. ०१ अन्वये दिनांक १४ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३ व ४ मधील तरतूदीनूसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महापालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रार्दुभाव

रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम आहेत असे घोषित करण्यात आले आहे.

१. **महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ३११ नुसार शहरात कोणत्याही वेळी कोणत्याही दुर्धर रोगांचा प्रादुर्भाव झाला असेल किंवा प्रादुर्भाव होण्याची भिती निर्माण झाली असेल अशा प्रसंगी किंवा कोणत्याही सांसर्गीक रोग उदभवला असेल किंवा शहरातील गुराढोरांमध्ये त्याचा प्रादुर्भाव होण्याचा संभव असेल अशा प्रसंगी अधिनियमाच्या आणि नियमाच्या किंवा त्या वेळा अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या सामान्य तरतुदी त्या प्रयोजनासाठी अपु-या आहेत असे आयुक्तास वाटेल तर त्यास राज्य शासनाच्या मंजूरीने नियमांत विनिर्दिष्ट करण्यात आले असतील असे आणि अशा रोगांच्या प्रार्दुभाव किंवा प्रसारास प्रतिबंध करणेसाठी त्या स आवश्यक वाटतील त्या उपाययोजना करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान केले आहेत.**

२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन अधिसुचना कोरोना २०२० प्र.क्र.५८/आरोग्य/५ दिनांक १४ मार्च २०२० मधिल मुददा क्र. १२ **मध्ये नमुद केल्याप्रमाणे या नियमावलीची अमंलबजावणी करणा-या प्राधिकृत अधिका-याविरुद्ध कोव्हीड १९ चा प्रार्दुभाव रोखण्यासाठी सदभावनेने केलेल्या किंवा करण्यात येणा-या कृती बद्दल अंमलबजावणीच्या अनुषंगाने अन्यथा दोषी नाहीत तो पर्यत कोणताही कार्यवाही अथवा गून्हा दाखल करता येणार नाही. तसेच नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील प्रकरण ९ कलम ५० अ मध्ये खालिल प्रमाणे विहीत करण्यात आलेले आहे.**

" Emergency Procurement & Accounting – Whether by reason of any threatening disaster situation or disaster, the National authority or the state authority or the district authority is satisfied that immediate procurement of provisions or materials or the immediate application of resources are necessary for rescue or relief –
(a) it may authorize the concerned department or authority to make the emergency procurement and in such case, the standard procedure requiring inviting of tenders shall be deemed to be waived ; "

**३. या अधिकारा नुसार उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) चा प्रार्दुभाव रोखणेसाठी आवश्यकता असलेले साहीत्यजी.ई.एम पोर्टलवरुन किंवा इ** निविदा पदधतीने खरेदी केली असता सदर साहीत्य प्राप्त होण्यासाठी कालावधी जास्त लागू शकतोही शक्यता नाकारता येत नाही.

४. महाराष्ट्र शासन उद्योग उुर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रं.भांखस-२०१४/प्र.क्र/८२भाग-३/उद्योग - दिनांक १/१२/२०१६ मधील परिच्छेद ३.२.१ नुसार सदर खरेदी३ लाखांपेक्षा जास्त किंमतीची असल्याने ई-निविदा करण्याचे सुचित केलेले आहे. परंतू सदर खरेदी ही आपत्कालीन परीस्थितीशी निगडीत असल्याने नैसर्गिक आपत्तीच्या काळात या शासन निर्णयातील परिच्छेद ३.३.१ खालिल प्रमाणे विहीत करण्यात आलेले आहे.

**" खरेदी अधिका-याने नैसर्गीक आपत्ती आणि माहीती/माणसे/मालमत्ता यांची मोठया प्रमाणात झालेली हानी, ज्यामुळे विभागाचे कामकाज बंद पडते अशा परीस्थीतीचे वर्गीकरण आपत्कालीन परीस्थीती म्हणुन करावे. तातडीच्या आदेशाव्दारे खरेदी, फक्त आपत्कालीन परीस्थीती उदभवेल तेव्हा आणि जेव्हा गरजेची पुर्तता नेहमीच्या खरेदी कार्यपध्दतीतुन होउ शकणार नाही, अशा वेळी करावी.अशी खरेदी अकल्पित किंवा अनपेक्षीत अशा परीस्थतीचा परीणाम म्हणुन करण्यात यावी. तथापी अपुरे नियोजन, दुर्लक्षित आवश्यकता, मागील माहीतीचा चुकीचा वापर/अनुमानाचा अभाव, या कारणामुळे उदभवलेल्या परीस्थीतीत तातडीच्या आदेशाव्दारे खरेदीचे समर्थन करणे फार अवघड होईल."**

५. सध्या कोरोना विषाणूचा वाढता प्रादुभाव पाहता रोज १५० ते २०० कोरोना बाधीत रुग्ण आढळून येत आहेत त्यामुळे प्रार्दुभाव रोखणेसाठी तसेच हाय रिस्क कॉन्टॅक्ट टेसिंग करणे आवश्यक आहे. तथापी वरील परिस्थिती विचारात

घेता या विपरीत परीस्थिती मध्ये कोव्हीड विषाणूचा प्रार्दुभाव रोखणे व नागरीकांचे आरोग्य व सामाजिक हीत यासाठी साहित्य खरेदी करणे अत्यंत आवश्यक आहे.

त्याकरीता शासनानी ठरवुन दिलेली विहीत पद्धत जसे की, जी.ई.एम/ई निविदा पद्धतीने खरेदी प्रक्रिया केल्यास बराच कालावधी उलटण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापी महाराष्ट्र शासन उद्योग उुर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रं.भांखस-२०१४/प्र.क्र/८२भाग-३/उद्योग -४ दिनांक १/१२/२०१६ मधील परिच्छेद ३.३.१ नुसार विहीत पदधतीचा वापर न करता तातडीच्या आदेशाव्दारे खरेदी, फक्त आपत्कालीन परीस्थिती उदभवेल तेव्हा आणि जेव्हा गरजेची पूर्तता नेहमीच्या खरेदी कार्यपदधतीमधुन होउु शकणार नाही अशावेळी करावी. सदर खरेदी अकल्पित किंवा अनपेक्षित (ExtraOrdinary unforeseen circumstances) अशा परीस्थितीचा परीणाम म्हणून तातडीने करणे अपेक्षीत आहे.

६. महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ५ नियम २(२) अन्वये कोरोना या संसर्गजन्य आजाराची लागण उल्हासनगर महापालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांना होवू नये म्हणून स्थायी समिती विषय क्रमांक ५ ठराव क्रमांक ६५ दिनांक १८/०३/२०२० रोजीच्या ठरावानुसार कोव्हीड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी वैद्यकिय व इतर बाबींची उपलब्धता तातडीने होणेसाठी शासन निर्देशानुसार किंवा इतर आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यासाठी साहीत्य, वस्तु, औषधे व अनुषंगीक बाबी निविदेशिवाय थेट खरेदी करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड मधिल प्रकरण ५ (२)(२) अंतर्गत आयुक्तांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

वरील सर्व पार्श्वभुमीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून कोविड-१९ तातडीची बाब म्हणून खालील साहीत्याची खरेदी करणे आवश्यक आहे.

| Sr. No. | Name Of Comsumbles | Mode Of Purchase | Total Kits | Rate in Rs. | Qty Of Test | Total Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Q Covid-१९ AG Detection Kit | 67(3) C | 200 kits | 435/- Per Test | 5000/- | 21,75,000/- |
| GST 12% | | | | | | 2,61,000/- |
| Grand Total | | | | | | 24,36,000/- |

७. तसेच **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम** ६७ (३) 'क' मध्ये नमूद केलेप्रमाणे कोणत्याही आणी बाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुस-या एखादया नगरपालिका प्राधिका-याच्या किंवा १(राज्य) शासनाच्या मंजूरी, मान्यता किंवा प्राधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहीजे असे नमूद आहे.

८. महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ५ नियम २(२) अन्वये कोरोना या संसर्गजन्य आजाराची लागण उल्हासनगर महापालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांना होवू नये म्हणून स्थायी समिती विषय क्रमांक ५ ठराव क्रमांक ६५ दिनांक १८/०३/२०२० रोजीच्या ठरावानुसार, या आजाराचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करण्यात येतील त्या करण्याचे संपूर्ण अधिकार मा.आयुक्त यांना दिलेले असल्याने सदरची खरेदी करीता ठरावाप्रमाणे व वर नमूद केलेल्या दिनांक १/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ३.३.१ प्रमाणे मान्यता देण्यात यावी.

तरी वरील SD BIOSENSER HEALTHCARE PRIVATE LIMITED. यांना रॅपिड ॲन्टीजेन टेस्ट

करण्यात आय.सी.एम.आर इंडिया इन्स्टीटयुट ऑफ मेडीकल सायन्सनेही तपासणी करुन SD BIOSENSER या एकमेव कंपनीच्या Standard Q Covid १९ Ag Detection Kit ला मान्यता दिलेली आहे. सदर 200 kits Standard Q Covid १९ Ag Detection Kit करीता रु 24,36,000/- ( चौवीस लाख छत्तीस हजार रुपये मात्र) एवढा खर्च उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांचे रॅपिड ॲन्टीजेन टेस्ट करणे करता प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळालेली आहे. सदर खर्च सन. २०२०-२०२१ मधील विपरीत परिस्थिती व्यवस्थापन B-२ (३) या लेखाशिर्षातून किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधितून करणे प्रस्तावित आहे.तसेच सदर प्रकरणीAntigen Test Kit ची खरेदी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि. २२ जून, २०२० रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने आहे. तरी सदर Q Covid-१९ AG Detection Kit खरेदीच्या खर्चास देयक अदा करण्याबाबत मा. स्थायी समिती यांचे मान्यतेसाठी सविनय सादर.

स्थायीसमितीठराव क्र.६१दिनांकः—२६/०३/२०२१

सुचकाचेनाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचेनाव :— श्री. राजेश वदारिया

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार व सभेत सदस्यांनी केलेल्या चर्चेअंतीआय सी एम आर सह ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ मेडीकल सायन्सयांनी M/s SDBiosensor Healthcare Private Limited या एकमेव कंपनीच्या Standard Q Covid-१९ Ag Detection किटला मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उल्हासनगर महापालिका तर्फे ५,००० Test (२०० kit) Q Covid-१९ AG Detection Kit महाराष्ट्र शासन निर्णयानुसार सदर M/s SD Biosensor कंपनी यांचे कडुन खरेदी करण्यात आलेल्या किटचा खर्च रक्कम रु २४,३६,०००/- हे देयक अदा करण्याबाबत मान्यता देत आहे.**

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते
सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ९ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र.९**आयसीएमआरसहऑलइंडियाइन्स्टीटयुटऑफमेडीकलसायन्सयांनीM/s SD Biosensor Healthcare Private Limited याएकमेवकंपनीच्या Standard Q Covid-१९ Ag Detection किटलामान्यतादिलेलीआहेत्यानुसारउल्हासनगरमहानगरपालिकेतर्फे २०,००० Test (८०० Kit) Q Covid-१९ AG Dectection Kit महाराष्टशासन निर्णयानुसारसदरM/s SD Biosensorकंपनीयांचेकडुनखरेदीकरण्यातआलेल्या किटचाखर्चरक्कमरुपये ८२,८८,०००/- हेदेयकअदाकरण्याबाबतमा. स्थायीसमिती यांचेमान्यतेसाठीसविनयसादर.

---

महापालिका सचिव:— होय सारखाच आहे. पास...

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— पास. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री.विजय पाटील-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

☑विषय क्र. ९ :—**आय सी एम आर सह ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ मेडीकल सायन्सयांनी M/s SD Biosensor Healthcare Private Limited या एकमेव कंपनीच्या Standard Q Covid-१९ Ag Detection किटला मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उल्हासनगर महापालिका तर्फे २०,००० Test (८०० kit) Q Covid-१९ AG Detection Kit महाराष्ट्र शासन निर्णयानुसार सदर M/s SD Biosensor कंपनी यांचे कडुन खरेदी करण्यात आलेल्या किटचा खर्च रक्कम रु ८२,८८,०००/- हे देयक अदा करण्याबाबत मा.स्थायी समिती यांचे मान्यतेसाठी सविनय सादर.**

प्रस्तावना

ज्याआर्थी सध्या जगभरात पसरलेल्या करोना विषाणूची लागण झाली आहे. सदर रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने करोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधनात्मक कायदा, १८९७ संदर्भ क्र. ०१ अन्वये दिनांक १४ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३ व ४ मधील तरतूदीनूसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महापालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम आहेत असे घोषित करण्यात आले आहे.

**१.महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ३१९ नुसार शहरात कोणत्याही वेळी कोणत्याही दुर्धर रोगांचा प्रार्दुभाव झाला असेल किंवा प्रादुर्भाव होण्याची भिती निर्माण झाली असेल अशा प्रसंगी किंवा कोणत्याही सांसर्गीक रोग उद्भवला असेल किंवा शहरातील गुराढोरांमध्ये त्याचा प्रादुर्भाव होण्याचा संभव असेल अशा प्रसंगी अधिनियमाच्या आणि नियमाच्या किंवा त्या वेळा अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या सामान्य तरतुदी त्या प्रयोजनासाठी अपु-या आहेत असे आयुक्तास वाटेल तर त्यास राज्य शासनाच्या मंजूरीने नियमांत विनिर्दिष्ट करण्यात आले असतील असे आणि अशा रोगांच्या प्रार्दुभाव किंवा प्रसारास प्रतिबंध**

**करणेसाठी त्यास आवश्यक वाटतील त्या उपाययोजना करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान केले आहेत.**

२.महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन अधिसुचना कोरोना २०२० प्र.क्र.५८/आरोग्य/५ दिनांक १४ मार्च २०२० मधिल मुददा क्र. १२ **मध्ये नमुद केल्याप्रमाणे या नियमावलीची अमंलबजावणी करणा-या प्राधिकृत अधिका-याविरुद्ध कोव्हीड १९ चा प्रार्दुभाव रोखण्यासाठी सदभावनेने केलेल्या किंवा करण्यात येणा-या कृती बद्दल अंमलबजावणीच्या अनुषंगाने अन्यथा दोषी नाहीत तो पर्यत कोणताही कार्यवाही अथवा गून्हा दाखल करता येणार नाही. तसेच नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील प्रकरण ९ कलम ५० अ मध्ये खालिल प्रमाणे विहीत करण्यात आलेले आहे.**

" Emergency Procurment & Accounting - Whether by reason of any threatening disaster situation or disaster, the National authority or the state authority or the district authority is satisfied that immediate procurement of provisions or materials or the immediate application of resources are necessary for rescue or relief -
(a) it may authorize the concerned department or authority to make the emergency procurement and in such case, the standard procedure requiring inviting of tenders shall be deemed to be waived ; "

**३.या अधिकारा नुसार उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) चा प्रार्दुभाव रोखणेसाठी आवश्यकता असलेले साहीत्य जी.ई.एम पोर्टलवरुन किंवा इ** निविदा पदधतीने खरेदी केली असता सदर साहीत्य प्राप्त होण्यासाठी कालावधी जास्त लागू शकतो ही शक्यता नाकारता येत नाही.

४.महाराष्ट्र शासन उद्योग उुर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रं.भांखस-२०१४/प्र.क्र/८२भाग-३/उद्योग -४ दिनांक १/१२/२०१६ मधील परिच्छेद ३.२.१ नुसार सदर खरेदी ३ लाखांपेक्षा जास्त किंमतीची असल्याने ई-निविदा करण्याचे सुचित केलेले आहे. परंतू सदर खरेदी ही आपत्कालीन परीस्थितीशी निगडीत असल्याने नैसर्गिक आपत्तीच्या काळात या शासन निर्णयातील परिच्छेद ३.३.१ खालिल प्रमाणे विहीत करण्यात आलेले आहे.

" खरेदी अधिका-याने नैसर्गीक आपत्ती आणि माहीती/माणसे/मालमत्ता यांची मोठया प्रमाणात झालेली हानी, ज्यामुळे विभागाचे कामकाज बंद पडते अशा परीस्थीतीचे वर्गीकरण आपत्कालीन परीस्थीती म्हणुन करावे. तातडीच्या आदेशाव्दारे खरेदी, फक्त आपत्कालीन परीस्थीती उदभवेल तेव्हा आणि जेव्हा गरजेची पुर्तता नेहमीच्या खरेदी कार्यपध्दतीतुन होउ शकणार नाही, अशा वेळी करावी.अशी खरेदी अकल्पित किंवा अनपेक्षीत अशा परीस्थतीचा परीणाम म्हणुन करण्यात यावी. तथापी अपुरे नियोजन, दुर्लक्षित आवश्यकता, मागील माहीतीचा चुकीचा वापर/अनुमानाचा अभाव, या कारणामुळे उदभवलेल्या परीस्थीतीत तातडीच्या आदेशाव्दारे खरेदीचे समर्थन करणे फार अवघड होईल."

५.सध्या कोरोना विषाणूचा वाढता प्रादुभाव पाहता रोज १५० ते २०० कोरोना बाधीत रुग्ण आढळून येत आहेत त्यामुळे प्रार्दुभाव रोखणेसाठी तसेच हाय रिस्क कॉन्टॅक्ट टेसिंग करणे आवश्यक आहे. तथापी वरील परिस्थिती विचारात घेता या विपरीत परीस्थिती मध्ये कोव्हीड विषाणूचा प्रार्दुभाव रोखणे व नागरीकांचे आरोग्य व सामाजिक हीत यासाठी साहित्य खरेदी करणे अत्यंत आवश्यक आहे.

त्याकरीता शासनानी ठरवुन दिलेली विहीत पद्धत जसे की, जी.ई.एम/ई निविदा पद्धतीने खरेदी प्रक्रिया केल्यास बराच कालावधी उलटण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापी महाराष्ट्र शासन उद्योग उुर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रं.भांखस-२०१४/प्र.क्र/८२भाग-३/उद्योग -४ दिनांक १/१२/२०१६ मधील परिच्छेद ३.३.१ नुसार विहीत पदधतीचा वापर न करता तातडीच्या आदेशाव्दारे खरेदी, फक्त आपत्कालीन परीस्थिती उदभवेल तेव्हा आणि जेव्हा गरजेची पूर्तता नेहमीच्या खरेदी कार्यपदधतीमधुन होउु शकणार नाही अशावेळी करावी. सदर खरेदी अकल्पित किंवा अनपेक्षित (ExtraOrdinary unforeseen circumstances )अशा परीस्थितीचा परीणाम म्हणून तातडीने करणे अपेक्षीत आहे.

६.महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ५ नियम २(२) अन्वये कोरोना या संसर्गजन्य आजाराची लागण उल्हासनगर महापालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांना होवू नये म्हणून स्थायी समिती विषय क्रमांक ५ ठराव क्रमांक ६५ दिनांक १८/०३/२०२० रोजीच्या ठरावानुसार कोव्हीड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी वैद्यकिय व इतर बाबींची उपलब्धता तातडीने होणेसाठी शासन निर्देशानुसार किंवा इतर आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यासाठी साहीत्य, वस्तु, औषधे व अनुषंगीक बाबी निविदेशिवाय थेट खरेदी करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड मधिल प्रकरण ५ (२)(२) अंतर्गत आयुक्तांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

सबब या अगोदर M/s SD Biosensor यांचे कडुन २२ जुन २०२० च्या शासन निर्णयानुसार Antigen Test Kit खरेदी करण्यात आली होती. त्यावेळी सदर कंपनीनेने Antigen Test Kit per Test रू. ४३५/- अधिक १२% जी.एस.टी. या रक्कमेने उपलब्ध करून दिले होते. परंतु सद्यस्थितीमध्ये Antigen Test Kit च्या किंमतीमध्ये घट झाली आहे. Antigen Test Kit per Test ३७०/- अधिक १२% जी.एस.टी. असे नविन दर असलेबाबत M/s SD Biosensor यांनी कळविलेले आहे.

वरील सर्व पार्श्वभुमीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून कोवीड-१९ तातडीची बाब म्हणून खालील किटची तात्काळ खरेदी करणे आवश्यक आहे.सदर किट खरेदी करिता पुढील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Name Of Comsumbles | Mode Of Purchase | Total Kits | Total Test (१ kit = २५ Test. ८०० kit x २५ | Rate in Rs. (अंदाजे) | Amount | Gst १२% | Total Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | test per kit =२०००० test) | | | | |
| 1 | Q Covid-१९ AG Detection Kit | 67(3) C | 800 kits | 20000 Test | 370/- Per Test | 74,00,000/- | 8,88,000/- | 82,88,000/- |

७.तसेच **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम** ६७ (३) 'क' मध्ये नमूद केलेप्रमाणे कोणत्याही आणी बाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुस-या एखादया नगरपालिका प्राधिका-याच्या किंवा १(राज्य) शासनाच्या मंजूरी, मान्यता किंवा प्राधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहीजे असे नमूद आहे.
८.महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ५ नियम २(२) अन्वये कोरोना या संसर्गजन्य आजाराची लागण उल्हासनगर महापालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांना होवू नये म्हणून स्थायी समिती विषय क्रमांक ५ ठराव क्रमांक ६५ दिनांक १८/०३/२०२० रोजीच्या ठरावानुसार, या आजाराचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करण्यात येतील त्या करण्याचे संपूर्ण अधिकार मा.आयुक्त यांना दिलेले असल्याने सदरची खरेदी करीता ठरावाप्रमाणे व वर नमूद केलेल्या दिनांक १/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ३.३.१ प्रमाणे मान्यता देण्यात यावी.

तरी संदर्भिय शासन निर्णयान्वये उल्हासनगर महानगरपालिका रुग्णालयातQ Covid-१९ AG Detection Kit एकूण २०,००० Test (८०० kit) खरेदी करणेआवश्यक आहे. सदर खरेदी करण्या करीता अंदाजेरुपये ८२,८८,०००/- खर्च अपेक्षित आहे.

M/s SD Biosensor यांना कार्यादेश निर्गमित केलेनंतर विहित कालावधीत सदर कंपनीने Antigen Test Kit उपलब्ध करून दिले होते. तद्नंतर सदर Antigen Test Kit ची वैद्यकिय आरोग्य विभागाच्या साठा पुस्तीकेमध्ये रितसर नोंदणी करून Antigen Test केंद्रावर सदर Antigen Test Kit चा पुरवठा करण्यात आलेला आहे.

तरी संदर्भिय शासन निर्णयान्वये उल्हासनगर महानगरपालिका रुग्णालयातQ Covid-१९ AG Detection Kit एकूण २०,००० Test (८०० kit) खरेदी करणेआवश्यक आहे. सदर खरेदी करण्या करीता अंदाजीत रू.८२,८८,०००/-(ब्याऐंशी लाख अठ्ठयाऐंशी हजार रूपये मात्र) खर्च अपेक्षित आहे. तसेच सदर बाबत होणारा खर्च हा सन. २०२०-२०२१ मधील विपरीत परिस्थिती व्यवस्थापन B-२(३) या लेखाशिर्षातून किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधितून करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर Antigent kit आय.सी.एम.आर इंडिया कॉन्सील ऑफ मेडीकल रीसर्च मान्यता प्राप्त कंपनीकडुन खरेदी करण्याकरीता प्रशासकीय मान्यता मिळालेला आहे.तसचे सदर प्रकरणीAntigen Test Kit ची खरेदी सार्वजनिक आरोग्य

**विभागाच्या दि. २२ जून, २०२० रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने आहे. तरी सदर Q Covid-१९ AG Detection Kit खरेदीच्या खर्चास देयक अदा करण्याबाबत मा. स्थायी समिती यांचे मान्यतेसाठी सविनय सादर.**

स्थायी समिती ठराव क्र.६२ दिनांक:— २६/३/२०२१

सुचकाचे नाव:— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव:— श्री. राजेश वदारिया

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार व सभेत सदस्यांनी केलेल्या चर्चेअंतीआय सी एम आर सह ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ मेडीकल सायन्स यांनी M/s SD Biosensor Healthcare Private Limited या एकमेव कंपनीच्या Standard Q Covid-१९ Ag Detection किटला मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उल्हासनगर महापालिका तर्फे २०,००० Test (८०० kit) Q Covid-१९ AG Detection Kit महाराष्ट्र शासन निर्णयानुसार सदर M/s SD Biosensor कंपनी यांचे कडुन खरेदी करण्यात आलेल्या किटचा खर्च रक्कम रु ८२,८८,०००/- हे देयक अदा करण्याबाबत मान्यता देत आहे.**

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाचीसही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते
सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १० वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.१०**उल्हासनगर महानगरपालिकेनेनिश्चितकेलेल्याठिकाणी (कोविडरूग्णालये व कॉरंटाईनसेंटर्स) व टाटाआमंत्रा,भिवंडीयेथेरूग्णांकरीताआवश्यकअसणारेबेड, गाद्या, उशा, बेडशिट, चादर, आंघोळीचेसाबण, कपडयाचेसाबण, टुथपेस्ट, टुथब्रश, टॉवेल, बकेट, मग, सोपडिश, डस्टबीन इ. चापुरवठाकरण्यातयेतअसूनत्याबाबतझालेल्याखर्च रु. ४९,११,४७९/- इतकास्थायीसमितीपुढेमाहितीस्तवसादरकरणेबाबत.

---

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः— हे सामान आपण मागविलेले आहे ते पहिले आलेले आहे तेच आहे ना की अजून नविन काही येणार आहे. जुनेच आहे ना. ठिक आहे.

सदस्य, श्री. राजू जग्यासीः— एकूण रक्कम रूपये किती आहे? आपण शेवटी, शेवटी २५ लाख लिहिलेले आहे. एकुण रक्कम किती आहे? गोषवा—यात शेवटच्या प्यारा मध्ये काय लिहिलेले आहे.

महापालिका सचिवः— एकूण ४९ लाख रूपये आहेत.

सदस्य, श्री.राजू जग्यासीः— पास पास. इतिवृत्ताची वाट न पाहता.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—इतिवृत्ताची वाट न पहाता.

**काही सदस्यः-** पास, पास....

**सभापती, श्री.विजय पाटील-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

☑
विषय क्र. १०:—उल्हासनगर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी (कोविड रूग्णालये व कॉरंटाईन सेंटर्स) व टाटा आमंत्रा,भिवंडी येथे रूग्णांकरीता आवश्यक असणारे बेड, गाद्या, उशा, बेडशिट, चादर, आंघोळीचे साबण, कपडयाचे साबण, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, टॉवेल, बकेट, मग, सोप डिश, डस्टबीन इ. चा पुरवठा करण्यात येत असून त्याबाबत झालेल्या खर्च रु. ४९,११,४७९/- इतका स्थायी समितीपुढे माहितीस्तव सादर करणेबाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरामध्ये कोविड-१९ या संसर्ग जन्य आजाराचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेउन सदर आजारावर नियंत्रण ठेवणेकरीता संक्रमीत रूग्णांना उपचार घेणेकरीता व संशयीत रूग्णांना कॉरंटाईन करून ठेवणेकरीता मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेशान्वये टाटा आमंत्रा, भिवंडी येथे व उल्हासनगर महापालिका क्षेत्रात महापालिकेमार्फत स्थापन करण्यात आलेल्या कोविड रूग्णालय व कॉरंटाईन सेंटर्स येथे दिनांक २६ मार्च २०२० पासून रूग्णांना आवश्यक असणारे बेड, गाद्या, उशा, बेडशिट, चादर, आंघोळीचे साबण, कपडयाचे साबण, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, टॉवेल, बकेट, मग, सोप डिश, डस्टबीन इ. चा पूरवठा करण्यात येत असून त्याकरीता उल्हासनगर क्षेत्रातील कोविड रूग्णालये व कॉरंटाईन सेंटर्स येथे पूरवठा करणेकामी पूरवठादारांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ६५ दिनांक १८/०३/२०२० अन्वये कोविड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी वैद्यकिय व इतर बाबींची उपलब्धता तातडीने होण्यासाठी शासन निर्णयानुसार किंवा इतर आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यासाठी साहित्य वस्तू, औषधे व अनुषंगीक बाबी निविदेशिवाय थेट खरेदीकरीता महाराष्ट्र महानागरपालिका अधिनियम अनुसुचि ड मधील प्रकरण ५ कलम (२) (२) अंतर्गत आयुंक्तांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ प्रमाणे दिनांक १३ मार्च २०२० पासून खंड २ (१) नुसार महापालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केलेले आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६७ (३) नुसार मा. आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानुसार टाटा आमंत्रा, भिवंडी व उल्हासनगर महापालिका क्षेत्रात विविध पूरवठादार यांचे मार्फत दिनांक २०/०६/२०२० पर्यंत खालील दरांप्रमाणे साहित्याचा पूरवठा करण्यात आलेला आहे.

**टाटा आमंत्रा, भिवंडी दिनांक ०६/०४/२०२०**

| १ | मे. सिध्दांत एंटरप्रायझेस | | | |
|---|---|---|---|---|
| | **साहित्याचा तपशिल** | **संख्या** | **प्रति नग दर** | **एकूण रक्कम** |
| | बेडशिट | २७५ | २१२ | ५८३०० |
| | गादी (६X३) | २७५ | १६४५ | ४५२३७५ |
| | टुथब्रश | २७५ | १८ | ४९५० |
| | सोप डिश | २७५ | १२ | ३३०० |
| | लोखंडी खाट (६X३) | १०० | ३९५० | ३९५००० |
| | ब्लँकेट | २७५ | २३० | ६३२५० |
| | प्लास्टीक बकेट | २७५ | १५० | ४१२५० |
| | प्लास्टीक मग | २७५ | ३९ | १०७२५ |
| | टॉवेल | २७५ | ८८ | २४२०० |
| | साबण | २७५ | १३ | ३५७५ |
| | टुथपेस्ट | २७५ | २२.५० | ६१८७ |
| एकूण | | | | १०,६३,११२/- |

**वैद्यकिय आरोग्य विभाग दिनांक १७/०४/२०२०**

| २ | मे. धनलक्ष्मी कम्पोजीट पॅनल शॉप | | | |
|---|---|---|---|---|
| | **साहित्याचा तपशिल** | **संख्या** | **प्रती नग दर** | **एकूण रक्कम** |
| | स्वॅब टेस्टींग मशीन (केबीन) | ०२ | ४२५०० | ८५,०००/- |
| १८% GST सह एकूण | | | | १,००,३००/- |

**टेउराम धर्मशाळा व मध्यवर्ती रूग्णालय दिनांक १७/०४/२०२०**

| ३ | मे. जैन ट्रेडर्स, ठाणे | | | |
|---|---|---|---|---|
| | **साहित्याचा तपशिल** | **संख्या** | **प्रती नग दर** | **एकूण रक्कम** |
| | स्वॅब टेस्टींगसाठी लागणारे फ्रिज | ०२ | १४५०० | २९००० |
| | कपडे धुण्याकरीता वॉशिंग मशिन | ०२ | ३६००० | ७२००० |
| एकूण | | | | १,०१,०००/- |

**कोवीड रूग्णालये व कॉरंटाईन सेंटर्स उल्हासनगर दिनांक २८/०४/२०२०**

| ४ | मे. सिध्दांत एंटरप्रायझेस | | | |
|---|---|---|---|---|
| | **साहित्याचा तपशिल** | **संख्या** | **प्रति नग दर** | **एकूण रक्कम** |
| | प्लास्टीक बकेट | २७ | १५० | ४०५० |
| | प्लास्टीक मग | २७ | ३९ | १०५३ |
| | साबण | ७० | १३ | ९१० |
| | टॉवेल | ३० | ८८ | २६४० |
| | टुथब्रश | ३० | १८ | ५४० |
| | टुथपेस्ट | ३० | २२.५० | ६७५ |
| | सोप डिश | ३० | १२ | ३६० |
| | बेडशिट | ३५० | २१२ | ७४२०० |
| | सोलापूरी चादर | १५० | २३० | ३४५०० |
| | एकूण | | | १,१८,९२८/- |

**टाटा आमंत्रा, भिवंडी दिनांक ०९/०५/२०२०**

| ५ | मे. सिध्दांत एंटरप्रायझेस | | | |
|---|---|---|---|---|
| | **साहित्याचा तपशिल** | **संख्या** | **प्रति नग दर** | **एकूण रक्कम** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | टॉवेल | २७५ | ८८ | २४२०० |
| | ब्लँकेट | २७५ | २३० | ६३२५० |
| | बेडशिट | २७५ | २१२ | ५८३०० |
| | गादी | २७५ | १६४५ | ४५२३७५ |
| | उशी, कवरसह | २७५ | ६० | १६५०० |
| | प्लास्टीक बकेट | २७५ | २७४ | ७५३५० |
| | मग | २७५ | ३९ | १०७२५ |
| | साबण | २७५ | १३ | ३५७५ |
| | टुथपेस्ट | २७५ | २२.५० | ६१८७ |
| | टुथब्रश | २७५ | १८ | ४९५० |
| | सोप डिश | २७५ | १२ | ३३०० |
| | डस्टबीन | २७५ | १०० | २७५०० |
| | कपडयाचे साबण | २७५ | १४ | ३८५० |
| | एकूण | | | ७,५०,०६३/- |

**टाटा आमंत्रा व कोवीड हॉस्पीटल दिनांक २१/०५/२०२०**

| ६ | मे. सिध्दांत एंटरप्रायझेस | | | |
|---|---|---|---|---|
| | **साहित्याचा तपशिल** | **संख्या** | **प्रति नग दर** | **एकूण रक्कम** |
| | साबण,आंघोळीचे | ५५० | १३ | ७१५० |
| | कपडयाचे साबण | ५५० | १३ | ७१५० |
| | टुथपेस्ट | ५५० | २२.५० | १२३७५ |
| | टुथब्रश | ५५० | १८ | ९९०० |
| | गादी | १०० | १६४५ | १६४५०० |
| | उशी, कवरसह | ५० | ६० | ३००० |
| | ब्लँकेट | ५० | २३० | ११५०० |
| | बेडशिट | ५० | २१२ | १०६०० |
| | टॉवेल | ५० | ८८ | ४४०० |
| | प्लास्टीक बकेट | ५० | २७४ | १३७०० |
| | मग | ५० | ३९ | १९५० |
| | डस्टबीन | ५० | १०० | ५००० |
| | सोप डिश | ५० | १२ | ६०० |
| | एकूण | | | २,५१,८२५/- |

**कोवीड हॉस्पीटल व ई.एस.आय हॉस्पीटल दि. २७/५/२०२०**

| ७ | मे. तुषार एंटरप्रायझेस | | | |
|---|---|---|---|---|
| | **साहित्याचा तपशिल** | **संख्या** | **प्रती नग दर** | **एकूण रक्कम** |
| | टि. व्ही. | ०४ | ११५०० | ४६००० |
| | टि - मेकर | १० | ८०० | ८००० |
| | टि. व्ही. ट्रॉली | ०२ | २००० | ४००० |
| एकूण | | | | ५८,०००/- |

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासीका दि. ५/६/२०२०**

| ८ | मे. सिध्दांत एंटरप्रायझेस | | | |
|---|---|---|---|---|
| | **साहित्याचा तपशिल** | **संख्या** | **प्रती नग दर** | **एकूण रक्कम** |
| | लोखंडी खाट | १५० | ३९५० | ५९२५०० |
| | गादी | १५० | १६४५ | २४६७५० |
| | उशी, कवरसह | १५० | ६० | ९००० |
| | चादर/ब्लँकेट | १५० | २३० | ३४५०० |
| | बेडशिट | १५० | २१२ | ३१८०० |
| एकूण | | | | ९,१४,५५०/- |

**कोवीड रूग्णालय २०/०५/२०२०**

| ९ | मे. सिध्दांत एंटरप्रायझेस | | | |
|---|---|---|---|---|
| | **साहित्याचा तपशिल** | **संख्या** | **प्रती नग दर** | **एकूण रक्कम** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सतरंजी (४X६) | ५० | ६३० | ३१५०० |
| | साबण, कपडयाचे | ५० | १३ | ६५० |
| | पेपर ग्लास | ५० | ०३ | १५० |
| | मॉब | ०६ | १५६० | ९३६० |
| | डस्टबीन | १०० | ११२ | ११२०० |
| | नॅपकीन | ५० | ४४ | २२०० |
| | पाण्याचे कॅन, २० ली. | २७ | १३८ | ३७२६ |
| | उशी, कवरसह | ३० | ६० | १८०० |
| एकूण | | | | ६०,५८६/- |

**कोवीड रूग्णालये व कॉरंटाईन सेंटर्स ३०/०५/२०२०**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | मे. सिध्दांत एंटरप्रायझेस | | | |
| | **साहित्याचा तपशिल** | **संख्या** | **प्रती नग दर** | **एकूण रक्कम** |
| | टुथब्रश | ५०० | १८ | ९००० |
| | टुथरपेस्ट | ५०० | २२.५० | ११२५० |
| | साबण, आंघोळीचे | ५०० | १३ | ६५०० |
| | साबण, कपडयाचे | ५०० | १३ | ६५०० |
| | टॉवेल | ५०० | ८८ | ४४००० |
| | प्लास्टीक बकेट | ५०० | २७४ | १३७००० |
| | प्लास्टीक मग | ५०० | ३९ | १९५०० |
| | डस्टबीन | ५०० | १०० | ५०००० |
| | साबण डिश | ५०० | १२ | ६००० |
| एकूण | | | | २,८९,७५०/- |

**टाटा आमंत्रा व महापालिका क्षेत्रातील कोवीड रूग्णालये दिनांक १३/०६/२०२०**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | मे. तुषार एंटरप्रायझेस | | | |
| | **साहित्याचा तपशिल** | **संख्या** | **प्रती नग दर** | **एकूण रक्कम** |
| | वॉटर डिस्पेंसर | **१६** | **१२०००** | **१९२०००** |
| | | | | **१,९२,०००/-** |

**वेदांत कॉलेज येथे साहित्य दिनांक २१/०६/२०२०**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | मे. सिध्दांत एंटरप्रायझेस | | | |
| | **साहित्याचा तपशिल** | **संख्या** | **प्रती नग दर** | **एकूण रक्कम** |
| | लोखंडी खाट (६X३) | ५० | ३९५० | १९७५०० |
| | गादी | ५० | १६४५ | ६५,८०० |
| | | | | **२,६३,३००/-** |

**टाटा आमंत्रा येथे साहित्य दिनांक १७/०६/२०२०**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | मे. सिध्दांत एंटरप्रायझेस | | | |
| | **साहित्याचा तपशिल** | **संख्या** | **प्रती नग दर** | **एकूण रक्कम** |
| | बेडशिट | ४४० | २१२ | ९३२८० |
| | उशि, कवरसह | १८० | ६० | १०८०० |
| | साबण, आंघोळीचे | १७०० | १३ | २२१०० |
| | साबण, कपडयाचे | १७०० | १३ | २२१०० |
| | टुथब्रश | १७०० | १८ | ३०६०० |
| | टुथरपेस्ट | १७०० | २२.५० | ३८२५० |
| | मॉब | ०३ | १५४५ | ४६३५ |
| | टॉवेल | १० | ८८ | ८८०० |

| | | |
|---|---|---|
| | एकूण | २,३०,५६५ |

**कोवीड रूग्णालये व कॉरंटाईन सेंटर्स ३०/०५/२०२०**

| १४ | मे. सिध्दांत एंटरप्रायझेस | | | |
|---|---|---|---|---|
| | **साहित्याचा तपशिल** | **संख्या** | **प्रती नग दर** | **एकूण रक्कम** |
| | गाद्या | २५० | १६४५ | ४११२५० |
| | चादर | २५० | २३० | ५७५०० |
| | उशा | २५० | ६० | १५००० |
| | बकेट | ७९ | १५० | १२००० |
| | साबण, आंघोळीचे | २५० | १३ | ३२५० |
| | साबण, कपडयाचे | २५० | १३ | ३२५० |
| | टुथपेस्ट | २४५ | २२.५० | ५५०० |
| | मग | २५० | ३९ | ९७५० |
| एकूण | | | | ५,१७,५००/- |

वरिलप्रमाणे टाटा आमंत्रा , भिवंडी व उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील कोवीड रूग्णालये व कॉरंटाईन सेंटर्स येथे रूग्णांकरीता साहित्य पूरवठा करण्यात आलेले असून दिनांक २०/०६/२०२० रोजी पर्यंत रू. ४९,११,४७९/- एवढया झालेल्या खर्चाची माहिती मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र.६३ दिनांक : २६/०३/२०२१

सुचकाचे नाव :—श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारउल्हासनगर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी (कोविड रूग्णालये वकॉरंटाईन सेंटर्स) व टाटा आमंत्रा,भिवंडी येथे रूग्णांकरीता आवश्यक असणारे बेड,गाद्या, उशा, बेडशिट, चादर, आंघोळीचे साबण, कपडयाचे साबण, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, टॉवेल, बकेट, मग, सोप डिश, डस्टबीन इ. चा पुरवठा करण्यात येत असून त्याबाबत झालेल्या खर्च रु. ४९,११,४७९/- इतका माहिती नोंद करीत आहे.

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ११ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.११**उल्हासनगरमहानगरपालिकेनेनिश्चितकेलेल्याठिकाणी (कोविडरूग्णालये व कॉरंटाईनसेंटर्स) व टाटाआमंत्रा, भिवंडीयेथेरूग्णांकरीताआवश्यकअसणारेबेड, गाद्या, उशा, बेडशिट, चादर, आंघोळीचेसाबण, कपडयाचेसाबण, टुथपेस्ट, टुथब्रश, टॉवेल, बकेट, मग, सोपडिश, डस्टबीन इ. बाबत ई-निविदेनुसारपुरवठाकरण्यातयेतअसूनत्याबाबतझालेल्याखर्चाचीमाहितीमा. स्थायीसमितीसदेणेबाबत.

---

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लीरः— पास..पासकृ

<u>महापालिका सचिव:—</u> पास..पास..

<u>महापालिका सचिव—</u>या मिटींगचे सर्व विषय पूर्ण झाले आता तिसरी मिटींग सुरू करू.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

**<u>सभापती, श्री.विजय पाटील-</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

☑**विषय क्र. ११ :-** उल्हासनगर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी (कोविड रूग्णालये व कॉरंटाईन सेंटर्स) व टाटा आमंत्रा, भिवंडी येथे रूग्णांकरीता आवश्यक असणारे बेड, गाद्या, उशा, बेडशिट, चादर, आंघोळीचे साबण, कपडयाचे साबण, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, टॉवेल, बकेट, मग, सोप डिश, डस्टबीन इ. बाबत ई-निविदेनुसार पुरवठा करण्यात येत असून त्याबाबत झालेल्या खर्चाची माहिती मा. स्थायी समितीस देणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ६५ दिनांक १८/०३/२०२० अन्वये कोविड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी वैद्यकिय व इतर बाबींची उपलब्धता तातडीने होण्यासाठी शासन निर्णयानुसार किंवा इतर आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यासाठी साहित्य वस्तू, औषधे व अनुषंगिक बाबी निविदेशिवाय थेट खरेदीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड मधील प्रकरण ५ कलम (२) (२) अंतर्गत आयुंक्तांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.
साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ प्रमाणे दिनांक १४ मार्च २०२० पासून खंड २ (१) नुसार महापालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केलेले आहे. नैसर्गीक आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५मधील कलम ५० अन्वये तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६७ (३) नुसार मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

उल्हासनगर शहरामध्ये कोविड-१९ या संसर्ग जन्य आजाराचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेउन सदर आजारावर नियंत्रण ठेवणेकरीता संक्रमीत रूग्णांना उपचार घेणेकरीता व संशयीत रूग्णांना कॉरंटाईन करून ठेवणेकरीता मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेशान्वये टाटा आमंत्रा, भिवंडी येथे व उल्हासनगर महापालिका क्षेत्रात महापालिकेमार्फत स्थापन करण्यात आलेल्या कोविड रूग्णालय व कॉरंटाईन सेंटर्स येथे दिनांक २० जुन २०२० पासून रूग्णांना आवश्यक असणारे बेड, गाद्या, उशा, बेडशिट, चादर, आंघोळीचे साबण, कपडयाचे साबण, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, टॉवेल, बकेट, मग, सोप डिश, डस्टबीन इ. चा पूरवठा करण्यात येत असून त्याकरीता उल्हासनगर क्षेत्रातील कोविड रूग्णालये व कॉरंटाईन सेंटर्स येथे पूरवठा करणेकामी ई-निविदेद्वारे न्युनतम दरांचे निविदाकारांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या तक्त्यापमाणे आहे.
सदर ई-निविदेमध्ये एकूण ११ निविदाकारांनी सहभाग घेतेला होता त्यापैकी १० निविदाकार पात्र ठरले असून ०१ निविदाकार मे.खंडेलवाल ॲन्ड खंडेलवाल यांनी निविदेतील अटी शर्तीची पूर्तता न केल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आलेले आहे.तदनंतर पात्र निविदाकारांचे आर्थिक देकार रक्कमेचे लिफाफे दिनांक १७/०६/२०२० रोजी उघडण्यात आले असता सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे न्युनतम दर सादर केलेले आहेत.

सद्यस्थितीत उल्हासनगर शहरात १५० ते २०० रूग्ण दैनंदिन आढळत आहेत. त्यामुळे त्यांच्यासाठी नविन कोरंटाईन सेंटर्स व हॉस्पीटल ची व्यवस्था करणे आवश्यक असल्याने न्युनतम दर सादर केलेल्या निविदाकारांना निविदेची कार्यवाही पूर्ण होणेपूर्वी तात्काळ साहित्य उपलब्ध करून देणेबाबत सांगण्यात आले. त्यानुसार सदर निविदाकारांनी साहित्य पूरवठा करावयास सुरूवात केलेली आहे.
तथापी सदर न्युनतम दरांचे खालील निविदाकार मे. राहूल एंटरप्रायझेस यांचे सोबत दिनांक ०८/०७/२०२० रोजी करारनामा करून त्यांना दिनांक ०९/०७/२०२० रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | म.न.पा. ने निश्चित केलेले दर (प्रती नग) | निविदेमध्ये सादर केलेले दर (प्रती नग) |
|---|---|---|---|
| 1. | Iron Cot, 6x3, (GI pipe1.5”, 18 Gage, 14 kg weight, 12 mm water proof plywood | **३९५०** | **२६४९** |
| 2 | Cotton Mattress, 10 kg, | **१६५०** | **७९९** |
| 3 | Towel, 4x2 | **८८** | **५६** |
| 4 | Plastic Bucket (18 Liter) | **२७४** | **१०९** |
| 5 | Plastic Mug, 2 Liter | **३९** | **१९** |
| 6 | Dustbin, Plastic, 5 Liter | **१००** | **५९** |
| 7 | Soap Dish | **१२** | **९.४०** |

मे. ए.एम. रामचंदानी यांचे सोबत दिनांक ०८/०७/२०२० रोजी करारनामा करून त्यांना दिनांक ०९/०७/२०२० रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | म.न.पा. ने निश्चित केलेले दर (प्रती नग) | निविदेमध्ये सादर केलेले दर (प्रती नग) |
|---|---|---|---|
| ख्.1. | Bath soap, 100 Gm. | **१३** | **९.९०** |

मे. बुबेरे ॲन्ड असोशिएट यांचे सोबत दिनांक ०८/०७/२०२० रोजी करारनामा करून त्यांना दिनांक ०९/०७/२०२० रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

| अ. क्र. | साहित्याचा तपशिल | म.न.पा. ने निश्चित केलेले दर (प्रती नग) | निविदेमध्ये सादर केलेले दर (प्रती नग) |
|---|---|---|---|
| १ | Pillow with cover, 1.5"kg, | **६०** | **५०.४०** |
| २ | Bedshit 6x3, Cotton printed | **२१२** | **१५३** |
| ३ | Cloth wash Soap, 100 Gm. | **१३** | **९.९०** |

मे.अमरज्योत एंटरप्रायझेस यांचे सोबत दिनांक ०८/०७/२०२० रोजी करारनामा करून त्यांना दिनांक ०९/०७/२०२० रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

| अ. क्र. | साहित्याचा तपशिल | म.न.पा. ने निश्चित केलेले दर (प्रती नग) | निविदेमध्ये सादर केलेले दर (प्रती नग) |
|---|---|---|---|
| 1 | Blanket/Chader, Solapuri, 6x3 | **२३०** | **१७१** |
| 2 | Toothbrush, Medium | **१८** | **१२** |

मे.महावीर एंटरप्रायझेस यांनी दिनांक ०३/०६/२०२० रोजीच्या पत्रान्वये टुथ पेस्ट हे साहित्य पूरविण्यास असमर्थता दर्शविलेली आहे.त्यांचेसोबत करारनामा झालेला नसल्यामुळे त्यांना कार्यादेश वितरीत करण्यात आलेले नाहीत.

वरिल सर्व साहित्य रूग्णांना वेळेवर देणे गरजेचे असल्यामुळे उक्त न्युनतम दरांचे निविदाकार यांचेशी करारनामा करून कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर साहित्याच्या वितरणापोटी रू. २५ लाखांच्या वर खर्च अपेक्षीत असल्याने वरिल वस्तूस्थिती मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सविनय सादर.

| अ. क्र. | साहित्याचा तपशिल | मनपाने निश्चित केलेले दर प्रती नग | निविदाकाराचे नाव | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **मे. महाविर एंटरप्रायझेस** | **मे. ए.एम. रामचंदानी** | मे. सागर फॅब्रीकेशन ॲन्ड स्प्रे पेंटींग | मे. नवनिर्माण कंनस्ट्रक्शन | **मे. बुबेरे ॲन्ड असोसिएटस** |
| १ | Iron Cot, 6x3, (GI pipe1.5", 18 Gage, 14 kg weight, 12 mm water proof plywood | 3950 | ३५११ | २७८५ | २७५० | ३७५० | ३५५५ |
| २ | Cotton Mattress, 10 kg, | 1650 | ८२१.११ | १०२५ | ८७५ | १२०० | १२३३ |
| ३ | Pillow with cover, 1.5"kg, | 60 | १५०.४४ | ९५ | १७५ | १०० | **५०.४०** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | Plastic Bucket (18 Liter) | 274 | १७०.७७ | १५९ | १३० | २५० | १७१ |
| १२ | Plastic Mug, 2 Liter | 39 | ३५.३५ | २७.४८ | ४० | ३५ | २९.२५ |
| १३ | Dustbin, Plastic, 5 Liter | 100 | ९०.९० | ८०.५० | १२० | ९५ | ९० |
| १४ | Soap Dish | 12 | ११.११ | १० | २० | १० | १५.३० |

| अ. क्र. | साहित्याचा तपशिल | मनपाने निश्चित केलेले दर प्रती नग | निविदाकाराचे नाव | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. सिध्दांत एंटरप्रायझेस | **मे. राहूल एंटरप्रायझेस** | मे. दिशा एंटरप्रायझेस | मे . श्रीक्रिष्णा एंटरप्रायझेस | **मे. अमरज्योत एंटरप्रायझेस** |
| १ | Iron Cot, 6x3, (GI pipe1.5", 18 Gage, 14 kg weight, 12 mm water proof plywood | 3950 | ३९५० | **२६४९** | ४५०० | ४२०० | २७७२ |
| २ | Cotton Mattress, 10 kg, | 1650 | १६९० | **७९९** | १७०० | १७१० | १२५१ |
| ३ | Pillow with cover, 1.5"kg, | 60 | १२० | १२५ | १२६ | १२५ | ५७ |
| ४ | Blanket/Chader, Solapuri, 6x3 | 230 | २४५ | २११ | २४२ | २४० | **१७१** |
| ५ | Bedshit 6x3, Cotton printed | 212 | २३५ | २०० | २४० | २३२ | १५९ |
| ६ | Toothbrush, Medium | 18 | १८ | १६.८० | २२ | २० | **१२** |
| ७ | Tooth pest, 100 Gm. | 22.50 | २२.५० | ४० | २५ | २४ | ४८ |
| ८ | Bath soap, 100 Gm. | 13 | १३ | १५.५० | १५ | १४ | २४ |
| ९ | Cloth wash Soap, 100 Gm. | 13 | १३ | १५.५० | १५ | १४ | ११ |
| १० | Towel, 4x2 | 88 | ११० | **५६** | १२५ | १२० | ६६ |
| ११ | Plastic Bucket (18 Liter) | 274 | २७५ | **१०९** | २७९ | २७० | १९२ |
| १२ | Plastic Mug, 2 Liter | 39 | ४० | **९९** | ४३ | ४२ | ३० |
| १३ | Dustbin, Plastic, 5 Liter | 100 | ११० | **५९** | ११५ | ११२ | ८१ |
| १४ | Soap Dish | 12 | १३ | **९.४०** | १५ | १४ | १५ |

स्थायी समिती ठराव क्र.६४ दिनांक:— २६/३/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार व सभेत सदस्यांनी केलेल्या चर्चेअंती उल्हासनगर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी (कोविड रूग्णालये व कॉरंटाईन सेंटर्स)व टाटा आमंत्रा, भिवंडी येथे रूग्णांकरीता आवश्यक असणारे बेड, गाद्या, उशा, बेडशिट, चादर,आंघोळीचे साबण, कपडयाचे साबण, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, टॉवेल, बकेट, मग, सोप डिश, डस्टबीन इ. बाबत ई-निविदेनुसार पुरवठा करण्यात येत असून त्याबाबत झालेल्या खर्चाची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५.१५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती, श्री.विजय पाटील यांनी जाहीर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:- २०/०८/२०२१

दिनांक:- २०/०८/२०२१ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

०४

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक २०/०८/२०२१, रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृह येथे मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील शासनाचे क्रमांक कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४, दिनांक २८ जुन, २०२१ च्या पत्रान्वये विहित कार्यपध्दती पालन करुन सभेस ऑनलाईन ॲपद्वारे घेण्यांत आली, सदर सभेत खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | **सभापती** |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश वदारीया | सदस्य |
| ४ | श्री. भगवान भालेराव | सदस्य |
| ५ | श्री. राजकुमार किशनचंद जग्याशी | सदस्य |
| ६ | श्रीम. जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ७ | श्री. कलवंतसिंह सोहता | सदस्य |
| ८ | श्री. चंद्रशेखर यादव | सदस्य |
| ९ | श्रीम. अर्चना करणकाळे | सदस्या |
| १० | श्रीम. कविता लाल पंजाबी | सदस्या |
| ११ | श्रीमती कंचन अमर लुंड | सदस्या |
| १२ | श्री. रमेश महादेव चव्हाण | सदस्य |
| १३ | श्री.आकाश पाटील | सदस्य |
| १४ | श्री. स्वप्नील बागुल | सदस्य |
| १५ | श्रीमती सुनिता बगाडे | सदस्या |
| १६ | श्री. गजानन शेळके | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य सभेस अनुपस्थित होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्रीमती करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त, आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव
३. श्री. मदन सोंडे, उप-आयुक्त (सा.आ.वि.)
४. श्रीमती प्रियांका राजपुत, उप आयुक्त (कर विभाग)
५. श्री. संतोष जाधव , उप आयुक्त
६. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक

८. श्री. प्रकाश मुळे, नगररचनाकार
९. डॉ. दिपक पगारे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१०. श्री. महेश सितलानी, शहर अभियंता
११. श्री. अश्विनी अहुजा, उप अभियंता (सा.बा.वि.)
१२. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता
१३. श्री. रहेजा, कार्यकारी अभियंता (पापुवि)
१४.श्रीमती श्रध्दा सपकाळे,सिस्टीम ॲनालिस्ट, मा.त.विभाग
१५. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता
१६. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी
१७. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
१८.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
१९. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
२०. श्रीम. विशाखा सावंत, प्र. पर्यावरण व्यवस्थापक
२१. श्री. विजय मंगलानी, विशेष महसुल वसुली अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती नर्गिस खान
२. श्री. बाळू भांगरे
३. श्रीमती विदया आढळ

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** मिटींग सुरु करा.

दुपारी ३.२० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त, श्रीम. करुणा जुईकर आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ होत्या.

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १ वाचून दाखवितात.

---

**⇨ विषय क्र १:— मागील स्थायी समिती सभेचे दिनांक ०७/०७/२०२१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.**

---

**सदस्या, श्रीम. कंचन लुंड:-** एक मिनीट मा. सभापतीजी...

**सभपती, श्री. दिपक सिरवानी:-** बोला कंचनजी.

**सदस्या, श्रीम. कंचन लुंड:-**मिटींग चालू होण्याच्या पहिलेमला एका विषयावर बोलायचे आहे, चर्चा करायची आहे, जवळ जवळ ९ वर्षापासून एका रोडसाठी मी आयुक्तांना सांगितले आहे, अधिका-यांना सांगितले आहे यासाठी मी प्रत्येक वेळी इकडे तिकडे भटकत आहे.तो रोड काही होत नाही.जेव्हा मी स्थायी समितीची सभापती होते, तेव्हा हा रोड टेंडर प्रोसेसमध्ये आणला होता.अजून काहीच काम झाले नाही. एस्टिमेट असेच पडले आहे आणि आमचे स्वर्गीय दादाजी हे पण या रोडसाठी प्रयत्न करीत होते, आमच्या दादाजींचे पण स्वप्न होते, तरी या रोडचे काम पुर्ण करुन घ्या. माझा हा विषय अजेंडावर आणला नाही तर मी सभापती आपल्या दालनाजवळ उपोषणासाठी बसेल, सभापतीजी सर्वांच्या रोडचे काम होत आहेत आणि माझा जो वार्ड आहे, तो का वंचित ठेवला जात आहे, हे मला समजत नाही.याच्यासाठी तरतुद नाही आहे का? बाकी मी बघत आहे उल्हासनगरचे सर्व रोड होत आहेत. बस माझा होत नाही. नाला बनत आहेत ये वो बनत आहेत. मोठी गोष्ट आहे दादाजींविषयी श्रध्दा नाही आहे. बाकी मी बघत आहे उल्हासनगरचे सर्व रोड होत आहेत. बस माझा होत नाही. नाले बनत आहेत ये वो बनत आहेत. मोठी गोष्ट आहे दादाजींविषयी श्रध्दा नाही आहे.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-**दोन मिनीट मी आपल्याशी बोलतो, आयुक्त साहेब आज मिटींगमध्ये नाहीत आयुक्तांशी बोलून सोमवार चा दिवस घेतो. तुम्ही आणि मी आयुक्तांशी बोलू आज मिळेल. दादाजींचे जे रोड आहेत, या मिटींगमध्ये नाही, परंतु बजेटमध्ये जो जुना गोषवारा आहे, तो विषय घेऊन मी आयुक्त साहेबांना बोलतो.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** मॅडम आम्ही इस्टिमेंट बनवले आहेत, आयुक्तांच्या टेबलवर पडले आहेत. आयुक्त साहेबांनी सांगितले की, बजेटच्या हिशोबाने करण्यात यावेत.

**सदस्या, श्रीमती कंचन लुंड:-** बजेटच्या हिशोबाने करणार. दुस-यांचे रोड होत आहेत आणि आमचे रोड होणार नाहीत. ४ वर्षापासून आमचे विषय दिले आहेत, अजून होत नाहीत. माझ्या काही समजण्यातच येत नाही.सभापती महोदय मी आताच तुमच्या दालनासमोर उपोषणाला बसणार आहे. माझ्या दादाजींचे स्वप्न आज ९ वर्षे झाली आहेत, मी पुर्ण करु शकत नाही. बाकीचे सगळया ठिकाणी रोड बनत आहेत, नाल्या बनत आहेत. माझ्या दादार्जी विषयी काहीच नाही का तुमच्या मनामध्ये ?

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** मी सोमवारी आपल्यासोबत आयुक्तांचा वेळ घेतो.

**सदस्या, श्रीमती कांचन लुंड:-**आपण मिटिंग ॲडजॉन करा. सोमवारी माझा विषय आणा. त्या वेळेस या विषयावर बोलू.

**सदस्या, श्रीमती कांचन लुंड:-**नाही नाही, आपण हि मिटिंग ॲडजॉईंड करा. सोमवारी ठेवा ना मिटिंग.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-**सभापतीजी, सभापती महोदय,

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** कलवंतजी बोला.

**सदस्य, श्री.कलवंतसिंह सोहता:-**सभापतीजी महोदय, मोठी दुर्भाग्याची गोष्ट आहे. कांचन मॅडम जे बोलल्या की ९ वर्ष लागले आणि हे काम होत नाही.काय कारण आहे की, मॅडम पण १ वर्ष चेअरमन होती. शेरीजी आमचे सभागृह नेता राहिले आहेत तरी पण हे काम का होत नाही?काय विषय आहे? याला पुर्ण करा ना.

**सदस्या, श्रीमती कांचन लुंड:-**कुलवंतजी हे ठेकेदारांची संगनमताने होते. धन्यवाद.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-**त्यांनी चौकशी केली पाहिजे ना कोण ठेकेदार असे करत आहे.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** कांचनजी, मी विनंती करतो की, सोमवारी आयुक्तांजवळ वेळ ठेवतो. जर नाही झाले तर मी तुमच्या सोबत त्यांच्या घराबाहेर बसेल बस.

**सदस्या, श्रीमती कांचन लुंड:-**सोमवारचे रदद करा ना. इतके काय आहे.मला समजत नाही.आपण यावेळेस तरी मला पाठिंबा दया.दादाजींना पाठिंबा दया.मला पाठिंबा देवू नका.स्व. दादाजींना पाठिंबा दया, ही मिटिंग रदद करा. सोमवारी ठेवा.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** कांचनजी मी विनंती करतो की, सोमवारी आयुक्तांसोबत बसू आणि positively बसू या.

**सदस्या, श्रीमती कांचन लुंड:-**माझा विषय पास होत नाही, माझे ऐकून घेत नाही तर मी दुस-या कोणाचा विषय पास होऊ देणार नाही.माझा हा हटट आहे असा समजा यावेळी.सॉरी सर.तुम्ही माझा मान ठेवा, दादाजींचा मान ठेवा.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** कांचन मॅडम, मी मिटिंग रदद नाही करु शकत. हा माझा पण अपमान आहे.सोमवारी आम्ही सर्व सोबत जाउ. सर्व १५ च्या १५ नगरसेवक आपल्या सोबत येतील. मी सगळयांना विनंती करेन. ओके.

**सदस्या, श्रीमती कांचन लुंड:-**ठिक आहे, जर सोमवारी नाही झाले तर मी आपल्या दालनाजवळ बसेल.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** मी आपल्यासोबत बसेल, अशी वेळ येणार नाही मला माहित आहे.

**<u>सदस्या, श्रीमती कांचन लुंड:-</u>**ही चांगली गोष्ट नाही, ठिक आहे. सभापतीजी जसे आपल्या ठिक वाटेल तसे.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** ठिक आहे. धन्यवाद. विषय वाचला होता.पहिला विषय पास. दुसरा घ्या.

**<u>महापालिका सचिव:-</u>**विषय क्र. १ पास इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

**<u>सभापती, श्री.दिपक सिरवानी:-</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑**विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक ७/०७/२०२१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव :—श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नांव :— श्री. गजानन शेळके

**<u>स्थायी समिती ठराव क्र. ३४ अ</u>** **<u>दिनांक : २०/०८/२०२१</u>**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक ७/०७/२०२१ रोजीचे पृष्ठ क्र. ०१ ते ५९ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव-</u>** विषय क्रमांक २ वाचून दाखवितात.

---

⇨**विषय क्र.२**:- माहे एप्रिल, २०२१ ते जून, २०२१ अखेरचा जमा खर्चाचा अहवाल.

---

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** पास ...

**<u>महापालिका सचिव :-</u>**हा विषय पास झाला आहे, इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

**<u>सभापती, श्री.दिपक सिरवानी:-</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

☑विषय क्र.२:—माहे एप्रिल २०२१ तेजून २०२१ अखेरचा जमा खर्चाचा अहवाल.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे १९४९मधील कलम १०५ नुसार माहे एप्रिल २०२१ ते जुन २०२१ अखेर पर्यंतची जमा खर्चाचा एकत्रित अहवाल खालील प्रमाणे सादर करित आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा. ही विनंती

जमा:—माहे एप्रिल २०२१ ते जुन २०२१ च्या "अ" "ब" व "क" अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खालील प्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| मागील शिल्लक | 2840000 |
| "अ" | 8246005000 |
| "ब" | 1000000 |
| "क" | 982566000 |
| एकूण | 9232411000 |

सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | महसूल जमा | 6329270000 |
| २ | ाासकीय अनुदान | 2597500000 |
| ३ | अनामत रकमा/ दायित्वे इ. | 302801000 |
| ४ | एकुण | 9229571000 |
| ५ | प्रारंभिक शिल्लक | 2840000 |
| | एकुण :— | 9232411000 |

माहे एप्रिल २०२१ ते जुन २०२१ च्या मुळ अर्थसंकल्पात एकुण जमा रक्कम रुपये ९२३२४११०००/— अपेक्षित धरलेली होती परंतू जुन २१ अखेर अपेक्षित उत्पन्न रू.२३०८१०२७५०/—होते त्यापैकी उत्पन्न रू. २००९८९६८०७ म्हणजे मुळ अंदाजपत्रकाच्या ८७.०८ टक्के जमा झालेले आहे.

माहे, जुन २०२१ अखेर मूळ व सुधारित अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्ष निहाय खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | PARTICULARS | ESTIMATES FOR THE YEAR | PROGRESSIVE TOTAL FROM APRIL 2021 TO June 2021 | Percentage as per original estimates |
|---|---|---|---|---|
| | **OP. BALANCE** | 2840000 | | |
| **A -** | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| BUDGET | | | | |
| P-I | REVENUE INCOME | | | |
| A1 | OCTROI | 0 | 0 | 0.00 |
| A2 | PROPERTY TAX | 1380000000 | 54223798 | 3.93 |
| B 1 | RECOVERY UNDER MRTP | 3150625000 | 217458458 | 6.90 |
| B 2 | Rec Un Un-Authorised Const | 0 | 0 | 0.00 |
| C-1 | MARKETS | 0 | 0 | 0.00 |
| C2 | HOSPITAL & DISP. | 310000 | 167860 | 54.15 |
| C3 | LICENCE FEES | 275865000 | 41873295 | 15.18 |
| D | GRANTS | 2165000000 | 593801285 | 27.43 |
| E | MISCELLANEOUS | 37755000 | 12222116 | 32.37 |
| P-II | CAPITAL RECEIPTS (LOANS) | | | |
| A | REVENUE FROM MPL. PROP | 502850000 | 772700 | 0.15 |
| B | GRANTS | 432500000 | 354813000 | 82.04 |
| C | LOANS | 0 | 0 | |
| P-III | EXTRA ORD. HEADS | 301100000 | 15458085 | 5.13 |
| Total - A-Budget-Income | | 8246005000 | 1290790597 | 227.28 |
| B – BUDGET | | | | |
| PART 1 | REVENUE RECEIPTS | 1000000 | 0.00 | 0.00 |
| PART 2 | CAPITAL RECEIPTS | 0 | 0.00 | 0.00 |
| C – BUDGET | | | | |
| P-I | REVENUE INCOME | | | |
| A | WATER BILL COLLECTION (TAX) | 500000000 | 19762844 | 3.95 |
| A | WATER BILL COLLECTION (W.S) | 50000000 | 1111749 | 2.22 |
| A | CORP. RATES & TAXES | 421000000 | 17157196 | 4.08 |
| B | LICENCE & FEES | 9790000 | 9100 | 0.09 |
| C | MISCELLANEOUS | 75000 | 13421 | 17.89 |
| P-II | CAPITAL RECEIPTS (LOANS) | 0 | 0 | |
| P-II | CAPITAL RECEIPTS (GRANTS) | 0 | 0 | 0.00 |
| P-III | EXTRA ORD. HEADS | 1701000 | 10000 | 0.59 |
| Total - C-Budget- Income | | 982566000 | 38064310 | 3.87 |
| A, B & C TOTAL INCOME (Without Opening Bal.) | | 9229571000 | 1328854907 | 14.40 |
| A, B & C TOTAL INCOME (With Opening Bal.) | | 9232411000 | 2009896807.00 | 21.77 |

१) मालमत्ता कर विभाग:—सुधारीत अर्थसंकल्पात मालमत्ता कर विभागाकडून माहे एप्रिल २०२१ ते जुन २०२१ मध्ये एकूण रक्कम रू १३८००००००/— स्वरूपात जमा होणे आवश्यक होते. मात्र प्रत्यक्षात जून, २०२१ अखेर रक्कम रू.

५४२२३७९८/— एवढी जमा झाली आहे. ती वरील अर्थसंकल्पिय तरतूदीच्या ०३.९३ टक्के एवढी अल्प प्रमाणात जमा झाली आहे. त्यामुळे मालमत्ता कर विभागाने प्रलंबीत मालमत्ता कर वसुली बाबत ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच ज्या इमारतींची कर निर्धारणा (Assessment ) केल्या नाहीत त्या त्वरीत कर निर्धारणा करून कर लावल्यास महापालिकेस उत्पन्न प्राप्त होईल.

२) मालमत्ता विभाग :—१) मालमत्ता विभागाकडून शहरातील पार्किंग स्थळाचे सर्वेक्षण करून पार्किंग स्थळे निर्माण करावी, ज्यामुळे महापालिकेस उत्पन्न प्राप्त होईल. २) रिकाम्या मालमत्ता भाडे तत्वावर वापरात आणून उत्पन्न वाढविणे. ३) व्यवसाय परवाना धोरण अवलंबून उत्पन्नाचे स्रोत वाढविणे. ४) महापालिकेच्या मालमत्तेचे सुधारित दर निश्चित करून उत्पन्न वाढविण्या साठी उपाययोजना करणे

३) पाणी पुरवठा विभाग:— १) सुधारीत अर्थसंकल्पात पाणी पट्टीसाठी माहे एप्रिल २०२१ ते जुन २०२१ मध्ये एकुण रूक्कम रू.५००००००० /— एवढी पाणी पट्टी जमा होणे आवश्यक होते. मात्र प्रत्यक्षात रू. ११११७४९/— एवढी रक्कम पाणी पट्टी जमा झाली आहे. ती मुळ अर्थसंकल्पाच्या २.२२ टक्के एवढीच अल्प प्रमाणात जमा झाली आहे. त्यामुळे प्रलंबीत पाणी पट्टी वसुलीबाबत ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. अनधिकृत नळ जोडणी नियमाप्रमाणे दंड आकारून नियमित करून नळ कनेक्शनला मिटर लावून पाणी चोरीला आळा घालणे आवश्यक वाटते.

लेखा परिक्षण विभागास पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पन्नाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवणे शक्य होत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील जमेचे लेखा परिक्षण करण्यात येत असून अनियमितता आढळल्यास सदर बाब संबंधित विभागाच्या निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात येतात.

खर्च—

| Sr. No. | PARTICULARS | ESTIMATES April 2021 To June 2021 | PROGRESSIVE TOTAL FROM April 2021 To June 2021 | Percentage as per original estimates |
|---|---|---|---|---|
| PART I | A BUDGET -Rev.Exp. | | | |
| A1 | SALARY | 1185544000 | 338227006 | 28.53 |
| A2 | ALLOWANCE | 53600000 | 1488199 | 2.78 |
| A3 | ADM. EXP. | 148600000 | 39949790 | 26.88 |
| P | STREET LIGHT | 79000000 | 18529247 | 23.45 |
| B2 | FIRE FIGHT | 10500000 | 769755 | 7.33 |
| C1 | PUBLIC HEALTH | 345010000 | 94462197 | 27.38 |
| C2 | HOSP. & DISP. | 500966000 | 77645960 | 15.50 |
| C3 | GARDEN IMPROVEMENT | 46500000 | 3101808 | 6.67 |
| C4 | EDUCATION | 945966000 | 95137773 | 10.06 |
| C5 | P.W.D | 261400000 | 22119792 | 8.46 |
| D | WARD COMMITTEES | 218400000 | 6066449 | 2.78 |
| E | MISCELLANEOUS | 177520000 | 27323391 | 15.39 |
| | | 3973006000 | 724821367 | |
| PART II | CAPITAL EXPENDITURE | | | |
| A1 | GEN. ADM | 25000000 | 4071401 | 16.29 |
| B1 | STREET LIGHT | 178500000 | 21413719 | 12.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| B2 | FIRE FIGHT | 155510000 | 3430721 | 2.21 |
**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. सभापतीजी, मा.आयुक्त मॅडम केणेजी मला सांगा की, टंडनलाच देण्यासाठी आपल्याला इन्ट्रेस का आहे? प्रशासनाचे जे अधिकारी आहेत, सोंडेजी, उप आयुक्त आणि केणेजी तुमचा काय इनट्रेस आहे की, टंडनलाच दयायला पाहीजे. ठराव क्रमांक ६६ दिनांक २६/०३/२०२१ स्थायी समितीमध्ये ठराव पास झाला होता. आम्ही सांगितले होते की, सात दिवसामध्ये परत टेंडर करण्यात यावा की काही लोकांनी सांगितले होते की, आम्ही फ्रीमध्ये करुन देण्यात येईल. परंतु प्रशासनाने ५ महीने आपला वेळ वाया घालावला आणि ५ महीने वेळ घालावल्या नंतर आज बोलत आहेत की, हे खुप आवश्यक आहे, तर पास करा.आम्ही पास करण्यास सगळे सदस्य तयार आहेत, टंडनलाच दयायचा आहे, तुमचा इन्ट्रेस काय आहे, हे सांगा.स्थायी समितीने आपल्याला त्या वेळेस काय सांगितले, याचा अर्थ आपण बाहेर निघून जाऊ या परत चर्चा करायची आवश्यकता नाही.स्थायी समितीने आदेश दिले होते की, ६६ नंबरचा ठराव रदद करीत आहेत आणि सात दिवसाच्या आतमध्ये नविन टेंडर काढा.तर आपण असे का केले नाही, याचा अर्थ आपण स्थायी समितीचे म्हणणे मानतच नाही. भरपुर कन्सलटंट फ्रीमध्ये काम करण्यास तयार आहेत.शहराच्या हितासाठी, ५ महीने झाले टेंडर काढला नाही, परत फेरसादर केले नाही आणि आज अचानक फेर सादर करीत आहेत. याचा अर्थ आपण जाणून बुजून करीत होते की, आपला डंपिंग ग्राउंड बंद झाला पाहीजे, आंदोलन झाले की, आपण टेंडर टंडनलाच देवू आणि तुम्ही त्या प्रमाणे घेऊन आले.तर आपला यामध्ये काय आहे? आपण एवढा लेट का केला?आपण खुलासा करा.

**उप आयुक्त (आरोग्य), श्री.मदन सोंडे:-** केणे, लेट का झाला खुलासा करा, स्पष्टीकरण दया लेट का झाला?

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** केणेजी सांगा लेट का झाले? विषय पुढे चालवा.

**मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:-**सर मी बोलत आहे, ही जी कन्सलटंन्सी आहे, यामध्ये वेगवेगळे प्राजेक्ट आहेत, यामध्ये आपलयाला वेगवेगळे प्रकल्प उभे करायचे आहेत. यामध्ये वेस्ट टू एनर्जी आहे, वेस्ट टू बायो खत जो आहे, वेस्टपासून बायो गॅस आहे, त्या नंतर आपण डेब्रिजपासून प्लेवर ब्लॉक बनवू शकतो, यामध्ये इन्सुलेशन प्लांट आहे,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**जो प्रश्न विचारला आहे, त्याचे उत्तर दया, जेव्हा स्थायी समितीने दिनांक २६/०३/२०२१ बोलले की, सात दिवसाच्या आतमध्ये फेर निविदा काढा, तर आपण फेरनिविदा का काढली नाही? काय प्राब्लेम होता ते सांगा.

**मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:-**सर मी तुम्हांला तेच सांगत आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**आपण ५ महीन्यामध्ये फेर निविदा का काढली नाही?तुमचा इनट्रेस काय आहे?टंडन तुमचा नातेवाई आहे किंवा दोस्ती आहे, हे मला सांगा.

**मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:-**सर प्रशासनाने या विषयी ऑलरेडी पहीले निविदा काढली होती, निविदा कन्सलटंन्सीसाठी....

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** केणे तुम्ही फार चुकीचे बोलत आहेत, निविदा निघाली असा प्रश्न नाही त्यावेळी स्थायी समितीमध्ये हे सांगितले होते की, आपल्याकडे फ्री काम करणारा माणूस उपलब्ध आहे. मग आपण टंडनला टेंडर का दयायचे?फ्रीमध्ये काम करणा-या माणसाचे काय झाले?ते सांगा आणि ५ महीन्यापर्यंत त्याच्यावर का ॲक्शन घेतली नाही.जर कोण फ्रीमध्ये डी.पी.आर.बनवून देत असेल तर त्याला प्राधान्य दिले पाहीजे का ६६ लाख रुपये खर्च करुन त्याला प्राधान्य दिले पाहीजे आणि ही चर्चा झालेली आहे.फ्रीसाठी सात दिवसाची मुदत त्यावेळी स्थायी समितीचे सभापती आणि कमिटीने दिलेली होती.तुम्ही तो सात दिवसामध्ये जो फुकट डी.पी.आर. बनवून देणार होता, त्याचा तुम्ही विचार केला नाही.५ महीने तुम्ही घालावले आता तुम्ही त्या फुकटच्या संदर्भात आपल्याकडे त्या माणसाने पत्र दिले आहे, त्याची फाईल दिलेली आहे, तुमचे नोटींग झालेले आहे, आमच्या माहीती प्रमाणे ही वस्तुस्थिती असतांना तुम्ही महानगरपालिकेचे ६६ रुपये का खर्च करीत आहेत? जर एखादा व्यक्ती आपल्याला फुकट डी.पी.आर.दयायला तयार आहे.तर आपण महानगरपालिकेचे ६६ लाख रुपये का खर्च करीत आहे, त्याचे उत्तर दया.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** केणेजी, आपण स्थायी समितीचा आणि स्थायी समितीच्या सदस्यांचा अपमान केला आहे, ठराव क्र.६६ दिनांक २६/३/२०२१ जो आपण आमच्याकडे ठराव पाठवला होता, त्यामध्ये शेवटी क्लीयर लिहीले आहे, हा ठराव रदद करुन सात दिवसाच्या आतमध्ये परत प्रस्ताव फेर सादर करणेस निर्देश देत आहे. परंतु आपण ५ महीन्या पर्यंत काहीच केले नाही.जेव्हा संकट आले, घराला आग लागली तेव्हा आपण बोलत आहेत की, आग विझवण्यासाठी विहीर खोदावी लागेल. तर मला सांगा की, मी जास्त काहीच विचारत नाही. जर आपण सांगाल की, कन्सलटंट आपला मित्र आहे किंवा सोंडे साहेबांचा मित्र आहे, तर आम्ही सर्व पास करायला तयार आहेत. आम्ही रेडी बसलो आहेत, आपण फक्त् सांगा की, त्याच्या बरोबर चांगली मैत्री आहे. तर आम्ही पास करायला तयार आहेत. तुम्ही तसे विनंती करा आम्ही सर्व पास करु.सोंडेजी असेच आणण्याचे काय आहे, कारण की, स्थायी समिती सांगते ते आपण ऐकत नाही.तर मग आमच्याकडे परत परत का आणत आहेत?

**मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:-**सर मी बोलू इच्छितो....

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** सन्माननिय केणे साहेब, फ्रीमध्ये काम करणा-या एजन्सीचे नाव सांगा.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** केणेजी हे जे भालेराव साहेब बोलत आहेत की, ती फाईल तुमच्याकडे आली आहे का, ते फ्रीमध्ये काम करायला तयार आहे. तशी तुम्हांला किंवा सोंडे साहेबाना आणि मॅडमला त्याची माहीती असेल. तर सदस्यांच्या समोर ती माहीती ठेवा कोण सांगेल?

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**केणेजी सांगतील, केणेजी सांगा जरा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** माझा एक प्रश्न आहे, केणेजी, ज्या वेळी आपण टेंडर कॉल केले होते, त्यावेळी फ्रीमध्ये जी कंपनी आपल्याला सेवा दयायला तयार होती, त्या कंपनीने फ्रीमध्ये सेवा दयायला प्रस्ताव दिला आहे का? किंवा त्यांनी टेंडरमध्ये भाग घेतला होता का?हा पण खुलासा करा आणि एन.जी.पी.ची काय ऑर्डर आहे?ते पण सांगा.

**मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:-**सर मी सांगतो,

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** त्यांनी सगळयांना पत्र दिले आहे ना, सभापती, सदस्य सगळयांना पत्र दिले आहेत.

**मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:-**मा. सभापती माझाआवाज येत आहे का सर, मी बोलू.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**जर कोणाचे सोंडे साहेबांचा यामध्ये काही असेल...

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** हा विषय रदद झालेला आहे, त्यामुळे टेंडर रदद करण्यात यावा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**नाही, नाही, मॅडम रदद का करणार स्थायी समितीमध्ये पहिलेच झालेला आहे, हा स्थायी समितीचा अपमान आहे, हे काय चालले आहे. जेव्हा स्थायी समितीचे १६ सदस्य ठराव रदद करीत आहेत तर प्रशासन लक्ष देत नाही आणि ५ महिन्यानंतर परत घेऊन येतात ही काम करण्याची पध्दत आहे का?आपण लोक तसेच घेऊन आले आहे का? सहा सहा महिने टेंडर काढत नाहीत, मुदतवाढ, मुदतवाढ आम्ही सांगत आहेत की, सात दिवसामध्ये टेंडर काढा ते तुम्ही करीत नाहीत. आता घेऊन आलेत आणि सांगतात की, इमर्जेन्सी आहे म्हणून यासाठी वेळ तर लागेल ना, कोणी सांगेल ५ (२) (२) मध्ये करा. जर कोणाचा आहे, यामध्ये शंका आहे, असे बोलून टाका. आम्ही पास करुन देवू....

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** टंडनसाठी सभा दोन -दोन, तीन-तीन वेळा रदद झाली आहे.

**अतिरिक्त आयुक्त, श्रीम. करुणा जुईकर आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ्:-**सन्माननिय सभापती, सन्माननिय सदस्य,मी सगळयात पहिल्यांदा विभाग प्रमुख आणि उप आयुक्त अत्यंत वाईट गोष्ट आहे. जर एखादा ठराव गेल्या स्थायी समितीमध्ये झाला होता, त्याची खातरजमा न करता, पुन्हा हा तो ठराव आणला आहे.त्या बददल संबंधित विभाग प्रमुख व उप आयुक्त यांच्याकडून खुलासा मागविण्यात यावा. नंबर दोन सन्माननिय सभापती व सन्माननिय सदस्यांना विनंती आहे की,....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** त्यांच्यावर कारवाई पण करण्यात यावी.

**अतिरिक्त आयुक्त, श्रीम. करुणा जुईकर आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ्:-**होय सर त्याच्यामध्ये जर तथ्य आढळल्यास सर स्पष्टीकरण पण घेण्यात येईल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**आताच घ्या ना स्पष्टीकरण.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** हा ठराव रदद झाला आहे, मागे घेण्यात यावा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** हे बघा यामध्ये केणे आणि उप आयुक्त यांना खुलासा करुन दया, आम्ही पण प्रश्न विचारले आहेत, हा टेंडर जेव्हा झाला होता, तेव्हा फ्रीमध्ये देणारी व्यक्ती किंवा कंपनी आहे, त्यांनी

टेंडरमध्ये भाग घेतला होता का? किंवा आपण सांगत आहेत की, राजू कुकरेजा एन.जी.पी.मध्ये केस चालू आहे, त्यामध्ये ऑर्डर काय झाली आहे?ते पण सांगा.

**मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:-**सर मी खुलासा देवू इच्छितो सर आवाज येत आहे का?

**सदस्या, श्रीम. कांचन लुंड:-** होय, येत आहे.

**उप आयुक्त (आरोग्य), श्री. मदन सोंडे:-** मा. सभापती, सन्माननिय सदस्य, या संदर्भात का उशिरा झाला आणि का परत सादर केला त्याबाबत आम्ही लेखी खुलासा देवू आणि आम्ही फेर सादर करण्याबाबत आम्ही विषय मागे घेत आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** कारवाई काय करणार ते सांगा. आपण फाईलच लपवून ठेवतात तर काय करणार सात दिवसाच्या आत झाले पाहीजे.

**उप आयुक्त (आरोग्य), श्री. मदन सोंडे:-**प्रस्ताव फेर सादर केला होता आम्ही..

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**मुदतवाढ काय म्हणून करायची?

**महापालिका सचिव:-** हा विषय मागे घेतल्याने संपुष्टात आला आहे.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** नंतरचा विषय घ्या.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** या संदर्भात सात दिवसाच्या आत कोणी जर महापालिकेला डी.पी. आर.मोफत बनवून देत असेल, ती संस्था जर पुढे येत असेल तर तसा प्रस्ताव करा तुम्ही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** असे करता येणार नाही, असे करु शकत नाहीत. मा. सभापतीजी, माझे म्हणणे हे आहे की, जी पण व्यक्ती किंवा संस्था उल्हासनगर महानगरपालिकेला आपली सेवा फ्रीमध्ये देत असेल त्यांना टेंडरमध्ये पार्टीसिपेट करायला पाहिजे. आपण संस्थेच्या बाजूने बोलू नका सर मी पण या सभेमध्ये होतो, मी अनुमोदक आहे, मला परिस्थितीची माहीती आहे, हा प्रश्न मी विचारतो की, ज्या व्यक्तीने टेंडरमध्ये पार्टीसिपेट केले नाही तर त्याची ऑफर आपण स्विकारु शकता का?

**महापालिका सचिव:-** सात दिवसामध्ये निविदा मागविल्यास ते एक रुपया का होईना भरु शकतील.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**आपण माझे ऐकुन घ्या, आधी जो ठराव झाला आहे, सात दिवसाच्या आतमध्येनिविदा मागवा, ज्यांना भाग घ्यायचा आहे, त्यांना घेवू दया.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** ठिक आहे, चला.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**भालेरावजी, यांनी सांगितले की,जो फ्रिमध्ये देत आहे, काम त्यांनाच दयायला पाहीजे. मी सांगितले की हा ठराव आपण करु नाही शकत का?असा ठराव पास करु शकत नाही का?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** पुढचा विषय घ्या.

**महापालिका सचिव:** ठिक आहे, हा जो आहे, तो संपुष्टात येत आहे आणि जुना लागू होत आहे आणि सात दिवसामध्ये.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** प्रशासनाने विषय मागे घेतला आहे.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** आज पासून सात दिवसामध्ये.

**सभापती, श्री.दिपक सिरवानी:-**सदरचा विषय प्रशासनाने मागे घेतला आहे.

**महापालिका सचिव**-विषय क्रमांक ७ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.७:-उल्हासनगर-४ प्रभागक्र.१४ येथेबॅरेकक्र.१३०७ सिंधनॅशनलस्कुलजवळसंरक्षणभिंत वनालाबनविणे.**

---

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**पास केले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-**कशाची भिंत आहे काय आहे कसे आहे काहीच नाही लगेच पास

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**मी राजेश च्या विरुध्द नाही टंडन च्या विरुध्द बोलत आहे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-**मा. चेअरमन साहेब, मा.अतिरिक्त आयुक्त मॅडम, हे नाल्याचे काम आहे बॅरेक नं.१३०७ आणि सिंध नॅशनल स्कुलच्या मागे खुप मोठा नाला आहे.तो पुर्ण तुटलेला आहे.पावसामुळे आजूबाजूचे पुरामुळे आजुबाजूचे झोपडी वाल्मिकीनगर आहेत त्या सर्व पाण्याने भरले होते.आयुक्त साहेबांनी प्रत्यक्ष भेट दिली होती.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-**माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, आम्हांला ऐकायला येत नाही. ते काय बोलत आहेत. कृपया शांत रहा.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-**मा. आयुक्तांनी प्रत्यक्ष पाहणी करुनइस्टीमेट बनवायला सांगितले होते, हे काम अत्यंत आवश्यक आहे.यात १२५ मी.चा नाला आहे त्याला रिटर्निंग वाल बनवायचे आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-**बॉटम बनवणार काय?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-**नाही सर बॉटम नाही बनवणार हे भिंतीचे काम आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** नाही आपण सांगितले की, नाला बनवणार. नाला बनवण्याचा अर्थ काय होतो.

**सदस्य, श्री राजेश वधारिया:-**नाला खुप मोठा आहे त्यात बॉटम टिकणार नाही. दोन्ही बाजूला भिंत बनवणार आणि आर सी सी करुन सोडून देणार.

**महापालिका सचिव:-**एक मिनिट मी ठराव वाचते. सर ठराव वाचत आहे, यात आता हे बोलले की, नाला नाही बनवणार

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-**जसा विषय आला आहे, तसेच पास करु. बॉटम नाही बनवणार. त्यांची मर्जी.ही तांत्रिक बाब आहे मी इंजिनियर नाही.

**महापालिका सचिव:-**संरक्षण भिंत व नाला बनविणे या कामाकरीता निविदाकार मे. जय भारत यांना ६८ लाख ३२ हजार आठशे एवढया रक्कमेच्या मान्यता देत आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**इतिवृत्ताची वाट न पाहता, पास...पास...

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-**पुढचा विषय

**महापालिका सचिव:-**विषय क्र. ७ पास झाला आहे.

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री.दिपक सिरवानी:-सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑ **विषय क्र.७ :-** उल्हासनगर-४ प्रभागक्र.**१४** येथेबॅरेकक्र.**१३०७** सिंधनॅशनलस्कुलजवळ **संरक्षण भिंतवनालाबनविणे.**

**प्रस्तावना**

उल्हासनगर-४ प्रभाग क्र.१४ येथे बॅरेक क्र. १३०७ सिंध नॅशनल स्कुल जवळ संरक्षण भिंत व नाला बनविणेआवश्यकअसल्यानेसार्वजनिकबांधकामविभागातर्फेसदरकामाचेरुपये ६८,३२,८००/- एवढयाखर्चाचेप्राकलनतयारकरुनसदरप्राकलनासप्रशासकीयववित्तीयमान्यताघेण्यातआलीवनियमाप्रमाणेसदरकामाचीनिविदाप्रक्रियाकरण्यातआलीत्याचीसविस्तरमाहितीखालीलप्रमाणेआहे.

**तक्ताक्र.१**

| | | |
|---|---|---|
| १. | प्राकलनीयखर्च | रु.६८,३२,८००/- |
| २. | निविदाप्रसिध्दकरण्याचादिनांक | दिनांक २८/०५/२०२१ |
| ३. | निविदाविक्रीकालावधी | दिनांक २८/०५/२०२१ ते २१/०६/२०२१ |
| ४. | भरलेल्यानिविदासादरकेल्याचाअंतिमदिनांक | दिनांक २२/०६/२०२१ |
| ५. | प्रथममुदतवाढ | - |
| ६. | द्वितीयमुदतवाढ | - |
| ७. | तृतीयमुदतवाढ | - |
| ८. | तांत्रिकभागउघडल्याचादिनांक | दिनांक २५/०६/२०२१ |
| ९. | आर्थिकभागउघडल्याचादिनांक्र | दिनांक १४/०७/२०२१ |
| १०. | विक्रीकेलेल्यानिविदांचीसंख्या | ५ |
| ११. | प्राप्तझालेल्यानिविदांचीसंख्या | ५ |

सदरनिविदेचातांत्रिकभागदिनांक २५/०६/२०२१ रोजीनिविदासमितीसमोरउघडण्यातआला. त्यामध्ये**१) मे. गोल्डनकन्स्ट्रक्शन २) मे. जयभारतकन्स्ट्रक्शन ३) मे. झा. पी. ॲण्डकंपनी ४) मे. एम.सी. कन्स्ट्रक्शनकंपनी ५)मे. रविएंटरप्रायजेस**यांनीनिविदासादरकेल्याआहेत. त्याचीसविस्तरमाहितीखालीलप्रमाणे :

॥**तक्ताक्र.२**

| **अ. क्र.** | **निविदाकाराच्यानिविदेमधीलबाबी** | **मे. गोल्डनकन्स्ट्रक्शन** | **मे. जयभारतकन्स्ट्रक्शन** | **मे. झा. पी. ॲण्डकंपनी** | **मे. एम.सी. कन्स्ट्रक्शन** | **मे. रविएंटरप्रायजेस** |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | निविदाप्रपत्रकाच्याखरेदीचीरक्कमभरलेलीआहेका? | होय | होय | होय | होय | होय |
| २. | इसारारक्कमभरलेलीआहेका? | होय | होय | होय | होय | होय |
| ३. | अद्यावतआयकररिटर्नभरल्याचीपावती (३ वर्ष) | होय | होय | होय | होय | होय |
| ४. | कामाचाअनुभव | होय | होय | होय | होय | होय |
| ५. | पॅनकार्डाचीप्रत | होय | होय | होय | होय | होय |
| ६. | संस्था/कंपनीनोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनीइत्यादीचेदस्ताऐवज | होय | होय | होय | होय | होय |
| ७. | निविदेमध्येदिलेल्यानमुन्यातरु.५००/- च्यास्टॅम्पपेपरवरप्रतिज्ञापत्रजोडणे आवश्यकआहे. | **नाही** | होय | होय | होय | **नाही** |
| ८. | मागील ३ वर्षाचेवार्षिकउत्पन्न | होय | होय | होय | होय | होय |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९. | पात्र/अपात्र | **अपात्र** | **पात्र** | **पात्र** | **पात्र** | **अपात्र** |

उक्ततक्त्यातनमुदकेलेल्यामाहितीनुसारनिविदाकांराच्याकागदपत्रांचीछाननीकेली. सदरनिविदेमध्ये**१) मे.रवीएंटरप्रायझेस २) मे.झा.पी. ॲन्डकं. ३)मे. गोल्डनकंस्ट्रक्शन ४) मे. जयभारतकंस्ट्रक्शन५) मे. एम.सी. चंदनानीकंस्ट्रक्शनकं.** यांनीनिविदासादरकेल्याआहेत. दि.०१/०७/२०२१ रोजीच्यापत्रान्वयेरु. ५०० च्यास्टँपपेपरवरप्रतिज्ञापत्रसादरकरणेबाबतनिविदाकारांनाकळविण्यातआलेहोते. परंतुसदरनिविदेमध्ये**१) मे.रवीएंटरप्रायझेस २) मे.गोल्डनकंस्ट्रक्शन**यांनीप्रतिज्ञापत्रसादरकेलेनाहीत्यामुळेते**अपात्र**ठरलेआहेत. तसेच**१) मे.झा.पी. ॲन्डकं. २) मे. जयभारतकंस्ट्रक्शन**व **३) मे. एम.सी. चंदनानीकंस्ट्रक्शनकं.** हेनिवादाकार**पात्र**ठरल्यानेत्यांचादुसराआर्थिकदराचालिफाफाउघण्यातआलात्याचीमाहितीपुढीलप्रमाणेआहे.

**तक्ताक्र.३**

| अ.क्र. | निविदाकारांचेनाव | दिलेलेदर (टक्केप्रमाणे) |
|---|---|---|
| **१.** | **मे. झा.पी. ॲन्डकं.** | ४.००० % **टक्केजास्त** |
| **२.** | **मे. जयभारतकंस्ट्रक्शन** | ०.०९० % **टक्केकमी** |
| **३.** | **मे. एम.सी. चंदनानीकंस्ट्रक्शनकं.** | २.००० % **टक्केजास्त** |

वरीलतक्त्यातनमुदउल्हासनगर-४प्रभागक्र.१४येथेबॅरेकक्र.१३०७सिंधनॅशनलस्कुलजवळसंरक्षणभिंतवनालाबनविणेयाकामाकरीतानिम्न दराचेनिविदाकारमे. जयभारतकंस्ट्रक्शनयांनी०.०९०%टक्केकमीदरसादरकेलेकेले आहेत. तरी प्राकलनिय खर्च रु.६८,३२,८००/- एवढ्या रक्कमेच्या कामाकरीता निम्न दराचे जयभारत कंन्स्ट्रक्शनयानिविदाकाराशीसंविदाकरणेसस्थायीसमितीच्या मान्यतेकरीता प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.३९दिनांक : २०/०८/२०२१**

**सुचकाचे नाव :—श्री. राजेश वदारिया**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता**

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार** उल्हासनगर-४ प्रभाग क्र.१४ येथे बॅरेक क्र. १३०७ सिंध नॅशनल स्कुल जवळ संरक्षण भिंत व नाला बनविणे याकामाकरीतानिम्न दराचेनिविदाकारमे. जयभारतकंस्ट्रक्शन यांना रु.६८,३२,८००/- एवढ्या रक्कमेच्या कामाकरीतामान्यता देण्यात येत आहे.

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही/—**

**अनुमोदकाची सही/—**

**सर्वानुमते**

**सभापती/पीठासीन अधिकारी**

**स्थायी समिती सभा**

**उल्हासनगर महानगरपालिका**

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ८ वाचून दाखवितात.

---

**⇨ विषय क्र ८:—उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग/नगररचना विभाग /पाणी पुरवठा विभाग/प्रभाग समिती कार्यालय इत्यादी विभागांसाठी ठेकेदारामार्फत अभियंता पुरवठा करणे बाबत.**

---

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** डिफर करा. विषय डिफर.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** डिफर का त्यांना सांगू तर दया. कोण बोलले डिफर करा. मी नाही बोललो.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** सांगा काय आहे हे.

**सदस्य, श्रीमती कांचन लुंड:-** हा बोला बोला आवाज येतोय.

**सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-** बोला बोला साहेब, तुमचा आवाज येत आहे.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**नमस्कार मा. सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्य गण आणि अतिरिक्त आयुक्त मॅडम आणि सर्व आमचे अधिकारी सर आपल्या महापालिकेमध्ये अभियंत्याची कमतरता खुप आहे. सध्या ५-६ अभियंत्यांवर आपले कामकाज चालू आहेत. आपण यापूर्वी काही मुलाखती घेवून काही अभियंते नियुक्त केले होते. त्यांच्या मुदतवाढीचा प्रस्ताव आपण स्थायी समितीपुढे सादर केला होता परंतु स्थायी समिती आपले विधी अभिप्राय आल्यावर पुढे त्यांना मुदतवाढ देवू नये जर मुदतवाढ दिली तर त्यांचे न्यायालयीन बाब निर्माण होवून नियमित करण्याची बाब उपस्थित होवू शकते. म्हणून ती मुदतवाढ नाकारली आहे. त्यामुळे सध्या आपल्याकडे एकही अभियंता नाही पद कार्यरत नाही आहेत. त्यामुळे कामावर बराच परिणाम होत आहे. हे विचारात घेवून आपण हे कनिष्ठ अभियंते आपल्याकडे २० अभियंते ठेकेदारामार्फत घेण्याचा प्रस्ताव आपण दिलेला आहे. निविदा काढलेली आहे २-४ दिवसात उघडले जाणार आहे. आणि या अभियंत्यांना साधारणत: आपण त्यांचे जे दर ठरलेले आहेत. रु.१५६०/- दर दिवसाप्रमाणे २२ दिवसांचा पगार प्रत्येकी आपला पकडला जातो आणि त्यानुसार २० अभियंत्यांचा रु.६,८६,४००/- असा वेतनाचा खर्च येणार आहे.रु.३४,३३०/- प्रमाणे सर्व अभियंते घेतले तर आपण सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग, नगररचना विभाग यांचेकडे जी अभियंत्यांची उणीव/गरज आहे. तिथे आपण पुरवु शकू. त्या कामावर काही नियंत्रण आणण्यासाठी काही होवू शकेल. म्हणून प्रस्ताव आपल्यासमोर मांडलेला आहे. कृपया स्थायी समितीला माझी विनंती आहे. या प्रस्तावाला मान्यता दयावी.

**सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-** नाईकवाडे साहेब, मागच्या वेळेस जे अभियंता घेतले होते, त्यांनाच परत घेतले तर नाही चालणार का?

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-**नाईकवाडे साहेब...

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**हा बोला हॅलो आवाज येत नाही आपला. आपला आवाज बरोबर येत नाही सर.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-**नाईकवाडे साहेब याच्या आधी अभियंता आपण नियुक्त केले होते त्यांना प्राधान्य देणार का नाही असे कलवंतजीचे म्हणणे आहे. विचारत आहेत.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-** नाईकवाडे साहेब, यामध्ये आपण ठेकेदाराचे इंजिनियर घेत आहेत, आपण या पहीले जे इंजिनियर घेतले होते, त्यांना घेणार आहेत का?

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**हॅलो, आपण यापुर्वी येथे जे लोक काम करत होते त्यांना आपण ठेकेदारामार्फत प्राधान्य देवू शकतो आपण थेट नाही घेऊ शकणार.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** तुम्ही म्हणता त्यांना प्राधान्य देण्यात येणार नाही. ते आम्हांला मान्य आहे, तो ठेकेदार कसा प्राधान्य देणार त्यांना. याचे उत्तर दया आम्हांला तुम्ही.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>**आपण ठेकेदारामार्फत त्यांचा अहवाल मागवू, मुलाखती घेवू आणि त्याप्रमाणे आपण त्यांना घेणार.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>**त्यांनाच घेणार याची गॅरेंटी काय? म्हणजे हा टेंडर तुम्ही मॅनेज केला आहे का?

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>**सर आपण अनुभवी माणुस असेल ते लोक जर इच्छुक असतील तर आपण ठेकेदाराला ते लोक आम्हांला पाहिजेत त्यांना नियुक्त करा असे सांगू ना सर. तशी अडचण नाही येणार.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>**सन्माननीय नाईकवाडे साहेब. अरे बोलू दया ना. ही निविदा तुम्ही कोणाला देणार आहेत. एक मिनिट

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>**ई-निविदा केली आहे सर.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** ही निविदा तुम्ही काढली आहे हि कुठल्या एजन्सीला देणार काही असे निश्चित झाले आहे का?

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>**ई-निविदा केलेली आहे आपण...

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** तुमचा आवाज येत नाही.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>**ई-निविदा केलेली आहे

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>**ई- निविदेमध्ये श्री. भगवान भालेराव यांनी टेंडर भरला तर श्री. भगवान भालेराव स्वत: इंजिनियर आहेत का? बी. सिव्हील आहेत का याची काय तपासणी करणार आहात तुम्ही हा विषय आपण डिफर करु चर्चा करा आणि मग हि जी कंपनी आहे तुम्ही कुठल्या कॉलेजला तिथे इंजिनियर आहेत का. एखादया साध्या मजूर संस्थेला तुम्ही निविदा देणार आहात का. कुणी इंजिनियर आहेत का याची खात्री आपल्याला करावी लागेल तशी त्याची नोंद आहे का. तुम्ही ठेकेदाराला देता तेव्हा त्याच्याकडे कशाच्या आधारावर एवढे इंजिनियर तुम्हांला मिळणार आहेत. ही कुठली कॅटेगिरी लावणार आहात त्या लोकांना तुम्ही त्यांना तर मला असे वाटते एखादया इंजिनियर कॉलेजला जिथे जिथे बी. सिव्हील किंवा डिप्लोमा होल्डर इंजिनियर सिव्हीलच्या जागी असतील त्या कॉलेजला कळवा ते कॉलेज आपल्याला इंजिनियर पुरवतील. आणि त्याच्या नंतर ही प्रकिया होउ शकते. तुम्ही एखादया मजूर संस्थेला किंवा एखादया कन्संट्रक्टच्या कामाला इंजिनियर मागवत असाल तर ते कसे देणार. इथे उल्हासनगरला अशी परिस्थिती आपल्याकडे आहे की, ठेकेदार तोच, अन्न कोव्हिडच्या मेडिसीन देणारा ठेकेदारपण तोच, आणि बेड देणारा ठेकेदार तोच, जेवण देणारा पण ठेकेदार तोच. ही पध्दत जरा बंद करा.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>**बोलू का मी.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>**हा बोला.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>**साहेब आपण निविदेमध्ये जे आपल्याला एज्युकेशन पात्रतेची लोक पाहिजे आहेत. त्याचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. आपल्याला बी. सिव्हील किंवा डिप्लोमा होल्डरर्सच आपल्या आर. आर. मध्ये जे शैक्षणिक पात्रता दिलेली आहे. त्या पात्रतेची लोक हवी आहेत. या स्पष्ट उल्लेख केलेला आहे. आपल्या एकतर थेट आपल्याला घेता येत नाही. थेट भरती करता येत नाही म्हणून तात्पुरती व्यवस्था म्हणून आपण ही व्यवस्था केलेली आहे आणि जर आपल्याला हे मनुष्यबळ पुरवणा-या संस्थेमार्फत आपल्याला निश्चित केलेल्या शैक्षणिक पात्रतेची लोक नाही मिळाली तर आपण घेणार नाही. जी शैक्षणिक पात्रता निश्चित केलेली आहे त्यांची आणि अनुभवी लोक मिळाली तरच आपण नियुक्त करणार त्याव्यतिरिक्त कुठल्याही अपात्र लोकांना आपण कोणत्याही परिस्थितीत इथे घेणार नाही. तसे कुठलेही काम करणार नाही.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>**नाईकवाडे साहेब माझा एक साधा विषय आहे की, तुम्ही जाहिराती काढून नविन इंजिनियर मागवा. जसे आपण जाहिरात काढून पुर्वी इंजिनियर घेतले होते, जशी तुम्ही जाहिरात काढा आणि त्यांची मुलाखत घेता तसेच मुलाखत घ्याआणि त्याचे इंजिनियर मागवा आणि बाकी ठेकेदारी पध्दत आता बंद करा.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-**मा. सभापतीजी..

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**मा. सभापतीजी, मा. आयुक्त मॅडम, सर मला दोन तीन या विषयाची माहिती दया. एक जे ११ इंजिनियर आमच्याजवळ होते. ज्यांचा वेळ समाप्त झाला आहे. आणि आता आता सर्व सदस्य त्याच्यां जी मनातील गोष्ट होती ती, समोर आली आहे. जर ठेकेदार घेणार तर ते ११ लोक आले पाहिजेत. याचा अर्थ असा आहे की हे ११ लोक शहरात किती दिवस काम केले चांगले केले आहे. ही एक समोरा समोरील गोष्ट लक्षात आली. असे जर नाही आहे तर मग या गोष्टीचा उल्लेख का करायचा की, जे निविदा आहे जो पण ठेकेदार आहे तो त्या ११ लोकांना घेईल किंवा बाहेरच्या लोकांना घेतील अजून कुठून पण घेतीलआमचे बोलणे असेल जोपण ठेकेदार घेणार आहेत त्यांची मुलाखत कोण घेणार तो लायक आहे किंवा नाही. एक त्यांचे शैक्षणिक पात्रता काय आहेगोषवा-यामध्ये ते आले पाहिजे व निविदेमध्ये पण आले पाहिजे. २. जर ठेकेदार २० लोक दिले आणि मुलाखत पण रदद झाल्या तर दुसरे ठेकेदार मागवावे लागतील या सर्व गोष्टी निविदेत असल्या पाहिजेत कारण की, आम्ही ११ लोकांना....

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** ६-६ महिन्यांचा करु शकतो.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**नाही करु शकत.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**बोलू का सर.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**जर आम्ही ११ लोकांना आम्हांला इंजिनियर पाहिजे सितलानी बसले आहेत. ते खुप त्रस्त आहेत. आमचे जे इंजिनियर आहेत अधिकारी आहेत त्यांना खुप त्रास होतो. ११ इंजिनियर ते खुप काम करीत होते, आणि हा क्रिटीकल विषय आहे की एक निविदा काढली पाहिजे. आवश्यक आहे कारण की खुप ...

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**बोलू का सर.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**नाईकवाडे साहेब, आता एक मिनिट आता तुम्ही मला सांगा की, इंजिनियरचा ठेका एखादया मजूर कामगार संस्थेने घेतला मजूर संस्थेचा सभासद, चेअरमन पासूनचे सर्व सभासद जे २५ सदस्य असतात. सगळे मजूर असतात. त्यांच्यामध्ये कुशल कामगार नसतो. त्याच्यामध्ये फार तर एखादा मिस्त्री असू शकतो किंवा दोन मिस्त्री असू शकतात. माझी स्वत:ची मजूर संस्था होती मी ती आता काढून टाकली आहे. ती दुसरीकडे दिली आहे,पण मी तुम्हांला सांगतो, २५ लोक जे एक मजूरच असतात. आता तुम्ही सांगा एक मजूर इंजिनियर बी. सिव्हील आहे डिप्लोमा आहे हे कसे सांगु शकतो?

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**साहेब, ऐकुन घ्या, मी बोलू का?नाही नाही साहेब एक मिनिट मजूर संस्था

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**मी बोलू ज्या लोकांनी ६ महिने काम केले त्यांना परत आपण घेऊ शकत नाही का? ६ महिन्यानंतर ब्रेक देदवून कृपया याचा खुलासा करा.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**यापुर्वी मी बोललेलो आहे. की आपल्याकडे आपण प्रस्ताव आणला होता. स्थायी समिती समोर मुदतवाढ देण्याबाबत आणि त्याचे विधी अभिप्राय घेण्यासाठी आपल्याला स्थायी समितीने आदेशित केले होते की स्थायी समितीच्या आदेशानुसार आपण विधी अभिप्राय घेतलेले आहे. विधी अभिप्रायामध्ये जर का जे कार्यरत लोक होते त्यांचे ४० दिवस जर फायनान्समध्ये भरले तर त्यांना आपल्याला नियमित करण्याची वेळ येवू शकेल आणि तसे होवू नये म्हणून स्थायी समितीनेच आपल्याला आदेशित केले की, अशा प्रकारे मुदतवाढ देवू नये. मुदतवाढ दिली नाही बंद झाले आपले मुदतवाढ दिली नसल्यामुळे...

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**साहेब लक्षात ठेवाआपण नियुक्ती देतातना कुठल्या नियमानुसार घेतो आता आपण चार उपआयुक्त महानगरपालिकेने घेतले आहेत, चार पैकी चारही परत पाठवा. आणि चारहींना आम्ही तात्पुरत्या स्वरुपात घेतो ना. निविदा काढून. असे कुठे होते का?

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**ऐकून घ्या साहेब.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**आपण कुठल्या पदासाठी आपण हे करतो ते तरी बघा.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** खुप वेळेपासून मी वाट बघत होतो की, आपण मला बोलण्याचा मोका देतील.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** बोला बोला.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-**धन्यवाद! सभापतीजी, मी सर्व सदस्यांना आठवण करुन देवू इच्छितो की, याच स्थायी समितीमध्ये मी बोललो होतो की, ज्या पण इंजिनियरचे २४० दिवसांची उपस्थिती लागली तर तो आपल्यावर दावा दाखल करेल की, मला कायम स्वरुपी नोकरी दया आणि कायदयाच्या हिशोबाने आपल्यावर बंधनकारक असेल त्यांना कायम स्वरुपी करायला लागेल. तर महानगरपालिकेने आपल्या विधी विभागाची सल्ला घेतला त्यांनी पण माझ्या म्हणण्याला प्रमाणीत केले की, जर आपण कोणत्याही इंजिनियरला किंवा व्यक्तीला जसे २४० दिवस कामावर ठेवता तर तो कायम स्वरुपी नोकरीसाठी अधिकार प्राप्त होतो. याचा अर्थ काय आहे? दुसरा ज्या ११ लोकांना आपण साधी मुलाखत घेवून २० हजाराच्या नोकरीवर घेतले. आपण त्यांना कायम केले व त्यांचे पगार ७० हजार केले. आणि बाकी लोकांना त्यात भाग घेण्याचे नाही ठेवला. जर आपण पहिले ११ चे ११ जसे पद भरतात. तसे मुलाखतीसाठी लोकांना बोलवत होतो आणि आपण त्यांना सांगत असतो . तर आपण या ११ लोकांपेक्षा जास्त शैक्षणिक पात्रता असलेले लोक, जास्त अनुभव असलेले लोक, त्यांच्या त्या पगारात मिळत होते. आपण पगार देणार २० हजार. तर आपल्याला लोक पण तसेच मिळणार. ज्यांना कुठे काम नाही मिळत ते २० हजारात आपल्याकडे काम करणार. आता आपण त्यांना पगार दिला आहे ३४,३२० रुपये. ३४,३२० रुपयामध्ये कनिष्ठ अभियंताची शैक्षणिक पात्रता माझ्या हिशोबाने बी. ई. सिव्हील असलायला पाहिजे. ज्याने कमीत कमी आम्हांला बी. ई. सिव्हील काही इंजिनियर मिळतील. मी आपल्याला एका गोष्टीचे उदाहरण देतो की, एक बिल्डींग होती विकास पॅलेस त्याच्या इंजिनियरने सर्टिफाईड करुन दिले की, ही बिल्डींग माझ्या नजरेसमोर दुरुस्ती झाली आहे व ही आता राहण्यास योग्य आहे. तर सार्वजनिक बांधकाम विभागाने सांगितले की, आम्ही ही सर्टीफाईड नाही करु शकत. याचा अहवाल बरोबर आहे की चुकीचा. का नाही करु शकत की, आमचा शहर अभियंताच डिप्लोमा होल्डर आहे. आज डिप्लोमा होल्डर, आपले शहर अभियंतास्ट्रक्चरल ऑडीटचा रिपोर्ट कसे बघणार? आम्हांला भरतीची गरज आहे. परंतु मजबुरी आहे की, महाराष्ट्र शासन याची मंजूरी देत नाही. त्यासाठी आम्हांला ठेकेदाराकडून २० लोक बी. ई. सिव्हील शैक्षणिक पात्रता असलेले आणि त्यासोबत त्यांना ॲटोकॅड ची पण माहिती असायला हवी. कारण की आजकाल काम ॲटोकॅडवरतीच चालत आहे. जसे अकांउटचे काम टॅलीवर चालते. तसे इंजिनियरींगचे काम ॲटोकॅडवर होत आहे. तर आपण हे शैक्षणिक पात्रतेत पण टाका. की जो पण बी. ई. सिव्हील इंजिनियर ठेवेल. त्याला ॲटोकॅडची पण माहिती असली पाहिजे. ते सर्टीफिकिट पण त्याच्याकडे पाहिजे तरच आम्ही काही प्रोजेक्ट चांगले करु शकणार. आणि बाकी सदस्यांना पण ही विनंती करतो की, या विषयाला वित्तीय मान्यता देवून निविदा मागवा, आणि प्रशासनाची जबाबदारी राहील की, ही निविदा चांगल्या प्रकारे मागविणे. आणि अशा संस्थेला दया की, ज्याचा मालिक कमीत कमी इंजिनियर असेल, जसे भालेराव जीने सांगितले की, मजूर कामगार संस्थेचा मालक ४ थी पास आहे. आणि तो आम्हांला २० इंजिनियर पुरवणार त्याची जर कोणतीही तक्रार असेल तर आमचे आयुक्त्, अतिरिक्त आयुक्त त्याच्याशी बोलेल की, मी तर ४ थी पास आहे. मला माहीती नाही इंजिनियर जो मिळाला मी तुम्हांला पाठवून दिला, असे नाही झाले पाहिजे. अशा संस्थेला आपल्या घ्यायचे आहे, ज्याचा मालक किंवा पार्टनर किंवा डायरेक्टर स्वत: बी.ई.सिव्हील असला पाहिजे. यासाठी माझी सर्व सदस्यांना निवेदन आहे की, या विषयास पास करा. की आमच्या जवळ तसेही इंजिनियर कमी आहेत. तसे पण लवकरात लवकर हे इंजिनियर सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग आणि नगररचना विभागाला आणि प्रभाग समिती विभागाला मिळावेत. तर आमच्या शहराचे अजुन काही काम होईल. धन्यवाद!

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**प्रशासनाची बाजू मांडल्याबददल मी आभारी आहे. आपण निविदा मागविल्याप्रमाणे निविदेमध्ये अटी व शर्तीमध्ये बी.ई.सिव्हील हेच शैक्षणिक पात्रता आणि डिप्लोमा सिव्हील मॅकनिकेल शैक्षणिक पात्रता ठेवणार आहोत. या सोबत निविदेमध्ये जे मनुष्यबळ पुरवठा करणारे ज्या संस्था असतात. त्या मजूर संस्था नसतात. हे आदरणीय उपमहापौर साहेबांच्या निदर्शनास आणू इच्छितो आणि ज्या मनुष्यबळ पुरवठा करणा-या संस्थाकडून आपल्याकडे यादी मागविली आहे आणि त्या यादीतून आपले शहर अभियंता, पाणी पुरवठा अभियंता, कार्यकारी अभियंता, नगररचना विभागाचे प्रमुख हे सर्व मुलाखती घेतील आणि त्यातून जे योग्य उमेदवार वाटतील तेच निवडले जातील सर आणि आपल्याला तातडीने मनुष्यबळाची आवश्यकता आहे ती निश्चितपणे आपण पुर्ण करु शकु अशी मला खात्री असल्यामुळे आपण मंजूर करावी अशी विनंती.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-**त्यांची मुलाखत कोण घेणार आहे? तुम्ही सांगितले बांधकाम खात्याला किती इंजिनियर?

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>**शहर अभियंता, उप आयुक्त मुख्यालय, पाणी पुरवठयाचे कार्यकारी अभियंता, नगररचनाकार राहतील,

**<u>सदस्य, श्री.स्वप्नील बागुल:-</u>**मा. आयुक्त साहेब जे ११ लोक आपल्याकडे इंजिनियर होते. त्यावेळेस त्यांनी कोव्हिड काळात महानगरपालिकेला सेवा दिली होती, उल्हासनगर शहरात काम केले आणि त्यांच्यावर अन्याय होणार नाही अशी काळजी घ्या.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** होय.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>**नाही नाही त्यांच्या मुलाखती कोण घेणार आहे?

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** मुलाखतीला आपले शहर अभियंता राहतील, पाणी पुरवठयाचे कार्यकारी अभियंता राहतील, नगररचनाचे नगररचनाकार राहतील आणि मुख्यालय म्हणून मी स्वत: राहील. अतिरिक्त आयुक्त येत असतील तर त्यापण राहतील एवढे सगळे कमीत कमी राहू.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>**साहेब एक गोष्ट लक्षात ठेवा, आपला कार्यकारी अभियंता डिप्लोमा होल्डर आहे. पाणी पुरवठा डिप्लोमा होल्डर, बी. सिव्हील इंजिनियरच्या मुलाखती कशा घेणार ते सांगा मला.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>**सर त्यांना ३० वर्ष कामाचा अनुभव आहे ना, कामाची माहिती विचारु शकतात सर त्यांना. तेस आपण बाहेरुन मागवू शकतो.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>**माझी फक्त एकच मागणी आहे ज्या एजन्सीला काम मिळेल ती एजन्सी इंजिनियर पुरविण्यात पात्र आहेत का एवढ फक्त तपासून बघा, बाकी काही नाही.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>**सर जास्तीत जास्त प्रयत्न करुन आपण चांगले अभियंते घेवू. आणि सर तुमच्या ज्या अपेक्षा आहेत त्या पुर्ण करण्यासाठी आम्हांला मुनष्यबळ नसेल तर करता येणार नाही.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:</u>**- राजेश भाई ओके पास.

**<u>महापालिका सचिव:-</u>**हा ठराव पास होत आहे,श्री. राजेश वधारीया आणि सदस्य श्री. भालेराव साहेब यांनी सांगितलेले मुदद‍े त्यांनी सांगितले की कमीत कमी इंजिनियर असावा पार्टनर किंवा कोणी आणि अशा संस्थेला दयावा की, त्या संस्थेचा अध्यक्ष हा इंजिनियर असावा. त्यांना ॲटोकॅड असणे गरजेचे आहे, डिग्री सर्टीफिकेट पाहिजे आणि याला वित्तीय मान्यता देत आहे. हा ठराव..

**<u>सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-</u>** मॅडम त्या ११ लोकांचा विचार करा.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:-</u>**इतिवृत्ताची वाट न पाहता पास....

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

**☑<u>विषय क्र. ८ :-</u>उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग/ नगररचना विभाग/पाणी पुरवठा विभाग/प्रभाग समिती कार्यालय इत्यादी विभागांसाठी ठोकेदारामार्फत अभियंता पुरवठा करणे बाबत.**

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता संवर्गातील एकूण २६ पदे मंजूर असुन त्यातील फक्त ०६ कर्मचारी कार्यरत आहेत व २० पदे रिक्त आहेत. सध्या ११ अभियंत्यांची ठोकवेतनावरील मुदत संपल्यामुळे त्यांची सेव संपुष्टात आण्यात आलेली आहे. त्यामुळ सार्वजनिक बांधकाम विभाग/नगररचना विभाग/पाणी पुरवठा विभाग/प्रभाग समिती कार्यालय येथे कर्मचारी नसल्यामुळे विकास कामे व शहरातील नैसर्गिक आपत्ती विषयक कामे व अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यासाठी यांची कर्मचारी नसल्यामुळे व इतर कामे होत नाही.यापुर्वी ठोकवेतनावर कनिष्ठ अभियंता यांना मासिक ठोकवेतन

रू.२०,०००/— इतके अदा करण्यात येत होते.उल्हासनगर महानगरपालिका सन २०२१—२०२२ या आर्थसंकल्पामध्ये आस्थापना खर्चाची रू. १२६.५ कोटी इतकी तरतूद आहे.

कनिष्ठ अभियंता या संवर्गासाठी अटी व शर्ती तयार करण्यात आल्या असून उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग/नगररचना विभाग/पाणी पुरवठा विभाग/प्रभाग समिती कार्यालय येथे कर्मचारी नसल्यामुळे विकास कामे व शहरातील नैसर्गिक आपत्ती विषयक कामे व अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. एका वर्षासाठी खालीप्रमाणे नमुद खर्च अपेक्षीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | कनिष्ठअभियंतायापदाचेमहाराष्ट्र राज्यदरसुची | एकादिवसाचेवेतनरु. १५६०/—याप्रमाणे |

सध्या माहापालिकेमध्ये ठोकवेतनावर कार्यरत कर्मचारी यांना ज्या दिवशी काम करतील त्या दिवसाचे वेतन अदा करण्यात येत आहे. त्यानुसार खालीलप्रणे अंदाजे खर्च दर्शविण्यात येत आहे.

- एक दिवसाचे वेतन रू. १५६०/— सार्वजनिक सुट्या वगळून २२ दिवस
- कनिष्ठ अभियंता यांना मासिक ठोकवेतन रू. ३४,३२०X२०=६,८६,४००/—
- वार्षीक खर्च रू. ६,८६,४००X१२= ८२,३६,८००/—

वार्षीक रू. ८२,३६,८००/— लाख खर्चाचा प्रस्तावास वित्तीय मान्यतेससाठी मा. स्थायी समितीसमोर सादर करण्याबाबत प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

शहरातील कामांच्या लक्षात घेता मा. स्थायी समिती च्या मान्यतेच्या अधिन राहुन निविदा काढण्यासाठी कार्यवाही सुरू आहे. तरी सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.४०दिनांक : २०/०८/२०२१**

**सुचकाचे नाव :—श्री. राजेश वदारिया**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता**

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग/नगररचना विभाग/पाणी पुरवठा विभाग/प्रभाग समिती कार्यालय इत्यादी विभागांसाठी ठेकेदारामार्फत अभियंता पुरवठा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**परंतु**

१) लवकरात लवकर निविदा मागवून कार्यवाही करण्याची जबाबदारी प्रशासनाची राहील.

२) संस्थेचा मालक/पार्टनर/डायरेक्टर हा स्वत: इंजिनियर असला पाहीजे.

३) तसेच निकषानुसार सक्षम इंजिनियर नेमले जातील याची जबाबदारी प्रशासनाची राहील.

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची** सही/—

**अनुमोदकाची** सही/—

**सर्वानुमते**

**सभापती/पीठासीन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ९ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र ९:—हॉटेल जवाहर मध्येकोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना साठी कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांना राहण्याची सोय उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात संदर्भात दि.१४/०४/२०२० ते १६/०६/२०२० पर्यंत राहण्याचे भाडे अदा करण्याच्या प्रस्ताव मा. स्थायी समिती यांची कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत सविनय सादर.**

---

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** पास पास... इतिवृत्ताची वाट न पहाता.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** पास पुढचा विषय घ्या.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** विषय क्र.१० आणि ११ सारखेच आहेत, एकत्र घ्या.

**महापालिका सचिव:-**विषय क्र. ९ पास इतिवृत्ताची वाट न पाहता. भालेराव साहेब बोलले आहेत.

**काही सदस्य:-** पास, पास....

**सभापती, श्री.दिपक सिरवानी:-सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

**विषय क्र. ९:- हॉटेल जवाहर मध्येकोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना साठी कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांना राहण्याची सोय उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात संदर्भात दि.१४/०४/२०२० ते १६/०६/२०२० पर्यंत राहण्याचे भाडे अदा करण्याच्या प्रस्ताव मा. स्थायी समिती यांची कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत सविनय सादर.**

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, ज्याअर्थी सध्या जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणूची लागण झाली आहे. सदर रोगाच्या प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधनात्मक कायदा, १८९७ संदर्भ क्र. ०१ अन्वये दिनांक १४ मार्च,२०२० पासून लागू करून खंड २,३ व ४ मधील तरतूदीनूसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महापालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम आहेत, असे घोषित करण्यात आले आहे.

त्या अर्थी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर अधिसुचने द्वारे प्राप्त अधिकारात कोरोना आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना अनुषंगाने तसेच महानगरपालिका क्षेत्रात कोरोना संबंधी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) “क” मध्ये नमुद केलेप्रमाणे कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंबा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुस-या दखादया नगरपालिका प्रधिका-याच्या किंवा १ (राज्य) शासनाच्या मंजुरी मान्यता किंवा प्रधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहीजे असे नमुद आहे.

आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५० (अ) अन्वये आपत्कालीन खरेदी व आपत्तीजन्य परीस्थिती किंवा धोक्याच्या कारणांमुळे राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरण बचाव करण्यासाठी तात्काळ तरतुद किंवा साहित्य खरेदी करणे किंवा संसाधनांचा त्वारीत उपयोग करणे आवश्यक आहे असे नमुद आहे. तसेच आपत्कालीन खरेदी करणेसाठी संबंधीत विभाग किंवा प्राधिकरणाला ते अधिकृत करुशकतात आणि आपत्कालीन परीस्थितीत निविदा मागविण्याची आवश्यक असलेली मानक प्रकिया माफ केलेली मानली जाईल असे नमुद आहे.

सविनय सादर करण्यात येते की टिपणी क्रमांक ४ वर मा. आयुक्त साहेब यांनी दिलेल्यानिर्देशानुसारयापुर्वी हॉटेलेचे राहण्याचे दर हे हॉटेलचा दर्जा व त्यामधील देण्यात आलेली सुविधानुसार दर निश्चित करण्यात आले होते. तसेच हॉटेल जवाहर यांचे मध्ये कोविड १९ प्रतिबंधात्मक उपाययोजना साठी कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांना राहण्यासाठी प्रति दिन, प्रति व्यक्ती रु ५००/- या दराप्रमाणे भाडे देण्यात प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर हॉटेल जवाहर मध्ये राहत असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांची तपशील खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of Doctor | Check in date | Check out date | No Of Day | Rate per person | Total Amount (5x6) | CGST 6% | SGST 6%) | Total Amount (5x6)(7+8+9) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | |
| 1 | Mr. Ashok More | 15/5/2020 | 16/6/2020 | 31 | 500 | 15500 | 930 | 930 | 17,360/- |
| 2 | Dr. R.K. Ghate | 15/05/2020 | 16/06/2020 | 31 | 500 | 15500 | 930 | 930 | 17,360/- |
| 3 | Mr. Navin Murli | 02/06/2020 | 16/06/2020 | 14 | 500 | 7000 | 420 | 420 | 7,840/- |
| 4 | Dr. R.K. SIngh | 15/05/2020 | 16/06/2020 | 31 | 500 | 15500 | 930 | 930 | 17,360/- |
| 5 | Dr. Ajay D Bhagwat | 30/05/2020 | 16/06/2020 | 17 | 500 | 8500 | 510 | 510 | 9,520/- |
| 6 | Mr. Rohan P Nangire | 06/06/2020 | 16/06/2020 | 10 | 500 | 5000 | 300 | 300 | 5,600/- |
| 7 | Dr. Ashish Vasavt Jumle | 14/04/2020 | 16/06/2020 | 62 | 500 | 31000 | 1860 | 1860 | 34,720/- |
| 8 | Dr. Sidhram Gyandev Kamble | 15/04/2020 | 16/06/2020 | 61 | 500 | 30500 | 1830 | 1830 | 34,160/- |
| 9 | Mr. Satish Wagh | 15/04/2020 | 16/06/2020 | 61 | 500 | 30500 | 1830 | 1830 | 34,160/- |
| 10 | Dr. Dinesh Chavan | 14/04/2020 | 16/06/2020 | 62 | 500 | 31000 | 1860 | 1860 | 34,720/- |
| 11 | Dr. Arun D Chandel | 14/04/2020 | 16/06/2020 | 62 | 500 | 31000 | 1860 | 1860 | 34,720/- |
| 12 | Dr. Bhushankumar Sakhre | 15/04/2020 | 16/06/2020 | 61 | 500 | 30500 | 1830 | 1830 | 34,160/- |
| 13 | Dr. Harshal S Gawai | 27/04/2020 | 16/06/2020 | 50 | 500 | 25000 | 1500 | 1500 | 28,000/- |
| 14 | Mr. Kailash Narayan Sardar | 04/05/2020 | 16/06/2020 | 43 | 500 | 21500 | 1290 | 1290 | 24,080/- |
| 15 | Mr. Surendra Raghunath Pilena | 04/05/2020 | 16/06/2020 | 43 | 500 | 21500 | 1290 | 1290 | 24,080/- |
| 16 | Dr. Shanti Hemnani | 16/05/2020 | 16/06/2020 | 30 | 500 | 15000 | 900 | 900 | 16,800/- |
| 17 | Dr. Hemlata Laxman Kolkar | 22/04/2020 | 16/06/2020 | 55 | 500 | 27500 | 1650 | 1650 | 30,800/- |
| 18 | Dr. Pankti Sawlani | 15/05/2020 | 16/06/2020 | 31 | 500 | 15500 | 930 | 930 | 17,360/- |
| 19 | Dr. Manisha Gosavi (Narayankar) | 01/6/2020 | 16/06/2020 | 15 | 500 | 7500 | 450 | 450 | 8,400/- |
| 20 | Dr. Suchita Gore | 01/06/2020 | 16/06/2020 | 12 | 500 | 6000 | 360 | 360 | 6,720/- |
| 21 | Dr. Jaiswal Sagar Omprakash | 22/04/2020 | 16/06/2020 | 23 | 500 | 11500 | 690 | 690 | 12,880/- |
| 22 | Dr. Patil Roshan Pramod | 22/04/2020 | 16/06/2020 | 23 | 500 | 11500 | 690 | 690 | 12,880/- |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 23 | Mr. Amit Sanat Pal | 12/05/2020 | 16/06/2020 | 34 | 500 | 17000 | 1020 | 1020 | 19,040/- |
| 24 | Dr. Sachin Shamrao Shinde | 28/04/2020 | 16/06/2020 | 18 | 500 | 9000 | 540 | 540 | 10,080/- |
| 25 | Dr. Omkar Sunil Bhosale | 28/04/2020 | 16/06/2020 | 18 | 500 | 9000 | 540 | 540 | 10,080/- |
| **Total** | | | | **898** | **500** | **4,49,000/-** | **26,940/-** | **26,940/-** | **5,02,880/-** |

उपरोक्त तक्त या प्रमाणे एकुण रुपये **५,०२,८८०/-**(अक्षरी रुपये पाच लाख दोन हजार आठशे ऐंशी रुपये मात्र) देयक अदा करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. हे सदरचा खर्च हा सन. २०२०-२०२१ मधील विपरीत परिस्थिती व्यवस्थापन B-२(३) या लेखाशिर्षातून किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधितून खर्च करणे प्रस्तावित आहे.तरी हॉटेल जवाहर मध्ये कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना साठी कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांना राहण्याची सोय उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात संदर्भात

दि. १४/०४/२०२० ते १६/०६/२०२० पर्यंत राहण्याचे भाडे अदा करण्याचे प्रस्ताव मा. स्थायी समिती यांची कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.४१ दिनांक :२०/०८/२०२१**

**सुचकाचे नाव :—श्रीम. अर्चना करनकाळे**

**अनुमोदकाचे नाव :—श्री. कलवंतसिंह सोहता**

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार हॉटेल जवाहर मध्येकोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना साठी कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांना राहण्याची सोय उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात संदर्भात दि.१४/०४/२०२० ते १६/०६/२०२० पर्यंत राहण्याचे भाडे एकुण रुपये ५,०२,८८०/-(अक्षरी रुपये पाच लाख दोन हजार आठशे ऐंशी रुपये मात्र) अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाचीसही/—**

**अनुमोदकाचीसही/—**

**सर्वानुमते**

**सभापती/पीठासीन अधिकारी**

**स्थायी समिती सभा**

**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १० वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र १०:**—लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या एकूण ३२ कामांच्या रुपये ७,००,९४,४९०/- एवढ्या खर्चाच्या कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणे.

---

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>**माहीती कोण देणार आहे?

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारिया:-</u>** मा. सभापतीजी, याची माहीती आम्हांला दिली पाहिजे आणि १५ कामे कोणती आहेत?आम्हांला यादी का दिली नाही?ठिकाण कोणते आहे, आणि काम कितीचे आहे?डायरेक्ट ७ करोड, आणि डायरेक्ट ३ करोड.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** विषय असा आहे, हा महाराष्ट्र शासनाचा निधी आहे, आणि जिल्हाधिका-यानी...

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारिया:-</u>**मी प्रशासनाकडून माहीती मागविली आहे.मा.सभापतीजी आपण त्यांना बोलू दया.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** सितलानीजी बोला.

**<u>शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-</u>**मा. सभापतीजी, सन्माननिय सदस्य, हा विषय दलित वस्तीसाठी आहे आणि दलितवस्तीचे १३ वार्डस आहेत.७ कोटींचे ३२ कामे आहेत आणि ते मा. जिल्हाधिकारी यांच्याकडून मंजुर होऊन आले आहेत. तुम्हांला यादी दिली नाही, मी आपल्याला विनंती करतो की, सोमवार पर्यंत संपुर्ण यादी तुमच्याकडे पोहचवण्यात येईल.हे काम करण्यासाठी प्रभाग समितीनुसार इस्टीमेट लिहीले आहे. ही कामे जिल्हाधिकारी यांच्याकडून मंजूर होऊन आली आहेत, आम्ही यांच्यातील कोणतीच कामे मंजूर केली नाहीत.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** अपण टेंडर मागविला आहे का?

**<u>शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-</u>**होय सर.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**जसे तुमच्याकडे जिल्हाधिकारी यांच्याकडून आले, त्या कामांची यादी तुम्हांला मा. जिल्हाधिकारी यांच्याकडून आली असेल. टेंडरची प्रक्रिया तर आपण केली असेल.

**<u>शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-</u>**होय टेंडरची प्रक्रिया आम्ही केली आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**तुम्ही सांगातात की, आम्ही काहीच केले नाही.

**<u>शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-</u>**सिलेक्शन आम्ही केले आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** सिलेक्श्न तुम्ही केले तर पास कसे करु शकतो? हे बघा तुम्ही टेंडर मागवला आहे, टेंडरमध्ये तुम्ही लोकेशन लिहीले असेल, यादी दिली असेल तर इथे का दिली नाही? तुम्ही आमच्या पासून काय लपवत आहेत?
**<u>शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-</u>**तुमच्या पासून काहीच लपवत नाही

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** पास. इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**हे बघा, हे दलितवस्तीचे कामे आहेत, आपण पास करु. परंतु तुम्हांला एक गोष्ट सांगू इच्छितो की, भालेरावजी या शहरामध्ये अजून पण दलित वस्त्या आहेत, संपुर्ण वार्ड तुमचा दलित वस्ती होऊ शकतो.परंतु आमच्या वार्डमध्ये पण दलितवस्ती आहे.आमच्या वार्डचे पण घ्यायला पाहीजेत.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** ज्या वार्डमध्ये दलितवस्ती जास्त आहे, ते काम पास होऊन आले आहेत आणि काम भरपुर आहे. पास इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>**दोन्ही विषय पास..इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>महापालिका सचिव:-</u>** विषय दोन्ही पास झाले आहेत, इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

**<u>सभापती, श्री.दिपक सिरवानी:-</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

☑**विषय क्र.१०**:-लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या एकूण ३२ कामांच्या रुपये ७,००,९४,४९०/- एवढ्या खर्चाच्या कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत....

**प्रस्तावना**

लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या एकूण ३२ कामांच्या रुपये ७,००,९४,४९०/- एवढ्या खर्चाच्या कामाची दिनांक ०१/०६/२०२१ ते २१/०६/२०२१ या कालावधीत ई निविदा मागविण्यात आली होती.

त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ७,००,९४,४९०/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०१/०६/२०२१ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०१/०६/२०२१ ते २१/०६/२०२१ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक २२/०६/२०२१ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | १३/०७/२०२१ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | -- |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०४ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०४ |

दिनांक १३/०७/२०२१ रोजीलोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या एकूण ३२ कामांच्या रुपये ७,००,९४,४९०/- एवढ्या खर्चाच्या कामाचा तांत्रिक भाग उघडण्यात आला. सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तांत्रिक भाग(Technical Bid)**

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | झा.पी.ॲण्ड कंपनी | एम.सी. चंदनानी कंन्स्ट्रक्शन | जयभारत कंन्स्ट्रक्शन | साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|---|---|
| १ | Certificate of Registration in appropriate Class from Certificate of Registration in appropriate Class from CPWD/State PWD/CIDCO/MCGM./MJP etc. | आहे | आहे | आहे | आहे |
| २ | Attested Copy of Pan Card | आहे | आहे | आहे | आहे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | Goods &Service Tax Registration / Undertaking for Goods &Service Tax Exemption | आहे | आहे | आहे | आहे |
| ४ | Income Tax Statement Return Statement and Turnover statement duly signed by the CA of Last Three years. | आहे | आहे | आहे | आहे |
| ५ | EPF Registration Certificate Number | आहे | आहे | आहे | आहे |
| ६ | Tenderer should have successfully completed with Government / Semi Government / Public Sector at least one similar type of work in last ५ years (Five years) | आहे | आहे | आहे | आहे |
| ७ | Annual Turnover of Last five years | आहे | आहे | आहे | आहे |
| ८ | The tenderer will be qualified only if their available bid capacity is more than the total estimated value of works for which he has offered his bid.(A*N*१.५) - B | आहे | आहे | आहे | आहे |
| ९ | The tenderer should possess his owned Ready Mix Concrete Plant | आहे | आहे | आहे | आहे |
| १० | Static Roller ८ to १० tonne, Smooth Wheeled power roller | आहे | आहे | आहे | आहे |
| ११ | Truck / Tipper/ Tractor | आहे | आहे | आहे | आहे |
| १२ | Ready Mix Concrete Plant | आहे | आहे | आहे | आहे |
| १३ | Transit Mixture ५ to ६ cum capacity | आहे | आहे | आहे | आहे |
| १४ | ५००/- Stamp Paper | आहे | आहे | आहे | आहे |
| १५ | Work in hand | आहे | आहे | आहे | आहे |
| १६ | Eligible / Not Eligible | आहे | आहे | आहे | आहे |
| | | **पात्र** | **पात्र** | **पात्र** | **पात्र** |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार निविदाकारांच्या कागदपत्रांची छाननी केली असता १) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी २) मे.एम.सी.चंदनानी कंन्स्ट्रक्शन ३) मे.जय भारत कंन्स्ट्रक्शन व ४) मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन हे चारही निविदाकार पात्र ठरत आहेत. परंतू मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यांनी अशी तक्रार केली आहे की, मे.साई सिध्दनाथ यांनी निविदेकरीता अपलोड केलेले कागदपत्र स्पष्ट नसून असदृश्य आहेत. सदर तक्रार प्राप्त झाल्यानंतर वरील चारही निविदाकारांना त्यांचे मुळ कागदपत्र तपासणी साठी कार्यालयात सादर करणेबाबत पत्र दिले. पत्रात असे स्पष्ट नमुद केले आहे की, जे कंत्राटदार मुळ कागदपत्र सादर करणार नाहीत, त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात येईल. दिनांक १४/०७/२०२१ पर्यंत कोणीही कागदपत्र सादर केले नसल्याने पुनश्च दिनांक २३ जुलै,२०२१ रोजी वरील चारही कंत्राटदार यांना मुळ कागदपत्र सादर करणेसंदर्भात स्मरणपत्र देण्यात आले.

दिनांक २७/०७/२०२१ रोजी १) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी २) मे.एम.सी.चंदनानी कंन्स्ट्रक्शन ३) मे.जय भारत कंन्स्ट्रक्शन हे कंत्राटदार मुळ कागदपत्रांसह कार्यालयात आले असता, संबंधित उप-अभियंता यांनी मुळ कागदपत्रांची तपासणी केली आहे. तसा अहवाल उप-अभियंता यांनी सादर केला आहे. तथापी, यामध्ये मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांनी विहित मुदतीत मुळ कागदपत्र तपासणीकरीता सादर केलेले नाही. त्यामुळे मे. साई सिध्दनाथ यांना अपात्र ठरविण्यात आले.

सदर पात्र/ अपात्र निविदाकारांची माहिती दिनांक ०६/०८/२०२१रोजी सायं.४.०० वाजेपासून ते १०/०८/२०२१ सायं ४.०० वाजेपर्यंत या कालावधीकरीता उल्हासनगर महानगरपालिकेच्या www.umc.gov.inया संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे Ulhasnagar.pwd@gmail.comया मेलवर व शहर अभियंता यांचे कार्यालयात लेखी स्वरुपात हरकती व सुचना मागविण्यात आल्या होत्या. परंतू दिनांक १०/०८/२०२१ रोजी सायं.४.०० वाजेपर्यंत कोणत्याही हरकती / सुचना प्राप्त झालेल्या नसल्याने दिनांक १८/०८/२०२१ रोजी सदर निविदेचा दुसरा लिफाफा (आर्थिक भाग) उघडणेत आला.निविदाकारांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **निविदाकारांचीनावे** | **दिलेलेदर** |
|---|---|---|
| १ | मे. झा.पी.ॲण्ड कंपनी | AT PAR |
| २ | मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन | ५.०००%टक्के जास्त |
| ३ | मे.एम.सी.चंदनानी कंन्स्ट्रक्शन | १०.०००% टक्के जास्त |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यांचे दर निम्न आहेत. तरी लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या एकूण १५ कामांच्या रुपये ७,००,९४,४९०/- एवढ्या खर्चाच्या कामाकरीता निम्न दराचे मे.झा.पी.ॲण्ड कंपनीयानिविदाकाराशीसंविदाकरणेसस्थायीसमितीच्या मान्यतेकरीता प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. ४२** **दिनांक : २०/०८/२०२१**

**सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता**

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार**लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या एकूण ३२ कामांच्या खर्चाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार मे.झा.पी.ॲण्ड कंपनीयांनारुपये ७,००,९४,४९०/- एवढ्या खर्चाच्या संविदेसमान्यतादेण्यात येत आहे.

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाचीसही/—**

**अनुमोदकाचीसही/—**

**सर्वानुमते**

**सभापती/पीठासीन अधिकारी**

**स्थायी समिती सभा**

**उल्हासनगर महानगरपालिका**

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ११ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र ११:—**लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्य एकूण१५ कामांच्या रुपये २,९९,८८,४६०/- एवढया खर्चाच्या कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकारयांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणे.

---

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

**<u>सभापती, श्री.दिपक सिरवानी:-</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑**विषय क्र. ११** :- लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रशासकीय **मान्यता प्राप्त झालेल्या एकूण१५ कामांच्या रुपये २,९९,८८,४६०/- एवढ्या खर्चाच्या कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत....**

**<u>प्रस्तावना</u>**

लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या एकूण १५ कामांच्या रुपये २,९९,८८,४६०/- एवढ्या खर्चाच्या कामाची दिनांक ०१/०६/२०२१ ते २१/०६/२०२१ या कालावधीत ई निविदा मागविण्यात आली होती.

त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये २९९८८४६०/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०१/०६/२०२१ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०१/०६/२०२१ ते २१/०६/२०२१ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक २२/०६/२०२१ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | १३/०७/२०२१ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | -- |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०४ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०४ |

दिनांक १३/०७/२०२१ रोजीलोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या एकूण १५ कामांच्या रुपये २,९९,८८,४६०/- एवढ्या खर्चाच्या कामाचा तांत्रिक भाग उघडण्यात आला. सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**<u>तांत्रिक भाग (Technical Bid)</u>**

| **अ.क्र.** | **निविदाकाराच्या निविदेमधील बाबी** | **झा.पी.ॲण्ड कंपनी** | **एम.सी. चंदनानी कंन्स्ट्रक्शन** | **जयभारत कंन्स्ट्रक्शन** | **साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन** |
|---|---|---|---|---|---|
| १ | Certificate of Registration in appropriate Class from Certificate of Registration in appropriate Class from CPWD/State PWD/CIDCO/MCGM./MJP etc. | आहे | आहे | आहे | आहे |
| २ | Attested Copy of Pan Card | आहे | आहे | आहे | आहे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | Goods &Service Tax Registration / Undertaking for Goods &Service Tax Exemption | आहे | आहे | आहे | आहे |
| ४ | Income Tax Statement Return Statement and Turnover statement duly signed by the CA of Last Three years. | आहे | आहे | आहे | आहे |
| ५ | EPF Registration Certificate Number | आहे | आहे | आहे | आहे |
| ६ | Tenderer should have successfully completed with Government / Semi Government / Public Sector at least one similar type of work in last ५ years (Five years) | आहे | आहे | आहे | आहे |
| ७ | Annual Turnover of Last five years | आहे | आहे | आहे | आहे |
| ८ | The tenderer will be qualified only if their available bid capacity is more than the total estimated value of works for which he has offered his bid.(A*N*१.५) - B | आहे | आहे | आहे | आहे |
| ९ | The tenderer should possess his owned Ready Mix Concrete Plant | आहे | आहे | आहे | आहे |
| १० | Static Roller ८ to १० tonne, Smooth Wheeled power roller | आहे | आहे | आहे | आहे |
| ११ | Truck / Tipper/ Tractor | आहे | आहे | आहे | आहे |
| १२ | Ready Mix Concrete Plant | आहे | आहे | आहे | आहे |
| १३ | Transit Mixture ५ to ६ cum capacity | आहे | आहे | आहे | आहे |
| १४ | ५००/- Stamp Paper | आहे | आहे | आहे | आहे |
| १५ | Work in hand | आहे | आहे | आहे | आहे |
| १६ | Eligible / Not Eligible | आहे | आहे | आहे | आहे |
| | | **पात्र** | **पात्र** | **पात्र** | **पात्र** |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार निविदाकारांच्या कागदपत्रांची छाननी केली असता १) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी २) मे.एम.सी.चंदनानी कंन्स्ट्रक्शन ३) मे.जय भारत कंन्स्ट्रक्शन व ४) मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन हे चारही निविदाकार पात्र ठरत आहेत. परंतू मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यांनी अशी तक्रार केली आहे की, मे.साई सिध्दनाथ यांनी निविदेकरीता अपलोड केलेले कागदपत्र स्पष्ट नसून असदृश्य आहेत. सदर तक्रार प्राप्त झाल्यानंतर वरील चारही निविदाकारांना त्यांचे मुळ कागदपत्र तपासणी साठी कार्यालयात सादर करणेबाबत पत्र दिले. पत्रात असे स्पष्ट नमुद केले आहे की, जे कंत्राटदार मुळ कागदपत्र सादर करणार नाहीत, त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात येईल. दिनांक १४/०७/२०२१ पर्यंत कोणीही कागदपत्र सादर केले नसल्याने पुनश्च दिनांक २३ जुलै,२०२१ रोजी वरील चारही कंत्राटदार यांना मुळ कागदपत्र सादर करणेसंदर्भात स्मरणपत्र देण्यात आले.

दिनांक २७/०७/२०२१ रोजी १) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी २) मे.एम.सी.चंदनानी कंन्स्ट्रक्शन ३) मे.जय भारत कंन्स्ट्रक्शन हे कंत्राटदार मुळ कागदपत्रांसह कार्यालयात आले असता, संबंधित उप-अभियंता यांनी मुळ कागदपत्रांची तपासणी केली आहे. तसा अहवाल उप-अभियंता यांनी सादर केला आहे. तथापी, यामध्ये मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांनी विहित मुदतीत मुळ कागदपत्र तपासणीकरीता सादर केलेले नाही. त्यामुळे मे. साई सिध्दनाथ यांना अपात्र ठरविण्यात आले.

सदर पात्र/ अपात्र निविदाकारांची माहिती दिनांक ०६/०८/२०२१रोजी सायं.४.०० वाजेपासून ते १०/०८/२०२१ सायं ४.०० वाजेपर्यंत या कालावधीकरीता उल्हासनगर महानगरपालिकेच्या www.umc.gov.inया संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे Ulhasnagar.pwd@gmail.comया मेलवर व शहर अभियंता यांचे कार्यालयात लेखी स्वरुपात हरकती व सुचना मागविण्यात आल्या होत्या. परंतू दिनांक १०/०८/२०२१ रोजी सायं.४.०० वाजेपर्यंत कोणत्याही हरकती / सुचना प्राप्त झालेल्या नसल्याने दिनांक १८/०८/२०२१ रोजी सदर निविदेचा दुसरा लिफाफा (आर्थिक भाग) उघडणेत आला.निविदाकारांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकारांचीनावे | दिलेलेदर |
|---|---|---|
| १ | मे. झा.पी.ॲण्ड कंपनी | AT PAR |
| २ | मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन | ५.०००% टक्के जास्त |
| ३ | मे.एम.सी.चंदनानी कंन्स्ट्रक्शन | १०.०००% टक्के जास्त |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यांचे दर निम्न आहेत. तरी लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या एकूण १५ कामांच्या रुपये २,९९,८८,४६०/- एवढ्या खर्चाच्या कामाकरीता निम्न दराचे मे.झा.पी.ॲण्ड कंपनीयानिविदाकाराशीसंविदाकरणेसस्थायीसमितीच्या मान्यतेकरीता प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.४२दिनांक : २०/०८/२०२१**

**सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता**

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारलोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या एकूण१५ कामांच्या रुपये २,९९,८८,४६०/- एवढ्या खर्चाच्या कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाचीसही/—**

**अनुमोदकाचीसही/—**

**सर्वानुमते**

**सभापती/पीठासीन अधिकारी**

**स्थायी समिती सभा**

**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**महापालिका सचिव:-** विषय क्रमांक १२ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र १२:**—वर्ष २०२१-२२ मध्ये उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र.१ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डे डांबरीकरणानेभरणेया कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशीसंविदा करणेस मान्यतामिळणे.

---

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**या विषयामध्ये सांगा, डांबरीकरणामध्ये मा. सभापतीजी, माझा हा आरोप आहे की, जेवढे पण पैसे पास होतात, ते बरोबर वितरीत होऊन कधी पण काम होत नाही. प्रत्येक वेळी कुठे ना कुठे काम जास्त होऊन जाते आणि नंतर ठेकेदाराकडून ऐकायला मिळते की, हे काम जास्त झाले आहे, पुढे मी काम करणार नाही आणि शेवटी दोन वर्षापासून शहर अभियंता इथे बसले आहेत. मला माहीती दया की, जय भारत कंपनी किती वर्षापासून या शहरामध्ये काम करीत आहे.मागचा विषय कधी घेतला होता.

**सदस्या, श्रीम. कविता पंजाबी:-** मा. सभापतीजी, मला पण बोलायचे आहे.

**सभापती, श्री. दिपक सिरवानी:-** आपण ही निविदा कधी काढली होती?यामध्ये आपण कोणते कोणते रोड चेक केले आहेत?ते आता पेसिफीक तुमच्या उत्तरामध्ये आले पाहीजे.

**शहर अभियता, श्री. महेश सितलानी:-** मा. सभापतीजी, मा. आयुक्त साहेब, हे तीन महिन्याचे काम आहे, ६.५० कोटीचे आम्ही ,एस्टीमेट बनवले होते. हा एस्टीमेट आम्ही नवव्या महिन्यामध्ये बनवले होते.पावसाच्या पहिले.ते आम्ही प्रत्येक प्रभाग समितीनिहाय बनवले होते.गोषवा-यामध्ये उल्लेख केलेला आहे. प्रभाग समिती क्र.२ चे १ कोटी ८० लाख, प्रभाग समिती क्र. ३ चे २ कोटी ४२ लाख, प्रभाग समिती क्र.४ चे १ कोटी ७९ लाख...

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**आम्हांला जेव्हा पण काम असते, तेव्हा आम्हांला अधिका-यांकडे जावे लागते. शहर अभियंता साहेब, हे काम झाले आहे की नाही मी आपल्याला पत्र दिले आहे.दोन वेळा विचारले की, हे काम झाले का?

**शहर अभियता, श्री. महेश सितलानी:-**सर मागच्या वर्षी...

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** तुमचे कोणते काम आहे?

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**तुम्ही ज्याला पण काम देतात, त्याची गॅरेटीं किती असते?

**शहर अभियता, श्री. महेश सितलानी:-**६ महीन्याची असते.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**जय भारतवाल्याने कधी गॅरेटी पहीले काम केले आहे का?

**शहर अभियता, श्री. महेश सितलानी:-**सर जे जे काम खराब होऊन जाते, ते काम आम्ही परत दुरुस्ती करुन घेत असतो.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**मागच्या वेळेस आपण टेंडर दिला होता, तेव्हा आपण परत करुन का घेतले नाही, हे बघा आपण मिटींगमध्ये बसले आहेत, मुददा हा आहे की, काम झाले पैसा कमी पडला तर परत दुसरा टेंडर, पैसे कमी तिसरा टेंडर काम खराब होते तरी आपण त्याच्याकडून करुन घेत नाहीत. माझा या ठेकेदाराला विरोध आहे.

**शहर अभियता, श्री. महेश सितलानी:-**तुम्ही बोलतात ते खरे आहे, पैसे कमी पडले तर...

**सदस्या, श्रीम. कविता पंजाबी:-** मा. सभापतीजी माझे पण आरोप आहे की, डांबरीकरणाचे काम बिलकुल चांगले होत नाही, तुम्ही गॅरेंटी देवू शकतात का?मा.सभापतीजी ऐकुन घ्या, कामे बिलकुल होत नाहीत.

**सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-** मा. सभापतीजी जसलोक शाळेपासून रेणुका सोसायटी, आशिर्वाद सोसायटी मागच्या वेळेस डांबरीकरणाचा करायचे होते, परंतु पुर्ण दिले नाही.

**सदस्या, श्रीम. कविता पंजाबी:-**आमचे पण तसेच आहे, शिवाजी चौक पर्यंत

**शहर अभियता, श्री. महेश सितलानी:-**मागच्या वेळेस मनिष इन्टरप्रायजेसला बोललो होतो, परंतु आम्ही देवू शकलो नाही कारण की, पैसे कमी होते.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**कमी असण्याचे कारण काय आहे?

**शहर अभियता, श्री. महेश सितलानी:-**कमी असण्याचे कारण मी सांगतो, नवव्या महिन्यामध्ये पाऊस येत असतो, पाऊसाच्या नंतर पाटोल तयार होतात, त्यामुळे ते कमी होतात. सर मी हे पण मान्य करतो की, कधी कधी काम जास्त पण होते.सर मी सांगितले की रक्कम कमी झाली.

**<u>सदस्या, श्रीम. कविता पंजाबी:-</u>**सभापतीजी माझे पण आरोप आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. सभापतीजी मी सांगातो, कविता पंजाबी आणि राजू जग्यासी यांनी बोलले काम कमी होते तर त्याचे कारण काय आहे?जेव्हा कोणी नगरसेवक विचारतो की, काम कम आणि....

**<u>सदस्या, श्रीम. कविता पंजाबी:-</u>**आपण बरोबर बोलत आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>**रोड बनवतांना एस्टीमेट कीम जास्त होतात, याचे कारण काय आहे? आता पण एक प्रभाग समितीमध्ये काम होऊ शकत नाही.कधी आम्ही शहर अभियंता यांना विचारले संपुर्ण शहरामध्ये एवढा पाऊस पडला आहे की, मागच्या २० वर्षाचे रेकॉर्ड तोडले आहे.आम्ही मा. आयुक्तांना बोलून ३० करोड रुपये शासनाकडून आणले आहेत. आपण आपले रोड बनवण्यासाठी शासनाकडून पैसे मागवत असतो आणि आपण ६ करोडचे एस्टीमेट आणणार तर नंतर प्रत्येक जण ओरडेल आणि हे सगळे शहर अभियंता यांना ऐकावे लागेल. आपण एस्टीमेट काढून शहर अभियंता काम करेल. मी आपल्याला निवेदन करतो की, प्रत्येक नगरसेवक शहर हितासाठी काम करीत असतो.त्यांच्या घरचे काम होत नाही.संत कोराराम चौक् वर, दुस-या चौकावर खडडे असतील तर लोक ओरडतील. मी आपल्याला निवेदन करतो की, हे एस्टीमेट खुप कमी बनली आहे.यामध्ये फक्त् राजू जग्यासीच नाही तर सगळेच ओरडणार आहेत आणि या वेळेस आपण शासनाकडून मला वाटते की, २५ करोडची मागणी केलेली आहे.आपल्या भरपाईसाठी की, पावसाळयामध्ये आपले रोड खराब झाले आहेत. यामुळे ६.५० करोडचे काम पाटोलचे झाले पाहीजे.त्याच बरोबर याच रेटवर जर हा ठेकेदार काम करायला तयार आहे.तर जे नविन रोड डांबरीकरणासाठी १० करोड रुपये आहेत ते मिळून हे १६.५० करोडचे काम झाले पाहीजे. डांबरीकरणासाठी जे १० करोड रुपये आहेत, ते या बरोबर घेण्यात यावेत आणि जो फंड बाहेरुन येणार आहेत, २५ करोड रुपयाची जी मागणी केली आहे, त्यासाठी नविन टेंडर काढण्यात यावे आणि त्यामध्ये कटींन्यु काम करण्यात यावे.जर १० करोडची अजून लागले तर आपण मा. आयुक्त मॅडमला प्राधिकृत करीत आहे.तर आपण १६ करोड, ५० लाख पास करीत आहेत. ६.५० करोड आणि १० करोड दुसरे १६.५० करोड आपण यामध्ये टाका.यासाठी आपण आयुक्तांना प्राधिकृत करीत आहेत. ते निर्णय घेतील.

**<u>महापालिका सचिव:-</u>** १० करोडची वेगळी निविदा मागवतआहेत यात कसे होणार?

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मॅडम तुम्ही बोलू नका?

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>** जमनादास पुरस्वानी यांच्या मताशी मी सहमत आहे की, ही रक्कम खुप कमी होते, परतु जिथ पर्यंत मी समजतो, टेंडर ६ करोडचे करणार आहे आणि १० करोड त्याच्यामध्ये अॅड करणार आहेत, हे संभव नाही.आपण टेंडर करा आणि अजून पार्टी येऊदया त्याच्यामध्ये स्पर्धा निर्माण झाली पाहीजे.मॅडम हे संभव आहे का?मॅडम आपण लिगली सांगा.आपण ऑफीसली बोला की, १० करोड रुपयामध्ये करु शकतो.

**<u>शहर अभियता, श्री. महेश सितलानी:-</u>**आपल्याला जो पर्यंत ६ करोडचे काम होण्यासाठी ६ महिने लागतील त्याच्या नंतर १० करोडची निविदा निघेल.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** अजून किती रोड बाकी आहेत?

**<u>शहर अभियता, श्री. महेश सितलानी:-</u>**सर नियमात जे बसतील ते मी करेल.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मा. सभापतीजी, मी बोलू इच्छितो की, यामध्ये जर आपण गोषवारा वाचला तर यामध्ये लिहीले आहे, वर्षे सन २०२१-२०२२ मध्ये उल्हासनगर शहरातील प्रभाग क्र. १ ते ४ मध्ये रस्त्यांवरील खड्डेडांबरीकरणाने भरणे या कामाची दिनांक १३/०१/२०२१ ते ०४/०२/२०२१ च्या कालावधीमध्ये निविदा मागविण्यात आली होती.आपण हे बघा की, एवढया वेळे पहीले टेंडर मागविला होता आणि टेंडरचे जे प्रोसेस आहे. ती एवढी लांब आहे की, स्थायी समितीमध्ये येता येता, त्यांना पाच महिने लागले आहेत. परत आपण दुसरा टेंडर काढला तर परत अजून ५ महिने लागतील. राजू जग्यासी, कविता पंजाबी, गजानन शेळके सोहता भरपूर सदस्य आहेत, ज्यांनी पास केले आहेत त्यांचे नाव घेतो. ते नाराज होतात की, आम्ही स्थायी समितीमध्ये असून देखील आमचे काम झाले नाहीत.तर हे टेंडर १.३५ टक्के बिलो जर ठेकेदार याच दरावर काम करण्यासाठी तयार आहे, १.३५ टक्के बिलो तर हे आवश्यक नाही की, नविन टेंडर करा आणि बिलो गेला पाहिजे. जास्त पण जाऊ शकते. तर यासाठी पहिले त्या ठेकेदाराला विचारा जर हाच ठेकेदार

याच दरावर १.३५ बिलो काम करण्यासाठी तयार आहे, तर त्याला १६ करोड, ५० लाख ४५ हजार १२० रुपयाचे काम करुन घ्या आणि जर महाराष्ट्र शासनाकडून जी आपण मागणी केली आहे. पावसामध्ये आपले रोड, रस्ते, गटार ,नाले, कलवर्ट जो जो नुकसान झाले आहे. त्याच्या भरपाईसाठी आम्ही २५ करोडची मागणी केली आहे. जर हे २५ करोड रुपये येत असतील, तर ते पैसे आपल्या शहरासाठीच कामी येतील. जसे की, पाच नंबरमध्ये कलवर्टचा मध्यतंरी सोशल मिडियामध्ये एक फोटोग्राफ फिरत होते की, कलवर्ट धसले आहे, सेम गोष्ट तशीच फर्निचर बाजारामध्ये त्याच्यामुळे माझ्या भागामध्ये काही ठिकाणी पाणी भरले होते.तर हे इमर्जेन्सीची कामे आहेत, ते करायला लागतात. तर माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, हे पास करण्यात यावे. कारण हे काम आपल्याच वार्डमध्ये होणार आहे आणि त्याच बरोबर मी शहर अभियंता यांना एक सल्ला देतो की, राजू जग्यासी, कविता पंजाबी आणि शेळकेजीच्या इथून पहिले पहिले काम चालू करा. त्यांचे वार्ड पुर्ण झाल्या नंतर पुढे काम घ्या आणि त्यांना सांगा की, मशिनरी जास्त घेऊन या जसे की, काम लवकर झाले पाहिजे. कामाचे ॲटम वाढत असेल त्याच्या हिशोबाने मशिनरी सुध्दा जास्त आणली पाहिजे. मशिनरी जास्त आणल्याने प्रत्येक प्रभागामध्ये वेगवेगळी मशिनरी असल्यामुळे काम लवकर होईल आणि बाकी नगरसवेकांच्या इथे पण काम झाले पाहिजेत. परंतु सुरुवात जी आहे, ती राजू जग्यासी यांच्या इथून झाली पाहिजे. कविता पंजाबी, आणि शेळकेंचा वार्ड पण जवळच आहे

या वेळी सदस्य, श्री. राजू जग्यासी हे सभागृहाच्या बाहेर गेले. 

**<u>सदस्या, कविता पंजाबी:-</u>** वदारिया साहेब धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**तर काम करायला दिले पाहिजे, खुपच गरजेचे आहे, ते आम्ही समजू शकतो. ते ठेकेदार समजू शकत नाही किंवा कोणतेही अधिकारी समजू शकत नाही. माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, हा विषय लवकर पास करण्यात यावा. इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..पास..

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** नाही, नाही, विषय असा आहे, मॅडम, मागच्या वेळेस आयुक्त, श्री. निंबाळकर यांच्या काळामध्ये डांबरीकरणाचा पाटोलचा टेंडर काढला होता, तो १३.५० कोटीचा होता आणि तेव्हा पण आपण असेच काम केले होते. इमर्जेन्सीमध्ये आणा आणि तिसरी गोष्ट म्हणजे आता पाऊस जास्त पडलेला आहे. हा पहिला विषय आणि दुसरा म्हणजे आता १० दिवसावर गणपती जवळ आले आहेत. गणपतीमध्ये रस्ते तसेच आज चालिया सण पण चालू आहे. असे असतांना युध्दपातळीवर काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे कुठल्याही प्रकारचा टेंडर न काढता जर याच दरामध्ये बिलोमध्ये समोरचा ठेकेदार जर करीत असेल आणि १६ कोटी, ३९ लाखाला त्या प्रमाणे ती रक्कम टाकून त्याला मान्यता दयावी, अशी माझी पण विनंती आहे.

**<u>महापालिका सचिव:-</u>** ठेकेदार जर त्याच दरावर काम करण्यास तयार असेल तर १६ करोड, ४९ लाख, ....

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** नाही नाही, पहिले ६ करोड आणि १० करोड ते.

**<u>महापालिका सचिव:-</u>** होय म्हणून मी १६ करोड वाचले ना. एकुण १६ करोड, ४९ लाख हे टाकते.

**<u>शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-</u>** जो वाढीव काम आहे, त्याचे अभिप्राय टेंडर कमिटीकडून घेण्यात यावे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:-** आम्ही ठराव करीत आहेत. तुम्ही १० कोटी यात टाका.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** आम्ही ठराव करीत आहेत, आपण आम्हांला सुचना देवू शकत नाहीत. याच्याकडून अभिप्राय घ्या, त्याच्याकडून अभिप्राय घ्या, हे नाही यु कॅन नॉट डीटेक्टेड आम्ही आमचा ठराव पास करीत आहेत. स्थायी समिती तुम्हांला ज्या सुचना देते, तर तुमचे काम आहे की, पुर्ण करणे.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** सचिव मॅडम ठराव वाचा.

**<u>महापालिका सचिव:-</u>**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०२१-२२ मध्ये उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र.१ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डेडांबरीकरणाने भरणेया कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन यांचेशी रु.६,४९,४५,१२०/- एवढ्या रक्कमेच्या संविदा करणेस मान्यता देत आहे आणि १० कोटी रुपये लेखाशिर्षात बददल करणेस मान्यता देत आहे.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** यामध्ये आम्ही आयुक्तांना प्राधिकृत करुन काही तांत्रिक सुधारणा असतील तर सांगू.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:-</u>** प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे, इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..

**<u>सदस्या, श्रीम. कंचन लुंड:-</u>** सभापतीजी , मला तुम्ही सांगितले होते की, माझ्या कामासाठी आयुक्तांना कधी भेटायचे ते मला आताच सांगा.

**<u>सभापती, श्री. दिपक सिरवानी:-</u>** उद्या सकाळी आपण ११.०० वाजता या. आयुक्तांबरोबर माझे बोलणे झाल्या नंतर मी तुम्हांला सांगेल.

**<u>महापालिका सचिव:-</u>** ठराव पास झाला आहे आणि या सभेचे विषय संपले आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. सभापतीजी, आपल्या उल्हासनगर महानगरपालिका, अग्निशमन दलाच्या चार कर्मचा-यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळाला आहे, श्री. बाळू नेटकेजी, अग्निशमन अधिकारी, श्री. पंकज पवार, श्री. संदिप, श्री. राजेंद्र विर, सहाय्यक अग्निशमन अधिकारी तर मी सगळयांना विनंती करतो की, यांचे सगळयांचे इथे अभिनंदन करण्यात यावे आणि महासभेमध्ये आपण करणार तर आहेतच पण इथे टाळया वाजवून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

**<u>सभापती, श्री.दिपक सिरवानी:-</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .**

---

☑**विषय क्र. १२ :-** वर्ष २०**२१**-२२ मध्ये उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र.१ते ४ मधील
**रस्त्यांवरील खड्डेडांबरीकरणाने भरणेया कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशीसंविदा करणेस मान्यतामिळणेबाबत..**

**<u>प्रस्तावना</u>**

वर्ष २०२१-२२ मध्ये उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र.१ते४मधील रस्त्यांवरील खड्डे डांबरीकरणाने भरणेया कामाची दिनांक १३/०१/२०२१ ते ०४/०२/२०२१ या कालावधीत ई निविदा मागविण्यात आली होती.

त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ६४९५००००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १८/०५/२०२१ |

| | | |
|---|---|---|
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १८/०५/२०२१ ते २४/०५/२०२१ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक २५/०५/२०२१ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०९/०७/२०२१ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | -- |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०४ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०४ |

दिनांक ०९/०७/२०२१ रोजी उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र.१ते४मधील रस्त्यांवरील खड्डे डांबरीकरणाने भरणेया कामाचा तांत्रिक भाग उघडण्यात आला. सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तांत्रिक भाग (Technical Bid)**

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | झा.पी.ॲण्ड कंपनी | जयहिंद रोड बिल्डर्स | जयभारत कंन्स्ट्रक्शन | साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|---|---|
| १ | Certificate of Registration in appropriate Class from Certificate of Registration in appropriate Class from CPWD/State PWD/CIDCO/MCGM./MJP etc. | आहे | आहे | आहे | आहे |
| २ | Attested Copy of Pan Card | आहे | आहे | आहे | आहे |
| ३ | Goods &Service Tax Registration / Undertaking for Goods &Service Tax Exemption | आहे | आहे | आहे | आहे |
| ४ | Income Tax Statement Return Statement and Turnover statement duly signed by the CA of Last Three years. | आहे | आहे | आहे | आहे |
| ५ | EPF Registration Certificate Number | आहे | आहे | आहे | आहे |
| ६ | Tenderer should have successfully completed with Government / Semi Government / Public Sector at least one similar type of work in last ५ years (Five years) | आहे | आहे | आहे | आहे |
| ७ | Annual Turnover of Last five years | आहे | आहे | आहे | आहे |
| ८ | The tenderer will be qualified only if their available bid capacity is more than the total estimated value of works for which he has offered his bid.(A*N*१.५) - B | आहे | आहे | आहे | आहे |
| ९ | The tenderer should possess his owned Ready Mix Concrete Plant | आहे | आहे | आहे | आहे |
| १० | Static Roller ८ to १० tonne, Smooth Wheeled power roller | आहे | आहे | आहे | आहे |
| ११ | Truck / Tipper/ Tractor | आहे | आहे | आहे | आहे |
| १२ | Ready Mix Concrete Plant | आहे | आहे | आहे | आहे |
| १३ | Transit Mixture ५ to ६ cum capacity | आहे | आहे | आहे | आहे |
| १४ | ५००/- Stamp Paper | आहे | आहे | आहे | आहे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५ | Work in hand | आहे | आहे | आहे | आहे |
| १६ | Eligible / Not Eligible | आहे | आहे | आहे | आहे |
| | | **पात्र** | **पात्र** | **पात्र** | **पात्र** |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार निविदाकारांच्या कागदपत्रांची छाननी केली असता १) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी २) मे.जय हिंद रोड बिल्डर्स ३) मे.जय भारत कंन्स्ट्रक्शन व ४) मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन हे चारही निविदाकार पात्र ठरत आहेत. परंतू मे.झा.पी.ॲण्ड कंपनी व मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन यांनी अशी तक्रार केली आहे की, मे.साई सिध्दनाथ यांनी निविदेकरीता अपलोड केलेले कागदपत्र स्पष्ट नसून असदृश्य आहेत. सदर तक्रार प्राप्त झाल्यानंतर वरील चारही निविदाकारांना त्यांचे मुळ कागदपत्र तपासणी साठी कार्यालयात सादर करणेबाबत पत्र दिले. पत्रात असे स्पष्ट नमुद केले आहे की, जे कंत्राटदार मुळ कागदपत्र सादर करणार नाहीत, त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात येईल. दिनांक १४/०७/२०२१ पर्यंत कोणीही कागदपत्र सादर केले नसल्याने पुनश्च दिनांक २३ जुलै,२०२१ रोजी वरील चारही कंत्राटदार यांना मुळ कागदपत्र सादर करणेसंदर्भात स्मरणपत्र देण्यात आले.

दिनांक २७/०७/२०२१ रोजी १) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी २) मे.जय हिंद रोड बिल्डर्स ३) मे.जय भारत कंन्स्ट्रक्शन हे कंत्राटदार मुळ कागदपत्रांसह कार्यालयात आले असता, संबंधित उप-अभियंता यांनी मुळ कागदपत्रांची तपासणी केली आहे. तसा अहवाल उप-अभियंता यांनी सादर केला. तथापी, यामध्ये मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांनी विहित मुदतीत मुळ कागदपत्र तपासणीकरीता सादर केलेले नाही. त्यामुळे मे. साई सिध्दनाथ यांना अपात्र ठरविण्यात आले.

सदर पात्र/ अपात्र निविदाकारांची माहिती दिनांक ०६/०८/२०२१रोजी सायं.४.०० वाजेपासून ते १०/०८/२०२१ सायं ४.०० वाजेपर्यंत या कालावधीकरीता उल्हासनगर महानगरपालिकेच्या www.umc.gov.inया संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे Ulhasnagar.pwd@gmail.comया मेलवर व शहर अभियंता यांचे कार्यालयात लेखी स्वरुपात हरकती व सुचना मागविण्यात आल्या होत्या. परंतू दिनांक १०/०८/२०२१ रोजी सायं.४.०० वाजेपर्यंत कोणत्याही हरकती / सुचना प्राप्त झालेल्या नसल्याने दिनांक १८/०८/२०२१ रोजी सदर निविदेचा दुसरा लिफाफा (आर्थिक भाग) उघडणेत आला.निविदाकारांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **निविदाकारांचीनावे** | **दिलेलेदर** |
|---|---|---|
| १ | मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन | १.३५०% टक्के कमी |
| २ | जयहिंद रोड बिल्डर्स | ०.९९०% टक्के जास्त |
| ३ | झा.पी.ॲण्ड कंपनी | ०.०००% टक्के जास्त |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन यांचे दर निम्न आहेत. त्यांनी १.३५० टक्के कमी इतके दर सादर केले आहेत. शासन परिपत्रक क्रमांक : सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दिनांक २६ नोव्हेंबर,२०१८ अन्वये रुपये ६,५०,०००/- परफॉमस सेक्युरीटी रक्कमेचा भरणा आठ दिवसांत संबंधित एजन्सीकडून घेण्यात येत आहे.

तरी उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र.१ते४मधील रस्त्यांवरील खड्डे डांबरीकरणाने भरणे प्राकलनिय खर्च रु.६,४९,४५,१२०/- एवढ्या रक्कमेच्या कामाकरीता निम्न दराचे मे.जयभारत कंन्स्ट्रक्शनयानिविदाकाराशीसंविदाकरणेसस्थायीसमितीच्या मान्यतेकरीता प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. ४४** **दिनांक : २०/०८/२०२१**

**सुचकाचे नावः— श्री. भगवान भालेराव**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी**

57

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारवर्ष २०२१-२२ मध्ये उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र.१ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डेडांबरीकरणाने भरणेया कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन यांचेशीरु.६,४९,४५,१२०/- एवढ्या रक्कमेच्या संविदा करणेस मान्यतादेत आहे.

परंतु

३) जुलै ऑगस्टमध्ये झलेल्या अतिवृष्टीमुळे सदर काम वाढणार आहे. तरी वाढीव काम करण्यासाठी सदर लेखाशिर्ष (रस्ते दुरुस्ती) अंतर्गत तरतुद उपलब्ध नसल्याने नवीन रस्ते डांबरीकरण या लेखाशिर्षातुन १० कोटीची अतिरिक्त तरतुद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अन्वये पुर्नसमायोजन करुन नव्याने निविदा मागविण्यास मान्यता देत आहे.

४) परंतु तो पर्यंत प्रत्यक्ष काम करताना स्थानिक आवश्यकतेनुसार काही कमी जास्त झाल्यास (अपेक्षित रक्कमेची अनुज्ञेय कमी/जास्त) वरील दराने त्या कंत्राटदाराकडून गरजेनुसार काम करुन घेणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेत येत आहे. करारनाम्यात तसे समाविष्ट करावे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ४.५५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती, श्री. दिपक सिरवानी यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक –२६/०३/२०२१

दिनांक –२६ /०३ /२०२१ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

७

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक २६/०३/२०२१, रोजी सायंकाळी५.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील महासभा सभागृह येथे शासनाचे क्रमांक कोरोना-२०२० /पत्रक्र.७६/नवि-१४, दिनांक २१ डिसेंबर, २०२० च्या पत्रान्वये विहित कार्यपध्दती पालन करुन प्रत्यक्ष सहभागाने/उपस्थितीने घेण्यांत आली, सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. विजय चाहू पाटील | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | सदस्य |
| ४ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |
| ५ | श्री. राजेश वदारिया | सदस्य |
| ६ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | सदस्या |
| ७ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | सदस्या |
| ८ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | सदस्या |
| ९ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| १० | श्रीमती अर्चना करणकाळे | सदस्या |
| ११ | श्रीमती कंचन अमर लुंड | सदस्या |
| १२ | श्री. राजकुमार किशनचंद जग्यासी | सदस्य |
| १३ | श्री.कुलवंतसिंह सोहता | सदस्य |

तर,
खालील दर्शविलेले सदस्य सभेस अनुपस्थित होते.

**१.** श्रीमती जया प्रकाश माखिजा
२. श्री. चंद्रशेखर यादव.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्रीमती करुणा जुईकर, अतिरीक्त आयुक्त
२.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय)
४.डॉ. दिपक पगारे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
५. श्री. मंगेश गावडे मुख्य लेखापरिक्षक
६. श्री. सुर्यकांत खटके, लेखाधिकारी
७.श्री. अशोक मोरे, सहा लेखा परिक्षक
८. श्री. महेश सितलानी, शहर अभियंता
९.श्री. मनिष हिवरे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी

१०. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता
११. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी
१२. श्री. नितेश रंगारी, अधिक्षक
१३. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
१४. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भंडार विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती नर्गिस खान, लिपिक
२.श्री. बाळु भांगरे, लिपिक
३. श्रीमती विद्या आढळ, लिपीक

सकाळी५.१५ वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

या वेळी अतिरिक्त, आयुक्त, श्रीम. करुणा जुईकर या आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ होत्या.

महापालिका सचिवः—तिसरी सभा सुरू होत आहे.

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक १ वाचून दाखवितात.

---

**⇨ विषयक्र.१.:- उल्हासनगर-३ येथील क्रिटीकेअर हॉस्पीटल ते पंजाबी कॉलनी, शास्त्रीनगर, तुलसी विहार पर्यंतचा रस्ता सिमेंट काँक्रीट करणे या कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणे.**

---

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः— ठिक आहे. चांगले आहे, रस्त्याची कामे होत आहेत. परंतु यामध्ये काही गोष्टीचा समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे. हे काम होणार आहे हे त्यावेळी डी.पी.च्या नुसार काम चालू होणार आहे. काही ठिकाणी रोड कटींग साठी अडचणी येतील. तर हे जे असेल त्याची वाट न पाहता काम चालू राहावे. जो पर्यंत कटींग होत नाही. त्या ठिकाणी काम पूर्ण रूपाने चालू राहीले पाहिजे आणि हे काम लवकरात लवकर पूर्ण झाले पाहीजे. या कामामध्ये अडचणी न येता प्रशासनाने चांगल्या प्रकारे सहयोगाने, ठेकेदाराल ज्या काही अडचणी येतील त्या शहर अभियंता यांनी त्या पूर्ण करून दिले पाहीजेत आणि मी हा ठराव देत आहे, तो वाचून...

सदस्य, श्री. राजू जग्यासीः— मा. सभापतीजी, मा. आयुक्त मॅडम याचा सारखाच एक मुदद्दा आहे की आपल्या शहर अभियंता माहिती आहे की आमच्या पॅनलमध्ये ओटी सेक्शनवाला रोड, जो रामायण नगर लक्ष्मीनगर पासून ३ नंबर ओटी पर्यंत रोड जात आहे. हा रोड देखील पास होवून वर्क ऑर्डर दिलेली आहे. केवळ त्या ठिकाणी काही टाऊन प्लॅनिंग, डी.पी. नुसार रोड कटींगची काही मार्किंग दयायची आहे हया कारणामुळे हा रोड अजून चालू करण्यात आलेला नाही आहे. दोन तीन वेळा हा विषय निघालेला आहे तर हया मुददयाला प्राथमिकता देवून ज्या ठिकाणी कटींग करायची आहे तर ठिक आहे जर संभव नाही आहे. नाही तर काय होते की, प्रत्येक वर्षी रोड न बनवल्यामुळे पावसाळयामध्ये मोठ मोठे खडडे होत असतात आणि १ वर्षा पूर्वी या ठिकाणी एक ते दोन मृत्यु झालेले आहेत.तर आपण टाउन प्लॅनिंग विभागाला आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी जागेवर पाहणी करून तात्काळ निर्णय घेण्यात यावा. वर्क ऑर्डर वगैरे आगोदरच झालेली आहे. शितलानीजी बरोबर आहे. तरी आपण त्यांना तसा आदेश देण्यात यावा.

सदस्य, श्री. भारत राजवानीः—माझ्याकडे सुध्दा एका रोडचे आनंदपूरी दरबारचे काम थांबलेले आहे. अर्धी मार्किग दिली आहे अर्धी मार्किंग देणेची बाकी आहे. तर आपण नगररचनाकार विभागाला आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने ते काम करावे आणि मार्किंग देण्याचे वेळी एका ठिकाणी थोडीशी चूक झालेली आहे तर तेही दुरूस्त करण्यात यावे.

सदस्या, श्रीम. कंचन अमर लुंडः— सभापतीजी, मला एक माहिती पाहिजे होती. सितलानीजी यांना बोलविण्यात यावे, की मार्च, २०१८ मी जेव्हा सभापती होती त्यावेळी मी रामरक्षा रोडचे स्थायी समितीकडून मान्यता घेवून केले होते. तरी सुध्दा त्याचे स्टेटस काय आहे? व आतापर्यंत हा रोड का बनविला नाही.

शहर अभियंता, श्री. महेश शितलानीः— मॅडम, कोणता रोड?

<u>सदस्या, श्रीम. कंचन अमर लुंड:—</u> रामरक्षा रोड, स्टेटस काय आहे? मी स्थायी समितीमध्ये मान्यता दिलेली होती, अजून पर्यंत रोड का झाला नाही?

<u>शहर अभियंता, श्री. महेश शितलानी:—</u> टेंडर कॉल झालेला नाही.

<u>सदस्या, श्रीम. कंचन अमर लुंड:—</u> टेंडर कॉल झालेला नाही म्हणजे काय या ठिकाणाहून मान्यता होवून गेला आहे. टेंडर कॉल का नाही झाला?

<u>शहर अभियंता, श्री. महेश शितलानी:—</u> मॅडम या बाबतची चौकशी व माहिती घेऊन तीन चार दिवसात देण्यात येईल. आता तर माझ्याकडे माहिती नाही, मी सात दिवसाच्या आतमध्ये...

<u>सदस्या, श्रीम. कंचन अमर लुंड:—</u> मी आपल्याला किती वेळा कॉल केलेला आहे, मॅसेजेस केलेले आहेत आपल्याला तर फोन उचलायला वेळच मिळत नाही. आपण फोन का उचलत नाही, तसेच मी एक महिना मेसेज केलेला आहे. मेसेजला सुध्दा रिप्लाय देत नाही. एवढे कामात बिझी असतात तर राजीनामा का देत नाहीत.मला याची माहिती पाहिजे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> सभापती महोदय, आमच्या सदस्यानी हा विषय घेतला आहे. आपण शहर अभियंता यांना आदेश करावा की उदया, परवा, किंवा सुटटीचे दिवस सोडून मंगळवारी त्याच्यांशी भेट घेवून जो पण विषय, रामरक्षा हॉस्पीटलचा रोड बाबतची संपूर्ण माहिती देण्यात यावी.

<u>सदस्या, श्रीम. कंचन अमर लुंड:—</u> रोडच्या काम आहे. माझा याला विरोध आहे की, माझे वार्डातला रोड का बनविला जात नाही. सन २०१८ पासून एम.एम.आर.डी.ए. कडून सुध्दा या रस्त्यासाठी मी मान्यता घेतली आहे.

<u>सभापती, श्री. विजय चाहू पाटील:—</u>संबंधित अधिका—यांनी चार ते पाच दिवसात नगरसेवकांच्या तिथे जावून बघून त्यांचे समाधान करावे.(येथे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सभापतींना ठराव दिला.) सचिव मॅडम वाचा ठराव.

<u>सदस्य,श्री. राजेश वधारिया:—</u> सभापतीजी, या विषयामध्ये मा. आयुक्त साहेबांना धन्यवाद देतो की, या रोडची परिस्थिती खूप खराब आहे आणि या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर जी वस्तुस्थिती आहे आम्ही सांगितले की हा जो क्रिटीकेअर हॉस्पीटल पासून ते पंजाबी कॉलनी चौक, कविता मेडीकलपासून ओ.टी.पी. स्कुल जवळून तुलसी निवासापर्यंत त्यालाच वडार कॉलनी चौक सुध्दा बोलतात तर इथपर्यंत हा रोड बनविला जाणार आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की, काही ठिकाणी जागा कमी मिळेल. ऍज पर डी.पी. नुसार मिळणार नाही तर त्या ठिकाणी उपलब्ध जो विडथ रोड ची मिळत असेल, ॲडजस्टींग विडथ ज्या ठिकाणी मिळेल तेवढाच रोड बनविला गेला पाहीजे. हा ठराव दिलेला आहे. आणि हे काम लवकरात लवकर चालू व्हावे. तसेच दिलेल्या मुदतीत वेळेत काम पूर्ण करावे. यासाठी मी सांगतो की, या कामामध्ये प्रशासनाने पूर्ण लक्ष घालून काम करण्याबाबत माहिती दयावी आणि या रोडचे काम लवकरात लवकर चालू झाले पाहिजे आणि पुर्ण पण झाले पाहीजे.

<u>महापालिका सचिव:—</u> हा ठराव सर्वांना समजला पाहिजे म्हणून वाचून दाखविते. ही स्थायी समिती उल्हासनगर ३ येथील क्रिटीकेअर हॉस्पीटल, पंजाबी कॉलनी शास्त्रीनगर तुलसी विहार पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे या कामाच्या निविदेश प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांच्याशी संविदा करणेस तसेच रस्त्यावर विदयुत टेलिफोन वायरींग साठी केलेले रस्ते दुरूस्त व वाढीव काम सदर ठेकेदाराकडून पूर्ववत करून घेणेस येणा—या खर्चास मान्यता देवून कामासाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे. आपण आता सुध्दा सांगा नंतर ठरावात बदल करता येणार नाही.

<u>सदस्य,श्री. राजेश वधारिया:—</u>हा आम्हांला समजून घ्यायचे आहे, आपण पुर्ण करा, नंतर मी बोलतो.

<u>महापालिका सचिव:</u>—तसेच सदरचे सहा महिने मुदतीचे वेळेत पूर्ण करण्यासाठी त्यांना लवकरात लवकर देयक अदा करण्यात यावे. जेणेकरून कामे थांबणार नाहीत. तसेच डी.पी. काम करायचे आहे परंतु ज्या ठिकाणी जागा उपलब्ध नाही त्या ठिकाणी जागा उपलब्धतेनुसार कामे करण्यात यावी. इतिवृत्ताची वाट न पाहता.

<u>सदस्य, श्री. राजेश वधरीया:—</u> बरोबर आहे. मला हे समजून घ्यायचे आहे की, आपण एक शब्द सांगितला खडडे भरण्याचा याचा अर्थ काय आहे? आपण मराठी वाचले त्याचा हिंदी मध्ये अर्थ सांगा. तो जो शब्द आहे तो काढून टाकला पाहिजे.

<u>महापालिका सचिव:—</u> ठराव दुरूस्ती आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वधरीया:—</u> हे ५ करोडचे टेंडर आहे. त्यामध्ये तर त्यांनी घेतलेले असेल.तर असे नाही होणार की, त्यांनी घेतला नसेल.

<u>महापालिका सचिव:—</u>नाही. आपण ठराव दिलेला आहे मला त्यातली माहिती नाही. तुम्हांला काय पाहिजे होते.ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार व सभेत ठरलेल्या चर्चेअंती**उल्हासनगर-३ येथील क्रिटीकेअर हॉस्पीटल ते पंजाबी कॉलनी, शास्त्रीनगर, तुलसी विहार पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे या कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस**तसेच रस्त्यावर विदयुत टेलिफोन वायरींगसाठी केलेले रस्ते दुरुस्तीमुळे काम वाढल्यास ते काम सदर ठेकेदाराकडून पूर्ववत करुन घेणेस येणा—या खर्चास मान्यात देउन या कामासाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे. तसेच सदरचे **काम निविदेत नमुद केलेल्या विहित वेळेत**पुर्ण करण्यासाठी त्यांना लवकरात लवकर देयक अदा करण्यात यावे. जेणेकरून कामे थांबणार नाहीत. तसेच डी.पी. काम करावयाचे असून परंतु ज्या ठिकाणी जागा उपलब्ध नाही त्या ठिकाणी जागा उपलब्धेनुसार काम करण्यात यावे.

<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:—</u> पास..इतिवृत्ताची वाट न पहाता.

<u>महापालिका सचिव:—</u> पास इतिवृत्ताची वाट न पाहता. सर्व संमतीने पास...

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

**<u>सभापती, श्री.विजय पाटील :-</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

☑विषय क्र. १ :—**उल्हासनगर-३ येथील क्रिटीकेअर हॉस्पीटल ते पंजाबी कॉलनी, शास्त्रीनगर, तुलसी**विहार पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे या कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर-३ येथील क्रिटीकेअर हॉस्पीटल ते पंजाबी कॉलनी, शास्त्रीनगर, तुलसी विहार पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे या कामाची दिनांक ०७/०१/२०२१ ते २९/०१/२०२१ या कालावधी ई निविदा मागविण्यात आली होती. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ४८४७६७२७/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०७/०१/२०२१ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०७/०१/२०२१ ते २८/०१/२०२१ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक २८/०१/२०२१ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/०२/२०२१ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | -- |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०६ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०६ |

दिनांक ०८/०२/२०२१ रोजी उल्हासनगर-३ येथील क्रिटीकेअर हॉस्पीटल ते पंजाबी कॉलनी, शास्त्रीनगर, तुलसी विहार पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे या कामाचा तांत्रिक भाग उघडण्यात आला. सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**<u>तांत्रिक भाग (Technical Bid)</u>**

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | झा.पी.अॅण्ड कंपनी | जयहिंद रोड बिल्डर्स | शंकर ट्रेडर्स | साई सिध्दनाथ कंन्स्टक्शन | जयभारत कंन्स्ट्रक्शन | दत्त दिगंबर कंन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Certificate of Registration in appropriate Class from Certificate of Registration in appropriate Class from CPWD/State PWD/CIDCO/MCGM./MJP etc. | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| २ | Attested Copy of Pan Card | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ३ | Goods &Service Tax Registration / Undertaking for Goods &Service Tax Exemption | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ४ | Income Tax Statement Return Statement and Turnover statement duly signed by the CA of Last Three years. | आहे | आहे | आहे | आहे | आहे | अन्य कंपनीच्या नाव |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | EPF Registration Certificate Number | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ६ | Tenderer should have successfully completed with Government / Semi Government / Public Sector at least one similar type of work in last ५ years (Five years) | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ७ | Annual Turnover of Last five years | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ८ | **The tenderer will be qualified only if their available bid capacity is more than the total estimated value of works for which he has offered his bid.(A*N*१.५) - B** | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ९ | The tenderer should possess his owned Ready Mix Concrete Plant | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| १० | **Static Roller ८ to १० tonne, Smooth Wheeled power roller** | आहे | आहे | कागदपत्र नाही | कागदपत्र नाही | आहे | आहे |
| ११ | **Truck / Tipper/ Tractor** | आहे | आहे | मालकी नाही | आहे | आहे | आहे |
| १२ | **Ready Mix Concrete Plant** | आहे | आहे | आहे | आहे | आहे | कागदपत्र नाही |
| १३ | **Transit Mixture ५ to ६ cum capacity** | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| १४ | **५००/- Stamp Paper** | आहे | आहे | आहे | नाही | आहे | आहे |
| १५ | **Work in hand** | आहे | आहे | आहे | दिलेले नाही | आहे | आहे |
| १६ | **Eligible / Not Eligible** | पात्र | पात्र | अपात्र | अपात्र | पात्र | अपात्र |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार निविदाकारांच्या कागदपत्रांची छाननी केली असता १) शंकर ट्रेडर्स २) साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन व ३) दत्त दिगंबर कंन्स्ट्रक्शन या तीन निविदाकारांनी सादर न केलेले कागदपत्र सादर करणेबाबत दिनांक २२/०२/२०२१ रोजीच्या पत्रानुसार कळविण्यात आले होते. परंतू १) साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन व दत्त दिगंबर कंन्स्ट्रक्शन यांनी कागदपत्र सादर केले नाही व शंकर ट्रेडर्स यांनी हरकत दाखल केली आहे. मा.आयुक्त यांचे निर्देशानुसार हरकतदार मे.शंकर ट्रेडर्स व निविदा समिती यांची बैठक शुक्रवार दिनांक ०५/०३/२०२०रोजी स्थायी समितीच्या दालनात घेण्यात आली. सदर बैठकीस मे.शंकर ट्रेडर्स यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीच्या दरम्यान मे.शंकर ट्रेडर्स यांचे म्हणणे ऐकून घेतले व त्यांच्या कागदपत्रांबाबत पुनश्च छाननी करुन निर्णय घेण्यात येईल असे निविदा समितीने सांगितले. तद्नंतर शंकर ट्रेडर्स यांचे कागदपत्रांची पुनश्च छाननी केली दोन मुद्दयांमध्ये शंकर ट्रेडर्स अपात्र होत होते. ते खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १० | Static Roller ८ to १० tonne, Smooth Wheeled power roller | कागदपत्र नाही |
| ११ | Truck / Tipper/ Tractor | मालकी नाही |

यामध्ये मुद्दा क्र.१० करीता मे.शंकर ट्रेडर्स यांनी कागदपत्र सादर केल्याने सदर मुद्दयाकरीता पात्र करण्यात आले व मुद्दा क्र.११ करीता विधी विभागाचे अभिप्राय घेण्यात आले. विधी विभागाचे अभिप्रायानुसार वाहन संस्थेच्या नावे असल्यास ग्राह्य धरणे योग्य आहे व वाहन वैयक्तिक मालकीचे असल्यास ग्राह्य धरण्यात येऊ नये. असे विधी विभागाने अभिप्राय दिले. शंकर ट्रेडर्स यांचेकडे बांधकामाकरीता लागणार वाहन संस्थेच्या नावे नसून वैयक्तिक नावे आहे. यावरुन शंकर ट्रेडर्स अपात्र ठरत होते.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन उल्हासनगर-३ येथील क्रिटीकेअर हॉस्पीटल ते पंजाबी कॉलनी, शास्त्रीनगर, तुलसी विहार पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे या कामाचे निविदाप्रक्रियेत १) शंकर ट्रेडर्स २) साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन व ३) दत्त दिगंबर कंन्स्ट्रक्शन हे तीन निविदाकार अपात्र ठरत आहेत. व १) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी २) मे.जयहिंद रोड बिल्डर्स व ३) मे.जय भारत कंन्स्ट्रक्शन हे तीन निविदाकार पात्र ठरत असल्याने सदर पात्र/ अपात्र निविदाकारांची माहिती दिनांक ०८/०३/२०२१रोजी सायं.४.०० वाजेपासून ते १०/०३/२०२१ सायं ४.०० वाजेपर्यंत या कालावधीकरीता उल्हासनगर महानगरपालिकेच्या www.umc.gov.inया संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे Ulhasnagar.pwd@gmail.comया मेलवर व शहर अभियंता यांचे कार्यालयात लेखी स्वरुपात हरकती व सुचना मागविण्यात आल्या होत्या. परंतू दिनांक १०/०३/२०२१ रोजी सायं.४.०० वाजेपर्यंत कोणत्याही हरकती / सुचना प्राप्त झाल्या नसल्याने दिनांक १२/०३/२०२१ रोजी सदर निविदेचा दुसरा लिफाफा (आर्थिक भाग) उघडणेत आला.निविदाकारांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकारांचीनावे | दिलेलेदर |
|---|---|---|
| १ | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी | ७.८६०% टक्के कमी |
| २ | जयहिंद रोड बिल्डर्स | ११.०७०% टक्के जास्त |
| ३ | जयभारत कंन्स्ट्रक्शन | ६.०००% टक्के जास्त |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यांचे दर निम्न आहेत. त्यांनी ७.८६० टक्के कमी इतके दर सादर केले आहेत. शासन परिपत्रक क्रमांक : सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दिनांक २६ नोव्हेंबर,२०१८ अन्वये परफॉमस सेक्युरीटी रक्कमेचा भरणा आठ दिवसांत संबंधित एजन्सीकडूनघेण्यात येत आहे.

तरी उल्हासनगर-३ येथील क्रिटीकेअर हॉस्पीटल ते पंजाबी कॉलनी, शास्त्रीनगर, तुलसी विहार पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे प्राकलनिय खर्च रु.४,८४,७६,७२७/- एवढ्या रक्कमेच्या कामाकरीता निम्न दराचे झा.पी.ॲण्ड कंपनी यानिविदाकाराशीसंविदाकरणेसस्थायीसमितीच्या मान्यतेकरीता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.६५          दिनांकः— २६/३/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार व सभेत ठरलेल्या चर्चेअंती**उल्हासनगर-३ येथील क्रिटीकेअर हॉस्पीटल ते पंजाबी कॉलनी, शास्त्रीनगर, तुलसी विहार पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे या कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस**तसेच रस्त्यावर विदयुत टेलिफोन वायरींगसाठी केलेले रस्ते दुरुस्तीमुळे काम वाढल्यास ते काम सदर ठेकेदाराकडून पूर्ववत करुन घेणेस येणा—या खर्चास मान्यात देउन या कामासाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे. तसेच सदरचे **काम निविदेत नमुद केलेल्या विहित वेळेत**पुर्ण करण्यासाठी त्यांना लवकरात लवकर देयक अदा करण्यात यावे. जेणेकरून कामे थांबणार नाहीत. तसेच डी.पी. काम करावयाचे असून परंतु ज्या ठिकाणी जागा उपलब्ध नाही त्या ठिकाणी जागा उपलब्धेनुसार काम करण्यात यावे.

या ठरावा अंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता तो अंमलात आणण्यात येईल.

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक २ वाचून दाखवितात.

———————————————————————————————

➩ **विषयक्र.२.**:- उल्हासनगर शहरासाठी जुन्या भुयारी गटार योजनेचे खडेगोलवली येथे असलेले मलशुध्दीकरण केंद्र व जागेची सुरक्षा ठेवणेसाठी सुरक्षा रक्षक नेमणेबाबत.

———————————————————————————————

सदस्य, श्री. राजेश वधरीयाः— आपल्याकडे किती सुरक्षारक्षक आहेत आणि किती पाहिजेत? अजून किती पाहिजेत सुरक्षारक्षक.

सदस्य, श्री. राजू जग्यासीः— पाणी पुरवठा विभागाचा विषय आहे का?

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानीः— या विषयाची कोणी माहिती देत नसतील तर हा विषय डिफर करण्यात यावा.

सदस्य, श्री. राजू जग्यासीः—आहे का कोणी?

सदस्य, श्री. राजेश वधरीयाः— सदर च्या विषयी प्रशासनामार्फत कोणीही माहिती देण्यास तयार नाही. डिफर.

सदस्या, श्रीम. ज्योती गायकवाडः— शाळेवर पण सुरक्षारक्षक असायला पाहिजेत.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः— शाळा बंद आहेत.

सदस्य, श्री. भारत राजवानीः— गार्डन पण बंद आहेत.

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानीः— मा. सभापतीजी, ज्योतीजी गायकवाड यांनी एक खूप चांगला विषय मांडला आहे.

<u>सदस्या, श्रीम. ज्योती गायकवाड:—</u>त्याच्यासाठी आपल्याला माहिती पाहिजे ना. शाळेसाठी सुरक्षारक्षक पाहिजेत.

<u>सदस्य श्री. राजू जग्यासी:—</u> उत्तर देण्यासाठी कोणीच नाही साहेब.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u> आमच्या वार्डामध्ये गार्डन आहेत, आम्हाला पण गार्डनसाठी सुरक्षारक्षक पाहिजेत. हया सगळया गोष्टी पूर्ण झाल्या पाहिजे.

<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:—</u> अधिकारी आले तर आपण विचारू शकतो.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u> एक मिनीट अधिका—यांना बोलवा, नाही तर १० मिनीटानंतर बोलवा.

<u>सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी:—</u> हा विषय रदद् करण्यात येंत नसून डिफर करत आहेत.

<u>महापालिका सचिव:—</u> हा विषय डिफर करण्यात येत आहे.

**<u>काही सदस्य:-</u>** पास, पास....

**<u>सभापती, श्री.विजय पाटील-</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

☑विषय क्र. २ :—**उल्हासनगर शहरासाठी जुन्या भुयारी गटार योजनेचे खडेगोलवली येथे असलेले मलशुध्दीकरण केंद्र व जागेची सुरक्षा ठेवणेसाठी सुरक्षा रक्षक नेमणेबाबत.**

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरासाठी जुन्या भुयारी गटार योजनेचे खडेगोळवली येथे असलेले मलशुध्दीकरण केंद्र व जागेची सुरक्षा ठेवणेसाठी सुरक्षारक्षक नेमणे असल्याने पाणी पुरवठा विभागातर्फे सदर कामाचे रु.३०,१८,२७५/- एवढ्या खर्चाचे प्राकलण तयार करुन सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्यात आली आहे. मा. आयुक्त सो., यांचे मान्यतेने जनसंपर्क अधिकारी यांना दिनांक १६/०९/२०२० रोजीच्या सकाळ, मिड-डे, व धनुषधारी या वृत्तपत्रामध्ये जाहिरात देवून ई निविदा मागविण्यात आली होती. सदर ई निविदेच्या तांत्रिक बाबींचा लिफाफा दिनांक २८/०९/२०२० रोजी उघडण्यात आला. कागदपत्रांची छाननी केली असता तीनही निविदाकार तांत्रिकदृष्टया पात्र आहेत. त्यामुळे लिफाफा क्र.०२ (आर्थिक भाग दर) उघडण्यासाठी निविदा समिती सदस्यांची मान्यता घेणेसाठी सादर करणेत आले होते. या समितीची मान्यता घेतल्यानंतर दिनांक ०८/१२/२०२० रोजी ठेकेदार / प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत लिफाफा क्र.०२ (आर्थिक भाग दर) उघडण्यात आला.त्याप्रमाणे तीन पात्र निविदा धारकांनी भरलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | प्राकलनीय किंमत | सादर केलेला दर | एकुण रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | **मे. हर्षल टेकनिक्स, नाशिक** | **रु.३०,१८,२७५/-** | ०.१ टक्के कमी दराने | रु. ३०,१५,२५६.६४५ | I |
| २ | **मे. कल्पतरु इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रक्टर, उल्हासनगर** | | ५ टक्के जादा दराने | रु. ३१,६९,१८८.६६६ | II |
| ३ | **मे. शुभ इंटरप्रायझेस, बदलापुर** | | ७.५ टक्के जादा दराने | रु.३२४४६४५.५३९ | III |

वरील ०३ निविदाधारकापैकी मे. हर्षल टेकनिक्स, नाशिक यांचे निविदेचे दर अंदाजित किंमतीच्या दरापेक्षा ०.१ टक्के कमी दराने आहेत. त्यानुसार या कामाची एकुण किंमत रु.३०,१५,२५६.६४५ एवढी येते, सदर दर इतर एजन्सीपेक्षा तुलनात्मकरित्या न्युनतम व कमी असल्याने, वाजवी वाटतात. मे. हर्षल टेकनिक्स, नाशिक यांनी सादर केलेल्या न्युनतम निविदेची किंमत रु.२५.०० लाखापेक्षा जास्त असल्याने आर्थिक मंजुरीसह त्यांच्याशी करारनामा करुन कार्यादेश देण्यासाठी वित्तीय मान्यता घेणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने गोषवारा तयार करण्यात आला असुन, मान्यतेसाठी शिफारस करण्यात येत आहे.सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीची आर्थिक मंजुरी मिळणेसाठी मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करणेत येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.६५ अ</u>          <u>दिनांक:— २६/३/२०२१</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार**उल्हासनगर शहरासाठी जुन्या भुयारी गटार योजनेचे खडेगोलवली येथे असलेले मलशुध्दीकरण केंद्र व जागेची सुरक्षा ठेवणेसाठी सुरक्षा रक्षक नेमणेस कार्यसुचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.**

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव-** विषय क्रमांक ३ वाचून दाखवितात.

———————————————————————————————————————

⇨ **विषयक्र.३.**घनकचरा व्यवस्थापनासाठी अंबरनाथ तालुक्यातील मौजे उसाटणे येथील जागेत विविध घनकचरा प्रकल्प उभारणेसाठी सुधारित घनकचरा प्रकल्प तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे करीता सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे निविदाकार मे. टंडन अर्बन सोलुशन प्रा.ली., मुंबई यांच्याशी संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

———————————————————————————————————————

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:— या विषयाबाबतीत कोण सांगणार सरकारचा जी.आर. काय आहे? आपण जो कनसल्टंट ठेवतो त्याला किती टक्के सरकारमध्ये पैसे देणे ठेवले आहे? हा प्रस्ताव कसा येईल याची माहिती कोण देणार आहे.?

सदस्य, श्री.राजू जग्यासी:— कोणी नाही आहे. डिफर करा.

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:— नाही. डिफर नाही याबाबतीत माझेकडे एक पत्र आलेले आहे.

सदस्य, श्री.राजू जग्यासी:—कोणीच नाही तर माहिती कोण देणार? कोण आहे?

सदस्य, श्री. राजेश वधरीया:— मनिष हिवरे बसले आहेत ना.

मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:— मा. सभागृह, उल्हासनगर महापालिकेला घनकचरा व्यावस्थनासाठी जागा नसल्याने आपण शासनाकडे जागेची मागणी केली होती. त्या अनुषंगाने आपणास माहितच असेल की, उसाटणे तालुका अंबरनाथ येथे आपल्याला जवळपास ३७ एकरची जागा मिळालेली आहे आणि सदर जागेवरती सदयस्थितीत आता आपल्याकडे घनकच—यावर प्रक्रिया करण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने सदरचा दैनंदिन जो कचरा निर्माण हातो. तो आपण गायकवाडपाडा येथील खदाणीत विरगत करीत आहोत. त्यामुळे प्राप्त जागेवरती रिवाईज डी.पी.आर. व्दारे आपल्याला विविध प्रकल्प उभारायचे आहेत. ३७ एकर जागेत घनकचरा प्रक्रिया केंद्र उभारायचे आहे. तसेच इतर शासनाने दिलेल्या गाइडलाईन्सनुसार तिथे विविध प्रकल्प उभारले जातील. त्यासाठी सर्वप्रथम सदर जागेच्या प्रक्रियेत डी.पी.आर. पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे आपण सदर जागेवर रिवाईज डी.पी.आर. तयार करण्यासाठीची कन्सल्टंसीची नेमणूक करीत आहोत आणि त्यासाठी विविध प्रक्रिया अंती मेसर्स टंडन अर्बन सोल्युशन यांचे निम्न दर प्राप्त झालेले आहेत आणि माझी सभागृहाला विनंती असेल घनकच—यांची जी आताची सदयस्थिती आहे. त्याअनुषंगाने सदर सल्लागार नेमणूकीस मंजूरी दयावी जेणेकरून एमजीपी कडून मिळालेल्या गाइडलाईन्सनुसार त्वरीत तिथे काम करणे सोयीचे होईल.

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:— मौजे उसाटणे येथे किती करोड हा प्रोजेक्ट बनणार आहे.

मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—त्याचाच डीपीआर बनविण्यासाठी, त्याचा अंदाज काढण्यासाठी...

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—</u> सरकारकडून जी.आर. आला होता की, कोणताही डी.पी.आर. बनविण्यासाठी त्या डी.पी.आर.चा १.५ टक्केपेक्षा जास्त रक्कम डी.पी.आर. बनविणा—याला आपण देवू शकत नाही. याची आपल्याला माहिती नाही आहे की कितीचा डी.पी.आर. बनवायचा आहे. की ६० लाख रूपये त्यांना १ करोड आपण कसे काय देवू शकतो? दुसरी गोष्ट स्मार्ट वेस्ट मॅनेजमेंट कंपनी ही जी आहे त्यांनी एक पत्र दिलेले आहे की आपल्याला उसाटणे येथील काम सुरू करायचे आहे. आम्ही संस्थेच्या माध्यमातून फ्रि ऑफ चार्ज कन्सल्टंट नेमण्याची गरज भासणार नाही.जर आपण याला फेर निविदा करत असाल, ७ दिवसाची मुदत वाढ करून ता ती कंपनी सुध्दा भाग घेईल. आणि त्या ठिकाणचा फ्रि ऑफ चार्ज डी.पी.आर. बनवून देवू शकते. यासाठी स्थायी समितीच्या काही सदस्याना पत्र दिलेले आहे. त्यामुळे या प्रस्तावास फेरनिविदा सादर करण्यासाठी आम्ही मान्यता देत आहेत. हे परत सादर करा जेणेकरून अजून जास्त लोक सहभाग घेतील आणि याची सर्व माहिती असली पाहिजे. जेसे की एखादा २० करोड चा जर प्रजेक्ट असेल तर २० करोडचे १.५ जरी आले तरी ३० लाख रूपये होतात. ६० लाख होणार नाही कारण सरकारने बंधन केलेल आहे. हे १.५ टक्केपेक्षा जास्त देवू शकत नाही. पाणी पुरवठा विभागाचे अशा प्रकारचे ब—याच वेळा प्रस्ताव आणले होते. सरकारच्या आदेशानुसार १.५ टक्क्के पेक्षा जास्त आपण देवू शकत नाही. या प्रस्तावास परत सादर करण्यात यावे अजून लोक भाग घेतील आणि पैसे कमी खर्च होवू शकतील किंवा मोफत डी. पी.आर. बनवून मिळेल.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र सिंह भुल्लर:—</u> या टेंडरसाठी.

<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u> मा. सभागृह मी सांगू इच्छितो की एन.जीपी च्या गाइडलाईन्स आहेत. एन.जीपी ची उल्हासनगर महापालिकेवरती केस आहे. की जेणेकरून आपण लवकरात लवकर हा डी.पी.आर. बनवून उसाटणे येथे आपल्याला प्रकल्पाची तयारी करण्याची आहे. मा. महोदय यांनी सांगितल्यानुसार दोन जी.आर. आहेत. एक जी.आर. नुसार लोकसंख्येच्या आधारावरती आपण फी ठरवू शकतो. दुसरा जी.आर. आहे की, जी रक्कम आहे त्या रक्कमेच्या २ टक्केपर्यंत आपण देवू शकतो. जर आपण लोकसंख्येच्या अनुषंगाने गेला तर आज जवळपास किमान ६ लक्ष आपली लोकसंख्या आहे आणि ६ लक्ष प्रत्येक प्रमाणे १२ रूपये प्रमाणे देवू शकतो असे गाइडलाईन्स आहेत. तर त्या अनुषंगाने पण हे ६५ लाख खर्च बसतो आहे. आणि जर दुसरा २ टक्के च्या हिशोबाने घ्यायचा असेल तरी त्याची ती किमंत जी असेल डी.पी.आर.ची त्या अनुषंगाने गोषवा—यामध्ये नमूद केलेले आहे की त्यांना कोणत्याही परिस्थितीत त्या रक्कमेच्या वरती देयक दिले जाणार नाही.

<u>सदस्य, श्री भारत राजवानी:—</u> हे आम्ही ठरवू शकतो की आपण ठरवू शकता? कोणला कोणत्या जी. आर. प्रमाणे पैसे दयाचे आहेत.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—</u> नाही नाही. आता पर्यंत कन्सल्टंट नेमायचा आहे. हे दोन कन्सल्टंट. टंडनचे कोणीअधिकारी आहे सांगू शकता का? टंडन जवळ आपे किती डी.पी.आर. अपूर्ण अवस्थेत पडलेले आहेत. जर त्यांनी डी.पी.आर. बनविले पैसे पण दिले तर असा कोणता डी.पी.आर. कामयाब झाला आहे. हे सांगा. उल्हासनगर शहरात टंडने कोणकोणती कामे केली आहेत आणि ती केलेली कामे यशस्वी झाली आहेत. म्हणून आम्ही या प्रस्तावास रदद् करत आहेत आणि फेरनिविदा करण्यासाठी ७ दिवसाच्या आत त्यांना बोलविण्यात यावे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u> पास. इतिवृत्ताची वाट न पाहता. सात दिवसामध्ये फेरनिविदा आणण्यात यावी.

<u>महापालिका सचिव:—</u> पास...

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—</u> पास..पास...

<u>**काही सदस्य:-**</u> पास, पास....

<u>**सभापती, श्री.विजय पाटील-**</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

☑विषय क्र. ३ :—घनकचरा व्यवस्थापनासाठी अंबरनाथ तालुक्यातील मौजे उसाटणे येथील जागेत विविध घनकचरा प्रकल्प उभारणेसाठी सुधारीत घनकचरा प्रकल्प तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे करीता सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे निविदाकार मे. टंडन अर्बन सोलुशन प्रा.ली., मुंबई यांच्याशी संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

## प्रस्तावना

आरोग्य विभागाकडून उल्हासनगर महानगरपालिकेला घनकचरा व्यवस्थापनासाठी अंबरनाथ तालुक्यातील मौजे उसाटणे येथील जागेत विविध घनकचरा प्रकल्प उभारणेसाठी सुधारित घनकचरा प्रकल्प तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे करीता सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी ई-निविदा क्र. 2020_UMC-622495_1 अन्वये निविदा मागविण्यात आली होती.

त्यानुसार निविदा विक्री व स्विकृती दिनांक ०६/११/२०२० ते २६/११/२०२० रोजी दुपारी १२:०० वाजेपर्यंत होती.परंतु दिनांक २६/११/२०२० ई-निविदा कक्ष मार्फत मिळालेल्या माहितीनूसार दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या.तद्नंतर दिनांक ०३/१२/२०२० रोजी पर्यंत (Bid submission) साठी मुदत वाढ (1st Extension) देण्यात आली होती. तथापी दिनांक ०४/१२/२०२० रोजी मिळालेल्या माहितीनूसार पुनश्च फक्त दोनच निविदा प्राप्त झाली होती. तद्नंतर दिनांक ०८/१२/२०२० रोजी पर्यंत मुदतवाढ (**2nd**Extension) देण्यात आली होती. दिनांक ०८/१२/२०२० ई-निविदा कक्ष मार्फत मिळालेल्या माहितीनूसार दोनच निविदा प्राप्त झाल्या आहेत.

तथापी उल्हासनगर महानगरपालिकेला घनकचरा व्यवस्थापनासाठी घनकचरा प्रकल्प उभारणेसाठी सुधारीत घनकचरा प्रकल्प तयार करणेसाठी व त्याची त्वरीत अंमलबजावणी करण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करणे तातडीचे व कालमर्यादीत आहे. त्याकरीता कालावधी कमी आहे. अशा परिस्थितीत शासन निर्णय, क्रमांक:भांखस/२०१४/प्र.क्र.८२/भाग-II, उद्योग-४, दिनांक ०१/१२/२०१६ मध्ये पृष्ठ ६६ वर ४.४.३.१ वर सुचना निर्गमीत केल्यानुसार कामाची पूर्तता वेळेवर करण्यास महत्व देण्यात आले तर, खरेदी अधिकारी (दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर देखील) ३ निविदा पेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरी त्यासह पुढे जाण्याचा निर्णय घेऊ शकेल व त्यासाठी सुसाध्य कारणे नमूद करेल अशा प्रसंगी, किंमतीच्या वाजवीपणी खात्री करण्यासाठी खरेदी समितीला अतिरिक्त काळजी घ्यावी लागेल. असे नमूद केले आहे. त्यास निविदा समितीने मान्यता दिल्यानंतर सदर निविदेचा पहिला लिफाफा (तांत्रिक) दिनांक २८/१२/२०२० रोजी दुपारी ०२:०० वा.ई-निविदा कक्षात उघडण्यात आलेली आहे.

ई-निविदा कक्षा मार्फत प्राप्त झालेल्या अहवालान्वये खालिल २ निविदाकांराच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या.

१) मे. आय सी यु सी, कंन्सलंट प्रा.ली., नवी दिल्ली
२) मे. टंडन अर्बन सोलुशन प्रा.ली., मुंबई

उक्त २ ही निविदाकारांनी निविदेतील तांत्रिक माहिती व विशिष्ट अतिरिक्त अटी व शर्ती (Technical Specifications& specific additional terms and conditions) नुसार कागदपत्राची पुर्तता केली. त्याचा तपशिल खालिल प्रमाणे.

The following proposal received for the above work within the schedule time, the details of the proposals are as follows

| Sr.no | Tender Qualifying Criteria | Tandon Urban Solutions Pvt. Ltd. | ICUC Consultants Pvt. Ltd. |
|---|---|---|---|
| 1. | Scan copy of Letter of Proposal as per(APPENDIX I-FORM-1) | Submitted | Submitted |
| 2. | Tender Fee of Rs. 5,900 | Paid online | Paid online |
| 3. | EMD amount of Rs. 2 lakhs | Paid online | Paid online |
| 4. | Company Registration certificate under Companies Act, 1956, or 2013. | Submitted | Submitted |
| 5. | APPENDIX-I-FORM-4- FINANCIAL CAPACITY OF THE APPLICANT Certificate issued by the CA having average annual turnover of Rs. 100 lakhs (Rupees Hundred lakhs) for last three years. | Average Turn Over of last three years is Rs. 83.41 crore | Average Turn Over of last three years is Rs. 1.31 crore |
| 6. | PAN Card details | AADCT0885G | AACCI6429A |
| 7. | GST Registration | 27AADCT0885G1Z7 | 07AACCI6429A1ZX |
| 8. | Experience certificate / work order or in hand Consultancy Project work as consultant /sub consultants / association of Urban planning and infrastructure for aggregate project cost of not less than Rs. 20 crores (Rupees Twenty Crores) in the last five years. | Certificate from Pimpri Chinchwad Municipal Corporation submitted | Certificate from Bhopal Municipal Corporation submitted |
| 9. | Certified copy of audited balance sheet for the last three years | Submitted | Submitted |

| | | | |
|---|---|---|---|
| 10. | **Details of Technical Personnel on the rolls of the bidder along with qualification as per APPENDIX-I-FORM-5)** | **Submitted** | **Submitted** |
| 11. | **Other Document if any required pertaining to this tender.** | | |
| a. | **Appendix-I, FORM-2 – Particulars of the Applicant** | **Submitted** | **Submitted** |
| b. | **APPENDIX-I-FORM-3- POWER OF ATTORNEY** | **submitted** | **Submitted** |
| C. | **APPENDIX-I-FORM-6- PROPOSED METHODOLOGY AND WORK PLAN** | **Submitted** | **Submitted** |
| d. | **APPENDIX-I-FORM-7- CURRICULUM VITAE (CV) OF KEY PERSONNEL** | **Submitted** | **Submitted** |
| | **Remarks** | **Qualified** | **Qualified** |

Since all the bidder meeting the above minimum criteria as per tender, we further evaluating the Technical Proposals of the Qualified bidders as per the following criteria mentioned in the RFP.

| Sr.no | Tender Qualifying Criteria | Max Marks | Tandon Urban Solutions Pvt. Ltd. | ICUC Consultants Pvt. Ltd. |
|---|---|---|---|---|
| **A** | **Approach and methodology** | **10** | 5 | 8 |
| **B** | **Team Experience** | **40** | | |
| **1.** | Team Leader, Post-graduation in Environmental with 15 yrs in experience | **18** | [7.2 + 9] 16.2 | [9 + 9] 18 |
| **2.** | Project Engineer, Post-Graduation in Environmental with 10 yrs in experience | **12** | [4.8 + 5.52]10.32 | [6 + 6] 12 |
| **3.** | Design Engineer, Graduate with experience of 5 years | **5** | [2 + 2.5] | [2.5 + 2.5] 5 |
| **4.** | Resident Engineer, B.E in Civil Engineering or equivalent having 5 years experience | **3** | [1.2 + 1.5] | [1.5 + 1.5] 3 |
| **5.** | Site Engineer, B.E in Environmental /Civil Engineering or equivalent having 2 years experience | **2** | [0.8 + 0.92] 1 | [1 + 1] 2 |
| **C** | **Firm Experience** | **50** | | |
| **1.** | Should have provided or providing support as DPR Consultants /PMC / IE (consultants / sub-consultants / association) in solidwaste projects to at least 3 Municipal Corporations/Councils formission projects of GoI and state government | **15** | 15<br>1. certificate from Vasai Virar Municipal Corporation submitted<br>2. certificate from Navi Mumbai Municipal Corporation submitted<br>3. Certificate from Pune Municipal Corporation submitted | 15<br>1. Certificate from Bhopal Municipal Corporation submitted<br>2. Certificate from Kalyan Dombivli Municipal Corporation submitted<br>3. Letter from Swachh Maharashtra Mission submitted for Mira Bhayander Municipal Corporation, Bhiwandi Nizampur Municipal Corporation, Ulhasnagar Municipal Corporation, Panvel Municipal Corporation, KulgaonBadlapur Municipal Corporation,<br>4. Certificate from Katni Municipal Corporation submitted<br>5. Certificate from Directorate, Urban Administration and Development, M. P. submitted for 30 ULBs and 29 ULBs<br>6. Certificate from NL works ( Government of Netherlands) submitted for 43 ULBs<br>7. Work order from National Institute of Urban Affairs (MOHUA) submitted |
| **2.** | Should have provided or providing support as PMC / IE(consultants / sub-consultants / association) in dump siteremediation projects to at least 1 MunicipalCorporations/Councils for mission projects of GoI and stategovernment | **10** | 10<br>certificate from Vasai Virar Municipal Corporation submitted | 1. Certificate from Bhopal Municipal Corporation submitted<br>2. Certificate from Kalyan Dombivli Municipal Corporation submitted |
| **3.** | Implemented successfully at least 1 PPP MSW projects wherethe authority has signed the concession agreement with theprivate entity as PMC / IE ( consultants / sub-consultants /association) | **5** | 5<br>certificate from Navi Mumbai Municipal Corporation submitted | 5<br>1. Certificate from Katni Municipal Corporation submitted<br>2. Certificate from Bhopal Municipal Corporation submitted |
| **4.** | Implemented successfully MSW projects wherethe authority has signed the concession agreement with theprivate entity as DPR Consultants / PMC / IE (consultants / subconsultants/ association) | **5** | 5<br>Experience certificate submitted | 5<br>Experience certificate submitted |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **5.** | Empanelment under SBM | **10** | 10 | 10 |
| **6.** | Have Experience in the Konkan Region | **5** | 5 | 5 |
| | **Total (Passing Marks 60)** | **100** | **90.44** | **98** |
| | Eligibility | | **Eligible** | **Eligible** |

तद्नंतरमा.निविदा समिती व मा. आयुक्त यांच्या दिनांक २२/०१/२०२१ रोजीच्या मान्यतेनूसार सर्व निविदाकारांचा निविदेचा दुसरा लिफाफा (Commercial bid) उघडण्यापुर्वी निविदाकार व इतर यांना निविदाकारांनी अपलोड केलेल्या ऑनलाईन दस्तऐवजा बाबत हरकती मागविण्यास महापालिका वेबसाईट व महापालिका नोटिस बोर्डावर जा.क्र.उमपा/आवि/उप-आ/३३०/२०२१, दिनांक २७/०१/२०२१ अन्वे नोटिस/सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार दोन दिवसात कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष सार्वजनिक आरोग्य विभागाकडे दिनांक २९/०१/२०२१ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत हरकती मागविण्यात आल्या होत्या. सदर कालावधीत एक ही हरकत प्राप्त झाली नाही.त्यामुळे २ निविदाकार पात्र असल्याने निविदा समितीने (दुसरा लिफाफा) वित्तीय लिफाफा उघडण्यास मान्यता दिली आहे.त्यानुषंगाने दिनांक ०३/०२/२०२१ रोजी दुपारी ०३:०० वाजता निविदा समितीच्या मान्यतेने वित्तीय लिफाफा उघडण्यात आला.त्यामधिल पात्र २ ही निविदाकारांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

**तुलनात्मक तक्ता**

| Si.No | Item Description | Units | M/S ICUC Consultants Pvt Ltd. | M/S Tandon Urban Solutions Pvt Ltd. | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Providing project Management Consultancy Service for integrated Solid Waste Management projects at Ulhasnagar | Job work | 1,15,00000 | **65,00000** | 65,00000/- |

तरी निविदेतील अटी व शर्तीनूसार मे. आय सी यु सी, कंन्सलंट प्रा.ली., नवी दिल्ली व मे. टंडन अर्बन सोलुशन प्रा.ली., मुंबई यांचे तांत्रिक आणि आर्थिक स्कोअरवर आधारित एकत्रित आणि अंतिम मूल्यांकन (Combined and final evaluation Based on Technical and Financial score) खालिल प्रमाणे आहेत.

| Sr.no | Name of Firm | Rate Quoted in Financial proposal | Financial Score as per RFP | Financial Weighted Score in Combined Evaluation | Marks obtained in Technical evaluation | Technical Weighted Score in Combined Evaluation | Combined Score |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 0.20 | | 0.80 | |
| 1 | M/S Tandon Urban Solutions Pvt Ltd. | 6500000 | 100.00 | 20.00 | 90.44 | 72.35 | 92.35 |
| 2 | M/S ICUC Consultants Pvt Ltd. | 11500000 | 56.52 | 11.30 | 98.00 | 78.40 | 89.70 |

तरी उक्त नमुद तांत्रिक आणि आर्थिक स्कोअरवर आधारित एकत्रित आणि अंतिम मूल्यांकन (Combined and final evaluation Based on Technical and Financial score) नुसार मे. टंडन अर्बन सोलुशन प्रा.ली., मुंबई यांचा एकत्रित मार्क (Combined Score) मे.आय सी यु सी, कंन्सलंट प्रा.ली., नवी दिल्ली यांच्या पेक्षा जास्त आहे.व सदर कामाकरीता रु. ६५,००,०००/- (रुपये पासष्ट लाख मात्र.) इतका खर्च न्युनतम आहे. तरी प्राप्त न्युनतम दर हे शासनाने दिलेल्या सर्व निकषाच्या अनूसरुन राहतील व सदरचे दरानूसार न्युनतम दर सादर करणारे मे.टंडन अर्बन सोलुशन प्रा.ली., मुंबई यांना काम करणे बंधनकारक राहील.

तरी सदरच्या खर्चास उक्त कामासाठी न्युनतम दर सादर करणा-या निविदाकार मे. टंडन अर्बन सोलुशन प्रा.ली., मुंबई यांच्याशी संविदा करण्याकरीता मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे.करीता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा.स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र.६६

दिनांक:— २६/३/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार घनकचरा व्यवस्थापनासाठी अंबरनाथ तालुक्यातील मौजे उसाटणे येथील जागेत विविध घनकचरा प्रकल्प उभारणेसाठी सुधारित घनकचरा प्रकल्प तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे करीता सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे निविदाकार मे. टंडन अर्बन सोलुशन प्रा.ली., मुंबई यांचा संविदा रदद करुन पुन्हा नव्याने ७ दिवसाच्या अल्प मुदतीच्या कालावधीत निविदा मागवून प्रस्ताव फेरसादर करण्याचे निर्देश देत आहे.

या ठरावाच्या अंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सभापती, श्री. विजय चाहू पाटील:— ही सभा संपली असे जाहीर करतो.

सायंकाळी ५.३३ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती, श्री. विजय पाटील यांनी जाहीर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक –३०/०३/२०२१

दिनांक –३० /०३ /२०२१ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

८

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा मंगळवार दिनांक ३०/०३/२०२१, रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील महासभा सभागृह येथे शासनाचे क्रमांक कोराना-२०२० /पत्रक्र.७६/नवि-१४, दिनांक २१ डिसेंबर, २०२० च्या पत्रान्वये विहित कार्यपध्दती पालन करुन प्रत्यक्ष सहभागाने/उपस्थितीने घेण्यात आली, सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. विजय चाहू पाटील | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | सदस्य |
| ४ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |
| ५ | श्री. राजेश वदारिया | सदस्य |
| ६ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | सदस्या |
| ७ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | सदस्या |
| ८ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | सदस्या |
| ९ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| १० | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| ११ | श्रीमती अर्चना करणकाळे | सदस्या |
| १२ | श्रीमती कंचन अमर लुंड | सदस्या |
| १३ | श्री. राजकुमार किशनचंद जग्यासी | सदस्य |
| १४ | श्री.कुलवंतसिंह सोहता | सदस्य |

तर,
खालील दर्शविलेले सदस्य सभेस अनुपस्थित होते.

१. श्री. चंद्रशेखर यादव.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्रीमती करुणा जुईकर, अतिरीक्त आयुक्त

२.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव

३.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी

४.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकिय आरोग्य अधिकारी

५. श्रीमती अनिता सपकाळे, वैद्यकिय आरोग्य अधिकारी

६. श्री. मंगेश गावडे मुख्य लेखापरिक्षक

७. श्री. सुर्यकांत खटके, लेखाधिकारी

८. श्री. अश्विनी आहुजा, उप अभियंता

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्री. बाळु भांगरे, लिपिक

२.श्रीमती विदया आढळ, लिपिक

दुपारी ३.१९ वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले

या वेळी अतिरिक्त आयुक्त, श्रीम. करुणा जुईकर या आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ होत्या.

**श्रीमती अनिता सपकाळे, वैद्यकिय आरोग्य अधिकारी:-**एक विनंती होती आमचा एक आयत्यावेळेचा विषय आहे.

**महापालिका सचिव:-**एक मिनिट आपण माईक मध्ये बोला, माईक ठेवला आहे.

**श्रीमती अनिता सपकाळे, वैद्यकिय आरोग्य अधिकारी:-**सर, एक विनंती होती. आमचा एक आयत्या वेळेचा विषय आला की आपल्याकडे जे हॉटेल मयूर मध्ये जे वैद्यकीय अधिकारी जे कोव्हिड-१९ मध्ये कार्यरत होते. त्यांची आपण राहण्याची आणि खाण्याची सोय तिथे केली होती.तर त्यांचे जे देयक आहे ते आपल्याला अदा करायचे आहे तर ते आम्ही मान्यतेसाठी आपल्या समक्ष सादर करु शकतो.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** आयत्या वेळेचा विषय का घेत आहात? आयत्या वेळेचा विषय आणायचा नाही.आम्ही वाचणार कधी आणि अभ्यास कधी करणार.त्यामुळे आयत्या वेळेचा विषय आणायचा नाही.कसे काय करायचे कोणाचा आहे?

**महापालिका सचिव:-** मयुर हॉटेलचा आहे.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:-** आम्ही अभ्यास कधी करायचा, विषय पत्रिका वरती आणा. आम्ही वाचलेला नाही अभ्यास केलेला नाही आणि प्रत्येक वेळी तुम्ही हा विषय आणणार.आमचा सगळयांचा विरोध आहे.आयत्या वेळेचा कोणताही विषय घेणार नाही.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** सगळे एकत्र विषय आणण्याबददल मागच्या मिटींग मध्ये सांगितले होते. साहेब दोन तीन दिवसामध्ये २० लाख २५ लाख हॉटेलचे बील घेवून येणार.

**अतिरिक्तआयुक्त, श्रीम. करुणा जुईकर:-**सर, आता ३१ मार्च येत आहे तो पर्यंत हे बील अदा होवून जाईल, त्यामुळे आपणास एक विनंती आहे.आपण हे मान्य करा सर.

**सदस्या, श्रीम. कंचन लुंड:-**हे विषय अगोदरच आणायला पाहिजे होते.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** नंतर करु,सदर विषयाचा अभ्यास करुन नंतर केले जाईल.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** शोक सभा भरपूर आहेत त्यामुळे ५ वाजेपर्यंत मिटींग संपणार नाही. ४.०० वाजेपर्यंत ठिक आहे.

**महापालिका सचिव:-** आपल्या कारकिर्दीतील ही शेवटची सभा आहे.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** कधी मिटींग ठेवणार. आपण घ्या हे ॲडमीट आम्ही केले आहे, ६ वाजेपर्यंत मिटींग ॲडजॉन करा.

**<u>महापालिका सचिव:-</u>**सर्व समंतीने बोला, पुरस्वानी सर, एक मिनीट तुम्ही सदस्य आहेत, ॲडमीट करायचा विषय हा आयत्या वेळेचा विषय आला आहे. तुम्हाला गोषवारा समोर दिला आहे.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-</u>**मॅडम कुठला विषय आहे.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>**हे ॲडमीट करुन घेवू आणि मिटींग ४.३० वाजेपर्यंत ॲडजॉन.

**<u>महापालिका सचिव:-</u>** आता आपण एक वेळा जरी मिटींग ॲडजॉन केली तर आपणांस आज ही मिटींग पूर्ण करावयाची आहे.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>**आजच पुर्ण करणार ना.

**<u>महापालिका सचिव:-</u>**परत दुस-यांदा ॲडजॉन करता येणार नाही.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>**होय, आजच पूर्ण करणार. ४.३० वाजेपर्यंत ॲडजॉन करुन ५ वाजेर्यंत पूर्ण करु चारच विषय आहेत ना. मॅडम ही मिटींग ४.३० वाजेपर्यंत ॲडजॉन करत आहेत.

**<u>महापालिका सचिव:-</u>** सभा स्थगितीचा प्रस्ताव आला आहे, ॲडजॉन करण्याचा, सदस्यांनी मांडले आहे अनुमोदन कोणी तरी दया आणि सभापती आपण सांगावे ही सभा किती वाजता घेवू या.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>**ही सभा ४.३० वाजता घेवू .

**<u>सदस्य, श्री.भारत राजवानी:-</u>** ४.३० वाजता घेवू, ठिक आहे.

**<u>सभापती, श्री. विजय पाटील:-</u>**ही सभा ४.३० वाजता इथेच घेण्यात येईल.स्थगित करण्यात येत आहे.

या वेळी दुपारी ३.२५ वाजता सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत सभा स्थगित करण्यात आली.

**<u>महापालिका सचिव:-</u>**सभा सुरु करण्यात येत आहे.सभापती महोदयांनी मला आदेश दिले आहे.

**<u>महापालिका सचिव</u>**-विषय क्रमांक १ वाचून दाखवितात.

---

⇨ विषय क्र १:—उल्हासनगर महानगरपालिके मध्ये तात्पुरत्या स्वरुपात (कंत्राटी पध्दतीने) कोव्हिड १९ करिता ऑक्सिजन सल्लागार (Oxygen Consultant) यांना ६ महिने किंवा कोव्हिड संपेपर्यंत मुदतवाढ देणेबाबत मा.स्थायीसमिती यांचे मान्यतेस्तव सविनय सादर.

---

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>**पास..पास.. पास. मॅडम पास..इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>महापालिका सचिव:-</u>** पहिला नंबर विषय पास... इतिवृत्ताची वाट न पहाता पास बोलले आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मॅडम एक मिनीट माझे लक्षनव्हते ऑक्सिजनचा होता ना.

<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>ऑक्सिजनचा होता. पास..पास..

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>**पास तर करायचा आहे ना, बोलू दया तरी. डॉक्टर साहेब हा जो विषय आला आहे, २ एप्रिल पासून ऑक्सिजनचा सल्लागार नेमणेसाठी पहिल्या वेळेस पण आपण ऑक्सिजनसाठी टाऊन हॉलमध्ये आणि अन्य ठिकाणी व्यवस्था केली होती. परंतु ज्यां लोकांनी बघितले आपण दुर्भाग्य असे बघितले की, कोरोना पेशंट येत नव्हते पण कोरोना पेशंट परत वाढले आपण काढून टाकले.मी फक्त एवढेच निवेदन करतो की, सल्लागार नेमायचाच आहे.त्यासाठी आपले जे ठिकाण निश्चित होते, परत त्या ठिकाणी लवकरात लवकर व्यवस्था करण्यात यावी.कारण की उद्याची स्थिती जी आहे, ती आपल्यांना पण माहिती आहे आणि मला सुध्दा माहिती आहे. संपुर्ण मुंबईमध्ये सर्व हॉस्पिटल पेशंटसाठी फुल झाली आहेत. उल्हासनगरमध्ये एक विषय होता, शांतीनगरच्या हॉस्पिटलला आम्ही लोकांनी विरोध केला होता.परंतु आज आम्हांला पश्चाताप झाला आहे की, आम्ही त्या वेळी विरोध केला होता.ते हॉस्पिटल आज जर नसते तर आपल्या शहराचे लोक आज खुपच भटकले असते आणि याच्या बरोबरच

सल्लागाराचाविषय आहे याच्या बरोबर जोडलेला आहे.आपल्याकडे डॉक्टर्स, नर्स आणि इतर डिपार्टमेंट खुपच कमी आहेत. कारण की मी काल शांतीनगरच्या हॉस्पिटलमध्ये तीन तास थांबलो होतो.आपले सगळे डॉक्टर आणि बाकी लोक एवढी मेहनत करीत होते की, रिस्पेक्ट करीत होते, पेशंटच्या घरचे आले होते, त्यांचे सामान आतमध्ये देणे, त्यांना भेटणे.परंतु ते एवढे थकले होते की, १२, १२ तास १५, १५ तास ते दुप्पट काम करीत आहेत. तर मी डॉक्टर साहेबांना पण निवेदन करतो की, महापौरजी हे खुप गरजेचे आहे की, डॉक्टरांची संख्या वाढली पाहिजे.खुपच कमी डॉक्टर आहेत आणि जास्त काम करीत आहेत आणि आपले जे हेल्पर आहेत, पहिले पाच किवा दहा पेशंट होते.आजच्या दिवसामध्ये इथे संपुर्ण हॉस्पिटल भरले आहे.तिथे या लोकांना एवढे काम आहे की, कोणाला डिसचार्ज दयायचा आहे, कोणाला दुस-या हॉस्पिटलमध्ये पाठवायचे आहे.मी जेव्हा डॉक्टर सिंगला भेटलो, मी प्रत्येक वेळी त्यांच्या सोबत व्हॉटसअपवर बोललो होतो.एवढे की, मला माहितीच नव्हते की, मी जमनादास पुरस्वानी आहेत. चेह-याने ओळखत नव्हत्या त्यांनी प्रत्येक वेळी व्हॉटसअपवर बोलत होत्या.परंतु एवढे रिस्पेक्टली जो पण कार्य चालले आहे.हॉस्पिटलचे खुपच सुंदर प्रकारे चालले आहे.त्यासाठी मी डॉक्टर राजा रिझवानी, डॉ. पगारे यांना धन्यवाद करतो की, आपल्या महानगरपालिकेमध्ये डॉक्टर खुपच चांगले काम करीत आहेत आणि अजून जे हॉस्पिटल तयार करायचे आहेत, ते लवकरात लवकर तयार करण्यात यावेत आणि डॉक्टरांची संख्या वाढविण्यात यावी.कारण की, सर्व डॉक्टर खुप मेहनत करीत आहेत.त्यांना संख्या जरुर वाढवून देण्यात यावी.जसे की सफाई कामगार असतील, हेल्पर असतील, कंपाऊडर असतील, धन्यवाद असतील त्यांची संख्या डबल केली पाहिजे.कारण की आज खुपच त्रास आहे.तर माझी विनंती आहे की, मा. महापौरजी आपण बघाशहरामध्ये खुपच त्रास आहे, पेशंटच्या नातेवाईकांकडून एवढे फोन येत आहेत की, तर डॉक्टर साहेब आपण धन्यवाद करण्यास पात्र आहेत,आपणकृपया यांच्यासाठी करा.

**वैद्यकीय आरोग्यअधिकारी, डॉ. राजा रिझवानी:-**सभापती, महोदय,मी हे सांगू इच्छितो की, जो जमनादास पुरस्वानी विषय काढला आहे, काल आम्ही सुटटीच्या दिवशी पाच डॉक्टर अॅपॉईटमेंटकेले आहेत आणि काल सायंकाळी रेडक्रॉस चालू केले आहे.६० बेड आहेत तिथे रेडक्रॉस हॉस्पिटलमध्ये आणि जसे जसे डॉक्टर सोडून गेले होते, त्यांना आपण परत बोलवत आहेत आणि स्टाफने उद्या त्यांची मुलाखत पण ठेवली आहे.ज्यांचे पण सिडी आमच्याकडे आहे, त्यांना दोन तीन दिवसामध्ये बोलावून अपॉयमेंट दिली जाईल.त्यासाठी आम्ही काल रेडक्रॉस हॉस्पिटल ६० बेडचे चालू केले आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**धन्यवाद, डॉक्टर, राजा रिझवानी, मा. महापौरजी, आपण डॉक्टरांचे आभार मानून त्यांना धन्यवादकरायला पाहीजे.एवढी सेवा आपले डॉक्टर करीत आहेत की, लोक विचार करतात की, सरकारी हॉस्पिटल परंतु आज खाजगी हॉस्पिटलच्या जास्त आपल्या शांतीनगरच्या हॉस्पिटलमध्ये देखरेख होत आहे. बाहेर लोक लाखो रुपये फायदा घेऊन एवढा फायदा घेऊ शकत नाहीत. जेवढी आज तिथे सुविधा मिळत आहेत आणि सर्व लोक नम्रस्वभावाने काम करीत आहेत, त्यांचा सत्कार झाला पाहीजे.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**डॉक्टर साहेब, मा. सभापतीजी, फक्त् एक माहीतीसाठी सर्व सदस्यांना आजच्या परिस्थितीमध्ये एकुण किती बेड तयार आहेत. थोडे माहीतीसाठी सांगा.सर्व मिळून.

**वैद्यकीय आरोग्यअधिकारी, डॉ. राजा रिझवानी:-**आपले ४५० बेड टाटा आमंत्रामध्ये आहेत,ते चालू नाही केले.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**पॉझीटीव्हपेशंटसाठी.

**वैद्यकीय आरोग्यअधिकारी, डॉ. राजा रिझवानी:-**अजून ठेवले नाहीत,पॉझीटीव्ह पेशंटसाठी प्लॅटेनियम हॉस्पिटलमध्ये २०० बेड, आणि २२० बेड तहसिलमध्ये आणि ६० बेड रेडक्रॉससाठी पॉझीटीव्ह पेशंटसाठी ठेवले आहेत.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**म्हणजे४५० च्याआसपास आजची परिस्थिती काय आहे?

**वैद्यकीय आरोग्यअधिकारी, डॉ. राजा रिझवानी:-**आजची परिस्थिती म्हणजे काल आम्ही रेडक्रॉस चालू केले आहे, तेव्हा १५ पेशंट आहेत आणि १७० पेशंट आपल्या तहसिलमध्ये आहेत आणि १४० प्लॅटेनियममध्ये आहेत.

सदस्य, श्री. राजू जग्यासी:-अशी माहिती दिली की, पेशंटला बेड मिळत नव्हते, तर अशी परिस्थिती आहे का? त्यांना बेड कमी पडत आहेत.

**वैद्यकीय आरोग्यअधिकारी, डॉ. राजा रिझवानी:-**नाही सर.सन्माननिय सदस्य असे काहीच नाही.काल पण सुटटीच्या दिवशी रेडक्रॉसमध्ये आणि प्लॅटेनियममध्ये आज सकाळी जाऊन आलो आहे.कुठे तरी चुकीचा समज झाला आहे, आज पण ४० बेड आपल्याकडे तयार आहेत.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**टाऊन हॉलच्या विषयी आम्हांला माहिती दया, टाऊन हॉलमध्ये आपण जी सुविधा केली होती, मा. आयुक्त साहेब...

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:**-राजुजी टाऊन हॉलमध्ये आपण बनवले होते, ते असेच पडले होते, तिथे पेशंट येत नव्हते, तर आम्हीच लोकांनी सांगितले की, ठेवून काय फायदा त्यासाठी भाडे दयावे लागेल त्यामुळे बंद करा.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:**-सर्वच काढून टाकले.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:**-होय.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:**-म्हणजे जो खर्च केला होता तो सगळा पाण्यात गेला.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:**- डॉक्टर साहेब, परत चालू करण्याची संभावना आहे का?

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:**-खर्च केला, पाण्यामध्ये गेला.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:**-नाही, नाही, परत आता पेशंट ज्या हिशोबाने वाढत आहेत.

**वैद्यकीय आरोग्यअधिकारी, डॉ. राजा रिझवानी:**-जर आयुक्त साहेब येतील आणि जर निर्णय होईल. तसेच आपल्याकडे शाळा नंबर १८ पण जव्हारच्या बाजुला रिकामे पडले आहे.ते पण तयार होईल.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:**-म्हणजे पुढच्यासाठी सुविधा ठेवली आहे, आम्हांला असे नाही वाटत की, पेशंट वाढले पाहिजेत, परंतु जर अशी परिस्थिती आली तर आपण सावध राहिले पाहिजे.

**वैद्यकीय आरोग्यअधिकारी, डॉ. राजा रिझवानी:**-आणि आम्ही असा पण प्लॅन करुन ठेवला आहे की, जर आपल्याला गरज लागली तर आय.टी.आय. चा पहिला मजला पण चालू करु शकतो.आम्ही दोन्ही प्लॅन बनवून ठेवले आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:**-या वेळेस मॅडम, जी आपली व्यवस्था आहे, महापालिकेची जे नविन नविन लोक येत होते, तेव्हा खुपच त्यांना त्रास होत होता.आता जे कॉल सेंटर आहेत आणि आपातकालीन व्यवस्था आहे, ती खुपच सुंदर आहे.तिथे आम्हांला कधीच सांगावे लागत नाही की, मी नगरसेवक बोलत आहे. आम्ही फक्त् मॅसेज पाठवत असतो की, हा आमुक, आमुक पॉझीटीव्हपेशंट आहे आणि ते लोक आम्हांला एक तासामध्ये रिप्लाय करतात की, आपण आमुक हॉस्पिटलमध्ये जा, तहसिलदारमध्ये जा, शांतीनगरला जा, ऑक्सिजन लेवल काय आहे? जर आम्ही पेशंटच्या घरच्यांचा पत्ता देतो, तेव्हा ते त्यांच्याशी संपर्क करत असतात. या वेळेचा सिस्टमखुप चांगले चालले आहे.यासाठी आपणअजून काही करु शकता तर जरुर करा.ॲम्ब्युलन्सची सेवा खुपच चांगली आहे,धन्यवाद.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:**-धन्यवाद. डॉक्टरांचे पण आणित्यांच्या टीमचे पण धन्यवाद.

**महापालिका सचिव:**- याच्यामध्ये लिहिते ६ महिने किंवाकोव्हीड संपेपर्यंत ठरावात काय टाकू?

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:**-६ महिने आणि जो पर्यंत कोव्हीड संपत नाही तो पर्यंत मा. आयुक्त…

**महापालिका सचिव:**-नाही, नाही, एक तर ६ महिने येईल किंवा कोव्हीड संपेपर्यंत एकच काही तरी येईल.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:**- कोव्हीड संपेपर्यंत.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:**- कोव्हीड संपेपर्यंत.

**महापालिका सचिव:**-तुम्ही निर्णय घ्या, काय ते?

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:**-कोव्हीड संपेपर्यंत लिहा.

**महापालिका सचिव:**-ठिक आहे, इतिवृत्ताची वाट न पहाता पास…

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:**-इतिवृत्ताची वाट न पहाता पास…

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:**-इतिवृत्ताची वाट न पहाता पास..

**काही सदस्य:**-पास, पास….

**सभापती, श्री.विजय पाटील-** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे . 

---

☑विषय क्र. १:-उल्हासनगर महानगरपालिके मध्ये तात्पुरत्या स्वरुपात (कंत्राटी पध्दतीने) कोव्हिड-१९ करिता ऑक्सिजन सल्लागार (Oxygen Consultant) यांना ६ माहिने किंवा कोविड संपे पर्यंत मुदतवाढ देणेबाबत मा. स्थायी समिती यांचे मान्यतेस्तव सविनय सादर.

प्रस्तावना

वरिल विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिके मध्ये तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर श्री.गुरूप्रसाद गडकरी, मे. वायु सोल्युशन, यांची ऑक्सिजन सल्लागाराची (Oxygen Consultant) उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रात कोविड १९ प्रतिबंधात्मक उपाययोजना संदर्भात सर्व DCHC व DCH रूग्णालयांकरीता रू. ६०,०००/- प्रति माह या प्रमाणे माहे सप्टेंबर २०२० ते माहे डिसेंबर २०२० या ४(चार) महिन्यांकरीता नेमणूक करण्यात आली होती. त्याअनुषंगाने सदर कालावधी मध्ये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामधील कार्यारत DCH व DCHC रूग्णालयांची व ऑक्सिजन पुरवठा करणा-या उपकरणांची ऑक्सिजन सल्लागार (Oxygen Consultant) यांचे कडुन तपासणी सुरू केलेली आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिकेतर्फे कोव्हिड -१९ बाधित रूग्णांच्या उपचाराकरीता खजगी DCHC रूग्णालयांना परवानगी देण्यात आली होती.त्याअनुषंगाने सदर रूग्णालयांमधील ऑक्सिजन उपकरणांची सुस्थितीमध्ये असलेबाबत श्री.गुरूप्रसाद गडकरी, मे. वायु सोल्युशन, सल्लागार (Oxygen Consultant) यांचे कडुन पडताळणी करणे करीता आदेशित करण्यात आले होते. सदर सर्व रूग्णालयांची श्री.गुरूप्रसाद गडकरी, मे.वायु सोल्युशन, सल्लागार (Oxygen Consultant) यांचे कडुन नियमितपणे पडताळणी करण्यात येत आहे.

तसेच श्री.गुरूप्रसाद गडकरी, मे.वायु सोल्युशन, सल्लागार (Oxygen Consultant) यांची मुदत माहे ३१ डिसेंबर, २०२० मध्ये संपत आहे. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिकेतर्फे नव्याने २ महानगरपालिका DCH रूग्णालय शांतीनगर, उल्हसनगर-३ व १ DCHC रूग्णालय रेडक्रॉस रूग्णालय येथे सुरू करण्यात येणार असल्यामुळे तसेच इतर कोव्हिड-१९ करीता कार्यरत रूग्णालये सदर ठिकाणच्या ऑक्सिजन पुरवठया विषयी सल्लागाराची (Oxygen Consultant) यांची आवश्यकता लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच संभाव्य कोव्हिड -१९ च्या दुस-या लाटेचा धोका लक्षात घेता सध्या स्थिती कोरोना विषाणु प्रदुर्भाव पाहता व दुसरी लाड आली मुळे कोव्हिड रुग्णांची संख्या वाढता आहे तसेच दैनंदिन आहवालनुसार रुग्णांचा संख्यतेही वाढ होण्याची निदेर्शनीस येत आहे या बाबत वर्तमान पत्रात रुग्णवाढची माहिती मिळत आहे.

त्यामुळे सबब वरील सर्व परिस्थिती लक्षात घेता श्री.गुरूप्रसाद गडकरी, मे.वायु सोल्युशन, सल्लागार (Oxygen Consultant) यांना एक दिवसांचा खंड देवुन दि.०२/०४/२०२१ ते ३०/०९/२०२१ पर्यंत मा.आयुक्त सो यांनी दिलेली मान्यतेनुसार पुढील ६ महिनेकरिता किंवा कोव्हिड संपे पर्यंत कालावधी साठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.सदरचा खर्च हा सन. २०२०-२०२१ मधील विपरीत परिस्थिती व्यवस्थापन B-२(३) या लेखाशिर्षातून किंवा Covid-१९ या विषाणूच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधितून करणे प्रस्तावित आहे. सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती यांचे माहितीस्तव सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र.६७ दिनांक:— ३०/०३/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारकोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगावर प्रतिबंध व नियंत्रण आणणेसाठी उल्हासनगर उल्हासनगर महानगरपालिके मध्ये तात्पुरत्या स्वरुपात (कंत्राटी

पध्दतीने) कोविड १९ करिता ऑक्सिजन सल्लागार (Oxygen Consultant) यांना कोव्हिड सपेंपर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देत आहे.

या ठरावा अंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता तो अंमलात आणण्यात येईल.

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीनअधिकारी
स्थायीसमितीसभा
उल्हासनगरमहानगरपालिका

---

महापालिका सचिव- विषय क्रमांक २ वाचून दाखवितात.

————————————————————————————————————————

⇨ विषय क्र २:—कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगावर प्रतिबंध व नियंत्रण आणणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना मोफत उपचार मिळणेसाठी उल्हासनगर मनपा क्षेत्रात २००बेडचेसुसज्य असलेले सत्य साई प्लॅटेनियम हॉस्पीटल मासिक भाडे रु. २० लाख + १८ टक्केGST या भाडे तत्वावर घेण्यात आले होते. सद्या कोरोना विषाणू आजाराची दुसरी लाट आली आहे व वाढता प्रादुर्भाव पाहता उल्हानगर मनपाकोव्हिडहॉस्पीटला (सत्य साई प्लॅटेनियम हॉस्पीटला) ६ महिने किंवा कोव्हिड-१९ संपेपर्यत मुदतवाढ देणेबाबचा प्रस्तावमा. स्थायी समितीची यांच्यामान्यतेस्तव सादर.

————————————————————————————————————————

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**मा. सभापतीजी, मी पहील्या विषयामध्ये सांगितले होते की, आमची काही चुकी झाली होती. जेव्हा हा विषय पहिल्या वेळेस आला होता, हॉस्पिटल २० लाख रुपये भाडयाने देणे होते, तेव्हा आम्ही खुपच आक्रमकतेने त्याचा विरोध केला होता की, हे खुप चुकीचे होत आहे, नुकसान होत आहे. परंतु आज आम्हांला या चुकीचा पश्चाताप होत आहे की आम्ही फार मोठी चुकी केली होती.जर आता हे झाले नसते तर पश्चाताप झाला असता मनाला की, आमच्यामुळे खुप सारे पेशंट औषधांपासून वंचित राहीले असते.तर आज खुप आनंद झाला आहे, बहुमताने झाले आहे.आज तेथील जी व्यवस्था आहे. आज आपले गरीब लोक हॉस्पिटलचा फायदा घेत आहेत. कारण की, आपल्याला हे २० लाख रुपये खुपच कमी वाटत आहेत. कारण हॉस्पिटलमध्ये जर कोणी जात होते तर लोक आम्हांला फोन करुन सांगत होते की, इन्ट्रीचेच १ लाख रुपये घेत होते.हॉस्पिटलमध्ये पाय ठेवा आणि १ लाख रुपये भरा. आज खुप चांगले आहे आणि आम्ही तुम्हांला सगळयांना धन्यवाद देतो की, आज हे हॉस्पिटल ठेवले आहे, त्याला ६ महिने वाढवण्यासाठी आम्ही मान्यता देत आहेत. ६ महीने इतिवृत्ताची वाट न पहाता, जर परत वाढले तर परत ६ महीने वाढविण्यात येईल. परंतु ६ महीने.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** दुसरा म्हणजे आज हॉस्पिटल उघडले आहे, तर परिस्थिती कशी आहे? दुसरी व्यवस्था काय आहे?जसे पेशंट वाढत जात आहेत. कोव्हिड संपेपर्यंत पास करा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**सभापती महोदय, मा. आयुक्तमॅडम, जर आपल्याला यासाठीजर अजून चांगले हॉस्पिटल मिळत असेल तर त्यासाठी पण डॉक्टरसाहेब जर कोणी देत असतील किंवा तुमच्याकडे कोणी आले तर आपण घेऊन या.कारण की, आपला खर्चकरण्यापेक्षा जास्त जसे की, पहीले आयुक्तसाहेबांनी ठेवले होते.आपण जो खर्च करतो, त्या पेक्षा बनवलेले हॉस्पिटल आपल्याला मिळाले आहेत. जर असे ५० किंवा १०० बेडचे हॉस्पिटल मिळत असेल तर त्यासाठी पण आपण प्रस्ताव घेऊन या.

**वैद्यकीय आरोग्यअधिकारी, डॉ. राजा रिझवानी:-**त्यासाठी आम्ही भरपूर प्रयत्न करीत आहेत आणि खाजगी हॉस्पिटल पण आम्ही दोन तीन एप्रोच केले आहेत, सेंच्युरीवाल्यांनी पण एप्रोच केले आहे की, कोव्हीडसाठी आम्हांला परवानगी दया आणि आशिर्वाद हॉस्पिटलचा एक प्रप्रोजल आला आहे, तो पण आम्ही एक, दोन दिवसात त्यांना पण आम्ही परवानगी देणार आहेत. तो पण सुरु करण्यात येईल.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-**नाही. नाही. हा विषय पण कोव्हिड संपेपर्यंत पास करा.

**महापालिका सचिव:-** पास...

**काही सदस्य:-**पास, पास....

**सभापती, श्री.विजय पाटील**-सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे .

---

☑विषय क्र. २ :—कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगावर प्रतिबंध व नियंत्रण आणणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना मोफत उपचार मिळणेसाठी उल्हासनगर मनपा क्षेत्रात २०० बेडचे सुसज्य असलेले सत्य साई प्लॅटेनियम हॉस्पीटल मासिक भाडे रु. २० लाख + १८ टक्के GST या भाडे तत्वावर घेण्यात आले होते. सद्या कोरोना विषाणू आजाराची दुसरी लाट आली आहे व वाढता प्रादुर्भाव पाहता उल्हानगर मनपा कोव्हिड हॉस्पीटला (सत्य साई प्लॅटेनियम हॉस्पीटल) ६ महिने किंवा कोव्हिड-१९ संपेपर्यत मुदतवाढ देणेबाबचा प्रस्ताव मा.स्थायी समितीची यांच्या मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावना

उपरोक्त् विषयान्वये सविनय सादर करणेत येते की, मा. आयुक्त यांचेकडील मंजुर टिप्पणी पृष्ठ क्रमांक १ ते १७ अनुसार व मा. स्थायी समिती ठराव क्रमांक-२२, दिनांक १२/११/२०२० अन्वये उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील गोरगरीब जनतेस तात्काळ मोफत आरोग्य सेवा उपलब्ध होण्याच्या हेतुनेकोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगावर प्रतिबंध व नियंत्रण आणणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना मोफत उपचार मिळणेसाठी उल्हासनगर मनपाच्या कोव्हिड हॉस्पीटल (सत्य साई प्लॅटिनियम हॉस्पीटल) या २०० बेडची (अंदाजित १३५ सेंट्रल ऑक्सिजन बेड व ६५ आयसीयु बेड) व्यवस्था असलेले हॉस्पीटलचे साधनसामग्रीसह (Hospital Equipment Set up including Oxygen Pipeline, Liquid Oxygen Tank, Medical Assests, Furniture, General Assets, Miscellaneous) मासिक भाडे रु.२० लाख + १८ टक्के GST (रु. २०,००,००० भाडे + ३, ६०,००० GST = २३,६०,०००/-) (देखभाल व दुरुस्तीसह) या प्रमाणे महानगरपालिकेमार्फत भाडयाने चालविण्यासाठी उल्हानगर मनपा कोव्हिड हॉस्पीटल (सत्य साई प्लॅटिनियम हॉस्पीटल) यांना ६ महिने किंवा कोव्हिड-१९ संपेपर्यत संदर्भिय पत्र क्रमांक-७ रोजीच्या कार्यादेशान्वये दिनांक २१/०९/२०२० रोजी पासुन घेण्यात आले होते व उल्हासनगर महानगरपालिकेचे DCHकोव्हिड रुग्णालय सुरु करण्यात आले होते.

सदर स्थितीत कोरोना विषाणू आजाराचा प्रादुर्भाव पाहता व दुसरी लाट आली असल्यामुळे कोव्हिड रुग्णांची संख्या वाढत आहे. तसेच दैनंदिन अहवालानुसार रुग्णांच्या संख्येतही वाढ होत असल्याचे निदर्शनास येत आहे.तसेच वर्तमानपत्रातही रुग्ण वाढीबाबत माहिती मिळत आहे. सदर ची परिस्थिती पाहता व कोरोना बाधीत रुग्णांस आवश्यकतेनुसार वेळेततात्काळ मोफत आरोग्य सेवा पुरविणे आवश्यक आहे. याकरिता उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जनतेच्या हिताच्या दृष्टीने सदर उल्हासनगर मनपा कोव्हिड हॉस्पीटल (सत्य साई प्लॅटिनियम हॉस्पीटल), शांतीनगर, उल्हासनगर-३ यांना पुढील ६ महिन्याची किंवा कोव्हिड -१९ संपेपर्यत मा. आयुक्त साहेब यांचेकडील मंजुर टिप्पणी दरानुसार रु. २० लाख रुपये + १८ टक्के GST दर माहे या दराने भाडेतत्वावर मुदतवाढ देण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

सदर उल्हासनगर मनपा कोव्हिड हॉस्पीटल (सत्य साई प्लॅटिनियम हॉस्पीटल), शांतीनगर, उल्हासनगर-३ हे रु. २० लाख रुपये + १८ टक्के GST या प्रमाणे दर माहे या दराने पुढील ६ महिने किंवा कोव्हिड -१९ संपेपर्यत भाडेतत्ववार घेतल्यास ६ महिने X रु. २०,००,०००/- लाख भाडे प्रति माहे + ३,६०,०००/- GST १८ टक्के याप्रमाणे एकुण रु. १,४१,६०,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी एक्केचाळीस लाख साठ हजार मात्र) ऐवढा खर्च होणे अपेक्षित आहे. कोणताही करारनामा ६ महिने किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीकरिता करावयाचा असल्यास मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक असते. त्यामुळे सदरचा खर्चहा सन २०२०-२०२१ मधील विपरीत परिस्थिती व्यवस्थापन B-२(३) या लेखाशिर्षातुन किंवा Covide-१९ या विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास त्या विशेष निधातून करण्यासाठी व सदर उल्हानगर मनपा कोव्हिड हॉस्पीटल (सत्य साई प्लॅटिनियम हॉस्पीटल), शांतीनगर, उल्हासनगर-३ हे भाडेतत्वावर चालविण्यास घेणेकामी सदर उल्हानगर मनपा कोव्हिड हॉस्पीटल (खाजगी सत्य साई प्लॅटिनियम हॉस्पीटल) यांना ६ महिने किंवा कोव्हिड -१९ संपेपर्यत मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिति ठराव क्र.६८ दिनांक:— ३०/०३/२०२१

सुचकाचे नाव:— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव:— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारकोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगावर प्रतिबंध व नियंत्रण आणणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना मोफत उपचार मिळणेसाठी उल्हासनगर मनपा क्षेत्रात

२००बेडचेसुसज्य असलेले सत्य साई प्लॅटिनियम हॉस्पीटल मासिक भाडे रु. २० लाख + १८ टक्केGST या भाडे तत्वावर घेण्यात आले होते. सद्या कोरोना विषाणू आजाराची दुसरी लाट आली आहे व वाढता प्रादुर्भाव पाहता उल्हानगर मनपा कोव्हिड हॉस्पीटला (सत्य साई प्लॅटिनियम हॉस्पीटला) यांस कोव्हिड-१९ संपेपर्यत भाडेतत्वावर मुदतवाढ देणेस मान्यता देत आहे.

या ठरावा अंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता तो अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव- विषय क्रमांक ३ वाचून दाखवितात.

—————————————————————————————————————

⇨ विषय क्र ३:—**उल्हासनगर-२ येथील लासी बील्डींग ते श्री.भगवान भालेराव यांचे कार्यालय ते चंद्रशेखर आझाद शाळा ते तुलसी निवास पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे या कामाच्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकाराशी संविदा करणे.**

—————————————————————————————————————

